म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू. प्रवास
सं. क्र. ५८१

REFBK-0020311
REFBK-0020311

म. ग्रं. सं. ठाणें
विषय ३
नों. क्र. ३१

APTE HOME LIBRARY
No.
NAUPADA, THANA.

20399

APTE HOME LIBRARY
No.
NAUPADA, THANA.

पुस्तकें मिळण्याचें ठिकाणः—

**गोविंद हरी फडके** ( लेखक )

मुक्काम व पोष्ट नेरळ, जि. कुलाबा.

REFBK-0020311

REFBK-0020311

१२३३९
५०८
३१
२१।१।५८

## सर्वोत्कृष्ट पण सर्वांत स्वस्त.

# बलवंत मुद्रणालय-रत्नागिरी.

छपाई संबंधीच्या कोणत्याही कामांत ग्राहकांना पुण्या-मुंबईची छपाई कोंकणच्या अल्प किमतींत करून देणें हेंच बलवंत मुद्रणालयाचें वैशिष्ट्य असून मुंबईपासून मंगलोरपर्यंतच्या सर्व कोंकणपट्टींत 'बलवंत मुद्रणालया' एवढें एकही मुद्रणालय नाहीं ही एकच गोष्ट त्याच्या सर्व श्रेष्ठतेचा भक्कम पुरावा होय. आपण एकदां अनुभव घ्या ह्मणजे आमचे कायमचे ग्राहक व्हाल. अधिक माहितीकरितां चौकशी करा.

—व्यवस्थापक, 'बलवंत मुद्रणालय'—रत्नागिरी.

BEST YET CHEAPEST.

# माझी तीर्थयात्रा

२०३९९

## भाग तिसरा

## दक्षिण हिंदुस्थानचा प्रवास.

प्रवासाचे नकाशासुद्धां

ग्रंथकार

**गोविंद हरी फडके**

माझी तीर्थयात्रा भाग १ व २ यांचे कर्ते

सन १९२८.

किंमत सव्वादोन रुपये. व्ही. पी. २०१२.

सुटा नकाशा किंमत ०-४-०

माझी तीर्थयात्रेचा
भाग १, २ व ३ हीं तिन्हीं पुस्तकें सुट्या नकाशासह
एकदम घेतल्यास टपाल खर्च माफ.

हें पुस्तक रत्नागिरी येथें श्रीयुत गजानन विश्वनाथ पटवर्धन यांनीं
आपल्या 'बळवंत' मुद्रणालयांत छापिलें तें गोविंद हरी फडके
ग्रंथकार यांनीं नेरळ जि. कुलाबा
येथें प्रसिद्ध केलें.

सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.

# अनुक्रमणिका.

## चित्रें व नकाशे.


| | | |
|---|---|---|
| हिंदुस्थानचा नकाशा. | | |
| तुळजा भवानी. | ग्रंथाचें पृष्ठ | १०८ |
| पंढरीचा विठोबा रखुमाई. | | ११५ |
| श्रीरामेश्वर. | | १९१ |
| श्रीव्यंकटेश—बालाजी. | | २४५ |
| श्रीजगन्नाथजी. | | ३१७ |
| श्रीमहाकाली. | | ३३२ |


## प्रस्तावना पृष्ठें.


**प्रस्तावना.**

| | |
|---|---|
| अडचणींची परंपरा. | १ |
| लिथोचीं चित्रें कां दिलीं? | २ |
| नकाशाची तयारी. | ३ |
| पौराणिक यात्रांची दुरुस्ती. | ४ |
| यात्रांच्या पुस्तकांत दुसऱ्या गोष्टी कशाला? | ५ |
| अशुद्ध कां राहतात? | ६ |
| स्वतंत्र यात्रा कोणत्या केल्या व कां? | ६ |
| वाचकांस विनंति. | ७ |


## ग्रंथाचीं पृष्ठें.


**उपोद्घात**

| | |
|---|---|
| प्रवासाचे फायदे | १ |
| प्रवासाचे प्रकार | २ |
| यात्रांचे उद्देश | ३ |
| यात्रा विधी ( शास्त्रोक्त ) | ३ |
| ( व्यवहारीक ) | ४ |

**माझी तीर्थ यात्रा भाग २ रा.**

| | |
|---|---|
| ह्या यात्रेचा काळ | ७ |

| | |
|---|---|
| हेतू | ७ |
| तो हेतू साधण्याचीं नवीं व जुनीं साधनें. | ८ |
| त्यांतील फरक. | ९ |
| यात्रेची तयारी. | ११ |
| पैशाची तयारी. | १२ |
| रेलवेची माहिती. | १३ |
| अनुभव. | १६ |
| फुकट ओझें नेणें. | १७ |
| गंगेची व्यवस्था. | १९ |
| डब्यांतून उतरणें. | १९ |
| रेलवेच्या गैरसोयी. | २१ |
| शिधासामान. | २२ |
| अडचणी. | २५ |
| यात्रेचें वर्णन. | ३० |
| घारापुरी. | ३० |
| नाशिक. | ३६ |
| बाटलेले मुसलमान. | ३६ |
| वंशावळीचें महत्व. | ३८ |
| राम सामर्थ्य. | ४२ |
| पौराणिक राक्षस असल्याचा पुरावा. | ४३ |
| त्र्यंबकेश्वर. | ४४ |
| गौतमाची ब्रह्महत्या. | ४६ |
| गोदावरीचा उत्पत्ती काळ. | ५० |
| ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा. | ५२ |
| सप्तश्रृंगी. | ५४ |
| वेरूळ. | ५८ |
| भिन्ननाणें. | ६० |
| दौलताबादचा किल्ला. | ६१ |
| लेणीं. | ६३ |
| घृष्णेश्वर. | ६६ |
| औंढ्या नागनाथ | ७१ |
| भक्तीचें सामर्थ्य | ७२ |
| माहूर | ७४ |
| अमृताची वाटणी | ७५ |
| मातृतीर्थ | ७७ |
| जातीभेदाचें वैशिष्ट्य | ७८ |
| येहेळ गांवचे तुकाराम साधू | ८२ |
| परशुराम अवताराचें कारण | ८२ |
| सहस्त्रार्जुनाचें स्वागत | ८३ |
| ब्राह्मण क्षत्रियांचीं कर्तव्यकर्में | ९० |
| शुद्ध नीति व विशेष नीति. | ९३ |
| गीतेचें तात्पर्य. | ९६ |
| ब्राह्मणांचें कर्तव्य. | ९७ |
| परक्यांचा उद्देश. | ९७ |
| कोंकणस्थांचें मूळ. | ९८ |
| आडनावांची प्रवृत्ति. | ९९ |
| कोकणस्थांची वाढ. | १०० |
| ही मुख्य यात्रा कां झाली? | १०१ |
| मूर्ख गाडीवानाचा प्रसाद. | १०२ |
| एका तिकिट कलेक्टराची कर्तबगारी. | १०३ |
| परळी वैजनाथ | १०३ |
| चांगदेव. | १०४ |
| उतरण्याची सोय. | १०४ |
| जोगाईचें अंत्रें. | १०६ |
| तुळजापूर. | १०८ |

| | |
|---|---|
| सोबतीचा परिणाम. | १०९ |
| भोप्यांची कामगिरी. | १११ |
| कवड्यांचे अलंकार. | ११३ |
| **पंढरपूर.** | ११५ |
| बार्शी. | ११६ |
| गरदींचें महात्म्य. | ११७ |
| वैकुंठीचा महिमा. | ११८ |
| रंगशिळा. | १२१ |
| विठोबाचें आकर्षण. | १२१ |
| **गाणगापूर.** | १२३ |
| एक सुंदर दत्त तसबीर. | १२३ |
| भिमा अमरजा संगम. | १२४ |
| भस्माचा डोंगर. | १२५ |
| भामटेगिरीचा प्रकार. | १२७ |
| **विजापूर.** | १२९ |
| हिंदु मुसलमानांचे शरीरसंबंध | १२९ |
| नव्या व जुन्या कामांचे नमुने | १३० |
| प्रेक्षणीय वस्तु. | १३० |
| गोल घुमज. | १३३ |
| बारनिसाची कंपनी. | १३६ |
| **हंपीविरूपाक्ष.** | १३७ |
| क्षेत्र महिमा. | १३७ |
| सत्व,रज,तमाचे परिणाण. | १३९ |
| रथोत्सव. | १४२ |
| व्यसनेषु सख्यम्. | १४५ |
| कोदंडधारी राम. | १४६ |
| अत्युत्कृष्ट दगडी कलाकुसरी | १४७ |
| चमत्कारिक होड्या. | १४७ |
| किष्किंधा–पंपा. | १४८ |
| एक चमत्कार. | १५० |
| वालीचें दहनस्थान. | १५३ |
| लंकेचें स्थान. | १५४ |
| या यात्रेचें रहस्य. | १५५ |
| **कार्तिक स्वामी.** | १५६ |
| भस्माची कथा व चमत्कार. | १६० |
| एक विलक्षण चोरी. | १६२ |
| **हरीहर.** | १६२ |
| **श्रीरंगपट्टण.** | १६५ |
| दर्यादौलत. | १६६ |
| **म्हैसूर.** | १६७ |
| **बंगलोर.** | १६९ |
| **कोलार.** | १७० |
| **उतकमंड** | १७४ |
| एक ब्राह्मणी हॉटेल. | १७७ |
| दो[illegible]टा शिखर [illegible]. | १७८ |
| कुनूरचें पाश्चूर इन्स्टिटयूट | १८२ |
| **मदुरा.** | १८४ |
| श्रीरंगम्. | १८५ |
| जंबुकेश्वर. | १८६ |
| दाक्षिणी हॉटेलें. | १८६ |
| गोपुरें. | १८७ |
| देवदर्शन. | १८८ |
| **रामेश्वर.** | १९१ |
| रामाचा सेतु. | १९२ |
| रामेश्वराची प्रत्यक्ष पूजा करितां येत नाहीं. | १९३ |
| पूजेची व्यवस्था. | १९४ |
| देवळाचें काम. | १९५ |

लाच लुचपतीची मनाई. १९८
रामेश्वराचें उत्पन्न व खर्च १९९
जगदंबेच्या पालखीचा थाट २०१
तिर्थविधी. २०३
धनुष्कोंडी व सेतू. २०६
यात्रेचें खरें पुण्य. २०८
गंधमादन पर्वत. २०८
कांहीं पौराणिक गोष्टींची सत्यता. २१०
रामेश्वराची पौराणिक कथा. २१३
वरप्रसादाची योग्यता. २१४
कुंभकोण. २२१
चिदंबरम्. २२३
फार भव्य व सुंदर गणपती प्रतिमा. २२३
नटर[illegible]च्या दर्शनाचा [illegible]ाट. २२४
भाषेचा फार्स. २२५
चेंगलपट ऊर्फ पक्षीतीर्थ. २२६
रेलवेचा घोटाळा. २२७
उन्हाळी भातशेती. २२७
येथील शोभा. २२९
पक्षीराजांचें दर्शन. २३०
त्याची फलश्रुती. २३१
एक लबाड खानावळवाला. २३२
कांचीवरम्. २३३
सुब्रह्मण्याचें दर्शन. २३५
चमत्कारिक शौचविधी. २३६
सर्व तीर्थावरचा विधी. २३७
एकांबरेश्वर ऊर्फ शिवकांचीचें मुख्य दैवत. २३८
चमत्कारिक आम्रवृक्ष. २३९
इकडील पालखीचा थाट. २३९
उपाध्येबुवांची लबाडी. २४०
विष्णुकांची व कामाक्षी. २४१
गाडीवाल्याशीं तक्रार. २४३
बालाजी. २४४
पायऱ्यांवर नांवें २४५
माकडांच्या लीला. २४७
चमत्कारीक देशाचार. २४७
देवाच्या पैशाची वसुली. २४८
श्रद्धेच्या कल्पना व फळें २५०
व्यवहारिक दाखला. २५२
मूर्तीपूजेचें रहस्य. २५४
नवसाचे प्रकार. २५७
अवेळीं लग्नमुंजी. २५८
उत्सव व नैवेद्य. २५८
शेषाचल म्हणण्याचें कारण. २६०
दुधाची चमत्कारिक विक्री. २६०
गोविंदजीचें दर्शन. २६१
काला हस्ती. २६१
श्री मल्लिकार्जुन. २६४
भिल्ल किंवा डाकूंचा तडाका. २६४
जाण्याचे मार्ग. २६६
चोरीचें तत्व. २६७
प्रवासाची हकीकत. २७१
सावधगिरीच्या गोष्टी २७२
सामान. २७३

बैलगाडीचा प्रवास. २७४
एक संकट. २७६
आत्मकूट. २८०
डाकूंचें दर्शन. २८१
नागलोटी. २८२
पहाडी प्रवास. २८३
मुंग्यांचीं प्रचंड वारूळें २८४
एका वृद्धाचा दुरभिमान. २८५
पंचरबू. २८५
भीमतोळा. २८७
श्रीमल्लिकार्जुन. २८८
हा कर कोणाचा ? २९३
पाताळ गंगादर्शन. २९४
दोन कारुणिक गोष्टी. २९७
भक्तिमार्गाचे प्रकार. २९९
तेलंग्यांचें आचरट खाणें ३०१
एका महाराष्ट्रीय देशस्थाचा परोपकार व भक्तिरस. ३०२
महानंदी. ३०६
एका स्टेशन मास्तरचा थोरपणा. ३०७
या यात्रेचें महत्व. ३०९
गुप्त घराण्याची राजधानी. ३११
एका खाणावळींतील गफलती. ३१३
एक धर्म रहस्य. ३१४
जगन्नाथपुरी. ३१५
रथोत्सव. ३१९
तीर्थविधी व प्रसाद. ३२०
पाकशाळेंतील प्रसादाची रीत ३२२
जगन्नाथाचा अडका. ३२३
चतुरायुष क्षेत्रें. ३२७
कलकत्ता. ३२५
घड्याळांचा फरक. ३२९
गंगासागर संगम. ३३०
महाकाली. ३३२
तिकिटांचा गोंधळ. ३३५
शोणनदाचा विस्तृत पूल. ३३८
काशी प्रयाग. ३४०
आत्मवंचना व नीचवृत्ति. ३४१
सेतु विसर्जन ३४२
गंगेचे पार्सलाची खबरदारी ३४३
झटकेवाल्याच्या गमती. ३४४
गर्दींत गाडी कशी मिळवावी ३४५
चित्रकूट. ३४६
मंदाकिनी. ३४७
चित्रकूट प्रदक्षिणा. ३४९
भरतागमन. ३५१
भरतास रामाचा उपदेश. ३५२
यात्रारहस्य. ३५५
अत्रि ऋषींचा आश्रम व त्यांचें आदरातिथ्य. ३५७
उपसंहार. ३६५
नर की वानर. ३६५
यात्रेचा समारोप. ३६८
परिशिष्ट १ (यात्रांची सूची) पृष्ठ १
परिशिष्ट २ ( पौराणिक देश ) २६
परिशिष्ट ३ (पौराणिक भूगोल) २९

# प्रस्तावना.

यात्रेचा पहिला भाग प्रसिद्ध झाल्यानंतर दुसरा भाग दक्षिण हिंदुस्थानचा लवकरच प्रसिद्ध होईल, असें त्यांत लिहिलें होतें, त्याप्रमाणें तो प्रसिद्ध करावयाचा, पण शुभ कार्याला अडचणी फार येतात. गवत कितीवेळां मुळासकट उपटून काढलें तरी तें पुन्हां उगवतें व जमिनींतील सर्व पोषक रस खाऊन कलमांचा किंवा मुद्दाम लाविलेल्या नाजूक झाडांना मारितें. त्याप्रमाणें ह्या पुस्तकाचे प्रसिद्धीस अनाहूत बहुत अडचणी आल्या. पहिली मुख्य अडचण ह्मणजे मी पशुपतीनाथाची यात्रा करून आल्यावर तिचें काम प्रथम करावयाचें ही मुख्य अडचण आली. तीही उत्तर हिंदुस्थानचीच यात्रा असल्यामुळें पहिल्या भागाची पुरवणी ह्मणून घ्यावी असें प्रथम वाटलें होतें. पण पुरवणीसारखें तिचें संक्षिप्त रूप होईना. आणि कांहीं झालें तरी हा भाग उत्तर हिंदुस्थानांत मोडतो, ह्मणून दक्षिण हिंदुस्थानचा भाग प्रसिद्ध होण्यापूर्वीं या यात्रेचें वर्णन प्रथम देणें जरूर आहे असें ठरलें. कारण त्याशिवाय यात्रांचा अनुक्रम जमत नाहीं मग त्याला पुरवणी नांव द्या, किंवा स्वतंत्र भागाचें नांव द्या. असें ठरल्यावर तेंच वर्णन थोडें विस्तृत व स्पष्ट करून त्यास दुसरा भाग असें नांव देऊन त्याच्या तयारीस लागून तो प्रसिद्धही केला. त्यालासुद्धां विनाकारण अडचणी आल्याच. त्या तेथें सांगितल्या आहेतच.

ह्या अडचणी सांगून काय होतें? असें कोणी ह्मणतील तर हा मनुष्याचा स्वभाव आहे. त्याच्या मनाचें हें सांत्वन आहे. मनुष्य कशानें मेला हो? असें विचारण्याची वहिवाट आहेच. वस्तुतः हे विचारून निघालेल्या उत्तरांत कांहीं अर्थ नसतो, तरी त्यांत थोडेसें समाधान आहे, हेंच खरें. मला तरी हें समाधान करण्याचें कारण असें कीं, मी पहिल्या भागाची जाहिरात दिल्यापासून लोकांनीं तो भाग

ताबडतोब मागवून नेला. दक्षिणाप्राईझ कमेटीनें व इंदुरच्या ग्रंथोत्तेजक मंडळीनें त्याला बक्षिसेंही दिलीं. मुंबई इलाखा, मध्यप्रांत, वऱ्हाड व बडोदें संस्थान यांत शाळांचे बक्षिसाकरितां व लायब्ररीकरितां तो मंजूरही झाला. त्या पुस्तकावरून कांहीं लोकांना यात्रेची स्फूर्ती होऊन ते लोक यात्रा करूनही आले आणि वर्णन केल्याप्रमाणें हुबेहूब माहिती मिळाल्यामुळें त्यांनीं याचा फारच गौरव केला. या पुस्तकानें आमची उत्तम सोय होऊन कितीतरी पैसे वाचविले. यात्रेचें रहस्य समजून ती सुखावह झाली, असे त्यांनीं धन्योद्गार काढले आहेत. अशा रीतीनें पहिला भाग लोकांना अतिशय आवडल्यामुळें त्यांनीं लगेच दुसऱ्या भागाची मागणी केली. ही मागणी बहुतेकांची आली. ज्या बुकसेलरांकडे हीं विकावयास ठेविलीं होतीं, त्यांनींसुद्धां ह्या दुसऱ्या भागाची मागणी केली. पण दुसरा भाग सवडीनें लवकरच छापवूं असें म्हटलें आहे. अद्याप तो तयार नाहीं असें कित्येकांना त्यांच्या जबाबी कार्डावर व पाकिटावर उत्तरें दिलीं. तरी कांहीं लोकांनीं तुमचा हस्तलेख तरी दाखवाल काय? आम्हांला दक्षिण हिंदुस्थानचे यात्रेस जावयाचें आहे असा प्रश्न विचारलाच! सारांश हें पहिल्या भागाच्या वर्णनाचें फळ आहे. दुसरा भाग नेपाळचा हाही पहिल्या भागाप्रमाणें सर्वत्र मंजूर होऊन त्यालाही बक्षिसें मिळालीं आहेत. आतां तिसऱ्याची शक्य तितकी तयारी करून व अडचणींची कशी तरी संभवना करून हा भाग आमच्या प्रिय वाचकांना प्रेमानें सादर करीत आहें. दिरंगाईची क्षमा होईल अशी आशा आहे.

यात्रांचे पुस्तकांत मुख्यतः प्रवासाचे नकाशे, देवस्थानचे फोटो त्यांच्या निरनिराळ्या भागाचे व छबिन्यांचे फोटो अवश्य दिले पाहिजेत. पण कांहीं ठिकाणचे फोटो, देवाचे ठिकाणीं अंधार असल्यामुळें, सदैव गर्दी असल्यामुळें आणि अवेळीं दार बंद असल्यामुळें घेतां येत नाहींत. यापेक्षां त्या त्या ठिकाणच्या देवस्थानचे फोटो

किंवा चित्रें त्या यात्रेंत मिळतात, तीं बहुधा रंगीत असतात. त्याच रंगीत चित्रांचे फोटो, पुस्तकाच्या पानाचे बेताचे करून घेऊं लागल्यास खर्च फार येऊन फोटोही चांगले निघत नाहींत, असा मला पहिल्या भागांतील फोटोवरून अनुभव आला. म्हणून त्यापेक्षां तेथील वस्तुस्थितीचें हुबेहुब वर्णन करून व तेथील देवतांची चित्रें घेऊन त्यावरून लिथोचीं चित्रें द्यावीं, ह्मणजे त्या योगानें तेथील खरी स्थिति तरी समजेल, म्हणजे त्या देवतेचें खरें दर्शन तरी होईल, या भावनेनें अगदीं निरुपाय होऊन मुख्य मुख्य देवस्थानचीं सहा चित्रें निरुपायानें दिलीं आहेत. दर्शनी व शेवटच्या मळ पृष्ठाच्या चित्रांवरून दक्षिण हिंदुस्थानच्या देवालयांची व रथोत्सवाची स्थूलमानानें कल्पना येईल. कांची क्षेत्राचे देवस्थानचें चित्र व रथोत्सवाचें चित्र हंपी क्षेत्राचें दिलें आहे. हाच नमुना बहुतेक सर्व ठिकाणीं थोडया फार फरकानें सर्वत्र आहे.

मुख्य महत्व नकाशावर आहे. सबब हा नकाशा फार काळजीपूर्वक तयार केला आहे, तरी त्यांत कांहीं थोडया बहुत चुका राहिल्या आहेत. पण त्या क्षम्य आहेत ह्मणजे सहज नजरेंत येण्यासारख्या आहेत. उदाहरणार्थ तापी व्हॅली रेलवेचा फाटा भुसावळेपासून न निघतां जळगांवपासून निघाला आहे, वगैरे. या नकाशांत सर्व भागांतील यात्रांचें प्रत्येक स्थळ, त्यास जाण्याचे मार्गसुद्धां दाखविलें आहे, त्याचा यात्रेकरूस फार उपयोग होईल. जास्त माहिती परिशिष्टांत व विस्तृत माहिती यात्रा वर्णनांत त्या त्या भागामध्यें दिली आहे. यात्रा वर्णनांत ठिकठिकाणीं पौराणिक देशांचीं नांवें आलीं आहेत. ते पौराणिक देश पूर्वी कोठें होते तेही दाखविले आहेत व त्यांचीं नांवें शेवटीं परिशिष्टांत दिलीं आहेत. ह्या पौराणिक देशांपैकीं, जे देश हिंदुस्थानाबाहेर आहेत ते नकाशाचे बाहेर त्या त्या दिशेला दाखविले असून त्यांचीं चालू नांवेंही दिलीं आहेत, त्यावरून त्यांची कल्पना

सहज होईल. सदरहू नकाशा रीतीप्रमाणें पुस्तकांत दिला आहेच. पण प्रवासांत नेहमीं उपयोगी पडावा म्हणून तो चिवट व जाड कागदावर काढून त्याच्या जास्त प्रती काढून त्यांची किंमत चार आणे ठेविली आहे. यात्रेकरूंनीं व प्रवास करणारांनीं हा सुटा नकाशा अवश्य घ्यावा. उपसंहाराप्रमाणें आर्यांच्या प्रगतीचा दुसरा नकाशा उत्तरध्रुवापासून अंतर्वेदीपर्यंत तयार करावा असें मनांत आलें होतें पण त्याचें वर्णन दुसऱ्या भागांत दिल्यावरून व ह्या पुस्तकाच्या शेवटीं तिसरें परिशिष्ट दिलें आहे त्याचे माहितीवरून जरूर वाटल्यास जिज्ञासूला स्वतंत्र नकाशाही काढितां येईल. तिसऱ्या परिशिष्टावरून पौराणिक काळीं पृथ्वीची कल्पना, भूपृष्ठाची वाटणी व त्यांस नावें काय होतीं हें स्पष्ट समजेल. जिज्ञासूनें त्यावरून हात नकाशा काढून आपले संग्रहीं ठेवावा. ह्या वर्णनावरून हें काम आतां भागण्यासारखें झालें आहे असें वाटल्यामुळें तो दिला नाहीं. हा हिंदुस्थानचा नकाशा १९२६ पर्यंत बरोबर दिला आहे. यापुढें जाण्यायेण्याच्या नवीन सोई झाल्या असतील; सबब रेल्वे प्रवासाकरितां प्रवाशानें चालू रेल्वे गाईड घ्यावें. गाईड घेतलें तरी हा नकाशा जरूर पाहिजेच.

पहिल्या भागाच्या पहिल्या परिशिष्टांत ज्या पौराणिक व इतर यात्रा दिल्या आहेत, त्यांपैकीं आतां पाहून आलेल्या मार्गाची त्यांत दुरुस्ती करून त्यांची माहिती वाढवून व त्यांत ऐतिहासिक सृष्टिसौंदर्य व हवा खाण्याचीं ठिकाणें व कारखाने यांची जोड दिली आहे. पौराणिक यात्रांशिवाय राहिलेल्या प्रख्यात ठिकाणची यादी वर्णानुक्रमानें दिली आहे त्यावरून तीं ठिकाणें लवकर समजतील. जीं ठिकाणें पाहून झालीं आहेत किंवा ज्याच्याजवळ न गेल्याचा वर्णनांत उल्लेख आहे, त्यांचें तें वर्णन कोणत्या भागांत केलें आहे तो भाग आंकड्यानें त्या वर्णनाचे शेवटीं दिला आहे. ज्याच्या पुढें भागाचा आंकडा

नाहीं तीं ठिकाणें अद्याप पाहणें राहिलीं आहेत, असें समजावें. तरी त्यांची माहिती इतर ग्रंथावरून व त्या यात्रा करून आलेल्या लोकांच्या सांगण्यावरून दिली आहे. अर्थात ती बरीच विश्वसनीय आहे, पण तो माझा अनुभव नाहीं. सर्व भागांमिळून पाहिलेलीं स्थळें त्या परिशिष्टांत दिलीं आहेतच; क्वचित् राहिलीं असतील. या पुस्तकाचा मूळ उद्देश प्रख्यात पौराणिक यात्रा दाखविण्याचा आहे. पण त्यांच्या रस्त्यावर जीं लहान लहान तीर्थें, क्षेत्रें, ऐतिहासिक स्थळें, सृष्टिचमत्काराचीं स्थानें, कारखान्याच्या जागा सहज लागतील तेवढींच सवडीनुसार पाहतां आलीं तीं पाहून त्यांचीं वर्णनें दिलीं आहेत. पाहण्यासारखीं असून वेळाभावामुळें जी पाहतां आलीं नाहींत त्याबद्दल त्या ठिकाणीं यात्रेकरूंनीं किंवा जिज्ञासूंनीं तीं स्थळें अवश्य पाहून यावीं असें बजाविलें आहे. असें जरी आहे तरी ह्याशिवाय दुसरीं पाहण्यासारखीं स्थळें नाहींत असें मात्र जिज्ञासूंनीं समजूं नये. जिज्ञासूंना सर्व विश्व थोडेंच आहे.

यात्रांच्या अनुषंगानें सृष्टिक्रम विषयक, अद्भुत चमत्कार, ऐतिहासिक, पौराणिक, धार्मिक, सामाजिक, राजकीय व व्यापारविषयक व्यवहारिक अशी माहिती आली आहे, तिचा यात्रेशीं संबंध काय अशी कांहीं लोकांना शंका येण्याचा संभव आहे पण हें त्या त्या यात्रेचें रहस्य आहे. हें समजलें नाहीं तर धोंडापाण्याचे नुसत्या दर्शनानें किंवा ब्राह्मणास दक्षणा देऊन तीर्थविधी केल्यानें कांहीं पुण्य मिळावयाचें नाहीं व यात्रांचा उद्देश फुकट जाईल, सबब ही यात्रा करण्यांत पूर्वजांचा मानवी हित साधण्याचा काय हेतु होता हें समजलेंच पाहिजे त्या धोरणानें तें वर्णन आलें आहे. आतां मी त्या यात्रेसंबंधानें काढलेले विचार सर्वांना पसंत पडतील असें नाहीं; कांहींना निराळे वाटण्याचा संभव आहे पण ह्या दृष्टीनें प्रयत्न व्हावा हाच त्यांचा उद्देश आहे.

मराठी ग्रंथांत प्राय: अशुद्धें राहतात याचें कारण कंपोझिटरचें अज्ञान आहे. हें शास्त्रीय पुस्तक नसल्यामुळें त्याचें शुद्धिपत्र दिलें नाहीं. तरी पण ज्यानें अर्थहानी होऊन मूळ उद्देश जाऊन अनर्थ झाला आहे त्या चुका दाखवणें भाग आहे. अशा चुकांपैकीं पान १०१ खालून पांचव्या ओळींत "स्थांनीं ह्मणजे देशस्थानीं सुद्धां केवळ भोळेपणा थोडा कमी करून" असें पाहिजे तेथें भोळेपणा ऐवजीं मोठेपणा हा शब्द चुकून पडला आहे. व अर्थ हानी झाली आहे. तसेंच पान ३१२ वरून सहावी ओळ यांत गुप्त घराण्याबद्दल गुहा घराणें असें चुकून पडलें आहे. पान १३ मध्यें रेलवेची माहिती दिली आहे, तींत पंधरा शेराच्या आंत उतारूचे ओझें असलें तरी त्यानें ते रेलवेवर वजन करून त्याचें वजन पंधरा शेराचे आंत खरोखर आहे, अशी रसीट घ्यावी ह्मणजे कोठेंच अडचण पडणार नाहीं. अशी रसीट देण्याबद्दल आतां रेलवेकडून पारसल क्लार्कास ताकीद दिली आहे. अशी रसीट नसून गाडींत एखाद्याचें ओझें पंधरा शेरापेक्षां जास्त आढळल्यास त्यावेळीं पंधरा शेराची सवलत न मिळतां सर्व वजनाचा आकार घेतला जाईलच असा आतां रेलवेनें सक्तीचा नियम केला आहे; सबब तिकिटाबरोबर आपल्या बोजाची पारसल क्लार्ककडून रसीट घेण्यास विसरूं नये. जास्त मंडळी बायका मुलें असल्यास हें मुळींच विसरूं नये. थोडें ओझें जास्त असल्यास जरा थोडा चार्ज पडेल, पण पुढें रेलवे नोकरांचा त्रास होणार नाहीं.

या यात्रांपैकीं नाशीक त्र्यंबकची यात्रा दोनदां झाली आहे. पहिली फेरी पंचवीस वर्षांपूर्वीं झाली आहे, तरी दोहींचा अनुभव यांत आहे. तसेंच श्री शैल्य मल्लिकार्जुनाची यात्राही शिवरात्रीसच करावी लागत असल्यामुळें तीही पेन्शन घेतल्यावर मागाहून १९२४ सालीं केली. या यात्रेचा लेखही फार विस्तृत असल्यामुळें दुसऱ्या

भागाप्रमाणें हा स्वतंत्र भाग करावयाचा विचार होता परंतु उगीच ग्रंथसंख्या वाढवूं नये व ह्यांत त्याचा समावेश होण्यासारखा असून एवढीच यात्रा मागें राहूं नये ह्मणून यात्रेकरूंच्या सोयीकरितां तिचाही यांतच समावेश केला आहे. तशीच घारापुरीची यात्राही सवडीप्रमाणेंच केली आहे. बाकी सर्व यात्रा एकदम केल्या असून त्यांची वेळ आरंभीं दिलीच आहे.

पहिल्या दोन भागांप्रमाणेंच ह्या भागांस हस्तें परहस्तें लवकर मदत मिळाल्यास आणखी चवथा भाग समुद्र प्रवासाचा व महाराष्ट्रांतील यात्रा यांचा प्रसिद्ध करावयाचा आहे. आश्रयदाते जशी लवकर मदत करतील त्याप्रमाणें तो लवकर प्रसिद्ध होईल. सदर भागांत अष्टविनायक, राहिलेलीं पौराणिक स्थळें, रामदास, तुकाराम, इत्यादि सत्पुरुषांचीं स्थळें, जजुरी, महालक्ष्मी, भिमाशंकर, गोकर्ण व पंचमहा सरोवरांपैकीं नारायण सरोवर वगैरे प्रख्यात स्थळें राहिलीं आहेत, त्यांचें वर्णन येईल. हें पुस्तक आपल्या मूळ उद्देशाप्रमाणें मध्यम स्थितीच्या मनुष्याच्या उपयोगी व संग्राह्य झालें आहे कीं नाहीं हें त्यांनीं ठरवावें व हस्तें परहस्तें मदत करावी अशी प्रार्थना आहे.

मु. नाळे, जि. कुलाबा<br>तारीख १।१।२८.

गोविंद हरी फडके.<br>ग्रंथकर्ता.



श्री.

# हें पुस्तक कसें आहे ?

पुस्तकाचें बाह्य स्वरूप अगदीं साधें आहे. मनुष्याचा स्वभाव, त्याच्या सवयी व आवड हीं बहुधा त्याच्या कृतींत आढळतात. कृति कितीही कृत्रिम केली तरी तींत त्याचे स्वभावाचें कांहीं तरी प्रतिबिंब पडल्याशिवाय राहातच नाहीं, ह्मणून त्या कृतीवरून शहाणे आपले दूरदर्शित्वानें त्याची परिक्षा करितात. त्याप्रमाणें ह्या ग्रंथ पाहून ह्याचा कर्ता अत्यंत साधा पण मार्मिक असावा असें पुष्कळांनीं बोलून दाखविलें आहे. मुखांतरीं चित्रें अगदीं साधीं, त्यांत दर्शनी चित्रें तर फारच ओबडधोबड, अलीकडच्या पद्धतीप्रमाणें नाहींत ह्मणून लोकांचें मन बहुधा त्यांकडे आकर्षिलें जातच नाहीं. तरी पण याचे वडील भावांची (माझी तीर्थयात्रा भाग १ व २ ह्यांची) ओळख लोकांस झाली असल्यामुळें त्यांच्यानें हें पुस्तक घेऊन वाचल्याशिवाय राहावलें नाहीं. त्यांच्याकडून ह्याच्या आंतल्या स्वरूपाबद्दल मागील भाग १ व २ प्रमाणेंच मोठे प्रशंसोद्गार आले आहेत.

वस्तूला नटविणें हें विशेष अकलेचें काम नाहीं, हें केवळ पैशाचें आहे. आणि अशाकरितां पैसे खर्च करून त्याचा बोजा गुणग्राहक गिऱ्हाइकांवर लादणें इष्ट नाहीं, असा ग्रंथकर्त्याचा समज आहे. "जातीच्या सुंदरांना कांहींही चालतें" असें संगित कविगुरुप्रमाणें ग्रंथकर्त्याला वाटतें; पण हल्लींचें जग फॅशनला भुकेलेलें आहे ह्मणून त्याच्याकरितां तरी यांत कांहीं तरी सुधारणा कराच असें माझ्या अभिष्ट चिंतणाऱ्या मंडळीनें मला अखेर सुचविलें आहे.

पाश्चात्यांपासून उत्पन्न झालेली ही फॅशन मनुष्याला किंवा राष्ट्राला कोणत्या गतीला नेईल हें सांगतां येत नाहीं. हिचे अनिष्ट परिणाम आतां सामान्य मनुष्यास तर जाणवूं लागले आहेत व महात्मा गांधींसारखे ज्ञानी आपला साधेपणा सोडूं नका असा कंठरवानें उपदेशही करूं लागले आहेत. आतां फॅशन ह्मणून कांहीं निराळेपणा इत्राच असेल तर हें पुस्तक साधेपणाच्या योगानें एक प्रकारची फॅशनच घेऊन आलें आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आपली वस्तु जरूर तेवढी सुंदर किंवा नीटनेटकी तरी असावी, असें हल्लींच्या काळीं प्रत्येकास वाटणारच; त्याप्रमाणें मीही त्याचा प्रयत्न केला होता. पण यात्रेंत जशी फसवी मंडळी आढळतात त्याप्रमाणें मीही त्या कामीं फसून निराश झालों आहे. तरी पुढें प्रयत्न सोडणार नाहीं. याउपर आपलें पुस्तक विशिष्ट तऱ्हेनें बांधलेलें असलेंच पाहिजे अशी ज्यांची उत्कट इच्छा असेल ते हें पुस्तक आपले इच्छेप्रमाणें बांधून घेतीलच. इतकी काटकसर करून किंमत ठेविली तरी पुस्तकाची किंमत जास्त आहे असें ह्मणणारे कांहीं लोक आढळलेच. पण त्यांत कांहीं अर्थ नाहीं. आणखीं चार आणे किंमत वाढवून पुस्तक सुंदर केलें असतें तर गिऱ्हाईक वाढलें असतें असेंही कांहींनीं सांगितलें. पण हा मत वैचित्र्याचा प्रश्न आहे. फॅशनेबल ग्राहक वाढले असते तर त्यामानानें गरीब पण जिज्ञासू ग्राहक कमी झाले असते हें उघड आहे.

पुस्तकाच्या अंत:स्वरूपाकडे पाहातां तें मात्र अत्यन्त उपयुक्त व संग्रहणीय आहे व आबाल वृद्ध स्त्री पुत्रांचें मनरंजन करून त्यांची समजूत घालून ज्ञानदायक झालें आहे, ह्याबद्दल मात्र कोणाचाच मतभेद नाहीं. यात्रानुरोधानें प्रसिद्ध केलेले विचार फार उपयुक्त व

प्रशंसनीय आहेत असें बहुतेकांचें मत पडलें आहे. आतां त्यांत आपल्या आवडीप्रमाणें कोणी तयारीला, सृष्ट चमत्काराला, शोधाला, राजकारणाला, धार्मिक विधींना, जातिभेदाच्या विचारसरणीला, किंवा दैविक चमत्कारांना आपले इच्छेप्रमाणें महत्व दिलें आहे एवढेंच. पण ग्रंथकर्त्याला त्या यात्रेच्या ओघानें जें लिहिणें भाग पडलें तेंच त्यानें लिहिलें आहे. कोणाच्या उखाळ्या पाखाळ्या काढून नवीन मतें उपस्थित करण्याकरितां नाहीं असें सुज्ञ वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. मुद्दाम कोणाची कुचाळी काढण्याकरितां कांहीं लिहिलें नाहीं.

याच्या सत्यतेकरितां हें पुस्तक ज्यांनीं लक्षपूर्वक वाचलें आहे, अशा राजमान्य व विद्वान लोकांचे कांहीं अभिप्राय खालीं देत आहें. प्रथम ह्याचे दोन्ही भाग ज्यांनीं फार लक्षपूर्वक व अभिमानानें वाचले असून तिसऱ्या भागाची जे मार्गप्रतीक्षा करीत बसले होते, ते बाबासाहेब साने हे ह्यावेळीं कैलासवासी झाल्यामुळें त्यांच्याबद्दल ग्रंथकर्ता फार दिलगीर आहे. कारण मूळ उत्तेजन त्यांचेंच होतें. आतां दुसरे त्यांच्याच जोडीचे भारताचार्य नानासाहेब वैद्य यांचा अभिप्राय खालीं देत आहें. त्यांच्या दीर्घ व्यवसायापुढें त्यांना हें पुस्तक नुसतें पाहण्याससुद्धां तीन महिने पुरले नाहींत! शेवटीं तीन महिन्यापुढें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें ठेववत नाहीं, असें मी लिहिल्यामुळें त्यांनीं आपला अभिप्राय अतीशय संक्षेपानें दिला आहे. त्यांना सवड असती तर त्यांची खात्री होऊन ह्यापेक्षां श्रेष्ठ अभिप्राय खचित् आला असता, पण दिलेल्या अभिप्रायांतसुद्धां कांहीं कमी नाहीं.

भारताचार्य चिंतामण विनायक ऊर्फ नानासाहेब वैद्य
यांचा अभिप्राय:—

मी. रा. फडके यांचें तिसरें पुस्तक माझी तीर्थ यात्रेचें बरेंच वाचलें. पुस्तक मागील भागांप्रमाणें मनोरंजक असून महत्वाच्या माहितीनें भरलेलें आहे. कोणत्याही क्षेत्राची विस्तृत, धार्मिक माहिती जमवून व त्याजविषयीं ऐतिहासिक स्वरूपाची हकीकत तपासून ती सर्व यांत दिली असल्यामुळें पुस्तक सर्व बाजूनें वाचनीय व संग्रहणीय झालें आहे.

ग्वाल्हेर.
ता. २८।३।२८ } चिंतामण विनायक वैद्य.

—२—

दुसरे भारतीयांविषयीं अभिमान बाळगणारे ब्रह्मर्षि
श्री. नारायण भवानराव ऊर्फ नानासाहेब पावगी
यांचा अभिप्राय:—

श्री.

श्रीयुत गोविंदराव हरी फडके, मुक्काम नेरळ.

सा. न. वि. वि.

"माझी तीर्थयात्रा नांवाच्या आपल्या तीन पुस्तकांपैकीं दुसऱ्या पुस्तकावर मी पूर्वींच अभिप्राय दिला आहे.

२ तदनंतर मला उपलब्ध झाल्यावर पहिला व तिसरा भाग हे देखील मी वाचून पाहिले.

३ ते मुद्दां फार परिश्रमपूर्वक आपण लिहिले आहेत यांत शंका नाहीं. ठिकठिकाणचे नकाशे दिले असून महत्वाचीं देवालयें आणि स्मरणीय स्थळेंही दाखविलीं आहेत.

४ जगोजागीं कोणत्या अडचणी येतात त्यांतून पार पडण्या-साठीं कोणते उपाय योजावे, शिधासामुग्रीची कशा प्रकारची तजवीज आगाऊ करून ठेवावी, मार्गांत कोणत्या प्रसंगांना कसें तोंड द्यावें लागतें, ठिकठिकाणीं लबाड लोक कसे भेटतात, त्यांच्या तडाक्यांतून कसा बचाव करणें इष्ट असतें वगैरे एकना दोन किंबहुना शतशः अडचणींचें चित्र वाचकांपुढें ठेऊन त्यांचे निराकरण कसें करावें, या विषयींचें विवेचन स्वतःच्या अनुभवानें केलेलें असल्यामुळें तें निःसंशय उपयुक्त आहे.

५ कांहीं नवीन चालीरितींची सकारण पूजा करून आमच्या कित्येक इष्ट असलेल्या हिंदू रीतरिवाजांपासून कसें द्विगुणित हित होतें हें सांगोपांग दाखविलें असल्यामुळें तें खचित ध्यानांत ठेविलें पाहिजे. ( भाग ३ रा. पृष्ठांक ९–१० )

६ आगगाडीचें वेळापत्रक सर्व तऱ्हेच्या लोकसमुदायास सम-जावें ह्या हेतूनें भाग ३ रा पृष्ठांक १३ वर केलेली सूचना निःसं-शय संग्राह्य आहे.

७ ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद, सहभोजन, गौरकाय स्त्रीसंबंध, बाट-लेल्यांचा पश्चात अनादर इत्यादिक अनेक गोष्टींचे विवेचन यथार्थ असून तें आपलेपणा कायम ठेऊनच केलेलें असल्यामुळें खचितच मार्मिक आहे. ( भाग ३ पा. ७८, ८०, ३६८, ३७३ )

८ पुढें शेवटीं परिशिष्ट १, २, ३ ह्यांत दिलेली माहिती फारच उपयुक्त व मनोरंजक आहे.

मुक्काम पुणें,
फाल्गुन शुद्ध २ शके १८४९
गुरुवार ता. २३-२-२८

नाना पावगी

—३—

याशिवाय इतर मंडळींचे अभिप्राय न मागतां कसकसे येत असतात त्याचा नमुना कळावा ह्मणून मी न मागतां आलेला एक अभिप्राय नमुन्या करितां पुढें देत आहें. हे गृहस्थ महाबळेश्वर येथील प्रख्यात हिंदू सॅनिटेरियमचे मुख्य डॉक्टर आहेत.

डॉ. चिंतामण मनोहर अन्तुरकर
यांचा अभिप्रायः—

श्री.

कृ. सा. न. वि. वि. आपण सॅनिटोरियमकरितां ह्मणून सवलतीचे दरानें माझी तीर्थयात्रा पुस्तकाचे तीन भाग, त्यांचे तीन सुटे नकाशासह चार रुपये दोन आण्याला व्ही. पी. सह पाठविलेले पावले.

वरील तिन्ही भागांतील माहिती फारच चांगली मनोरंजक व प्रशंसनीय आहे यांत बिलकूल शंका नाहीं. आपला चौथा व शेवटचा भाग प्रसिद्ध होतांच जरूर माझेकडे सवलतीचे दरानें व्ही. पी. नें पाठवून देण्याची कृपा कराल अशी मी आशा करितों. वरील पुस्तकें आपण पाठविलीं त्याबद्दल मी आपला फारफार आभारी आहें.

माझेपेक्षां विद्वान लोकांनीं सदर पुस्तकाला अभिप्राय दिलेले आहेत त्यापेक्षां जास्त अभिप्राय माझ्या सारख्या अज्ञ मनुष्यानें देणें ह्मणजे सूर्यापुढें खद्योत्याचा कितपत उपयोग होणार आहे? एकन्दरींत वरील तिन्ही भाग खरोखरीच संग्रहालायक आहेत व त्याचप्रमाणें चौथा व शेवटचा भागही प्रसंसनीयच होईल हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. कळावें कृपा लोभ असावा हे विज्ञापना.

महाबळेश्वर हिंदु
सॅनिटोरियम
ता. १८।२।२८

आपला.
डॉ. चिंतामण मनोहर अन्तुरकर.
मेडिकल ऑफिसर हिन्दु सॅनिटोरियम
महाबळेश्वर.

वरील अभिप्रायावरून कृत्रिमापेक्षां स्वाभाविक अभिप्रायांची गोडी वाचकांना कळून येईलच. जास्त अभिप्रायांची आवश्यकता नसल्यामुळें दिले नाहींत.

# उपोद्घात.

No..............
NAUPADA, THANA.

तीर्थानामवलोकनम् परिचयः सर्वत्र वित्तार्जनम् ॥
नानाश्चर्य निरीक्षणम् चतुरता बुद्धेः प्रशस्तागिरः ॥
एते संतिगुणाः प्रवासं विषये दोषोस्ति चैकोमहान् ॥
यन्मुग्धा मधुराऽधराधर सुधा पानम् विना स्थीयते ॥१॥

मनुष्य प्रवासास निघाला ह्मणजे तो जसजसा चौकस, विचारी, बहुश्रत व मनमिळाऊ असेल तसतसे त्याला फायदे विशेष प्रकारें होतात. नाना प्रकारच्या तीर्थांचें, देवतांचें दर्शन अनायासें होतें. त्यांतील कित्येकांचे थाटाचे उत्साह दृष्टीस पडतात. लग्नसमारंभ, सभा, बाजार, ठिकठिकाणच्या चालीरिति, पेहराव व धर्म समजुती यांची विशिष्ट माहिती होते. अलीकडच्या पद्धतीप्रमाणें त्यांचे आपसांतील द्वेष व प्रीति हीं दृष्टोत्पत्तीस येतांत. मनुष्य कर्तृत्ववान असला तर त्याला उद्योगधंदा मिळून, अनायासें पैसाही मिळतो; पण तो गबाळ किंवा अजागळ असेल तर त्याचे पैसे जाऊन फजीतीही होते! विद्वानाला ठिकठिकाणचीं सृष्टिकार्यें, त्यांपासून मनुष्यांनीं करून घेतलेले फायदे, सृष्टिशोभा, मनुष्याचें कौशल्य, प्रदर्शनें, अशीं नानाप्रकारचीं आश्चर्यें दृष्टीस पडून त्याच्या बुद्धीला आणखी चतुरस्रता प्राप्त होते व निरनिराळ्या लोकांशीं बोलण्याचा प्रसंग आल्यामुळें बोलण्यांत वाकबगारी येते. सारांश मनुष्याचें एकदेशीयत्व, कुरठेपणा, तुसडेपणा, इतरांच्या बोलण्याचा विचार न करितां मी ह्मणतों तेंच खरें वगैरे दुर्गुण जाऊन तो व्यवहारपटु, कुटुंबवत्सल, धोरणी, सावध, स्वाभिमानी, हिमती, कर्तृत्ववान्, व

सद्गुणी होण्यास प्रवासाशिवाय विकतें शहाणपण घेण्याला दुसरें चांगलें साधन नाहीं. प्रवास हें एक प्रकारचें तप आहे. आपण जें ज्ञान मिळविलें असेल त्याचा पडताळा पाहण्याचें परदेश हें एक साधन आहे. म्हणून मोठमोठे विद्वान शिकून तयार झाले म्हणजे प्रवासाला बाहेर पडतात. श्रीमंत व राजे लोकांस आपल्या ताब्यांत पुष्कळ लोकांस वागवावें लागतें. त्यांचें हृद्गत समजून त्यांविषयीं मनांतून आदर व त्यांवर छाप पडली पाहिजे म्हणून त्यांस व त्यांच्या मुलांसही प्रवास करावा लागतो. इंग्लंडच्या राजांना सुद्धां राज्यावर बसण्यापूर्वीं आपलें राज्य व पृथ्वीपर्यटन करावें लागतें. असे प्रवासा-पासून सर्व प्रकारचे फायदे आहेत. पण जो डोळे उघडून पाहील त्याला आहेत. नाहींतर केवळ विलासी मनुष्यांना हा एक त्रासच आहे. त्यांना वाटतें कीं आपल्या मुलांमाणसांना सोडून कोठें भटकत फिरावयाचें ? पण हल्लीं रेलवे झाल्यामुळें बायकामुलांसुद्धां सुखानें प्रवास करितां येतो. व प्रवासाचा अनुभव बायकामुलांसही मिळतो ! त्यामुळें हल्लींचें लोक सहकुटुंब प्रवास करून आपली हौस पुरवून घेतात.

ज्यांना ऐहिक सुखाकरितां कामानिमित्त प्रवास करावा लागतो किंवा ज्यांच्या तो नशिबीं येतो त्यांना वरील गुण थोडे बहुत प्राप्त होतातच. पण ज्यांना इहलोकींचीं सुखें अनायासें प्रारब्धानें मिळालीं आहेत त्यांना त्याकरितां प्रयत्न करण्याची जरूरी नाहीं; तरी त्यांना तीं तशीं पुढल्या जन्मीं मिळावीं, देहसार्थक व्हावें, अशी इच्छा असणारच. ह्मणून परमार्थाकरितां तरी प्रवासाचा दुसरा प्रकार ह्मणजे यात्रांचा सांगितला आहे. कोणीकडून तरी मनुष्यानें घराबाहेर पडून आपली सुधारणा करून घ्यावी. हाच त्यांचा उद्देश दिसतो आतां प्रवासाच्या सोई उत्तम झाल्या आहेत, वाटेंतील दगा फटका नाहींसा झाला आहे, यामुळें प्रवासापासून जितका उपयोग व्हावा तितका होत

नाहीं. गावांत आपल्याघरांतून निघून आपल्या मित्राच्या घरांत जाण्या-प्रमाणें हल्लींचा प्रवास होतो अशीं साधनें निर्माण झालीं आहेत. हें ज्ञान प्राप्त व्हावें ह्मणून आमच्या धर्मशास्त्रकारांनीं या यात्रा कशा कराव्या त्याचे नियम सांगितले आहेत ते प्रथम पहिल्या भागांतच सांगावयास पाहिजे होते पण दोन्ही भागांतील यात्रा हिमालयाच्याच असल्यामुळें अनायासें पायीं प्रवास होऊन इष्टकार्य थोडेंबहुत होतेंच पण ह्या भागांत आधुनिक साधनांचा सुळसुळाट असल्यामुळें हा विधि मुद्दाम येथें सांगितला आहे. धर्मशास्त्राप्रमाणें

## यात्रांचे उद्देश

असे आहेत. मोठमोठ्या पापांच्या प्रायश्चित्तार्थ जशीं कृच्छ्र चांद्रायणादि कष्टसाध्य व्रतें सांगितलीं आहेत, त्याचप्रकारें तीर्थयात्रा विधीही सांगितले आहेत. त्यांत त्यांनीं तीर्थांची योग्यता, स्थानाचें दूरत्व आणि ती यात्रा करण्याचे क्लेश इत्यादिकांचें तारतम्य लक्षांत आणून, गुन्ह्याचें स्वरूप लक्षांत घेऊन प्रायश्चित्ताची योजना केली आहे, हें उघड दिसून येतें. तीर्थें व क्षेत्रें यांच्या यात्रा शास्त्रोक्त नियम धारण करून केल्या असतां त्यांच्या योगानें देहास क्लेश, श्रम व दंड होऊन पापांचें क्षालन होतें, आणि पुण्यप्राप्ति होऊन चित्तशुद्धिद्वारा त्या यात्रा ज्ञानप्राप्तीसही कारणीभूत होतात. कारण हें एक प्रकारचें तपच आहे. हें तप धर्मशास्त्राप्रमाणे कसें करावें ह्याबद्दल

## यात्राविधि

सांगितला आहे. तो असाः—प्रथम दिनशुद्धि पाहून पहिल्या दिवशीं घृतश्राद्ध करून निघावें. दुसरे दिवसापासून प्रातःकाळीं स्नानादि नैमित्तिक विधी करून ईश्वराचें नामस्मरण करीत पादचारी मार्गक्रमण करावें. दुपारचेवेळीं मुक्काम करून भोजन वगैरे माध्यान्हकर्म करावें. भोजनोत्तर मार्गक्रमण करूं नये. प्रतिग्रह, परान्न, स्त्रीसंग इत्यादि

वर्ज करून सत्य भाषण व ब्रह्मचर्यादि नियम धारण करावे. तीर्थ प्राप्त झालें असतां तत्प्रयुक्त उपोषण, क्षौर, स्नान, तर्पण, श्राद्धादिक-विधि करावे. श्राद्धादि विधि करणें उक्त नसल्यास देवब्राह्मण तरी अवश्य करावे. शेवटीं यात्रा संपल्यावर व आपल्याघरीं आल्यावर दधिश्राद्ध करून पहिल्या भागांत सांगितल्याप्रमाणें मांवदें करून शास्त्रोक्त यात्रेची समाप्ति करावी. मार्गक्रमण करीत असतांना छत्री किंवा जोडा धारण केल्यास चतुर्थांश पुण्य नष्ट होतें. वाहनारूढ झाल्यास अर्धें फळ जातें. यास्तव यात्रेंत त्याचा उपयोग करूं नये. आतां आग-गाडीनें अगर बोटीनें किंवा मोटारीनें यात्रा केली असतां ती कष्ट व श्रम न लागतां सुखानें होते. यामुळें यात्रेचा मुख्य उद्देश जो देहदंड किंवा शारीरिक तप किंवा काटकपणा यावयाचा तो बिलकूल साधत नाहीं. व इतर नेम धर्महीं फारसे घडत नाहींत. म्हणून यात्रेचें जितकें फल प्राप्त व्हावें तितकें न होतां फक्त ज्या तीर्थी व क्षेत्रीं स्नानदानादिक कृत्यें करण्यांत येतील तेवढ्याचेंच फल प्राप्त होईल. हल्लीं लौकिक दृष्टि देवधर्मावरून उडून जात असल्यामुळें देव, तीर्थें व यात्रा यांच्या विषयीं अनुदार भावना उत्पन्न होऊं लागली आहे; पण साधकानें तेथील मानुष अत्याचाराकडे लक्ष न देतां तीर्थ व देवता यांचाच महिमा पहावा म्हणजे त्यास निराश होण्याचा प्रसंग येणार नाहीं.

हा यात्राविधि शक्य तितका शास्त्राप्रमाणें आचरला जावा म्हणून येथें सांगितला आहे. शक्याशक्यतेचा विचार व सवड हीं ज्यांचीं त्यांनीं पहावीं. वेळ, सवड, रेल्वे, बोटी, यांच्या अडचणांमुळें किंवा सोयीमुळें याप्रमाणें टाईमशीर यात्रा-विधि होणें शक्य नाहीं. पण ज्यांना केवळ पायींच यात्रा करावयाची आहे, व पुष्कळ सवड आहे त्यांना हा मार्ग सोयीचा आहे. जेवण झाल्यावर दुपारीं चालूं नये असें यांत सांगितलें आहे. त्यांत त्यांचा उद्देश नुसतें केवळ बसून रहावें असें नाहीं. तर त्या ठिकाणीं हिंडून तेथील उपयुक्त

माहिती म्हणजे ऐतिहासिक, पौराणिक, स्थानिक, लौकिक आचार-विचार, स्थानमहात्म्य व त्या संबंधानें कांहीं पौराणिक विशेष कथा असल्यास तेथील पौराणिक महात्म्य वाचून तें अवश्य पहावें. ऐतिहासिक गोष्टींकरितां सरकारी गॅझिटियर्स पहावे. उद्योग धंदे, कला कौशल्य, विशेष संस्था, सार्वजनिक संस्था, लोकशिक्षक व पुढारी व त्यांचे उद्देश यांची माहिती करून घ्यावी. त्या ठिकाणचे आसपास कांहीं बघण्यासारिखें असल्यास मुद्दाम बघून यावें. केवळ धार्मिक गोष्टींकडेच लक्ष देऊं नये. या करितां जास्त वेळ लागला तरी कांहीं हरकत नाहीं. या सर्वांचा उपयोग आपल्या आचरणांत व कृतींत आणावा. व त्याचा फायदा लोकांसही करून द्यावा. शक्य तितका परोपकार करावा. आगगाडींत सुद्धां शक्य तितकी लोकांची सोय करावी. लोकांशीं सलगीनें वागावें. पण आपल्या सावधपणांत अंतर करू नये. आपण उपाध्या-कडे उतरण्यास जातों त्या ठिकाणीं देवब्राह्मण आपल्या शक्तीप्रमाणें केल्याशिवाय राहूं नये. निदान आपलें जेवण तरी त्यांच्या अंगावर पाडूं नये. आपल्या तसदीप्रमाणें त्याला त्याचा फायदा करून द्यावा. आतां सर्व प्रकारचे यात्रेकरू सारख्या दर्जाचे नसतात म्हणून यात्रे-करूंपासून उपाध्यास कमी जास्त फायदा होणें अपरिहार्य आहे. ते श्रीमंत लोकांचीं उदाहरणें सांगून पैसा उपटण्याचा प्रयत्न करतात, पण आपण त्यांच्या नादीं लागू नये. आपल्या व त्यांच्या योग्यतेप्रमाणें व्यवहार ठेवावा. उसनवार दानधर्म करूं नये. ह्या गोष्टी महत्वाच्या म्हणून ठिकठिकाणीं अनेकवार सांगितल्या आहेत, आणि या धोरणानें मी पुढच्या यात्रा केल्या आहेत.

---

स्वस्तिक वाच



स्वस्तिक वाचनालय
नौपाडा - ठाणे.
क्रमांक २
अनुक्रमांक ३९

# माझी तीर्थयात्रा.

## भाग ३ रा.

## दक्षिण हिंदुस्तानचा प्रवास.

ता. २ मार्च १९२० ते ता. ८ मे १९२० पर्यंत.

उत्तर हिंदुस्तानचे यात्रेचे वेळीं आणलेली गंगा रामेश्वरास समर्पण करून तेथून सेतू आणून पुन्हा प्रयागांत त्रिवेणींत यथाविधि विसर्जन करून गंगा व तीर्थप्रसाद घेऊन यात्रा समाप्त करणें राहिलें होतें, तें यावेळीं केलें.

संसारांत गढून गेलेल्या माणसास नेहमीं रोजचा व्यवसाय व त्याच त्याच मनुष्यांशीं नेहमीं प्रसंग येत असल्यामुळें राग, लोभ, द्वेष, मत्सर वगैरे विकार मनांत येऊन संसारदु:खें भोगावीं लागतात. तीं दु:खें टाळण्यास मन संसारांतून क्षणभर तरी अन्य मार्गाकडे नेणें जरूर आहे. पण एके ठिकाणीं बसून भोंवतली परिवार तोच असल्यामुळें त्यांतून अन्य मार्गाकडे मन लावणें मुष्किलीचें आहे. सबब शरीरासुद्धां मनास न्यावें लागतें. एके ठिकाणीं बसून कंटाळा आला म्हणजे शारीरस्वास्थ्या-करितां जसें दुसरे ठिकाणीं जाणें-पाय मोकळा करण्याकरितां जाणें-जरूर आहे, तसेंच मन:स्वास्थ्याकरितां किंवा मन जोमदार अथवा ताजें

होण्याकरितां त्याला अन्य व्यवसायांत नेणें जरूर आहे. याकरितां खेळ, नाटकें, तमाशे, लायब्ऱ्या व इतर करमणुकीचीं साधनें यांच्या योजना हल्लींच्या सुशिक्षितांनीं केल्या आहेत. पण आपल्या पूर्वजांनीं याकरितां कांहीं गोष्टी सक्तीनें केल्या जाव्या ह्मणून धर्मांतच गोंविल्या आहेत; स्नानसंध्या, स्तोत्रपाठ, पूजा, देवदर्शनास जाणें, तेथें क्षणभर तरी बसणें, हव्य, कव्य, व्रतें, लग्नकार्यें, कथाकीर्तन, उत्साह वगैरे कितीतरी भिन्न रुचीच्या गोष्टी वेळोवेळीं करावयाच्या ठरविल्या आहेत. धर्मांत त्यांची योजना झाल्यामुळें हीं कृत्यें नियमानें विधियुक्त होऊन व मन:शुद्धि होऊन पुन्हा व्यवहारांत बुद्धि सरळ चालावी, हाच त्यांचा मुख्यत्वें प्रधान हेतु दिसतो. इतर हेतू त्यांत नाहींत, असें मात्र नाहीं ! शिवाजी, नानाफडणीस वगैरे राजकार्य-धुरंधर त्यांस क्षणाची सुद्धां फुरसत नसतां रामदास तुकारामाच्या कीर्तनास ते अवश्य जात. इतकेंच नव्हे तर कसलाही प्रसंग त्या वेळीं आला तरी कीर्तनांतून उठत सुद्धां नसत व मन:स्वास्थ्य जाऊं देत नसत. शिवाजी महाराज तुकारामाच्या कीर्तनास गेले असतां मोंगलांचें धरणें आलें तरी उठले नाहींत ह्या गोष्टी इतिहास प्रसिद्ध आहेत. मन:स्वास्थ्याच्या जुन्या व नव्या साधनांत फार फरक आहे. नवीं साधनें शांततेच्या वेळींच मिळतील व सवडीप्रमाणें उपयोगी पडतील, पण जुनीं, राज्यक्रांती चालू असतांसुद्धां सुरू असतात. नवीं साधनें व्यावहारिक आहेत व जुनीं पारमार्थिक आहेत. यामुळें नव्या साधनांनीं मनाचा व्यवसाय बदलेल पण तें शुद्ध होणार नाहीं. मन शुद्ध होण्यास तें ईश्वरपरायणच केलें पाहिजे, ह्मणजे नव्यांत इहलोकचें सुख आहे पण जुन्यांत इहपरलोकचें सुख आहे. ह्मणून नव्या मार्गांपेक्षां जुने मार्गच श्रेष्ठ होत. पण जुने मार्ग धार्मिक, त्यांवर इंग्रजांचा शिक्का नाहीं ! सबब ते आचरणें लाजिरवाणें आहे असाच अलीकडील सुशिक्षित मंडळींचा समज झाला आहे. लोक

संध्याकाळीं अगदीं पाण्याशेजारीं हवा खात बसतात; पण कपडे काढून हातपाय धुऊन व ओल्या हाताचा सर्व शरिरास स्पर्श करून संध्या करण्यास सांगितलें तर त्यांना तें आवडत नाहीं. पण हवा खाण्याचा शास्त्रोक्त उद्देश संध्या केल्यानें जसा सिद्धीस जातो तसा नुसती डोक्यावरची टोपी काढून सिगारेट ओढीत बसल्यानें जात नाहीं. ह्या गोष्टी अनुभवानें सतत आचरल्यास समजतील. संध्या करीत बसल्याने आंग उघडें राहून त्याला शुद्ध हवा मिळते. सर्व अवयवांना पाणी लागल्यानें ते तेजस्वी होतात. मंत्रोच्चारानें हवा योग्य प्रमाणानें फुःफुसांत शिरून रूधिराभिसरण उत्तम होतें व मन ईश्वरपरायण केल्यानें तें शुद्ध होऊन तेजस्वी व सामर्थ्यवान् होतें हे ऐहिक उपयोग स्पष्ट आहेत. तसेंच नवीन मंडळी रोज २ मैल सहल करून येईल, परंतु त्यांस रोज सकाळीं सूर्यास साष्टांग नमस्कार घालीत जा, असें सांगितलें तर, त्यांस तें कसेंसेंच वाटतें! पण ह्या रपेटीपेक्षां नमस्कारांनीं सर्व अवयवांना सारखा व्यायाम मिळून अंतःशरीर शुद्ध होतें व अनायासें स्वधर्माप्रमाणें वागल्याचें श्रेय मिळतें, हें त्यांना समजत नाहीं. याचें मुख्य कारण मुलांची लहानपणापासून हल्लींच्या शिक्षणानें शिस्तच बिघडली आहे हें होय. लोकांना राजकर्त्यांचें अनुकरण करावें असें वाटतें, परंतु सुदैवानें हल्लीं लोकांचा ...समज बदलून आतां जुन्याचें पुनरुज्जीवन होत चाललें आहे, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे; आणि या करितांच सुज्ञ ग्रंथकारांना नव्योपेक्षां जुन्याचें महत्व जास्त दाखविणें भाग पडत आहे. नवें सर्वथा वर्ज करावें असें माझें मत नाहीं, पण त्यांतील बहुतेक भाग निःसत्व असल्यामुळें तें करूं नका असें सांगितलें तरी देशकालाप्रमाणें मनाची प्रवृत्ति तिकडे होणारच! जुने मार्ग चढावाचे अर्थात कठीण आहेत. पण त्यांच्या आचरणानें मन जोमदार व सुदृढ बनतें. पण नवे उताराचे-सोपे-असल्यामुळें व नव्यांच्या आचरणानें मन निकस व लेचेंपेचें

बनतें. म्हणून जुन्याचें आचरण सक्तीनें करून केवळ करमणुकी करितां कधीं कधीं नवें आचरावें म्हणजे मन जोमदार बनून त्याची करमणूक व मनरंजनही होईल. हल्लीं सुधारलेल्या आचरणानें नवीन मंडळी निकस व बिनजोमाची होत चालली आहे. आतां देशास कर्तृत्ववान् मंडळीची फार आवश्यकता भासूं लागली आहे. ह्मणून सर्वांकडून त्याचा योग्य प्रयत्न झाला पाहिजे. असें केल्यानें जुन्याचें पुनरुज्जीवन होऊन त्याबद्दल अभिमान वाटूं लागेल व नवीन पिढी कर्तृत्वसंपन्न निपजेल.

संसारांतील लहानसान सुख दुःखें वरील उपचारांनीं शांत होतील. परंतु एकजीव झालेल्या भार्येचा किंवा पतीचा वियोग, कर्तृत्वसंपन्न पुत्र-वियोग, अकस्मात झालेली द्रव्यहानी अशा सारख्या तीव्र हानीच्या योगानें मनुष्य कधीं कधीं वेडे बनतात. त्यांस कशाचीहि गोडी लागत नाहींशी होते. अशा वेळीं महायात्रा केल्यानें व साधुसंतांच्या दर्शनानें व त्यांच्या उपदेशानें या नश्वर जगाची पूर्ण ओळख होऊन मन ईश्वरपरायण होतें व तो आपलें कर्तव्य म्हणुन परमेश्वरावर भरंवसा टेवून इहलोकचीं सर्व कर्मे यथाविधी व उत्साहानें करूं लागतो. पण त्याचें मन स्थिर झाल्यानें त्यास सुखदुःख मात्र होत नाहीं. हा यात्रेचा मुख्य फायदा आहे. याचा अर्थ ज्यांचेवर असे प्रसंग येतील त्यांनीं मात्र यात्रा कराव्या असा नाहीं. 'देशाटनं पंडित मित्रताच' वगैरे अन्य फायदे असून त्यांचा पहिल्या भागांत ऊहापोह करून स्पष्टरीतिनें दाखविले आहेतच ते अवश्य वाचवे. पहिल्या भागाची प्रस्तावना वाचल्याशिवाय व त्यांची माहिती केल्याशिवाय याचा कांहीं उपयोग नाहीं.

अशा रितीनें मन उद्विग्न झालें असतां यात्रेची जशी तयारी करावयास पाहिजे तशी न करितां केवळ मन उद्विग्न झालेलें पाहून लोक एकदम यात्रेस निघतात व त्यांचा पस्तावा होतो. तसा होऊं नये ह्मणून—

# या यात्रेची तयारी

कशी करावी हें प्रथम सांगतों. यासंबंधें पहिल्या भागांत खुलासा केला आहेच त्याचें हें थोडें सुधारलेलें या यात्रेला लागू असें दिग्दर्शन आहे. कोणत्याही कामाची अगोदर तयारी करून तें केलें असतां काम उत्तम होऊन त्यापासून खरा लाभ होतो. नाहींतर काम बिघडून पस्तावा होतो. तोच नियम यात्रांसही लागू आहेच. प्रत्येक भागाच्या यात्रा भिन्न परिस्थितीच्या असल्यामुळें त्यांची तयारीही प्रत्येक भागांत भिन्न प्रकारची लिहावी लागत आहे.

यात्रेस निघण्यापूर्वीं प्रथम शरीरप्रकृति सुदृढ व निरोगी केली पाहिजे. ज्यांची प्रकृत मूळचीच चांगली आहे त्यांस फारसा प्रयत्न करण्याचें कारण नाहीं. तरी पण वेळीं अवेळीं जेवण, उन्हातान्हांत—पायांत कांहीं घातल्या वांचून—हिंडणें, थंड पाण्याचें स्नान, वाटेल तेथें आणि फारशी हंतरूण पांघरुणाची पर्वा न करितां झोंप येणें, प्रसंगीं मिळेल तसें जवणें व रेल्वेस्टेशनवर घाणेरडे पदार्थ मिळतात त्यांच्या उपयोगाची संवय न ठेवणें, दिवसांतून केव्हांतरी एकदां जेवून समाधान होणें, गर्दीतून जाऊन आपली वाट काढणें, भिन्न पाणी पिण्याचा परिपाठ ठेवणें वगैरे गोष्टींची संवय जरूर केलीच पाहिजे-नव्हे घसवट केली पाहिजे. ह्मणजे अशा गोष्टी केल्या तरी थकवा येतां कामा नये व प्रकृति बिघडतां कामा नये. अशी शरीराची व मनाची तयारी करणें हेंच ह्या यात्रेचें मुख्य तप आहे. कोणी ह्मणतील उन्हांतून जातांना आह्मीं पायांत जोडा किंवा बूट घालूं व डोक्यावर छत्री घेऊं. पण तसें नेहमीं साधत नाहीं. कांहीं यात्रा जोडा किंवा बूट कांहीं न घालतां अनवाणीच त्या केल्या पाहिजेत, असा प्रतिबंध आहे. ज्या ठिकाणीं सर्व यात्रा अगदीं अनवाणी जाते तेथें आपण जोडा किंवा बूट वापरणें हास्यास्पद आहे. याचप्रमाणें वर सांगितलेल्या गोष्टींची

संवयच पाहिजे. नाहीं तर ताप किंवा दुसरें दुखणें येऊन मनःस्वास्थ जातें, व अनिवार यात्रा क्लेश होतात. शरीराला काटकपणा येण्याला रोज २।३ मैल फिरावें किंवा १०।१२ तरी नमस्कारांच्या आवृत्त्या सकाळीं सूर्यास घालाव्या. अशा रीतीनें शरीराची तयारी झाल्यावर

## पैशाची तयारी

हें दुसरें काम आहे. यात्रेस लागणारा पैसा ज्यानें त्यानें आपल्याजवळ मागें पहिल्या भागांत सांगितल्याप्रमाणें भिन्न भिन्न ठिकाणीं ठेवावा. व त्या शिवाय यात्रेंत पैशाची अफरातफर झाली तर पैशाची वाण पडूं नये ह्मणून आपलें पत्र किंवा तार गेली असतां आपणांस ताबडतोब पैसा मिळेल अशी तजवीज करून ठेविली पाहिजे. ह्मणजे दोघांतिघां-जवळ तरी अगाऊ पैसे देऊन ठेविले पाहिजेत. उत्तर हिंदुस्तानच्या यात्रेंत चोरांचें बंड कमी पण दक्षिण हिंदुस्तानचे यात्रेंत हें फार. गबाळपणें वागल्यानें पैसा गेल्यामुळें रोज कोणी तरी यात्रेकरू रडत असतात! हिमालयाचे यात्रेंत सहसा चोरी होत नाहीं उत्तर हिंदुस्ता-नांत वस्तु राहिल्यास चोरीस जाते. पण दक्षिण हिंदुस्तानांत पैसा अगर वस्तु चोरण्याचा प्रयत्न करितात हें फार वाईट आहे! देवळांत, धर्मशाळेंत, खानावळींत, स्टेशनवर, जिकडे तिकडे चोरांपासून सावध रहा अशा पाट्या लाविल्या आहेत. पोलीसचा बंदोबस्तही आहे, पण चोऱ्या थांबत नाहींत. ह्मणजे इतके चोर बिलंदर असतात असें नाहीं, पण लोकच खराब व पोलीस त्यांस सहाय्य करितें. किंवा तें तिकडे मुळींच लक्ष देत नाहीं, असेंच ह्मणावें लागतें!!

याकरितां धर्मशाळेंत न उतरतां पंड्याकडे उतरावें हें बरें. पंड्याकडे उतरल्यानें थोडे जास्त पैसे खर्च होतात, त्याचे इच्छेप्रमाणें कांहीं कमजास्त दानधर्म करावा लागतो, पण त्याचें दान तरी आपल्या हातून होतें. ह्मणून त्याबद्दल विशेष वाईट वाटत नाहीं.

चोरी होण्यापेक्षां तें बरें असें कोणीही कबूल करील. उत्तर हिंदुस्थानच्या यात्रेंत हवेशीं झगडण्याचा प्रसंग येतो, पण दक्षिण हिंदुस्थानांत अशा रीतीनें माणसांशीं झगडण्याचा प्रसंग येतो. दक्षिणेंत बहुतेक सर्व प्रवास रेल्वेनें करावा लागतो. या करितां—

## रेल्वेची माहिती

अवश्य असावी. घोरपड्यांच्या पुस्तकांत मराठी नकाशा दिला आहे व रेल्वेची माहितीही दिली आहे. पण ती पुरेशी नाहीं. विश्वनाथ गणेश जावडेकर वकील धुळें-खानदेश यांचें पुस्तक घ्यावें. माहितीचें पुस्तक अगदीं लहान आहे. शिवाय टाईम टेबल समजण्यापुरतें तरी इंग्रजी आलें पाहिजे. व्यवहारापुरतें इंग्रजी आल्याशिवाय दक्षिण हिंदुस्थानची यात्रा होणें फार कठीण आहे. दक्षिणेंतील कर्नाटकी, तेलंगी, मल्याळी या भाषा व त्यांची लिपी ह्या अगदीं भिन्न आहेत. हिंदुस्थानी व इंग्रजी येत असलें ह्मणजे गाड्यांच्या वेळा समजून ठिकठिकाणीं लावलेल्या पाट्या वाचतां येतात व कसा तरी गुजारा होतो. पण कांहीं ठिकाणीं उपाय अगदीं चालत नाहीं. या करितां बेळगांव समाचार प्रेसमध्यें इंग्रजी, मराठी, हिंदुस्तानी, कानडी, तेलंगी, अरबी ह्या भाषांचा मिळून एक कोश मिळतो तो घ्यावा, त्यांत जरूर ते व्यवहारोपयोगी शब्द सर्व भाषांत दिले आहेत. पुस्तक लहान १०।२० पानांचेंच असून किंमत २।४ आण्यापर्यंतच आहे तें संग्रहीं असावें. कपडे व भांडीं अगदीं बेताचीं असावीं. ही यात्रा उन्हाळ्यांत करावयाची असल्यामुळें कपड्यांची फारशी जरूर नाहीं. तसेंच क्षेत्रासंबंधानें तेथें देव ब्राह्मण करावा लागत असल्यामुळें आपलें भोजनही पंड्याकडे त्यांतच होतें. सर्व दक्षिण हिंदुस्थान पंच द्रविडामध्यें मोडत असल्यामुळें महाराष्ट्रीयांस द्राविड ब्राह्मणाकडे जेवणास हरकत नाहीं. शिवाय सदर्न मराठा व साउथ इंडियन रेल्वे यांच्या मुख्य मुख्य

स्टेशनवर तेलंग्यांच्या खानावळी असून त्या चालविण्याचा मक्ता तेलंगी ब्राह्मणाकडेच दिला आहे त्यांचे दर माफक असून जेवणांचा बेतही बरा असतो. तेथें जेवण्यास हरकत नाहीं. भात, आंबटवरण, कोरडी भाजी, ताक व एकादी चटणी किंवा लोणचें इतके प्रकार त्यांत असतात. दक्षिणेंत पुरी भाकरी किंवा पोळी प्रयत्न केला तरी मिळत नाहीं. इकडे सोवळ्या ओवळ्याचा प्रकार फार कमी आहे. फक्त ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्या पंक्ती निराळ्या मांडतात ! येथेंही भाषेची अडचण पडते. परंतु वस्तूवर बोट दाखवून ती मागतां येते. शिवाय स्टेशनावर व मुख्य मुख्य ठिकाणीं उतारूंच्या समजुतीकरितां पाट्या मारल्या असतात. त्या इंग्रजींत असतात व देशभाषेंतही असतात. देश भाषेचा अभाव असल्यामुळें इंग्रजी तरी आलें पाहिजे. इंग्रजी नसून केवळ देश भाषेंतही एखादी पाटी असते. पण अशीं ठिकाणें फार थोडीं आहेत, त्यास नाइलाज आहे. मोठमोठ्या जंक्शनवर थर्डक्लास तिकीट ऑफिस व थर्डक्लास वेटिंगरूम —राहाण्याबसण्याची जागा—हीं मुख्य स्टेशनपासून फार दूर असतात. कोठें कोठें रेल्वेपुलाच्या पलीकडेही असतात. जणूं काय त्यांचा मुख्य स्टेशनशीं स्पर्शही होऊं नये ! जंक्शन जर २।४ लाइनींचें असेल तर तितकीं तिकीट ऑफिसें कधीं कधीं निरनिराळीं असतात. त्यांत आपलें कोणतें हें पाटीवरून ओळखावें लागतें. विचारण्यांत अर्थ नसतो. गडबडीमुळें कोणी सांगतच नाहीं आणि सांगितल्यास कांहींतरी सांगतात ! मुख्य स्टेशन व थर्डक्लास वेटिंगरूम यांच्यामध्यें एक दरवाजा असतो व तो नेहमीं बंद असतो. गाडी सुटण्याची वेळ आली ह्मणजे १५।२० मिनिटें तो उघडतात. कदाचित गाडी भरून गेली असली ह्मणजे तो उघडीतही नाहींत ! मागूनच्या गाडींतून जा असें सांगतात. कदाचित तिकिटेंही बंद करितात. आणि दुसरी गाडी जर उशिरानें सुटणारी असली तर स्टेशनवर बसण्यास-

सुद्धां देत नाहींत. गावांत धर्मशाळेंत जा असें सांगतात. तें काय सांगतात व काय नाहीं याचा नेमच नाहीं. आणि तें ऐकिलें नाहीं कीं पोलीस उभा आहेच! बहुधा ते पोलीसकडूनच सांगवतात. ह्मणजे बोलण्याचें कारणच पडत नाहीं. फार मोठ्या ठिकाणीं तिकीट ऑफिसें गावांत असतात. पण तीं दिवसा चालू असून रात्रीं बंद असतात. अशा ठिकाणीं गांवांतूनच तिकीट काढून घ्यावें हें फारच उत्तम. ह्मणजे तेथें सुखानें तरी तिकीट मिळतें, हिशोब करावयास मिळतो व स्टेशनवर अगोदर जाऊन दरवाज्यापाशीं बसून राहिल्यास ठरलेली गाडीही मिळते. ज्या ठिकाणीं अशीं गांवांत ऑफिसें असतात, त्या ठिकाणीं स्टेशनवर गाडी निघण्यापूर्वीं १५।२० मिनिटेंच तिकीटें देतात. गर्दी फार असते सबब सर्वांना तिकिटें मिळत नाहींत. कदाचित् गावांतल्या तिकीटवाल्यांनीं गाडी भरली किंवा गावांतल्या तिकीट ऑफिसचा रिपोर्ट तिकिटें फार खपल्याचा आला, किंवा गाडींत फार गर्दी आहे तिकिटें देऊं नका, अशी मागील स्टेशनची तार आली ह्मणजे तिकिटेंच बंद करितात. मग पुन्हा मागें फिरावें लागतें! मनुष्य एकटा असला ह्मणजे तो हे हेलपाट कसे तरी घालतो, पण बायकामुलें असलीं म्हणजे त्याच्या त्रासाला पारावारच नसतो. ज्या ठिकाणीं गांवांत तिकीट आफिसें नसतात त्या ठिकाणच्या स्टेशनवर 'गाडीपूर्वीं तिकीट ऑफिस २ तास कोठें तीन तास उघडें राहील' कोठें रात्रंदिवस उघडें राहील अशा पाट्या मारल्या असतात. पण त्याप्रमाणें अंमलबजावणी मात्र होत नाहीं. तिकिटाची खिडकी उघडी असते, पण आंतमध्यें मनुष्यच नसतो! स्टेशन मास्तरकडे तक्रार केली तर प्रथम स्टेशनांत प्रवेश होण्याचीच मुष्कील! याउपर झाला तर 'मास्तर परसाकडे गेले आहेत, गाडीला अवकाश आहे, तिकिटें मिळतील असा कोणी जबाब देतात. नाहींतर 'रेग कोपेन पूरयेत्' हें जिकडे तिकडे आहेच.

सारांश ज्याला धांगडधिंगा करण्याची संवय किंवा ताकद आहे, त्यालाच स्टेशनवर तिकीट मिळतें! यात्रा, तशांत महायात्रा चालू असली तर विचारण्याची व बोलण्याची सोयच नसते!

बरें तिकीट कसें तरी मिळालें असें मानलें, तरी दरवाजावर इतकी चेंगरा चेंगरी होते कीं त्यांतून ओझें व बायकामुलें नेणें अत्यंत त्रासाचें होतें. अशा रीतीनें प्लॅटफार्मावर प्रवेश झाला तरी गाडींत इतकी गर्दी असते कीं, दरवाजा उघडण्याचीच मुष्कील पडते. शिवाय आंतील लोक दांडगाई करून आंत येऊं देतच नाहींत. तक्रार करून चालत नाहीं. कारण जास्त मनुष्यें कोंबण्याचा अधिकार कोणासच नाहीं. रेल्वे अधिकारीच सांगतात कीं, "जागा मिळाली तर बसा. नियमाप्रमाणें जागा बसण्याची असून जर कोणी बसूं दिलें नाहीं तर त्याची तक्रार आम्ही ऐकूं, जागा भरल्यावर आमचा इलाज नाहीं!" इतकी गर्दी असते. व लोक उभे असतात, तरी कित्येक लोक निर्लज्यपणें खुशाल निजलेलेही असतात! हे निजणारे लोक केवळ मूर्खच असतात असें नाहीं. मूर्खाला कोणी अशा वेळीं निजूंच देणार नाहींत. निजणारे हे बूट पाटलोण, कॉलरवालेच शहाणे म्हणविणारेच असतात. शर्थ आहे त्यांची! हिंदू हिंदूंची किंवा गरिब गरिबांची जाण जाणत नाहीं तेथें स्वराज्य तरी कसें मिळेल?

इतके डबे गच्च भरलेले असतात, त्यांतच कधीं कधीं पलटणचे (मिलिटरीचे) लोक येतात व थर्ड क्लासांतून प्रवास करणारे युरोपियन येतात. मग त्यांच्याकरितां डबा किंवा कंपार्टमेंट रिझर्व करून द्यावा लागतो. किंवा तो डबाच गाडींतून सोडावयाचा आहे असें सांगतात! म्हणजे हमालाकडून ठवलेले बोजे मजुरी खर्च करून पुन्हा काढवून दुसरे ठिकाणीं बायका मुलांसुद्धां जावें लागतें. याकरितां अगदीं रिकाम्या डब्याची चौकशी करून मग त्यांत बसावें. दुसरे ठिकाणीं जागा मिळाल्यास बरी नाहींतर इतका प्रयत्न करून, हमालास, शिपा-

थास, व पोलिसास पैसे देऊन मिळविलेली जागा जाऊन गाडीही चुकते! हा थर्डक्लासचा सुख सोहाळा रेल्वे अधिकारी रात्रंदिवस पहात असतात. कधीं कधीं ट्राफिक म्यानेजर व एजंट ह्यांच्यासुद्धां हा सुख-सोहाळा दृष्टीस पडतो. पण थर्डक्लासचे प्यासेंजरची कोणीही सोय करीत नाहींत. मिलिटरी लोक आले तरीसुद्धां डबा जास्त लावीत नाहींत. भरपूर डब्याचे लोक आले तर कदाचित् डबा जोडतात! थोडे कमी असल्यास त्यांतच घुसावयास सांगतात. आणि ते तर बोलून चालून दांडगेच त्यांच्यावर अपीलच नाहीं. ते कायद्याप्रमाणें प्रत्येक बाकावर पांचच बसतात दुसऱ्यास आंत उभेंसुद्धां राहूं देत नाहींत सारांश, थर्ड क्लासच्या माणसास वाटेल त्यांनीं धमकावावें. ही नेहमींची स्थिति झाली. एकादी यात्रा त्यांत असली म्हणजे बोलायचीच सोय नाहीं.

मागें पहिल्या भागांत "प्रवासाकरितां एक पाकिटाचा बोजा करावा व त्याचें वजन १५ शेर असावें असें सांगितलें आहे." या १५ शेरांशिवाय जी. आय. पी. रेल्वे थर्ड क्लास प्यासेंजर यांस एक लहानसें हंतरूणपांघरूण. व ब्लांकेट, उशी, छत्री, काठी व फराळाचा डबा इतकें सामान फुकट नेऊं देते. ह्मणजे वजन करावयाच्या वस्तूंत ह्या वस्तु घातल्या नाहींत तरी चालतात. याशिवाय प्रत्येक तिकिटास १५ शेर ओझें सर्व रेल्वेनीं फुकट नेण्याचें कबूल केलें आहे. यांत पहाडी रेल्वेचा मात्र समावेश होत नाहीं. ह्मणजे उतकमंड येथें जाण्यास निलगिरी रेल्वे लागते. तींत ५ च शेर ओझें माफ आहे. तीच स्थिति माथेरान व दार्जिलिंग रेल्वेची आहे रा. जावडेकर यांच्या बुकाप्रमाणें माझें ओझें हंतरुणापांघरुणाशिवाय १५ शेर होतें ह्मणून मी वजन केलें नाहीं. पण साऊथ इंडियन रेल्वेंत गेल्यावर एके ठिकाणीं हें सर्व सामान तोललें गेलें त्यांतून वरील हंतरुण, पांघरूण, फराळाचा डबा काढून दिला नाहीं. मी तक्रार केली. तेव्हां स्टेशनमास्तरनीं त्या रेल्वेचें

गाईड काढून दाखविलें. त्यांत ही रेल्वे, बाडबिच्छायतीच्या वस्तु फर्स्ट व सेकंड क्लासचे प्यासेंजर यानांच फक्त फुकट नेऊं देते, थर्डक्लास प्यासेंजर यांस फुकट नेऊं देत नाहीं असें दाखविलें. तेव्हां अर्थांत सर्व सामान वजन केलें तें १८ शेर भरलें अर्थांत २० शेराचा चार्ज १॥ रुपाया भरावा लागला! यांत १५ शेर ओझें वजा केलें नाहीं. कारण जेथें मूळ तिकीट काढलें तेथेंच जर ओझें वजन केलें तर १५ शेर माफ होतें. मध्यें किंवा शेवटीं कोणी पकडलें तर हा फायदा जातो! मग सर्व वजनाचे पैसे द्यावे लागतात! असा सर्व रेल्वेचा नियम आहे. कधीं कधीं गाडींत ट्रेन कंडक्टर असतात ते सुद्धां गाडींत ओझें वजन करून पहातात. याशिवाय कांट्यामध्यें फरक असतो. एका ठिकाणीं ओझें वजन केलें व १५ शेर भरलें तर दुसरे ठिकाणीं १५ शेरच भरेल असा नियम नाहीं. १४ शेर किंवा १६ शेर होईल, व मग २० शेरांचे पैसे द्यावे लागतील! हमालाच्या डोक्यावर बोजा दिला–हमाल केला–ह्मणजे लगेच पास मागतात. हातांत किंवा खाकेंत सामान घेऊन गेलें ह्मणजे जास्त वजन असलें तरी कोणी सहसा विचारीत नाहींत! जास्त वजनाच्या योगानें हमाल करून पैसे जास्त भरावे लागून फार खोटी होते. सर्व लोकांचीं तिकिटें घेतल्यावर मग आपल्या जास्त वजनाचा विधि होतो इतक्यांत तांगे, वाहानें सर्व निघून जातात व मग मनुष्य पस्ताव्यांत पडतो. ह्मणून प्रवास लांब करावयाचा असल्यास व वजन जास्त वाटल्यास वेळींच लगेज करावें ह्मणजे १५ शेर माफ होऊन पैसे व धक्काधक्क हीं वाचतात. ह्मणून आपलें पाकीट सर्व सामाना मिळून १२।१३ शेर वजनाचेंच ठेवावें. ह्मणजे कोठेंच अडचण पडणार नाहीं! थोडें जास्त वजन असल्यास दोन बोजे केले तर चांगलें ह्मणजे कोणाच्या ध्यनांत येत नाहीं. पण दोन बोजांना दोन हात गुंततात. मग डबा उघडण्याची पंचाईत पडते. दोहोंवर लक्ष ठेवावें लागतें, अशा गैरसोई आहेत. जसें ज्याला परवडेल तसें त्यानें करावें.

दक्षिण हिंदुस्थानचे यात्रेस उत्तर हिंदुस्थानाइतकें सामान लागत नाहीं. ह्या अडचणींचा प्रसंग सर्वच ठिकाणीं येतो असें मात्र नाहीं, मोठ्या यात्रेची वेळ, पर्वणी वगैरे आली असतां येतो पण त्यांची माहिती असावी ह्मणून यांचें दिग्दर्शन केलें आहे.

यात्रा केल्यानंतर गंगा आणावी लागते ही गंगा तांब्याभर किंवा पराकाष्ठा कळशीभर घेतली तरी मांवद्याचे वेळीं सर्वांस पुरत नाहीं मग पाणी घालून ती वाढवावी लागते. असा प्रसंग येऊं नये निदान गंगोदक तरी त्यावेळीं सर्वांस शुद्ध मिळावें, ह्मणून मी घासलेटचा डबा कोरा घेऊन त्याचा वास काढून टाकून तो भरून कथलाच्या डाकानें पक्का बंद करून पारसलनें घरीं पाठवूं लागलों तर ईस्ट इंडिया रेल्वे त्याच्या वजनाचा पूर्ण चार्ज घेते, व इतर रेल्वे हा नाशवंत माल समजून अर्धा चार्ज करितात. प्रयागास ह्या दोन्ही गोष्टी पहावयास मिळतात. दारागंज येथें छोट्या लाइनीवरून पारसल पाठविल्यास अर्ध्या रेटनें जातें व तेंच मोठ्या इ. आय्. रेल्वेच्या स्टेशनवर नेलें तर पूर्ण चार्ज पडतो. पूर्ण चार्ज पडल्यावर पैसे डिलि-वरीच्या ठिकाणीं दिले तरी चालतात. पण नाशवंत मालाचे पैसे अगाऊ भरावेच लागतात. डबा थोडा कमी भरला ह्मणजे वजन २० शेरापेक्षां कमी होतो. पूर्ण भरल्यास २२।२३ शेर होतो व थोड्याकरितां ३० शेराचा चार्ज भरावा लागतो. या डब्याचे चार्जा-शिवाय रेल्वेचे नोकर गैर कायदा ४।८ आणे जास्त मागतात पण तेही जरूर द्यावे नाहींतर डब्याची आदळ आपट होऊन गंगा सांडून फक्त डबा रिकामा घरीं जातो! पैसे देणें राहिले असल्यास तो कसल्या तरी घाण पाण्यानें भरून मिळतो!

आपल्या डब्यांतून पाणी पिण्याकरितां किंवा दुसरे कशाकरितां आपणास उतरणें असेल तर आपला बोजा व जागा रक्षण करण्यास शेजाऱ्यास विनवावें. नाहींतर गाडी उभी राहिल्यावर मंडळीची चढउतर

झाल्यावर मग जावें, नाहींतर आपले जागेवर दुसरा मनुष्य बसून भांडण करण्याचा प्रसंग येतो. डब्यांतून उतरल्यावर डब्याची खूण ठेवावी ह्मणजे आपला डबा शेवटपासून किंवा आरंभापासून किंवा फर्स्टक्लास किंवा सेकंडक्लासपासून कितवा आहे हें ध्यानांत ठेवून पुढें जावें. किंवा आपला डबा स्टेशनच्या कोणत्या भागासमोर किंवा पाटीसमोर आहे हेंही ध्यानांत ठेवावें. तसेंच गाडी किती उभी रहाणार आहे, नळावर गर्दी किती आहे या सर्वांचा विचार करावा. तसेंच दरवाजा उघडण्याचें व बंद करण्याचें साधन कसें आहे याचीही ओळख करून घ्यावी. कारण हीं साधनें सर्व रेल्वेचीं सारखीं नाहींत. पाण्याचे नळ उघडण्याचीं व डबे उघडण्याचीं साधनें निरनिराळ्या रेल्वेवर व कित्येक ठिकाणीं फारच भिन्न आहेत. या गोष्टी अगदीं क्षुल्लक दिसतात खऱ्या, परंतु यांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे कित्येकांची गाडी चुकून आपल्या बोजास किंवा मुलामाणसांस अंतरावें लागलें आहे. या उपर कदाचित गाडी चुकलीच तर आपली गाडी प्रथम ज्या स्टेशनावर उभी रहाते त्या स्टेशनमास्तरास तार देऊन बोजा व माणसें उतरण्यास सांगून आपण मागील गाडीनें जावें. आपल्या डब्याचा नंबर व गाडींत त्याचें स्थान टिपण वहींत लिहून ठेवावें तसेंच कुलीचा नंबर लक्षांत ठेवावा.

येथें हें रेल्वे थर्ड क्लासचें आख्यान बहुतेक संपूर्ण झालें. यात्रेचें पुण्य कोणत्या जन्मीं लागावयाचें असेल तें लागो पण या आख्यानाचें फळ पदोपदीं मिळतें! लढाई सुरू झाल्यापासून रेल्वेनीं आपल्या गाड्या कमी केल्या त्या लढाई बंद झाली तरी अद्याप सुरू केल्या नाहींत; आतां सुरू होत आहेत. थर्डक्लासचे उतारूंकरितां त्यांच्या जवळ डबे, इंजिनें कांहीं नाहींत. यात्रेचे वेळीं मालाचे डबेही माणसांना बसावयास मिळत नाहींत. सर्व लोक उभे असतात पण त्यांची दाद कोणी घेत नाहीं. खरोखर मेल असो किंवा कोणतीही

गाडी असो थर्डक्लासांतून बायका मुलांसुद्धां अशावेळीं प्रवास करणें दिवसानुदिवस बिकट व धोक्याचें झालें आहे. रेल्वेशिवाय तर गत्यंतर नाहीं, व रेल्वे कांहीं सोय करीत नाहीं इतकेंच नव्हे तर ती बेपर्वा आहे याबद्दल शहाण्यांनीं रेल्वेबोर्ड, सरकार, कायदेकौन्सिल वगैरेकडे पाहिजे तेवढी खटपट केली पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं व तसा होतही नाहीं. 'आई जेऊं घालीना व बाप भिकेला जाऊं देईना' अशांतली स्थिति आहे. व कधीं कधीं लक्षावधी यात्रा जमते ती रेल्वेच्यानेंही नेवत नाहीं. मग पायीं जाते! तो मनुष्यांचा समुदाय पाहिला म्हणजे जीव थक्क होतो! ही माहिती जरूरीची असून कोणत्याही बुकांत किंवा रेल्वे गाइडांत नाहीं सबब येथें दिली आहे. यात्रेच्या मोसमांत यात्रा केली नाहीं म्हणजे हें नाटक सहसा दृष्टीस पडत नाहीं.

याशिवाय किरकोळ अडचणी आहेतच. निजाम रेल्वेमध्यें थर्ड क्लासमध्यें रात्रीं दिवे नसतात. स्टेशन आलें म्हणजे तेवढ्यापुरते लावतात. स्टेशन सुटलें ह्मणजे दिवे गेले. विजेचे दिवे असल्यामुळें असें करितां येतें. प्लाटफार्मावर ऊन व पाऊस यांपासून रक्षणार्थ छपरें नाहींत. इतकेंच नव्हे तर कांहीं स्टेशनला प्लाट फार्मही नाहींत. कांहीं ठिकाणीं पाणी नसतें. कांहीं ठिकाणीं गाडी आल्यावर तेवढ्यापुरतें मात्र सोडतात. तितक्यांत ज्याला कार्यभाग करून घेणें असेल त्यांनीं घ्यावा. ईस्ट इंडिया रेल्वेची मुंबई मेल कलकत्त्याहून सुटते तिला मेलचा चार्ज नाहीं, पण जबलपुरापासून मुंबईपर्यंत तिला मेलचा चार्ज आहे! यामुळें अलाहाबाद रस्त्यावर माणिकपूर स्टेशनपासून मुंबईचें तिकीट काढलें असतां तें साध्या गाडीचें मिळतें पण जबलपुरास जी तिकीट तपासणी होते त्यावेळीं ह्या मनुष्यास खालीं उतरतात व दुसऱ्या गाडींत जाणेस सांगतात. इतक्यांत गर्दी करून जास्त चार्ज भरला तर ती गाडी मिळते नाहींतर चुकते! तपासणींत तो जर चुकून

राहिला तर तो जेथें उतरेल तेथें तो जास्त चार्ज वसूल करितात !! ईस्ट-इंडिया रेल्वेवर थर्ड क्लासचे मेलचे चार्ज निराळे नाहींत. फक्त २०० मैलांपुढें जाणाराला तींत बसूं देतात. अशी एकच गाडी मेल व प्यासेंजर होत असली ह्मणजे, उतारूंना विनाकारण धकाधक होते. अशा गाडीचे एकदम मेलचें तिकीट मागितलें तर मिळूं शकतें. पण त्याकरितां थोडा प्रयत्न करावा लागत असल्यामुळें गर्दींत तिकीट-मास्तर तें देत नाहींत. अगाऊ तजविजीनें मिळतें. झालें. रेल्वेसंबंधीं जितक्या अडचणी आठवल्या तितक्या सांगितल्या. ह्या रेल्वे गाईड बाहेरच्या आहेत व व्यवहारांतील आहेत ह्मणून गाईडची माहिती करून घेऊन ह्यांचेंही स्मरण असावें. दुःख अकस्मात येऊन चित्तवृत्ति बदलते पण तें अगाऊ समजलें ह्मणजे त्याचे निराकरणाची तजवीज करितां येते. निदान तें सुसह्य तरी होतें, आणि अडचणी सुसह्य होण्याकरितांच हीं वर्णनें लिहावीं लागतात. माणसांची गर्दी व तारतम्य पाहून मनुष्यास अनुकूळ असेल तर त्यानें अशा प्रसंगीं 'इंटरक्लासचें' तिकीट काढावें हें बरें. पण हा अनुकूलतेचा प्रश्न आहे. पण गर्दींतून शिरकाव होण्याकरितां कधीं कधीं इंटरचें किंवा सेकंड क्लासचें सुद्धां अगदीं जवळच्या स्टेशनचें काढावें लागतें ! अशानें सेकंडक्लास मार्गानें स्टेशनांत सुखानें प्रवेश होतो. ज्या वेळीं फ्लाटफार्म तिकीट सुद्धां बंद करितात तेव्हां ही युक्ती आहे.

## शिधा-सामान

घ्यावयाचें त्यांत स्टोव्ह असल्यास जरूर घ्यावा. मात्र तो घडीचा असून जस्ती पेटीसहीत घ्यावा. जस्ती पेटी नसल्यास त्याकरितां मुद्दाम करावी. ह्मणजे त्याचें सर्व सामान सुरक्षित राहातें. तसेंच पेटींत पिन्स, जरूर ते रबर, स्टोव्ह निवळण्याचें व बंद करण्याचें पान वगैरे जरूर तें सर्व सामान अवश्य घ्यावें. स्पिरीट न घेतलें तरी

चालेल. घासलेटनें पेटवावा. मात्र घाण पुसण्याकरितां व स्टोव्ह संरक्षणार्थ फडकीं अवश्य घ्यावीं. शिवाय ताजें मेटकूट १ पौंड डबाभर घ्यावें. म्हणजे तें दहीं ताकांत किंवा चिंचगुळाच्या पाण्यांत कालविल्यानें भात किंवा भाकरीचें उत्तम तोंडीलावणें होतें व वेळ वाचतो. वेळ असल्यास भाजी, पिठलें वगैरे वाटेल तें करावें पण घाईचे वेळीं ह्याचा फार उपयोग होतो. आपलेजवळ १।२ वेळेपुरता डाळ-तांदूळ किंवा पीठ ह्यांचा शिधा ठेवावा. जास्त ठेवूं नये. तिखट, चिंच, मेटकूट ह्या सामानाकरितां लहान लहान डबे घेऊन प्रत्येक डबा स्वतंत्र फडक्यानें पुन्हां बांधावा. म्हणजे तो उघडण्याचा संभव नसतो. तसेंच तांदूळ व पीठ याकरितां जाड कापडाच्या पिशव्या घ्याव्या, पुरचुंड्या घेऊं नये. या सामानापेक्षां थोडे बेसनाचे लाडू, शंकरपाळे, घरीं केलेलीं बिस्किटें हीं घ्यावीं. या यात्रेंत जेवणखाण करण्याचा प्रसंग येत नाहीं कारण सर्वत्र जेवण मिळतें. पण मध्येंच धर्मशाळेंत उतरण्याचा प्रसंग आला म्हणजे या सामानाचें महत्त्व समजतें ! बाकी दक्षिणेचे यात्रेंत कांहीं घेतलें नाहीं तरी चालतें, सर्व सोयी आहेत. प्रत्येक रेल्वेचें गाईड ( टाईम्टेबल ) अवश्य घ्यावें व घड्याळ घ्यावें. नकाशा सोबत दिला आहे तो अवश्य घ्यावा म्हणजे त्याच्या योगानें आपल्या प्रवासाचें नियमन करितां येतें. एक स्मरणवही व सिसपेन्सिल घेऊन ठेवावी. रेल्वेगाईडची फार अवश्यकता असते. पण गाईड छापून फार दिवस झाल्यामुळें त्याच्या प्रती संपून गेल्यामुळें तें मिळत नाहीं, सबब मोठमोठ्या स्टेशनावर 'व्हिलर कंपनीचीं' बुक्स्टॉल्स आहेत. त्यांत हिंदुस्थानांतील सर्व रेल्वेचें टाईमटेबल ब्रॉडशा कंपनी दर महिन्यास प्रसिद्ध करते तें चालू महिन्याचें दीड रुपयास मिळतें, तें तरी अवश्य घ्यावें. त्यांत हिंदुस्थानांतील सर्व रेल्वेचा संपूर्ण नकाशा असतो. तो जरूर पाहून घ्यावा व हें टाईमटेबल कसें पहावयाचें हें एकदां समजून घ्यावें

म्हणजे गाड्या व त्यांच्या वेळा, जंक्शनें चांगलीं समजतात. पुस्तकांकरितां एक रुमाल घ्यावा. व सर्व ठिकाणचे तीर्थप्रसाद—अगारे, कुंकू बुका वगैरे—मिळतात ते ठेवण्याकरितां निरनिराळ्या पिशव्या किंवा डब्या घ्याव्या, म्हणजे कुंकवाकरितां एक, अंगाऱ्याकरितां एक, प्रसादाकरितां एक, अशा निरनिराळ्या असाव्या. नारळ वगैरे अवजड पदार्थ प्रसादाचे असले तरी फारसे ठेवूं नये, एकादा ठेवावा. तसेंच प्रवासांत चमत्कारिक चिजा मिळतात, त्या अवजड असल्यास रेल्वेनें किंवा पोष्टानें घरीं पाठवून द्याव्या. अगदीं लहान असल्यास जवळ बाळगावी. अशा वस्तूंकरितां निराळी पिशवी करावी. पण यामुळें ओझें वाढूं देऊं नये. अशा रीतीनें आणलेले प्रसाद घरीं आल्यावर गंगापूजन करितांना मांडवाचे महाप्रसादांत सामील करावे म्हणजे सर्वच स्वयंपाक प्रसादमय होतो व त्याचा लाभ सर्वांस होतो. पाकिटाला कुलूप असावें. शिवाय एक दुसरें कुलूप जरूर घ्यावें. धर्मशाळेंत किंवा कोठें स्वतंत्र खोली मिळाल्यास तीला लावण्यास पाहिजे. तसेंच एक ५० हात बारीक दोरी पाणी काढणेस घ्यावी. अशा रितीनें सर्व सामान पाकिटांत भरून त्यास कुलूप लावावें व वर बैठकीकरितां लहान सतरंजी, घोंगडी किंवा तरट घ्यावें म्हणजे तें कोठेंही बसणेस प्रथम उपयोगी पडतें. रेल्वेंत बाकावर बसण्यास उपयोगी पडतें. शिवाय आपण कोठें गेल्यास त्यानें जागेचें रक्षण होतें. तसेंच स्टेशनवर नुसतें पाकीट ठेवल्यास चोराच्या पटकन मनांत येतें, पण त्यावर घोंगडी किंवा सतरंजी, पाकीट न दिसेल अशी घातल्यास तितकें कोणाच्या मनांत येत नाहीं. कांहीं तरी सामान पडलें आहे असें वाटतें. हमालाजवळ पाकीट दिल्यास त्यावर झांकण घातल्यानें सामानाचें, ऊन, पावसापासून रक्षण होतें व गर्दींत तो कोठें शिरला तरी ओळखतां येतो, नजर रहाते असे फायदे होतात.

आतां यात्रेला निघणें तें एकट्यानें निघावें किंवा बरोबर मंडळी

असावी याबद्दल बराच मतभेद आहे बाकी ज्याची घरचीच मंडळी असेल त्याला ती टाकून देतां येत नाहीं. संगतीनें यात्रा करणें चांगलें खरें, पण त्यांत फायदे आहेत तसे तोटेही आहेत. मुख्यतः सर्वांची प्रकृति निरोगी राहावी लागते तशी रहात नाहीं मंडळी घेतल्यास आपलें जेवण-खाण आपल्या समाजांत होत असल्यामुळें त्या ठिकाणच्या रीतिभाती जेवणाखाणासंबंधी कशा आहेत ह्या समजण्याचा मार्ग नसतो, तो मनुष्य एकटाच असला ह्मणजे त्याचा स्थानिक मंडळींत समावेश सहज होतो. मंडळीमुळें नियमित वेळांत प्रवास होत नाहीं. रेल्वेंत किंवा गर्दीत चुकण्याचा संभव असतो. वगैरे बऱ्याच अडचणी आहेत व त्या घातक आहेत. त्यांचें वर्णन दुसऱ्या भागांत सविस्तर आलें आहेच याहि भगांत थोडें आहे. मुख्यतः ज्याला नियमित मुदतींत प्रवास करावयाचा असेल त्यानें एकटेंच जावें हें उत्तम. आणि दक्षिण हिंदुस्थानची यात्रा ही हिमालयासारखी निर्मानुष नाहीं. माणसांतील असल्यामुळें एकट्यास कांहीं त्रास होत नाहीं. बाकी ५०।५० मंडळी यात्रा करतांना पाहिली आहे त्यांत बायकामुलेंही असतात सगळाच गोंधळ! चांगलें चाललें तर ठीक पण प्रवासांत घट्टयाकट्टया मंडळी-चेंही चांगलें चालत नाहीं, तर ह्या मंडळीचें कसें चालावें! यात्रेंत एकदां दुपारीं १२ वाजतां किंवा १ वाजतां जेवण्याचा पाठ ठेवावा. दुसऱ्यांदां जेऊं नये ह्मणजे प्रकृति सहसा बिघडत नाहीं.

ही यात्रा करण्यास सुमारें ४ महिने लागतात. ह्मणून माघ महिन्यांत निघून वैशाख अखेर यात्रा पुरी करावी हें चांगलें. पण हा मोसम लग्नकारणांचा असून मोठमोठ्या जत्रांचाही असतो. अशा यात्रांच्या तडाक्यांत सांपडल्यास फारच त्रास होतो. शिवाय चोरी होण्याचा फार संभव असतो, तो निराळाच. ह्या चोरांच्या त्रासानें कशाकडेच चांगलें लक्ष लागत नाहीं. बाकी यात्रेकरूला राजरोस लुबाडण्याचा प्रत्येकजण प्रयत्न करीत असतोच! तिकिट मास्तर

पैसे खाणार, पोलीस खाणार, दुकानदार, पंडे, कुत्रीं, मांजरें, वानर, माकडें, जसें ज्याला मिळेल तसें तो लुबाडीत असतो ! यांचे लुबाडण्याचे प्रकार फार मनोरंजक असतात. ते सर्व सांगूं लागलों तर फार विस्तार होईल. नमुन्याकरितां एक माकडाची गोष्ट सांगतों. चित्रकूटास गेलों, तेथें माकडें फार आहेत, ह्मणून धर्मशाळेच्या मालकांनीं मला, बाहेर न रहातां एका खोलींत राहाण्यास व स्वयंपाक करण्यास सांगितलें व खोली उघडून दिली. मी बाजारांतून दहीं, लोणी द्रोणांत आणिलें आहे हें रस्त्यानें कांहीं माकडांनीं पाहिलें होतें. मी ते द्रोण कोनाड्यांत ठेवून कपडे काढण्याकरितां पाठ फिरविली मात्र! इतक्यांत एक वानर येऊन तो द्रोण घेऊन गेला! मी पहातों तों झाडावर बसून मलाच वांकवल्या दाखवीत खुशाल खात बसला आहे !! मी तिकडे पहात आहें इतक्यांत पाठीमागून दुसरा वानर दुसरा द्रोण नेण्याकरितां आला तेव्हां मी तो द्रोण खोलींत घेऊन गेलों इतक्यांत खोलींत शिरण्याकरितां आणखी एक आला! तेव्हां मी जास्त बंदोबस्तानें राहिलों. खोली उघडी ठेवण्याचा उपायच नाहीं. एक प्रवासी गंगेत स्नान करीत असतां त्यानें बाहेर काढून ठेवलेल्या रुपयांचा कसा घेऊन एक वानर नदीच्या कांठावरच्या झाडावर बसला होता. पैशाची पुरचुंडी गेल्याबरोबर प्रवाशाचें धाबें दणाणलें. तो घाबरला. चोर दिसतो, पण त्याजवळून पैसे मिळणार कसे? तो गया वया करूं लागला, त्यानें हात जोडले, तों तो माकड जास्तच त्याची चेष्टा करूं लागला! आतां पैसे परत मिळतात कसे ह्या विवंचनेंत तो पडला. मारायला जावें तर तो उठून दुसरेकडे कोठें डोंगरावरही जाईल. मंडळीची ही गर्दी झाली!! शेवटीं तेथील एका मनुष्यानें सांगितलें कीं, एका लहान मडक्यांत थोडे चणे आणून ठेव ह्मणजे ते घेण्याकरितां माकड येईल. त्याप्रमाणें त्यानें केलें. दूर मडकें ठेवल्याबरोबर वानर ते घेण्याकरितां आला व त्याच्या हातून कसा सुटला व

प्रवाशास मिळाला! चणे मिळण्याकरितां वानर असें करतात असें समजलें ह्मणजे ह्या चोरांची भूक फार मोठी नाहीं असें समजतें, हें बरें आहे. पण चोरट्या माणसांची भूक पैशाची असल्यामुळें ती अनावर आहे. तिकीट काढण्याची फार गर्दी झाली ह्मणजे बोचकें संभाळून तिकीट काढणें धोक्याचें असतें अशा वेळीं पोलिसास कांहीं पैसे दिल्यास तो तिकीट काढून देतो, पैशाची अफरातफर होत नाहीं. त्याचप्रमाणें हमाल काम करितात, पारसलवाले काम करितात. गाडींत फार गर्दी असली म्हणजे ओझें घेऊन तें गाडींत ठेवून जागा मिळवून देण्याचें काम हमालांनींच करावें, तिकीट कलेक्टरही करितात. हा सर्व पैसे खाऊंचा व्यवहार आहे व हें जरी त्यांचें काम आहे तरी चांगले कामाबद्दल बेताचा मोबदला कोणीही देऊं शकतो. पण यांचें मागणें अचरट. कधीं कधीं नुसतें तिकीट काढण्याला सुद्धां प्रत्येक तिकीटास ४।६ आणे मागतात. गाडींत बसवण्याबद्दल हमाल १२ आणे, रुपया, किंवा वाटेल तें मागतात. हीच गोष्ट सर्वांची कामें होतात खरीं, पण प्रत्येक ठिकाणीं पैसा किती पुरा पडेल? बरें प्रसंग विशेषीं हेंही ठीक आहे परंतु आपणांस पैसे मिळावे ह्मणून उतारूंस कधीं कधीं संकटांतही घालतात, त्यांना नाडतात हें वाईट आहे. ज्याला जरूर पडेल तो पैसे देईल परंतु जो स्वतः काम करीत आहे त्याला त्यांनीं कां प्रतिबंध करावा हें समजत नाहीं. तक्रार करण्याचा उपाय नाहीं कारण सर्व एकच. उपाध्येबुवा, किंवा पंडे यांची तरी हीच अवस्था. यात्रेकरूंनीं आपल्याकडे यावें ही अनावर इच्छा असते व त्याप्रमाणें दोन दोन किंवा चार चार स्टेशनें अगोदर येऊन यात्रेकरूंस 'तुमच्या इच्छेप्रमाणें यात्रा करून देऊं, तुमच्या इच्छेबाहेर जाणार नाहीं' वगैरे वाटेल त्या अटी कबूल करितात, व यांची घरीं आल्यावर हेंच केलें पाहिजे, तेंच केलें पाहिजे, याला कमींत कमी अमूक रुपये लागतील,

अशी चर्पटपंजरी चालू होते. पैसे निघेपर्यंत त्यांचें त्याकडे लक्ष असतें. नुसता त्याच्या तोंडून शब्द निघाला कीं ते तयार असतात. पण एकदां पैसे मिळाले व वंशाचा लेख लिहून घेतला ह्मणजे तुह्मी किती ओरडलेत किंवा बोंबलल्लेत तरी ते मुळींच पहाणार नाहींत! मग आपली व्यवस्था आपणच केली पाहिजे. त्यांचें तोंड दुसरीकडे फिरलेंच!! सबब आपली सर्व व्यवस्था होईपर्यंत पैसे देऊं नयेत, व लेखही लिहून देऊं नये. हे लेख पंडे तुमच्या वंशावर आमचा हक्क आहे, आह्मीं तुमचे कुलगुरू आहों असें दर्शविण्याकरितां घेत असतात. आपला कुलगुरू माहीत असल्यास ठीकच, नाहीं तर लेख लिहून दिल्यावर शेवटीं 'जुना पूर्वजांचा लेख कोणापाशीं सांपडल्यास हा लेख रद्द आहे असें समजावें.' हें तरी अवश्य लिहावें ह्मणजे भांडणें होत नाहींत. अशा लेखानें आपली पूर्व परंपरा मिळणेचा संभव असतो. सबब हे लेखही करून देण्यास हरकत नाहीं. त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें प्रथम आपण लेख दिला नाहीं तर ते रागावतात पण आपण तिकडे लक्ष देऊं नये. पंड्याचें काम जिकीरीचें आहे पण एक पंड्या केला ह्मणजे क्षेत्रांत इतरांचा त्रास तरी होत नाहीं, देवदर्शन चांगलें होतें, जागा चांगली व बंदोबस्ताची मिळते व जीव एकप्रकारें निर्घोर होतो हा मोठा फायदा आहे.

उत्तरेकडच्या यात्रेंत त्यांत विशेषत: हिमालयाच्या यात्रेंत यात्रेकरूला विशेषत: सृष्टिनियमांशीं किंवा निसर्गाशीं झगडावें लागतें. ह्मणजे ऊन, पाऊस, वारा, तुफान, बर्फ, जंगल, दरे, खोरे, कडे, पठार, नद्या, नाले वगैरेशीं झगडावें लागतें व त्यांतून सुरक्षितपणें यावें लागतें. तेथें सामानसुमान, पैसे ह्यांची फारशी पर्वा नाहीं, तिला कोणी विचारीत नाहींत फक्त शरीर संभाळणें ह्मणजे मिळविलें. पण दक्षिणेच्या यात्रेंत याच्या उलट आहे. यांत यात्रेकरूला मनुष्य स्वभावाशीं व त्याला अनुसरून त्यांचें चालणें, बोलणें व विशेषत: त्यांच्या

बऱ्या वाईट हस्तलाघवाशीं झगडावें लागतें. व त्यांतून सामान व विशेषतः पैसा–नोटी यांस जिवापलीकडे जपावें लागतें. शरीराची पर्वा नसते. आपण मनुष्य वस्तींतूनच जात असल्यामुळें शरीर रक्षणास लागणारें अन्नपाणी कोठेंहीं निदान भीक मागून तरी मिळेल. पण हिमालयांत चांगलें अन्न व पाणी निदान बरेंसें अन्नपाणी प्रयत्न करूनही मिळत नाहीं. आणि मनुष्यांत दिवसानुदिवस कांटकपणा कमी असल्यामुळें ती यात्रा विशेष कठीण जाते. त्या यात्रेचें पुण्य मनुष्यास कांटकपणा येतो हें आहे. व दक्षिणेच्या यात्रेचें पुण्य ह्मणजे मनुष्यांचे स्वभावाची व त्यांच्या आचार विचारांची माहिती, त्यांच्या धार्मिक समजुती, कालपरत्वें व देशपरत्वें त्यांचे आचार, पेहराव व त्यांच्या योगानें धर्माचीं विविध अंगें दृष्टीस पडून मनाला फार बोध होतो. तुसडेपणा जाऊन सहानुभूति उत्पन्न होते. असें एकंदर भरत खंडाच्या यात्रेनें परमेश्वराचे विराट स्वरूपाचें दर्शन, त्याच्या अगाध लीला पाहून मन थक्क होतें व तें ईश्वरपरायण होतें. याचा अर्थ मनुष्य कर्तव्यशून्य होतो किंवा निव्वळ साधु होऊन संसार प्रपंच सोडून मनुष्य जातीपासून तो अलिप्त राहाण्याची इच्छा करितो असा नाहीं; तर व्यवहारोपयोगी कामें करतांना मनुष्य, मनुष्यांच्या संगतीनें व घसवटीनें त्यांच्याविषयीं राग, लोभ, द्वेष, मत्सर इत्यादि मनोविकार उत्पन्न होऊन जे अनर्थ उत्पन्न होतात तसे न होतां त्यांची तीव्रता नेहमींच्या घसवटीनें बरीचशी कमी होऊन, कार्यक्षम बनतो व विचारी होतो. ह्मणजे तो संसारांत असून नसल्यासारखा अलिप्त राहतो. मनुष्याला जन्मास येऊन मिळवावयाचें तें हेंच आहे. ह्मणूनच यात्रा करून आलेल्या मनुष्याच्या जन्माचें सार्थक झालें असें म्हणण्याची वहिवाट आहे. व कोणत्याहि बऱ्या वाईट गोष्टींचा निर्णय त्यास विचारतात. या प्रमाणें तो कार्यक्षम झाला नाहीं तर त्याची यात्रा निष्फळ झाली किंवा त्यानें खालीं मान घालून कांहीं न पाहतां यात्रा

केली असें म्हणावें लागतें. बाकी बहुधा असें होणार नाहीं. सर्व साधुसंतांत, प्रपंच व परमार्थ यांची सांगड फक्त समर्थांनींच घातली आहे.

‘ प्रथम हरि कथा निरूपण । दुसरें तें राज्यकारण ।
तिसरें तें सावधपण । सर्व विषयीं ॥

हें सावधानाविषयीं त्यांचें वचन प्रत्येकानें हृदयांत बाळगण्यासारखें आहे. ह्मणजे परमेश्वर स्मरून किंवा सद्सद्विचारानें कोणतीही गोष्ट केली—शत्रूचा जीव घ्यावयाचा कां होईना—तरी तिचा परिणाम वाईट होणार नाहीं. निदान द्वेष तरी वाढत नाहीं. या समर्थांच्या अनुग्रहामुळें शिवरायांनीं अफजुलखानासारख्याचे वध केले तरी त्यांच्या मुसलमान रयतेनें त्यांचा कधीं द्वेष केला नाहीं. सारांश, परमेश्वरस्मरण पूर्वी कधीं कोणासही सुटलें नव्हतें तें आतां सुटत चाललें आहे. हें समाजाच्या अधोगतीचें चिन्ह आहे हें फार वाईट आहे. सारांश परमेश्वराची ओळख होण्याचा पहिला धडा यात्रा हा आहे. पहिल्या भागांत सांगितलेली व ही दिलेली माहिती व सांगितलेले विचार पुढील यात्रा करण्यास पुरेसे आहेत सबब आतां—

## यात्रेचें वर्णन करूं.

दक्षिणेच्या यात्रेचा आरंभ मी मुंबईपासून केला. प्रथम—

## घारापुरी

येथील कोरींव लेणी पहाण्याकरितां निघालों. घारापुरी हें मुंबईच्या आग्नेयेस बेट आहे. हें मुंबईपासून ७ मैल आहे. बोटींतून किंवा पडावांतून जावें लागतें. पडावांतून गेल्यास एक दिवस मोडतो, व गास मंडळी निदान १०।२० पडावाच्या भरतीची पाहिजे. नेहमीं पडाव निघतातच असें नाहीं मनुष्यांची भरती असली ह्मणजे तो निघतो. बरोबरच फराळाचें बरेंचसें घेऊन सकाळीं ७ वाजतां निघावें.

वारा असेल त्याप्रमाणें पडाव जाण्यास सुमारें दोन तीन तास लागतात. पडाव बोटींच्या धक्क्याचे खालीं ह्मणजे उत्तरेचे बाजूकडून निघतात. त्यांतून जातांना ऊन फार लागतें. पण यापेक्षां बोटींतून जावें हें उत्तम. बोट मुंबईहून अलेकझांडरा डाकमधून उलवा लाइनीकडे सकाळीं स्टँडर्ड टाईम ७॥ वाजतां सुटते. व एलीफंटा केव्हला ८॥ वाजतां पोंचते व तेथून परत १०॥ वाजतां निघून १२ वाजतां मुंबईस पोंचते. घारापुरीला एलिफंटा केव्ह म्हणतात. बोटींतून बंदरावर उतरल्यावर दोन टेंकड्या दिसतात. त्यांत बऱ्याच लेण्या आहेत. पण त्यांपैकीं मुख्य लेण्यापर्यंत सडकेचा रस्ता आहे. दीड मैल आंत गेल्यावर लेण्याच्या पाव्या लागतात. लेण्याच्या जवळ ऑफीस आहे. त्यांत चार आणे माणशीं सरकारी कर भरून लेणीं पाहण्यास जाऊं देतात. पुराणवस्तू दुरुस्तीच्या कायद्याप्रमाणें याची दुरुस्ती केली आहे. व दुरुस्तीचा खर्च ह्या करांतून काढतात. ह्या लेण्या पाहण्यास मुंबईहून बोटीनें बरेच युरोपियन येतात. सबब येथें व्यवस्था बरी आहे. बंदरावर उतरण्यास लाकडी धक्का आहे. यामुळें पाण्यांत पाय टाकण्याचें कारण पडत नाहीं. जलदी करून आल्यास हीं मुख्य लेणी पाहून हीच बोट परत मिळते. नाहींतर दुसरे दिवसापर्यंत बसावें लागतें. बाकी मुख्य लेणीं पाहिल्यानंतर दुसऱ्या लेण्यांत फारसें महत्व नाहीं. मुख्य लेणीं मात्र लक्षपूर्वक पाहण्यासारखीं आहेत. हीं लेणीं जेथें जेथें असतात, तेथें पाण्याची सोय बहुधा असते. तेथील पाणीही उत्तम असून तें उत्तम राखिलेलेंही असतें तसें येथीलही राखलेलें आहे. महाशिवरात्रीस येथें मोठी यात्रा भरते. त्यावेळीं दुकानें वगैरे येतात. येथें थोडीबहुत वस्तीही आहे.

एकंदर लेण्या पांच आहेत. त्यांत चार पूर्ण प्रेक्षणीय आहेत. पांचवीची मोडतोड फार झाली आहे. लेण्यांतील कांहीं मूर्ती फार भव्य ११।१२ फूट उंचीच्या आहेत. हल्लीं जे त्यांचे अवशेष दृष्टीस

पडतात त्यांवरून त्या वेळच्या सौंदर्याची, कपड्यांची व दागिन्यांची व विनोदाची कल्पना करतां येते तसेंच मूर्ती फार प्राचीनकाळच्या असल्यामुळें त्यावेळीं एवढालीं मोठी माणसें होतीं किंवा काय हें समजत नाहीं. हल्लींही कांहीं माणसें फार उंच आढळतात. त्याचप्रमाणें त्या काळीं एवढाली तरी उंच मंडळी असावी असा तर्क होतो. हा काल बौद्धापूर्वींचा निदान दोन हजार वर्षांपूर्वींचा तरी असावा. मुख्य लेणीं पश्चिम टेकडीवर आहेत. पहिलें लेणें त्रिमूर्तीचें अथवा दत्ताचें आहे. पण याचे मध्यभागीं ब्रह्मदेवाचा चेहेरा दिसतो. दत्ताच्या फोटोंत मध्यभागीं ब्रह्मदेव क्वचित असतो. कारण ब्रह्मदेवाचे उपासक त्याला शाप झाल्यामुळें कोणीच नाहींत. येथें तरी मधला चेहेरा ब्रह्मदेवाचा ह्मणण्याचें कारण एका बाजूचा कोपयुक्त आहे. अर्थात तो शंकराचा असला पाहिजे. मधला नम्र व शेवटला सभ्य अर्थात विष्णूचा असावा. म्हणजे ब्रम्हा, विष्णु व रुद्र अर्थात उत्पत्ति, स्थिति व लय असा क्रम असून ब्रम्हदेवाला प्राधान्य असेल अशा वेळचीं हीं लेणीं असावीं म्हणजे तो काल दोन हजार वर्षांचा तरी असावा. या मूर्तीचें मुकुटाचें काम अगदीं अप्रतिम आहे. प्रथम जेव्हां ही मूर्ती कोरली असेल तेव्हां ती अत्यंत दर्शनीय व स्मरणीय झाली असेल. मला वाटतें या मोहकपणामुळेंच ती शत्रूच्या हातून आजपर्यंत राहिली असेल. दोन्ही बाजूंस द्वारपाळ, कैलासनाथाचे गण दाखविले आहेत. त्यांचा खुजा बांधा, फार मोठीं पोटें, हातांत शिंगें घेतलेले, त्यांची उभें राहाण्याची ऐट वगैरे पाहून मौज वाटते.

याच्या डाव्या बाजूस दुसरें लेणें ईश्वर पार्वतीच्या विवाहाचें आहे. त्यांच्या ११ व ९ फूट उंचीच्या मूर्ती आहेत शंकराच्या बाजूस गजारूढ इंद्र व कमलावर बसलेला ब्रम्हदेव असून दुसरेही देव आहेत. पार्वतीचे बाजूस गरुडावर बसलेले विष्णू व इतर देवताही दाखविलेल्या आहेत. ह्मणजे हा सर्व देखावा पार्वतीच्या विवाहाच्या तयारीचा

दिसतो. कारण पुढच्या लेण्यांत ईश्वर पार्वतीचा विवाहच प्रत्यक्ष दाखविला आहे. पार्वती शंकराच्या बाजूस मर्यादेनें अधोमुख दाखविली आहे व तिचा हात शंकराच्या हातांत दिला आहे. पार्वतीचा पेहेराव जैन मारवाड्यासारखा दिसतो, यावरून हा चित्रकार जैन असावा. जवळ चंद्र हा अमृतकलश घेऊन करवलीसारखा उभा आहे. हा चंद्र आहे हें दाखविण्याकरितां याचे मानेमागें चंद्राची कला दाखविली आहे. पार्वतीचे बाजूस सर्व देवांगना करवल्या ह्मणून दाखविल्या आहेत. सर्व ठिकाणीं शृंगी, भृंगी व पार्श्वगण हे तुताऱ्या, वाजविण्याचे करणे, व ढोलकीं वाजवीत चाळले आहेत. वाजवितांना यांची उभे राहण्याची ऐट फारच विनोदात्मक दाखविली आहे. समोर आठ फूट उंचीची उग्र, नररुंडमाळा धारण केलेली, अष्टभुजाकृती भैरवाची मूर्ती आहे. याचे पुढचे लेण्यांत विवाहाचा नाच ऊर्फ मृडानेश्वराच्या तांडवाचा देखावा दाखविला आहे. त्या ठिकाणीं शृंगी, भृंगी, षडानन, गजानन, ब्रह्मदेव, विष्णू यांच्या मूर्ती असून कोणी झांज वाजवितो आहे, कोणी टाळ, मृदंग, शिंगें, तुताऱ्या, ढोल वाजवीत आहेत असें दाखविलें आहे. यांत षडानन गजाननाच्या मूर्ती चुकून कोरल्या असाव्या असें वाटतें. कारण हीं मुलें पार्वतीला नंतर झालीं. कदाचित् हा नाच लग्नाचा नसून लग्नानंतरचा परमेश्वराचें तांडव दाखवितात त्यावेळचा असेल. याच्या पुढच्या लेण्यांत कैलासाचा देखावा दाखविला आहे. ह्मणजे वधूचा गृहप्रवेश दाखविला आहे. कैलासांत ईश्वरपार्वती बसलीं आहेत, सर्व देवही बसले आहेत व रावण आपले वीसही हातांनीं कैलासपर्वत मान खालीं घालून तीवर तो उचलून घेत आहे असें दाखविलें आहे. त्याचें डोकें दिसत नसून त्याचे वीस हात व पाठीमागचा भाग हीं दिसतात. हें लेणें सुटें आहे. याच्या समोरच्या बाजूस लग्नसमारंभ पुरा होऊन कृतकृत्य झालेलीं ईश्वरपार्वती कैलासांत बसलीं आहेत. पार्वतीजवळ मुलास घेतलेली एक देवांगना

आहे. ही कदाचित तिची पाठराखणी आली असावी. त्याच्या जवळच पलीकडे शंकराची मूर्ती अर्धनारी नटेश्वराच्या वेषांत ह्मणजे हिचा अर्धाभाग शिवाकृतीचा (पुरुषाचा) आणि दुसरा भाग अपर्णाकृतीचा ह्मणजे स्त्रीचा असून जवळच भव्य असा नंदिकेश्वर व इतर देवगण आहेत. प्रत्येक खोलीच्या किंवा देवाच्या दालनांत बैठकीचे बाजूस मोठमोठे द्वारपाळ व चित्रविचित्र देवगण आहेत. हीं सर्व लेणीं सुटीं नाहींत, खडकाला चिकटलेलीं कोरून काडलेलीं आहेत. पण एका स्वतंत्र देवळांत शिवलिंग असून त्याचे प्रत्येक बाजूस दोन दोन असे आठ द्वारपाळ गदा घेऊन उभे आहेत. त्यांपैकीं एक मात्र सबंध आहे. हीं सर्व लेणीं मध्यें मध्यें खांब ठेवून एका दगडाची कोरलीं आहेत. मधलें शिवालय अगदीं सुटें आहे पण त्यालासुद्धां सांधा नाहीं याचें फार मोठें आश्चर्य वाटतें. तसेंच हीं सर्व एकाच दगडाचीं असून एकही मूर्ती भंग पावलेली नाहीं किंवा तिच्या एखाद्या अवयवालाही धक्का लागला नाहीं, यावरून कोरणारांची कमाल वाटते. शिवाय येथें एवढा मोठा पर्वतप्राय कडक दगड लागेल असा तरी त्यांना अदमास कसा करतां आला? यावरून त्यांना भूगर्भशास्त्राची चांगली माहिती असावी असें दिसतें. तसेंच अशीं लेणीं जथें जथें आहेत तेथें तेथें पाणीही अगदीं उथळ जागेवर, खोदलेल्या कुंडांत व फारच उत्तम असून सर्वांत महात्वाची गोष्ट ही कीं, तें सर्व ऋतूंत सारख्या स्थितींत असतें ह्मणजे कमी जास्त होत नाहीं, बिघडत नाहीं व सारख्या प्रमाणांत थंड असतें याचें आश्चर्य वाटतें. याशिवाय दुसऱ्या पुष्कळ गुहा आहेत. त्यांत एकांत गणपती व एकांत बुद्धाची मूर्ती आहे व स्तूपही आहे. याला कोणी धर्माचा डेरा ह्मणतात. दोन्ही डोंगरांवरील लेणीं पाहावयाचीं असल्यास परत जाण्यास बोट मिळण्याचा संभव नसतो. सबब सवडीप्रमाणें बाकीच्या लेण्या पाहाव्या. जुन्या बंदराच्या धक्यावर जेथें मुंबईहून आलेले पडाव लागतात तेथपासून वर धक्यापर्यंत पायऱ्या बांधल्या आहेत. व दोन

बाजूंस हत्तींचीं चित्रें दाखविलीं आहेत. ह्यावरून ह्या बेटाला एलेफंटा असें पोर्तुगिझांनीं नांव दिलें आहे. हें जुनें बंदर अगदीं लेण्याजवळ आहे.

विधर्मीयांचे हल्लयामुळें व कालवशतेमुळें हीं चित्रें बहुतेक छिन्नविच्छिन्न झालीं आहेत. परंतु त्यांचे जे हल्लीं अवशेष राहिले आहेत त्यांवरून पाहाणारास पूर्व कारागिरांच्या कौशल्याची, कामाची व धोरणाची धन्यता वाटल्यावांचून राहाणार नाहीं. कोणतीही मूर्ती सुटी नाहीं. एक भलें मोठें दालन करून त्याच्या भिंतींमध्यें ( खडकांत ) मेहेरपीसारखें देववर करून त्यांत त्या कोरल्या आहेत. त्यांत विसंगतता कोठें तरी दिसावी पण ती मुळींच दिसत नाहीं ! याचें अत्यंत आश्चर्य वाटतें. ह्या नुसत्या मूर्ती कोरल्या नसून प्रसंगाप्रमाणें त्यांच्या शरिराची रचना व चेहेरे दिसावे, जणूं काय तो समारंभ चाललाच आहे किंवा हीं चित्रें आपणांजवळ आतां बोलतीलच असें दिसतें. यांना पूर्वी रंग दिलेला असावा असें कांहीं ठिकाणीं रंगाचा अवशेष राहिलेला आहे त्यावरून दिसतें. त्यावेळीं त्यांचा देखावा फारच उत्तम दिसत असेल. हीं चित्रें पाहून आल्यावर कित्येक दिवस तीं आपल्या स्मरणांतून जातच नाहींत. यांतील कांहीं चित्रें नग्न आहेत. यावरून येथें जैन धर्माचें प्राबल्य होतें त्यावेळीं तीं तयार केलीं असावींत व मागून ब्राह्मण धर्माचा उदय झाल्यावर दुसरीं केलीं असावींत असें दिसतें. हीं लेणीं पाहून आल्यावर त्यांच्याकरतां आपण केलेला प्रयत्न फुकट गेला नसून आपण इतके वेळां मुंबईस येऊन हें जुनें ऐश्वर्य पाहिलें नाहीं याचें आश्चर्य वाटतें. येथें येऊन जाण्यास सकाळचा सहा तास वेळ व जाण्यायेण्याचें बोटीचें भाडें फक्त ७ आणे आहे; आणि तेथील ४ आणे कर मिळून ११ आणे होतात. बाहेरून मुंबईस येणाराला ११ आणे खर्च ह्मणजे कांहींच नाहीं. एखादें नाटक पाहाण्यालासुद्धां यापेक्षां जास्त खर्च लागतो. तरी मुंबईस येणारांनीं ही अमूल्य संधी दवडूं नये अशी शिफारस

आहे. बोटींतून धक्यावर उतरतांच सडकेनें चालूं लागावें. पश्चिम टेकडीवर ह्मणजे दुसरे टेकडीवर हीं लेणीं आहेत हें कोणीही सांगतो. किंवा टपालवाला याच बोटींतून उतरून पत्रें वांटण्यास तिकडेच जातो व परत बोटीनें तो परत फिरतो त्याजबरोबर जावें. मीं दिलेली बोटीची वेळ व खर्च हीं त्यावेळचीं आहेत. यापुढें त्यांत थोडा कांहीं बदल होईल परंतु तो ह्मणण्यासारखा नाहीं. लेण्याजवळ गेल्यावर उतारूकरतां टेबल, खुर्च्या, बसायला हवाशीर जागेचें छप्पर वगैरे केलीं आहेत. लेणीं दाखविण्यास शिपाई पाहिजे असल्यास जास्त खर्च दिला तर तो दाखविण्यास येतो. ही सर्व मजा पाहिल्यावर मी

## नाशीक

येथें गेलों.

कृतेतु पद्मं नगरं, त्रेतायांच त्रिकंटकं ।
द्वापारेच जनस्थानं, कलौ नाशिकमुच्यते ॥१॥

अशी याची चारी युगींची प्रख्याती आहे. स्टेशनपासून गांव ५ मैल आहे. सडक आहे व गावांत जाण्यास टांगे व ट्राम आहेत. मुसलमानांनीं हा प्रांत जिंकल्यावर यांतील कांहीं लोकांस बाटवून या शहरास गुल्छनाबाद असें नांव ठेवून त्या नांवासही बाटविण्याचा प्रयत्न केला होता परंतु तो फार दिवस टिकला नाहीं. पुन्हां नाशीकच नांव कायम झालें. पण बाटलेले मुसलमान मात्र मुसलमानच राहिले. वस्तुतः ते ज्यावेळीं बाटले ते त्यांच्या खुशीनें मुळींच बाटले नव्हते. उलट धर्मांतर झाल्याबद्दल त्यांना पश्चात्ताप होत होता. अशा वेळीं तेथील धूर्तांनीं त्यांना आपल्या गंगेच्या सहाय्यानें प्रायःश्चित्त देऊन शुद्ध करून घेतलें असतें तर काय बहार होती. त्यावेळची हिंदुधर्माची परिस्थितीच निराळी होती. प्रामाणिकपणा, सत्य, पापभीरुत्व, व कडक धर्मबंधनें हाडींमाशीं खिळल्यामुळें अगदीं क्षुल्लक कारण झालें तरी इतरांनीं

त्यांना वाटलें म्हणावें व त्यांनीं तें कबूल करावें ! काय हा अनर्थ ! हल्लीं कसें जरी आचरण केलें तरी मनुष्यास आपण बाटलों असें वाटतच नाहीं. व लोकही तो बाटला असें त्यास ह्मणत नाहींत ! एवंच दोन्ही मार्ग वाईटच परंतु पहिल्यापेक्षां चालू काळाला दुसरा बरा एवढेंच.

**अनाचाराद्भवेद्भ्रष्टः । अत्याचारेणमूर्खता ।**
**आचार व्यवहारेषु । समचित्तो भवेत्सुखी ॥ १ ॥**

प्रत्येक धर्मानें आपलीं धर्मबंधनें सांगितलीं आहेत. अर्थात् ह्या बाह्य गोष्टी आहेत, यांस त्या धर्माचे आचार म्हणतात. हे आचार जो पाळणार नाहीं तो धर्मभ्रष्ट होतो हें खरें आहे. पण फाजील धर्माभिमानी म्हणवून घेण्याकरितां आचारांचा कीस काढीत बसणें व त्याबद्दल लोकांस दोष देणें हा केवळ वेडेपणा आहे. म्हणून आचार-व्यवहारक्षम करून ते शक्य तितके पाळणें याचेंच नांव खरा धर्माभिमान आहे. याशिवाय शास्त्रांत आपद्धर्म म्हणून सांगितले आहेत. आणि आपत्ति प्राप्त झाली असतां जो आपत्तीप्रमाणें वागत नाहीं तो धर्माचरण करीत नाहीं असें महाभारतांत स्पष्ट सांगितलें आहे. धर्म हा व्यवहारांत अडचणी घालण्याकरितां उत्पन्न झाला नाहीं. परंतु पूर्वीं जुन्या लोकांच्या समजुतीनें विनाकारण सात कोटी हिंदूंचे मुसलमान होऊन सर्व हिंदुस्थानामध्यें धार्मिक वितंडवाद माजला आहे. वस्तुतः अद्याप त्यांचें रक्त व आचारसुद्धां हिंदूचे आहेत. व ते आजपर्यंत एकाच मायभूमीचें दूध ( अन्नपाणी ) खात आहेत. मग त्यांत वेगळेपणा किंवा भिन्नभाव कोठें आला ? परंतु व्यर्थ धर्माभिमान उत्पन्न होऊन दोघांचीं डोकीं फुटत आहेत. आमचे हिंदु-मुसलमान बांधव याचा विचार करतील—आपली समजूत करून घेतील—तेव्हां खरें. हल्लीं हिंदुधर्मानें त्यांना आंत येण्याचा दरवाजा खुला केला आहे. इच्छा असेल त्यानें हिंदू धर्मांत यावें. ज्यांना मुसलमानांत

राहण्याची इच्छा असेल त्यांनीं मुसलमान राहावें पण व्यर्थ द्वेष करूं नये. सर्व हिंदुस्थान मुसलमान होण्याचे दिवस आतां राहिले नाहींत, हें त्यांना कोणी सांगावयास पाहिजे असें नाहीं. आतां या चांगल्या सुधारणेबरोबर कांहीं वाईट आलें नाहीं म्हणजे झालें! ब्राह्मण जात आजपर्यंत सर्वांनीं मिळून पवित्र राखली होती ती आतां तशी राहील किंवा नाहीं याची शंका आहे कारण स्वतः आचार बिघडवण्यास तिनेंच आरंभ केला आहे. ही उन्नति खास नव्हे. असो. इतर जाती बिघडल्या तर त्या धार्मिक ब्राह्मणाच्या सांनिध्यानें कधींतरी सुधारतील पण ब्राह्मणांचाच आचार बिघडला म्हणजे कोणाचीच सुधारणा होणें शक्य नाहीं.

स्टेशनावर उतरतांच नाशीकचे गंगापुत्र ऊर्फ पंडे यांची गर्दी उतारूसभोंवतीं जमते. प्रत्येकाचे हातांत मोठमोठ्या जाड्या वह्या व 'अहो तुह्मी कोठले, तुमचें नांव काय, तुमचे उपाध्ये कोण' वगैरे प्रश्न प्रत्येकाकडून विचारले जातात, इतके कीं शेवटीं कंटाळा येतो. हा त्या ब्राह्मणांचा लोचटपणा पाहून राग येतो व त्यांजविषयीं अनादर वाटतो. पण यात्रेकरूंच्या वंशावळी त्यांच्याजवळ जशा मिळतात तशा अन्यत्र फारशा कोठें मिळत नाहींत. त्यांचेंच अनुकरण आतां ठिकठिकाणचे क्षेत्रोपाध्ये करूं लागले आहेत. पण फार प्राचीन काळापासून उपाध्येपण, नांव, गोत्र, वंश लिहून घेण्याची व्यवस्था मूळ नाशीकचीच खरी. येथें २।४ शें वर्षांपूर्वीचे सुद्धां लेख मिळतात? हल्लीं विभक्त कुटुंबपद्धतीमुळें व पोट भरण्याकरितां कोण कोठें जातो त्याचा नेम नाहीं. यामुळें आपले वंशज जगांत कोठें आहेत किंवा नाहींत याचा वानवा पडतो. फार काय सांगावें बापाव्यतिरिक्त आजापणजांचें नांव सुद्धां कित्येकांस माहित नसतें मग आजी पणजीचें नांव कोठून असणार? आईचें सुद्धां माहीत नसतें. आईचें नांव आई असें लहान मुलासारखेंही पुष्कळ सांगतात! पण त्यानांच हिंदु-

स्थानांतील मुसलमानी राजांचीं किंवा इंग्लंडांतील राजांची वंशावळ व त्यांचे काळ विचारले तर ते बिनचूक सांगतील ! सारांश हें देशाचें दुर्दैव किंवा काळमहिमा आहे. तेव्हां पंड्याच्या उपकाराकरितां नव्हे, तर आपली वंशावळ कायम राखण्याकरितां तरी आपला पूर्वींचा पंड्या ओळखून त्याची पूजा करून त्यास लेख लिहून द्यावा. आपला त्यांचा वेद एक मिळाला नाहीं किंवा ते अशिक्षित असले किंवा मूर्ख दिसले तरी त्यांजकडे पाहूं नये. आपल्या पंड्याचें नांव ठाऊक असल्यास सांगावें म्हणजे कोणी जास्त विचारीत नाहीं. पंडा ठाऊक नसल्यास कोणी तरी करावा म्हणजे दुसऱ्यांचा त्रास होत नाहीं व गंगेवर गेल्यावर आपला पूर्वींचा पंडा असल्यास-तो तपास करीत येतोही—आपले पूर्वजांचे लेख मिळतील तिकडेच जाणें उत्तम. न मिळाले तर आपली वंशावळ मुलासुद्धां लिहून देऊन जुना पूर्वजांचा लेख कोणाकडे सांपडल्यास हा लेख रद्द समजावा, असें शेवटीं लिहावें म्हणजे झालें. सारांश हल्लींच्या विभक्त कुटुंबपद्धतीमुळें ह्या संस्थेची फार जरूर आहे सबब तिचा तिरस्कार करूं नये. शिवाय आपण लेख लिहून दिला नाहीं किंवा लिहून दिला व तो पुढें मुलांनीं मानला नाहीं तर फिर्याद थोडीच होत आहे !

नाशीक शहर गोदावरीचे दोन्ही कांठीं वसलें आहे. पावसाळीं गंगेला महापूर आला म्हणजे जाण्यायेण्याकरितां आतां मध्यें मोठा दगडी पूल बांधला आहे. एका बाजूस नाशीक शहर व दुसरे बाजूस पंचवटी आहे. गंगेच्या दोन्ही कांठीं पितळेच्या व तांब्याच्या भांड्यांचीं दुकानें, हळद पिंजर वगैरे सौभाग्य द्रव्यांचीं दुकानें रांगेनें असून शिवाय पुण्याच्या मंडईसारखा फळफळावळ, भाजीपाला व धान्यांच्या दुकानांचा मोठा बाजार भरलेला दिसतो. मधून गंगा वाहते आहे. लोक स्नान करून तिची पूजा अर्चा करीत आहेत, कोठें श्राद्धें पिंडदान चाललें आहे, कोठें जपजाप्य ध्यान चाललें आहे. दोन्ही तीरांवर मोठमोठ्या देवा-

दोन, चारचार मजली हवेल्या आहेत. देवळें, मठ, धर्मशाळा सर्व तेथेंच आहेत. गंगेंत निरनिराळ्या धार्मिक व व्यवहारिक उद्देशाकरितां कुंडें व निरनिराळ्या राजेरजवाड्यांनीं बांधलेल्या धर्मशाळा, इमारती व प्रशस्त घाट बांधले आहेत. यामुळें गांवांतील स्त्रीपुरुषांचा, व्यापाऱ्यांचा व यात्रेकरूंचा सर्वांचा तेथेंच जमाव जमतो ह्मणून शहरापेक्षां गंगेची शोभा नेहमीं चित्ताकर्षक दिसते. त्यांत विशेषतः सकाळीं व संध्याकाळीं तर देखावा फार बहारीचा दिसतो. गंगेच्या दोन्हीं बाजूला एवढा विस्तीर्ण प्रदेश दुसऱ्या कोणत्याही क्षेत्रीं असा रम्य पहावयास मिळत नाहीं. यामुळें गंगेवरून हलूंच नये असें वाटतें. शहरांत कांहीं सभा वगैरे झाली तरी ती ह्या मैदानावर बहुधा होते. इतकीं हीं मैदानें विस्तृत आहेत, आणि हीं सर्वदा अशींच खुलीं राहतील कारण पावसाळीं हीं सर्व मैदानें जलमय होतात!

याशिवाय नाशीक शहरांत व पंचवटींत पुष्कळ देवळें व त्यांचे सोहाळे अवलोकनीय आहेत. ते पंड्यामार्फत पहावयास मिळतात. रामचंद्राच्या अवतार कृत्यांनीं या स्थानाला परम पावनत्व आल्यामुळें व रामानें दशरथाचें कांहीं और्ध्वदेहिक येथेंच करून त्याच्या अस्थी रामकुंडांत टाकल्यामुळें सर्व ठिकाणचे लोक और्ध्वदेहिक विधीकरितां बहुधा येथेंच येतात. व मृतांच्या अस्थी रामकुंडांतच टाकतात. उन्हाळ्यांत गंगेचें पाणी फार वाहातें नसतें किंबहुना मुळींच वाहात नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. पण रामकुंडांत पडलेल्या हस्तींचें दर्शन किंवा स्पर्शन इतके लोक स्नान करितात त्यांपैकीं कोणासही होत नाहीं! हें आश्चर्य आहे. हाच येथील विशेष तीर्थमहिमा आहे. असें जर नसतें तर ही चाल इंग्रजसरकारनें केव्हांच बंद केली असती. गंगेचा महिमा तो हाच कीं कितीही व कसलीही घाण पडो गंगा स्वच्छ ती स्वच्छच!! ह्मणूनच तिला 'परमपावनी' ह्मणतात. व हिंदु लोक तिचे भजनीं लागतात. आर्य

धर्माची अशी ठिकठिकाणीं साक्ष आहे, ह्मणूनच त्याजवर आजपर्यंत कितीही हल्ले आले, तरी तो धर्म टिकून राहिला आहे.

नाशीक व पंचवटी येथील गांवांतील देवळें, नारोशंकरची घांट वगैरे पंडे दाखवितात पण पंचवटींतील व तपोवनांतील राम-अवताराचीं स्थळें तीं लांब असल्यामुळें दाखवीत नाहींत. तरी आपण चांगला माहितगार मजूर करून तीं अवश्य पाहून यावीं. असा मजूर पंड्यामार्फत मिळतो. त्याचेमार्फत रामचंद्राचें तपोवनांत राहाण्याचें ठिकाण पहावें. या पुण्यस्थानीं हल्लीं रमणीय व भव्य देवालय असून त्यांत श्रीराम, सीता आणि लक्ष्मण या त्रिवर्गांच्या मूर्तीं, वालुकामय कृष्ण पाषाणाच्या मनोवेधक आहेत. सीतेला राहाण्याकरितां केलेली सीतागुंफा ही जमिनींत खडकांत खोल वेडीवांकडी आहे. एक मनुष्य तींत शिकस्तेनें जातो, व तोंड न फिरवितां त्यास तसेंच मागें फिरावें लागतें इतकी अडचण आहे. पण तिचा पुण्यमहिमा हा कीं, तेथें जीव गुदमरत नाहीं. हवा येण्यास तर साधन दिसत नाहीं! व आंत राम, लक्ष्मण, सीतेच्या मूर्ती असून एक दिवा असतो पण हवा खराब होत नाहीं हेंच विशेष आहे. तेथून जवळच ‘रामशेज’ नांवाचा डोंगर आहे. तेथें तृणशय्येवर राम निजत असत. तेथून तपोवन नांवाचें लक्ष्मणाचें तपश्चर्येचें स्थान आहे. तेथें शूर्पणखेला लक्ष्मणानें विरूप केलें. येथें हल्लीं बैरागी राहतात. त्रिशिरा, खर, दूषण वगैरे १४ हजार राक्षस रामावर एकदम चालून आले असतां, लक्ष्मणास सीतेच्या रक्षणाकरितां ठेवून एकट्या रामानें त्या सर्वांचा वध करून तेथील राक्षसशाहीचें उच्चाटन करून टाकिलें व आर्यांना वस्तीला जागा करून दिली, तें हें ठिकाण. हें ठिकाण पाहिल्यानें इतके विचार मनांत आले. आणि असे रामसाध्याचे विचार प्रत्येकाच्या मनांत आले पाहिजेत. ह्मणूनच ह्या यात्रेचें महत्व आहे. रामाच्या पराक्रमाची राक्षसांना एवढी धास्ती किंवा वचक बसला होता कीं,

रामाचें नांव निघतांच त्यांच्या हृदयांचें पाणी होत असे. म्हणूनच रामरक्षा स्तोत्राची योजना झाली असावी. नुसत्या रामनामाचा असा महिमा वर्णन करणें किंवा त्याचा महिमा गाणें हें अलीकडच्या मंडळीस खरें वाटणार नाहीं, सबब त्यांना अलीकडील ऐतिहासिक पुरावा देतों. रजपूत, जाट किंवा मोंगल आपल्या घोड्यांस पाणी पाजूं लागले. व ते पाणी पीत नाहींसे झाले ह्मणजे ते घोड्यास म्हणत 'कायरे तुला पाण्यांत मराठा शिपाई दिसला काय ?' म्हणजे मराठ्यांचा वचक रजपूत व मोंगल यांस व त्यांच्या निर्बुद्ध जनावरांस सुद्धां बसला होता. मराठ्यांच्या पराक्रमाची ही स्थिति, मग रामाच्या पराक्रमाला मर्यादाच नव्हती. तेव्हां त्याचे संबंधानें कोणतीच गोष्ट अशक्य नव्हती. कधींहि फुकट न जाणाऱ्या उपायास रामबाण नांव देणें अशी आजपर्यंत सर्वांची पद्धति आहे. असो. पुढें रावणानें कपट करण्याकरितां मारीच्याला पाठविलें वगैरे त्यांचें कपट प्रसिद्धच आहे. ही हकिकत सीतेनें आपल्या बहिणींस खालील श्लोकांत मोठ्या प्रेमानें व अभिमानानें सांगितली आहे.

**प्रेमें लक्ष्मणजींस सांगति रणारंभींच मद्रक्षण ॥**
**स्वामी लाविती न द्विशद्बळवधें व्हायासि भद्रक्षण ॥**
**हे तार्क्ष्यप्रभुते चतुर्दशसहस्रक्रव्य भोक्ते अही ॥**
**बाई देखिलि दूरुनीहि रुधिरें धाली निवाली मही ॥**

काय हें रामाचें सामर्थ्य ! आणि पराक्रमाचा आत्मविश्वास. लक्ष्मणाला व सीतेलाही रामाच्या बलाची प्रचीति माहीत असावी म्हणूनच ते निर्धास्त लांब राहिले. ह्या चौदा हजार राक्षसांपैकीं एकही परत गेला नाहीं. फक्त शूर्पणखा आज राक्षसशाही संपली, कांहीं तरी लाज धरा अशी कळ पेटविण्याकरितां ती लंकेंत रावणाकडे गेली ! राम मारीचाला मारावयास गेले असतां व तेथें तो मरतांना मारिचानें रामासारखी लक्ष्मणास हाक मारून बोलावल्यामुळें लक्ष्मण, सीतेला

मर्यादेची रेषा काढून देऊन रामाकडे गेला. ती रेषा आतां ओढ्याचे रूपानें दाखविली आहे. त्याच ठिकाणाहून रावणानें भिक्षेकरितां येऊन व सीतेला त्या मर्यादेच्या पलीकडे बोलावून तो तिला घेऊन गेला. तें हें ठिकाण. ह्या शिवाय नाशीकपासून सहा मैलांवर गंगापूर आहे तेथें चक्रतीर्थ नांवाचा गोदावरीचा डोह आहे. त्र्यंबकेश्वराच्या डोंगरावरून गोदावरी उगम पावली व पुढें ती गुप्त झाली तेव्हां रामानें तेथें बाण मारून तिला प्रगट केलें तोच हा डोह. तेथून मात्र तिचा प्रवाह कायम सुरू झाला आहे. तिचा पुढें एक धबधबा आहे तोही पाहून यावा. गौतमानें मोठा प्रयत्न करून जो हा उत्तम पाण्याचा झरा त्र्यंबकास निर्माण केला, त्याला पुढें जमीन कठीण न मिळतां पोकळ मिळून तो तींत नाहींसा झाला. ही फार वाईट गोष्ट झाली सबब श्रीरामचंद्रानें जमिनीचा उतार नीट लक्षांत घेऊन खणलें—बाण मारला—तों त्याला या झऱ्याचें पाणी सांपडलें. हें प्रत्यक्ष अनुभवावरून समजलें. यामुळें रामाला फार आनंद झाला व त्यानें तेथें पर्णशाला बांधून बरेच दिवस मुक्काम केला. नाशिकाहून ६ मैल टाकळी नांवाचें खेडें आहे. तेथें रामदासस्वामींनीं मोठी तपश्चर्या केली व तेथें मारुतीची स्थापना केली आहे. तेथूनच पुढें ते महासाधु या नांवानें प्रसिद्धीस आले. तशींच जवळ ५ मैलांवर बौद्धांची कोरींव लेणीं आहेत तींही पहावीं. यांस ‘ उषवदाताचीं शिलासनें ’ म्हणतात. हींही पाहाण्यासारखीं आहेत.

हा इतका पौराणिक व धार्मिक भाग झाला पण हा अतिप्राचीन असल्यामुळें खरा होता किंवा बनावट आहे याची पाश्चात्यलोक टवाळी करीत असतात. पण १८९० च्या जून महिन्यांत गोदावरीचे कांठीं एक खाण खणीत असतां, तींत कांहीं मनुष्यांचे अवशेष सांपडले होते. डोक्याची कवटी सांपडली होती, ती तीन हात रुंदीची होती ! तसेंच दोन दांत सांपडले त्यांची लांबी

६।७ इंच होती ! ! अलीकडे आफ्रिकेंत एक माणसाचें हाड ९० पौंड वजनाचें व पायाचें हाड ११ फूट ६ इंच लांबीचें सांपडलें आहे तसेच पाठीचे कणेही अजस्त्रच आहेत. ह्या सर्व वस्तू ब्रिटिश म्युझियममध्यें ठेवण्यास नेल्या आहेत. जरूर तर त्या पाहून किंवा वर्णनें वाचून आपली खात्री करून घ्यावी. या वस्तूंवरून रामायणकाळीं येथें व आफ्रिकेंत अगडबंब अगर धिप्पाड माणसें किंवा राक्षस होते अशी त्यांची खात्री होईल. अर्थात परकीयांच्या नादीं लागून धर्मलंड बनलेल्या आमच्या कांहीं लोकांचीही त्यावरून खात्री झाली आहे. व पुराणांतील सर्वच मजकूर मनोरंजनाकरितां नसून खरा आहे अशीही खात्री होत चालली आहे. आफ्रिका पूर्वी हिंदुस्थानास लागून होती, मागून मध्यें समुद्र आला असा बळकट पुरावा आहे. आतां नाशिक, त्र्यंबकचें स्वतंत्र वर्णन केलेलें पुस्तक मिळतें तेंही घेऊन ठिकठिकाणचीं पौराणिक स्थळें अवश्य पहावीं. नाशीक पाहिल्यानंतर मी

## त्र्यंबकेश्वर

येथें जाण्याची तयारी केली. त्र्यंबकेश्वर येथें जाण्याकरतां परत भाड्याच्या गाड्या गंगेच्या नाशीकक्रडच्या तीरावर मिळतात. त्या परत जाणाऱ्या असल्यामुळें त्यांतून गेल्यास माणशीं चार आठ आणे पडतात. पण स्वतंत्र केल्यास ८।१० रुपये सांगतात. कारण त्र्यंबकेश्वर नाशीकपासून २० मैल आहे. ह्या गाड्या संध्याकाळीं जेवून खाऊन निघतात व रात्रभर चालून सकाळीं त्र्यंबकेश्वरास पोंचतात. गाड्या जातात तेव्हां त्र्यंबकेश्वराचा पहाटेचा चौघडा वाजतच असतो. तो ऐकून मन प्रसन्न होतें. या गाड्या जुटीनें निघतात. नाशीकपासून त्र्यंबकेश्वरापर्यंत सडक आहे. पूर्वी वाटेंत दगा फटका फार होत असे. तो आतां बहुतेक नाहींसा झाला आहे. तरी मधून मधून त्याचा प्रादुर्भाव होतो, असें गाडीवान ह्मणतात. कोणावर वेळ कशी येईल

याचा काय नेम आहे? वेळ रात्रीची व पल्ला लांबचा, मध्यें गांव नाहीं यामुळें जुटीनेंच जाणें सोईचें आहे. स्वतंत्र गाडी करणारानें सुद्धां याच गाड्यांबरोबर निघावें हें उत्तम. पण आतां मोटारी झाल्यानें हा सर्व त्रास चुकून सकाळीं जाऊन संध्याकाळीं परतसुद्धां येतां येतें. त्र्यंबकेश्वरास स्वतंत्र म्युनिसीपालिटी आहे. यामुळें नाशीकच्या म्युनिसीपालिटीचा कर भरला तरी त्र्यंबकेश्वराच्या म्युनिसीपालिटीचा चार आणे कर परत भरावा लागतो. सिंहस्थामध्यें सर्व तीर्थें गोदावरींत येत असल्यामुळें यात्रा अतोनात येत असते. त्यांत आरंभीं व शेवटीं फारच गर्दी होत असते. यात्रेचे वेळीं त्र्यंबकेश्वरास पुष्कळ मोटारी सुटतात.

**गंगाद्वारे, कुशावर्तें, बिल्वके नील पर्वते**
**स्नात्वाच कनखले तीर्थें पुनर्जन्म न विद्यते.**

याप्रमाणें येथें दर्शनें व स्नानें मुख्य आहेत. यांपैकीं सर्वांत मुख्य कुशावर्त तीर्थ आहे. बाकीचीं मुख्य नाहींत. तीं निरनिराळ्या ठिकाणीं मुख्य आहेत. ह्मणजे गंगाद्वार—गंगेच्या उगमीं—हिमालयांत, कुशावर्त या ठिकाणीं, बिल्वतीर्थ तिकडे हिमालयांत आहे. नील पर्वत ह्मणजे निलगिरी—दक्षिणेंत आणि कनखल तीर्थ हरिद्वाराजवळ आहे. अशीं लांब लांब ठिकाणीं हीं मुख्य तीर्थें आहेत. पण इतक्या लांबच्या यात्रा ज्यानें केल्या नाहींत किंवा करण्याचें सामर्थ्य नाहीं त्याला बाकीच्या सर्वांचें दर्शन व स्नान व्हावें ह्मणून बाकीच्या तीर्थांची येथें योजना केली आहे. याचप्रमाणें जिथें जिथें यांतील मुख्य तीर्थ आहे तें मुख्य धरून बाकीच्या तीर्थांची तेथेंही अशीच स्थापना केली आहे.

त्र्यंबकेश्वर हें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक आहे. याचें देऊळ सवाई माधवराव पेशव्यांनीं बांधिलें. देऊळ दगडी व प्रशस्त आहे. पेशव्यांनींच या देवळाला मोठी नेमणूक करून दिली आहे. हल्लीं हें काम पंचकमेटीमार्फत चालतें. त्यांत चारी प्रहर चौघडा, त्रिकाल पंचामृती पूजा व रोज पंचपक्वान्नांचा महानैवेद्य याप्रमाणें व्यवस्था

असते. नैवेद्याची मूद पक्या सवाशेराची असते व त्याचप्रमाणें दहीं, दूध, मध वगैरे पंचामृती पूजेच्या वाट्या अर्धा अर्धा शेराच्या असतात. आजकाल ह्या नैवेद्याचीच किंमत पांच रुपये आहे. या नैवेद्यावर चार माणसें खुशाल जेवतील! त्र्यंबकेश्वराच्या देवळांत पिंडीमध्यें एक खोलगट वाटीसारखा भाग आहे. त्यांत अगुष्ठमात्र तीन लिंगें आहेत. हीं ब्रह्मा, विष्णू, महेश अशा अर्थी आहेत. यांच्यावर अकरा धारांच्या अभिषेकपात्रानें रुद्राभिषेक त्रिकाळ होतो. अभिषेक आटोपल्यानंतर हा भाग फडक्यानें अगदीं कोरडा करितात. व एक मिनिटाच्या आंत पुन्हा त्यांत पाणी निघालेलें आहे असें सर्वांना दिवा घेऊन दाखवितात. ही शिवाच्या जटेंतील गंगा असून प्रत्यक्ष साक्षात्कार आहे असें दाखवितात. रोज शंकराची त्रिकाळ पूजा, नैवेद्य व निरनिराळ्या वेळीं दर्शनाचे पोषाख घालतात ते पाहाण्यासारखे आहेत. त्र्यंबकेश्वराचा मुगूट जडजवाहिरांचा आहे. हा विशेष पाहाण्यासारखा आहे. इतका मोठा मुगूट कोठेंही नाहीं. एकंदरींत त्र्यंबकेश्वराचें हें मनुष्यानें केलेलें ऐश्वर्य पाहाण्यासारखें आहे. निदान हिरेजडीत मुगूट तरी अवश्य पाहावा. दर सोमवारीं व पर्वणीस तो देवाला घालतात. देवळाभोंवतीं मोठीं पटांगणें आहेत व सर्व ठिकाणीं फरशी आहे.

गौतमाला ब्रह्महत्या घडली त्याची पौराणिक कथा अशी आहे:— पूर्वी जनकाचे पुरोहित गौतम ऋषी पुत्रप्राप्तीनंतर आपल्या अहिल्या स्त्रीसह ब्रह्मगिरीवर तपश्चर्या करण्याकरितां राहिले असतां तेथें एकदां मोठें अवर्षण पडलें. तेव्हां त्यांनीं वरुणाची आराधना करून त्यापासून अक्षय पाण्याचें कुंड मागून घेतलें व त्याचे तीरीं इतर मुनींसह आश्रम व शेतीभाती करून राहिले. एके दिवशीं त्या कुंडावर पाणी भरण्याकरितां आलेल्या ऋषिपत्न्यांची व गौतमाच्या शिष्यांची कांहीं कारणानें बोलाचाली झाली. ती सर्व हकिकत ऋषिपत्न्यांनीं आपआपल्या पतींस सांगितली. त्यांनीं त्याबद्दल गौतमाचा सूड घेण्याच्या

इराद्यानें गणपतीची आराधना करून त्यापासून इच्छित वरप्राप्ति करून घेतली. पुढें गणपतीनें रोडक्या गाईचें रूप घेऊन गौतमाचें शेत खाण्यास आरंभ केला. व गौतमानें हात लावतांच धरणीवर पडून मेल्याचें सोंग घेतलें. हें पाहतांच इतर ऋषींनी त्यावर गोहत्येचा दोष ठेवून त्यास बहिष्कृत केलें. तेव्हां त्या दोषाचे निरसनार्थ गौतमानें त्यांच्याच सांगण्यावरून ब्रह्मगिरीवर सकल ब्रह्मवृंदांस शतवार प्रदक्षिणा व कोटी लिंगार्चन करून गंगा प्राप्तीस्तव तप आरंभिलें. त्या योगानें शंकर प्रसन्न होऊन ते गंगेस देऊं लागले पण ती तिकडे जाईना. (शंकराचा वियोग तिला सहन होईना.) तेव्हां रागानें त्यांनीं ब्रह्मगिरीवर जटा आपटल्या त्यावेळीं निरुपायानें ती तेथें प्रगट झाली. परंतु तिनें शंकरास आपल्या संन्निध राहण्याविषयीं फारच आग्रह धरला तेव्हां तेही तिच्या संन्निध त्र्यंबकेश्वर नांवाच्या लिंगानें राहते झाले. नंतर गौतम गंगेंत स्नान करून व त्र्यंबकेश्वराचें दर्शन घेऊन आपल्या पापापासून मुक्त झाले.

भगिरथानें जशी दीर्घ प्रयत्नानें भागीरथी आणली त्याचप्रमाणें गौतमानें मोठ्या तपश्चर्येनें (प्रयत्नानें) गोदावरी आणली. म्हणजे गोदावरी सुद्धा मनुष्याच्या प्रयत्नाचेंच फळ आहे. तिचा उगमही केवळ स्वाभावीक नाहीं. ब्रह्मगिरीपर्वतावर शिवानें ज्या ठिकाणीं जटा आपटल्या आहेत त्या ठिकाणीं खडकावर जटेसारख्या रेषा भरींव कोरल्या आहेत. तें स्थान व गंगेच्या उत्पत्तीचें कुंड म्हणजे खरें कुशावर्त वर ब्रह्मगिरी डोंगरावर असून तेथें मजूर करून मुद्दाम जावें. माहितगार मजूर चार सहा आणे दिले असतां मिळतात. रोज चार आणे दिल्यानें ते सर्व दाखवितात. ब्रह्मगिरीवर जाण्याला रस्ता थोडा अवघड आहे. पण अवघड ठिकाणीं मुंबईच्या श्रीमंत व्यापारी लोकांनीं आतां पायऱ्या केल्या आहेत व लोखंडी कठडे केले आहेत. ब्रह्मगिरी हें सह्याद्रीचें उंच शिखर आहे. येथें उभें राहून पाहिलें असतां

पश्चिमेच्या बाजूस फार खोल असा विस्तीर्ण कोकणचा भाग दिसतो. व पूर्वेकडे देश दिसतो. मूळ गंगा औदुंबराच्या झाडाखालीं उत्पन्न होऊन तिच्या प्रवाहधर्माप्रमाणें ती खोलाकडे म्हणजे कोकणांत जात होती. व त्याप्रमाणें तिचा एक प्रवाहही गेला आहे. हिला कोकणामध्यें वैतरणा म्हणतात. या वैतरणेचें पाणी अत्यंत निर्मळ व गंगेप्रमाणेंच उपयुक्त व पवित्र मानतात. हिच्या कांठीं केलेल्या भाजीपाल्याला इतरांपेक्षां विशेष चव असते असें म्हणतात. मींही हिच्या कांठावरील वांग्यांची चव घेतली आहे. वांगीं फार चविष्ट व लोण्यासारखीं विरघळणारीं असतात. वैतरणेलाही कोकणांत मान आहे.

**‘ वैतरण्यां सिंधुसंगमे विजयाभिनंदनः ’**

म्हणजे ही वैतरणा समुद्राला ज्या ठिकाणीं मिळते, त्या ठिकाणीं विजयाभिनंदन नांवाचा शककर्ता राजा होणार असल्याची कथा पुराणांत आहे. व दरसालच्या पंचांगांतही असते. हिला समुद्राचे ठिकाणीं दातिवऱ्याची खाडी म्हणतात. हिच्या एका बाजूस आरनाळा व दुसऱ्या बाजूस दातिवरें गांव आहे. या वैतरणेप्रमाणें ओढ्या प्रांतामध्यें एक वैतरणा नांवची महानदी आहे. तेव्हां तीच वैतरणा मुख्यत्वेंकरून श्रेष्ठ असावी असें वाटतें. ही वैतरणा ( गंगा ) कोंकणांत येऊन तिचा फारसा उपयोग झाला नाहीं. कारण प्रदेश लहान व डोंगराळ, कांहीं उत्पन्न होण्याजोगें नाहीं. व या झऱ्याचें पाणी अगदीं निर्दोष. अर्थात मनुष्यांना ह्याचा उपयोग झाला पाहिजे हें पाहून गौतमानें शंकराची प्रार्थना करून त्याचाच एक मोठा फांटा देशाकडचे बाजूस आणून देश समृद्ध केला व हिला गोदावरी हें नांव ठेविलें. मूळ जेथें औदुंबराच्या मुळाशीं गंगेचा उगम आहे तो कोकणच्या बाजूचाच आहे. तेथून कोकणाकडे उतार आहे. अर्थात पाण्याच्या नियमाप्रमाणें तो प्रवाह तिकडेच गेला. पण प्रयत्न करून गौतमानें तो पूर्वेकडे ह्मणजे घांटावर आणला आहे हें

त्या ठिकाणावरून स्पष्ट दिसत आहे. पण जुन्या पद्धतीप्रमाणें त्यानें हा मान शंकरास दिला. शंकरानें रागावून जटा आपटल्यामुळें गंगेची देशावर येण्याची इच्छा नव्हती तरी ती घाबरून पूर्वेकडे ह्मणजे देशावर आली. असा पौराणिक भाग दाखविला आहे. जेथें खडकावर शिवाच्या जटा कोरल्या आहेत त्यांना शेंदूर फासून त्यांची पूजा करतात.

अशा रीतीनें हा मनुष्य प्रयत्नाचा विजय आहे. यामुळें त्र्यंबकेश्वर, ब्रह्मगिरी, गौतम व गोदावरी यांचें माहात्म्य मोठें आहे. त्यांत रामचंद्रासारख्या अवतारी पुरुषांनीं तिच्या कांठीं पुष्कळ दिवस राहून तिची महती गाइली, यामुळें तिला पवित्रता विशेष आली. सीता रामायणामध्यें सीतेनें ह्मटलें आहे —

**निववी मज मातासी श्रीमत्त्र्यंबक जटोद्भवा गंगा**
**स्मरणें, स्तवनें, स्नानें शुचि करिती विश्वाचित्त वा-गंगा ॥**

सीतेनें तिची अशी महती गाइली यामुळें पुढें साधुसंतांनीं त्र्यंबक, नाशीक, पैठण वगैरे ठिकाणीं तिचा विशेष महिमा गाऊन लोकांस उपदेश केला. मूळ गंगा जेथून उत्पन्न झाली आहे तेथून तिचा प्रवाह पूर्वेकडे आला. पण जमिनींत घुसूं लागला ह्मणून आदिवराहानें तिला अडविलें. तेथें वराह तीर्थ झालें आहे. या वराह तीर्थांत वरून गंगेचें थोडें थोडें पाणी पडत असतें. प्रवाह नाहीं. या तीर्थांतून पुढेंही प्रवाह वाहातो असें दिसत नाहीं. यामुळें या तीर्थाचें पाणी स्वच्छ नाहीं. याचें पाणी खालीं कोठें जातें कांहीं समजत नाहीं. पण तें तेथून खालच्या कुशावर्तांत आलें असें ह्मणतात. पण हें लोक ह्मणतात यावरून मानावयाचें, प्रत्यक्ष आधार दिसत नाहीं. खालचें कुशावर्त हीही एक जिवंत झऱ्याची पुष्करणी बांधली आहे. त्यांतील पाणी येतें काठून व जातें कोठें हें समजत नाहीं हेमाडपंतानें गंगेला बांधून नेण्याकरतां चांगली चिरेबंदी वाट प्रवाहाला करून दिली होती. पण गंगा ह्मणाली, मी बांधली जाणार नाहीं. यामुळें कुशावर्ता-

पासूनचा प्रवाह गुप्त झाला. व हेमाडपंताचे श्रम व्यर्थ गेले. अद्याप त्याचें उत्तम बांधीव काम दिसत आहे. त्यानें पुढें रामाची प्रार्थना केली व रामानें बाण मारून त्र्यंबकेश्वरापासून बऱ्याच लांब गंगापुरापासून प्रवाह सुरू केला. म्हणजे गोदावरीचा दृश्य उगम गंगापुरापासूनच आहे व पुढें तो सतत चालला आहे. त्र्यंबकेश्वरास गोदावरीचा प्रवाह दृश्य नाहीं. गंगामाहात्म्यामध्यें गंगा केव्हां आली याबद्दल पुढें लिहिल्याप्रमाणें खुलासा आहे.

**गतेकृते द्विलक्षेवै मांधाता चक्रवर्तिनि ।**
**कूर्मे वैचाव-तारेच तथा सिंहगते गुरौ ॥**
**माघशुक्ल दशम्यांच मध्यान्हे सोमवासरे ।**
**गंगा समागता भूमौ गौतमप्रार्थिता सति ॥**
**औदुंबर तरोर्मूले ययौ प्रत्यक्षतां तदा ।**
**स्नानं चक्रे महाभागः प्रथमं गौतमो मुनिः ॥**

कृतयुगाचीं दोन लक्ष वर्षे गेल्यावर, मांधाता सार्वभौम राजा असतां, विष्णूचा कुर्मावतार असतां, धातानाम संवत्सरीं, सिंहस्थ गुरु असतां, माघ शुद्ध १० सोमवारीं, दोनप्रहरीं, गौतमाच्या प्रार्थनेवरून औदुंबर वृक्षाच्या मुळीं गंगा प्रगट झाली. व त्यांत गौतम मुनी प्रथम स्नान करून पावन झाले. असा मनुष्य प्रयत्नाचा स्पष्ट उल्लेख आहे. म्हणजे आर्यांनीं हा प्रांत वस्तीस योग्य आहे असें पाहिलें, पण तेथें पाण्याचा अभाव आहे, म्हणून हा प्रदेश वैराण दिसतो. सबब त्यांनीं प्रयत्नांनीं ह्या नद्या उत्पन्न केल्या व देश समृद्ध केला असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. आतां पौराणिक मंडळींनीं गंगेप्रमाणें गोदावरीची योग्यता गंगेपेक्षांही श्रेष्ठ आहे अशा अर्थी तिला गोदावरी हें नांव ठरविलें आहे. याचा अर्थ गो म्हणजे गाय, दा धातूचा अर्थ दान करणें व वर म्हणजे श्रेष्ठ, म्हणजे एकंदर अर्थ (चंद्र सूर्यग्रहण पर्वणीच

20399

वेळीं प्रयागास गंगा यमुनांच्या संगमावर स्नान करून सत्पात्रीं, सवत्स, व सालंकार अशा ) असंख्य गाई दान केल्यानें जें पुण्य प्राप्त होतें त्यापेक्षांही वर म्हणजे श्रेष्ठ आहे. असें फळ नुसत्या हिच्या स्नानानें प्राप्त होतें. म्हणून हीस गोदावरी नांव ठविलें आहे. अनार्यांपेक्षां आर्यांच्या सुधारणा अशाच श्रेष्ठ आहेत. त्या वेळच्या आर्यांना नद्या, कालवे व जमिनीची सपाटी ऊर्फ लेव्हल यांची फार मार्मिक माहिती असावी असें दिसतें. त्याशिवाय असें होणें शक्य नाहीं. हेमाडपंताला पाण्याचें लेव्हल व जमिनीचा कणखरपणा न समजल्यामुळें त्याची त्र्यंबकची मेहनत फुकट गेली. पण कुशावर्ताचें माहात्म्य मात्र कमी झालें नाहीं. सर्व आर्यावर्तांत कुशावर्ताची महती मोठी आहे.

कुशेनावर्तितां गंगा, गौतमेन महात्मना ।
कुशावर्तमितिख्यातं विष्णुलोकेषु दुर्लभं ॥

असा याचा मोठा महिमा आहे. मागें सांगितलेल्या ब्रह्मगिरी पर्वतावर गंगेचा उगम आहे. तें तेथील मुख्य गंगाद्वार, तसेंच त्याच्या जवळ मूळ दर्भानें उत्पन्न केलेलें कुशावर्त म्हणजे पर्वतावर जेथें गंगा उत्पन्न झाली तेथें एक लहान कुंड आहे. व त्याच्या जवळच त्र्यंबकेश्वराचें मूळ स्थान आहे. पण इतक्या उंचीवर सर्व यात्रेकरूंस जातां यावयाचें नाहीं म्हणून त्यांचें स्मारक खालीं केलें आहे. पुढें बिल्वतीर्थ आहे. कुशावर्ताजवळ एक विहीर आहे तींत घाण पाणी असतें. त्यांत सर्व यात्रेकरू पिंड, दर्भ, पत्रावळी, फुलें वगैरे टाकतात. अर्थात त्याचें पाणी नासून किडे पडले आहेत व दुर्गंधी येत आहे. पण त्यास कनखल तीर्थ ह्मणतात. यावरून आपल्याकडे कोठें घाण पाण्याचें डबकें असलें, ह्मणजे कनखलतीर्थ म्हणण्याचा परिपाठ आहे. यात्रेकरूंची अंधश्रद्धा प्रबळ नसती तर यांत कोणीही स्नान करतेना. पण तीर्थ आहे असें जाणून पुष्कळ लोक यांत सुद्धां स्नान करतात. कोणी नुसतें मार्जन करितात. कोणी नुसतें दर्शन व नमस्कार करूनच पुढें

जातात! अशा घाणपाण्यामध्यें स्नान करण्यास सांगण्याचा शास्त्राचा उद्देश यात्रेकरूंची आवडनिवड नाहींशी करावी हाच दिसतो.

या यात्रेंत ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा मुख्य मानली आहे. ह्या ब्रह्मगिरीवर सद्योजात, वामदेव, अघोर, ईशान आणि तत्पुरुष अशी पांच लिंगाकार शिखरें आहेत, ह्मणून सर्व ब्रह्मगिरी शिवस्वरूपी आहे व त्यावरील प्रत्येक झरा गंगा आहे असें समजून, सर्वच ब्रह्मगिरीला प्रदक्षिणा करावी असा त्याचा मोठा गौरव केला आहे. या ब्रह्मगिरीच्याच प्रवाहांची गोदावरी बनली आहे. ही सर्व प्रदक्षिणा नऊ कोसांची आहे. मार्ग चांगला नाहीं. नुसती पायवाट आहे. पण जों जों कांटे खडे लागतील तों तों विशेष पुण्य आहे असें त्र्यंबकेश्वराच्या यात्रेंत व आरतींत स्पष्ट सांगितलें आहे. मतलब हा कीं हें पाहिल्याशिवाय राहूं नये. खडे कांटे काढून कोणी तरी रस्ता साफ केला असता पण त्यामुळें यात्रेकरूस काटकपणा आला नसता. हा काटकपणा येण्याकरतांच सह्याद्रींत त्र्यंबकेश्वर, भीमाशंकर, व महाबळेश्वर अशीं तीन प्रख्यात शिवस्थानें ठेविलीं आहेत. अशानें सर्व मावळाची सहज माहिती होते. या ब्रह्मगिरीच्या प्रदक्षिणेनें कोंकण व देश यांच्या सीमेवरची सृष्टिशोभा फारच निरनिराळ्या प्रकारची दिसते ह्मणून या प्रदक्षिणेची महती जास्त वर्णन केली आहे. हे झरे उत्पन्न करण्यांत येथील पाण्याची विशेष परीक्षा केली असावी. जमिनीच्या विशिष्ट क्षारामुळें एकाद्या ठिकाणचें पाणी विशेष चांगलें, उपयुक्त व पाचक असतें असा अनुभव ब्रह्मगिरीवरील झऱ्यांचा आर्यांना आल्यामुळें त्यांनीं याला गंगा हें नांव देऊन याची महती वर्णन केली आहे. व तो प्रवाह लोकादरास पात्र केला आहे.

मूळ गंगा डोंगरावरील वराह तीर्थांत पडते. या वराह तीर्थासमोर डोंगरांत गोरखनाथाची गुहा आहे. तसेंच अष्ट विनायकांपैकीं बल्लाळ नामें गणपतीचा मूळ अवतार येथें झाला अशी गणेश पुराणांत कथा

आहे. याची सविस्तर हकीकत भाग ४, जंजिरा मुरूड व पाली या यात्रेंत येईल. हें येथील गणपतीचें देऊळ राघोबादादा पेशवे यांनीं बांधलें आहे त्यांचें अवश्य दर्शन घ्यावें. त्र्यंबकेश्वरास व गोरखनाथाचे गुहेंत कानफाटे गोसावी, बैरागी यांचे येथें मोठे आखाडे आहेत. गोसाव्यांचे निरंजनी, निर्वाणी असे अनेक पंथ आहेत व तेथें त्यांचे आखाडे आहेत. येथें पुष्कळ यात्रेकरू पुत्रप्राप्तीकरितां नागबली, नारायणबली करितात. त्याकरितां स्मशानांत गोदावरीच्या काठीं धर्मशाळेच्या सोयी आहेत. विसोबा खेचराची व नामदेवाची गोष्ट संतमहात्म्यांत सांगितली आहे ती येथेंच झाली असें ह्मणतात. त्या जागांचें व त्यांच्या मठाचें दर्शन घ्यावें. तसेंच ज्ञानेश्वराचे गुरु व ज्येष्ठ बंधु निवृत्तिनाथ व ब्रह्मानंद स्वामी यांच्या समाधी आहेत. योग्य वेळीं त्यांच्या यात्रा व पालख्या निघतात. हीं व दुसरीं स्थानें केदारेश्वर, कुशेश्वर, कर्पुरेश्वर, इंद्रेश्वर, बिल्वकेश्वर, कांचनेश्वर, उत्रेश्वर, त्रिभुवनेश्वर, त्रिसंध्येश्वर, त्रिसंध्यादेवी, कनकेश्वरी, कोलांबिका, नीलांबिका, इंद्रतीर्थ, कांचनतीर्थ, गौतमतीर्थ, कपोततीर्थ, वाराणशीतीर्थ, मणिकर्णिकातीर्थ, अन्नपूर्णातीर्थ, वल्लाळतीर्थ, बिल्वतीर्थ, केतकीतीर्थ वगैरे पवित्र स्थानें एक माहितगार मजूर करून अवश्य पाहून यावीं. मजूर चुकार असतात. सबब सर्व ठिकाणची माहिती आपणांस पाहिजे. अमूक ठिकाण दाखव असें ह्मटलें ह्मणजे ते दाखवितात. नाहीं तर कंटाळा करतात. नाशीक व त्र्यंबक येथील संपूर्ण माहितीचें पुस्तक नाशीक व त्र्यंबक येथें मिळतें तें घेऊन संपूर्ण वाचावें. व सर्व क्षेत्र पाहून यावें. त्यांत दोन्ही ठिकाणची माहिती असते.

पुराणांत या क्षेत्रास त्रिसंध्यक्षेत्र असें नांव आहे. महाशिवरात्रीस व कार्तिकी पौर्णिमेस रथोत्सवाप्रीत्यर्थ येथें मोठ्या यात्रा भरतात. निवृत्तीनाथाची यात्रा पौष वद्य ११ भरते. सिंहस्थांतही येथें मोठा मेळा जमतो. ही यात्रा झाल्यावर नाशीकास जाण्यापूर्वी गंगापुरास

जाऊन जेथून गंगा पुन्हा उत्पन्न झालेली आहे त्या कुंडांत स्नान व दर्शन करून नाशकास यावें. गाडीवाल्यानें तसें कबूल न केल्यास नाशकाहून गंगापुरास मुद्दाम जाऊन यावें. हल्लीं येथें शंकराचार्यांचें संस्कृत विद्यालय व आश्रम पहाण्यासारखीं झालीं आहेत. परत नाशकास आल्यावर गंगेच्या पंचवटीच्या तीरास दर बुधवारीं व शनिवारीं वणीच्या गाड्या बाजारास येतात. त्यांचा शोध करून वणीस जावें येथें स्वारीस सुमारें आठ आणे पडतात. पण स्वतंत्र गाडी केल्यास ८ रुपये पडतात! कारण नाशीकपासून वणी २६ मैल आहे. नऊ कोस दिंडोरी तालुक्याचें ठाणें आहे. व पुढें चार कोस वणी आहे. वणीहून

## सप्तशृंगी

चा डोंगर सुमारें तीन मैल आहे. वणीहून शिधाध्या घेऊन मोठ्या पहाटेस उठून मार्ग चालू लागलें पाहिजे ह्मणजे सप्तशृंगीस मनुष्य ८।९ वाजतां जाऊन पोंचतो. वणीपासून गडापर्यंतचा रस्ता चांगला नाहीं. व पुढें पायऱ्याही उंचच उंच आहेत. पण गडाचा मार्ग बांधीव पायऱ्यांचा असल्यामुळें जाण्यास अडचण पडत नाहीं. हा पायऱ्यांचा मार्ग सुमारें दोन मैलांचा आहे. खानदेशांतून कळवणचे बाजूने येणाऱ्या लोकांस वर जाण्यास चांगला गाडीरस्ता आहे, पण त्या बाजूनें लांबचा प्रवास पडून वेळ फार लागतो सबब नाशीकचा रस्ता चांगला. डोंगराचा निम्मे भाग चढून गेल्यावर श्रीगणेशाचें स्थान, तीर्थें व कुंडें लागतात. या पुढचा रस्ता पायऱ्यांचा नसून डोंगरसपाटीचा आहे. सप्तशृंग गांव डोंगरावर मैदानांत शिखराच्या पायथ्याशीं आहे. गांव ह्मणजे मोठा नाहीं. धर्मशाळा, पुजारी, गवळी वगैरे ५।१० लोकांचीं घरें आहेत हाच गांव. अशा बिकट वाटेंतून जनावरें कशीं येतात व गडावरील शेती कशी होते ह्मणून तपास केला. तेव्हां खानदेशांतून कळवण बाजूनें येतात असें समजलें.

म्हणून तो रस्ता माहीत झाला. या धर्मशाळेंतून सुमारें दोन अडीचशें पायऱ्या पुन्हा वर चढून गेलें म्हणजे शिखराच्या मधोमध कड्यामध्यें श्रीजगदंबेचें भव्य स्थान आहे. अगदीं शिखरावर जगदंबेचें मुख्य स्थान आहे असें म्हणतात पण तेथें जाण्याचा उपाय नाहीं इतका तो अवघड आहे. खालच्या ठिकाणापर्यंतसुद्धां पूर्वी मार्ग नव्हता. पण आतां तो चांगला केला आहे. श्रीजगदंबेची भव्य मूर्ती ज्याठिकाणीं उभी आहे तेथें पहाडास गुहाकृती दोन तीन पुरुष उंच कपार असून त्या कोरलेल्या मेहेरपींत खडकांत कोरलेली अशी आंगची मूर्ती आहे, सुटी नाहीं. येथें देऊळ, सभामंडप किंवा जागेची सोय मुळींच नाहीं. फक्त ५।१० मंडळीला उभें राहाण्यापुरती जागा आहे. सप्तशृंगीची मूर्ती सिंदुरचर्चित, अठरा भुजांची, अजमासें १० फुटांची, सायुध व महिषासुराचें मर्दन करीत असलेली अशी भव्य आहे. रूप तेजस्वी असून अत्यंत दर्शनीय आहे. कांहीं साक्षात्कार किंवा ईशतत्व त्यांत असल्याशिवाय नुसता दगड इतका तेजस्वी, शोभिवंत, अगदीं आपणाशीं बोलेल असा दिसणार नाहीं. मनुष्यें मातीचे व मेणाचे पुतळे करितात, त्यांना पुष्कळ उपचार करितात तरी दैविक तेजाची त्यांच्यानें बरोबरी करवत नाहीं. मग कर्तृत्वाचें नांवच नको. जगदंबेची दररोजची व मंगळवार किंवा शुक्रवारची पंचामृती पूजा विशेष अवलोकनीय असते. मूर्ती फार मोठी असल्यामुळें मध्यें फळी बांधली आहे. तीवर बसून एक पुजारी ब्राह्मण मूर्तीच्या वरच्या भागाची पूजा करितो व दुसरा कमरेच्या खालील भागाची पूजा करतो. दोघांचें काम एक समयावच्छेदेंकरून चालतें. यात्रेकरूस पूजा पायांचीच करावी लागते. श्रीजगदंबेचे उत्सव वर्षांतून दोन वेळ मोठ्या थाटानें होतात. त्यांपैकीं एक चैत्री पौर्णिमेचा व दुसरा नवरात्राचा आश्विन मासांतला. त्यावेळीं येथें सुमारें १०।१५ हजारांपर्यंत यात्रा भरते व डोंगरावरील मैदान व शिखर अगदीं फुलून जातें.

यात्रेच्या दिवसांत अगदीं शिखरावर ध्वजा लावण्याची चाल आहे. तेथें जाण्यास वाट नाहीं. तरी तेथील एका खालच्या जातींतील इसमास देवीचा वर असल्यामुळें तो ध्वजेचा मोठा वासा, फलपुष्पांच्या माळांचा टोपला, हळदकुंकू, नारळ, ओटी भरणेचें साहित्य, चोळीपातळ वगैरे रात्रीं बारा वाजतां घेऊन जाऊन उजाडण्यापूर्वीं परत येतो. तेथें पूजा केल्याचा दिवा रात्रीं दिसतो. व ध्वज सकाळीं दिसतो. अर्थात तो तेथपर्यंत जातो यांत शंका नाहीं. हीच स्थिति कोंकणांतील म्हणजे जव्हार संस्थानांतील महालक्ष्मीची आहे. तें वर्णन चौथे भागांत त्या यात्रेंत येईल. पौर्णिमेचे दिवशीं रात्रीं बारा वाजतां त्याचे अंगांत येतें. बेशुद्धींत असतांनाच तो तें सामान घेऊन जातो व काम करून सकाळीं बेशुद्धींतच परत येतो. त्याला रस्त्याचें विचारतां तो कांहीं सांगत नाहीं. मला माहीत नाहीं असें म्हणतो. पण एक बाई येते तिच्या मागून मी जातों. नंतर ती पुन्हा निघाल्या ठिकाणीं मला आणून पोंचविते, इतकें सांगतो. काय दैवी चमत्कार आहे पहा! नास्तिकांना लाजविणारा आहे. जेथें दिवसास सुद्धां नुसतें जातां येत नाहीं तेथें मध्यरात्रीं एवढें सामान घेऊन व बेशुद्धींत जाऊन मनुष्य काम करून परत येतो हा सुधारकांना दैवी चमत्कार मानावयाचा नसला तरी मोठें कल्पनातीत आश्चर्य तर खरेंच असें मानणें भाग आहे आणि यालाच दैवी चमत्कार असें आस्तिक मानतो दुसरें काय? हा मनुष्य मरण पावल्यावर त्याच्याच कुळांतील दुसऱ्या कोणाचे तरी आंगांत येतें, व मग तो हें काम दरसाल करितो. या प्रमाणें ही रीत अगदीं प्राचीन काळापासून वंशपरंपरागत चालत आली आहे.

या देवीची कथा सप्तशती ग्रंथांत फार सुरस वर्णिली आहे. देवीच्या ३॥ पीठांपैकीं ही अर्ध मात्रा आहे असें म्हणतात. शिखराची ऊंची सुमारें ३६०० फूट असावी. जवळच मार्कंडेय ऋषीच्या आश्र-

माचा डोंगर आहे. तेथें त्यांचा पूर्वी आश्रम होता. तेथें आतां मार्कंडेय तीर्थ आहे. येथेंही यात्रेकरू दर्शनास जातात. मधल्या डोंगर सपाटीवर एक साधू ब्राह्मण झोंपडी करून गायत्री पुरश्चरण करीत होता. त्याच्या धुमीचे धुरानें झोंपडीवरचे वांसे डांबर लावल्याप्रमाणें तेलकट काळे झाले होते. म्हणजे बरेच वर्षे त्याची तपश्चर्या चालली असावी असें दिसतें. असे साधू एकांतवासामध्यें जागा पाहून जगापासून अगदीं अलिप्त असतात. या साधूंची एक गाय मात्र होती. तिची ते सेवा करीत होते. यज्ञामध्यें अग्नि व गाय यांची योग्यता मोठीच आहे. अशा साधूंचें दर्शन होण्याजोगें असल्यास अवश्य घ्यावें. कोणाचा केव्हां अनुग्रह होईल याचा नेम नसतो. अशा साधुसंतांचें दर्शन सुद्धां दुर्लभ असतें. तें यात्रेमुळें कधीं कधीं साधतें. मी पाहिलेले साधू बोलत नसत. रीतीप्रमाणें मी मनापासून त्यांना नमस्कार केला व कांहीं व्यावहारिक द्रव्य त्यांचे पुढें ठेविलें. त्याचा ते उपयोग करोत वा न करोत. अगोदर समजलें असतें तर कांहीं फळफळावळ किंवा फराळाचें घेतां आलें असतें. या सप्तशृंगीवर पेशवाईचे वेळीं एक गौड स्वामी तप करीत होते. भाऊसाहेब पेशव्यांच्या स्वारीमुळें त्यांचा फार छळ झाला सबब स्वामींनीं त्यांस शाप दिला. यामुळें पानपतचे लढाईंत त्यांस पूर्ण अपयश आलें असें प्रसिद्ध झालें आहे. दुर्दैव तें हेंच म्हणजे त्या वेळच्या लोकांना राष्ट्रीय अभिमानापेक्षां द्वेषाचें महत्व जास्त वाटे ! मुसलमान व इतर धर्मी लोक त्यांचा छळ करीत तेव्हां त्यांचा शाप कोठें जातो !!

श्रीचें दर्शन व यथासांग पूजाअर्चा झाल्यावर देवब्राह्मण, कुलाचार, कुलधर्म खालीं वणीस आल्यावर करतात. डोंगरावर करण्याची सोय नाहीं. तेथें एकाद दुसरें पुजारी ब्राह्मणाचें घर असतें. पण सामान वगैरे कांहीं मिळत नाहीं. वणीसही सप्तशृंगीचे देऊळ आहे त्याला देवीचें खालचें ठाणें ह्मणतात. देवीचे देवळाजवळ एक

पुष्करणीसारखें बांधीव तीर्थ आहे. त्यांत स्नान, दान वगैरे करतात. व या देवीची पूजा करून आपल्या कृतकार्याची सांगता करतात.

वणीहून माल भरून गाड्या दर मंगळवारीं व शुक्रवारीं नाशीकच्या बाजारास जाण्याकरतां निघतात त्यांतही माणसें घेतात. स्वारीस सुमारें आठ नऊ आणे पडतात. अपरिचित मनुष्य असल्यास दीड रुपयाही सांगतात. पण चार ठिकाणीं चौकशी केली ह्मणजे सवडीनें गाडी मिळते. ह्या गाड्याही नाशीक प्रमाणेंच संध्याकाळीं निघून सकाळीं नाशकास पोंचतात. याप्रमाणें ही यात्रा झाल्यावर नाशीक स्टेशनावरून मनमाडास आलों. व तेथून गोदावरी व्हॅली रेल्वेनें दौलताबाद स्टेशनवर उतरून तेथून

## वेरूळ

सुमारें दहा मैल आहे, तेथें जाण्यास निघालों. रस्ता सडकेचा आहे. स्टेशनाजवळच दौलताबादचा किल्ला आहे तो अनायासें पाहून घ्यावा. हें ऐतिहासिक महत्वाचें स्थान आहे. हें पूर्वीं निजामशाहीचें दौलतीचें आगर होतें. हल्लीं येथील सर्व दौलतीस कीड लागून त्याची माती झाली आहे! कालगती विचित्र आहे दुसरें काय? आतां येथें नुसतीं ऐतिहासिक स्थानें दाखवितात. कौरवपांडवांच्या कुरुक्षेत्राप्रमाणें तीं आतां नामशेष झालीं आहेत. त्याचप्रमाणें ह्या किल्ल्यांत एकनाथ स्वामींचे गुरु जनार्दन स्वामींची ह्मणून जी समाधी दाखवितात तीही नामशेषच झाली आहे. ही समाधी अंधारांत एकांतवासामध्यें एका गुहेंत होती. व तेथें जाण्यास कंबर कंबर पाणी लागे, असें ह्मणतात. पण आतां कांहीं नाहीं. मोडून, तोडून, फोडून सर्व निकाल झाला आहे. हा किल्ला अगदीं एका दगडाचा व मधोमध बेलग आहे. हा मोठ्या टेकडीसारखा आहे. किल्ल्यावर जाण्याला भुयारांतून जावें लागतें. या किल्ल्यावर जाण्याला परवानगी लागते. ही परवानगी तेथें जवळच किल्लेदार राहातात त्यांजकडे मिळते. ही परवानगी ठेवी

नसून त्यांच्याकडून एक सोटा मिळतो. तो घेऊन किल्लयावरील निजामाच्या चौकीदारास दिला ह्मणजे आंत जाण्याला परवानगी मिळते आंत जाण्याचें भुयार ऊर्फ बोगदा मोठा आहे व वांकडा-तिकडा आहे. अपरिचित मनुष्याला जावयाला भयच वाटेल. पण येथें किल्ला दाखविण्याकरितां एक दोन मुसलमान असतात ते घासलेटची मोठी मशाल लावून आपणांस बरोबर नेतात. बोगद्यांतून वर गेल्यावर मोडक्या तोडक्या इमारती व विशेष स्थानें पाहावयास सांपडतात. त्यांत कांहींची दुरुस्ती हल्लीं निजामाकडून होत आहे असें दिसतें. किल्लयाच्या सर्वांत वरची इमारत अजून सुस्थितींत आहे. येथें गच्चीवर उभें राहीलें असतां सुमारें वीस मैल त्रिज्येच्या वर्तुळाचें क्षेत्र दिसतें. किल्ला चोहोंकडून उंचच उंच तुटलेल्या कड्यासारखा असल्यामुळें त्यावर स्वारी करण्याला कांहीं साधन नाहीं. यामुळें हा किल्ला अजिंक्य किल्लयांमध्यें मोडत असे. असा एका दगडाचा भुइकोट किल्ला जगांत दुसरे ठिकाणीं कोठें नाहीं असें म्हणतात. प्रसिद्ध हेमाडपंत हा देशस्थ, यजुर्वेदी ब्राह्मण दौलताबादचाच राहणारा होता असें म्हणतात. यानेंच मोहऱ्या व बाजरी लंकेतून प्रथम आणली व मोडी लिपी उत्पन्न केली. हा १२ बाराव्या शतकांत होऊन गेला असें म्हणतात पण हें खोटें दिसतें. हेमाडपंती कामें फार जुनीं दिसतात.

ही गोदावरी व्हॅली रेलवे मिटरगेजची असून चालण्यास बरी आहे. पण रात्रीं थर्ड क्लासचे डब्यांत दिवे नसतात. स्टेशन आलें म्हणजे तेवढे लावतात. दिवे विजेचे आहेत यामुळें असें करतां येतें. सिग्नलचे दिवे सुद्धां गाडी सुटली असें समजल्यावर लावतात. स्टेशन-वर बहुधा प्लॅटफॉर्म नाहींत व पाणी नाहीं. थर्ड क्लास डब्यांत संडास नाहींत व गर्दी फार अशी अडचण असते. तशीच या निजामच्या राज्यांत नाण्यांची मुख्य अडचण असते. हिला सरकारनें निजा-माची गॅरंटी दिली असल्यामुळें या रेलवेवर निजामाचेंच नाणें चालतें.

ब्रिटिश नाणें घेत नाहींत. हैद्राबाद, शिकंदराबाद वगैरे मुख्य ठिकाणीं जेथें युरोपियनांची रहदारी चालते तेथें ब्रिटिश नाणें घेतात. निजामाचें नाणें स्टेशनवर मिळावें म्हणून, रेलवे स्टेशनवर ठिकठिकाणीं निजामाचें नाणें देण्याकरितां सराफ ठेविले आहेत. निजामाचें नाणें कमी किंमतीचें आहे. त्यांचा डयूब आपल्याकडील दोन पै इतका असतो. ह्मणजे ब्रिटिश आण्याचे डयूब सहा पण यांतही फरक करून जरूरीप्रमाणें आठही घेतात. ब्रिटिश नाण्यास तिकडे कलदार किंवा सुरती नाणें म्हणतात. या सुरती रुपयास १ आण्यापासून ३ आणे पर्यंत बट्टा मिळतो. अडल्यास मुळींच वटाव न मिळतां बरोबरही घ्यावे लागतात. मोठ्या स्टेशनवर किंवा मोठमोठ्या दुकानांवर नाण्यांची अदलाबदल करण्यास सराफ बसलेले असतातच. पण लहान स्टेशनावर रात्रीं क्वचित सराफ नसतोही. सबब निजाम हद्दींत जरुरी पुरतें तरी निजाम नाणें बाळगावें पण तें जास्त घेऊन ठेवूं नये. कारण ब्रिटिश हद्दींत तें मुळींच घेत नाहींत. ब्रिटिश नोटांचे तिकडे पैसेही पुरे मिळत नाहींत. कांहीं वटाव द्यावा लागतो. या रेल्वेवर तिकिटांची किंमत ब्रिटिश नाण्यांमध्यें मांडलेली असते. पण घेतात निजामच्या नाण्यांत! ब्रिटिश नाणें दिलें तर घेत नाहींत. अर्थात ती रक्कम जास्त द्यावी लागते! निजामाच्या नाण्यास हाली ( शिक्का ) म्हणतात. ही रक्कम किती जास्त द्यावी लागते याचा लहान स्टेशनवर नियमच नाहीं. कारण तो कोठें लिहिलेला नसतो. मोठ्या स्टेशनावर जसजसा भाव बदलत जाईल, त्याप्रमाणें इंग्रजी जाहिराती रेलवेच्या लागतात. निजाम हद्दींत सुद्धां हैद्राबाद, शिकंदराबाद, गाणगापूर, येथें रेलवेवर निजामाचें नाणें घेत नाहींत, ब्रिटिश घेतात. मनमाडलाही ब्रिटिश नाणेंच घेतलें. पण दौलताबाद आली कीं हाली शिक्का पाहिजे!! तिकडील पोष्टांत सुद्धां हाच प्रकार आहे. कांहीं ठिकाणीं ब्रिटिश पोष्टें निजामच्या हद्दींत उघडलीं आहेत त्यांत ब्रिटिश कार्ड टाकलें तर तें ब्रिटिश हद्दींत बरोबर पोंचतें होतें.

पण निजामाचे पोष्टांत टाकल्यास त्याजवर ब्रिटिश तिकिटाशिवाय निजामाचें तिकीटही लावावें लागतें. मात्र ब्रिटिश हद्दींतून आलेलीं पत्रें निजाम पोष्टांतून बिनखर्चानें पेड होतात. रजिस्टरेंही पेड होतात. पण व्ही.पी. व मनिआर्डर मात्र होत नाहींत. कारण तेथें पैशाच्या देवघेवीचा संबंध आला. त्यांचा बट्टवडा ब्रिटिश पोष्टांतूनच मालकास घ्यावा लागतो. व याबद्दल मालकास पोष्टाकडून आपलें आर्टिकल ब्रिटिश पोष्टांत येऊन घेऊन जावें अशी नोटीस मिळते. निजामाचीं कार्डें. पाकीटें, तिकिटें, नोटीही आहेत. पण तीं निजाम हद्दींत मात्र चालतात. बहुतेक सर्व हिंदुस्थानामध्यें फक्त निजामाचेंच स्वतंत्र नाणें व पोस्ट ऑफिसें आहेत. यामुळें व्यवहाराला थोडी गैरसोय होते. सबब निजामहद्दींत आपल्या प्रवासाचा अदमास पाहून जेथें वटाव जास्त मिळेल तेथें निजामाचें नाणें घेऊन ठेवावें. अशी स्वतंत्र चलनें हिंदुस्थानांत आतां थोडींच राहिलीं आहेत.

दौलताबाद स्टेशनवर वेरुळास जाण्याकरतां गाड्या मिळतात. व भाडें जाऊन येऊन रुपया सवा रुपया पडतें. येथें भाड्यास किराया ह्मणतात. भाडें चार आठ आणे जास्त पडलें तरी द्यावें. पण मध्यें दौलताबादचा किल्ला पाहावयाचा आहे, लेण्यांच्यापुढें घृष्णेश्वरास व वेरूळ गांवांत जाऊन तेथून जेवून परत दौलताबादेस यावयाचें आहे, असा गाडीवाल्यापाशीं स्पष्ट करार करावा. असा करार केला नाहीं तर दौलताबादचा किल्ला पाहातां यावयाचा नाहीं व घृष्णेश्वरासही जातां यावयाचें नाहीं. गाडीवान आपली गाडी वेरूळाजवळ टेकडीवर रोजा ह्मणून मुसलमान वस्तीचें ठिकाण आहे तेथें सोडून ठेवतो व खालून लेणीं पाहून या ह्मणून सांगतो. आपण येईपर्यंत गाडी तेथेंच सुटलेली असते. संध्याकाळपर्यंत तरी दौलताबादेस पोहोचूं अशा बेतानें परत यावें. रोजा येथें मुसलमानांचे मोठमोठे दर्गे व मशिदी पाहाण्याजोग्या आहेत. हें उंचावर असल्यामुळें निजामसरकारनेंही

आपल्याकरतां येथें एक बंगला अलीकडच्या पद्धतीप्रमाणें बांधला आहे. रोजापासून वेरूळचीं लेणीं सुमारें १॥ मैल आहेत. रोज्यापासून वेरूळ घृष्णेश्वरपर्यंत अगदीं खडा उतार आहे. सडक आहे. हा जो उताराचा डोंगर त्यांतच कोरींवलेणीं आहेत. हें मुसलमानी राज्य आहे. यांत कायद्यानें मुसलमानांस कांहीं विशेष हक्क आहेत असें नाहीं, तरी राज्य त्यांचें असल्यामुळें त्यांचें वर्चस्व जास्त आहे. निजाम-हद्दींत प्रजेस शस्त्र धरण्याचा अधिकार आहे. तेव्हां त्यांचेशीं वेतानें वागावें हें बरें; ह्मणजे अतिप्रसंग येणार नाहीं व तो आणूं नये.

मनमाडास रात्रीं बसलें असतां दौलताबादेस गाडी सकाळीं येते. स्टेशनवरून सात वाजतां निघून किल्ल्यापर्यंत यावें तों साडेसात वाजतात. किल्ला पाहून यावें ता नऊ वाजतात. पुढें १० मैल जावयास निदान २॥ तास लागतात, म्हणजे लेण्याजवळ जाण्याला साडेबारा होतात. यापुढें लेणीं पाहून घृष्णेश्वरास जाणें म्हणजे अपराण्हकाळ होतो. पुढें घृष्णेश्वराचें दर्शन मात्र होतें. पूजन होत नाहीं. पुढें गांवांत जावें तरी सर्वांचीं जेवणें उरकलेलीं असतात. म्हणजे किती जरी मजा पहात असलों तरी आत्माराम शांत झाला नसल्यामुळें त्यापासून कांहीं सुख होत नाहीं. सबब स्टेशनवरून शक्य तितक्या लवकर निघावें पण गांवांतून उजाडल्याशिवाय स्टेशनवर गाड्याच येत नाहींत. पण त्यांत जी पहिली मिळेल तीच ठरवून किल्ला पाहून एकदम वेरूळास जावें. किंवा लेणीं न पाहातां प्रथम गांवांत जाऊन ब्रह्मकर्म आटपून घृष्णेश्वराची यथाविधि पूजा करून भोजन झाल्यावर दुपारीं दोन तीन वाजतां निघावें व लेणीं पाहावीं व मग स्टेशनवर यावें. किंवा वेरुळास एक दिवस मुक्काम करून सकाळीं पूजा व संध्याकाळीं लेणीं पाहून दुसऱ्या दिवशीं स्टेशनवर यावें. लेण्यांचें तोंड पश्चिमेस असल्यामुळें लेणीं नेहेमीं संध्याकाळींच पाहाणें सोईचें असतें. संध्याकाळीं आंत सूर्यप्रकाश चांगला पडल्यामुळें देखावा चांगला दिसतो.

दौलताबाद स्टेशनवर कोणी फर्स्टक्लास किंवा सेकंडक्लास पॅसेंजर उतरल्यास आणि त्यास वेरुळास जावयाचें असल्यास दौलताबादचे स्टेशनमास्तर त्यास 'तांगा पाहिजे काय' असें विचारतात. व त्याप्रमाणें तार करून औरंगाबादेहून फर्स्टक्लास किंवा सेकंडक्लास तांगा बोलावितात. त्यांचे चार्जही बरेच ह्मणजे दहाबारा रुपये असतात. यापेक्षां औरंगाबादेहून जाणें बरें. दौलताबादेपेक्षां औरंगाबादेहून जाण्यांत फारसा फरक नाहीं. पण मग दौलताबादचा किल्ला पाहावयाचा राहातो.

वेरूळचीं लेणीं सर्व जगांत श्रेष्ठ आहेत. अर्थात् ती पाहाण्यासारखीं आहेत. यामुळें जगांतून (परदेशांतून) कोठूनही मनुष्य येवो तो तीं पाहाण्यास अवश्य जातो. कारण प्राचीन कारागिरीचा तो एक अत्युत्कृष्ट मासला आहे. हीं लेणीं प्रसिद्ध असल्यामुळें त्याचीं वर्णनें फार झालीं आहेत ह्मणून त्यांचे पुन्हा वर्णन करून जागा अडवीत नाहीं. कारण त्यांचे वर्णनास निदान १०।२० पृष्टें तरी लागतील. इतर लेणीं जशीं एकाच काळांतील असावींत अशीं वाटतात तशीं हीं वाटत नाहीत. यांतील कांहीं नग्न आहेत. अर्थात् तीं जैन धर्माचें ज्यावेळीं येथें प्राबल्य असावें त्यावेळचीं असावींत. त्यानंतर बौद्ध धर्माचें वर्चस्व आलें. त्यावेळीं त्यांनींही आणखी नवीन बांधलीं. त्यांच्या लेण्यांत प्रमुख स्थानीं बौद्धाची मूर्ती किंवा स्तूप आहेत. पुढें श्रीशंकराचार्यांचा अवतार झाल्यावर त्यांनीं बौद्ध धर्माचा पाडाव करून पुन्हा वैदिक धर्माची स्थापना केली. तेव्हां त्यांच्याही अनुयायांनीं त्यांत आणखी भर घालून प्रमुख स्थानीं शिवलिंगाची स्थापना केली आहे. त्यानंतर मुसलमानी झाली. त्यांनीं नवीन तर बांधलीं नाहींच. पण जुन्यांचा शक्य तितका विध्वंसच केला! सर्वांचा विध्वंस होणें शक्य नाहीं. कारण त्या मूर्तींच फार मोहक व त्यांचें कलाकुसरीचें काम फार

धाबाणण्यासारखें आहे. त्याचें वर्णन करून किंवा चित्रें काढून भागावयाचें नाहीं. तें प्रत्यक्ष पाहिलेंच पाहिजे. जशीं काय आपल्या-जवळ आतां बोलतीलच अशा उठावाचीं तीं आहेत. खरोखर भेटीस आलेल्या पाहुण्यांस तीं आपलें गतवैभव सांगत आहेत. अशा चित्रांचा विध्वंस मनुष्याचे हातून होणें शक्य नाहीं; तरी पण कोणाचें नाक कापलें आहे, डोळे फोडले आहेत, बायकांचे स्तनावर हात चालविला आहे, अशा लीला केवळ द्वेषानेंच केलेल्या आहेत! या लेण्यांत इंद्रसभा, सत्यलोक, यमलोक, कैलास, वैकुंठ, दशावतार, अष्टदिक्पाल व दुसऱ्या पौराणिक सभा यांचे सुंदर देखावे दाखविले आहेत. त्यांत देव, गंधर्व, राक्षस, नारद, तुंबर, जयविजय, हत्ती, सिंह यांचे अजस्र देखावे, पौराणिक प्रसंग, रामरावण युद्ध, पांडव, चौसष्ट योगिनी, नवग्रह, कृष्णगोपी, लक्ष्मी, सरस्वती, पार्वती वगैरे देवांगनाही यथा-प्रसंग दाखविल्या आहेत. त्यांचें प्राचीन तऱ्हेचें सौंदर्य व पेहेरावांची घाटणी यांचें शिल्पकाम पाहून प्रेक्षकांस महदाश्चर्य वाटतें. सर्वांत कैलास मंदिराची शोभा अपूर्व आहे इतर लेण्यांत व ह्यांत विशेष असें आहे कीं इतर लेणीं दगडांत कोरलेलीं आहेत. सुटीं नाहींत. पण कैलास हें लेणें सर्व लेण्यांच्या मध्यें अगदीं सुटें असून त्याची इमारत दुमजली आहे. आणि त्याचेभोंवतीं दगडांत सर्व लेणीं आहेत. या लेण्यांत सर्व कलाकौशल्याचा कळस झाला आहे. ह्मणजे मधलाच तेवढा डोंगरासारखा दगड शिल्लक ठेवून, त्याचे कळसापासून पाया-पर्यंत दुमजली देऊळ अगदीं बिनचूक व कोठेंही दगडाची कमजास्त कपची न उडतां कोरलें आहे. असें कोरावयाचें ह्मणजे मानवी धोर-णाची व कसबाची पराकाष्ठा झाली नाहीं असें कोण ह्मणेल! या सर्व लेण्यांत सांधा किंवा चुना यांचा संपर्कच नाहीं. हीं पौराणिक आहेत यावरून हीं वैदिक धर्माच्या वेळचीं असावींत असें दिसतें. ह्मणजे सर्वांचे कसबांत हिंदुधर्मीयांचेंच श्रेष्ठत्व आहे. येथें एक विहीर

खडकांत कोरली आहे. तीही वेडीवांकडी आहे. पण तींत पाणी मुबलक व उत्तम आहे. बाकी लेण्यांत कोठेंही पाण्याचीं टाकीं किंवा पाणी नाहीं. इतर ठिकाणच्या लेण्यापेक्षां ह्या वेरूळ लेण्यांत हा दोष आहे.

या शिवाय ८०।८० फूट लांब ४० फूट रुंद व १० फूट उंच अशीं दगडीं पटांगणें ऊर्फ सभामंडप छताला कोणत्याही खांबाचा किंवा कसलाही आधार नसतां केवळ निराधार दुमजली, तिमजली असे पांच मजल्यांपर्यंत गुहेप्रमाणें डोंगरांत कोरले आहेत! मध्यें मध्यें दगडी जिनें ठेविले आहेत. जिकडे तिकडे हवा व उजेड भरपूर असून पाहाण्याचीही उत्तम सोय केली आहे. दगडांतच उखळें वगैरे कोरलीं आहेत. एवढ्या मोठ्या पांच पांच मजली सभामंडपाची त्यावेळीं जरूर असावी म्हणूनच ते कोरले असले पाहिजेत हें उघड आहे. इतकें कर्तृत्व ज्यांनीं केलें त्यांचा आतां मागमूस सुद्धां राहूं नये, नांव सुद्धां राहूं नये, हें दुर्दैव आहे! ज्याला मध्यें कोठें सुद्धां दोरा सांपडावयाचा नाहीं असा हा सर्व एकसंध दगड तरी त्यांना कसा शोधतां आला? येथें दगडांत हटकून पाणी लागेल असें तरी त्यांन
कसें समजलें? आणि हा सर्व विद्या आतां कोठें गेली? तिचा मा
मूसही कसा राहिला नाहीं? त्याचें राहून राहून आश्चर्य ...ळाच्या-
द्वेष असला तरी त्या संबंधाच्या दंतकथा किंवा ... असावें असें
कशा राहिल्या नाहींत यांचें आश्चर्य वाटतें. आतां ...ठांत गणपतीची
भूस्तरशास्त्राचा व भूगर्भशास्त्राचा ओनामा ऊर्फ आरं...ईं. अहिल्या-
असा टेंभा मिरवितात म्हणजे आमचे शोधापूर्वीं हीं शास्त्... हें अर्धवट
असें सांगतात, त्यांनीं ही लेणीं एकदां येऊन तरी पहावीं... करतात
आपल्या पूर्वीं हिंदुस्थान पुष्कळ शहाणें होतें अशी त्यां... दिसतें.
होईल! वेरूळ हा प्राचीन पुरुखा राजाचा पुत्र एल राजा ... शंकर
राजधानी होती असा पुराणांतरीं दाखला मिळतो. म्हणजे हीं ले...च
इ. स. पूर्वींचीं कांहीं शतकांचीं तरी असलींच पाहिजेत.

हीं लेणीं व घृष्णेश्वराच्या देवळाचें काम पहात असतां मन नेहमीं अतृप्त राहातें. हल्लीं अशीं कामें होणें जवळजवळ अशक्यच. परंतु तीं त्यावेळीं राजाश्रयामुळें व धर्माभिमानामुळें झालीं, तीं डोळे भरून पाहाण्यालासुद्धां आह्मांला वेळ मिळूं नये हें आमचें दुर्भाग्यच! दुसरें काय? ज्यांच्याजवळ पैसे असतात त्यांस वेळ नसतो व ज्यांना वेळ पुष्कळ असतो त्यांच्याजवळ पैसे नसतात. व त्यांनीं हीं लेणीं पाहून त्यापासून काय अनुमान करावयाचें किंवा काय घ्यावयाचें हें समजण्याची किंवा त्याचा उपयोग करण्याची त्यांना अक्कल नसते. एवंच प्राचीन दृष्यवैभव आमच्या देशांत असून त्याचा उपयोग आह्मांला न होतां परक्याला होत आहे. यालाच कालगती ह्मणतात. दुसरें काय? लेण्यांपासून

## घृष्णेश्वर

सडकेनें सुमारें एक मैल आहे. हें देऊळ अहिल्याबाई होळकरीण हिनें
नवें बांधलें असें ह्मणतात. देवळाचा दगड तांबूस आहे. लिंगही श्रेष्ठ
अस
चें तांबूस आहे. यामुळें याला घुसृणेश्वर ह्मणतात. घुसृण ह्मणजे
पण कैल
गवतीनें हें केशराचें केलें आहे अशी पौराणिक कथा आहे.
इमारत दुमज
लिंगांपैकीं एक आहे. याची पौराणिक कथा अशी
या लेण्यांत सर्व का
ा नगरींत विबुधसुधर्मा या नांवाचा एक ब्राह्मण
तेवढा डोंगरासार
ा नामक स्त्रीसह राहिला होता. हीं दोन्हीं परम शिवभक्त
पर्यंत दुमजली
ांस संतान नव्हतें. तेव्हां त्या ब्राह्मणानें आपल्या स्त्रीच्या
कपची न उड
ऊन दुसरी स्त्री केली. तिचें नांव घृष्णा असून तीही परम
णाची व कर
होती. तिला शिवकृपेनें एक पुत्र झाला. त्यावेळीं पहिल्या
सर्व लेण्यां
(सुदेहेस) सवतीमत्सरामुळें अत्यंत खेद झाला व तिनें पाळत
आहेत
ह्मण
ून एके दिवशीं त्या बालकास ठार मारलें. हें वर्तमान जेव्हां त्या
ब्राह्मणाला व घृष्णेला कळलें तेव्हां तीं दोघें किंचितही न रागावतां व

शोक न करितां सर्व भार देवावर टाकून स्वस्थ बसलीं. हें त्यांचें धैर्य पाहून शंकर प्रसन्न झाले आणि त्या बालकास जिवंत करून घृष्णेच्या आग्रहाकरितां तेथेंच पार्वतीनें स्थापिलेल्या घृष्णेश्वर रूपानें राहिले. देवाचें मूळ नांव घुसृणेश म्हणजे केशराचा केलेला असें आहे. कोणी घृष्णेच्या नांवावरून घृष्णेश्वरही म्हणतात. जवळ लेण्यांचा नमुना आहेच. अहिल्याबाईसारखी धार्मीक व मनसोक्त पैसे खर्च करणारी बाई देऊळ बांधणेस निघाली यामुळें घृष्णेश्वराचें देऊळ पाहाण्यासारखें झालें आहे. त्यावेळच्या कारागिरीचा हा उत्कृष्ट नमुना आहे! लांकडावर काम होणार नाहीं इतकें कलाकुसरीचें काम त्यांनीं दगडावर करून दाखविलें आहे! याच नमुन्यासारखें पण फार लहान असें गणपतीचें देऊळ येथून एक फर्लांगावर जवळच आहे. तें अर्धेंच बांधून झालें असतां गणपतीची स्थापना केली आहे. वर छपर नाहीं व तें बांधणेंचें राहिलें तें अद्याप तसेंच आहे. आतां गणपतीवर फक्त झापांचें छपर घालतात! तेथील लोक म्हणतात, प्रथम हेंच देऊळ बांधण्याचा अहिल्याबाईचा विचार होता पण मग शंकराचें बांधलें, म्हणून हें राहिलें. पण असें होतें तर ह्या अर्धवट देवळांत गणपतीची स्थापना कां केली हें समजत नाहीं. देवळाच्या स्वरूपावरून हें शंकराच्या देवळाच्या पाठीमागून बांधलें असावें असें दिसतें. देऊळ अर्धवट कां राहिलें व अशा अर्धवट देवळांत गणपतीची स्थापना कां केली ह्याचें समाधानकारक उत्तर मिळालें नाहीं. अहिल्याबाईच्या हातून अशी गोष्ट होणें शक्य नाहीं. तिच्या पश्चात् हें अर्धवट राहिलें असल्यास नकळे. या देवळावर झांप बांधून सावली करतात पण पावसाळयांत याचा फारसा उपयोग होत नसावा असें दिसतें. शंकराच्या देवळाजवळ तळें किंवा निदान विहीर तरी असते. शंकर हे जलधारा प्रिय असल्यामुळें पाण्याची कांहीं तरी सोय असतेच पण घृष्णेश्वर येथें मात्र तसें नाहीं. देवळाखालीं जवळच इला नांवाची

पुण्य नदी आहे पण ती साधारण ओढ्यापेक्षां सुद्धां लहान आहे. अर्थात तींत उन्हाळ्यांत पाणी मिळणें शक्य नाहीं. ह्या नदींतच विहीर व झरे खणले आहेत व त्याचें पाणी देवास पूजेकरतां वर न्यावें लागतें. येथील पुजारी चांगला सुशिक्षित व धोरणी दिसला. तो यात्रेकरूंची त्यांच्या इच्छेप्रमाणें शक्य ती सोय करतो. पैसे काढण्याचे कामांत तोही कुशल आहेच. मी तेथें अपराण्हकाळीं गेलों असतां ह्यानेंच मला ह्यावेळीं जेवण कोठें मिळेल व धार्मिक कृत्यें कोठें होतील हें दाखविलें. व त्याप्रमाणें स्नान, दान, पूजा, जेवण, हीं झालीं. हातांनीं करण्याची सुद्धां सोय नव्हतीच; कारण पाण्याचा अभाव! मी उतरलों त्या ठिकाणीं चांगली मुबलक पाण्याची विहीर होती व माणसें सोयीचीं होतीं. हेंच प्रसंगीं परमेश्वराचें साह्य आहे.

देवळाभोंवती पडव्या व धर्मशाळा आहेत. सर्व काम दगडी आहे. या ज्योतिर्लिंगाच्या ठिकाणीं एवढी सृष्टिशोभा नाहीं. पण कोरीवलेणीं पाहिलीं जावीं हाच येथें ज्योतिर्लिंग ठेवण्याचा प्रधान हेतू असला पाहिजे असें दिसतें व यामुळेंच हें स्थान श्रेष्ठ मानलें गेलें असावें. निदान येथें येण्यापासून हा फायदा आहे खरा. देवळापासून वेरुळ गांव एक दोन फर्लांग आहे. गांव लहान आहे व जंगलांत आहे. अवेळीं म्हणजे जरा सकाळीं किंवा संध्याकाळीं दर्शनास निघाल्यास प्रथम वाघाचें दर्शन होतें असें म्हणतात! गांवांतही मोडके तोडके तलाव आहेत पण ते कांहीं डबक्यांवजा नसून चांगले बांधीव असे पूर्ववैभवाचे सूचक आहेत आणि ते असलेच पाहिजेत. कारण ज्यावेळीं हीं कोरीवलेणीं बांधलीं गेलीं त्यावेळीं येथें चांगल्या सुशिक्षित लोकांची वस्ती असलीच पाहिजे. गांवाला तटही आहे. अर्थात मागें लिहिल्याप्रमाणें येथें पूर्वी एल नांवाचा राजा राज्य करीत होता असें पुराणांतरीं लिहिलें आहे त्याचीच ही साक्ष पटते. या नंतर हा भाग एलिचपूरच्या यदु राजाच्या ताब्यांत गेला असें म्हणतात.

नंतर यादव ऊर्फ जाधव यांचें राज्य झाल्यानंतर मुसलमानी झाली असें इतिहास सांगतो.

हीं लेणीं व देऊळ दाखविण्यास तेथें गुरव असतातच. त्यांचे-जवळ लेणीं दाखविण्याबद्दल काय द्यावयाचें याचा ठराव करावा. आम्हाला कांहीं द्या नाहींतर देऊं नका असें तो म्हणतो. त्यावर आपण काय देणार हें त्यास सांगावें व नक्की ठरवावें. नाहींतर शेवटीं हेंगल होते. हा मनुष्य घेतला नाहीं तरी लेणीं पाहाण्यास कांहीं हरकत नाहीं. तो लांबलचक सर्वच डोंगर पोखरला आहे. आपणाच जाऊन पाहावीं. लेणीं अनुक्रमें जवळ जवळच आहेत. आतां आपण पाहिल्यानें त्यांचीं नांवें व कथा ( माहिती ) हीं आपणांस समजत नाहींत. पण ती त्याजपासून ऐकण्यांतही विशेष नाहीं कारण ती खरी नसते. दोन बायकांचा दादला, सुताराची झोपडी अशीं कांहीं तरी त्यांनींच अनुमानानें नांवें ठरविलेलीं आहेत; प्राचीन नाहींत. शिवाय हीं लेणीं पाहाण्यास कोणीना कोणी तरी येतच असतात. त्यांच्याबरोबर जावें म्हणजे झालें. गुरव दाखवूं लागला म्हणजे वेळ वांचावा म्हणून तो पटापट भाटासारखीं दाखवून चालूं लागतो. त्याजबरोबर आपणासही चालावें लागतें. जरा थांब, सावकाशीवर घे असें म्हटलें तर तो म्हणतो मला वेळ नाहीं. तुह्मांलाच तेवढें दाखवावयाचें आहे असें नाहीं. आणखी पुष्कळ मंडळी येतील त्यांस दाखविलें पाहिजे. शिवाय तुम्ही काय देणार हें समजलेंच ! ह्मणजे त्याला त्यामध्यें कांहींच वाटत नाहीं. कारण एखाद्या खानदानीच्या किंवा श्रीमंत मनुष्याच्या बरोबर गेल्यास त्याला सहजच दोन रुपये मिळतात. आपण काय २।४ आणे देणार तेव्हां त्याचेंही म्हणणें खरें आहे. आपण पाहाण्याच्या जिज्ञासेनें जातों आणि पैसे देऊन समाधान होत नाहीं. याकरतां त्याच्या म्हणण्याप्रमाणें एकदां पाहून आल्यावर आपण तीं सर्व पुन्हा सावकाश पाहून आपलें समाधान

करून घ्यावें या शिवाय दुसरा इलाज नाहीं. लेणीं पाहाण्यास कोणी युरोपियन, पारशी, किंवा संस्थानिक आल्यास त्यांच्याबरोबर जाणें विशेष सोईचें असतें. कारण त्यांच्यामुळें आपणाला सविस्तर व त्यांच्या श्रेष्ठ कल्पनेचें धोरण समजतें. पण असा योग क्वचित येतो. श्रीमंतांच्या दृष्टीनें आपणांस गुरवास पैसे देतां यावयाचे नाहींत. कारण आपण त्याच्या एक तासाची किंमत आपल्या दृष्टीनें करणार व श्रेष्ठ लोक आपल्या दृष्टीनें करणार ! तेव्हां हें कसें जमावें ? आपण ठराव केला व त्याप्रमाणें पैसे देऊं लागलों, तरी तो हे भिकाऱ्यासारखे कोण घेतो असें ह्मणून पैसे फेंकून देऊन हेंगल घालतोच! तुम्ही माझा फार वेळ मोडलात, वगैरे त्याची कुरकुर असतेच. जितके जास्त पैसे मिळवितां येतील तेवढे मिळवावयाचें हें त्यांचें ब्रीदच असतें. त्याला उपाय काय? एक रागावून गेला म्हणजे मध्यस्तीकरतां दुसरा येतो पग त्यांचें कांहीं चाललें नाहीं म्हणजे तिसरा येतो अशी व्यवस्था त्यांची ठरलेलीच असते. ती पाहून आपणांस कौतुक वाटतें. व शेवटीं मोठ्या नाखुशीनें आपण दिलेलें घेतातच ! असो. लेणीं पाहून आल्यावर सवड असल्यास दौलताबाद येथें परत येण्यापेक्षां औरंगाबाद येथें जावें. हा निजामाच्या राज्यांतला मोठा सुभा आहे. किंवा प्रथम तेथून वेरूळास यावें. वेरुळास येण्यास घोड्याचे टांगे मिळतात. औरंगाबादेहून वेरूळ १६ मैल आहे. पण घोड्याच्या टांग्यामुळें, १० मैल मोडक्यातोडक्या बैल गाडीनें जाण्यापेक्षां तेंच बरें असें वाटतें. नंतर येतांना दौलताबादेवरून यावें व किल्ला पहावा. पण वेरूळावरून दौलताबादेस येण्यास गाडी क्वचित मिळते, ही गैरसोय आहे. औरंगाबाद, वेरूळ दौलताबाद अशी गाडी किंवा तांगा मिळाल्यास या प्रवासाचा उपयोग आहे. पण अशाला पैसे फार पडतील. असो. दौलताबाद स्टेशनवरून मी पूर्णा जंगशनवर आलों व तेथून हिंगोली ब्रँचकडे जी लाईन जाते त्या लाइनीनें चौंडी स्टेशनवर आलों. तेथून

# औंढ्या नागनाथ

हें स्थान स्टेशनच्या पश्चिमेस १४ मैलांवर आहे. जाण्यास सडक आहे व गाड्याही मिळतात. पण गाड्या उघड्या व बसण्यास धड साटीही विणलेली नसते. शिवाय भाडेंही फार मागतात. इकडे जाण्याची रहदारी फारशी नसल्यामुळें व हे शिवरात्रीसारखे उत्साहाचे दिवसही नसल्यामुळें गाड्या स्टेशनवर येत नाहींत. गांवांतून आणाव्या लागतात. पायीं गेल्यास मधून खिंडींतून रस्ता थोडा जवळ आहे. पण पहाडी रस्ता असल्यामुळें तोही त्रासच आहे. हें शिवस्थान सुद्धां अत्यंत रम्य आहे. भोंवताली कोट आहेत. आंत विस्तीर्ण पटांगण व सर्वत्र फरशी केलेली आहे. आंत धर्मशाळा, पाण्याच्या पुष्करणी वगैरे सर्व कांहीं सोयी आहेत, यामुळें संसारास त्रासलेलीं पुष्कळ कुटुंबें येथें कांहीं दिवस सुखवस्तु राहण्याकरितां आपल्या बायकामुलां सुद्धां येतात. मी गेलों ते दिवस उन्हाळ्याचे असल्यामुळें पाणी थोडें खराब झालें होतें. पण स्नान करण्यास हरकत नव्हती. देवळांत गेल्यावर आंत पिंडी आहे. पण मुख्य तें स्थान नव्हे. मुख्य स्थान भुयारामध्यें आहे. हेंही बारा ज्योतिर्लिंगांपैकीं आहे. याची पौराणिक कथा अशी आहे. पूर्वी दारुका नामक राक्षसीनें तप करून गिरिजेपासून वाटेल त्या ठिकाणीं येणारें असें एक वन ( अरण्य ) मागून घेतलें व त्यांत ती आपल्या दारुक नामक पतीसह राहून देव ब्राह्मणांना फार पीडा देऊं लागली. तिनें हजारों ब्राह्मण बंदीशाळेंत घातले. त्यांत एक ब्राह्मण शिवभक्त होता. त्यानें इतरांस शिवदीक्षा देऊन पार्थिव पूजा करण्यास शिकविलें. ब्राह्मण शिवाची पूजा करितात हें सेवकानें दारुकास सांगतांच तो आला व ब्राह्मणांस पूजा करूं नका असें म्हणूं लागला. पण ब्राह्मण ऐकेनात तेव्हां त्यानें अतोनात छळ केला व त्यांस मारावयास धांवला. त्यावेळीं शंकर प्रसन्न होऊन त्यांनीं

आपल्या भक्तांचा बचाव केला व ते निर्धास्त होण्याकरितां आपण तेथेंच स्थित झाले. तेंच हें नागेशलिंग व त्या स्थळास दारुकावन ह्मणतात. ह्या देवाचें तोंड फिरलेलें आहे. याची पिंडी–पाणी पडतें तो भाग–पूर्वाभिमुख आहे. हें येथें विशेष आहे. अशी शंकराची पिंडी पूर्वाभिमुख कोठेंही नसते. हा नामदेव नामक भगवद्भक्ताचा प्रताप आहे. नामदेव हा नेहमीं येथें कीर्तन करायला येत असे. एके दिवशीं तेथील कर्मठ ब्राह्मणांना कांहीं अनुष्ठान करावयाचें होतें, ह्मणून त्यांनीं ह्या टाळकुट्याचें कीर्तन चालू असतां त्याला त्याचे सामानासह उचलून देवाचे एके बाजूस ठेविलें, तर याचें कीर्तन ऐकण्यास देवानें सुद्धां तोंड फिरविलें असें म्हणतात ! म्हणजे देवाला ब्राह्मणांच्या शोभेच्या वैदिक पूजेपेक्षां नामदेवाचें प्रेमळ कीर्तनच जास्त आवडलें. ह्मणजे देव नित्यनैमिक कर्मापेक्षां प्रेमळ भक्ताला जास्त भुलतो हें दाखविलें आहे. नामदेवाचें प्रेमळ कीर्तन चालू असतां कथेंत पांडुरंगसुद्धां नाचत असत इतकें त्याचें पांडुरंगाविषयीं निःसीम प्रेम होतें.

**नामदेव कीर्तन करी । पुढें नाचे पांडुरंग ।।**

हा अभंग प्रसिद्धच आहे. त्याचाच हा साक्षात्कार आहे. सारांश अत्यंत प्रेमळपणाचा अधिकार सर्पासारख्या प्राण्यावर चालतो असें नाहीं तर दगडासारख्या निर्जिव वस्तूवरही चालतो असें स्पष्ट दिसतें. कारण त्यांतसुद्धां आत्मा आहेच. मात्र त्याला हाक पोंचून तो जागृत केला पाहिजे. यामुळें ही पिंडी तशी राहिली अशी दंतकथा आहे. येथेंही उपाध्यामार्फत देव ब्राह्मण करतां येतो. उपाध्ये देवळांत बसलेलेच असतात. हें देवस्थान पूर्वी अमृतोदकामध्यें ( पाण्यांत ) होतें अशी पौराणिक कथा आहे. हें पाणी आतां कोठें गेलें असें मी ब्राह्मणास विचारलें, तेव्हां ते ह्मणाले पूर्वी येथें पाणी होतें पण भीमानें गदा मारून त्याचा निकाल केला व देवस्थान

दर्शनास मोकळें केलें असें कांहीं तरी कार्याकारण सांगतात. याचा अर्थ हा देव देऊळ होण्यापूर्वी पाणी भरलेल्या खड्डयांत होता पण तो नवसाला पावूं लागला. नामदेवासारखे भगवत्भक्त येऊन त्याचा सामक्षा दाखवूं लागले तेव्हां लोकांनीं तो खाडा उपसून पाण्याचा झरा बंद केला, खालवर चिरेबंदी भुयार केलें व त्याच्यावर देऊळ बांधिलें. गाभारा न बांधता भुयार बांधण्याचें कारण मुसलमानांचा देवळें भ्रष्ट करण्याचा जुलुमच असावा. कारण त्याच्यावर एक दर्शनी पिंडी व नंदी आहे. मुसलमान बाटवायला आले तर त्यांना तो वरचा देव दाखवावयाचा व हिंदूंनीं खालच्या तळघरांतील देवाची पूजा करावयाची ! अशा करितां ही योजना असावी असें दिसतें. एकंदरींत हें देवस्थान आडवाटेवर आहे खरें; तरी मुद्दाम दर्शन घेण्यासारखें आहे अशी माझी खात्री झाली. मग हा स्थानमहिमा किंवा ईश्वराची लीला हें कांहीं सांगतां येत नाहीं. इतर देवस्थानांत व शंकराच्या देवस्थानांत हें विशेष आहे कीं, शंकराचे देवळांत गेल्यानें व त्याच्या दर्शनानें चित्त अगदीं शांत व स्थिर होतें. सकाळ संध्याकाळ लोक दर्शनास येतात व संतोषित होऊन जातात. चौंडी स्टेशनवरून मी संध्याकाळीं तीन वाजतां निघून सहा वाजतां नागनाथाला पोहोंचलों. देवस्थानचा सर्व देखावा पाहिला. दुसरे दिवशीं पहाटे तीर्थविधी उरकून पुन्हा चौंडी स्टेशनवर आलों. येतांना मध्यें थोडी सडक नसल्यामुळें चुकलों. पण अदमासानें विचारून विचारून मुख्य सडकेला लागलों. गाडी १० वाजतां येते ती मिळते किंवा नाहीं याचा विचार होता. गाडी चुकती तर एक दिवस मुक्काम करावा लागला असता. कारण गाडी एकच असते. ह्यावेळीं निजाम हद्दींमध्यें जिकडे तिकडे प्लेग होता यामुळें गाड्या मिळाल्या नाहींत. असो. चौंडी स्टेशनवरून हिंगोलीकडे जाणाऱ्या गाडींत बसून मी बोल्डा स्टेशनवर आलों. तेथून

# माहूर

येथें जाण्यास गाड्या मिळतात. हिंगोलीहूनही मिळतात. बोल्डा व हिंगोली दोहींकडून अंतर सारखेंच आहे पण हिंगोलीहून सोयीच्या मिळतात. मला कोणी बोल्डाहून सांगितलें ह्मणून मी येथें उतरलों. येथून माहूरगड २५ कोस आहे. रस्ता अगदीं वाईट व गाड्याही अगदीं वाईट असतात. त्यांना छपरें नसतात व खाटाही विणलेली नसते. नुसतीं लांकडें असतात व आंत कडबा पसरून कसें तरी बसावें लागतें. येथें जाऊन येण्यास निदान आठ दहा दिवस लागतात. भाडेंही असेंच २५।३० रुपये जाऊन येऊन पडतें. बोल्डा येथील स्टेशन-मास्तर दक्षिणी ब्राह्मण होते त्यांनीं माझे गाडीची सोय करून दिली. एकंदरींत ही यात्रा फार त्रासाची व दगदगीची आहे. पण निजामाच्या राज्यांत रेल्वेचा सुळसुळाट कमी व सुधारणा कमी यामुळें अनायासें ब्राह्मणांची जुनी राहाणी पाहाण्यास मिळते व ती अद्याप येथें कायम आहे. मागसांचा त्यांत पाहुण्यांचा इकडे आदर आहे, कंटाळा नाहीं. येथील जेवणें जुन्या पद्धतीप्रमाणें एकदोन वाजतां होतात. जेवणाच्या वेळीं कोणीही ब्राह्मण आला असतां त्याला कोठेंहो भोजन-आमटी भाकरी-अगदीं निरपेक्षतेनें मिळतें. भात असतोच असा नेम नाहीं. पण त्याला इलाज नाहीं. हा देश रिवाज आहे. या जुन्या पद्धतीच्या राहाणीमुळें मला हा प्रवास सुखावह झाला व जुनी रीतरिवाज हीं पाहाण्यास सांपडलीं. कोठेंही जा, सर्व माणसें प्रेमळ दिसतात व आपण आपल्या घरीं आलों आहों असें वाटतें. नव्या-पद्धतीप्रमाणें भोजनाबद्दल कांहीं दिलें तर घेत नाहींत इतकेंच नव्हे तर देऊं लागलें असतां उलटा त्याबद्दल त्यांना राग येतो ! पण यात्रेकरूनें फुकट सहसा जेवूं नये. सवत्र मुलांना खाऊकरतां, बायकांना चोळी बांगडीकरतां किंवा निदान देवापुढें तरी कांहीं ठेवावें. मी असें करीत असें

वोल्डा स्टेशनवरून टप्या टप्यानें गाड्या केल्या तर परत भाड्याच्या गाड्या मिळून थोड्या भाड्यांतही जातां येतें. पण मला नियमित मुदतींत जाऊन यावयाचें असल्यामुळें व या बाजूला प्लेग असल्यामुळें मीं एकदम थेटचीच गाडी परत यावयाचे बोलीनें केली. मुंबईकडचा प्लेग कमी झाला होता परंतु ह्या बाजूला प्लेग असल्यामुळें कांहीं ठिकाणचे गांवचे गांव बाहेर पडलेलें दिसले.

कोल्हापूर, तुळजापूर, माहूर हीं देवीचीं सबंध पीठें व सप्तशृंग अर्धे अशीं देवीचीं ३॥ पीठें आहेत. कोल्हापूर येथें महालक्ष्मी, तुळजापुरास तुळजाभवानी व माहूर येथें रेणुकेचें स्थान आहे. येथें जमदग्नीचा आश्रम होता. हें स्थान डोंगरावर माहुरगड किल्ल्यावर आहे. डोंगरावर चढण्यापूर्वीं पायथ्याशीं प्रथम प्रवरा नदी लागते. ही प्रवरा राहूचें डोकें कापलें त्या वेळीं त्याच्या मुखांतून अमृताचा प्रवाह निघाला त्यापासून झाली ह्मणून हिला प्रवरा ह्मणजे सर्व नदीमध्यें श्रेष्ठ असें नांव मिळालें. ही गोदावरीस मिळाली आहे. गोदावरीचे कांठीं नेवासें आहे त्यास निवास क्षेत्र ह्मणतात. श्रीविष्णूंनीं मोहिनीचें रूप घेऊन येथें निवास केला ह्मणून यास नेवासें ह्मणतात. यावरून देव दैत्यांनीं अमृताची वाटणी येथेंच कोठें तरी केली असली पाहिजे. येथेंच ज्ञानदेवांनीं ज्ञानेश्वरी प्रथम केली. ती प्रथम दगडावर लिहिली होती असें ह्मणतात. असे दगड अद्याप तेथें पहावयास मिळतात. माहूर-गडावर परशुरामानें आपल्या आईचा, बापाच्या--जमदग्नीच्या--आज्ञेनें वध केला; त्यानंतर ती जमदग्नीच्या वरानें जिवंत झाली पण अखेर मेल्यावर तिची क्रिया त्यानें या ठिकाणीं केली. परशुरामाला आईचा वियोग सहन होईना ह्मणून त्याचें शांतवन करण्याकरितां व त्याच्याकडून क्रिया करवण्याकरितां तेथें प्रत्यक्ष दत्त आले व त्यांनीं त्याजकडून आईची क्रिया तेथें करविली. ही क्रिया यथाविधि झाली तर आई पुन्हां जिवंत होईल असे दत्तानें सांगितलें

होतें पण परशुरामानें क्रिया संपण्यापूर्वीच प्रेमानें आई ह्मणून हाक मारिली ! तेव्हां ती " काय बाळा " असें ह्मणाली. व पुढची क्रिया थांबली ! ! यामुळें तोंडाचा भाग मात्र जिवंत झाला. खालचा भाग जिवंत झाला नाहीं. यामुळें येथें मुखाचीच मुख्य पूजा आहे. परशु-रामाच्या आग्रहानें येथें दत्त राहिले. दिवसा संचारार्थ गेले तरी रात्रीं येथें निजावयाला येत असत ह्मणून माहूर हें दत्ताचें निद्रेचें ठिकाण आहे. अशा रीतीनें तिनें त्याला ह्या ठिकाणीं प्रत्यक्ष दर्शन दिलें. यामुळें हें स्थान प्रसिद्ध आहे. सिद्धपूर (मातृगया) हें ज्यांना लांब पडतें ते येथें येऊन मातृगया करितात. जवळच दुसरा डोंगर आहे. त्यावर दत्तमहाराजांचें स्थान (पादुका) आहेत. रेणुकेचें जें मुख्य स्थान डोंगरावर आहे तेथें देवळांत कांहीं व्यवस्था नाहीं. देऊळही साधारणच आहे. मूर्तीही विशेष दर्शनीय नाहीं. दगडाचा नुसता अजस्र असा फक्त शिराचा भाग आहे. भोंवती वस्तीही नाहीं. एक पूजारी इतर जातीचा आहे. तो पूजा करून खालून गडावर रोज पुरणपोळीचा नैवेद्य घेऊन येतो एवढेंच आहे. पण पुढच्या डोंगरावर दत्तांचें स्थान आहे. दत्त रोज येथें निजावयास येतात. रोज काशींत गंगेंत स्नान व विश्वेश्वर दर्शन, कोल्हापुरास भोजन व येथें निद्रा अशी भावना आहे. येथें व्यवस्था उत्तम आहे. हें संस्थान एका गोसाव्याचे ताब्यांत आहे. श्रीदत्ताच्या पादुकांशिवाय येथें दर्शनाकरितां दत्ताची मोठी मूर्ती आहे. पूजेचे वेळीं ती पहावयास मिळते. पण एरवीं पहाण्याची असल्यास त्यास तेथील महंताची परवानगी घेतली पाहिजे. शिवाय एक रुपया फी घेतात. पण मला महंतानें ती फुकट दाखविली होती, ही भगवत्कृपाच समजावयाची. मूर्ती सरासरी तीन फूट उंचीची आहे. एवढी सर्व सोन्याचीच असेल किंवा नाहीं कोण जाणे. देवीचें स्थान व दत्ताचें स्थान येथें पाण्याचें फार दुर्भिक्ष आहे. ह्या डोंगराचे पायथ्याशीं एक कुंड आहे; तेथें जेमतेम घागर बुडते. अर्थात या

पाण्याच्या ठिकाणीं फार कडक बंदोबस्त आहे. पिण्याशिवाय पाणी कोणासच घेऊं देत नाहींत, फक्त पिण्यापुरतें घेऊं देतात. हें पाणी ५००।७०० उंच पायऱ्या चढून वर न्यावें लागतें. माहुराहून पहांटेस जरी निघालों तरी पहाडाखालील मातृतीर्थावरून स्नान करून देवीला जाण्यास ९।१० वाजतात व दत्ताला जाण्यास सहज बारा वाजतात. दोन्ही ठिकाणीं गाडी जाण्याची सडक आहे पण ती इतकी वाईट आहे कीं, तेथून गाडी नेणें ह्मणजे बैलांचे पुरे हाल होतात व गाडी पूर्ण खिळखिळी होते. अर्थात मनुष्यासमुद्धां गाडींत बसणें नकोनकोसें होतें. अगोदर रस्ता मोठा चढावयाचा आहे व त्यांत सर्व रस्त्याभर गोटे-गोटे आहेत. शिवाय रस्ता पहाडी असल्यामुळें त्याला वांकणें फार आहेत. बैलांचे पाय घसरतात व गाडी केव्हां खालीं पडेल याचा नेम नाहीं असें वाटतें. गाडी चढतांना त्रास होतो व उतरतांनाही होतो सबब अशा ठिकाणीं गाडी न नेतां पायींच जाणें बरें. मातृकेनंतर दत्ताचे स्थानापर्यंत दुसरा डोंगर असल्यामुळें रस्ता उतारचढावयाचा आहे तरी बरा आहे. यामुळें पुढें गाडींत बसल्यानें थोडे श्रम वांचतात. प्रथम माहूर गांव सुद्धां डोंगरावरच आहे. डोंगर चढण्याचा रस्ता लहान मोठ्या गोट्यागोट्यांनीं भरला आहे सबब पायीं उतरून जाणें पुष्कळ बरेंसें वाटतें. गाडी चढत असतां किंवा उतरत असतां जर घसरली तर बैल, गाडी, माणसें, त्यांचें सामान कोठें पडेल व त्यांचा कसा चक्काचूर होईल याचा नेमच नाहीं.

येथें जें मातृतीर्थ ह्मणून सांगितलें आहे तें डोंगराचा प्रवाह अडवून मोठा चुनेकची बांध घालून केलेला तलाव हें होय. खालीं खडक न लागल्यामुळें हा बांध आतां खचून पडत चालला आहे. उन्हाळीं हा तलाव खालून पाणी झिरपून गेल्यामुळें अगदीं आटतो. मग त्यांतच विहीर खणतात; पण पाणी अगदीं वाईट खताड्याचें असतें व तेंच वर काढून तीर्थ ह्मणून स्नान करावयाचें असतें. हें मातृतीर्थ परशु-

रामानें आपल्या आईच्या क्रियेकरितां बाण मारून उत्पन्न केलें व पाताळांतून यांत गंगा आणिली. या शिवाय सर्व गांवाला गांवापासून अर्धा मैलावर एक विहीर आहे. तिला मात्र पाणी विपूल असून आंत उतरण्यास चांगल्या पायऱ्या आहेत. या पायऱ्यांची एकच रांग नसून सभोंवती अशा आठ रांगा आहेत. ह्मणजे एकाच वेळीं ह्या विहिरींत आठ भिन्न जातींचीं मनुष्यें कोणाचाही स्पर्श न होतां हांडे भरून काढूं शकतात. एकच विहीर सर्वांस असतां अशी सोय मीं आजपर्यंत कोठेंही पाहिली नाहीं. माहूरचा किल्ला बांधला त्याच्या पूर्वीची ही विहीर आहे असें ह्मणतात. ह्मणजे पूर्वी जरी स्वराज्य होतें, लोक आनंदांत होते, तरी भिन्न जातींत सुद्धां पूर्ण सलोखा होता. त्यांनीं जाती मोडून टाकण्याचा किंवा जातीभिन्न कर्मे करण्याचा, सहभोजनाचा किंवा स्पर्शास्पर्शाचा प्रयत्न कधींही केला नाहीं, तर त्यांनीं जाती जातींची अशा ठिकठिकाणीं मुद्दाम सोय केलेली दृष्टीस पडते. हल्लीं जे ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद, स्पर्शास्पर्श निघाले आहेत ती केवळ परक्यांची चिथावणी आहे. स्वराज्य असतांना हे वाद मुळींच निघाले नाहींत इतकेंच नव्हे तर त्यावेळच्या क्षत्रियाला स्नानसंध्येच्या, ब्रह्मकर्माच्या किंवा विद्येच्या गोष्टी सांगितल्यास तो स्पष्ट ह्मणे कीं हीं कर्मे ब्राह्मणांचीं आहेत, आह्मास नकोत! आमची तलवार राज्यरक्षण व धंदे हींच आह्मांला श्रेष्ठ आहेत. जाती वैशिष्ठ्य हें आचारविचारांतच आहे. आचार सुटला तर जात राहिली कोठें? नुसती जात व धर्म हीं अदृश्य आहे. तीं बाहेरच्या रूपानें ह्मणजे आचारानेंच ओळखावीं लागतात. ह्मणून कोणीही आपले आचार सोडतां कामा नये. हे आचार ज्याचे त्यानें रक्षण करावे व दुसऱ्या जातीनें त्यांस मदत करावी हीच खरी नीति आहे. पण हल्लींचा जातीजातींमध्यें सलोखा करण्याचा प्रकार निराळाच दिसतो! कोणी ह्मणतो सहभोजन करा, कोणी ह्मणतो सहभोजनांत एवढी एकी होत

नाहीं शरीरसंबंधच झाले पाहिजेत. हल्लीं या शरीरसंबंधाची मर्यादा युरोपियनांच्या मडमा करीपर्यंत गेली आहे. आणि हें एवढें कशाकरतां तर युरोपियन व आपण एक व्हावें ह्मणून! युरोपियन व आपण तरी एक कशाकरतां व्हावयाचें तर त्यांच्या स्वराज्याचा आपणाला फायदा मिळावा ह्मणून! पण हा किती वेडेपणा आहे? अशानें स्वराज्य मिळणें तर लांबच राहिलें; कारण त्यांनीं बाटविलेल्या ख्रिस्ती लोकां-बद्दल त्यांच्यांत किती आदर आहे हें पदोपदीं आपणास स्पष्ट दिस-तच आहे. त्यांनासुद्धां ते काळा आदमी ह्मणून तुच्छच मानतात. पण अशानें काहीं फायदा नसून आमची अविचारी मंडळी मात्र स्वजा-तीला व स्वधर्माला मुकतात! सारांश हे प्रयत्न जातीजातींत एकी करण्याकरितां नसून परकीयांच्या नादीं लागून आपल्या मनाचें घाणे-रडें कौतुक पुरविण्याकरतांच आहेत हें उघड होय. यामुळें जातीजातींत एकी होणें लांबच राहिलें, पण द्वेष मात्र उत्पन्न होत चालला आहे. हल्लीं ब्राह्मण एकीचा प्रयत्न करीत आहेत पण पूर्वीं इतर जातींमध्यें ब्राह्मणांना जो मान होता त्याच्या शतांशही हल्लीं नाहीं. उलट द्वेषाचें बीं मात्र पसरत चाललें आहे. याचें कारण ब्राह्मण क्षेत्रांत इतरांच्या उड्या पडूं लागून मिशनऱ्यांच्या संगतीनें ब्राह्मण धर्म बाटवावा हेंच परकीयांचें धोरण आहे. पण ही चूक आहे. ब्राह्मण जात ही आजपर्यंत सर्व जातींकडून पवित्र राखली गेली तशी ती पुढेंही पवित्र राखणें हें हिंदूंस नव्हे तर सर्व मनुष्य जातीस भूषणावह आहे. आमचें स्वराज्य असतां युरोपियन लोकांस आमच्या सभेंत किंवा समाजांत कोठेंही जागा मिळाली तर ते आपल्याला धन्य समजत असत. पण तेच आह्मी जिंकिले गेल्याबरोबर आमच्या छायेसही ते स्पर्श करूं इच्छीत नाहींत. आमच्यांतील कितीही विद्वान किंवा लायक मनुष्य असला तरी त्याला नेटिव्ह, इंडियन, किंवा कुली अशा नांवानें संबोधितात. व त्याप्रमाणें वागवितात. याबद्दल आपणांस खरोखर तिटकारा आला

पाहिजे. पण तो मुळींच येत नसून त्याबद्दल साहेबाचें आपणास कौतूक वाटतें. किती हीनावस्था ही? जे जातीजातीची एकी करण्यास शिकवितात किंवा जातीभेद मानणें गैर आहे असें शिकवितात त्यांच्यांतच आपली जात पवित्र ठेवण्यासंबंधें किती तीव्र अभिमान आहे हें हल्लीं स्पष्ट दिसतें. तुह्मी जिंकले गेलां आहां असें तुम्हांस ते किती प्रकारें तरी दाखवितात व यामुळें तुमची आमची जात एक कशी होईल असें बोलून कृतींतही दाखवितात. तरी लोचटपणानें व त्यांच्यांतील लबाड लोकांच्या (मिशनरींच्या) बोलण्यावर विश्वास ठेवून आम्ही आपल्या समाजाची घडी विस्कटणें म्हणजे आपल्या मूर्खपणाची कमालच करणें असें कोणास वाटणार नाहीं? परकीयांच्या या मूर्खपणाच्या अनुकरणानें व दुर्बुद्धीनें आमचें किती तरी नुकसान होत आहे व पुढें किती होईल हें सांगतां येत नाहीं. आणि ह्या चुक्या मुख्यत्वेंकरून आमच्यांतील सुशिक्षित म्हणविणाऱ्यांकडून होत आहेत आणि हेच आतां आमचे पुढारी होणार! पण ज्याला आपलें स्वत्व राखतां येत नाहीं तो पुढारी काय उपयोगाचा? तो असल्या अनुकरणानें समाजाची दुर्दशा मात्र करील! परकीयांचा सहवास प्राप्त झाला असतां ते उपदेश करूं लागले ह्मणजे "शत्रु बुद्धि विनाशाय" हें तत्त्व लक्षांत ठेऊन त्यांची शक्य तितकी तपासणी करावी. दुसरें ते जो आपणांस उपदेश करितात तो आपले कल्याणाकरितां नसून त्यांत त्यांचेंच कल्याण असतें ही गोष्ट नेहमीं लक्षांत ठेविली पाहिजे. त्यांचा उपदेश जरी बाहेरून मोहक वाटला तरी तो आपली उन्नति न करितां नाश करील हें पक्कें लक्षांत ठेवलें पाहिजे. विद्वान् किंवा अधिकारी मनुष्य आपल्या बुद्धिमत्तेप्रमाणें आपल्या बोलण्याला मोहक स्वरूप आणितो व दुसऱ्याला फसवितो. ख्रिस्ती मिशनऱ्यांचीच इच्छा आमच्या उत्तम समाजाचा व सात्विक संस्कृतीचा नाश व्हावा व आमची अधोगती व्हावी ह्मणून

आह्माला त्या संकराचा उपदेश करीत आहेत. ह्यापेक्षां दुसरें कांहीं नाहीं. पण हें आमच्यांतील शहाण्यांना कळेल तेव्हां खरें. जी गोष्ट वाटण्याची तीच गोष्ट सर्व जाती एक करण्याची आहे. असो. पूर्वी याच विहिरीचें पाणी गडावर चढवून तेथें दोन तीन मैल लांबीचा कोट व किल्ला बांधला आहे. शर्थ आहे त्या लोकांची ! या गडावरून ३०।४० मैल त्रिज्येचा पल्ला सहज दिसतो ह्मणूनच येथें किल्ला बांधला आहे.

येथें पाणी असें तोट्याचें आहे म्हणून देवीस पंचामृती अभिषेक करावयाचा असल्यास उपाध्ये बुवांची फी ३॥ रुपयांपासून पांच रुपयांपर्यंत आहे. तसेंच दत्तपादुकांवर रुद्राभिषेक करावयाचा असल्यास पांच रुपये फी घेतात. अर्थात दोन्ही देवांस पाण्याचा स्पर्शही होत नाहीं मग पत्रपुष्पांची पूजा कोठली ? नुसतें सालंकार दर्शन मात्र होतें. दत्ताच्या नुसत्या पादुकांचेंच दर्शन होतें. दत्ताचे दरवाजे चांदीच्या पत्र्यानें मढविले आहेत. पुष्कळ श्रीमंत शेट सावकारांनीं त्याला देणग्या दिल्या आहेत व आणखी देत आहेत. मध्यप्रांत व वऱ्हाड येथील लोक येथें फार येतात. बोल्डा स्टेशनकडील मार्गापेक्षां वऱ्हाडाकडील मार्गच जास्त सोयीचा आहे, असें मला तिकडील लोक आले होते त्यांच्या सांगण्यावरून समजलें. भुसावळपासून नागपूरकडे जी. आय्. पी. चा जो फांटा जातो त्यांतील मूर्तिजापूर पासून यवतमाळकडे जो फांटा जातो, त्यांतील धारवा स्टेशनपासून माहूरला चांगला रस्ता आहे. लांबी २५ कोस आहे कमी नाहीं आणि सडकच आहे असें नाहीं. पण रस्ता इकडीलपेक्षां पुष्कळ चांगला असून स्वारीच्या गाड्याही स्टेशनवर मिळतात. बोल्डा स्टेशनवर गाडी कष्टानें मिळते आणि तिला छपर नसतें इतकेंच नव्हे, तर साठी विणलेली सुद्धां नाहीं असा तिचा अवतार असतो हें मागें सांगितलेंच आहे. तशा ह्या गाड्या नसतात. ह्या गाड्या चांगल्या छपराच्या छकड्या असतात.

बोलड्याचे रस्त्यांत तुकारामबोवांचें येहेळगांव म्हणून एका सत्पुरुषाचे समाधीचें गांव आहे. देहूचे तुकारामबोवा ते हे नव्हत. हे ब्राम्हण होते. ह्या प्रांतांत त्यांची फार प्रख्याती आहे. त्यांची समाधी, व देऊळही लोकांनीं उत्तम बांधलेलें आहे. याचें जातांना किंवा येतांना जरूर दर्शन घ्यावें. अद्यापही येथें घेतलेला नवस कधींही फुकट जात नाहीं अशी येथील लोकांची भावना आहे. जिवंत असतां त्यांनीं पुष्कळ चमत्कार करून दाखविले असें इकडील लोक सांगतात. नमुन्याकरतां त्यांतील एक देतों:—येथील ब्राम्हण भोजनांत तुकारामबोवा ह्यांस एकदां बोलाविलें होतें. पण ही स्वारी कोठें जाऊन बसली होती ती कांहीं केल्या येईच ना. तेव्हां ब्राम्हणांनीं भोजनाचें उदक सोडून ते जेवावयास बसले. ही गोष्ट तुकारामबोवांस समजली तेव्हां ते ह्मणाले, बसूं द्या त्यांना. लोक जेवावयाला बसले तर सर्वत्रांच्या अन्नांत किडे पडलेले! तेव्हां लोक उमजले व त्यांना शरण गेले. तेव्हां तुकारामबोवा आले व त्याच अन्नाची समाराधना पुन्हा पानें वाढून केली व ती उत्तम प्रकारें पार पडली!!

या लांबलचक प्रवासांत गाडीचे धक्के, आदळ आपट ह्यांशिवाय कांहीं नाहीं. मुलूखही पाहाण्यासारखा नाहीं. खुद्द रेणुकेचें देऊळ व मूर्तीही अगदीं साधारण असून अगदीं निर्जन ठिकाणीं आहे. पाण्याचा थेंबही डोळ्यांस लावण्यास मिळणार नाहीं अशा ठिकाणीं आहे. मग या यात्रेचें पूर्वजांनीं एवढें महत्व कां वर्णन केलें हें समजेना. विचार करतां रेणुकेवरून परशुरामाची गोष्ट लक्षांत आली. ही गोष्ट भागवत स्कंद नऊ अध्याय १५ यांत लिहिली आहे. परशुरामाचा बाप जमदग्नी हा घरांत नसतां एक क्षत्रिय राजा (चित्ररथ गंधर्व) जमदग्नीचें रूप घेऊन त्याचे आश्रमांत आला, तेव्हां रेणुकेला हें न समजून तिनें रीतीप्रमाणें त्याचें स्वागत केलें. इतक्यांत प्रत्यक्ष जमदग्नीच तेथें आले! तेव्हां झालेला प्रकार त्यांच्या उघडकीस आला. तो गंधर्व तर पळून

गेलांच पण त्यांना बायकोचा अतिशय संताप आला. राग अनावर झाला, त्याबरोबर बायकोचा शिरच्छेद करावा ह्मणून त्यानें प्रत्येक मुलास बोलाविलें. बाप सांगत असला तरी मातृवध कसा करावा असें प्रत्येक मुलाच्या मनांत येऊन कोणीच हें काम करीना. तों तों जमदग्नीचा कोप वाढतच चालला. अगोदरच जमदग्नी ह्मणजे रागाचा अवतार त्यांत त्याचा क्रोध अनावर झाला. त्यांत सर्व जगसुद्धां भस्म होण्याचा संभव होता, मग आईची व आपली कथा कसली? आतां आपण हिला मारली नाहीं तरी याच्या क्रोधाग्नींत ती होरपळून जाणार इतकेंच नव्हे, तर आपणसुद्धां त्यांची आज्ञा ऐकिली नाहीं, ह्मणून सर्व भाऊ शापदग्ध होणारच. आणि अशानें सर्व कुलाचा क्षय झाला तरी अखेर जमदग्नीचा राग शांत होणार नाहीं व त्याला अखेर मुक्तीही मिळणार नाहीं. वस्तुतः त्यांत मुलांचा अपराध नाहीं, आईचा नाहीं व बापाचाही नाहीं. कारण आईचा वध करणें केव्हांही गैरच. आईकडे तरी कसला दोष? कारण तिनें जमदग्नी समजून त्याचें स्वागत केलें. परपुरुष ह्मणून कोठें केलें होतें? तसेंच जमदग्नी-कडे कसला दोष? अगोदरच तो रागीट ऋषी, त्यांत बायकोची व्यभि-चारासारखी मर्मभेदक गोष्ट त्याला कशी सहन होईल? अर्थात अप-राध ह्यांत कोणाचाही नाहीं. त्या क्षत्रियाचाच होता. तसेंच मागें परशुराम घरीं नसतां कार्तवीर्यार्जुनानें (सहस्रार्जुनानें) अशीच जमदग्नीची कामधेनू पळवून नेली होती. ही गोष्ट वशिष्ठ विश्वामित्रा-सारखी झाली. वशिष्ठानें अरण्यांत आपले आश्रमांत विश्वामित्राचें राजोपचारानें कामधेनूच्या सहाय्यानें स्वागत केलें, त्याबद्दल विश्वामित्रानें बळजबरीनें त्याची कामधेनु पळविली! तोच प्रकार येथें झाला. कार्तवीर्य अर्जुनाची ह्मणजे सहस्रार्जुनाची राजधानी माहिष्मति ह्मणजे हल्लींचें महेश्वर. तेथून तो शिकारीकरितां येथें जमदग्नीच्या आश्रमाकडे ह्मणजे माहूरगडावर आला. तो थकला आहे असें पाहून जमदग्नीनें काम-

धेनूच्या सहाय्यानें त्याचें राजोपचारानें वसिष्ठाप्रमाणें स्वागत केलें. तें वैभव त्याला असह्य होऊन त्यानें ती कामधेनूच पळविली तेव्हां जमदग्नी रागानें तपःश्चर्येला निघून गेला. तेव्हां त्यानें रेणुकेची अशीच चेष्टा केली. पुढें परशुराम घरीं आल्यावर त्याला ही हकिकत कळली. तेव्हां त्यानें प्रथम आईचें सांत्वन केलें व पुढें सहस्रार्जुनाला ठार मारिलें. त्याचें उट्टें काढण्याकरतां सहस्रार्जुनाचे मुलानें प्रत्यक्ष जमदग्नीचाच वध केला. त्याबद्दल रेणुकेनें २१ वेळां ऊर बडवून घेतला. तेव्हां हे क्षत्रिय राजे उन्मत्त होऊन गरीब, निरुपद्रवी, व शांत अशा आह्मा ब्राह्मणांच्या चेष्टा करूं लागले आहेत, त्यांच्या बायकांवरसुद्धां नजर ठेऊं लागले आहेत हें बरें नाहीं. त्यांचें शासन केलें नाहीं तर अनाचार वाढून ब्राह्मणांच्या वाटेस वाटेल त्यानें जावें कारण ते कांहीं त्यांचा प्रतिकार करीत नाहींत असें होईल व अशानें ब्राह्मण जात नष्ट होईल. शिवाय असें न केलें तर वर्णाश्रमधर्म व कुटुंबव्यवस्थेची पद्धति मानव जातीच्या सुधारणेकरितां घालून दिली तिचा जम न बसतां तीहि नष्ट होईल. सबब याचा वेळींच बंदोबस्त केला पाहिजे, ह्मणून ह्याचकरितां परमेश्वरानें परशुराम अवतार घेतला.

प्रत्यक्ष मातुःश्रीचा वध करणें ही अत्यंत निंद्य व शास्त्रविरुद्ध गोष्ट आहे खरी, तरीपण ती ह्यावेळीं केली असतां फार फायदेशीर होईल. इतकेंच नव्हे तर, मागें सांगितल्याप्रमाणें अपरिहार्यही असल्यानें आतां तसें करणें अगदीं जरूर आहे असें परशुरामाचे मनानें घेतलें. कारण आपण जर बापाच्या इच्छेप्रमाणें वागलों तर प्रथम पित्राज्ञा पालन केल्यासारखें होईल. शिवाय आपला बाप असा तसा सामान्य ऋषी नाहीं. त्याच्या इच्छेप्रमाणें झालें तर आईसुद्धां पुन्हा जिवंत होईल इतकेंच नव्हे तर आपल्या इच्छेप्रमाणें सर्व कांहीं होईल. व हें आपल्या वडिलांच्या आशिर्वादानें होईल, आपल्या पराक्रमानें कांहीं होणार नाहीं, असें जाणून त्यानें आपल्या आईचा कुऱ्हाडीनें या ठिकाणीं

(ज्या ठिकाणीं पाण्याचा अगदीं लेशसुद्धां नाहीं अशा ठिकाणीं) गिरीशिखरावर वडिलांच्या इच्छेप्रमाणें शिरच्छेद केला. त्याबरोबर जमदग्नी प्रसन्न झाला व त्यानें त्याची पाठ थोपटली व वाटेल ते वर माग असें तो ह्मणाला. तेव्हां परशुरामानें पहिला वर आई जिवंत व्हावी हा मागितला. नंतर मातृवधाचा मला दोष लागूं नये, भावांना पित्राज्ञा भंगाचा दोष लागूं नये, आई सर्व दोषांपासून मुक्त होऊन तिचा उद्धार व्हावा, तिला सद्गति मिळावी व तिची कीर्ति त्रिभुवनांत अखंड रहावी, श्रीमोरयापासून मिळालेल्या माझ्या परशूला यश असावें, क्षत्रियांना शासन करण्याचें मला सामर्थ्य यावें, वगैरे वगैरे वर त्यानें मागितले. वर मागणें संपल्यावर जमदग्नी तथास्तू ह्मणाले. त्याबरोबर रेणुका एकदम जिवंत झाली हें पाहून परशुरामाला अत्यानंद झाला, व ज्याच्या शब्दानें मेलेलें मनुष्य जिवंत होतें त्याला जिवंत मनुष्याला मारण्याला कितीसा वेळ लागेल? तेव्हां अर्थात् झालें हें एका अर्थी उत्तमच झालें अशी परशुरामाची खात्री झाली व त्याला आपल्या बापाच्या योग्यतेचा पूर्ण प्रत्यय आला. पुढें आपल्या आईनें जमदग्नीप्रीत्यर्थ २१ वेळां ऊर बडवून घेतला ह्मणून परशुरामानें २१ वेळां निःक्षत्रिय पृथ्वी केली व त्यांच्या रक्तानें कुरूक्षेत्रांत स्यमंतपंचक नांवाचे पांच तलाव भरले. पुढें पितरांच्या आशीर्वादानें तेच तलाव तीर्थोदकें झालीं वगैरे अवतार कृत्यें प्रसिद्धच आहेत. रेणुकेची प्रसिद्धी त्रिभुवनांत व्हावी ह्मणून ही यात्रा मुख्य मानली गेली व यामुळें या यात्रेचें महत्पुण्य आहे असें दिसतें. परशुरामानें २१ वेळां निःक्षत्रिय पृथ्वी केली ह्मणजे त्या जातीचा इतके वेळां संहार झाला असें नसून त्यांतील कर्ते पुरुष इतके वेळां मारून त्यांचें शूरत्व, दुराभिमान व द्वेष हीं नाशींशीं होईपर्यंत त्यानें हें केलें व तें २१ वेळां करावें लागलें असेल असें वाटतें. अशा रीतीनें क्षत्रियांचें क्षत्रियत्व नाहींसें झालें ही फार वाईट गोष्ट झाली. कारण अशानें राज्याचें रक्षण होणें अशक्य आहे.

ह्मणून क्षत्रिय अभिमानी विश्वामित्रानें ही परंपरा रामलक्ष्मणाना राज-सौख्यांतून काढून पुन्हां सुरू केली. हल्लींचे क्षत्रियही चालू परिस्थितीनें असे दुर्बळ झालेआहेत. त्यांना ब्राह्मणांची संख्या व विद्या मात्र पाहिजे आहे. त्यांना सुद्धां बनविणारा कोणी विश्वामित्रासारखा किंवा पहिल्या बाजीरावासारखा निघाला पाहिजे. पण तो निघेल तेव्हां खरें. हल्लीं त्यांची तेजस्विता गेल्यामुळें त्यांची दृष्टी गृहकलहांत होऊन ते घरांतल्या ह्मातारीशीं ( ब्राह्मणांशीं ) पिरपिर करीत बसले आहेत ! ( ब्राह्मण ब्राह्मणेतर वाद माजवीत आहेत )

याप्रमाणें क्षत्रियांचा पूर्ण बंदोबस्त झाला. खुद दशरथ राजा एवढा पराक्रमी पण त्याला सुद्धां बायकोचें सोंग घेऊन बायकांत लपून बसावें लागलें होतें अशी कथा आहे. या प्रमाणें ब्राह्मणांचा क्षत्रियांना पूर्ण वचक बसून व ते पुन्हां ब्राह्मणांचे वाटेस जाणार नाहींत असें झालें व ब्राह्मण केवळ शापादपी नसून शरादपी सुद्धां आहेत अशी त्यांची खातरी झाली. असा त्यांस वचक बसला खरा पण तो सत्तेचा होता, प्रेमाचा नव्हता. आणि यामुळेंच तो टिकण्यासारखा नव्हता व त्याचें उट्टें केव्हांतरी निघालें असतें. निदान यामुळें ब्राह्मण जात जपतपार्थ विद्येच्या शोधार्थ किंवा दीर्घदृष्टीकरितां मोकळी राहिली पाहिजे होती पण कशानें तिला राहतां आलें नसतें; व व्यर्थ दोन्हीं जातींत कायम भांडण राहून कालांतरानें दोन्ही जाती नष्ट झाल्या असल्या किंवा निर्वीर्य तरी झाल्या असत्या. व या जाती उत्पन्न करण्याचा परमेश्वराचा हेतू सिद्धीस गेला नसता. म्हणून परमेश्वरानें रामकृष्णरूपानें क्षत्रियांत मुद्दाम अवतार घेऊन क्षत्रियांनीं ब्राह्मणांशीं कसें वागावें, ब्राम्हणांचा व क्षत्रियांचा संबंध काय आहे व सर्व जगाच्या कल्याणाकरतां तो कसा राखावा याचे नियम घालून देऊन त्याप्रमाणें त्यांनीं वागूनही दाखविलें. व आपल्या क्षत्रिय जातीस उपदेशही केला. पुढें परशुरामाला क्षत्रियश्रेष्ठ रामाचें दर्शन झालें, तेव्हां

राम हा पूर्ण सात्विकच अवतार आहे अशी त्याची अंतर्ज्ञानानें व बाह्य स्वरूपानें खात्री झाली. हा क्षत्रियांचा बंदोबस्त सात्विकपणानें करील, आतां आपलें काम नाहीं, अवतार संपूर्ण झाला, पितर संतुष्ट होऊन त्यांनीं अवतार संपविण्याची आज्ञा दिली, असें पाहून त्यानें आपला परशू कायमचा खालीं ठेविला व आपला ब्राम्हण जन्म असून आजपर्यंत ब्रह्मकर्म हातून कांहींच घडलें नाहीं, म्हणून प्रथम शरीर शुद्धीकरितां त्यानें सर्व तीर्थयात्रा केल्या व मनःशुद्धीकरितां तो महेंद्र - पर्वतावर कोकणांत वासिष्टीनदीचे कांठीं दीर्घ तपश्चर्या करण्याकरतां गेला. रामानें परशुरामाचा पराभव केला म्हणून तो घरीं बसला हें म्हणणें बालिशपणाचें दिसतें. कारण परशुराम काय किंवा राम काय हे एकाच परमेश्वराचे अवतार आहेत. ते एकमेकांचे मारक किंवा पराभव करणारे कसे होतील ? शिवाय कालमहात्म्याप्रमाणें जीव सृष्टि उत्तरोत्तर कमी दर्जाची होत आहे. पूर्वींच्या म्हाताऱ्यांचें तेज किंवा धमक हल्लींच्या तरुणांतही नाहीं ह्यावरून ही गोष्ट स्पष्ट दिसते. या बद्दल पूर्वींच्या मारुती—अर्जुनाच्या व भीमाच्या पराक्रमाच्या पौराणिक गोष्टी प्रसिद्धच आहेत. परशुरामानें सहस्त्रार्जुनास मारिलें पण तेवढ्या- वरच तो न जातां त्यानें आणखी एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली आणि रामानें केवळ रावणाचाच पराभव केला. ह्या रावणाला कार्तवीर्यार्जुनानें एखाद्या माकडाप्रमाणें बांधून आपल्या माहिष्मती नगरींत कोंडून ठेविलें व पुढें त्याचा पुष्कळसा अपमान करून सोडून दिलें. यारून कार्तवीर्यार्जुनाची व रावणाच्या शक्तीची तुलना होते. त्याच्याविषयीं पुढील म्हण तेंव्हांपासून प्रसिद्ध आहे.

**कार्तवीर्योर्जुनो नाम राजा बाहु सहस्त्रवान् ।**
**तस्य स्मरण मात्रेण गतं नष्टंच लभ्यते ॥**

म्हणजे सहस्त्रार्जुनाचा धाक ऊर्फ दरारा रावणाप्रमाणें सजीव वस्तूंवरच न चालतां निर्जीव वस्तूंवर सुद्धां चाले. एकादी वस्तु हरवली

किंवा नाहींशी झाली तर सहस्रार्जुनाच्या नामस्मरणानें ती परत येत असे. मराठ्यांच्या धाकाप्रमाणेंच हें होई. सारांश रावणाच्या पराक्रमाचें जसें अघटित वर्णन आहे त्यापेक्षां सहस्रार्जुनाचें जास्त आहे. मग रामापेक्षां परशुरामाची शक्ति कमी कशी ? पण हा सुद्धां बुद्धिवादच आहे. परमेश्वर आपले इच्छित सिद्धीकरितां हव्यातेवढ्या शक्तीचाच अवतार निर्माण करितो हेंच खरें. परशुराम चिरंजीव होता म्हणूनच प्रत्यक्ष दोन अवतारांची भेट येथेंच झाली. यापुढें राम क्षत्रियांचा बंदोबस्त करण्याला पूर्ण समर्थ आहे, आतां आपली जरूर नाहीं, तो ब्राम्हणांचें संरक्षण खात्रीनें करील अशी खात्री झाल्यावर त्यानें आपला परशु खालीं ठेविला हेंच म्हणणें जास्त सयुक्तिक दिसतें. त्याप्रमाणें रामचंद्रानें समृद्धीनें भरलेल्या साम्राज्याचा सुद्धां त्याग करून राक्षसांचा नायनाट करून ब्राह्मणांचें व त्यांच्या यज्ञयागाचें रक्षण केलें, व ब्राह्मण हा आपल्या समाजाचा एक श्रेष्ठ अवयव असून त्यांचें रक्षण करणें हें क्षत्रियांचें मुख्य कर्तव्यकर्म आहे असें दाखविलें. श्रीकृष्णानें तर ब्राह्मणांचे पाय शिरसावंद्य केले इतकेंच नव्हे तर ब्राह्मणांच्या लत्ताप्रहारांची खूण म्हणून आपल्या वक्षस्थळावर ती कायमची ठेवून तें आपलें भूषण मानलें. व ब्राह्मण माझें कुलदैवत आहे असें आपल्या जातीला स्पष्ट सांगून त्याचा हा प्रत्यक्ष जाहीरनामाच लाविला. श्रीकृष्णानेंही, त्यावेळीं असेच क्षत्रिय राजे उन्मत्त झाले होते म्हणून, भारतीय युद्ध करून सर्वांचा नायनाट केला. इतकेंच नव्हे तर पुन्हा राजे असे उन्मत्त होऊं नयेत ह्मणून धनुर्वेद नाहींसा केला व पुन्हां अवतार घेण्याचा प्रसंग येऊं नये असें केलें.

हाच कित्ता आजपर्यंतच्या त्यांच्या (क्षत्रियांच्या) सर्व साधूसंतांनीं व राजेरजवाड्यांनींही गिरविला होता. तुकाराम महाराजांनीं मंबाजीबोवाच्या लाथा सहन केल्या आणि 'जरी झाला ब्राह्मण भ्रष्ट,

तरी तिहीं लोकीं श्रेष्ठ' असा आपल्या समाजाला उपदेश केला. श्रीशिवाजीमहाराजांनीं तर 'गोब्राह्मण प्रतिपालक' अशी आपणास पदवी घेऊन त्यांतच त्यांनीं आपणांस भूषण मानिलें होतें. शाहूमहाराजांचीसुद्धां अशीच हकीगत आहे. एक ब्राह्मण कुष्ठी होता. तो नरसोबाच्या वाडींत श्रीची आराधना करीत असतां त्यास दृष्टांत झाला कीं, शाहूमहाराज हे ईश्वरांश आहेत; त्यांनीं स्नान करून सांडलेलें पाणी घेऊन तूं स्नान कर व अंगाला लाव ह्मणजे बरा होशील. ही गोष्ट ब्राह्मणानें शाहूमहाराजांस सांगून त्यांचें तीर्थ मागितलें. तेव्हां आपले शरीराचे पाण्याचा स्पर्श ब्राह्मणाचे शरीरास होणें योग्य नाहीं असें जाणून महाराजांनीं स्वहस्तें बाळकृष्णाची (मूर्तीची) पंचामृती पूजा केली व त्या तीर्थांत आपले हाताचा आंगठा बुडवून तें तीर्थ ब्राह्मणास दिलें. ब्राह्मणानें तें सर्व तीर्थ निरभिमानानें अंगाला लाविलें व त्याचा रोग गेला. ही गोष्ट बनावट किंवा दंतकथा नाहीं. पारसनीस यांच्या इतिहास संग्रहामध्यें प्रसिद्ध झाली आहे. धन्य त्या माहात्म्याची! या त्याच्या सात्विकपणामुळेंच त्याला अक्लेश राज्य मिळालें व त्याचे राज्याची कीर्ती दिगंत पसरली. हीच गोष्ट अहिल्याबाई होळकरणीची आहे. एका ब्राह्मणानें तिच्या स्तुतिपर ग्रंथ केला व तिला वाचून दाखविला. त्यांतली स्तुति बनावट किंवा खोटी नव्हती; पण तीसुद्धां तिला आवडली नाहीं. तिनें तो ग्रंथ नर्मदेंत टाकून दिला! या तिच्या सात्विकपणामुळेंच तिचीही कीर्ती भरतखंडांत दुमदुमून राहिली. मुसलमानानां सुद्धां ती वंद्य झाली. क्षत्रियांनीं आपणाकडे लहानपणा घेतला ह्मणजे ते लहान होतात व ब्राह्मणांनां श्रेष्ठपद प्राप्त होतें असें मुळींच नाहीं. तर याच्या उलट प्रकार होतो. ब्राह्मणांनींसुद्धां तुकारामाचे अभंग शिरसावंद्य व मान्य केले आहेत.

याप्रमाणें स्वराज्य असेपर्यंत ब्राह्मण व क्षत्रिय यांची एकी होती व प्रजा आनंदांत होती. पण परराज्य झाल्याबरोबर किंवा त्याची

छाया पडल्याबरोबर जिकडे तिकडे आपमतलब व त्याकरितां जाती-जातींत द्वेष यांचा सुळसुळाट झाला. राष्ट्रकार्याची जाणीव क्षत्रियांना राहिली नाहीं. आज पुन्हा ही घडी विस्कटली आहे. परकीयांच्या फुसलावणीनें क्षत्रियांची दृष्टी पराक्रमांतून निघून ब्राह्मणांविषयीं वितुष्टता उर्फ गृहकलह उत्पन्न करूं लागली आहे; अर्थांत हिचा परिणाम परकीयांना पोषक व आम्हांला घातक होत आहे हें सांगणें नकोच. अशा घरभेदानें आजपर्यंत कोणाचें घर सुरक्षित राहिलें आहे ? पण ही गोष्ट आमच्या क्षत्रियबंधूंस कळेल तेव्हां खरी. वस्तुत: ज्या रामकृष्णांच्या वंशांतले अस्सल मराठे क्षत्रिय आह्मीं आहों असा ते अभिमान बाळगतात, त्यांची बुद्धि मूळ वंशाच्या धोरणापासून तूर्त तरी भ्रष्ट झाली आहे खरी. क्षत्रियांनीं ब्राह्मणांस मान दिला तर ब्राह्मण जात शेफारून जाईल असें मुळींच नाहीं. ती आजपर्यंत कधीं गेली नाहीं (राजे झाले नाहींत) अर्थांत पुढेंही होणार नाहीं. आणि जरी शेफारली असें वाटलें तरी त्यांच्या हातांत आहे काय? राज्याधिकार किंवा सामर्थ्य क्षत्रियांकडेच राहाणार! ब्राह्मण तुकारामाच्या अभंगाला वेदवाक्याप्रमाणें मानतात. कथा कीर्तनांत तर त्याची प्रामुख्यानें गणना होते. श्रीशिवाजीला तर ते प्रत्यक्ष शिवाचा अवतारच मानतात व त्याचीं देवळें बांधतात. अर्थांत क्षत्रियांचा हा समज पूर्ण चुकीचा आहे. राज्याचें रक्षण शक्ति व युक्ति यानें होतें. नुसत्या शक्तीनें किंवा युक्तीनें होत नाहीं. ब्राह्मण क्षत्रिय एक झाले ह्मणजे बाकीच्या जाती त्यांस मिळतीलच व मग राष्ट्रकार्य सिद्धीस जाईलच. पण ह्या दोन जाती एक झाल्या नाहींत तोंपर्यंत कांहींच होणार नाहीं, ही गोष्ट ब्राह्मणांचे लक्षांत आहे आणि जेव्हां जेव्हां क्षत्रिय समाज ब्राह्मणांशीं फटकून वागतो तेव्हां तेव्हां ब्राह्मण आपलें ब्रह्मकर्म टाकूनसुद्धां त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न करतात. हीच गोष्ट हल्लींही चालू आहे. नुसतें ब्रह्मकर्म करणें हेंच ब्राह्मणांचें कर्तव्य

नसून देशकाल वर्तमान लक्षांत घेऊन समाजाची घडी विस्कटल्यास समाज पुन्हा सामर्थ्यवान् उत्पन्न होण्याकरतां प्रयत्न करणें हेंच ब्राह्मणांचें मुख्य कर्तव्य आहे. हें जे करतील त्यांनाच ‘ वर्णानाम् ब्राह्मणो गुरुः ’ ही संज्ञा लागू होईल. परिस्थिति लक्षांत न घेतां जे नुसते स्नानसंध्या करीत बसतील ते ब्राह्मणच नव्हत. परिस्थिति बिघडल्यास तिची दुरुस्ती करण्याची जबाबदारी ब्राह्मणांवरच आहे. रामदास, ब्रह्मेंद्रस्वामी, यांनीं तेंच कार्य केलें व हल्लींचे पुढारी ब्राह्मण आपणाकडे कमीपणा घेऊनसुद्धां तेंच कार्य करीत आहेत. यश येईल तेव्हां खरें. याला देशकाल वर्तमान जाणणें असें ह्मणतात. हेंच ब्राह्मणांचें कर्तव्य आहे. नुसतें जपजाप्य करीत बसणें हें त्यांचें कर्तव्य नव्हे. हाच उपदेश रामशास्त्री यांच्यासारखे तपोनिष्ठ ब्रह्मर्षीनेंही माधवराव पेशव्यांस केला होता. सारांश परमेश्वरानें निर्मिलेल्या जातींची घडी बिघडूं नये ह्मणूनच त्यांनीं दुहेरी नियम केले आहेत. ह्मणजे ज्यांनीं त्यांनीं आपल्या जातीप्रमाणें वागावें इतकेंच नाहीं तर दुसऱ्या जाती भ्रष्ट होण्याचा समय येईल तर त्यांचेंसुद्धां रक्षण करावें ह्मणजे ब्राह्मणांनीं ब्राह्मण धर्माप्रमाणें वागावें व इतर जातींनीं त्यांना मदत करावी तरच हिंदूंचे देव, वेद व सर्व समाज हे सोवळे राहातील. असा आचार आजपर्यंत सर्वजाती जातिबंधन कबूल करून राहात आल्या होत्या व त्यांत त्यांचा संतोषही होता. वेद नुसते ब्राह्मणांचे नव्हेत तर ते सर्व आर्यांचे आहेत इतकेंच नव्हे तर सर्व जगानें त्याचा अभिमान बाळगून त्यांचें रक्षण केलें पाहिजे. स्त्रियेनें आपलें पातिव्रत्य रक्षण करावें व सर्व पुरुष जातीनें तिला मदत करावी म्हणजे तिचें मन कदाचित चळल्यास पुरुषानें आपलें मन ताब्यांत ठेवावें व तिच्या पातिव्रत्याचें रक्षण करावें. अशा दुहेरी वृत्तीनें जुन्या समाजांत पूर्ण शांती नांदत होती, हल्लींसारखी भगभग किंवा अंधाधुंदी नव्हती.

हल्लीं क्षत्रियांना ब्राह्मण व्हावेंसें वाटतें (ब्राह्मणकर्में करावींशीं वाटतात) स्त्रियांना पुरुष क्षेत्रांत यावेंसें वाटतें व पुरुषांसारखी विद्या, काम, धंदा, नोकरी, तालीम, नमस्कार, बैठका काढून पुरुषक्षेत्रांत मान मिळावा असें वाटतें. पण पुरुष धर्म व स्त्री धर्म हे एक कसे होतील? त्यांच्या धर्माप्रमाणें त्यांची व्यवस्था लावणें हेंच धर्मकर्त्याचें काम आहे. याप्रमाणें मतस्वातंत्र्यामुळें ईश्वरनिर्मित स्थितीला सुद्धां जो तो कंटाळला आहे. पण ही चूक आहे. हातांनीं पायास झालेल्या दुःखाचा प्रतिकार करावा. पायास कांटे बोंचले तर ते हातासच काढावे लागतात, ते पायांनीं कसे निघतील? इतकेंच नव्हे तर सर्व शरिराच्या स्वास्थ्याकरतां सर्व अवयवांनीं एकमेकांच्या दुःखाच्या प्रतिकारार्थ आपल्याला नेमलेल्या कामाचा कंटाळा न करितां झटलेंच पाहिजे, म्हणजे सर्व शरीर सुयंत्रित चालून कार्यक्षम होईल. पायांना कधीं तरी स्वस्थता मिळते पण हातांना कधींच मिळत नाहीं, हें पायांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे. तें न जाणतां आपण शरिराच्या खालीं असतो, ह्मणून आपणांस कांटे बोंचतात. तर आपण हातच होऊं, म्हणजे हाताचें-ही काम करूं म्हणजे बरें, असें जर पाय म्हणूं लागले, तर तें जसें हास्यास्पद होईल व सर्व शरिराची घडी बिघडेल, तद्वतच परक्यांच्या अनुकरणानें व भलत्याच प्रकारच्या स्वातंत्र्यानें समाजाची घडी बिघडेल व तशी ती हल्लीं बिघडत चालली आहे. आपल्या एकट्याच्या सुखाकरतां नव्हे तर सर्व संसाराकरतां स्त्रियांनीं गृहकृत्यांतच प्रावीण्य संपादावें हेंच त्यांस भुषणावह आहे. पण हें बी. ए. पर्यंत शिकून आलेल्या स्त्रियांना सुद्धां समजत नाहीं. मग हें शिक्षण कसलें? एक सुशिक्षित विदुषी, काव्यचंद्रिका राधाबाई आपटे यांनीं मात्र आपल्या स्त्री–समाजाला अगदीं ठासून सांगितलें आहे कीं —

**महिला कर्तव्याचा, ओ ना मा हाच पाक सिध्यर्थ ॥**
**राबावें मोदभरें, सेवकजन योजणें नसे इष्ट ॥**

गृहकृत्यांत व बालसंगोपनांत दक्षता ठेवणें याची योग्यता खरोखर कमी नाहीं. पण अलीकडच्या सुशिक्षित बायकांना तें आवडत नाहीं हेंच वाईट आहे. पाश्चात्य स्त्रिया कदाचित हीं कामें करीत नसतील पण त्यांच्या समाजामध्यें गृहसौख्यही तितकेंच असतें हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे. याप्रमाणें हल्लींच्या शिक्षणानें समाज बिघडत चालला आहे, हें लोकांना समजेल तेव्हां खरें. हें थोडेसें विषयांतर झालें पण तें ओघानेंच करावें लागलें आहे.

परशुरामानें मातृवध केला हें त्याचें आचरण नीतीच्या व धर्माच्या अगदीं विरुद्ध झालें. ब्राह्मणाची मुंज झाली ह्मणजे त्यास गुरूकडून जो उपदेश मिळतो त्यांत 'मातृदेवो भव' ह्मणजे आईला देवाप्रमाणें मान हा उपदेश पहिला आहे. त्यानंतर 'पितृदेवो भव' असा आहे. ह्मणजे आईचा मान मुख्य आहे. असें असतां त्यानें मातृवध मुद्दाम केला हें त्याचें आचरण अत्यंत निंद्य होय. अर्थांत तो ब्राह्मणत्वापासून च्युत झाला असें समजून त्याला त्या वेळच्या ब्राह्मणांनीं वर्णबाह्य केलें. तेव्हां परशुरामानें ब्राह्मणांची सभा भरवून तींत नीति, अनीति, विशेष-नीति, तसेंच धर्म, अधर्म, आपद्धर्म व विशेष धर्म यांचा नीट खुलासा केला. व त्याप्रमाणें मातृवध करूं नये हें शास्त्र खरें आहे; परंतु आपल्या प्रत्यक्ष बापाच्या आज्ञेप्रमाणें मातृवध केला नाहीं तर मातेचा वध अन्य रीतीनें खात्रीनें होतो आणि तो अपरिहार्य आहे इतकेंच नव्हे, तर त्यामुळें सर्व कुटुंबाचा, जातीचा व समाजाचा व कदाचित जगाचासुद्धां नाश होतो असें जर असेल आणि मातृवध केला तर माता पुन्हा जिवंत होऊन सर्व आपदा टळून सर्वांचेंच कल्याण होईल असें निश्चितात्मक असेल, तेव्हां मातापितरांच्याच नव्हे तर कुटुंबाच्या व जगाच्या उद्धाराकरतां व संतोषाकरतां मातृवध करणें हीच नीति होय व न करणें ही अनीति होय. अर्थात ही विशेष नीति आहे. अशा गोष्टी जगांत पुष्कळ होतात.

कसायाच्या हातून सुटलेली गाय कोठें गेली आहे हें आपणांस माहीत असतां कसाई विचारील तर त्यास गाईचा खरा पत्ता न सांगतां अगदीं विरुद्ध सांगणें हें विशेष नीतीचें उदाहरण प्रख्यात आहे. सारांश, नीति, धर्म व सत्य यांच्या प्रत्यक्ष आचरणापासून समाजाचें नुकसान होत असेल तर विशेष धर्माप्रमाणे व आपद्धर्माप्रमाणें वागणें अगदीं जरूर आहे. कारण सत्य, नीति किंवा धर्म समाजाच्या रक्षणाकरतां आहेत, नाशाकरतां नाहींत याचा निदान ब्राह्मणांनीं तरी प्रसंगीं सारासार विचार केलाच पाहिजे. हल्लींच्या राजनीतींत तर ह्या गोष्टी पदोपदीं घडतात. क्लैव्ह व वॉरन हेस्टिंग्ज ह्यांनी हिंदुस्थानांत इंग्लिशांस शोभणार नाहींत असे अनन्वित प्रकार केले ही गोष्ट ब्रिटिश पार्लमेंटनेंही कबूल केली आहे. पण त्यांनीं हें ब्रिटिश लोकांच्या हिताकरतां केलेलें आहे असें ठरवून त्यांस सर्व गुन्हे माफ केले! ह्मणजे हींसुद्धां नीतीच झाली असें पाश्चात्यांनींही ठरविलें आहे. पण हिला विशेष नीति किंवा राजनीति असें ह्मणतात. हल्लींसुद्धां कोर्टांत पुरावा संपल्यावर कोणता कायदा कोठें लावावयाचा व त्याची अम्मलबजावणी किती, कोठें व कशी करावयाची हें जज्जांनीं ठरवावयाचें असतें आणि ह्मणूनच एकच गुन्हा युरोपियनानें किंवा नेटिव्हानें केल्यास शिक्षेचें प्रमाण अगदीं भिन्न होतें. मागासलेल्या जातीस पुढें आणावयाचें, तसेंच हल्लींच्या स्त्री शिक्षणाचे नियम, व स्पेशल जकाती हीं विशेष नीतीचीं स्पष्ट उदाहरणें आहेत. ही नीति जेते लोक स्वतःच्या मतलबाकरितां आचरतात व जितांस मात्र सामान्य नीतीकडे बोट दाखवितात. जितांपैकीं कोणीही ह्या विशेष नीतीचा हक्क आहे असें सांगेल किंवा समजून देईल तर त्याच्याशीं जेत्यांचें हाडवैर होतें हें प्रसिद्धच आहे!

पूर्वीं नीतींत बदल करतां येत नसे. मग त्यापासून कितीही नुकसान होवो. तें समाज सोशी. राम, हरिश्चंद्र, वसिष्ठ, विश्वामित्र

यांच्या गोष्टी प्रसिद्धच आहेत. परंतु समाजाचें कधीं कधीं त्यानें कल्याण होत नाहीं, सबब प्रसंगविशेषीं त्यांत शहाण्या माणसांनीं बदल करून समाज वांचविला पाहिजे. ही विशेष नीति परमेश्वरानें प्रथम वामन अवतारांत सांगितली व आचरली. बलिराजाच्या अंगीं लेशही दुर्गुण नव्हता. परंतु तो दैत्यांशीं असल्यामुळें तो साम्राज्याचा मुख्य अधिकारी होणें उपयोगी नाहीं. कारण त्याचेपुढें त्याचे सर्व वंशज तसेच सत्वगुणी निपजतील कशावरून? म्हणून ह्या विशेष नीतीनें त्याला काढला. ही विशेष नीति प्रसंगार्थ आहे व तिचा उपयोग शहाण्यांनींच केला पाहिजे. म्हणून समाजाचे मुख्य घटक जे ब्राह्मण त्यांस तरी ह्या नीतिचें शिक्षण देणें जरूर आहे. कारण पुढें परकीयांशीं संबंध येईल तेव्हां आपलेपणा रक्षण करण्याकरितां ह्या नीतीचा उपदेश त्यांस केला पाहिजे, म्हणजे ही नीती स्वतः प्रथम आचरणांत आणुन दाखविली पाहिजे, म्हणून ही गोष्ट परमेश्वरानें परशुराम अवतारांत आचरून दाखविली व तिचा ब्राह्मणांस उपदेश केला. पण ही जात शहाणी असूनही त्यांनीं तो न ऐकतां देवाशींच भांडण करून देवालाच त्यांनीं वाळींत टाकला! व जुन्या रूढ शास्त्राधारालाच ते चिकटून बसले! ते आपला आग्रह सोडीनात. तरी त्यांतून कांहीं लोक परशुरामाच्या मताचे मिळाले त्यांना ही नीती परशुरामानें शिकविली. पण देवानें ही नीती तेव्हां क्षत्रियांस किंवा इतर जातींस सांगितली नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. कारण ते अविचारानें, लोभानें किंवा मत्सरानें तिचा दुरुपयोग करतील म्हणून अडल्यास त्यांनीं ब्राह्मणांस विचारावें असें ठरविलें. ही विशेष नीति ब्राह्मणांनीं आचरलेली पाहून इतरांना राग येतो. पण त्याबद्दल तुकारामानें आपल्या जातीस स्पष्ट बजाविलें आहे.

**जरी झाला ब्राह्मण भ्रष्ट। तरी तिहीं लोकीं श्रेष्ठ !!**

याचा अर्थ शहाण्यानें एखादे वेळीं गैरशिस्त गोष्ट केली अशी

दिसली तरी ती प्रसंगार्थ आहे. तिचें आचरण आपण करूं नये. हल्लीं सुद्धां युरोपियनांकरितां निराळे नियम आहेत, किंवा ते प्रसंग विशेषीं निराळे होतात याची जाणीव सर्वांना आहेच. रामावतारीं ह्या विशेष नीतीचा पूर्ण अम्मल झाला. म्हणजे राक्षस हे समाज सुधारणेला विघातक आहेत, त्यांची सुधारणा होणें शक्य नाहीं तेव्हां त्यांस मारलेंच पाहिजे. याच दृष्टीनें आफ्रिका व अमेरिकेच्या मूळ रहिवाश्यांचा युरोपीयनांनीं नायनाट केला. रावणाजवळ सीता परत मिळण्याबद्दल कितीतरी शिष्टाई झाली, पण व्यर्थ ! सबब ह्या जातीचा नाश करणें हीही विशेष नीति होय. कृष्णावतारांत तर कृष्णांनीं अर्जुनास गीता सांगून ब्राह्मणांसच नव्हे तर सर्व जगास स्पष्ट नियमच घालून दिला. केवळ आपल्या फायद्याकरतां सर्व कुलाचा किंवा सर्व राष्ट्राचा नाश करणें बरोबर नाहीं; त्याकरतां आपला नाश झाला तरी चालेल ही अर्जुनाची नीती खरी व थोरपणाची होती यांत शंका नाहीं. पण अधिकारानें उन्मत्त होऊन एक समाज दुसऱ्यास विनाकारण दुःख देईल तर त्यास शासन करण्याचा प्रयत्न शहाण्यांनीं केलाच पाहिजे. अशा प्रयत्नांस परमेश्वर सहाय्यही होतो आणि तो परमेश्वर प्रत्यक्ष मींच आहें, मीं तुला साह्य करून त्यांची खोड मोडतों किंवा तो समाज नाहींसा करतों हें कृष्णाचें अभिमानाचें व पराक्रमाचें बोलणें अर्जुनास खरें वाटेना. तेव्हां त्याला विराट स्वरूप दाखवून त्यानें आपल्या सामर्थ्याची खात्री केली व हें विशेष नीतितत्व अर्जुनाकडून अमलांत आणवून जगास जागें केलें. कृष्णालाच हें करतां आलें नसतें असें नाहीं आणि तें देवानें वामन, परशुराम व राम अवतारांत केलेंही. पण मनुष्यांनीं प्रसंग विशेषीं त्याचा अंगिकार केलाच पाहिजे हें शिकविण्याकरतां अर्जुनाकडून तें करविलें व गीतेच्या रूपानें जगास धडा घालून दिला. गीतेचें तात्पर्य प्रवृत्तीपर किंवा निवृत्तीपर असें कोणी कसें जरी काढलें तरी भगवंतांनीं अर्जु-

नाला त्या समयीं जी गीता सांगितली तिचें तात्पर्य तरी हेंच खचित आहे. कोणीही होऊन अधिकाराच्या जोरावर अनीतीनें किंवा ह्या विशेष नीतीचा अतिरेक करून गरिबांस त्रास देईल तर तो कितीही सामर्थ्यवान् असला तरी गरिबानें भगवंताला अनन्यभावानें शरण जाऊन त्याच्या जुलमाचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे. हेंच गीतेचें तात्पर्य आहे हें यावरून स्पष्टच झालें आहे. ह्या विशेष नीतीचा उपयोग एखाद्या कार्यांत करण्याची जरूर आहे कीं नाहीं हें पाहाण्याकरितां प्रत्येकानें कार्यारंभीं देशकाल संकीर्तन व गोत्र-कुलाचा म्हणजे आपल्या सामर्थ्यशक्तीचा उच्चार व विचार अवश्य करावा असे तेव्हांपासून ठरविण्यांत आलें आहे. म्हणजे कार्य कर-ण्यापूर्वीं तुम्ही कोठें आहां, कशा स्थितीमध्यें आहां, तुमचें सामर्थ्य किती आहे, साह्य किती आहे, याचा पूर्ण विचार करा व मग कार्याला लागा. म्हणजे तुम्हांला कार्य करण्याचें धोरण समजेल व मग परमेश्वर साह्य करील. देशकालवर्तमानाप्रमाणें स्वत्व राखण्याकरतां नीतीला व धर्माला वळण देणें हेंच ब्राह्मणांचें मुख्य कर्तव्य आहे. नुसतें यंत्राप्रमाणें स्नानसंध्या किंवा जपतप करीत बसण्याचें नाहीं. देशकालवर्तमानाचें धोरण बांधून त्याप्रमाणें धर्मतत्त्वें प्रतिपादून समा-जास बहकूं न देतां त्याचें कल्याण करणें हेंच खरें ब्राह्मणत्व होय ! हें करणार नाहींत ते ब्राह्मणच नव्हत. आपल्याकडेच पाहाण्याकरतां ब्राह्मण जात नाहीं—तशी कोणतीच जात नाहीं—पण दुसऱ्या जाती चुकत असल्यास ब्राह्मणांनीं त्यांस जागें करून प्रत्येकानें देशकालवर्तमान ओळ-खून आपलें स्वत्व राखलेंच पाहिजे—म्हणजे आपलें राष्ट्रधर्मरूपी घर राखलेंच पाहिजे. परवश होतां कामा नये हेंच खरें शिक्षणाचें सार आहे. नुसतें लिहितां वाचतां येणें हें शिक्षण नव्हे हें आपले लोक विसरले व नुसते नीति नीति, शिक्षण शिक्षण, घेऊन बसले आहेत. परकीय लोक आपणांस सुशिक्षित करताहेत व नीति शिकवीत आहेत तें

आमच्या उद्धाराकरितां नसून त्यांचें बूड येथें कायम टिकावें ह्याकरितां आहे हें उघड आहे. हें समजून आतां कोठें ते जागे होत आहेत! व त्यांस ह्या नीतीनें आतां आपलें घर व सर्वस्व जात आहे असें समजूं लागलें आहे! पुढें राम, पंपासरोवरास गेले असतां जो रामलक्ष्मणांचा संवाद बगळा व माशासंबंधानें लिहिला आहे तो येथें उत्तम लागू पडतो. सबब तें वर्णन येथें वाचावें. द्विरुक्तीच्या दोषाकरितां तें येथें देण्याचें टाळलें आहे.

याप्रमाणें ह्या विशेष नीतीचा उपदेश परशुरामानें ब्राह्मणांस त्या सभेमध्यें केला. परंतु सर्वांस ती गोष्ट पसंत पडली नाहीं. परंतु ज्यांना ती पसंत पडली असे त्यांतून चौदा गोत्रांचे ६४ ब्राह्मण निघाले. साठे म्हणजे साठावे व साठ्ये म्हणजे ६१ वे अशी त्यांची चौसष्ट कुळांची गणती समजते. हे परशुरामाच्या बाजूचे झाले व दुसरे होईनात. ते जुन्यालाच धरून बसले व आपला आग्रह सोडीनात. नवीन मताची मंडळी थोडी पण यांचा पुरस्कार केला नाहीं तर नवीन स्थापलेलें तत्व उत्क्रांतीकारक असून त्याचा नाश होईल, जगाची सुधारणा होणार नाहीं व अवतारकृत्य फुकट जाईल. हें तत्व जगांत राहिलें म्हणजे केव्हां तरी त्याचा जगभर प्रसार होईल म्हणून अशा मंडळींची संख्या वाढली पाहिजे, काटक व धोरणी झाले पाहिजेत, यांच्यांत व जुन्यांत भांडण होऊन यांचा नाश होऊं नये म्हणून यांच्याकरतां नवीन जागा (कोंकण) ऊर्फ परशुरामक्षेत्र त्यानें शोधून काढून त्यांस तेथें वस्ती करावयास लाविलें व आपण त्यांच्या रक्षणाकरतां महेंद्र पर्वतावर तपश्चर्या करीत बसले. हेंच कोकणस्थ ब्राह्मणाचें मूळ आहे असें दिसतें. परशरामाचा व यांचा अशा रीतीचा संबंध दिसतो व यांना चित्तपावन ह्मणजे नवीन सुधारणेनें—परशुरामीय तत्वानें—ज्यांचें चित्त पवित्र झालें आहे—समजूत झाली आहे—ते असें ह्मणण्याची वहिवाट पडली. मुख्यतः चित्तपावन हें नांव त्यांना

कसें मिळालें ह्याची माहिती तीर्थयात्रा भाग ४ यांत परशुराम क्षेत्रांत हरिहरेश्वराचे यात्रेंत येईल. इतके दिवस झाले, नव्हे युगें सुद्धां होऊन गेलीं तरी कोकणस्थ व इतर ब्राह्मण यांच्यांत वरील तत्वाचा फरक अद्याप दृष्टीस पडतोच. देशस्थ ह्मणजे केवळ धार्मिक, जुन्या वृत्तीचे, साधेभोळे व कोकणस्थ ह्मणजे धूर्त, तडफदार हा जातिविशिष्ट फरक अद्यापही दृष्टीस पडतो. तो जाऊन सर्व ब्राह्मण वर्ग एक व्हावा ह्मणून पेशव्यांनीं परस्परांशीं शरीरसंबंध करण्याचा प्रयत्न केला होता पण ईश्वरी इच्छेनें तें जुळलें नाहीं. देशस्थांच्या धार्मिक समजुतीमुळें व साधेभोळेपणानें त्यांच्यांत पुष्कळ साधुसंत निर्माण झाले व कोकणस्थांत त्यांच्या तडफेमुळें तेजस्वी राजकारणी पुरुष झाले. पेशवाईत देशस्थांची ही वृत्ति पालटून तेही राजकारणी झाले. ह्या भोळेपणामुळें व सात्विक गुणामुळें आपलें अतिशय नुकसान झालें आहे हें त्यांना आतां सुद्धां समजूं लागलें आहे. कोकणस्थ लोक कोकणच्या काटक हवेवर राहिल्यामुळें त्या हवेचा त्यांच्यावर विशेष परिणाम झाला व त्यांच्या बुद्धीला अधिक तीव्रता आली. तसेंच त्यांच्या शरिरावर व त्यांच्या वर्णकांतीवरही त्या हवेचा विशेष परिणाम होऊन ते मूळचे काळे होते परंतु त्यांचा रंग पालटत पालटत ते प्रथम तांबूस नंतर पिवळसर व गोरेही झाले. यामुळें त्यांच्या विशिष्टत्वाचीं दर्शक अशीं त्यांना काळे, गोरे, पिंगळे (पिवळे) घारे अशीं टोपण नांवें पडलीं. व पुढें कांहींना धंदेवाचक सुतार, जोशी व कांहींना अधिकारवाचक व कांहींना गांवावरून प्रत्यातीदर्शक नांवें मिळालीं तेव्हांपासून त्यांच्यामध्यें आडनांवांची प्रवृत्ति झाली.

ही आडनांवांची प्रवृत्ति विशेषेंकरून कोकणस्थांतच आरंभापासून आढळते. त्यांच्या धोरणांनीं किंवा त्यांचा देशस्थांशीं किंवा कऱ्हाड्यांशीं संबंध पडल्यावर तेही तशीं आपलीं आडनांवें ठेवूं लागले पण त्यांच्यांत रंगाचा व धंद्याचा फरक झाला नाहीं. केवळ गांवावरून अथवा अधिकारवाचकच त्यांचीं नांवें पडलीं. देशाप्रमाणें कोकणांत बारा

बलुतेदार नाहींत यामुळें सर्व कामें ब्राह्मणांनाच करावीं लागलीं व ह्यामुळें त्यांच्यामध्यें फडके, सुतार अशीं धंद्याचीं नांवें पडलीं. कांहींनीं वैशंपायन, व्यास वगैरे प्राचीन ऋषींचीं म्हणजे आपल्या गोत्रांचींच नांवें कायम ठेविलीं. कांहींना गांवावरूनच नांवें पडलीं व जोगळेकर, सुगवेकर, चिपळूणकर, राजापुरकर वगैरे नांवे पुढें कुलवाचकच झालीं. अशा रीतीनें चौसष्ट कुळांच्या आडनांवांचा आरंभापासून शोध केल्यास मी म्हणतों असे त्यांचे मूळचे संबंध कळल्याशिवाय राहणार नाहींत. प्राचीनकाळीं नांव सांगण्याची पद्धत निराळी होती. तिचा नमुना आतां फक्त लग्न कार्यांत मात्र दिसतो. ती अशी कीं, प्रथम गोत्र, प्रवर, नंतर आजा, नंतर बाप व अखेर मुलाचें किंवा मुलीचें नांव घेतात. आपलेकडील पाताण्यांत किंवा तैलंगणांतसुद्धां आडनांवें नाहींत. ते स्वतःचें नांव, बापाचें नांव व आज्याचें नांव घेतात म्हणजे झालें. सारांश आडनांवांची पद्धति मूळची कोंकणस्थांची असून संगतीनें ती पुढें सर्व महाराष्ट्रभर पसरली असें दिसतें. या आडनांवांवरून नियमित गोत्रांवरून व डोंगर, समुद्र यांचे सांनिध्यानें हे लोक काटक व धाडशी बनले, त्यांची संख्या नियमित झाली व त्यांचें विशिष्टत्व कायम राहिलें. कोंकणस्थांची संख्या प्रथम अगदीं नियमित होती सबब त्यांचा कानडी ब्राह्मणांच्या मुलींशीं कांहीं काळतरीं शरीरसंबंध होत असावा असें वाटतें. कारण आक्का, ताई, हीं नांवें तसेंच "अडगुलम् बडगुलम् सोन्याच कडगुलम्" इत्यादि मुलांस खेळविण्याचीं लहान लहान गाणीं व कांहीं शब्द कानडींतीलच आहेत आणि ते विशेषेंकरून कोंकणस्थांच्या प्रचारांतले आहेत. येथें पूर्वी कानडी भाषा होती असें म्हणवत नाहीं कारण तशी असती तर ती सर्वस्वी नष्ट झाली नसती. हे प्रकार बायकांच्याच संबंधाचे असल्यामुळें ही गोष्ट संभाव्य दिसते. पुढें कोंकणस्थांची संख्या वाढल्यावर तो शरीरसंबंध तुटला असावा. या शिवाय कानडी व कोंकणस्थ बायका

20377

थांच्या रंगरूपांतही बरेंच सादृश्य अद्याप दिसतें. पुढें कोकणस्थ देशस्थांचा संबंध कऱ्हाडे ब्राह्मणांतर्फे झाला असावा. कारण कऱ्हाड्यांचेंही कोकणस्थांशीं सादृश्य दिसतें आणि तें चिपळूण मार्गानें झालें असावें असें अनुमान आहे.

ही यात्रा मोठी अर्थात तिचा लेखही मोठा झाला. आतां या लेखाचा त्याच्याशीं काय संबंध आहे? हें विषयांतर आहे असें कोणासही वाटेल. पण यात्रेचे इतर पुस्तकांत व ह्यांत हाच विशेष फरक आहे. जागेचा भूगोल समजला म्हणजे इतिहास समजला पाहिजे. नुसतें देशदर्शन व त्याचा जाण्यायेण्याचा रस्ता कळावा किंवा तेथील कांहीं कमजास्त माहिती कळावी याकरतांच केवळ हें पुस्तक नाहीं. ती यात्रा पूर्वजांनीं उत्पन्न करण्याचा हेतू, तेथील स्थानमहात्म्य व त्यावरून त्याचीं अनुमानें, सृष्टि निरीक्षण, भोंवतालची परिस्थिति व या यात्रेपासून आपणांस काय बोध घ्यावयाचा हेंच या पुस्तकांत विशेष आहे. म्हणून मातुश्री जगदंबा रेणुकेबद्दल हा लेख लिहिणें जास्त जरूर पडलें. रेणुकेचें किंवा परशुराम अवताराचें हें ध्येय, या यात्रेंत जात असतां समजलें. मन रिकामें पडल्यामुळें ह्या यात्रेची मूळ कल्पना येऊन व यात्रेचा हेतू समजून भगवत्कृपेनें हा या यात्रेचा फायदा झाला. नाहीं तर ही यात्रा मोठी कष्टमय होती. पण तीच आतां चांगली सफळ झाली असें वाटतें. सारांश कोंकणस्थ देशस्थांचें मूळ एकच, महाराष्ट्रीय ब्राह्मण. पण परशुरामीय तत्वामुळें त्यांच्यांत जो देशकालभेदानें मतभेद झाला तो आतां काढून टाकिला पाहिजे. त्यांनीं सुद्धां केवळ मोठेपणा थोडा कमी करून परशुरामी बनलें पाहिजे तरच या परराज्यांत उपयोग आहे. हें तत्व, हाच या यात्रेचा प्रसाद देशस्थांच्या नेहमीं डोळ्यांपुढें असावा म्हणून ही यात्रा दक्षिण हिंदुस्थानच्या मध्यभागीं सर्व देशस्थांपुढें ठेविली आहे व देवीच्या साडेतीन पिठांत म्हणजे मुख्य यात्रेंत हिची गणना केली आहे असें

स्पष्ट दिसतें. परशुराम, रेणुका व कोकणस्थ यांचा संबंध कोकणांत, त्याचें घाटावर काय आहे असें प्रथम मला वाटलें; पण जमदग्नीचा मूळ आश्रमच माहुरगडावर होता असें मागाहून तपासाअंतीं समजल्यावर सर्व कथा जुळून आली, समजली व आनंद झाला.

ही यात्रा संपून मी पुन्हा बोल्डा स्टेशनवर आलों. रस्ता फार दगडाळ ह्मणून शरीराचे व सामानाचे फार हाल झाले. एक दोन ठिकाणीं रात्रीं अपरात्रीं रस्ता न दिसल्यामुळें गाडी उलटली, मला लागलें व गाडीही नादुरुस्त झाली. असा त्रास झाला पण त्रासाला कंटाळतां कामा नये हें मागें सांगितलेंच आहे. आमचा गाडीवान महामूर्ख होता. तो चढणीवर गाडी बैलांचे तंत्रानें त्यांना त्रास होऊं नये ह्मणून सावकाश चालवी व उतरणीवर आपल्याला लवकर गेलें पाहिजे ह्मणून धावडवी! रस्ता वाईट, दगडाळ, उंचनीच वळणें फार आहेत, तूं मला कधींतरी खाड्यांत घालशील असें मी त्यांस बजावीत असें. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. अखेरीस गाडी उलटून त्याचें प्रायःश्चित सर्वांस भोगावें लागलेंच! उपाय नाहीं. 'मूर्खाशीं गांठ पडना तर चूप बैठना' अशी ह्मण आहे. गाडी ठरवतेवेळीं बैलांची वैरण व गड्याचें जेवण आपण पत्करूं नये. हें लक्षांत ठेवावें.

बोल्डा स्टेशनवरून पूर्णा जंक्शनवरून मी परत परभणी स्टेशनवर आलों. पूर्णा स्टेशनवर उतारूंची अतिशय गर्दी झाली. थर्डक्लासच्या डब्यांत मुसलमान बरेच भरले असल्यामुळें ते दुसरे उतारूस दांडगाई करून आंत येऊं देत ना. बाहेर माणसांची अतिशय गर्दी व हे स्वस्थ ऐसपैस जागा घेऊन हातपाय ताणून पडलेले होते. सर्व डब्यांमध्यें हीच अवस्था होती. गाडींत जागा असून लोक गाडींत कां बसत नाहींत याचें कारण जेव्हां एका शहाण्या तिकीट कलेक्टराला समजलें तेव्हां त्यानें त्याचा बंदोबस्त

केला. त्यानें चक्क सांगितलें कीं, रेलवेंत मोंगलाई चालावयाची नाहीं, उतारूंस बसूं द्या. तेव्हां आंतील लोक ह्मणाले, आमचे लोक बाहेर गेले आहेत त्यांच्याकरतां ही जागा आहे. तेव्हां तो ह्मणाला ठीक आहे गाडी चालू होईपर्यंत लोक आले नाहींत तर तुह्मांला सर्वांना खालीं उतरीन व पोलीसच्या ताब्यांत देईन. तेव्हां सगळे लोक घाबरले व त्यांनीं सर्वांस आंत येऊं दिलें! उतारूंची सोय करणारे असे रेल्वे नोकर फारच क्वचित. हें त्यांचें कामच असतें आणि त्याकरितांच त्यांना ठेविलें आहे हें खरें, तरी उगीच कोण त्रास घेतो असें ह्मणून सोडून देतात. त्या तिकीट कलेक्टरनें एकाही मनुष्याला बाहेर राहूं दिलें नाहीं व सर्वांची सोय केली. मीं त्याला याबद्दल शाबासकी देऊन त्याचा गौरव केला. मुसलमानी राज्यांत मुसलमानांविरुद्ध त्यांना तंबी देणारा दक्षिणी मनुष्य भेटला यावरून या रेल्वेंत न्यायाचा अम्मल थोडा तरी आहे, ही फार संतोषाची गोष्ट आहे असें वाटलें. अशा रीतीनें मुसलमानांच्या असंतोषानें गाडींत बसलेल्या मनुष्यांची विशेषतः मारवाड्यांची मुसलमानांनीं बरीच चेष्टा चालवली होती. भांडणाचा प्रसंग येतो कीं काय असें मला वाटलें होतें पण दुसरें स्टेशन येऊन उतारू बरेच उतरल्यामुळें तो प्रसंग टळला. मी परभणी स्टेशनवर उतरलों त्यावेळीं त्या गावांत प्लेग असून गांव बाहेर पडला होता. स्टेशनवरच त्यांच्या झोंपड्या होत्या. येथून

## परळी वैजनाथ

कडे जाण्यास बैलगाड्या मिळतात. परळी वैजनाथ येथून बारा कोस आहे. तेथें प्लेग असल्यामुळें किंवा कशानेंही ह्मणा गाडीवानानें नुसते जाण्याचे दहा रुपये घेतले. गाड्या अगदीं वाईट, धड साटीही विणलेली नसते व नुसतीं आंत लांकडे असतात. निरुपायानें अशा गाड्या करणें भाग पडतें, वाटेंत एकदोन ठिकाणीं मुक्काम झाला.

याच रस्त्यावर गोदावरीचे कांठीं पैठण, नेवासें वगैरे प्रख्यात क्षेत्रें आहेत. श्रीविष्णूनीं मोहनीचें रूप घेऊन देवकार्य साधल्यानंतर येथें निवास केला ह्मणून त्यास निवास क्षेत्र ऊर्फ नेवासें ह्मणूं लागले. येथें ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी प्रथम दगडावर लिहिली असें ह्मणतात. असे कोरलेले दगड अद्याप तेथें कांहीं सांपडतात असें ह्मणतात. पैठणास रेड्याकडून वेद ह्मणवून आपली योग्यता सुशील ब्राह्मणांस दाखवून दिली. जमल्यास या क्षेत्रावरून गाडीचा ठराव करावा. न जमल्यास पुन्हां मनमाड येथें येऊन नगर लाईनीनें हीं क्षेत्रें व पुणतांबें ज्याला पूर्वीं चांगदेवाच्या पुण्याईनें पुण्यस्तंभ ह्मणत तेंही पाहून यावें. चांगदेव हे वाजसनीय शाखेचे ब्राह्मण होते. योगसमाधीनें मृत्यु जिंकण्याची कला यांना माहीत झाल्यामुळें ते चवदाशें वर्षें जगले अशी आख्यायिका आहे. पुणतांबें पाहून झाल्यानंतर परळी वैजनाथ येथें जावें. मी जात होतों त्या रस्त्यांत एका ठिकाणीं नुपते रुद्रावर्तनाचे ब्राह्मण होते. मी पांथस्थ ह्मणून मलाही प्रसादाला बोलाविलें होतें. लवकर होईल, उशीर होणार नाहीं असें सांगितल्यामुळें व गेल्यानें अनायासें तेथील समाजाचे आचारविचार कळतील असें वाटल्यामुळें मीं तें कबूल केलें. पण जेवायला लवकर तरी संध्याकाळचे पांच वाजले आणि यामुळें सर्वप्रकारची अव्यवस्था झाली. येथील सर्व प्रकार अव्यवस्थेचा होता. पानें घरावर धाब्यावर मांडलीं होतीं व त्यांत बायका पुरुष यांची बसण्याचीं शिस्त नव्हती. बायका असून पुरुषच वाढीत होते! असो. परळी येथें वैजनाथाचे देवळाजवळ एक साधूचा मठ आहे तेथें जेवणाची व राहाण्याची चांगली सोय आहे. ह्या मठाची चालक हल्लीं एक बाई आहे व ती फार साध्वी आहे. गांवाला परळी ह्मणतात व देवाला वैजनाथ ह्मणतात. गांव मोठा आहे व बहुतेक लिंगाईत व्यापाऱ्यांची वस्ती आहे. देऊळही उंचावर आणि भव्य आहे. सभामंडपही नवाच बांधलेला असून

सर्व काम लांकडी व प्रेक्षणीय आहे. एका बाबेंत माबतील इतक्या व्यासाचे व ताडाएवढे उंच असे मोठे लांकडी खांब पाहून आश्चर्य वाटलें. कारण एवढा खांब खालपासून वरपर्यंत चौरस घडविण्यास तो वृक्ष केवढा तरी मोठा असला पाहिजे! अशा प्रकारचे वृक्ष पोसण्याजोगें जंगल निजाम हद्दींतून जातांना मला कोठें दिसलें नाहीं व एवढा खांब लांबून आणावयाचा ह्मणजे तो रेल्वेंतून आणणेंसुद्धां अडचणीचेंच आहे.

हें देवस्थान बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक आहे. येथें देवाला सर्व लोक शिवतात. लहान मुली, बायकासुद्धां शिवतात! कोणालाच प्रतिबंध नाहीं. येथें मोठमोठे लिंगाईत उंची रेशीमकांठी धूतवस्त्रें नेसून व पांघरून, तांब्या पंचपात्री व पूजासाहित्य घेऊन देवाचे पूजेस येतात ते अगदीं ब्राह्मणांसारखे दिसतात; पण त्यांना शेंडी नाहीं! फक्त भस्म लाविलेलें पाहून येथील ब्राह्मण शेंडी ठेवीत नाहींत कीं काय ह्मणून मी तपास केला, तेव्हां हे लिंगाईत आहेत असें कळलें. लिंगाईत लोक कोणच्याही हातचें खात नाहींत. हे वीरशैव आहेत. येथील ब्राह्मण लोकांची राहाणी व पोषाख अद्यापपर्यंत जुन्या पद्धतीचा आहे. ह्मणजे त्यांचीं पागोटीं नवीन पुण्याच्या पद्धतीचीं नसून नानासाहेब पेशवे यांचें जसें पागोटें क्रमिक पुस्तकांच्या चित्रांत दाखविलें आहे त्या पद्धतीचीं आहेत. सर्व पोषाखही त्याच पद्धतीचा असतो. आंगांत बाराबंदी, डोक्याला वरील तऱ्हेचें पागोटें व खांद्यावर धोतराची घडी असते. देवळाच्या चारी बाजूला पायऱ्या फारच भव्य आहेत. लोक रोज सकाळ संध्याकाळीं दर्शनाला येतात व या पायऱ्यांवर हवा खात बसतात. येथील दिपोत्सव, पालखी, आरास, त्रिकालपूजा निरनिराळ्या प्रकारच्या स्त्रीपुरुषांचा समुदाय व त्यांच्या विशिष्ट प्रकारच्या चालीरीती हीं पाहाण्यासारखीं आहेत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत येथील वेळोवेळचे प्रकार पाहून येथून उठू-

नच जाऊं नये असें वाटतें. अर्थात एकंदर त्याची पौराणिक कथा अशी आहे. एकदां रावणानें कैलास पर्वतावर जाऊन खडतर तपश्चर्या केली. त्या योगानें शंकर प्रसन्न होऊन त्यांनीं त्यास वर मागण्यास सांगितलें. रावणानें शंकराच्या पूजनार्थ रोज लंकेतून कैलासांत यावें लागतें ह्मणून त्यांचे आत्मलिंग मागितलें. तें त्यांनीं तत्काळ देऊन सांगितलें कीं हें लंकेस जाईपर्यंत जमिनीवर ठेऊं नको. तें त्यानें मान्य केलें. परंतु एवढें जड लिंग आपणास लंकेस कसें नेतां येईल याची त्यास मोठी काळजी पडली! तेव्हां शंकरानीं त्या लिंगास दोन रूपें देऊन तीं कावडींतून खांद्यावरून नेण्यास सांगितलीं. त्याप्रमाणें तो नेत असतां वाटेंत त्यास लघुशंका लागली; तेव्हां त्यानें तेथें एक गुराखी होता त्याजवळ कावड दिली व आपण लघुशंकेस गेला. बराच वेळ झाला तरी तो येईना. तेव्हां त्या गुराख्यानें ती कावड जमिनीवर ठेविली, त्याबरोबर तीं लिंगें तत्काळ जमिनींत गेलीं. नंतर रावण आला व त्यानें त्यांस उपटण्याचा फार प्रयत्न केला, पण तो सिद्धीस गेला नाहीं. त्या लिंगांपैकीं कावडीचे मागील अंगास होतें तें हें वैजनाथ व पुढील अंगास होतें तें गोकर्णमहाबळेश्वर या नांवांनीं प्रसिद्ध झालीं. या स्थानाच्या अंतरावरून रावणाच्या कावडीची व त्याची कल्पना होते. गोकर्णाची विशेष माहिती चवथ्या भागांत येईल. रावण शंकरांचें आत्मलिंग घेऊन लंकेत चालला होता तें त्यानें नेलें असतें तर लंका अजिंक्य झाली असती. सबब सर्व देवांच्या विनंतीवरून गुराखी होण्याचें काम मंगलमूर्ति गणपतींनीं स्वीकारिलें व त्यामुळें हें देवकार्य साधलें. असो. येथील बाजारामध्यें निजामाचें नाणें चालतें. मोठमोठ्या व्यवहारांत ब्रिटिशाही चालतें पण नाण्याची मोड मोंगलाईच्या नाण्यांच्या हिशेबानें चालते. येथें नवी गाडी करून मी

## जोगाईचें अंबे

या ठिकाणीं गेलों. अंबाबाईचें देऊळ जुन्या पद्धतीचें असून चांगलें


आहे. देवीची मूर्ती नाहीं, फक्त तोंडाचा मुखवटा आहे. माहूर प्रमाणेंच हाही प्रौढ व किंचित उग्र व सिंदूर चर्चित आहे. देशस्थांत हिचें फारसें महत्व नाहीं पण कोकणस्थांत हिचें बरेंच आहे. बऱ्याच कोकणस्थांच्या घराण्यांतील ही कुळस्वामीनी आहे सबब हिच्या दर्शनास व नवस वगैरे फेडण्यास हीच मंडळी फार येते. येथें येण्यास बार्शीलाइट रेलवेचें शेवटचें स्टेशन लातूर हेंच जवळ आहे. लातूरपासून सहा कोस हें जोगाईचें अंबे आहे. नवरात्रांत येथें विशेष उत्साह होतात. देवीची पूजा व अभिषेक कोणीही अवेळीं आल्यास जगदंबेच्या मोठ्या पितळी पादुका आहेत त्यांच्यावर होतो. येथें शंकरराव वकील ह्मणून कोकणस्थ सुखवस्तू गृहस्थ आहेत ते या देवीच्या व्यवस्थेचे पंच आहेत. कोकणस्थाचें घर हें एवढेंच आहे. कोकणस्थ लोक बहुतेक त्यांच्याचकडे उतरतात. त्यांचेकडे उतरल्यास ते ब्राह्मणामार्फत देवीची पूजाअर्चा व अभिषेक करवितात. या देवीला सरकारांतून उत्पन्न नाहीं सबब सर्व खर्च यात्रेकरूंवर चालतो असें ह्मणतात. या देवीचे उत्साह नवरात्रांत वगैरे होतात त्यावेळीं जे यात्रेकरू येतात व त्यांशिवाय पूर्वी जे आले असतील त्यांचे पत्ते सदर वकील लिहून घेतात व त्यांजकडे सदर उत्साह प्रसंगीं पत्रें पाठवून व ही देवी ज्यांची कुलस्वामिनी आहे त्यांचेकडून मदत मागवून, सदरहु उत्सव ते थाटाचे करतात. मी अकरा वाजतां या गांवीं पोंचलों. स्नान करून बारा वाजतां लगेच पूजेला गेलों त्यावेळीं देवीचा चौघडा चालू होता. यावरून चौघड्याला तरी कायमचेंच उत्पन्न असलें पाहिजे असें दिसतें. गांव व पेठ मोठी आहे. मुसलमानांनीं याला मोमिनाबाद असें नांव ठेविलें आहे. येथील ब्राह्मणाजवळ पूजाअर्चेसंबंधानें व देवब्राह्मणाबद्दल स्पष्ट ठराव करावा. गुळमुळीत राहूं नये नाहींतर अडवून पैसे घेतात. परभणी स्टेशनपासून लातूरपर्यंत सर्व प्रदेश वैराण मैदान आहे. जमिनींत एक खडा नाहीं यामुळें मनस्वी धुरळा

उडतो. जिकडेतिकडे कापूस, ऊंस, करडई वगैरेचीं पिकें तयार झालीं होतीं. मधून मधून हरणें, ससे, रोही वगैरे वन्य श्वापदांचे गोजीरवाणे कळप दृष्टीस पडत. त्यांच्या जलद गति व धांव संपल्या-वर सर्वांचें एकदम मुरडून मागें पाहणें व पुन्हां धांवणें वगैरे गोष्टी फार गोजीरवाण्या व आल्हादकारक दिसत व करमणूक होई. येथून पुढें लातूरला गेलों. येथें रेल्वे लागली. लातूर गांव फार मोठा आहे. निजाम हद्दींतला गल्ला, कापूस वगैरे येथूनच रवाना होतो. ही गाडी लहान असून लातूरपासून पंढरपुरापर्यंतच गेली आहे. या रेल्वेनें येडशी स्टेशनवर गेलों व तेथून

## तुळजापूर

जवळ आहे असें पाहून तेथें उतरलों. तेथून तुळजापुरापर्यंत सडक आहे. वाटेंत जेथें निजाम हद्द सरते व ब्रिटिश हद्द लागते तेथें सूचनार्थ खांब व पाट्या लावलेल्या आहेत. सोलापुरापासूनही तुळजापुरास जातां येतें आणि नुसतें ज्याला तुळजापुरासच जावयाचें असेल त्याला सोलापुरचाच मार्ग उत्तम आहे. सोलापूर येथें स्टेशनवर श्रीराम धर्म-शाळा व विठोबाचे देवळांतही धर्मशाळा आहेत. सर्वत्र खोल्या व पाण्याच्या सोयी आहेत तेथें उतरावें. येडशीपासून तुळजापुरापर्यंत टांगेही मिळतात पण भाडें फार सांगतात. टांगा परतीचा असला किंवा जरूर जावयाचा असला तर भाडें कमी पडतें. येडशीपासून धाराशीपर्यंत टांग्यांची रहदारी मोठी असते म्हणून तेथपर्यंत भाडें कमी पडतें पण पुढें गाडी मिळण्याची पंचाईत पडते. सबब येडशीपासून एकदमच जाण्यायेण्याच्या भाड्याची गाडी ठरविणें सोईचें असतें. गाड्या अगदीं वाईट व लहान असतात. त्यांच्या सांट्या विणलेल्याच नसतात. आंत कडबा घालून कसें तरी बसावयास करतात. यामुळें आपण सुटी वस्तू जोडा वगैरे ठेविल्यास

# श्री जगदंबा तुळजा भवानी.



तुळजापुर

स्वस्तिक वाचनालय,
पाडा - ठाणे.

पडण्याचा संभव असतो. धाराशीला मुसलमानांनीं उस्मानाबाद असें नांव ठेविलें आहे. मुसलमानांनीं व ख्रिश्चनांनीं त्यांच्या ताब्यांत आलेल्या माणसांचीं व स्थळांचीं अशींच नांवें बदलून ते त्यांच्या पूर्वेतिहासाचा मागमूसही राहूं देत नाहींत. धाराशी हा निजामाच्या राज्यांतील एक सुभा व कोर्टाची जागा आहे. याला स्टेशन येडशी आहे म्हणून येथपर्यंत तांग्याची रहदारी मोठी असते.

प्रवासांत मी बहुतेक स्वतंत्र गाडी करीत असें. पण या प्रवासांत एका मारवाड्यानें मला मुद्दाम सांगितलें कीं, माझ्या आईला व आजीला तुळजापुरास जावयाचें आहे, तुम्हीं त्यांच्याबरोबर जाल तर उपकार होतील. मींच गेलों असतों पण मला जाण्यास सवड नाहीं. तुम्ही ह्या आमच्या गाडींत गेल्यास दोघांस एक गाडी मिळून तुमचें थोडें भाडेंही वांचेल. मलाही दुसरी गाडी मिळेना म्हणून मी त्याच्या मुरवती-खातर हो ह्मटलें पण मला त्यामुळें फार त्रास झाला. या बायांबरोबर एक त्यांचा बारा वर्षांचा मुलगा होता, त्याचा एक जोडा रात्रीं गाडीं-तून वाटेंत कोठें तरी पडला व एक जवळ राहिला. आह्मी प्रातर्विधि करण्याकरतां तुळजापुरापासून दोन मैलांवर अलीकडे एक पाण्याचें कुंड आहे तेथें उतरलों असतां हें समजलें. तेथें प्रातर्विधि व स्नान करून उजाडतांच तुळजाभवानीच्या दर्शनास जाण्याचा आमचा विचार होता. गाड्यांचें हें अड्ड्यांचें ठिकाण आहे व सर्व यात्रा येथेंच उतरते. त्या जोड्याचा मी रीतीप्रमाणें पुष्कळ तपास केला पण गाडी भिकार असल्यामुळें रात्रीं तो कोठें पडला काय समजणार? आम्ही तपासास लागलों तों उजाडलें. गाडी रात्रभर चालत होती व मागाहून यात्रा येत होती, तेव्हां तो कोणी नेला असेल हें कसें समजणार? पण त्या बायांनीं त्याबद्दल आकांडतांडव केलें. मी म्हटलें, आठ बारा आण्यांचे जोड्याकरतां इतकें कशाला करतां? पण तें त्या ऐकतना. त्या ह्मणाल्या तुम्हांला काय होतें जोडा आमचा गेला.

बारा आणे मी देतों असें ह्मटलें, तरी त्या ऐकतना. त्या घरच्या चांगल्या श्रीमंत होत्या असें त्यांच्या बोलण्यावरून समजलें होतें. मुलगाही त्यांचा एकुलता एक नातू होता परंतु जोड्याकरतां त्यांनीं मुलाला वाटेल तशा शिव्या दिल्या, जोडा शोधण्याकरतां त्याला परत पाठविलें व जोडा घेऊन आलास नाहींस तर तोंड दाखवूं नको असें सांगितलें. मी ह्मटलें आह्मीं रस्ता फार चालून आलों आहों, यात्रेकरूंची रहदारी मोठी आहे तेव्हां जोडा कसा सांपडेल ? तरी त्यांनीं त्याला शिव्या देऊन परत पाठविलाच. मुलगा जोडा शोधण्यास गेला. आठ वाजले, नऊ वाजले, दहा वाजले तरी मुलाचा पत्ता नाहीं. सर्व गाडीवान व यात्रेकरू निघून गेले, तरी मुलगा दिसेना. झाडावर उंच चढून पाहिलें तरीही पत्ता लागेना ह्मणून मुलाच्या शोधाकरतां पुन्हा एक बाई गेली. तेव्हां यांच्या नादीं मी कोठला लागलों असें मला झालें. अगोदर कोणाच्या संगतीनें प्रवास करावयाचा नाहीं, केल्यास बायकांचे संगतीनें जावयाचें नाहीं, असा माझा ठराव असे. त्यांत या मारवाडी बायका पडल्या दिडकी करतां प्राण टाकावयाच्या ! तरी त्यांनीं शेवटीं मला व्यर्थ घोटाळ्यांत घातलेंच. बरें, माझ्या एकट्याकरतां गाडीवान निघेना कारण त्यांतली एक बाई अतिशय वृद्ध व पंगू होती. वाटेंत मजुरही मिळेना, नाहींतर त्याजजवळ ओझें देऊन मी निघालों असतों. मग तेथें एक तुळजापुरचा भोपी भेटला. हे भोपीं यात्रा आपलेकडे नेण्याकरतां ठिकठिकाणच्या पंड्यांप्रमाणें येथें या मुक्कामावर येत असतात. त्याला मी आपली सर्व हकीकत सांगितली. तेव्हां तो ह्मणाला, तुह्मी माझ्या बरोबर चला व तुमचा बोजा गाडींत असूं द्या, गाडीवान माझ्या ओळखीचा आहे व त्यास माझें घर माहीत आहे. तुमचें ओझें तो माझे घरीं नक्की आणून पोंचवील. या बायकांच्या नादीं तुह्मी लागूं नका. नंतर गाडीवानाची व त्याची रुजवात करून घेतली. त्यानें ओझें पोंचविण्याचें कबूल केलें व मी त्या भोप्याबरोबर

तुळजापुरास गेलों. नंतर संध्याकाळीं तीन वाजतां त्या बाया येऊन माझें पाकीट मला मिळालें. आल्याबरोबर त्यांस जोडा सांपडला काय ह्मणून विचारलें, तेव्हां तो आपण रात्रीं मुक्कामास होतो त्या ठिकाणापासून चार मैल पुढें ह्मणजे आतां गाडी उतरलेल्या ठिकाणापासून दहा मैल मागें सांपडला असें त्या ह्मणाल्या ! केवळ चार सहा आण्यांच्या वस्तूंकरतां त्या बाईनें व मुलानें उन्हातान्हाचे वीस मैल चालण्याचे श्रम घेतले याचें नांव मारवाडी ! ! सोबतीचा परिणाम कधीं कधीं असा होतो ह्मणून मी सोबतीनें कधीं प्रवास करीत नाहीं.

'एक रात्र प्रसंगेन काष्ठघंटा विटंबना'

या प्रमाणें झालें ! दुसऱ्या भागांत पुष्कळ बायकांबरोबर जाण्याचा प्रसंग आला त्यावरून कितीही कांटेतोल प्रमाणें वागलें किंवा घस सोसली तरी संगतीनें थोडें तरी तोंड वाजतेंच, निदान असंतोष होतो असा मला तरी अनुभव आला; मग कदाचित् हा माझ्या दैवयोगाचा गुण असेल.

श्रीभवानीचे पुजारी भोपे जातीचे शूद्र आहेत. त्यांचेकडे ब्राह्मणेतर यात्रा जाते पण ब्राह्मणांसही ते अवश्य बोलावतात. ब्राह्मण कुटुंब आलें तर त्यास जागा देऊन ते त्यांची सर्व व्यवस्था करतात. मजसारखा एकटा आला तर ब्राह्मणाची बाई स्वयंपाक करण्याकरतां बोलावून, ब्राह्मण, सवाशीण बोलावून तीर्थप्रसाद करतात पण दुसरे ब्राह्मणाकडे पाठवीत नाहींत. कारण ते आपले यात्रेकरूंना फितावितील व एवढा प्रयत्न केलेला फुकट जाईल. मग तीर्थाचे ब्राह्मणही त्याचें उट्टें तसेंच काढतात. एक ब्राह्मण जेवावयास बोलावला म्हणजे तो आपले घरचीं २।३ लहान लहान मुलें घेऊन येतो, सवाशीण बोलाविली म्हणजे ती आपले घरच्या २।३ लहान लहान मुली बरोबर आणते. स्वयंपाकास बाई येते ती तेथें न जेवतां आपले घरीं खुशाल ५।६ जाडजूड

पोळ्या व एक चुडकुलीभर तूप घेऊन जाते. अशा रीतीनें २।३ माणसांचें अन्न ती घेऊन जाते. म्हणजे भोप्यांना पाठीमागें कांहीं शिल्लक ठेवीत नाहींत. भोपी लोक आपल्या पदरचें फारच देतात, ते त्याचें उट्टें यात्रेकरूकडून काढितात! सारांश—

**"याचको याचकं, दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते"**

याप्रमाणें चाललेलें असतें. ब्राह्मणाकडे उतरण्यास गेलें म्हणजे तेथें ब्राह्मण, सवाशीण, कुमार, कुमारिका त्यांच्या घरचींच असतात!! यात्रेकरूच्या पंक्तीच्या वेळीं ते कांहींच जेवीत नाहींत. लवाड, खाणावळीप्रमाणें यात्रेकरूनें लवकरच आटपावें व दोन घांस कमी खावेत म्हणून आपणच लवकर आटपून शेवटचा भात आणणेंची घाई करितात! अशावेळीं आपणच जेवीत बसणें म्हणजे बरें दिसत नाहीं; पण अशा वेळीं लाज किंवा शिष्टाचार बाजूस ठेवून जशास तसें करून आपण प्रशस्तपणें मागून घेऊन तीर्थप्रसाद मनमुराद भक्षण करावा. कारण उपाध्येबुवांनीं हवें असेल तें मागून घ्या व स्वस्थपणें जेवा अशी प्रार्थना केलेली असतेच. वस्तुतः त्यावेळीं आपण यजमान असून त्यांस ब्राह्मण बोलाविलें असतें. पण त्यांस आग्रह केला असतां ते घेत नाहींत. याउपर आग्रहानें वाढविल्यास टाकून देतात व हात खोळंबून बसतात. पण अशानें त्यांचें अन्न फुकट जात नाहीं, तें त्यांच्या मुलांच्या उपयोगी पडतें. प्रत्येक ठिकाणीं प्रत्येक पात्रास दर भक्कम घेऊन सैंपाकीण बाईसुद्धां आकार घेतात व मग असा प्रकार करतात! पण आपण तिकडे लक्ष देऊं नये. ह्या त्यांच्या पैसे काढण्याच्या युक्त्या आहेत. देवीचा सर्व कारभार भोप्यांच्या मार्फत ओवळ्यानें चालत असल्यामुळें नैवेद्यही ओवळ्यानेंच नेतात. कारण सोवळ्यानें गर्दीमुळें नेतां येत नाहीं. जरी कदाचित प्रयत्नानें नेला तरी तो देवीला दाखविण्याचा आपल्याला अधिकार नाहीं. भोप्यांनींच दाखविला पाहिजे अशी रीत आहे. सत्रत्र

ते देवींकडे भोपेच घेऊन जातात. त्यापेक्षां आपण बरीं दाखवून त्यांच्या स्वाधीन करावा हें उत्तम.

देवीचें देऊळ खोलगट भागामध्यें आहे पण भोवताली जागा ऐसपैस व फार प्रशस्त आहे. देवीची मूर्ति शालिग्राम शिलेची कंबरेएवढी उंच असून ध्यान सुंदर आहे. ही सिंहवाहिनी आहे व हिला शेंदूर लावित नाहींत. दर्शन सकाळपासून अकरा बारा वाजेपर्यंत होतें. पुढें संध्याकाळीं ४।५ वाजल्यापासून रात्रीं ८।९ वाजेपर्यंत होतें. मी जर त्या गाडीवानाबरोबर आलों असतों तर माझा तो दिवस फुकट गेला असता. पण मी लवकर आल्यामुळें माझे देव ब्राह्मण, भगवतीचें दर्शन वगैरे यथास्थित झालें.

येथें लहान मोठ्या कवड्यांचे नानाप्रकारचे अलंकार करतात ते प्रेक्षणीय असतात. त्यांत गोंधळी लोकांच्या डोक्यावर घालण्याकरतां जो कवड्यांचा मुगूट करतात त्यांत त्यांचें फारच कौशल्य दिसून येतें. कवडीला भोंक न पाडतां ती दोरीमध्यें बटणासारखी गच्च कशी बसते—प्रयत्न केला असतांही ती निघत नाहीं इतकी गच्च कशी बसते याचेंच आश्चर्य वाटतें. ह्या नानाप्रकारच्या लहानमोठ्या कवड्या येथें येतात कशा म्हणून मीं भोप्यांस विचारिलें तेव्हां ते ह्मणाले आम्ही त्या मुंबईहून आणतों येथें होत नाहींत. देवळाच्या आवारांत शिरतांना तेथें एक गायमुखाचा झरा आहे, तो कोठून येतो हें समजत नाहीं. लोकांनीं तो लांबवर खणून पाहिला आहे तरी त्याचा अंत लागत नाहीं असें ह्मणतात. दुसऱ्या बाजूला एक मोठी प्रशस्त पुष्करणी आहे तिला कल्लोळतीर्थ ह्मणतात. याशिवाय दुसरीं तीर्थें आहेत पण उन्हाळ्यांत त्यांचें पाणी चांगलें राहात नाहीं. भगवतीच्या दर्शनाकरितां जगांतील सर्व तीर्थें तेथें वस्ती करून राहिलीं व त्यांचा गोंधळ झाला ह्मणून त्याला कल्लोळतीर्थ हें नांव मिळालें. सर्व तीर्थें, पुष्करण्या, गायमुखें, देऊळ व पटांगण हीं सर्व चिरेबंदी बांधिलेलीं आहेत. देवळाचे आवारांत देवीचे फोटो, कुंकू,

कवड्यांच्या नानाप्रकारच्या बनविलेल्या वस्तू व दुसऱ्या अनेक प्रासादिक वस्तूंचीं दुकानें बसलेलीं असतात. त्यांतून आपण जरूर त्या घ्याव्या. फोटो वाटण्याकरितां जास्त घ्यावे. हिचे फोटो चांगले उठत नाहींत. फोटोवरून दर्शन न घेतां समक्ष दर्शनाला आलें पाहिजे अशी देवीची इच्छा आहे असें भोपी सांगतात. माझा यात्राविधि झाल्यावर मी उतरलों होतों तो भोपी मजजवळ रीतीप्रमाणें लेख मागूं लागला. इतक्यांत एक ब्राह्मण खाकेंत वह्या घेऊन आला. त्याजकडे आमची वंशावळ मिळाली नाहीं पण कोकणांत आमचें जें मूळ गांव सोमेश्वर आहे तेथील फडक्यांची वंशावळ मिळाली. त्यांचा व आमचा संबंध आहे किंवा नाहीं हें समजलें नाहीं पण त्यामुळें त्या ब्राह्मणाबरोबर जाऊन त्यास दक्षणा देऊन त्याचा तीर्थप्रसाद घ्यावा लागला. तोही माझा लेख मागूं लागला पण भोप्याच्या व त्याच्या भांडणामुळें मीं तो कोणासच दिला नाहीं!

ही देवी ऐतिहासिक व पौराणिक दृष्टीनें फार प्रख्यात आहे. देवीच्या ३॥ पीठांपैकीं हें एक मुख्य पीठ आहे. श्रीशिवाजी महाराजांची ही कुलस्वामिनी होती व हिच्यावर त्यांची पूर्ण श्रद्धा होती. कोठेंही महत्कृत्यास किंवा संकटांत उडी घालावयाची असली म्हणजे प्रथम भवानीचें स्मरण केल्याशिवाय ते पाऊल टाकित नसत. जगदंबेनेंही त्यांस कधीं अंतर दिलें नाहीं. अफझुलखानाचा वध, औरंगजेबाच्या दरबारांत त्यांची कैद व सुटका यासारखीं अगदीं बिकट कामें त्यांच्या हातून हिच्याच प्रसादानें पार पडलीं. तिचें निरंतर स्मरण व चिंतन व्हावें म्हणून शिवाजीनें आपल्या तरवारीलाही भवानी हेंच नांव दिलें होतें. ती रात्रंदिवस त्यांचेपाशीं असे, अर्थात भवानीचें विस्मरण त्यांस कधींही झालें नाहीं. त्या तरवारींत देवी जागृत आहे अशीच त्यांची श्रद्धा होती व त्यामुळेंच आपलें रक्षण होतें अशी त्यांची पूर्ण भावना होती. ही तलवार त्यांना

स्वस्तिक वाचनालय,
– ठाणे.

# श्री विठ्ठल रखुमाई.



श्री क्षेत्र - पंढरपूर.

कशी मिळाली ही हकीगत चौथ्या भागांत येईल. शिवाजीनंतर पुढील राजांचा तो विश्वास कमी झाला, अर्थात त्यांचे यशाचें पारडेंही फिरलें. हल्लीं ही तलवार लंडनांत ब्रिटिश म्यूझियममध्यें ठेविली आहे असें ह्मणतात पण हें खरें नाहीं. कृष्णावतार संपल्यामुळें त्याचीं शंखचक्रगदापद्मादि आयुधें जशीं नाहींशीं झालीं त्याचप्रमाणें शिवाजीच्या तलवारीचें व वाघनखांचें झालें असा ऐतिहासिक पुरावा आहे. ब्रिटिश म्युझियमवाले सुद्धां हें शिवाजीचें खरें वाघनख नाहीं असेंच ह्मणतात. हा त्याचा नमुना आहे. वस्तुतः मारील त्याचीच तरवार आहे, नुपती तरवार काय करणार? ही देवी पुष्कळ घराण्यांतील कुलस्वामिनी आहे व तिचे नवस फेडण्याकरतां ते येथें येतात. ह्या देवीवर चारपांचशें भोप्यांच्या घराण्यांचा उदरनिर्वाह चालतो असें म्हणतात हिलासुद्धां मुसलमानांपासून फार उपद्रव झाला होता असें इतिहास सांगतो. हा गांव व पेठ मोठी आहे. येथून सोलापुरास जातां येतें पण गाडी परतभाड्याची केल्यामुळें व पुढें पंढरपुरास जावयाचें असल्यामुळें आह्मीं परत येडशी स्टेशनावरच आलों. वाटेंत बूट कोठें सांपडला तें ठिकाण मारवाड्याच्या मुलानें दाखविलें. गाड्या फार वाईट असतात. आमची गाडीही येतांना मोडली, तिचे दोर तुटले, गाडी उलटली व त्यांत एक ह्मातारी होती तिला थोडें लागलें, पण कसेबसे आह्मीं स्टेशनवर आलों! मारवाडणी पुन्हा लातूरला गेल्या व मी

## पंढरपूर

चें तिकीट काढलें. पण गाडीला गर्दी फार, सर्व लोक खचून भरून पुष्कळ उभे राहिले होते. शिवाय शंभर सवाशें उतारू शिल्लकही राहिले. तपास करतां सर्व स्टेशनवर अशीच गर्दी होती असें समजलें. कारण शंभू महादेवाचे यात्रेची ती वेळ होती. दोन दोन चार चार स्पेशली काढल्या तरी गर्दी कमी होईना जितकी मंडळी जाई त्याच्यापेक्षां पुष्कळ

जास्त मंडळी जमे. घांटावरच्या यात्राच फार जबरदस्त. लक्षावधी यात्रा जाणार त्याला ही छोटी गाडी काय पुरी पडते ? अखेरीस तिकीट बंद केलें व निम्मे यात्रा पायीं गेली ! सर्व स्पेशलींना मालाचे डबे लाविले होते. त्यांत पुष्कळ पुरुष, बायका व मुलें यांची चेंचाचेंच होत असे. डब्यांत दिवाबत्ती वगैरे कांहीं नाहीं. जागा करून देण्याबद्दल मी विनविलें पण त्यांचाही इलाज नव्हता. ते ह्मणाले जागा कायदेशीर असून कोणी विनाकारण अडविली असेल, तर मला सांगतां येईल. पण जेथें लोकच अनिवार आहेत तेथें आम्हांस कांहीं सांगतां येणार नाहीं. त्यांमध्यें तसेच घुसा ह्मणजे झालें, नाहींतर मागें रहाल. त्यादिवशीं चार स्पेशली गेल्या तरी मला जागा मिळाली नाहींच. दुसरे दिवशीं राहावयाचें म्हणजे प्रथम जेवावयाची सोय केली पाहिजे कारण स्टेशनावर कांहीं मिळत नाहीं. मग दुसरे दिवशीं जेवण करून गाडी आली त्यांतील एक दोन मनुष्यें उतरतांच त्या डब्यांत कसा तरी घुसलों. कांहीं वेळानें दुसरी मंडळी उतरतांच मला बसण्यास जागा मिळाली. यानंतर

## बार्शी

येथें भगवंताचे दर्शनास उतरावयाचें परंतु गाडीची व यात्रेची अशी स्थिति पाहून उतरलों नाहीं. बार्शीला सुमारें २०० मंडळी गाडींत बसण्याकरतां आली होती पण गार्डीनें एकाही मनुष्यास घेतलें नाहीं. दरवाजा उघडलाच नाहीं. बार्शीला द्वादशी क्षेत्र म्हणतात. अंबरीष राजाची कथा प्रसिद्धच आहे. त्याचें सत्व पहाण्यास त्याचेकडे द्वादशीस दुर्वास ऋषी आले. राजानें त्यांस भोजनास येण्याविषयीं विनंति केली व ते स्नानास नदीवर गेले. त्यांना येण्यास उशीर लागल्यामुळें पारण्याची वेळ निघून जाईल ह्मणून राजानें देवास नैवेद्य दाखवून तीर्थ घेऊन पारणें केलें. हें दुर्वासास अंतर्ज्ञानानें कळलें तेव्हां ते फार रागावले. दुर्वासाचे

रागाला क्षमा नाहीं. त्यांनीं आपल्या जटेंतून राजाचे नाशास कृत्या उत्पन्न केली पण श्रीकृष्णाच्या सुदर्शनानें त्याचें रक्षण केलें. त्या-कृत्येचा त्यानें नाश केला व तें सुदर्शन दुर्वासाचे पाठीस लाग-ल्यामुळें त्याच्या अंगाचा दाह होऊं लागला. त्याची शांती होण्याबद्दल ब्रह्मा, विष्णू, महेश यांच्याकडे तो प्रत्यक्ष गेला; परंतु अखेरीस त्याला या अंबरीषास शरण यावें लागलें. अंबरीष राजानें सुदर्शनाची प्रार्थना करतांच तें शांत झालें वगैरे कथा ज्या ठिकाणीं झाली तें हें द्वादशी क्षेत्र अंबरीषाची राजधानी होती. तेथें श्रीविष्णूचें देवालय आहे त्याला भगवान ह्मणतात. श्रीविष्णू, अंबरीष व दुर्वास यांचीं दर्शनें तेथें उतरून अवश्य घ्यावीं. त्यानंतर बार्शीरोड स्टेशनवर आलों. तेथें पुढें गेलेल्या सर्व स्पेशली उभ्या होत्या. त्यांतील मालाच्या डब्यांचे पत्रे दोनप्रहरीं बारा वाजले तेव्हां पूर्णपणें तापले. मनुष्यांची गर्दी भयंकर, हवा येण्यास दारें, खिडक्या नाहींत. असा गुदमरा होतो तरी पण लोक जाण्यास कमी करीत नाहींत. काय त्या विठोबावर त्यांची अचल श्रद्धा असेल ती असो व तो कधीं कोणास प्रसन्न होत असेल तो होवो. पण सध्यांतर त्याच्या भक्तांना ही भयंकर शिक्षा भोगावी लागत आहे! ह्या लाइनीवर उतारूंना चढण्यास व उतरण्यास प्लॅट-फॉर्म नाहींतच. एवढें मोठें बार्शीरोड स्टेशन पण तेथें सुद्धां प्लॅटफॉर्म नाहीं. मग सावलीकरतां छपरें कुठूनचीं असणार? सर्व लोक भर उन्हामध्यें तळमळत असतात. एक नाहीं म्हणावयाला पाण्याचा नळ मात्र आहे व तो मात्र मोठा व जोराचा आहे एवढें भाग्य विशेष आहे. इतकी गैरसोय आहे तरी गर्दी मुळींच कमी नाहीं. जसा एखादा मनुष्य तऱ्हे दिसावा त्याप्रमाणें सर्वच लोक वेडे झाल्यासारखेच दिसतात. गाडी चालू झाली ह्मणजे 'पुंडलीक वरदे हारि विठ्ठल!' असा नामघोष चालू होतो. जों जों पंढरपूर जवळ येत ... व... तसा या हरिनामाच्या गजराला ऊत येतो. पुढें चंद्रभागा व वाळवंटोतील देवळें दिसूं लागलीं

म्हणजे सगळी गाडीच विठ्ठलमय होते! स्टेशनवर पंडे आलेले असतात पण फार गर्दीपुढें त्यांचें कांहीं चालत नाहीं. गाड्या, तांगे आलेले असतात पण भयंकर यात्रेपुढें त्यांचें काय चालणार! मी गेलों तेव्हां यात्रेचे दिवस नव्हते पण सामान्य कोणत्याही महिन्याची दशमी, द्वादशी असली म्हणजे यात्रेची गर्दी असतेच. मी गेलों त्यानंतर कांहींएक यात्रा यावयाची होती तिची ही गर्दी होती व त्याच्या दुसऱ्या दिवशापासून म्युनिसिपालिटीचीं जकातीचीं नाकीं बसणार होतीं.

पंढरीला भूलोकींचें वैकुंठ म्हणतात तें अगदीं खरें आहे. यात्रा असो वा नसो जिकडे तिकडे सदा सर्वदा दिंड्या, पताका, टाळ, मृदंगाचा ध्वनी आणि हरिनामाचा गजर सुरू असतो व जिकडे तिकडे प्रेमानें भजन चाललेलें असतें यामुळें येथें दुसरी वृत्तीच उत्पन्न होत नाहीं. चंद्रभागेच्या वाळवंटांत सकाळीं पहावें तों कोणी स्नान करीत आहेत, कोणी देवदर्शनें घेत आहेत, भिकाऱ्यांनीं धोंड-भट्टीकरून आपलीं धोतरें भिक्षेकरितां पसरलीं आहेत, त्यावर कोणी दिडकी पै, तांदुळाचे, बाजरीचे दाणे किंवा चणे फुटाणे टाकले आहेत, ठिकठिकाणीं वाळवंटांत मोठमोठे स्त्रीपुरुषांचे जमाव जमून कीर्तनें सुरू आहेत असें आढळून येतें. सर्व समाजांत ब्राह्मणेतर मंडळीच फार. बुवा सुद्धां इतर जातींपैकीं असून त्यांचा पोषाख तुकाराम वगैरे संत मंडळीसारखा असतो. कीर्तनांत बुवा मध्यें उभे राहातात. एका बाजूला सर्व टाळ व झांजवाले असतात व दुसरे बाजूस सर्व मृदंगवाले गळ्यांत मृदंग बांधून उभे असतात. कथा तुकाराम, ज्ञानदेव, नामदेव वगैरे संतांच्या अभंगवाणीची चाललेली असते. निरूपण यथातथाच असतें पण एकसारखे अभंग व विठ्ठल रखुमाईच्या नांवाचा गजर क्षणोक्षणीं चाललेलाच असतो. अर्थविवरण किंवा खुलासा फारच थोडा. अशा कथा सर्व वाळवंटभर चाललेल्याच असतात. बुवापुरतें मात्र छप्पर व बैठक, बाकी सर्व मंडळी वाळूंत

उघड्यावर बसलेली असते. वर ऊन लागत असतें तरी त्यांची एक-तानता जातच नाहीं. समाजांत स्त्री पुरुष भाव नाहीं. हवी तेवढी मंडळी येत असते व जातही असते पण सर्व जागा भरलेली असते. बाजारांत जावें तों जिकडे तिकडे लाह्या, फुटाणे, बुक्का, कुंकू, उदबत्ती, कापूर यांच्या राशींच्या राशी मांडलेल्या असतात. फुलांच्या माळा, तुळशींच्या माळा व तुळशीकाष्टांच्या मण्यांच्या माळा जिकडे तिकडे विशेषत: देवळाजवळच्या दुकानीं तर फारच लटकलेल्या असतात. खुद्द श्रीविठ्ठल मंदिरांत दिवसा केव्हांही जा, गर्दी आहेच. देवळाच्या सभामंडपाचें काम आतां नवीन झालें आहे तें फार चांगलें झालें आहे. आतां रखुमाईच्याही सभामंडपाचें काम चाललें आहे. लांकूड कामच आहे पण खांब व बहालें फार मोठीं व भव्य आहेत.

हें विठोबाचें देऊळ प्रथम चांगदेवांनीं बांधलें असें ह्मणतात. श्रीविठ्ठलाची मूर्ति मूळ नग्न आहे असें ह्मणतात पण तें खरें नाहीं. तिच्या नग्नपणावरून ती बौद्धांची असावी असें कोणी मानतात; परंतु आद्य जगद्गुरू श्रीशंकराचार्य हे त्या ठिकाणीं गेले होते व त्यांनीं दर्शन घेऊन पांडुरंगाष्टक केलेलें प्रसिद्ध आहे. या मूर्तीच्या मस्तकावर शिवलिंग आहे. यात्रेच्या गर्दींत कोणी दुष्टानें दगड मारून विठोबाचा पायही मोडला आहे असें ह्मणतात. मूर्ति अनादि आसल्यामुळें पूर्ववत् डकवून अनादिक्रम चालवण्यास बाध नाहीं असें विद्वानांनीं ठरविल्यामुळें तें तसेंच चाललें आहे. आतां दगडानेंच पाय मोडला असेल असें वाटत नाहीं पण ही मूर्तीही कितीक वेळां उचलून दुसरीकडे नेली असून तिची येथें वारंवार स्थापना केली आहे. ह्यामुळें मूर्ति काढतांना व बसवतांना पाय मोडला असेल. असें जरी आहे तरी भगवद्भक्तांची पूज्यबुद्धि या मूर्तीविषयीं लेशभरही कमी झाली नाहीं व ती तुकारामाचे अभंगाप्रमाणेंच जगामध्यें अभंग राहाणार आहे असें स्पष्ट दिसतें.

पंढरपूरच्या जुन्या भागांत काशीसारखे रस्ते फरसबंदीचे व अगदीं लहान गल्ल्यांसारखे आहेत, त्यांतून गाड्या चालत नाहींत. या भागाच्या बाहेर गाड्या उभ्या राहातात. स्टेशनपासून गांव सुमारें एक मैल लांब आहे. सडक चांगली प्रशस्त आहे. पंढरपूर शहर आतां फार वाढलें आहे. नवीन वस्तीमध्यें रस्ते प्रशस्त ठेविले आहेत. मोठमोठ्या राजेरजवाड्यांनीं, श्रीमंतांनीं आपल्या जातीकरतां, स्वत:करतां व सर्व लोकांच्या उपयोगाकरितां अशा मोठमोठ्या धर्मशाळा बांधलेल्या आहेत. गुजराथी, कानडी व भाटे यांच्या धर्मशाळा फार प्रशस्त आहेत. जुनीं घरें मात्र चमत्कारिक आहेत. आतां यात्रेकरूंकरतां सरकार फार मोठ्या प्रमाणावर धर्मशाळा बांधीत आहे. त्या बांधून झाल्या ह्मणजे कोणालाही पंड्याकडे उतरतां यावयाचें नाहीं. यात्रेकरूनें धर्मशाळेंतच उतरलें पाहिजे अशी सक्ति होईल. यात्रेंत पटकी सुरू होऊन पंढरपूर बिघडतें तें न बिघडावें ह्मणून ही योजना आहे. गांवांत जिकडे तिकडे पाण्याची विपुलता आहे. येथें कुंकू व बुक्का दळण्याच्या मोठमोठ्या गिरण्या आहेत ! जिकडे तिकडे सुगंध सुटलेला असतो. येथील मुख्य प्रसाद कुंकू, बुक्का, लाह्या, खण व बांगड्या हाच आहे. या वस्तूंचा येथें अतिशय खप होतो यामुळें ह्या वस्तू येथें चांगल्या होत असून स्वस्तही मिळतात.

एकंदर पंढरपुरचा देखावा पाहिला ह्मणजे जुन्या संत मंडळींनीं पंढरीला खरोखर वैकुंठ बनविलें आहे. हरिनामाच्या गजराशिवाय येथें कांहीं नाहीं. ही परंपरा अद्याप येथें चालू आहे व पुढें ती अशीच चालू राहाणार असें दिसतें. खरोखर पंढरींतून विठोबा व चंद्रभागा गेली तर पंढरपुरांत कांहीं राहाणार नाहीं. येथील लोकांना श्रीविठ्ठलाशिवाय दुसरा कांहीं धंदा नाहीं. सर्व महाराष्ट्रांतील वऱ्हाडांतील, नागपुराकडील व जेथें जेथें मराठी भाषा चालते व तुकाराम, ज्ञानदेव वगैरे संतांच्या अभंगांची प्रसिद्धी आहे तेथील

यात्रेकरू येऊन आपला पैसा रात्रंदिवस येथें पाण्यासारखा ओततात त्यावर ही पंढरी व तेथील गिरण्यां हीं चाललेलीं आहेत. रेल्वेमुळें गुजराथेंतून व कर्नाटकांतूनही आतां यात्रा अलोट येऊं लागली आहे. मूळ विठोबा कर्नाटकांतलाच आहे. मूळ विठ्ठल शब्द कानडी भाषेंतलाच आहे.

॥ विठोबाला भेटावें, रंग शिळेवर नाचावें ॥

असें म्हणतात तें खरें आहे. भाविकांनीं एकदां तरी ह्या रंगशिळेवर नाचून यावें ह्मणजे संतांच्या महिम्याचा मनावर काय परिणाम होतो तें कळेल. सर्व यात्राविधि झाल्यावर ह्या रंगशिळेवर नाचावें लागतें. ही सभा-मंडपामध्यें कासवाच्या पाठीसारखी वाटोळी व मोठी प्रशस्त आहे. रंगशिळा म्हणजे रंगविलेली शिळा असा अर्थ नाहीं, तर पूर्ण भक्तीनें मनरंजन किंवा तल्लीन करणारी शिळा असा अर्थ घ्यावयाचा. 'पंढरपूरला कॉलरा आहे यात्रा बंद' अशा सरकारी जाहि-राती आषाढीला लागतात. रेल्वे स्पेशल गाड्या सोडीत नाहीं व नेहमींच्या गाड्यांना सुद्धां पंढरपुरचीं तिकिटें बंद करते. मिशनरी लोक आपल्या धर्माचा कीर्तनद्वारा मिशनरी अभंग म्हणून व नाना प्रकारें यात्रेच्या प्रसंगीं उपदेश करतात कीं, अरे हा कसला देव? दगड आहे दगड! खरा देव आकाशांतला आहे त्याला भजायचें सोडून या दगडाला काय भजतां!! हा काय तुम्हांला तारणार!!! लांबचे मनुष्य शक्य तितकीं पंढरपरच्या आसपासचीं तिकिटें काढून तेथें उतरून पायीं जातात. ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्या पालख्या तर पायींच जातात. अशा रीतीनें यात्रा फार जमते तरी मिशनरी लोकांच्या उपदेशाचा एकावरही परिणाम होत नाहीं, एकही मनुष्य बाटत नाहीं व यात्रा लेशही कमी होत नाहीं. काय त्या विठोबाच्या आकर्षणाचा परिणाम आहे पहा! या संत मंडळींत कांहीं दिवस वास करावा व यांच्या प्रमाणेंच तुळशीकाष्ठांच्या माळा व बुक्का फांसून लाजलज्जा वगैरे न धरतां आपण मनमुराद त्यांच्याबरोबर नाचावें व

देहाचें व मनाचें सार्थक करावें असें माझ्याही मनांत आलें पण तसें करण्यास वेळ नव्हता. इतकी एकतानता येथें उत्पन्न होते. परमेश्वर भक्तींत मन रमून एकतानता कशी उत्पन्न होते याचा दृक्प्रत्यय येथें येऊन, भक्तियोग हा ज्ञानयोगापेक्षां कसा सोपा व खरा परिणामकारक आहे हें चटकन लक्षांत येतें. आतां जाणारांनीं ही गोष्ट लक्षांत घेऊन सवड असेल तेव्हां त्या गोष्टीचा फायदा घ्यावा.

विठोबाचे दिवसांतून कित्येकवेळां बदलणारे पोषाक, पूजा अर्चा, राजभोग, सुखसोहाळे, पहाटे काकडारतीपासून रात्रीं शेजारतीपर्यंत त्याचीं दर्शनें, लोकांची श्रद्धा व उत्सुकता पाहून आपलें देहभान जातें व मन तल्लीन होतें. कितीही दु:खी तेथें जावो त्याच्या देहाचाच त्याला विसर पडतो मग सुखदु:खाची आठवण कसली! ही नेहमींची गोष्ट झाली परंतु कांहीं सण किंवा यात्रेचा दिवस असला ह्मणजे कांहीं विचारूं नये. आषाढी एकादशीस देवाचें दर्शन देखील होत नाहीं. पहाटेस दर्शनाकारितां गेलें तर आपला नंबर रात्रीं नऊ वाजतां येतो असें ह्मणतात! इतकी लक्षावधी यात्रा जमते. ह्या देवळाची व्यवस्था पूर्वीं बडव्यांच्या स्वाधीन होती पण त्यांच्या भांडणामुळें ती आतां सरकारच्या ताब्यांत गेली आहे. यामुळें आतां दर्शनाचें व इतर बाबतींचें फारसें लेलांव होत नाहीं व व्यवस्थाही बरी असते. खुद्द विठोबाचें देऊळ व गाभारा फार लहान आहे. तेथें दर्शनाकरतां गर्दीमुळें अर्धा तास लागतो. इतका वेळ हवा न मिळाल्यामुळें जीव गुदमरतो यामुळें बाहेरील स्वच्छ हवा पंपानें आंत सोडण्याची यात्रेच्या वेळीं व्यवस्था करतात.

अखेरीस चंद्रभागेच्या देखाव्याचें, तेथील अति विस्तृत पटांगणाचें व तेथून जवळच असणाऱ्या गोपाळपुऱ्याचें दर्शन घेऊन मी परत स्टेशनवर आलों. एक तास अगोदर आलों होतों तेव्हां पराकाष्टेनें गाडींत उभें राहाण्यास जागा मिळाली. पंढरपुराहून निघण्यापूर्वीं

निरानरसिंगपुरास जाऊन यावें. हें निरा नदीचें कांठीं आहे ह्मणून याला निरानरसिंगपूर असें ह्मणतात. नरसिंह अवतार संपूर्ण झाल्यावर भगवान भक्ताकरितां येथें येऊन राहिले अशी कथा आहे. हें अद्याप जागृत स्थान आहे. नंतर पुन्हां पंढरपुरावरून बार्शी रोडवरून मी

# गाणगापूर

येथें आलों. गाणगापूर स्टेशनपासून गांव सहा सात मैल लांब आहे व सडक नाहीं. आगगाडी सकाळीं स्टेशनवर येते. नंतर शौचाविधि करून बैलगाड्या ठरवाव्या लागतात. या गाड्यासुद्धां चांगल्या नसतात. रस्ता वाईट असून सडक थोडी आहे, नाहीं ह्मटलें तरी चालेल. रस्ता माळावरून आहे म्हणून धुरळा फार मनस्वी उडतो. गाडीवानाची न्याहारी वगैरे झाली म्हणजे गाड्या निघून गाणगापुरास पोंचण्यास सुमारें बारा वाजतात. ह्या गाड्या येईपर्यंत पुजारी देवळांतच असतात. सर्व गाड्या आल्यावर पुजारी मंडळी एकत्र जमते व कोण कोणाचा यजमान वगैरे ठरल्यावर यात्रा जिकडल्या तिकडे जाते. उपाद्धया कोणीच ठरला नाहीं तर नवीन उपाद्धया करतात. येथेंही उपाध्ये-बुवांकडे यात्रा उतरण्यास जागा केलेल्या असतात. येथें कांहीं उपाध्ये कानडी तेलंगी आहेत, तरीपण त्यांना मराठी साधारणपणें येतें. त्यांच्या चालीरीती थोड्या भिन्न आहेत. बिऱ्हाडांत बोचकें ठेवून देवळांत गेल्यावर प्रथम दर्शनींच दत्ताची मनोहर तसबीर ऑईल पेंटिंगनें काढलेली दृष्टीस पडते. ही तसबीर पाहिल्याबरोबर तहान, भूक व श्रम नाहींतसे होतात इतकी ती सुंदर आहे आणि स्थानमाहात्म्यामुळें तिच्या आंगीं दिव्य तेज आलें आहे. असें ध्यान आजपर्यंत मला कोठेंही पहावयास सांपडलें नाहीं. रंगविणारानें आपलें नांव खालीं घातलें आहे. गायकवाड पेंटर सोलापूर अशीं तीं अक्षरें आहेत. फोटो चांगला पांच फूट लांब व चार फूट रुंद असा आहे, त्याचें मनमुराद

दर्शन घेतलें. इतकेंच नव्हे तर फावल्या वेळामध्यें मी याच फोटोकडे पाहात असें. यामुळें ही मूर्ति माझ्या हृदयांत राहिली आहे.

बिऱ्हाड लागल्यावर गांवानजीकच भीमा नदी वाहात आहे तिच्यावर स्नानास जावें. स्नान करून आल्यावर दुरूनच दत्तपादुकांचें व चांदीच्या तीन मुखवट्यांचें दर्शन होतें. ही वेळ बहुधा माध्यान्ह पूजेची असते. ब्रह्मा, विष्णू, महेश असे तीन सारख्या स्वरूपाचे मुखवटे पादुकांवर ठेविलेले असतात. मुख्य पूजा पादुकांची असते ती पहाटे चार वाजतां कडकडीत सोंवळ्यानें पंचामृती स्नानानें व रुद्राभिषेकानें होते. नंतर पादुकांवर हे मुखवटे घालतात ते दिवसांत पुन्हा काढीतच नाहींत. पादुका गुहेसारख्या आंतल्या भागांत आहेत, त्यांचे दर्शन बाहेरून एका गवाक्षांतून होतें. आंत उजेड नाहीं व हवाही येण्याचें साधन नाहीं. आंत फक्त एक मनुष्यच बसण्याइतकी जागा आहे त्यांत पुजारी व पूजासाहित्य याशिवाय दुसरें कांहीं नसतें. बाकीची मंडळी बाहेर बसतात. नरसोबाचे वाडीप्रमाणेंच हें देवस्थान फार कडकडीत आहे. भूतपिशाच्याची बाधा सुद्धां येथें जाते; त्याप्रमाणें महाव्याधीनें पीडलेले व कुष्ठी सुद्धां सर्व मानुषप्रयत्न करून थकल्यानंतर श्रींच्या अनुग्रहाकरितां येथें येऊन राहिलेले असतात. मनुष्य श्रीमंत असो अथवा गरीब असो, त्यानें आत्मशुद्धयर्थ व श्रींच्या अनुग्रहाकरितां भिक्षेच्या अन्नावरच राहिलें पाहिजे भीमेचें स्नान, गुरुपादुकांचें दर्शन, श्रींचें ध्यान व भिक्षेचा प्रसाद याप्रमाणें श्रींचा अनुग्रह होईपर्यंत करावें लागतें. नंतर श्रींचा जसा अनुग्रह होईल त्याप्रमाणें करावयाचें असतें. काम्यकर्माकरितां किंवा ऐहिक सुखाकरितां सुद्धां श्रींचा प्रसाद मागतां येतो. गुरुचरित्रांत भक्तांनीं अशीं ऐहिक सुखेंच गुरुपासून मागून घेतलीं आहेत.

येथून नदीकांठानें दोन मैलांवर भीमा व अमरजा यांचा संगम झाला आहे तेथें औदुंबराचे झाडाखालीं श्रीगुरु बहुधा जाऊन बसत

असें गुरुचरित्रांत सांगितलें आहे. तेथेंही असेंच देवालय, गुरूंच्या पादुका व त्यांवर चांदीचे मुखवटे आहेत व तेथेंही चारी प्रहर पूजा होते. अमरजेला उन्हाळ्यांत पाणी नसतें. तरी संगमावर पुष्कळ लोक आत्महिताकरतां, देहशुद्धीकरितां किंवा इष्टकामनासिद्ध्यर्थ अनुष्ठानें व तपश्चर्या करीत बसतात. सर्व लोकांना श्रीगुरूच्या कृपाप्रसादानें इष्टकामनासिद्धि व अनुग्रह प्राप्त होऊन ते संतुष्ट होऊन जातात. विन्मुख होऊन बहुधा कोणीही जात नाहीं. जितका दृढनिश्चय तितकें लवकर फळ मिळतें. होण्यासारखें नसल्यास तसा दृष्टांत होतो. बाकी श्रीगुरुकृपेला असाध्य असें कांहीं नाहीं; परंतु या जन्मीं तें त्याच्या दैवानें मिळण्यासारखें नसल्यास क्वचित् तसाही प्रसंग येतो. आपल्या इष्टसिद्ध्यर्थ मनुष्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले ह्मणजेच मनुष्यास ईश्वराची आठवण होते व त्यानें सिद्धी झाली म्हणजेच तो कायमचा ईश्वरपरायण होतो, ही ईश्वरत्वाचीच साक्ष आहे.

येथें श्रीगुरुचरित्रांत सांगितलेलीं सर्व स्थानें आहेत. कुष्ठी तारिला, वंध्या वृद्धेला पुत्र प्राप्ति झाली, रजकाला चक्रवर्ती केले, एका शूद्राचे शेतांत अलोट पीक दिलें तें शेत, वगैरे दाखवितात. देवाचा खर्च यात्रेच्या उत्पन्नावर व सार्वजनिक देणगीवरच चालतो. खर्च मोठा आहे अर्थात त्याला मोठ्या देणग्यांचें उत्पन्नही आहे. ही श्रींच्या कृपाप्रसादाची साक्ष आहे. गांव अगदीं लहान असून देवळाभोंवतीं ब्राह्मणवस्ती आहे व पडवीवजा धर्मशाळाही आहेत. यात्रा आली ह्मणजे कसातरी निर्वाह होतो. मागें जो संगम सांगितला त्या संगमावर एक टेकडी आहे. ती सर्व भस्माची आहे. त्यांतील भस्म यात्रेकरू येथील मुख्य प्रसाद म्हणून घेतात. पूर्वीच्या ऋषींनीं ब्रह्मदेवाकडून येथें मोठे यज्ञ करविले होते त्यांच्या भस्माचा हा डोंगर आहे. यावर कालांतरानें आतां माती पडून त्यावर झाडेंही रुजलीं आहेत;

पण थोडेंसें खणतांच भस्म मिळतें. हें भस्म व पांढरी माती जवळ जवळ सारखींच आहेत. तेव्हां त्याचें रासायनिकरित्या पृथक्करण करून ती माती नसून भस्मच आहे असें ठरल्यास ही गोष्ट विशेष आश्चर्याची आहे. प्राचीन ऋषिकाल म्हणजे बौद्ध व जैनांच्या पूर्वीचा काळ, अर्थात् तो निदान चार पांच हजार वर्षांपूर्वीचा आहे. राखाडीच्या धर्माप्रमाणें आणि इतक्या वर्षांच्या वाऱ्या पावसामुळें व लोकांच्या नेण्यानें त्याचा केव्हांच नाश व्हावयाचा. पण तो अद्याप टेंकडीच्या स्वरूपांत आहे यावरून या ठिकाणीं प्राचीन यज्ञ फार मोठ्या प्रमाणांत झाले असले पाहिजेत असें दिसतें. या भस्माशिवाय श्रींचें गंधानुलेपन व प्रसादाच्या चांदीच्या पादुका ह्याही येथें मिळतात. ह्या पादुका सोनाराजवळून आणल्यानंतर श्रींच्या पादुकांच्या ठिकाणीं ठेवून त्यांची पूजा अभिषेक वगैरे करून यथाविधि त्यांस पवित्रता आल्यावर श्रींचें गंधानुलेपनासुद्धां त्या यात्रेकरूस देतात.

हा गांव निजामाच्या राज्यांत आहे. येथील भाषा कानडी व दुरंगी आहे पण त्यांना मराठीहा कसें तरी समजतें. येथें पोळया वा भाकरी करण्याची नित्य चाल असल्यामुळें ह्मणजे तो तेथील बाध्य आहारच असल्यामुळें, पोळ्या पोळपाटावर किंवा भाकरी पितसतीत न करतां पोळपाटासारखा एक दगडच कायम करून तो चुलीशेजारीं जमिनींत जरा उंच असा पुरतात व त्यावर पोळ्या किंवा भाकऱ्या करतात! दर गुरुवारीं दत्ताच्या पालखीचा देखावा प्रेक्षणीय असतो. याशिवाय दत्तजयंतीला येथील सोहळा फारच अवलोकनीय असतो. माघ व श्रावण मासांतही उत्साह विशेष थाटाचे होतात. असो. श्रीब्रह्मदेवाच्या यज्ञानें पवित्र झालेल्या व गुरुपादुकांनीं पुनीत झालेल्या पुण्यभूमीचा कांहीं काळ मला सहवास घडला व गुरुपादुकांचें दर्शन व तीर्थप्रसाद मिळाला याबद्दल मला धन्यता वाटली.

देवब्राह्मण केल्यानंतर श्रीगुरूंची आज्ञा घेऊन मी गाणगापूर

स्टेशनवर आलों. गाडीवानानें गाडींतून पाकीट प्लॅटफार्मवर आणून ठेविलें व त्यांचें मीं भाडें दिलें. आंगांतले कपडे काढून व शिरस्त्या-प्रमाणें त्यावर घोंगडी झांकण घालून ठेविली हें फक्त त्या गाडीवा-नानेंच पाहिलें होतें. कारण भाडें दिल्यावर गाडीवान पोलिसाजवळ स्टेशनवर विड्या ओढीत गप्पा सांगत बसला होता. वेळ संध्या-काळची असल्यामुळें पाय धुवून, संध्या करावी व फराळ करून, पाणी घ्यावें ह्मणून मी जवळ कोणी नाहीं असें पाहून पाण्याला गेलों. पाणी स्टेशनवर नव्हतें ह्मणून स्टेशनच्या बाहेर विहीर होती तेथें पाण्याला गेलों व हात पाय धुऊन तांब्या भरून आणला व बोचकें पाहातों तों त्यांत सदरा व डोकीचा फेटा नाहीं! पण दुसरें कांहीं गेलें नाहीं हें भाग्य. नवा फेटा व सदरा काढून काम चालू केलें. ह्या वस्तू त्या गाडीवानानेंच नेल्या असा अंदाज लागला पण त्याला सोधावयाचा कोठें? आणि सांपडला तरी तो कबूल कशाचा येणार? त्यानें तरी पाहिलें कीं हलकी चोरी पचेल भारी पचणार नाहीं. पाकीट जड होतें व ह्या कोटासारखा कोट त्याला मिळणार नाहीं असें पाहून त्यानें आपल्या योग्यतेप्रमाणें चोरी केली. वेळ रात्रीची असल्यामुळें मी फारशा भानगडींत पडलों नाहीं. एकदां पोलीसला विचारलें व तुमचेजवळ विडी ओढीत बसलेला मनुष्य कोठें गेला असा तपास केला परंतु कांहीं तपास लागला नाहीं. कांहीं असो, 'जिवावरचें शेपटावर गेलें असेंच ह्मणावयाचें' दुसरें काय!

गाणगापूरला ब्रिटिश पोष्ट दुधनी, जिल्हा सोलापूर हें आहे. येथील उपाध्यांच्या मुख्य मुख्य वर्तमानपत्रांमध्यें सर्वाभिष्टकर व अत्यंत मंगलप्रद अशा श्रींच्या रौप्य पादुका व गंधानुलेपन प्रसाद व्ही. पी. नें पाठवूं अशा जाहिराती असतात, त्यांतसुद्धां पोष्ट दुधनी असें लिहिलें पाहिजे. गाणगापूर लिहून उपयोगी नाहीं. येथून पुढें कृष्णा स्टेशनवरून मल्लिकार्जुनास जाण्याचा माझा बेत होता पण

तेथें महाशिवरात्रीशिवाय इंग्रज सरकारचा बंदोबस्त नसतो. वाटेंत भिल्ल, रामोशी व दरोडेखोरांची वस्ती असून जंगल फार, रस्ता डोंगराळ व अवघड आहे. यावेळीं व या मार्गानें यात्रेकरू सुखरूपपणें जाऊन परत येणें अशक्य, असें बहुतेकांचें मत पडलें. शिवाय त्या भागाला तैलंगी भाषा यामुळें कोठें विचारण्याचीही सोय नाहीं ह्मणून तो बेत रहित केला. शिवाय या मार्गापेक्षां मल्लिकार्जुनास नंद्याळ स्टेशनवरून चांगला मार्ग आहे. रायचूरपासून गुंटकल जंक्शनवरून बेझवाड्याकडे जो रस्ता जातो त्याच्यामध्यें नंद्याळकडे जाण्याचा ह्या फांटा फुटतो. नंद्याळला उतरून पुढें आत्मकूर जिल्ह्याचें ठिकाण लागतें. तेथून ३२ कोसांवर श्रीशैल्य पर्वतावर मल्लिकार्जुन स्थान आहे. इकडील तेलंगी यात्रेकरू त्याला श्रीशैल्यच ह्मणतात. या मिळालेल्या माहितीवरून आतां तेथें जाण्यामध्यें पैसा जास्त खर्च होऊन दिवस फार लागणार, शिवाय देहाचासुद्धां भरंवसा राहाणार नाहीं सबब निरुपायानें हा नाद सोडून दिला. श्रीशैल्यपर्वत हें पूर्वघाटाचें एक शिखर आहे व तें अत्यंत रमणीय आहे. या पर्वताच्या जवळून पाताळगंगा गेली आहे. कृष्णा नदी त्या पर्वताच्या पडद्यांतून उंच उंच कड्यांमधून गेली आहे व हिलाच तेथें पाताळ गंगा ह्मणतात. यामुळें कृष्णेची प्रदक्षिणा करणेस जड जातें आणि ती कोणी फारशी करीतही नाहींत. ही यात्रा पर्वताच्या ह्या गिरिकंदरांत शिरून नदीच्या कांठानें भयंकर कडे व अंधारांतील दरे चढून अविश्रांत श्रम करून सूर्यास्तापूर्वी नदीच्या डोंगराच्या पलीकडच्या टोंकाला गेलें पाहिजे. हें काम एकदोघांचें नसून पुष्कळ मंडळी व माहितगार मनुष्य पाहिजे तरच कदाचित् हें काम होतें. असें जातांना व येतांना करावें लागतें. आंत नदीची काय स्थिती असेल, निरनिराळ्या हिंसकप्राणीमात्रांची किती वस्ती असेल हें सांगतां येत नाहीं. होडी घेऊन जरी गेलें तरी पाण्यांत भोंवरे, खडकांचे उंचनीच भाग खालींवर आलेले असे अस-

तील, नाहीं कोणी ह्मणावें? यामुळें जिवाची पर्वा न बाळगणारे तपस्वीसुद्धां या नादीं लागत नाहींत मग साध्या मनुष्याची काय कथा? नर्मदेची प्रदक्षिणा करण्याचीं साधनें मात्र त्या त्या ठिकाणच्या श्रीमंत मनुष्यांनीं करून ठेविलीं आहेत व ठिकाठिकाणचे मुक्काम व आश्रयाच्या जागा व शिधापाणी मिळण्याची व्यवस्था तेथें केली आहे. यामुळें पुष्कळ साधुसंत ती प्रदक्षिणा करतात. मल्लिकार्जुनाच्या यात्रेचें वर्णन सोईकरितां पुढें दिलें आहे.

यानंतर मी परत हुडगी जंक्शन मार्गानें पुरातन व इतिहास प्रसिद्ध अशा

## विजापूर

राजधानींत आलों. विजापूर हें शहर मुसलमानांच्या आदिलशाहीची राजधानी होती. हें दक्षिणेंतील मुसलमानी बहामनी राजे हिंदूंशीं फार सभ्यत्वानें वागत. इतकेंच नव्हे तर त्यांचा हिंदूंशीं शरीरसंबंधही होत असे. सातव्या बहामनी राजाचा शरीरसंबंध विजयानगरच्या घराण्याशीं जडला होता. तसेंच नवव्या राजानें सोमखेडच्या राजाच्या मुलीशीं लग्न लाविलें होतें. विजापूरचा पहिला राजा युसफ आदिलशहा यानें मुकुंदराव नांवाच्या ब्राह्मण गृहस्थाच्या मुलीशीं लग्न लाविलें होतें आणि तिचेच मुलगे पुढें तेथल्या गादीवर बसले! तसेंच बेदरच्या पहिल्या मुसलमान राजानें साबाजी या मराठ्याच्या मुलीशीं लग्न लाविलें होतें. ह्या अशा एकीमुळें त्यावेळीं बरेच हिंदूही मुसळमान झाले होते! अहमदनगरचा पहिला मुसलमान राजा हा मुसलमान झालेल्या ब्राह्मणाचा मुलगा होता. वऱ्हाडच्या इमादशाही राजकुलाचा मूळ पुरुष ब्राह्मणाचाच मुलगा होता. बेदरच्या बुरीदशाही कुलाच्या पहिल्या राजावर हिंदूंची एवढी भक्ति बसली होती कीं, चारशें मराठे त्याकरितां एकदम मुसलमान झाले असें इतिहास

सांगतो. या शरीरसंबंधानें मुसलमानांचा कडवेपणा गेला होता. असो. मुसलमानी कारकीर्दीत विजापूरचा विस्तार फार मोठा असून वस्ती अठरा लाखांची होती असें ह्मणतात; म्हणजे जवळ जवळ दुप्पट मुंबई झाली. आतां त्याचें वैभवसूचक कांहीं पडक्या इमारती व चौथरे मात्र आहेत पण त्याही इमारती आज पाहाण्यासारख्या आहेत. आज दोनशें वर्षें त्यांची रिपेर नाहीं तरी त्यांचा भव्यपणा, मजबुती, त्यांचे अजून दिसत असलेले रंग व नकशी काम यांवरून त्या जेव्हां नव्या व आपल्या वैभवांत असतील त्यावेळीं त्यांचें वैभव काय वर्णावें? या त्यांच्या इमारतींवरून मुसलमानी बादशाहा 'बादशाहा' या नांवास शोभणाऱ्या वैभवाचे भोक्ते होते यांत शंका नाहीं. हल्लींही रेल्वेपुलांचीं, गोदींचीं, बोगद्यांचीं, इमारतींचीं व बोटींचीं कामें प्रेक्षणीय नाहींत असें कोण म्हणेल? पण त्यांच्या वारंवार रिपेरी होत असून सुद्धां तीं केव्हां नादुरुस्त होऊन अनर्थ घडतील याचा नेम नसतो. तरी पण शिल्पकलेच्या किंवा कारागिरीच्या दृष्टीनें पाहिलें असतां प्राचीन लेणीं, जुन्या विशिष्ट मशिदी किंवा दुर्गे यांची योग्यता अर्वाचीन वस्तूंच्या दर्जाला लावून पाहिली असतां जुनें शाश्वतीचें, मजबूत व सुंदर असल्यामुळें सोन्यासारखें व नवीन फार तर चांदी-प्रमाणें, अशा कसाला लागतील हें कोणीही कबूल करील. असें असतां पाश्चात्य लोक तें कबूल करीत नाहींत, याचें खरें कारण त्यांचा स्वाभिमान व जित राष्ट्रांच्या कृतीचा सर्व प्रकारें उपमर्द करणें यापेक्षां दुसरें कांहीं नाहीं.

विजापुरांत आज सुद्धां पुष्कळ इमारती व पुराण वस्तू पाहाण्यासारख्या आहेत. त्यांत उपलीबुरूज, मुल्क-ई-मैदान तोफ, इब्राहिमरोजा, ताजबावडी, दरबारहॉल, अत्तरमहाल, जुम्मामशीद, व गोलघुमज हींच फार प्रेक्षणीय आहेत. तसेंच अलीकडच्या श्रीमंत सावकारांनीं बांधलेलीं देवळें, त्यांची आरास,

मूर्ती वगैरे पाहाण्यासारख्या आहेत. स्टेशनच्या जवळच तेथील श्री. प्रभुदेसाई वकील यांनीं महालक्ष्मीचें मंदीर बांधलें आहे तेंही पाहाण्यासारखें आहे. त्यांतील महालक्ष्मीची मूर्ति लहानच आहे पण ती अत्यंत सौंदर्ययुक्त आहे. हें देऊळ त्यांनीं आपल्या आईच्या इच्छेप्रमाणें तिच्या स्मारकाकरतां बांधलें आहे. इतर ठिकाणाप्रमाणें हेंही पहावें. मीं दोन रुपयांचा स्पेशल टांगा करून हें सर्व पाहून आलों. विजापुरांत पाहाण्यासारखें काय आहे हें सर्व टांगेवाल्यास माहीत असतें. निदान बाहेरील मनुष्य काय दाखविणेस सांगतो हें त्यांना पूर्ण माहीत आहे व त्याप्रमाणें ते दाखवितात. हें सर्व पाहून येण्यास निदान चार पांच तास लागतात. ठिकठिकाणीं त्या स्थानची माहिती सांगणारे असतातच. ज्या इमारती अद्याप सुस्थितींत आहेत त्यांत सरकारी कचेऱ्या नेल्या आहेत, यामुळें सरकारचा इमारतींचा व त्यांच्या रिपेरींचा खर्च वांचला आहे. सरकार त्याला पांढरा चुना देऊन फिकटपणा मात्र आणतात. त्या ठिकाणच्या वैभवाला त्या कचेऱ्या किंवा तो चुना शोभतसुद्धां नाहीं. ज्या ठिकाणीं राजवैभव दृष्टीस पडावयाचें त्या ठिकाणीं कैदखाने आणि तुरुंग! जी जागा राजसिंहासनाला योग्य त्या ठिकाणीं फार झालें तर जज्जसाहेब किंवा मॅजिस्ट्रेट साहेब खुर्ची टाकून बसणार! सारांश एक विपरीत झालें ह्मणजे काय विपरीत होत नाहीं!

मुल्क–ई–मैदान ऊर्फ महांकाळी तोफ पाहिली. ही तोफ अजस्त्र तर खरीच, पण ती केवळ शोभेची असावी असें दिसते. आजपर्यंत ती कधीं उडाली नाहीं असाच तिचा इतिहास आहे. जोरानें उडण्याचे कामीं तिच्या आंगीं दोन वैगुण्यें दिसलीं. एक—तोफेचें तोंड मागील भागापेक्षां किंचित तरी लहान पाहिजे किंवा बरोबर तरी पाहिजे, निदान मोठें तरी नको. त्याशिवाय गोळी उडण्याला जोर येत नाहीं. आणि दुसरें–जितकी तोफ लांब असेल

त्यामानानें तिचा मारा लांब पोंचतो. इतर तोफा येथें पडलेल्या आहेत आणि प्रत्येक किल्ल्याजवळ, दर्ग्याजवळ, व बुरजावर त्या आहेतच. त्यांत व हींत वरीलप्रमाणें फरक आहे किंवा नाहीं तो पहावा ह्मणजे चटकन लक्षांत येईल. हिचें पुढचें तोंड मोठें होत गेलेलें आहे व तिच्या आकाराप्रमाणें तिची लांबी नाहीं; पुष्कळ कमी आहे. ही पंचरस धातूची आहे. हिची धातु मऊ आहे. पुष्कळांनीं तिच्यावर खिळ्यानें आपलीं नांवें व तारखा कोरल्या आहेत. ही तोफ व त्याशिवाय इतर तोफा यांचा जर अलीकडच्या काळीं उपयोग होण्यासारखा असता तर सरकारनें—त्या अवजड असल्या तरी—हर प्रयत्नानें नेल्याच असत्या, पण तसें दिसत नाहीं. हिच्यावरून आस्रोजर्मनांची १६ इंची तोफ कशी असावी याचें अनुमान मात्र होतें. हिच्या तोंडाचा व्यास १६ इंचांहून जास्त आहे. गेल्या महायुद्धांत अशा तोफांचा पराक्रम सर्व जगास दिसलाच आहे. त्यांनीं अजस्र व भयंकर मजबूत असे किल्लेही यांच्या योगानें जमीनदोस्त केले आहेत!

ताजबावडी ही भोंवतालीं बांधून काढली असून ती फार खोल ह्मणजे निदान ताडभर तरी खोल असावी असें सांगतात. ह्मणूनच तिला बावडी ह्मणावयाची, नाहींपेक्षां तिला बावडी ह्मणतां यावयाची नाहीं. तिची लांबी व रुंदी १००×१०० फूट अशी आहे तेव्हां तो एक विस्तृत जलाशयच आहे. हिला आंत उतरण्याकरतां बाजूबाजूंनीं पायऱ्या आहेत, पण त्या लहान बाजूबाजूला आहेत, प्रशस्त नाहींत. एवढा मे महिना होता, तरी तिच्यांत पाणी भरपूर होतें व चांगलें स्वच्छ होतें. तिच्या भोंवतीं चांगल्या इमारती आहेत त्यांपैकीं एकींत हल्लीं म्युनिसिपालिटीचें ऑफिस आहे. दरबार हॉल, आयनेमहाल वगैरेंचीं कामें अद्यापही फार प्रेक्षणीय आहेत. कांहीं ठिकाणीं त्यांचे रंग सुद्धां दिसतात. कांचेच्या आरशाच्या ऐवजीं कांहीं ठिकाणीं अभ्र-

काचीं कामें केलेलीं आहेत. आंतून व बाहेरून केलेल्या गच्च्या व गॅलेऱ्या, त्यांच्या सुखसोयी व ऐषआराम हीं किती जरी पाहिलीं तरी तृप्ति म्हणून होत नाहीं. एकानें दुसऱ्याचें राज्य घेतलें व त्या राजवाड्यांत आपला राजवाडा केला तर काय हरकत आहे? जरूर ती त्यांत आपल्या इच्छेप्रमाणें सुधारणा केली म्हणजे झालें. पण तसें होत नाहीं. असें केल्यानें जुन्या वैभवाचें स्मारक झालें असतें, पण या कृत्यानें आपण आपल्या शत्रूचें स्मारकच करीत आहों किंवा आपण ह्यांत राहिल्यास यांतील राजा जसा जिंकला गेला तसे आपण कदाचित् जिंकिले जाऊं--जणूं काय आपल्या राजवाड्यामध्यें आपण कधींच जिंकिले जाणार नाहीं--असा त्यांचा समज! सारांश शत्रूची वस्तु किती जरी चांगली असली तरी तिकडे दुर्लक्ष करावयाचें. इतकेंच नव्हे, तर सवतीमत्सराप्रमाणें द्वेषानें तिचा नाश करावयाचा! कारण आपल्या वैभवापेक्षां त्याचें वैभव जास्त दिसतां कामा नये. म्हणजे आपण चांगलीं कामें करावयाचीं नाहींत आणि दुसऱ्याचीं चांगलीं पाहवत नाहींत. काय द्वेष हा!! एक मनुष्य जिंकला गेला म्हणजे त्याचें वाङ्मय, विद्या व कलाही जिंकिल्या जाव्या व त्यांचा नायनाट व्हावा यापेक्षां द्वेष तो कोणता राहिला? म्हणजे इसापनीतींत जी करडाची गोष्ट सांगितली आहे तीप्रमाणें तूं शिव्या दिल्या नसल्यास तर तुझ्या बापानें दिल्या असतील असें वड्याचें तेल वांग्यावर काढावयाचें! असो. हा काल महिमा आहे, सोडून देऊं. पण तीं ठिकाणें पाहून मनांत आलेले विचार वाचकांस सांगणें जरूर म्हणून दिले आहेत.

याशिवाय विजापुरांतील प्रमुख वस्तु म्हणजे बोलघुमज. असा घुमज जगांत कोठेंही नाहीं. हा इतका उंच आहे कीं, स्टेशनापासून गाडी दाहा मैल लांब आहे तोंच हा दिसूं लागतो. ताजमहालाची जशी प्रख्याती आहे तशीच या घुमजाची आहे. ह्या घुमजाला आंतून

भोंवतालीं अधांत्री अशी उंच गॅलरी आहे व हा गॅलरींत जाण्यास भोंवतालच्या भिंतींतून पांच, सहा जिन्यांच्या वाटा आहेत. या गॅलरींत गेलें आणि कांहीं आवाज काढला ह्मणजे त्याचा प्रतिध्वनी किती वेळ तरी घुमत असतो. हा प्रतिध्वनी आहे असें वाटतें! नुसतें 'ऑं' असें म्हटलें म्हणजे ऑं-ऑं-ऑं...असें एकसारखें कितीतरी वेळां होत असतें. हें पाहून फार चमत्कार वाटतो इतकेंच नव्हे, तर या गॅलरीमध्यें ठिकठिकाणीं बसण्याकरितां ओटे घातले आहेत त्यांपैकीं एकाद्यावर बसून भिंतीकडे तोंड करून कांहीं शब्द उच्चारल्यास त्याचा स्पष्ट आवाज त्याच्या समोरच्या विरुद्ध बाजूच्या गॅलरींत बसलेल्या मनुष्यास त्यानें भिंतीकडे तोंड किंवा कान केल्यास स्पष्टपणें ऐकूं येतो. टेलिफोनचा आवाज अस्पष्ट येतो पण हा अगदीं स्पष्ट येतो. प्रतिध्वनीचे शास्त्राप्रमाणें दोन्ही गोलार्धांचीं केंद्रें समोरासमोर असावीं लागतात, पण तसें तेथें नाहीं. कोणत्याही बैठकीवर व कोठेंही बोललें तरी प्रतिध्वनि ऐकूं येण्यास अडचण पडत नाहीं. सर्वांस सारखाच ऐकूं येतो, मात्र समोरच्यासमोरच्यांस तो चांगला स्पष्ट ऐकूं येतो व दुसऱ्यांस कमी येतो. हें अनुभविण्यास मंडळी जितकी जास्त असेल तेवढी चांगली. पाण्यावर फटका मारला असतांना त्याच्या लाटा एकसारख्या हालत असतात तसा तेथें प्रतिध्वनि एकसारखा उठत असतो व लाटांप्रमाणें पुढें कमी कमी होत जातो. पण पहिला आवाज अगदीं मुळाबरहुकूम असतो, ह्यावरून त्यावेळीं हें शास्त्र हल्लींपेक्षां बरेंच पूर्णतेस पोंचलें होतें व त्याचा परिचय गंवडी, मजुरांमध्येंही होता असें दिसतें. या शिवाय त्याची रचना इतकी बेमालूम व फार मोठ्या प्रमाणावर कशी झाली असती? आपण शब्द दुसऱ्याला ऐकूं जाणार नाहीं, निदान समोरच्या लांबच्या मनुष्याला खचित ऐकूं जाणार नाहीं इतक्या हलक्यानें भिंतीकडे तोंड करून बोललों तरी समोरचा मनुष्य आपण काय बोललों हें स्पष्ट सांगतो. खरोखरच ही आश्चर्य करण्या-

सारखी गोष्ट आहे. या शिवाय ही गॅलरी सुमारें आठ नऊ फूट रुंदीची आहे व तिच्यावर मोठमोठ्या ओट्यासारख्या बैठका केल्या आहेत. एवढी मोठी गॅलरी नुसत्या एका मागच्या भिंतीच्या आधारावर अधांतरी कशी राहिली याचेंही आश्चर्य वाटतें ! या इमारतीच्या मधोमध मोठमोठीं व बरींच उंच अशी थडगीं आहेत. सर्व मशीद गोलाकार आहे त्यामुळें वरून पाहिलें असतां सर्व भाग सारखाच दिसतो व आपण आलों कोठून व जावयाचें कोठें हें चटकन लक्षांत येत नाहीं. मग विचार करावा तेव्हां खालच्या थडग्यांवरून लक्षांत येतें.

वरतीं येण्यास पांचसहा जिने आहेत असें सांगितलें खरें; पण ते सर्व नेहमीं उघडे नसतात, बंद असतात. मंडळी जसजशी येईल तसतसे अनुक्रमें उघडतात. म्हणून आपण ज्या जिन्यांतून गेलों त्याच जिन्यांतून परत यावें लागतें. वरून खालीं पाहिलें असतां खालचीं एवढीं मोठीं दीडदोन पुरुष उंच थडगीं आहेत, तरी तीं नेहमींच्या प्रमाणें अगदीं लहान दिसतात! अर्थात खालचीं माणसें अगदीं लहान मुलांप्रमाणें दिसतात इतका तो उंच आहे. खरोखर हा घुमज पाहण्या सारखा आहे. आतां याला शेंदोनशें वर्षांमध्यें रिपेर झाली नाहीं ह्मणून तडे जाऊं लागले आहेत. अर्थात केव्हां तरी तो कालवश होणार व हिंदुस्थानांतील या बौद्धिक कारागिरीचा नाश होणार. पुराण वस्तु रक्षण कायद्याप्रमाणें याची आतां दुरुस्ती होऊं लागली आहे असें ऐकतों. हिंदुस्थानांत पुष्कळ स्वधर्मी व विधर्मी राजे आहेत, पण त्यांपैकीं कोणालाही याचा अभिमान नाहीं. नुसता कोरडा अभिमान वाटून काय उपयोग! असो. हा जोंपर्यंत उभा आहे व त्याचें सौंदर्य कायम आहे तोंपर्यंत विजापुरांत किंवा त्याच्या आसपास जाणारांनीं मुद्दाम वांकडी वाट करून विजापुरांत जावें व हा घुमज पाहून आपले डोळ्यांचें व कानांचें पारणें फेडावें. हा स्टेशनपासून अगदीं जवळ ह्मणजे फर्लांगाचे आंत आहे. दुसरें कांहीं पाहिलें नाहीं

तरी चालेल, पण हा घुमज जिज्ञासूनें अवश्य पाहून यावें अशी शिफारस केल्याशिवाय राहवत नाहीं. बाकीच्यासारखीं कामें त्यांना कोठें तरी दृष्टीस पडतील पण यासारखा घुमज त्यांस कोठेंही दृष्टीस पडणार नाहीं हें लक्षांत ठेवावें. 'कलया नरेंद्र' ह्मणजे राजा नानाप्रकारच्या कलाकौशल्यानें वश होतो असें ह्मटलें आहे. त्याप्रमाणें मुसलमानांच्या कारकीर्दींतसुद्धां होत असे; ह्मणजे कोणी कसलाही गुण दाखविण्यास येवो त्याच्या गुणाची पारख होऊन त्याला राजाश्रय मिळे व यामुळें राजाजळ बहुत गुणवान माणसें असत. विक्रम सभेंतील नऊ रत्नेंही अशाच प्रकारें त्या कालाला व राजाला शोभवीत होतीं. पण हल्लींचें पारडें सगळें निराळें झालें आहे. हल्लीं आपमतलबाच्या गुणाशिवाय कोणत्याही गुणाचें चीज होत नाहीं इतकें जग अधम झालें आहे. यामुळें हिंदुस्थानांतील लोकांच्या गुणांचा, बुद्धीचा व शक्तीचा ऱ्हास होत चाललेला असून याची गती कधीं थांबेल तेव्हां खरी. आमच्याकडील श्रीमंत लोकांना सुद्धां गुण नकोत केवळ पैसा पाहिजे. त्यांना ही जिज्ञासा होईतोंपर्यंत ललितकलेचा मागमूसही राहील कीं नाहीं याची शंका वाटते. राजेरजवाड्यांनीं ही गोष्ट लक्षांत घेतल्यास अंशत: काम साधणार आहे. पूर्वीं वैदीक, शास्त्री वगैरे लोकांस बडोद्यास दक्षणा मिळे. यामुळें मद्रासेकडून व सर्व हिंदुस्तानांतून वैदीक, पुराणीक, शास्त्री वगैरे येत. परंतु ती दक्षणा बंद झाल्यामुळें आतां कोणी येतच नाहींत. अर्थांत आर्यांच्या विद्यांचा असाच नायनाट होत जाणार आहे. परमेश्वरी इच्छा !!

हिंदुस्तानामध्यें वारनीस तयार होत नाहीं असें म्हणतात. पण येथें मी स्टेशनवर वारनिसाची गिरणी पाहिली. हें वारनीस अगदीं युरोपियन वारनिसाप्रमाणें दिसलें. कंपनी देशीच आहे. याशिवाय करडईच्या तेलाच्या गिरण्याही आहेत. विजापुरांत खाणा-

वळींची चांगली सोय आहे व गाडीवान तिकडे पोंचवितात. स्टेशनवरही धर्मशाळा आहे. विजापूर पाहिल्यावर गदग जंक्शनवरून मी हासपेट येथें आलों. व तेथून मोटारनें

## हंपी विरूपाक्ष

या प्राचीन क्षेत्रीं आलों. त्यावेळीं विरूपाक्षेश्वराची यात्रा व रथोत्सव होता आणि ह्मणूनच मोटार चालू होती. हें तुंगभद्रेच्या कांठीं आहे. गंगास्नान व तुंगापान प्रसिद्ध आहे. ह्मणजे गंगेच्या स्नानाचें पुण्य आहे व तुंगभद्रेच्या पिण्याचें आहे. खरोखर तुंगभद्रेचें पाणी फार गोड, चविष्ट व गुणकारक आहे ह्मणून तिला गंगेची उपमा योग्य आहे. मुंबईचें पाणी गोड आहे पण रोगी आहे आणि हें निरोगी आहे. एवढाच फरक, ह्मणजे हा असामान्यच फरक आहे. परमेश्वर-कृपेनें या यात्रेंत तुंगभद्रेच्या स्नानपानाचा सहवास मला बरेच ठिकाणीं व बरेच दिवस झाला. ह्या क्षेत्रांत सर्वत्र तुंगभद्रा व तिचे कालवे आहेत व नदीचा मुख्य प्रवाहही येथूनच गेला आहे. या क्षेत्राचा विस्तार फार मोठा ह्मणजे २०।२५ मैलांचा आहे. रामायण काळा-पासून किंवा त्याचे आधींपासून वाली—सुग्रीव या वानर राजांची येथें किष्किंधा नांवाची राजधानी होती. त्यावेळेपासून विजयानगराचा नाश होईपर्यंत या क्षेत्रास बरेवाईट दिवस पुष्कळ वेळां आले. याच विरूपाक्ष क्षेत्रांत विद्यानगर ऊर्फ विजयानगर ह्मणून मोठें सार्वभौम राज्य होऊन गेलें. त्याचा विस्तार नर्मदेपासून कन्याकुमारीपर्यंत होता. त्यावेळीं रामराजा राज्य करीत होता. याच्याच कारकीर्दींत श्रीज्ञाने-श्वर, नामदेव, गोराकुंभार, सांवतामाळी, भानुदास, विसोबा खेचर इत्यादि महान साधु उदयास आले व याच्याच कारकीर्दींत ज्ञानेश्वरी पुरी झाली. या रामरायाचा प्रधान प्रख्यात हेमाडपंत होता असें ह्मणतात. नंतर येथें बुक्कभूपाल नामें राजा राज्य करीत होता.

याचे मंत्री माधवाचार्य नांवाचे होते, त्यांनीं संन्यास घेतला तेव्हां त्यांस विद्यारण्य स्वामी हें नांव मिळालें. त्यांचे कनिष्ट बंधु सायणाचार्य यांनींच वेदांवर भाष्यें केलीं आहेत. असले विद्वान येथें होऊन गेले परंतु आतां तूर्त ह्यास वाईट दिवस आले आहेत खरे; तरी पूर्वी हें फार भरभराटीचें व विख्यात राज्य होतें अशाबद्दल इतिहास काय सांगेल तें सांगोच पण जुन्या इमारतींचे अवशेष व जयस्तंभ हे येथें जिकडेतिकडे पसरलेले आहेत, त्यावरून ही भूमि आपल्या वैभवाची साक्ष प्रत्यक्ष देत आहे. जुन्या सर्व इमारती दगडी आहेत, त्यांत जेथें जेथें दगडांचा सांधा आला तेथें तेथें तो कालवश होऊन पडतच चालला आहे. पण अद्याप तेथें सबंध मोठे दगड, दगडांचीं मोठीं लांबलचक बहालें व खांब आहेत इतकेंच नव्हे, तर तेथें अशा प्रकारच्या दोनदोन तीनतीन मजल्यांच्या दगडी इमारती अद्याप उभ्या आहेत. याचें नांव अजरामर काम व कौशल्य! येथें दगडांचा सुकाळ आहे. एवढ्या विजयानगराच्या सार्वभौम राज्यविस्ताराकरितां दगड खपला तरी अजूनही नदींत व सर्वत्र माळावर फारच अजस्र दगड आहेत. आतां या अवशिष्ट राज्यापैकीं अनागोंदी येथें मात्र एक लहान संस्थानिक असतो. याच्याच पूर्वजांनीं इंग्लिशांना प्रथम जागा दिली असें इतिहास सांगतो.

हासपेट स्टेशनपासून हंपी १० मैल असून रस्ता सडकेचा आहे. येथें मुख्य देवालय विरुपाक्षेश्वराचें आहे व हें अनादि--फार प्राचीन काळापासूनचें आहे. हें स्वयंभू लिंग आहे अशी प्रख्याती आहे. या देवळाचे मागें विद्यारण्य-स्वामींचा मठ व त्यांत त्यांची संन्यास घेतलेली मूर्ति आहे. या विद्यारण्यस्वामींच्या प्रासादिक आज्ञेवरूनच येथें विजयानगरची स्थापना झाली. या विजयानगरची पुढें भरभराट व अखेरही होऊन गेल्यास आज ४०० वर्षें होऊन गेलीं आहेत. आतां याचा मागमूसही राहिला नाहीं. पण विद्यारण्यस्वामींचा मठ,

विरूपाक्षेश्वराचें देऊळ व तुंगभद्रा नदी हीं जशींच्या तशींच आहेत. याचें कारण निरक्षेप साधू व मूळधर्म यांची उत्पत्ति सत्वगुणापासूनच असते व राज्याची रजोगुणापासून असते. तमोगुणाचे प्रसंग सर्वत्र विश्रुत आहेतच. यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, तमोगुणापासून उत्पन्न झालेल्या गोष्टी किंवा कृत्यें, उदाहरणार्थ, लढाया व सात्ति यांचें वैभव मोठें दिसलें तरी तें क्षणभंगूर आहे. राज्य हें रजोगुणात्मक असल्यामुळें ह्मणजे त्यांत बऱ्या वाईट गोष्टींचा समावेश असल्यामुळें त्याचें आयुष्य बरेंच असतें. पण धर्माचा व साधूंचा उदय सत्व गुणापासून असल्यामुळें त्यांचे वांटेस कोणी फारसे जात नाहींत. क्वचित् कांहीं मुसलमान राजांसारखे धर्मद्वेषी असतात त्यांपासून त्यांस इजा होते; अशावेळीं सत्वगुणाचें उर्फ धर्माचें रक्षण रजोगुणानें ह्मणजे राजानेंच केलें पाहिजे. महाराष्ट्रीय धर्म रामदासांनीं राखला म्हणण्यापेक्षां तो शिवाजीनें राखला हें ह्मणणें जास्त सयुक्तिक आहे. आतां उत्तरहिंदुस्थानामध्यें रामदास किंवा शिवाजी नव्हते तरी पण मुसलमानांच्या योगानें धर्माचा सर्वस्वी नाश झाला नाहीं. धर्माच्या पायीं अत्याचार करणारांचाच झाला, म्हणून मनुष्यांनीं आपली वृत्ति शक्य तितकी सात्विक ह्मणजे निरपेक्ष ठेविल्यास त्यांस ह्या संसारांत फार सुख होतें; रजोगुणात्मक ह्मणजे तुझें व माझें असें केल्यास मध्यम सुख होतें आणि तमोगुणात्मक ह्मणजे सर्वच माझें आहे तुझें कांहीं नाहीं असें सत्तीनें ह्मटल्यास अंगांत जोर आहे तोंपर्यंत तें कसेंबसें टिकेल, परंतु तेव्हांपासूनच त्यास आंतून शत्रु उत्पन्न झाले आहेत असें समजावें. अशा मनुष्यास खरें सुख कसें मिळेल? त्याच्या पाठीमागें धास्ती ही आहेच. ही सात्विक वृत्ति यात्रा केल्यानें उत्पन्न होते. व्यवहाराबाहेर मन काढण्यास यात्रेशिवाय साधन नाहीं. म्हणून आपल्या हयातींत कांहींतरी यात्रा अवश्य कराव्या. रोजचें स्वधर्माचरण व देवदर्शन ह्या यात्राच आहेत, मात्र नित्य नियमानें

केल्या पाहिजेत. पण त्यांचा आतां अभाव होत चालला आहे इतकेंच नव्हे, तर हा एक चेष्टेचा विषय झाला आहे! पण अशानें धर्माची चेष्टा न होतां ती करणारांचीच होत आहे!

श्रीशिवाजी महाराजांनीं राज्याची स्थापना केली. पुढें राज्य वैभवास आलें व अखेर नाश पावलें. परंतु रामदासांच्या उपदेशामुळें महाराष्ट्रीयांत जी तेजस्विता उत्पन्न झाली तीच त्यांचें खरें स्मारक आहे. हिंदुस्थानांतील इतर भागांपेक्षां महाराष्ट्रीयांत जास्त तेजस्विता कां? याचें कारण शिवाजी व रामदास. पेशव्यांचें राज्य गेलें परंतु त्यांनीं जी देवस्थानांची व्यवस्था व स्वधर्म रक्षणार्थ सोयी केल्या तेंच त्यांचें खरें स्मारक. मुसलमानांनीं जर ठिकाठिकाणीं मशिदी बांधिल्या नसत्या तर त्यांच्या धर्माचा येथें मागमूस तरी राहिला असता कीं नाहीं याची शंकाच आहे. जैन व बौद्धधर्मीयांचें राज्य गेलें तरी कोरविलेण्यांच्या रूपानें त्यांचें नांव राहिलेंच आहे. अशा सात्विक गोष्टींनीं राज्याचें नांव राहातें इतकेंच नाहीं, तर अशा ठिकाणीं कलाकौशल्याचें काम केलें तर तेंही तसेंच राहातें व त्यामुळें त्या काळची योग्यता समजते. राजवाड्यावरील कौशल्याचा नाश होईल पण देवळावरील कौशल्याचा तितका होणार नाहीं. पण अशीं कृत्यें स्वराज्य असल्याशिवाय होतच नाहींत. मनुष्याला बुद्धीची करामत किंवा कर्तृत्व दाखविण्यास स्वराज्याशिवाय सोय नाहीं. परकी राजे ह्या गुणांचा विकास होऊंच देत नाहींत, पण कदाचित ईश्वरकृपेनें झालाच तर तो केव्हांच चिरडून टाकून त्याचा मागमूसही ठेवीत नाहींत! हाच नियम संसारालाही लागू आहे. संसारांत गढलेल्या मनुष्यास पारमार्थिक गोष्टी संसारापुढें सुचत नाहींत. पण त्यांनी हें लक्षांत ठेवावें कीं, संसाराकरितां केलेल्या गोष्टींची फेड हल्लींच्या काळीं तरी क्वचित् होते किंवा झाली तर कृतघ्नपणांनीं होते. बायकामुलें त्याबद्दल उपकार मानीत नाहींत. तें तुमचें कर्तव्य होतें असें मानितात. पण

पारमार्थिक केलेल्या गोष्टीची म्हणजे परोपकाराची फेड इहलोकीं व परलोकीं अत्यंत सुखावह होते ह्मणून संसारी मनुष्यांनीं सुद्धां होईल तितकें परोपकारी धोरण ठेवावें. मुलें बापाचें नांव सांगतील किंवा कदाचित् कांहीं उपकार मानतील त्यापेक्षां त्यानें एखादे वेळीं केलेला परोपकार निःसंशय जास्त किर्ति करील किंवा मदत करील हें लक्षांत ठेवावें.

विरूपाक्षेश्वर हें शिवस्थान आहे. या देवालयास दोन भव्य गोपुरें आहेत तीं प्रेक्षणीय आहेत. यात्रेमध्यें या देवस्थानचे दर्शनास वेळेचे मानानें कर असतो. मुख्य दिवस जसजसा जवळ येईल तसतसा तो कर वाढतो व पुढें कमी होतो! हा कर सरकारी नाहीं, पुजाऱ्यांचा आहे. यात्रेचा मुख्य दिवस चैत्र शु० पौर्णिमा आहे. देवळाच्या आवारांत मोठमोठ्या धर्मशाळा आहेत व मोठमोठीं पटांगणें आहेत. पटांगणांतून तुंगभद्रेच्या कालव्याचा एक लहान फांटा नेला आहे त्यामुळें पाण्याची फार सोय झाली असून रमणीयता आली आहे. विद्यारण्य स्वामींच्या मठांत तर ह्या कालव्यानें फारच बहार केली आहे. या मठांत यात्रेचे निमित्त व नेहमीं सुद्धां मुक्तद्वार ब्राह्मण भोजन असतें. येथें स्वयंपाक घरांत पाण्याचीं कुंडें केलीं आहेत व त्यांतून कालव्याचा मोठ्या नळाएवढा प्रवाह सोडला आहे. त्याचा एक फांटा ब्राह्मण जेवावयास बसतात त्या भागामध्यें मोठें कुंड आहे त्यांत सोडला आहे. पुढें बाहेर हातपाय धुण्याकरतां एक कुंड आहे तेथें व त्याखालीं भांडीं घासण्याकरतां एक कुंड आहे त्यांतही सोडला आहे. या सर्वांत एकाच नळाचें पाणी खेळतें ठेविल्यामुळें फारच मजा झाली आहे. कुंडें नेहमीं ताज्या पाण्यानें भरलेलीं असतात व रोज उपसून टाकीत असल्यामुळें स्वच्छ राहतात. हल्लीं मद्रास इलाख्यांत ब्राह्मण व ब्राह्मणेतर यांच्यांत बराच लढा आहे खरा. येथील ब्राह्मण खुशाल ओंवळ्यानें जेवतात व त्यांच्या पंक्तीमध्यें यात्रेकरू बायकाही बसतात. केळीचीं पानें उभीं

न मांडतां आडवीं मांडण्याचा इकडे सांप्रदाय आहे. पंगत बसल्यावर वाढण्याचे आधीं ब्राह्मण ब्राह्मणेतर यांचा फार बारकाईनें शोध केला जातो. या भोजनाचे पंगतींत दोन ब्राह्मणेतर साधू व संन्यासी येऊन बसले होते त्यांस त्यांनीं तावडतोब उठविलें. अनोळखी मनुष्यास घेतच नाहींत. मी महाराष्ट्रीय कोकणस्थ ब्राह्मण आहें असें सांगितलें तरी त्यांस समजेना. शेवटीं त्यांच्यांतील एकानें सांगितलें कीं, तें खरे ब्राह्मण आहेत त्यांस बसूं द्या तेंव्हां त्यांनीं मला बसूं दिलें. येथें कोकणस्थ ब्राह्मण ह्मणून सांगितलें असतां त्यांची समजूत पटत नाहीं. आपला वेद व शाखा सांगितली पाहिजे ह्मणजे समजतें. मी गेलों होतों तो प्रसादाकरितां गेलों होतों, नुसते जेवणाकरतां नव्हे हें उघड आहे मी पहिले दिवशीं एका खाणावळींतच गेलों होतों पण तेथील एका परिचितानें स्वामींच्या मठामध्यें प्रसादाकरितां अवश्य या असें सांगितल्यावरून तेथें गेलों होतों. महाराष्ट्रांत जसे रामदास तसे त्या प्रांतांत विद्यारण्य स्वामी फार प्रख्यात आहेत. त्यांच्या शिष्यशाखेपैकीं एकाकडे त्या मठाची व्यवस्था असते.

येथील रथोत्सवाचा थाट फारच प्रेक्षणीय असतो. याचा नमुना मलपृष्ठावर दिला आहे. पूर्वीं हा रथ एका दगडाचा असून त्याचीं आंगचीं दगडी चाकें दगडी आसांत फिरतीं होतीं! अशा कारागिरीचा मासला आतां आर्यावर्तांत हल्लीं कोठेंही दृष्टीस पडावयाचा नाहीं. असा रथ ओढणारीं माणसें कशीं असलीं पाहिजेत याची कल्पनाच केली पाहिजे. हल्लींचा रथ लांकडीच आहे पण तोही फार अजस्रच आहे. ताबुदासारखे किंवा एखाद्या बंगल्यासारखे याला ८।९ मजले केलेले असतात. प्रत्येक मजल्यावर आंत माणसें, लहान मुलें बसतात व बाहेर चित्रविचित्र माणसें, वाघ, सिंह, नारद, तुंबर, हनुमान वगैरेंचीं लांकडी रंगविलेलीं चित्रें बांधितात. रथावर ध्वज पताका जिकडे तिकडे लाविलेल्या असतात. देवाची स्वारी वर चढविण्या-

करितां व उतरण्यास शिडीचा कांहीं उपयोग होत नाहीं. कारण एवढी उंच शिडी कोठून आणावयाची? त्याकरितां एक पाळणा बांधितात व त्यांत देवास ठेवून वर कप्पीनें ओढून घेतात. असे रथ दोन आहेत. एक पंपापतीचा (शंकराचा) व दुसरा पार्वतीचा. पार्वतीचा रथ थोडा लहान आहे. ह्या मोठ्या रथाला हातांत मावणार नाहींत एवढाले जाडे व अर्धा फर्लांग लांब असे तीन काथ्याचे सोल बांधितात व प्रत्येक सोलाला मुंग्यांसारखीं माणसें लागून हरहर महादेव असें एकदम ओरडून ओढूं लागतात. कोणी पाठीमागून लोटितात, कोणी चाकें लोटितात तेव्हां हें धूड कोठें किंचित् हालतें! हा रथ ओढण्याचा मान प्रथम ब्राह्मणांचा असतो. ह्या वेळीं प्रथम ब्राह्मणांनीं तो ओढण्यास फार प्रयत्न केला पण ते अल्पसंख्याक असल्यामुळें त्यांना तो रथ मुळींच हाललासुद्धां नाहीं. कारण इतके ब्राह्मण कोठून आणणार? शेवटीं ब्राह्मणेतरांनीं ते दोन्ही रथ एकामागून एक ठरलेल्या रस्त्यापर्यंत सुमारें अर्धा फर्लांग ओढीत नेऊन परत आणिले. हा रथोत्सवाचा समारंभ पाहाण्यास मुंग्यांसारखीं माणसें जमतात आणि रस्त्यांत जागा पुरत नसल्यामुळें हा सर्व थाट पाहाण्याकरितां कोणी झाडांवर, गच्चींवर, गोपुरांच्या मजल्यावर, अशीं चिकार माणसें भरलेलीं असतात. हा उत्कृष्ट देखावा देवळाच्या गोपुरावरून पाहाण्यास चांगला मिळतो. पण त्यावेळीं तो मामलेदार, मुनसफ, म्युनिसिपल ऑफिसर वगैरेंनीं अडकविलेला असतो. तरी तीं सर्व ८।९ मजली गोपुरें माणसांनीं चिकार भरलेलीं असतात. रात्रीं ह्या गोपुरांवर दिव्यांच्या माळा लाविल्या ह्मणजे फारच बहारीची शोभा दिसते. लहानशा दीपमाळेवर जर दिवे लावले तर ती सुरेख दिसते; मग ही तर ८।९ मजली इमारत आहे हिची शोभा काय वर्णावी? नदीच्या कांठीं, मैदानांत जिकडे तिकडे बत्त्या व चुली पेटलेल्या असतात. संध्याकाळीं उंचावरून हा सर्व देखावा व त्याचीं नदींत पडलेलीं प्रतिबिंबें पाहून

फारच अवर्णनीय शोभा दिसते. बाजारही असाच मोठा भरलेला असतो व त्यांत नानाप्रकारच्या चिजा असतात. त्यांत दगडी शंकराच्या पिंड्या, नंदीमहादेवासुद्धां अगदीं लहान बोराएवढ्या-पासून मोठमोठ्या मिळतात. धान्य, कापड, भांडीं, हॉटेलें, लांकडी सामान, रुद्राक्ष, भस्माचे गोळे, पान, फूल, अत्तर, गुलाब वगैरे सर्व प्रकारचे प्रासादिक व इतर जिन्नस देशी विदेशी असे असतात. त्यांतच पोलिसांची अरेरावी, धांगडधिंगा व गर्दी मोडण्याचा प्रयत्न आणि या गडबडीचा व प्रसंगाचा फायदा घेऊन चोरांनीं चोरी कर-ण्यांत दाखविलेले हस्तकौशल्य, इतकें करूनही कोणी पकडून पोलिसांच्या ताब्यांत दिल्यास पोलिसांच्या त्याच्यावर धक्काबुक्क्या व शेवटीं पैसे खाऊन दोन लाथा मारून मुसकटांत देऊन सोडून देणें वगैरे चमत्कार पाहून, एकच देव पण तो प्रत्येकाला कसकसा पावतो ह्याचें हृदयंगम चित्र डोळ्यांपुढें उभें राहून मन आश्चर्यचकित व थक्क होऊन जातें! यावरून व्यवहारामुळें उत्पन्न झालेल्या पाप-पुण्याचा क्षय व्यवहारानेंच झाला पाहिजे असा परमेश्वरी संकेत दिसतो व त्याचें हें दृष्य स्वरूप आहे असा मनाचा समज करून घेणें भाग पडतें. त्याशिवाय अशा ह्या परस्पर विरोधी धर्मकर्मांची उपपत्ति लागत नाहीं.

अशा गर्दीत माझे ओझ्याचें पाकीट कोठें ठेवावयाचें याबद्दल मला मोठा विचार पडला. कोणीच तें संभाळीना व एवढें मोठें पाकीट घेऊन कोठें हिंडावयाचें? एके ठिकाणीं बसून मजा कशी दृष्टीस पडणार? खाणावळवाल्याकडे गेलों तर तो रीतीप्रमाणें ह्मणाला कीं या गडबडींत पाकीट ठेवण्याची सोय होणार नाहीं. पण शेवटीं प्रत्येक वेळेचें भाडें ८ आणे घेऊन तें ठेवण्याचें त्यानें मोठ्या मिन्नत-वारीनें कबूल केलें. ह्मणजे ८ आणे जेवावयाचे व ८ आणे पाकीट संभाळण्याचे मिळून वेळेचा एक रुपया झाला! मग तेथें बंदोबस्ता-

करितां पोलिस स्टेशनही आलें, त्यांत क्षणभर बसलों व शिपायीराव याजपाशीं गोष्ट काढिली. त्याला दोनचार आणे देण्याचें कबूल केलें पण तो म्हणाला येथें सरकारी सामानांत कोणाचीही वस्तु घेत नाहींत. तो पोलीस दक्षिणी मराठा होता. त्याला मराठी भाषा येत असल्यामुळें त्याच्याजवळ मी बऱ्याच गप्पा मारल्या शेवटीं त्यानें विडी आहे काय ह्मणून विचारलें. मी विडी शोधल्यासारखें केलें व विड्या संपल्या आहेत असें सांगून जरा पाकिटाकडे लक्ष द्या, विड्या घेऊन येतों असें ह्मणून विड्या व पेटी घेऊन आलों व त्याला एक विडी दिली. आणखीही ५।६ दिल्या तेव्हां तो खूष झाला व ह्मणाला असूं द्या तुमचें पाकीट येथें, यांत जड महत्वाची वस्तु नाहींना? मी ह्मटलें नाहीं! कारण आहे असें कबूल केलें तर तो ठेवणार नाहीं. त्यानें तें उचलून आपल्या सामानांत नेऊन ठेविलें. त्याचें नांव गांव विचारून घेतलें होतें व त्याचा नंबर त्याच्या नकळत मीं टिपून ठेविला होता. असें करून मीं इकडेतिकडे मजा पाहाण्यास एकदांचा मोकळा झालों!

"व्यसनेषु सख्यं" ह्मणतात तेंच खरें. ह्मणजे सख्य हें व्यसनांतच आहे मग तें व्यसन कोणतेंही असो. विद्या व्यसन असलें तरी चालेल. मग तशाशीं मैत्री होईल पण मैत्रीला व्यसन पाहिजे. मीं विडी ओढणारा नव्हतों ह्मणून मजजवळ विडी नसे. पण यामुळें रेल्वेंत, गाडींत, स्टेशनवर, बैलगाडींत, बाजारांत जेथें तेथें हलक्या लोकांशीं संबंध पडल्यामुळें जो तो विडी मागे. ती मिळाली नाहीं ह्मणजे तो रुष्ट होई, त्याची सहानुभूती नाहींशी होई व व्यवहारांत उगीच धरम धक्के खावे लागत. पण मग तेव्हांपासून मी जवळ विड्या बाळगूं लागलों व यामुळें कामें चटाचट होऊं लागलीं! मनुष्यांनीं निर्व्यसनी असणें चांगलें खरें, पण हल्लीं अशा मनुष्यांना जगांत कोठेंच मान नसतो असें माझे पूर्ण प्रत्ययास आलें आहे.

कारण मला कोणतेंच व्यसन नव्हतें. चहा, विडी, तपकीर, पानसुपारी यांपैकीं किंवा कोणतेंच व्यसन नसल्यामुळें मला मान कोठेंच मिळत नसे व कोणी या सुद्धां ह्मणत नसे! पण तेव्हांपासून मी आपली सुधारणा केली ह्मणजे मी व्यसनी बनलों असें नाहीं, पण जसा व्यसनी भेटेल त्याप्रमाणें व त्याच्या कामाच्या मगदुराप्रमाणें कोणास चहा पाजावा, विडी द्यावी, सुपारी द्यावी असें करूं लागलों व त्यामुळे थोडक्यांत कामें उत्तम व विश्वासानें होऊं लागलीं. याकरितां प्रवाशानें आपल्याजवळ निदान विड्या तरी बाळगाव्या असें सुचवणें भाग झालें आहे. दक्षिणेकडे मद्रास इलाख्यांत तपकिरीचा रिवाज फार आहे व येथें सुपारी व तपकीर सर्वत्र मिळते तीही ठेवावी पण आपण मात्र मनोनिग्रह करून अलिप्त असावें. नाहींतर संगती संगदोष होऊन हें नसतें कुलंगडें पाठीस लागेल. आपल्यालाही ह्या व्यसनांचा त्यांच्याकडून आग्रह होतो पण तो इतका होत नाहीं. दुसरी गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे कीं लोक आपणांस त्यांच्याजवळील तपकीरीचा किंवा पानसुपारीचा आग्रह करतात, त्यावेळीं ती घेऊं नये. घेतल्यास आपल्याजवळील कांहीं तरी व्यसन त्यांस परत द्यावें लागतें, नाहींतर "फुकट खाऊ, लबाड" असें ह्मणून भांडण व कदाचित् मारामारीवरही प्रसंग येतो!

या प्रमाणें यात्रा पाहिल्यावर दुसरे दिवसापासून ती उलगडूं लागली तेव्हां मीही आसपासचीं ठिकाणें पहावयास गेलों. त्या क्षेत्रांत ऐतिहासिक व पौराणिक प्रसिद्ध अशीं स्थानें बरींच आहेत. हंपीपासून ३।४ मैलांवर अनागोंदी गांव आहे. तेथें एक संस्थानिक आहे. महाबलाढ्य व धनाढ्य अशा विजयानगरचा एवढाच अंश हल्लीं शिल्लक आहे. येथें जातांना वाटेंत कोदंडधारी रामाचें मंदीर आहे. तेथें श्रीराम, लक्ष्मण व सीता यांच्या मनुष्यापेक्षां मोठ्या मूर्ती असून दर्शनीय आहेत. जवळच तुंगभद्रा असून तिचा मोठा डोह या ठिकाणीं आहे. हेंही

एक तीर्थ आहे व येथें दर्शनार्थ कर आहेच; पण तोही असाच यात्रेचे वेळीं मात्र असतो इतर वेळीं नसतो. यात्रेवांचून हा सर्व मुलुख नेहमीं ओसाड व भयाण दिसतो. यानंतर पुढें २ मैलांवर श्रीविठ्ठलेश्वराचें मंदीर लागतें. यांत विठोबाची मूर्ति नाहीं पण देऊळ दगडी असून त्यांत कलाकुसरीचें दगडी काम अत्यंत सुंदर आहे. अशी कारागिरी मी कोठेंच पाहिली नाहीं. पुष्कळ युरोपियनसुद्धां ती कारागिरी पाहाण्याकरितां जरूर येतात, व फोटो घेऊन जातात. यात्रेकरूनें ज्याला शक्य असेल त्यानें यात्रेचे वेळीं कॅमेरा घेऊन जावें. ह्मणजे या चित्ताकर्षक स्थळाचे देखावे घेतां येतील व पुढें घरीं आल्यावर त्याच्या प्रती काढून विकल्यानें झालेला सर्व खर्च भरून निघून शिवाय फायदाही होईल. बाकी कितीही फोटो पाहिले तरी प्रत्यक्ष दर्शनाची सर केव्हांच येणार नाहीं. पण फोटो पाहाणाराचें मन त्या वस्तूंचें आकर्षण करण्यास तो बराच उपयोगीं पडतो हें खरें; हें देऊळ तेथील राम राजानें पंढरीच्या विठोबास येथें आणण्याकरितां मुद्दाम बांधिलें होतें आणि राजाश्रयामुळेंच तें इतकें सुंदर झालें. राजाच्या इच्छेप्रमाणें त्याचा प्रधान हेमाडपंत यानें पंढरीच्या विठोबाला येथें आणला होता व त्याची स्थापनाही केली होती. परंतु पुढें भानूदास नांवाच्या भक्तानें नंतरच्या तेथील राजास वश करून घेऊन त्यानें त्याला पुन्हा पंढरीस नेलें असें भक्तविजयांत वर्णन आहे! यापुढें दुसरी विठोबाची मूर्ति स्थापली नाहीं सबब हें देऊळ ओस पडलें. लाकडांवर जशी नक्षी करतात तितकी बारीक नकशी येथें दगडावर केलेली आहे आणि अशी थोडीथोडकी नाहीं, तर फार मोठें पटांगण आहे. राजाश्रय झाल्यावर काय कमी आहे? असो. हें देऊळ पाहिल्यावर वालीच्या किष्किंधेकडे जाण्याला मी निघालों. वाटेंत एक लहान नदी लागते. ह्या नदीच्या पलीकडे जाण्याला ज्या होड्या आहेत त्या चमत्कारीकच आहेत. ह्मणजे एक मोठा बुरडी पसरट हारा असून त्याला बाहेरून कात-

ड्यानें मढविला आहे. झाली होडी! यांत ५।६ माणसें बसतात व वल्ह्यानें वल्हवतात. हें जाणें बरेंच भीतिदायक आहे पण वहिवाट आहे त्याला उपाय काय?

प्राचीन किष्किंधा ही ओसाड आहे पण वालीची गुहा, वालीचें वधस्थान, त्याचें दहनस्थान, हीं लोक तेथें दाखवितात. तसेंच ऋष्यमूक पर्वतावरील सुग्रीवाची जागा व वालीच्या भयानें सुग्रीव, हनुमान वगैरेंनीं ऋष्यमूक पर्वतावर निर्भय केलें होतें तें स्थान, तसेंच अंजनीपर्वत व केसरी नामक वानर राजाची गुहा व त्यांत मारुतीचें जन्मस्थान हीं पहाण्यासारखीं आहेत. मारुतीचें जन्मस्थान हें पाहाडावर अगदीं बिकट जागीं असून तेथें पाण्याचीही सोय नसल्यामुळें तेथें कोणी साधूसंत किंवा बैरागीही राहात नाहींत. हल्लीं तेथें फक्त एक लहान देऊळ व पताका आहे.

मारुतीची जयंती सर्व हिंदूंकडून जिकडे तिकडे मोठ्या थाटानें साजरी केली जाते. कोणत्याही हिंदु गांवीं मारुतीचें देवालय नाहीं असें एकही गांव बहुधा सांपडावयाचा नाहीं. यावरून मुख्य जन्मस्थानीं व जन्माचे वेळीं फारच थाटाचा उत्साह होत असेल अशी माझी कल्पना होती. ह्मणून मी चैत्री पौर्णिमेला इकडे मुद्दाम आलों, तो विरूपाक्षेश्वराच्या उत्सवाचा थाट दृष्टीस पडला, पण अंजनी पर्वतावर कांहीं नाहीं ही आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे! श्रीमंतांनीं किंवा राजेरजवाड्यांनीं ही गोष्ट मनावर घेतल्यास डोंगरावर जाण्यास पायऱ्यासुद्धां होतील. आतां तेथें पाणी नाहीं तें खाढून नेतां येईल. ह्या महावीराचे उपासक किंवा रामदासी हिंदुस्थानांत पुष्कळ आहेत, त्यांनीं हें स्थान एकदां पाहून तरी यावें ह्मणजे त्यांचे मनावर प्रकाश तरी पडेल व त्यांची चूक त्यांचे लक्षांत येईल.

ह्या सर्व पुण्यभूमींतील मुख्य स्थान पंपासरोवर आहे. हें पंच महासरोवरांपैकीं आहे. हीं सरोवरें ह्मणजे फार मोठीं तळीं किंवा मोठें

जलाशय अशा अर्थानें नाहींत. तर त्यांचे काठीं फार मोठीं पौराणिक राजकारणें किंवा महत्वाच्या गोष्टी घडल्या ह्मणून यांस महासरोवर हें नांव मिळालें असून क्षेत्रांत त्यांचा नंबर वर ठेविला आहे. वस्तुतः हा एक तलाव किंवा पुष्करणी आहे. येथें एक बैराग्याचा मठ आहे व आंत उतरण्यास अगदीं लहान पायऱ्या आहेत. आंत पोसराचे वेल फार आहेत व पाणीही इतकें उत्तम नाहीं, साधारण आहे. पण रामावतारापूर्वीपासून ह्याची प्रख्याती आहे. ह्मणजे पूर्वींचे लोक केवळ स्थानाला महत्व न देतां इतिहासाला देत होते. रामाचा मुक्काम येथें पुष्कळ दिवस होता. एक दिवस येथें राम व लक्ष्मण स्वस्थ बसले असतां त्यांनीं ह्या सरोवरांत बगळ्यांना मासे धरतांना पाहिलें. बगळे हळुहळु पावलें टाकीत होते. तेव्हां राम लक्ष्मणास म्हणतात

**पश्य लक्ष्मण पंपायाम् बकाः परमधार्मिकाः ॥**
**शनैर्मुंचंति पादाग्रं प्राणिनाम् वध शंकया ! ॥ १ ॥**

लक्ष्मणा, पंपा हें सर्वस्वी पुण्य क्षेत्र खरें ! ह्या पंपा सरोवरांतील बगळेसुद्धां किती धार्मिक आहेत पहा. आपल्या पायांखालीं प्राणी मरूं नयेत ह्मणून अगदीं हळू कितीतरी जपून पावले टाकीत आहेत बरें ! हें बोलणें एका माशानें ऐकिलें तेव्हां तो मासा रामाला ह्मणतो

**सहवासी विजानाति सहवासी विचेष्टितम् ॥**
**बकं किम् वर्ण्यसे राम येनाऽहं निष्कुली कृतः ॥ १ ॥**

रामा, या बगळ्याचें साधुत्व कशाला वर्णन करतोस ! ह्यानें तर अशीं हळू हळू पावलें टाकून व डोळे मिटूनच आमचा निर्वंश केला आहे. फक्त मी तेवढा राहिलों आहें आणि माझ्यावरही त्याचें लक्ष आहेच ! मी सांपडलों ह्मणजे तो निघून जाईल ! ! रामा तुझा स्वभाव निष्कपटी आहे ह्मणून तुला तसें वाटतें. पण अशा ढोंगी साधूचें खरें आचरण त्याच्या सहवासाला जे असतात त्यांनाच समजतें !

याच ठिकाणीं रामाकडून वालीचा वध करण्याचा निश्चय आणि सुग्रीवाशीं व हनुमानादि वानरसमुदायाशीं सख्य व त्यायोगें सीताशुद्धि करण्याचें सर्वांचें नक्की ठरलें. वाली फार पराक्रमी होता सबब रामाकडून त्याचा वध होईल कीं नाहीं याबद्दल सुग्रीवास शंका आली, ह्मणून रामानें एक बाण मारिला तो सप्ततालवृक्षांचा छेद करून सप्तपाताळांत गेला! हें कृत्य जेव्हां सुग्रीवानें पाहिलें तेव्हां त्याची खातरी झाली व वाली-वधानंतर सीताशुद्धि करण्याची जबाबदारी सुग्रीवानें आपणावर घेतली. नंतर रावणाचा वध करीपर्यंत रामाला साह्य करण्याचेंही ह्या ठिकाणीं नक्की ठरलें व तेव्हांपासून या पंपासरोवराची ख्याती आहे. ह्मणून विरूपाक्षेश्वराला पंपापतीच ह्मणतात. ह्या सरोवरीं किंवा ह्या भागांत जाण्यास हल्लीं सर्वत्र सडका आहेत. कांहीं गुहा मात्र पर्वताग्र आहेत. त्या भयंकर जागीं व कांहीं इतक्या खोल आहेत कीं, दिवा किंवा मशाल घेऊन सुद्धां आंत जाण्यास धीर होत नाहीं! सीताशुद्धि होईपर्यंत रामलक्ष्मण जवळच माल्यवान पर्वतावर रहात होते. या स्थानीं आतां उत्तम राममंदीर असून त्यांत रामाची मूर्ति पद्मासन घातलेली व ध्यानस्थ बसलेली अशी असून जवळच लक्ष्मण व सीताशुद्धीचें वृत्त लीनपणें सांगत उभी राहिलेली अशी मारुतीची मूर्ति आहे. हेंहीं स्थान दर्शनीय आहे. हे पर्वत ह्मणजे फार मोठे व उंच आहेत असें नाहीं. लहान लहान टेकड्या आहेत पण त्यांची पौराणिक प्रसिद्धि फार मोठीं आहे.

ह्या सर्व प्रांतांत एक मोठा चमत्कार आहे. येथें तुंगभद्रेंत लहान मोठे गाटेगोटे दगड आहेत यामुळें तुंगभद्रा जिकडे तिकडे उथळच आहे. मध्यें कांहीं कांहीं ठिकाणीं मात्र मोठे डोहो आहेत. या नदी-शिवाय जमिनीवर, पर्वतावर व सर्वत्र दगडांच्या मोठमोठ्या राशी आहेत; कांहीं दगड एवढे मोठे आहेत कीं, एकेक दगड चारशें पांचशें टनांचा असावा! ह्मणजे एकेक दगड एकेका घराएवढा असा

आहे ! हे दगड आले कोठून व कोणी आणले असावेत ? हे दगड तुंगभद्रेंतून वाहात आले असावे व कालांतरानें तिची दिशा फिरल्यामुळें ते तेथेंच राहिले असावे ! पण असें म्हणावें तर एवढे मोठे अजस्र असे दगड डोंगरावर कसे गेले ! शिवाय डोंगरावर मनुष्यांना राहाण्याजोग्या त्यांच्या गुहा किंवा गुंफा कशा बनल्या ? सृष्टिक्रमाप्रमाणें पाहिलें असतां नुसता दगड जमिनीवर कधीं सांपडावयाचा नाहीं, तो कांहीं तरी मातींत गाढलेला असावयाचा; मग तो पर्वतावर असो किंवा जमिनीवर असो. पण या दगडांना मातीचा लेशही नाहीं व ते खडबडीतही नाहींत. गदग जंक्शनपासून अशा दगडांच्या लहान मोठ्या राशी घातलेल्या सर्वत्र दृष्टीस पडतात. पुढें रावणाशीं जंगी युद्ध करावें लागेल त्याच्याकरितां वानरांनीं हा अपरिमित दारूगोळाच सज्ज करून ठेविला होता. या दगडांतूनच समृद्ध असें विजयानगरचें नुसतें गांव नाहीं तर राज्य बांधलें गेलें ! तरी पण हल्लीं जो दगड इतका शिल्लक राहिलेला दिसत आहे त्याचा एक आणाही खर्च झाला आहे असें वाटत नाहीं. हा एवढा दगड येथें आला कसा ? ही सृष्टिकृती आहे कीं मनुष्यकृती आहे ? याचा कोणी विचार केला नाहीं ही मोठी चूक आहे. हा विचार केल्यावांचून ही यात्रा फुकट आहे. या दगडाबद्दल काय विचार करावयाचा आहे असें म्हणणें म्हणजे आपणच दगड बनणें होय ! ते दगड खरे, पण ते आपल्याला आपल्या कालाचा महिमा सांगत आहेत. आपल्या अकलेनें तो समजून घेतला नाहीं तर आपण दगडापेक्षांही दगड होऊं ! ! ही सृष्टिकृती तर खचित नाहीं कारण ज्याला माती नाहीं असा दगड सृष्टींत पाण्याच्या आसऱ्याशिवाय सांपडावयाचा नाहीं. कोणी म्हणेल पावसानें माती धुवून गेली असावी, पण ती राशीमध्यें कोठें तरी सांपडावी कीं नाहीं ? पण कोठेंही सांपडत नाहीं. शिवाय अशा अजस्र दगडांच्या कमानी, गुहा, विवरें अशीं आपोआप

कशीं होतील? शक्य नाहीं. अर्थात ही मनुष्यकृती आहे हें खचित. पण मनुष्यकृती ह्मणावी तर ती कृती हल्लींच्या मनुष्याच्या कल्पनेच्या सुद्धां बाहेर आहे! चालू काळांतील कितीही यांत्रिक युक्त्या लाविल्या तरी एवढे अजस्त्र धोंडे डोंगरावर चढणें व त्यांच्या गुंफा करणें शक्यच नाहीं. ज्यांनीं ज्यांनीं हें ठिकाण व हा सर्व प्रदेश पाहिला आहे त्यांसही असेंच वाटेल. मग हें कोणी केलें असावें असा प्रश्न येतोच.

याचें उत्तर पुराणांत आहे. जेव्हां अश्मयुग सुरू होतें अशा राम अवताराचे वेळीं वाली व सुग्रीव यांची ही युद्धभूमि होती व त्यावेळीं ह्या प्रांतांत शास्त्रास्त्र विद्या माहित नसल्यामुळें दगड व झाडें यांनींच युद्ध होत असे. सर्व वानर व मारुती असेंच युद्ध करीत आणि कोणत्याही रामायणांत तसा स्पष्ट उल्लेखही आहे. मारुतीनें तर द्रोणा-गिरी लंकेंत नेला ही गोष्ट प्रख्यातच आहे व जेथें जेथें मारुतीचें चित्र काढितात तेथें तेथें त्याच्या पराक्रमाचें सूचक असा हा द्रोणागिरी त्याच्या हातावर देतातच. ह्या गोष्टी आमच्यांतील बेगडी सुधारकांना व विधर्मी-यांना थट्टेच्या वाटतात. पण त्यांनीं ही विजयानगराची भूमि पाहून यावी ह्मणजे त्यावेळीं वानरांचें सामर्थ्य किती होतें हें दिसून येईल. वानरांपेक्षां माणसें श्रेष्ठ असणारच. अर्थात यावरून त्या वेळेच्या माणसांच्या बलाची व शारिरीक सामर्थ्याची कल्पना करितां येईल व रामयणांत वानरें, मनुष्यें, राक्षस व सर्वांत श्रेष्ठ असा रावण यांच्या पराक्रमाविषयीं ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्या सर्व तशाच खऱ्या वाटल्या नाहींत तरी त्यांत पुष्कळ ग्राह्यांश आहे असें ह्यावरून स्पष्ट समजेल. त्या वेळचा दारूगोळा म्हणजे ह्या दगडांच्या राशीच व त्या हल्लीं येथें सर्वत्र दृष्टीस पडत आहेत. यावरून रामरावणाचें युद्ध असामान्य झालें व त्याच्या तोडीचें असें दुसरें कोणतेंही झालें नाहीं असें ह्मणतात तेंच खरें दिसतें. पांवनच्या खाडींतही असेच मोठमोठे दगड समुद्रांत घातलेले दिसतात. कदाचित् हें युद्ध संपल्यावर ( वालीला मार-

ल्यावर ) ह्या दगडांच्या राशी सेतू बांधण्याकरितां लाविल्या असाव्या आणि सेतूचें व युद्धाचें काम संपल्यावर ह्या तशाच राहिल्या असाव्या असें दिसतें. हा मुलूख पहाडी असल्यामुळें येथें जन्मलेले वानरही मोठे काटकच झाले व त्यांत मारुती फार काटक झाला, कारण त्याच्या जन्मस्थानीं पाणीही नाहीं! अशा प्रकारचें अघटित काम करणारे वानर तरी केवढे मोठे असावेत याचा येथें पुरावा मिळतो. किष्किंधेंत, तुंगभद्रेच्या कांठीं जेथें वालीचें प्रेत दहन झालें, ती जागा येथें दाखवितात ह्मणून मागें सांगितलें आहे. त्या जागेच्या तीन बाजूंनीं पर्वत आहेत व चवथ्या बाजूनें नदी आहे. ही जागा हल्लीं एक पुरुषभर उंच, ५।६ शें हात लांब व तीस चाळीस हात रुंद अशी उंचवट्याची आहे, ह्मणजे वालीची लांबी रुंदी ह्या स्वरूपाची होती. हें तिचें इतकीं युगें होऊन गेल्यानंतरचें आजचें स्वरूप आहे यावरून त्याचे मूळ स्वरूपाची कल्पना करावी. ह्या टेकडीवर हल्लीं अनंत काळामुळें माती व गवत उगवलेलें आहे. पण तेथें उकरल्यास खालीं राख सांपडते व तींत लहानमोठीं हाडेंही सांपडतात. ही राख कोणत्याही यज्ञाची नसून नरयज्ञाचीच आहे हें उघड आहे. आतां कोणी ह्मणतील कीं, हें त्या वेळचें स्मशान असेल. पण स्मशान दुसरे ठिकाणीं दाखवितात. ही फक्त वालीचेच दहनाची जागा आहे आणि तसें असणेंही शक्य आहे. कारण वाली हा राजा होता व राजे लोकांच्या छत्र्यांची जागा ही इतरांपेक्षां भिन्नच असते. हीं हाडें यात्रेकरू आपल्या घरीं आणून ठेवितात व त्यामुळें घरांत भुतबाधा होत नाहीं असा त्यांचा समज आहे. तसेंच रामानें जेथून वालीला वाण मारिला तीं पांवलें जेथें दाखवितात त्या पावलांमधील अंतरावरून त्या वेळच्या विशाल माणसांची स्पष्ट कल्पना होते व पौराणिक गोष्टी खऱ्या असल्या पाहिजेत असें दिसतें.

दर युगाचे वेळीं प्राणिमात्रांच्या शरीराचा ( ताकदीचा ) व

आयुष्याचा ऱ्हास होतो, त्याबरोबर मनुष्यांचाही होतो असें हल्लींचे भूगर्भशास्त्रवेत्तेही ह्मणतात. प्राचीन युगांतील सरडे, काजवे, पक्षी वगैरेंचे हल्लीं खाणींत जे अवशेष सांपडले आहेत त्यांवरून हल्लींच्यापेक्षां ते प्राणी आठदहापट तरी मोठे असले पाहिजेत असें दिसतें. सर्व प्राणीमात्रच लहान होत आहेत असें नाहीं तर पंचमहाभूतेंही क्षीणच होत चाललीं आहेत. प्रत्यक्ष सूर्यच थंड होत चालला आहे व त्याचा हा परिणाम आहे असें हल्लींचे शास्त्रज्ञ ह्मणतात. यावरून आणखी १०।२० हजार वर्षांनीं हल्लीं जीं प्रदर्शनांत खुजीं किंवा जळ माणसें दाखवतात तेवढीच सामान्य सृष्टि होईल असें दिसतें. अर्थात आयुष्यही कमी होणारच. अगदीं अलीकडे मनुष्याचें आयुष्य शंभर वर्षें होतें तें आतां पन्नासांवरच आलें आहे व तें पुढें पंचवीसांवर येईल असें दिसतें!

कोणी असें ह्मणतात कीं, लंका ह्या बाजूस नव्हतीच. पूर्वीची लंका ही हल्लींची आस्ट्रेलिया असावी आणि तेथें जाण्याला जावा, सुमात्रा वगैरे बेटांचा तुटक पूल केला असावा. ब्रह्मदेशांतून ह्या प्रदेशांत--सयामांत जातांना हल्लींसुद्धां जीं ओरँग उटँग वानरें सांपडतात तीं फार बळकट आहेत. शिवाय आस्ट्रेलियांत ज्या मोठ्या धनवत्तर सोन्याच्या खाणी सांपडल्या आहेत, त्यांत शुद्ध सोन्याच्या पक्के ९०।९५ शेर वजनाच्या लगडीही एका खाणींत सांपडल्या आहेत! एवढ्या मोठ्या लगडी अशा शुद्ध स्वरूपांत जगांत आजपर्यंत कोठेंही सांपडल्या नाहींत. अर्थात शुद्ध सोन्याच्या एवढ्या लगडी सांपडणें ही मनुष्यकृती आहे, सृष्टिकृती खात्रीनें नाहीं. आणि रावणाची लंका तर सोन्याची होती. प्राचीन हिंदुधर्माचे अवशेष, देवळें, दगडावर अरवींत (ही मद्रासेकडे भाषा आहे) लिहिलेले लेख हीं तेथें सांपडतात. तेव्हां ह्याच बाजूला रावणाची लंका असावी असें वाटतें. पण सयाम मलाया येथील हल्लीं सांपडत असलेल्या ओरँग उटँग वानरांना शेपट्या नाहींत

आणि आमचे मारुती राजांची शेपटी तर लंका दहन करून आली होती. मारुतीनें ज्या लंकेंत उडी मारिली तिच्या अंतरावरून त्यावेळच्या अजस्र माणसांची जरी कल्पना केली तरी इतकी लांब उडी मारणें ह्मणजे आस्ट्रेलियांत तेथून उडी मारणें अशक्य वाटतें. सबब हल्लींचें सिलोन हीच लंका वाटते व इकडे स्थानिक मतही असेंच आहे. कदाचित् आस्ट्रेलियापासून मलाया द्वीपकल्पापर्यंत पूर्वींच्या युगांत एकच प्रांत असावा व भूकंपानें चालू युगांत समुद्र शिरून, जावा, सुमात्रा वगैरे बेटें झालीं असावींत. कारण भूकंपाची रेषा ही ह्याच मार्गानें दक्षिण महासागरांत गेली असून दक्षिण महासागरांतील, बेटांत जिकडे तिकडे ऊष्णोदकांचे झरे व ज्वलत्पर्वत आहेतच. एकंदर पाहातां आस्ट्रेलिया ही जरी लंका नसली तरी दक्षिण महासागरांत जिकडे तिकडे राक्षसशाही होती व ती सधन, संपन्नही होती असें हल्लींच्या तिकडील रानटी जातीं-वरून व सांपडलेल्या अवशेषांवरून दिसतें. हल्लीं ह्या जाती रानटी झाल्या पण प्राचीन काळीं त्यांचीं राज्यें भरभराटींत असावीं असें पुराणांवरून व सोन्याच्या लगडींवरून दिसतें. असो. रामयणांत बऱ्याच असंभाव्य गोष्टी आहेत अर्थात तें काल्पनिक आहे असें जें पाश्चयात्यांचें ह्मणणें आहे तें खोटें आहे. निदान त्यांतील बराच भाग—तो जरी असंभाव्यसा वाटला—तरी विचार करण्यासारिखा आहे, असें हे अजस्र दगड, त्यांच्या राशी व त्यांनीं झालेल्या गुहा ह्या स्थलवर्णनावरून निश्चित आहे. हें ह्या यात्रेपासून शिकण्यासारिखें रहस्य आहे हें उघड आहे. हें रहस्य ज्यांना कळलें नाहीं त्यांची ही यात्रा फुकट गेली.

याप्रमाणें ही यात्रा झाल्यावर पुन्हा हासपेटला आलों. तेथून दर सोमवारीं, बुधवारीं, शनिवारीं सकाळीं पांच वाजतां एक गाडी निघून कांप्लिहल्ली स्टेशनला ती साडेआठला पोंचते व लगेच नऊला

निघून दहा साडेदहाला पुन्हा हासपेटला परत येते. कण्विहल्लीपासून सोंडूर हें एक मराठे सरदाराचें संस्थान आहे व तेथें जाण्यास गाडीचे वेळीं बैलगाड्या मिळतात. सोंडूरपासून पुन्हा

# कार्तिक स्वामी

४ मैल असून सडक आहे तेथपर्यंत गाड्या जातात. पुढें डोंगरावर दोन मैल पायीं जावें लागतें परंतु रस्ता सडकेचा आहे. कण्विहल्ली-पासून गाड्या होनां होईतोंपर्यंत कार्तिक स्वामीच्या डोंगराच्या पायथ्या-पर्यंतच्या कराव्यात, ह्मणजे सोंडूरला गाडी पाहावी लागत नाहीं. नाहींतर डोंगराचे पायथ्याशीं जाण्यास सोंडूरला जास्त पैसे घेतात. हें देवस्थान सोंडूर संस्थानचे ताब्यांत असून त्याची सर्व व्यवस्था त्यांचे मार्फत चालते. दर तीन वर्षांनीं कृतिका योग येत असतां येथें मोठी यात्रा जमते.

कार्तिक्यां कृतिका योगे शिवयोगे विशेषतः ॥
शिवस्य तनयं दृष्ट्वा पुनर्जन्म न विद्यते ॥१॥
कार्तिक्यां कृतिका योगे, यः कुर्यात् स्वामिदर्शनं ॥
सप्त जन्म भवेद्विप्र धनाढ्यो वेद पारगः ॥२॥

त्या वेळीं धना व वेदपारग ब्राह्मण होणें हें भाग्याचें लक्षण मानलें जात होतें. आतां ब्राह्मण होणें हें कांहींसें दुर्भाग्य समजतात. या योगावर यात्रेचे वेळीं उत्पन्नही बरें होतें. ह्या वेळचा कर कृतिका योग जेथपर्यंत असेल तेथपर्यंत बराच जबर असतो. हा योग अगदीं थोडा असला ह्मणजे त्या दिवशीं माणशीं १०।१० रुपये सुद्धां कधीं कधीं कर घेतात! मग पुढें कमी कमी होत रुपया आठ आणे पर्यंत येतो. या वेळीं यात्रेला श्रीमंत ब्राह्मणेतर मंडळीच फार येते कारण चालू ब्राह्मण्यांत काय आहे हें आतां ब्राह्मणांस पूर्ण कळलें आहे.

हा प्रदेश अगदीं एकांतवासाचा असून तपश्चर्येला योग्य आहे हें जाणूनच कुमारस्वामी आईबापावर रागावून येथें तपश्चर्येला आले; सातासमुद्रांपलीकडे जसे विष्णु एकांतांत शयनाकरितां गेले त्याप्रमाणें ५।६ डोंगरांच्या पलीकडे हें ठिकाण आहे. कोठूनही गेलें तरी त्याच्या भोंवतीं डोंगर व जंगल हें आहेच. अर्थात जंगली श्वापदें व पक्षीही आहेत पण त्यांत मोर फार आहेत व स्वामीचें वाहनही मोरच आहे. स्वामींच्या पर्वताला लोहाचल पर्वत ह्मणतात. ह्या देवस्थानांत सोंवळ्या ओंवळ्याचा बंदोबस्त फारच कडक आहे. अगदीं कडक सोंवळ्याचा मनुष्य आला तरी सुद्धां तो हल्लींच्या पद्धतीचाच असणार! यामुळें त्याची तेथें फजिती होते. कितीजरी सोंवळें केलें तरी तें अलिकडच्या पद्धतीचें अर्थात बाडगें अथवा सुधारलेलें असणार! त्याचें पूर्व पद्धतीशीं कसें जमावें? आतां यात्रेचे वेळीं काय प्रकार होत असेल तें समजत नाहीं. बाकी एरवीं कडक बंदोबस्त असतो. यात्रा निघून गेल्यावर पुन्हा देवाला योग्य स्नान घालून सोवळें राखण्याची व्यवस्था होते. यात्रेंत तितका कडक बंदोबस्त राहात नाहीं. ही यात्रा बायका करीत नाहींत कारण त्यांस स्वामींचा शाप आहे. त्याची कथा अशी कीं, कार्तिक स्वामी वयांत आल्यावर त्यांच्या आईनें (पार्वतीनें) लग्नाची गोष्ट त्यांच्याजवळ काढली असतां स्वामी ह्मणाले, बायको असते कशी? तेव्हां ती ह्मणाली माझ्यासारखी. मग ते ह्मणाले तरमग मी लग्नच करणार नाहीं. तरी तिकडे लक्ष न देतां ईश्वर पार्वतीनें त्यांचें लग्न ठरविलें हें पाहून ते घर सोडून क्रौंच पर्वतावर तपश्चर्येस गेले. क्रौंच पर्वत मल्लिकार्जुनाजवळ आहे. तेथें स्वामी आहेत असें शंकराना समजल्यावर त्यांच्या भेटीकरितां शिवपार्वती हीं आलीं ह्मणून त्यांना चुकवून ते येथें तपश्चर्येला आले आणि त्यांनीं शाप दिला कीं, जी बायको येथें माझे दर्शनास येईल ती सात जन्म विधवा होईल. ( याच भागामध्यें

मल्लिकार्जुनाचें वर्णन आहे तें पहा.) यामुळें ही यात्रा स्त्रियांस वर्ज्य आहे. स्वामींची तपश्चर्या संपूर्ण झाल्यावर त्यांनीं तारकासुराला मारिला. नंतर सर्व देवांनीं त्याचें मंगल करण्याकरितां वल्ली व सेना या ब्रह्मदेवाच्या कन्यांशीं त्यांचें लग्न केलें. तें स्थान रेनिगुंठा आरकोनम् लाईनीवर तिरूतनी स्टेशनजवळ कुमार पर्वतावर आहे. त्याची हकीकत याच भागांत कांचीचें यात्रेंत आहे. येथें आबालवृद्ध स्त्री-पुरुष यात्रेला जातात व विवाहित स्वामींचें दर्शन घेतात. याला सुब्रह्मण्य क्षेत्र ह्मणतात व याचा महिमा त्या प्रांतांत मोठा आहे.

ह्या लोहाचलावर कुमारानें अगस्ती व लोपामुद्रा यांचें स्वागत केलें. याचें स्मारक आगस्तीची मूर्ति नाहीं, पिंडी आहे.

**एवंचरंतौ कालेन लोहाद्रौ षण्मुखः परः ।**
**दृष्टौ विश्रामयित्वा तौ स्वाश्रमे विदधेऽर्हणम् ॥**

—स्कंदपुराण, सह्याद्री खंड, हारिहरेश्वर महात्म्य अध्याय ३ श्लोक ८.

कार्तिक स्वामीला बायकांचें दर्शन नको मग त्यानें लोपामुद्रेचें स्वागत कसें केलें तर तिची योग्यताच असामान्य होती. देवालया जवळ अगस्त्यतीर्थ व अगस्तीचें ( शंकराचें ) व लोपामुद्रेचें अशीं देवालयें आहेत. तीर्थ व या देवालयांचे बरेच भाग पडीत झाले आहेत पण त्यांची दुरुस्ती होत नाहीं. महायुद्धामुळें यांची दुरुस्ती होणें राहिली असें ह्मणतात व ती हल्लींचे सोंडूरचे राजेसाहेब सेनापती घोरपडे हे करणार आहेत असें समजतें. येथील देवाची मूर्ति षण्मुख नसून एकमुखी उभी आहे व जवळच क्रौंच पक्षी दाखविला आहे. मूर्ति पुरुषभर उंचीची, गंडकी शिळेची व कृष्णपाषाणाची असून दर्शनीय आहे. येथें दर्शन सकाळीं ६ पासून दुपारीं ११।१२ वाजेपर्यंत व रात्रीं ८ वाजतां होतें. दर्शनास नियमित मंडळी सोडतात. धुपारती व पालखी रोज असते. पालखीच्या चार पांच प्रदक्षिणा फक्त देवळाभोंवतींच होतात. आवारांत स्वामींच्या उजवे बाजूस शंकराचें

व डावे बाजूस पार्वतीचें देऊळ आहे. तीं मागून बांधलेलीं आहेत. प्रत्येक देवळासमोर व देवळाच्या प्रत्येक दिशेला पालखी थांबून तेथें मंत्र व अष्टकें ह्मणून नंतर पुढें जाते. या पालखीला ब्राह्मणाशिवाय कोणी शिवत नाहीं. देवळाचे आवारामध्यें यात्रेकरूला उतरण्याकरितां धर्मशाळांचे मोठमोठे सोपे बांधले आहेत. शिपाई, कारकून, पुजारी, रामोशी मिळून येथें ५०।६० मंडळींची वस्ती नेहेमीं असते. येथें ब्राह्मणाला मुक्तद्वार भोजन मिळतें व यात्रेंतसुद्धां कितीही ब्राह्मण आले तरी मिळतें असें सोंडूर येथें समजलें. पण पर्वतावर गेल्यावर कांहीं नियमित मंडळीपर्यंतच मिळतें असें समजलें! हें भोजन रोज १२ किंवा १ चे सुमाराला मिळतें, अगोदर किंवा नंतर मिळत नाहीं.

कण्विहळ्ळी स्टेशनवर गाडी सकाळीं ८॥ वाजतां येते व त्यानंतर बैलगाडी करून सोंडूरला येण्यास १०।११ वाजतात व नंतर पुढची गाडी करण्यास वेळ लागतो. याप्रमाणें आह्मांला देवळांत जाण्यास १ चा सुमार आला व त्यामुळें दर्शन बंद झालें व जेवणेंही आटपत आलीं होतीं पण मला कसा तरी जेवणाचा प्रसाद मिळाला. दर्शन व पालखीचा लाभ रात्रीं पाहाण्यास मिळाला. येथें कांहीं नियमित जागीं खणलें असतां खडूसारखें भस्म लागतें. खडू कडक असतो पण हें फार मऊ व पांढरें स्वच्छ असतें. तसेंच जमिनींत अगदीं तांबडी गेरूसारखी माती मिळते. हें भस्म व माती असे दोन पदार्थ येथील प्रसाद ह्मणून यात्रेकरू घेऊन जातात. हें भस्म यात्रेचे वेळीं मात्र मोठ्या प्रमाणांत खणतात व पुन्हा बुजवून टाकतात. मध्यें यात्रा आल्यास त्यांस देण्याकरितां थोडें स्वतंत्र बाजूस काढून ठेवितात. कोणापासून कांहीं न घेतां प्रत्येक यात्रेकरूस लिंबाएवढा गोळा ह्या प्रत्येक वस्तूचा द्यावा असा तेथें ठराव आहे. पण शिपाई वगैरे यात्रेकरूजवळून पैसे घेतात व ते कमजास्त देतातच. पण असे हे पैशाचे खेळ जिकडे तिकडे आहेतच.

या भस्माची पौराणिक कथा अशी समजते–कुमारस्वामींचें लग्न करण्याचें ईश्वरपार्वतीनें ठरविलें परंतु तें स्वामींनें मान्य केलें नाहीं, ही गोष्ट पुराणी प्रसिद्ध आहे. पण पार्वतीला ह्या त्यांचा निश्चय आवडेना. ती ह्मणाली अरे, मी तुला दूध पाजून वाढविला, न्हाऊ माखू घालून डोळ्यांत काजळ घातलें, तें ह्याचकरितां काय? तेव्हां स्वामीनें तें दूध ओकलें त्याचें भस्म झालें व काजळ काढून टाकिलें त्याचे काळे खडे सांपडतात. या खड्यांची काळी रेघ वैष्णव आपल्या कपाळीं अक्षत ह्मणून लावतात. या आख्याइकेंत काय तथ्य असेल तें असो पण ज्या ठिकाणीं दूध ओकलें असें सांगतात तेथें मोठमोठीं पेवें केलेलीं आहेत. त्या पेवांत हल्लीं साधे दगड टाकितात व माती घालून तीं बंद करितात. नंतर तीन वर्षांनीं पुन्हां कृत्तिका योग येतो तेव्हां तीं पेवें उकरितात. तेव्हां त्या दगडांचे मऊ असे भस्माचे गोळे झालेले असतात हा येथील चमत्कार आहे. हेंच येथील स्थान माहात्म्य आहे. कदाचित् हा येथील जमिनींतील विशेष गुण असेल. कांहीं असलें तरी हा चमत्कार आहे खरा, आणि विशेष सृष्ट चमत्कार दाखविण्याकरितांच यात्रेच्या योजना असतात. या भस्मावर यात्रेचे वेळीं कर ठेविला आहे. या खाणींचें किंवा पेवांचें यात्रेचे वेळीं लेलांव करतात व मग लायसन्सनें विकतात.

या प्रांतांत भस्माचा सांप्रदाय फार आहे. वैष्णव लोकसुद्धां भस्म लावून मध्यें तांबडे गंधीची (देवाच्या मातीची) रेघ लावतात. सुवासिनी बायकाही भस्म लावितात व मध्यें कुंकू लावितात! बायका देवाचे दर्शनास जात नाहींत पण हा त्याचा प्रसाद ह्मणून लावितात. आपलेकडे सन्मानार्थ रावसाहेब किंवा महाराज ह्मणतात त्याप्रमाणें ह्या प्रांतांत सन्मानार्थ कोणालाही स्वामी ह्मणण्याची वहिवाट आहे. स्वामी हा शब्द बहुधा ब्राह्मणांनाच लावितात इतरांना लावित नाहींत, हा कुमार स्वामींचा सन्मान आहे. येथें मराठी भाषा नाहीं

तामील आहे. परंतु संस्थानिक मराठी असल्यामुळें हल्लींच्या राजेसाहेबांनीं एक दोन मराठी शाळा उघडण्याचा हुकूम सोडला आहे. आतां १०।१५ वर्षांनीं येथें मराठीचा फैलाव होईल असा अजमास आहे. राजे घोरपडे मराठे असल्यामुळें राजवाड्यांत मराठी भाषा चालते.

सोंडूरहून कार्तिक स्वामीस जाण्यास मात्र गाडी मिळते. परत येईपर्यंत गाडीवान राहात नाहींत. डोंगरावरून येण्यास कधीं कधीं एक दोन दिवसही मोडतात. खालीं राहाण्याची सोय नाहीं म्हणून येतांना चालत यावें लागतें किंवा अगोदर गाडीची व्यवस्था ठेवावी लागते.

सोंडूर गांव मोठा आहे. धर्मशाळा, लायब्ररी वगैरे आहेत. पण राजवाडा पाहाण्यासारखा नाहीं. तो राजवाडा आहे असें सुद्धां वाटत नाहीं. हल्लींचे राजे तो आतां नवीन बांधणार आहेत असें म्हणतात. राजे जुने घोरपडे या सेनापती घराण्यांतील आहेत. हल्लीं यांच्या बायका सुद्धां पराक्रमी आहेत. हल्लींच्या राणीसाहेबांनीं फार मोठा वाघ बंदुकीनें मारल्याचें प्रसिद्ध झालें आहे. येथें म्युनिसिपालिटी नाहीं. मी गेलों तेव्हां राजवाड्यामध्यें बायकांचा वसंतोत्सव ( चैत्रांतील हळदीकुंकवाचा समारंभ ) चालला होता तोही पाहाण्यास मिळाला. पण तो राजवाड्यांतील या दृष्टीनें विशेष महत्वाचा असा दिसला नाहीं. साधारण होता, तरी इतरांपेक्षां बराच शोभिवंत होता. या समारंभामुळें इकडील बायकांच्या पेहेरावाची व सौंदर्याची धाटणी कळली. त्यांच्या लुगड्यांचे कांठ हात हात रुंद असल्यामुळें तेही विशोभित दिसत होते. देशपरत्वें सगळेंच चमत्कारिक आहे. वर्णही बहुतेक सगळ्यांचा काळाच.

सोंडूरहून पुन्हा मी कांपिहल्लीस आलों व नंतर हासपेटला आलों. हासपेट येथें रेलवेची खाणावळ आहेच. उन्हाळ्यांत, खाणावळीकरितां चांगला मोठा मांडव घालतात. सोंडूरला बल्लारीहूनही जातां येतें. बल्लारीहून सोंडूर १२ कोस आहे व तेथूनही सोंडूरला गाड्या

मिळतात. सोंडूर गांवाचे भोंवतीं डोंगरच आहेत. जेव्हां अधिक महिना येतो तेव्हां कार्तिकांत कृत्तिका योगाचे वेळीं येथें पंचवीस हजारांपर्यंत यात्रा जमते असें म्हणतात. त्यावेळीं चोऱ्यांचा फार सुळसुळाट असतो. एऱ्हवीं सुद्धां असतो पण कमी. एका यात्रेकरू-जवळ हजार दीडहजारांच्या नोटी होत्या. सोंडूरपासून डोंगरावर जातांना मध्यें एक लहान नदी लागते. गडावर स्नानास पाणी चांगलें विपुल नाहीं. वरील पुष्करणीमध्यें स्नान करूं देत नाहींत व धुणें धुऊं देत नाहींत. बाहेर पाणी काढून तीं करावीं लागतात. म्हणून बहुतेक यात्रा येथें या नदीवर स्नान व धुणें आटोपून घेतात व वरच्या तीर्थांत वंदन मार्जन करितात. त्याप्रमाणें हा यात्रेकरू कपडे काढून स्नानास उतरला असतां त्याच्या हालचालीवर नजर ठेवून तो बुडी मारण्याच्या बेतांत व संकल्पाच्या गडबडींत असतां एका भामट्यानें त्याचें जाकीट लांबविलें ! झालें. तपास झाला, शोध झाला, सर्व फुकट गेलें. तेथील राजेसाहेबांस ही गोष्ट कळली व त्यांसही वाईट वाटलें. पण उपयोग काय ? त्यानीं त्याच्याच अजागळपणास दोष दिला. असो. हासपेट-वरून मी गदग हुबळी जंक्शनवरून म्हैसूर मार्गानें

## हरीहर

येथें आलों. हरीहर हें क्षेत्र तुंगभद्रेच्या कांठीं आहे. तुंगभद्रा नदीच स्वतः हरिहरात्मक आहे असें पुराणांतरीं म्हटलें आहे. स्टेशनपासून गांव नजीकच आहे. गांवांत शिरतांच प्रथम श्रीहरिहराचें दर्शनास गेलों. देवळाजवळ धर्मशाळा आहे. ह्या देवळाची रचना जरा निराळी दिसली. बांधणी पूर्व पद्धतीची फार ठेंगणी आहे. देऊळ सर्व दगडी असून खांब फार मोठमोठे व जवळ जवळ असे आहेत. पण फार साधे व वाटोळे आहेत. इतर देवळांप्रमाणें त्यांवर विशेष नक्षी व चित्रें नाहींत. या भागाला पूर्वी गुहारण्य

म्हणत असत. ह्या गुहदैत्याचा नाश करण्याकरतां हरीहरानें एकरूपानें येथें अवतार घेऊन त्या गुहदैत्याचा नाश केला व ह्या अभेद मूर्तीचें भक्तांना दर्शन व्हावें ह्मणून त्यांनीं तुंगभद्रातीरीं निरंतर वास केला त्याचें हें स्मारक आहे. याच देवालयांत अद्वैत मतस्थापक श्रीशंकराचार्य यांचा इतर पंडितांबरोबर वादविवाद झाला त्यासमयीं मंदिरांतील हरिहर देवतेनें 'आचार्यांचें स्वमत जें अद्वैत सिद्धांत तेंच वेदाचें खरें रहस्य आहे,' अशी त्रिवार वाणी उच्चारून आचार्यांचा गौरव केला, अशी तत्प्रांतीं व शंकर दिग्विजयांत कथा प्रसिद्ध आहे. तुंगभद्रेंत हरिहर तीर्थ आहे. तुंगभद्रेचें पाणी कोठेंही फार गोडच लागतें.

येथील मूर्ति गंडकी शिळेची आहे असें ह्मणतात. हिचा आकार हरि—हरात्मक असाच आहे. मूर्ति सुमारें दीड पुरुष उंच व उभी आहे. पाय पाताळांत गेले आहेत अर्थात पावलें दिसत नाहींत. तिचा अर्धा भाग शंकराचा व अर्धा विष्णूचा आहे. शंकराचा अर्धा भाग नग्न आहे. चार हात आहेत व उजवे हातांत शंकराचे बाजूस त्रिशूळ व डमरू असून डावे हातांत विष्णूचे बाजूस शंख व चक्र आहे. शंकरांचा अर्धा मुकूट जटाजुटांचा असून त्यावर चंद्रकला आहे, व दुसरे बाजूचा मुकूट किरिटाप्रमाणें आहे. गळयांत नररुंडमाळा, वैजयंती व वनमाला ह्या कायमच्या ह्मणजे आंगच्या खोदलेल्या आहेत. शिवाय बोराएवढाल्या खऱ्या शालिग्रामांची गुंफलेली माला निरंतर गळ्यांत असते. अशी मूर्ति मोठी व दर्शनीय आहे व ती नेहेमीं वस्त्रालंकार विरहित असते. देवाचे पुजारी ब्राह्मण असून ते नित्य देवालयामध्यें असतात. त्यांचेकडे मीं देवब्राह्मण केला व पुजाही त्यांचे मार्फतच केली. पूजा करण्यास मी स्वतः गेलों असल्यामुळें मूर्तीचें दर्शन फार उत्तम झालें. इतर यात्रेप्रमाणें येथें दर्शनाकरतां धांगडधिंगा घालावा लागला नाहीं. येथेंही सर्वत्र कानडी भाषाच

चालते पण पुजाऱ्याला थोडें कांहीं मराठी समजत होतें त्यामुळें माझें कार्य झालें. बाकी तो आपलेकडून मी मराठीचा प्रोफेसर आहें असें ह्मणत असे! मराठीच्या लिंगभेदामुळें इतर भाषा जाणणाऱ्यांच्या मराठी बोलतांना हास्यास्पद चुका होतात हें प्रसिद्धच आहे; तशाच त्याच्याहि होत असतच. ज्याला रेल्वेजवळचीच यात्रा करावयाची असेल त्याला ही यात्रा करणें फार सुलभ आहे. गांवांत पाण्याचे नळ आहेत व तुंगभद्रा नदी गांवाला अगदीं खेटून गेली आहे. तुंगभद्रेचें पुण्यकारक स्नान व हरीहराचें अभेदात्मक दर्शन यांचा लाभ येथें सहज होतो. मीं देवब्राह्मण केला त्या पुजाऱ्याकडे बायकोमाणूस नव्हतें; तरी त्यानें शेजारणीस बोलावून स्वयंपाक करविला होता, त्यामुळें येथील जेवणाखाणाची रीत, पक्वान्नें व शिस्त वगैरे कळली. येथें स्वयंपाकाची जागा बहुधा छातीभर उंच धक्क्यावर असते. लहान मुलांनीं स्वयंपाकांत लुडबुडावयाला येऊं नये, सोवळें ओवळें व खरकटें याचा घोंटाळा होऊं नये याकरितां ही रीत असावी असें दिसतें.

यानंतर आचार्यांच्या शृंगेरीला जाण्याचा विचार होता. तेथें तुंगानदीचा उगम, शृंगऋषीचें आश्रमस्थान व श्रीशंकराचार्यांचा आद्यमठ इत्यादि अवलोकनीय स्थानें आहेत. यास जाण्यास कुडूरवरून चांगला रस्ता आहे असें ऐकिलें होतें म्हणून कुडुरास गेलों. तेथें गेल्यानंतर, येथून तें फार लांब व गैरसोयीचें आहे असें तेथील स्टेशनमास्तरच म्हणाले व त्यानींच पुढील रस्ता सांगितला. मागेंच बिरूर जंक्शनवरून शिमग्यास रस्ता जातो, त्या रस्त्यावर तारिकारी स्टेशन लागतें. तेथें उतरून स्टीम ट्रामवेनें नरसिंगपुरास जावें व नंतर बैलगाडीनें शृंगेरीस जावें. नरसिंगपुराहून शृंगेरी ३२ मैल आहे. म्हणजे या यात्रेस निदान ८।१० दिवस तरी लागतील असें दिसलें. पण एवढा मला अवकाश नव्हता सबब ती यात्रा राहिली. नंतर शृंगेरीचा नाद सोडून मी

# श्रीरंगपट्टण

ह्या इतिहासप्रसिद्ध व पुराणप्रसिद्ध क्षेत्रीं आलों. येथें श्रीरंगाचें (श्रीविष्णूचें) चांगलें भव्य देवालय आहे. श्रीरंगाची मूर्ति ही फार भव्य ह्मणजे १० फुटांची असून निजलेली आहे. दुसरी भोग मूर्ति (पालखींत घालून फिरविण्याची मूर्ति) आहे तिची पूजा करितात. ती पितळेची असून सुमारें तीन फूट उंचीची आहे. तिच्यावर सर्व प्रकारचे अलंकार घातल्यामुळें ती फार रमणीय व दर्शनीय आहे. श्रीरंगपट्टण हें बेट कावेरी नदीच्या दुभंग झालेल्या पात्रामध्यें आहे. येथें इंग्लिश, निजाम व पेशवे या त्रिवर्गांनीं एक जुटीनें टिपूवर स्वारी केली. त्यांची खडाजंगी हातघाईची लढाई ज्या ठिकाणीं झाली व ज्या ठिकाणीं टिपू पडला तें ठिकाण पाहण्यास गेलों. जगांत राज्यक्रांतीकारक ज्या लढाया झाल्या त्यांपैकीं ही एक आहे. श्रीरंगपट्टणला सभोंवार कोट आहे व कोटापलीकडे कावेरी नदी वाहात आहे. कोटाच्या एका जवळच्या बुरजाजवळच टिपू पडला असें लोकांनीं दाखविलें. या ठिकाणीं म्हैसूर दरबाराकडून येथें पडलेल्या वीरांचें स्मारक संगमरवरी दगडाचें केलें आहे. त्यांत जे प्रख्यात वीर कामास आले त्यांचीं नांवें इंग्रजींत दिलीं आहेत. ते सर्व वीर इंग्लिश आहेत. जगूं काय इंग्लिशांशिवाय प्रख्यात असा कोणताही वीर पडलाच नाहीं! सर्व यश कायतें इंग्लिशांचेंच! लढाईंत जेथें यश आलें तेथें तें इंग्लिशांमुळें आलें व अपयश आलें असेल तेथें तें एतद्देशीय लोकांमुळें आलें असें ब्रिटिश कारकीर्दींत लिहिलेला इतिहास सांगतच आहेत! व इंग्लिशाकरितां परीक्षा देणारे सर्वजण तो पाठ करीतच आहेत!! आणि हें म्हैसूर दरबारासारखें स्वदेशी दरबारही कबूल करतें याचें विशेष आश्चर्य वाटतें! राजकारणामुळें या इंग्लिश स्मारकाला हात घालणें भाग होतें तर दुसरें पण तेथेंच इतरांचें

स्मारकही करावयास पाहिजे होतें. पेशवे, निजाम व खुद्द टिपू यांजकडे एकही मनुष्य नांव घेण्यासारखा नव्हता असें मानणें किंवा तिकडे म्हैसूरसारख्या एतद्देशीय संस्थाननें दुर्लक्ष करणें हा केवळ कालमहिमा आहे, दुसरें कांहीं नाहीं. हें स्मारक सुद्धां म्हैसूरदरबारकडून झालें आहे असा त्यावर स्पष्ट उल्लेख आहे. या ठिकाणीं कावेरीचें पात्र फार उथळ आहे. नदीस पायउतार आहे सबब हीच जागा. नदी उतरून लढाईस सोयीची आहे, असें त्रिवर्गानें ठरविलें असावें.

या ठिकाणीं दुसरें पाहाण्यासारखें ठिकाण म्हणजे 'दरया दौलत' म्हणून टिपूचा हवा खाण्याचा महाल हें आहे व तो अत्यंत रमणीय आहे. हा अगदीं कावेरीच्या कांठीं आहे. सभोंवार सुंदर बाग आहे व आंत दुमजली बंगला आहे. भोंवताले चिकाचे पडदे सोडलेले अद्यापही असतात. बाग अद्यापपर्यंत उत्कृष्ट राखला आहे. त्यांत विलायती शिवाय स्वदेशचि व नानाप्रकारचीं चित्रविचित्र झाडें लाविलीं आहेत. एक झाड ताडासारखें दिसतें पण त्याला केळीसारखीं पानें आलेलीं आहेत! ह्मणजे झाडाचा आकार ताडासारखा पण पानें केळीसारखीं मोटमोठीं व लांब असतात. आफ्रिकेंत किंवा दक्षिण महासागरांत पाण्याचें झाड ह्मणतात तें हेंच असावें असें त्याच्या वर्णनावरून दिसतें. केळीचें पान सुकुमार असतें पण याचें जाड असतें. आफ्रिकेच्या साहारा वाळवंटांत हीं पाण्याचीं झाडें फार आढळतात. त्याच्या कोंबांतून पुष्कळ पाणी निघतें. याला फळें येत नाहींत पण पाणी हेंच त्याचें वैभव आहे. तेथें हें पाण्याशिवाय जगतें व तें हवेंतील ओलावा शोषून आपल्या भागांत पाण्याचा संचय करितें. असे चमत्कारिक वृक्ष अनेक आहेत. बाग पाहिल्यावर बंगल्यांत जातांच त्याच्या भिंतींवर जुन्या पद्धतीनें काढलेलीं लढाईचीं चित्रें सर्वत्र आहेत. त्यावेळीं मराठ्यांच्या सैन्याची रचना कशी होती, निजामच्या सैन्याची

कशी होती, टोपीवाल्याची कशी होती, तसेंच लढाईचे वेळचा टिपूचा भरजरी पोषाक व त्याचे स्वारीचा थाट हीं चित्रांत उत्तमप्रकारें दाखविलीं आहेत. रंग इतके उंची आहेत कीं त्यांस आज १०० वर्षांवर अधिक होऊन गेलीं तरी अगदीं काल रंगविल्याप्रमाणें तकतकीत दिसतात. जिकडे तिकडे सुवर्णमय व रत्नमय महाल आहेत व ते आपल्या जुन्या राजवैभवाची अशा अवनतीच्या काळांतसुद्धां उत्तम साक्ष देत आहेत. येथें जाण्यास सर्वांस मोकळीक आहे व सर्व भाग उघडा आहे; फक्त माडीवर जाऊं देत नाहींत. खालचेंच वैभव पाहाण्यासारखें आहे मग वरचें फारच जास्त चांगलें असेल हें सांगणें नकोच. या बाजूला जाणारांनीं हें ठिकाण अवश्य पाहावें व आपल्या डोळ्याचें पारणें फेडावें अशी शिफारस आहे. या जन्मांत राज्य मिळण्याची त्यांना आशा नाहीं परंतु त्यांच्याकरितां खुन्या असलेल्या ह्या राजवाड्यांत क्षणभर बसून तरी त्यांनीं आपलें कौतुक पुरवावें. याशिवाय लालबाग ह्मणून जवळच एक मशीद आहे,तेथें हैदर व टिपू यांचीं कबरस्थानें आहेत. तिचा घुमट व चार बाजूंचे मनोरे उंचच उंच आहेत. तेथें हल्लीं फकीर राहातात. दिडकी दोन दिडक्या त्यांस दिल्यास ते ती पाहूं देतात. तीही पाहून घ्यावी. वर मनोऱ्याच्या शेवटीं गेलें असतां सर्व बेटाचा देखावा व कावेरीचे प्रवाह यांची मजा दिसते. हें सर्व पाहून मीं

## म्हैसूर

या हल्लींच्या राजधानीच्या शहरांत गेलों. श्रीरंगपट्टण व म्हैसूर यांचेमध्यें पश्चिमवाहिनी ह्मणून एक स्टेशन आहे तेथें कावेरी पश्चिमवाहिनी झाली आहे. या ठिकाणीं पूर्वीं टिपूची राजधानी होती असें ह्मणतात. म्हैसूरची प्रख्याती पूर्वीं नव्हती पण ती टिपूनंतर झाली. हल्लीं म्हैसूर हें शहर नवीन पद्धतीनें बांधलें असल्यामुळें

पाहण्यासारखें झालें आहे. रस्ते रुंद, स्वच्छ व जिकडे तिकडे विद्यु-न्मय आहेत. येथें शहराजवळ एक टेकडी आहे. तिच्यावर सुद्धां जिकडे तिकडे विद्युतदीप आहेत. घरोघरीं, खाणावळींत, थिएटरांत, रेलवे स्टेशनांत, दुकानांत सर्व बाजारांत जिकडे तिकडे विद्युद्दीपांचा लखलखाट आहे, यामुळें रात्रीं या शहराला अपूर्व शोभा येते. राज-वाडा तर आंतून व बाहेरून विद्युद्दीपांच्या निरनिराळ्या रंगाच्या सुशोभित माळांनीं नटविलेलाच दिसतो. हें शहर नवें आहे ह्मणून येथें घाण कचरा, मोडकीं तोडकीं घरें याचा लेशही नाहीं. सर्वत्र सुटीं नवीन दुमजली घरें, बाजार, कचेऱ्या व बागा आहेत कोठेंही गेलें तरी विजेशिवाय दुसरा दिवाच नाहीं. फार काय संडास सुद्धां विद्युन्मयदीपांनीं प्रकाशित असतो. ही वीज म्हैसूर दरबारनें कावेरीस मोठें धरण बांधून त्याचे धबधब्यांनीं उत्पन्न केली आहे व हिचे पासून म्हैसूर दरबारला लक्षावधि रुपयांचें उत्पन्न होऊन शिवाय संस्थानास विशेष शोभा आली आहे. ह्या कारखान्यावर कामगार पूर्वीं युरोपियनच असत पण आतां सर्व देशी आहेत. हा स्वराज्याचा फायदा. परराज्य असतें तर युरोपियन कधींहीं निघाले नसते! येथें गिरण्या वगैरे गांवाबाहेर असतील; पण गावांत गिरणीची चिमणी किंवा तिचा काळा धूर कोठेंही दृष्टीस पडला नाहीं. कदाचित् त्या विजेनें चालत असतील. यामुळें गांवांत कसलीच घाण नाहीं. येथील राजवाडा अप्रतीम पाहण्यासारखा आहे. तो पाहण्याकरितां प्रयत्न केला, परंतु त्याची दुरुस्ती चालली असल्यामुळें तो बंद होता. येथील पदार्थ-संग्रहालय सर्वांत श्रेष्ठ आहे. शहराजवळच्या टेकडीवर जगदंबेचें स्थान व देऊळ पाहण्यासारखें आहे. याला चामुंडी शिखर ह्मणतात. रात्रीं ह्या टेकडीवरील सर्व रस्ते विद्युतदीपानें प्रकाश-मान झाले ह्मणजे ही टेकडी दीपमाळेसारखी दिसते. म्हैसुरचा किल्ला व त्यांतील जुना राजवाडा हीं अवश्य पाहाण्यासारखीं

स्थळें आहेत. येथें ब्राह्मणांचीं मोठमोठीं हॉटेलें आहेत व त्यांत सर्व प्रकारची जेवणाची व राहाण्याची सोय होते. हॉटेलें ऊर्फ खाणावळी जशा पाहिजेत तशा नव्या व जुन्या प्रकारच्या, स्वस्त व महाग, गरीबांच्या व ऐषआरामीच्या अशा सोयींच्या आहेत. येथील दसऱ्याची मिरवणूक व उत्सव राजवाड्यांत फारच थाटाचा होतो असें ह्मणतात. त्याच दिवशीं म्हैसूर दरबारांत लोकप्रतिनिधींपुढें म्हैसूरच्या राज्याचा वार्षिक अहवाल वाचून दाखवितात. सारांश म्हैसूरचे राज्यांत अली-कडील सर्व प्रकारच्या सुधारणा असून सांप्रत तें अतिशय भरभराटीचें ठिकाण असल्यामुळें येथील सर्वच पाहाण्यासारखें आहे. उत्तर हिंदु-स्थानांत जयपूर व दक्षिण हिंदुस्थानांत म्हैसूर हीं शहरें पाहिलीं ह्मणजे जुन्या व नव्या नगर रचनेच्या सुखसोयी कळतील. निदान त्यांची कल्पना तरी होईल. म्हैसूर हद्दींतील रेल्वे, म्हैसूर दरबारनें आपल्या ताब्यांत घेतल्यामुळें इतर रेल्वेप्रमाणें थर्डक्लासांत गर्दी व बसण्यास जागा नाहीं अशी स्थिति किंवा दुसऱ्या रेल्वेंतील अव्यवस्था येथें सहसा दिसत नाहीं. येथील बैल विशेष वाखाणण्यासारखे, धिप्पाड, मोठ्या सामर्थ्याचे, कसलेले व कधींही न थकणारे असे असतात. त्यांची किंमतही तशीच दाणगी ह्मणजे एक हजार रुपये-पर्यंत असते! म्हैसुरानंतर मी

## बंगलोर

येथें गेलों. बंगलोर शहर पाहाण्यासारखें आहे. तेथें मराठी भाषा साधारण चालते पण त्याचे आसपास मराठी भाषा नाहीं. मराठीपासून हा भाग अलग आहे, ह्मणून कोणी हरदास, पुराणीक व व्याख्याता आला ह्मणजे मराठी मंडळीकडून त्याचें मोठें कौतुक होतें. ह्मणून ह्या व्यवसायाच्या मंडळीनें तेथें अवश्य जावें. त्यांची चांगली संभावना

होईल. हे लोक अशा मंडळीची वाट पहात असतात. येथें तलावाजवळ पुर्णय्याछत्तम ही उत्तम धर्मशाळा आहे.

बंगलोर येथें महत्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे तेथें ढेंकूण होत नाहींत हें फार मोठें आश्चर्य आहे. कारण ढेंकूण नाहींत असें जगांत ठिकाण नाहीं. म्हणूनच सुभाषितकार म्हणतात

**कमले कमला शेते हरःशेते हिमालये ॥**
**क्षीराब्धौच हरिःशेते मन्ये मत्कुण शंकया ॥**

अर्थ—लक्ष्मी कमळांतच कां राहाते? खुद्द परमेश्वर महादेव हिमालयावर अगदीं कडक थंडींत कां राहातात? तसाच श्रीविष्णू सातसमुद्रापलीकडे पाण्यांत अगदीं थंड अशा शेषावर कां शयन करितो? ह्या बड्या मंडळीला दुसरे कोठें निवांत जागा मिळत नाहीं ह्मणून? छे, असें नाहीं. सुभाषितकार ह्मणतात:—ही सर्व बडी मंडळी ढेंकणांच्या त्रासानें इतकी लांब पळाली!! इतकें ढेंकणांचें व मनुष्याचें साहाचर्य आहे. इतर ठिकाणचे ढेंकूण बंगलोर येथें नेले तर ते तेथें वांचत नाहींत असें ह्मणतात. बंगलोर येथें इंग्लिशांची रेसिडेन्सी आहे. येथून

## कोलार

येथील सोन्याच्या खाणी पहाण्याकरितां छोटी लाईन सोडून बड्या गाडीनें मी बोरिंगपेठ जंक्शनवर आलों. येथून खाणीकडे जाण्यास फांटा फुटतो. फांटा फुटल्यापासून दोन तीन मैल जातांच सोन्याच्या खाणीच्या गिरण्या दिसूं लागतात. पुढें उरगम स्टेशनवर यावें. ह्मणजे सर्वत्र सोन्याच्या गिरण्यांच्या चिमण्या दिसूं लागतात. व सोनें काढून घेतलेल्या मातीचे मोठमोठे पर्वतप्राय ढीग दिसूं लागतात. खाणी हा शब्द ऐकिल्यावर आपली जी कल्पना होते तशी येथें स्थिति नाहीं. खाण सोन्याची सबब ती उघडी ठेवतां उपयोगी नाहीं हें उघड आहे. या जमिनीचे बरेच खालीं सोन्याचे खडक आहेत ते यंत्रानें फोडून यंत्रावेच लिफ्टनें वर आणतात.

खाणीचें तोंड अगदीं अरुंद ह्मणजे ४ फूट लांब व तीन फूट रुंद असून वर बांधून काढलेलें असतें. त्यांत एक पिंजरा वरून लिफ्टनें खालीं सोडतात. ह्या लिफ्ट दोन असतात. एक वर जाते त्याचवेळीं दुसरी खालीं येते. ह्या लिफ्टमध्यें आठ माणसें उभीं राहातात व ती फार वेगानें त्यांना घेऊन एका मिनिटांत खालीं खाणींत जाते. तेथें नियमित वेळ काम केल्यावर शुद्ध हवा घेण्याकरितां त्यांस वर आणावें लागतें. वर आल्यावर डॉक्टरकडे त्यांची छाती तपासण्याकरितां पाठवितात. इजा झाली नसल्यास सोडून देतात. नाहींतर औषधोपचाराकरितां दवाखान्यांत पाठवून देतात. आंत खाणी प्रशस्त आहेत त्यांत हवा पोंचविण्याचें व विजेच्या प्रकाशाचें--रोषणाईचें--साधन केलें आहे.

खालीं गेल्यावर दगड फोडण्याचें व ते वर पाठविण्याचें काम चालतें. हें सर्व काम विजेनें होतें. ही वीज म्हैसूर सरकारनें कावेरी नदीस धरण बांधून उत्पन्न केली आहे. दगड वर आल्यावर खडी फोडण्याचे यंत्रानें त्याची बारीक खडी करतात. नंतर मोठ्या जात्यानें दळून त्याचें अगदीं बारीक वस्त्रगाळ पीठ करितात. नंतर त्या पिठांत पाणी मिसळून तें मिश्रण फळ्यांवरून सावकाश वाहूं देतात, त्या योगानें मळ, कचरा व माती वाहून जाते व सोन्याच्या मातीचा थर खालीं राहातो. अशा रीतीनें ती माती स्वच्छ धुतल्यावर ती विलायतेस पाठवून देतात त्यावेळीं ती तांबूस असते. विलायतेंत ह्या मातींत पारा मिसळूण सोन्याचे कण बाहेर काढतात. कारण पारा सोन्यासच चिकटतो, मातीस चिकटत नाहीं ह्मणून हे कण निराळे काढतां येतात. त्यानंतर त्यांतून पारा काढण्याकरितां फार आंच देतात. ह्मणजे पाऱ्याची वाफ होऊन तो उडून जातो व निव्वळ सोन्याचा रस शिल्लक राहातो. त्याचा कस व नंबर लावून मग येथें कंपनीमार्फत विकावयास येतें. यापैकीं दगड काढून त्याचा भुगा करून माती पाण्यानें वाहून जाईपर्यंत सर्व कृती दिसते. पण पुढची दाखवित

नाहींत. तसेंच खाणींत खालीं जाऊं देत नाहींत. खाणींत गेलेल्या माणसाबद्दल त्यांजवर जबाबदारी असते. गिरणींत पांच रुपये फी घेऊन पुढची थोडीशी कृती पाहूं देतात. पण अगदीं शेवटपर्यंत जाऊं देतच नाहींत. तेथें सर्व युरोपियन आहेत. पाण्याबरोबर वाहून गेलेल्या गाळाची राहिलेली माती एका बाजूस टाकतात त्या मातीचे पर्वतप्राय ढीग ठिकठिकाणीं झाले आहेत. ह्या ढिगांवरून आजपर्यंत या ठिकाणांतून किती सोनें गेलें याची कल्पना होते. लिफ्टशिवाय खाणींतील सर्व काम विजेनें चालतें. ही वीज कावेरीच्या धबधब्यापासून आणली आहे. त्याबद्दल व खाणींच्या मालकीबद्दल म्हैसूर सरकारास लक्षावधी रुपयांचें उत्पन्न आहे खरें; पण अशानें हिंदुस्थानांतील अस्सल खनिज संपत्ति विलायतेस जात आहे हें अयोग्य आहे.

मी गेलों तो दिवस रविवारचा होता. त्या दिवशीं सर्व खाणी बंद होत्या. फक्त एकदोन खाणी सुरू होत्या ह्मणून मला हें सर्व पाहाण्यास मिळालें, नाहींतर दुसरे दिवसापर्यंत राहावें लागलें असतें. येथें फार कडक बंदोबस्त आहे. या खाणींतील एक राईएवढा दगडही कोणी घेतां कामा नये किंवा ज्यांतून सोनें निघून गेलें आहे अशा मातीचा भुगाही घेतां कामा नये. अशी वस्तू ज्याचेजवळ सांपडेल त्यास एक हजार रुपये दंड व ६ महिने शिक्षा अशा जिकडे तिकडे पाट्या लाविलेल्या आहेत. इतका कडक बंदोबस्त आहे. नुसता दगड हातांत घेऊन पाहूं देतात पण तो त्यांच्या समक्ष टाकावा लागतो! या दगडांतून सोनें निघत असेल अशी कल्पना सुद्धां होत नाहीं. त्यांत कोठेंही चकाकी नाहीं किंवा पिवळे, तांबडे किंवा पांढरे कसलेही कण चकाकत नाहींत. पाणी वाहून गेलेल्या मातींत सुद्धां हा प्रकार दिसत नाहीं. मात्र हे दगड इतर दगडांपेक्षां जरा जड लागतात एवढेंच. पण या पेक्षांहीं पुष्कळ दगड जड असतात परंतु माहितगार मनुष्याशिवाय तो ओळखतांच यावयाचा नाहीं.

हा दगड थोडा भुरकट व मऊ असतो. सोनें काढून घेतलेला भुगा सीमेंट सारखा दिसतो.

या भागांत मूळची वस्ती मुळींच नव्हती; परंतु खाणीचें काम सुरू झाल्यामुळें जिकडे तिकडे मजुरांकरतां झोंपड्या व ऑफीसरांकरतां बंगले झाले आहेत. वस्ती मोठी व महत्वाची झाल्यामुळें अर्थात कोर्ट, कचेऱ्या, बाजार, पोस्ट, सडका, रेल्वे वगैरे सर्व कांहीं येथें झालेलें आहे. अर्थात ब्राह्मणांची खाणावळही झाली आहे पण ती गांवामध्यें आहे. गांव स्टेशनापासून थोडा लांब आहे. इकडील ब्राह्मणांचा खाणावळी घालणें हा एक धंदाच दिसला. ब्राह्मणांशिवाय इतरांच्या खाणावळी नाहींत. सोनें काढण्याच्या गिरण्या इकडे फार आहेत. निदान १००।१५० तरी मला दिसल्या व त्यांनीं ४० चौरस मैल जागा व्यापिली आहे असें ह्मणतात. हा सर्व प्रदेश सोन्याचाच आहे. हें सोनें ज्या खडकांतून निघतें तो लाव्हापासून बनला असावा. पृथ्वींतून जेव्हां लाव्हा निघाला त्या वेळीं त्याच्यांत इतर धातु अतिशय तप्त होऊन त्यानें उत्पन्न झालेल्या खडकांत त्यांचें सोनें बनलें असावें. प्रत्येक धातूचें किंवा पदार्थाचें अतीशय तप्ततेनें सोनें बनतें असें रसायन शास्त्रेत्यांचें ह्मणणें आहे. मातीलाच पृथ्वींतून कमजास्त उष्णता लागल्यामुळें तिचे दगड, धातु व पदार्थ उत्पन्न झाले असावे, असें ह्या शास्त्रानें सिद्ध केलें आहे. सारांश मृत्तिकेलाच निरनिराळी उष्णता लागल्यामुळें तिचे निरनिराळे पदार्थ व धातु झाले आहेत. सर्वांची अंत्यावस्था सोनें आहे; याच दृष्टीनें सोन्यास अग्नीची विष्ठा असें आमच्या पूर्वजांनीं नांव दिलें आहे. ह्मणजे ते रसायन शास्त्रांत पूर्वत्वास पोंचले होते असें दिसतें. या जग प्रख्यात खाणी सवड असेल त्यांनीं एकदां तरी पाहून घ्याव्या. वर लिहिलेल्या गोष्टींशिवाय येथें सोनें कसें होतें या संबंधाची सर्व जिज्ञासा पुरी होत

नाहीं. प्रथम खाणींत जाऊंच देत नाहींत! तरीपण सोनें सांपडण्याला जागा कशी पाहिजे, दगडामध्यें काय काय द्रव्यें असावीं लागतात, असा दगड किंवा खडक कोणत्या भोंवतालच्या परिस्थितींत सांपडतो वगैरे माहितीही जमीन पाहून भूगर्भ शास्त्रवेत्त्याला याचे पासून बरीच होईल. भाषा कानडी व इंग्रजी चालते.

या खाणी पाहून आल्यावर पुन्हां मी बोरिंग पेठ स्टेशनवर आलों. व तेथून जालर पेठ, सालेम, येरोड, व फोडान्द्र जंक्शन वर आलों. तेथून एक फांटा मंगलोराकडे जातो व एक निलगिरीकडे जातो. निलगिरीच्या दक्षिणेस सह्याद्री संपल्यामुळें पूर्वसमुद्र व पश्चिमसमुद्र यांमधील जमीन सपाटच लागते. घाटाची कटकट नसल्यामुळें रेल्वे पूर्वसमुद्रापासून पश्चिम समुद्रापर्यंत जिकडे तिकडे गेली आहे. मंगलूर सुद्धां पाहाण्यासारखें आहे. येथील माती उंची असल्यामुळें सर्व हिंदुस्थानाला मंगलोरी कौलें पुरविणारे कौलांचे कारखाने तेथें पुष्कळ असून पाहाण्यासारखे आहेत. पण वेळ नव्हता ह्मणून मी

## उत्तकमंड

या हिल स्टेशनवर येण्याकरतां निलगिरी रेल्वेवर जाण्याचा रस्ता धरून मटापालियमवर आलों. मटापालियमपासून निलगिरी रेल्वे लागते. या रेल्वेचे नियम निराळे आहेत. ही उत्तकमंडपर्यंत २९ मैल आहे व त्यांत १३ स्टेशनें आहेत. ह्मणजे सुमारें २।३ मैलांवर स्टेशन आहे. यावरून या सर्व पर्वतांच्या रांगांवर चांगली जिकडे तिकडे वस्ती पसरलेली आहे. खालीं खालीं हिंदूंची वस्ती आहे व वर युरोपियनांची लागत गेली आहे. येथील हवा थेट विलायतेप्रमाणें असल्यामुळें पुष्कळ युरोपियन लोक येथें कायमची वस्ती करून पेनशन घेऊन बंगले बांधून राहिले आहेत. येथें उन्हाळ्यांत मद्रासचे गव्हर्नर हवा खाण्याकरतां

येतात. त्यांचें हें हवा खाण्याचें ठिकाण आहे ह्मणून येथील म्युनिसिपालिटीचा बंदोबस्त फार कडक आहे. रोज दोन गाड्या जातात व दोन येतात. त्यांतसुद्धां एक मेल एक पॅसेंजर केली आहे! मेल केली आहे ह्मणजे त्यांत सुखसोई जास्त केल्या आहेत किंवा तिचा वेग जास्त केला आहे किंवा ती मधून मधून उभी राहात नाहीं असें मुळींच नसून, फक्त पैसा वसूल करण्यांत तेवढी मेल! जातांना गाडी इतकी गच्च भरून जाते कीं बसावयाससुद्धां कष्टानें जागा मिळते; पण येतांना बहुतेक रिकामी येते. वर जाण्याकरतां बैलगाड्यांची सडकही चांगली आहे. त्यावरून बैलगाड्या जातात व मालही जातो. परत येतांना त्यांत माणसें बसून येतात किंवा पायीं येतात; यामुळें रेल्वेला येतांना माणसें मिळत नाहींत. ह्मणून रेल्वेनें दरच वाढविले आहेत. येथील रेल्वेचा वेग फार कमी आहे ह्मणजे ताशीं ४।५ मैल एवढाच आहे. या गाडीला १।२ मालाचे डबे ३।४ थर्ड क्लासचे व १।२ फर्स्ट व सेकंड क्लासचे डबे मिळून ८।९ डबे असतात. गाडी लहान असल्यामुळें हिच्यांतून मोठ्या गाडीच्या १।२ डब्यांएवढाच ऐवज जातो!! ही गाडी एकाच एंजिनानें वर जाते. हिचें एंजीन गाडी वर जातांना ती घसरूं नये किंवा डब्याच्या सांखळ्या तुटूं नयेत ह्मणून तें गाडीच्या चढावाच्या वेळीं मागें लावतात व येतांना पुढें लावतात. चढाव बराच आहे. गाडी घसरूं नये व वर वेगानें जावी ह्मणून दोन रूळांच्यामध्यें आणखी तिसरा रूळ खांचणीचा केला आहे. त्यावरून एंजिनाचें एक चाक फिरतें त्यालाही खांचा केल्या आहेत. त्या रुळांत तें चाक दात्यांत दांते अडकल्याप्रमाणें बसतें यामुळें गाडी घसरण्याचा मुळींच संभव नसतो. या गाडीचें एंजीन व डबे हे निराळेच आहेत. भोंवतालची शोभा दिसावी ह्मणून डबे छपराशिवाय उघडेच असतात. एंजीनाचीं चाकेंही डबलच असतात. ह्मणजे बाजूला असून मध्येंही असतात. या रेल्वेवर

१० शेर ओझेंच माफ आहे. शिवाय वर जावयाच्या ओझ्याचे दरही निराळे आहेत. यामुळें इतर ठिकाणांहून आणलेलें ओझें येथें पुन्हा तोलतात व चार्ज करतात, सबब गाडी निघण्यास फार उशीर लागतो.

हे निलगिरी पर्वत हिमालयासारखेच आहेत. हिमालयांत व यांत थोडासा फरक आहे. हिमालय पर्वतांत चढउतार व नद्यांचे ओघ फार मोठाले आहेत, तेवढे येथें नाहींत. टेंकडीवर टेंकडी, खोऱ्यांचे बाजूला दुसरीं खोरीं, अशी याची रचना आहे; यामुळें सारख्या चढावानें रेल्वे व बैलगाडीची सडक नेण्यास सोय झाली आहे. येथील सृष्टिशोभा व हवा हीं पहिल्या भागांतील हिमालया-सारखींच आहेत. मी गाडींतून जात असतां भोंवतालच्या देखाव्या-वरून हिमालयाचीच मला आठवण झाली. जिकडेतिकडे डोंगरांचीं शिखरें व त्यावर मेघमंडळ, झाडी, दऱ्या, खोरें यांची मजा दिसली. पण तेथें पर्वतावर पाण्यांचे प्रवाहांच्या माळा असत तशा येथें नाहींत. त्याबद्दल येथें त्यांच्यावर मोठमोठ्या दगडांच्या रुद्राक्षासारख्या माळा आहेत. हिमालयांत बंगले नाहींत; इकडे सर्वत्र आहेत. हें ठिकाण समुद्र सपाटीपासून सुमारें दीड मैल उंच आहे व हिमालय ४ मैल आहे. हा विषुववृत्ताजवळ आहे व तो लांब आहे अशा दृष्टीनें यांत पुष्कळच फरक आहे. हिमालयाप्रमाणें यांत कोणत्याही गोष्टीचा अतिशयपणा नाहीं. मी मटापालियमाला ह्मणजे निलगिरीच्या पायथ्याच्या स्टेशनवर होतों तेव्हां उष्ण हवेमुळें अंगावर कपडाही ठेववत नव्हता. पण गाडींत बसून जसजसा वर येत चाललों तस-तसे नवीन कपडे काढून आंगांत घालावे लागले. गाडी सकाळीं १० वाजतां मटापालियमपासून निघाली ती संध्याकाळीं ४ वाजतां उत्तकमंडला पोंचली! तरी ही मेल होती!! स्टेशनवर उतरतों तों सर्व थाट युरोपियन चालीचा. मी एक कुली करून त्यास ब्राह्मणाचे खाणावळींत चल ह्मणून सांगितलें. तो

ह्मणाला येथें ब्राह्मणाची खाणावळ नाहीं, हॉटल आहे. मग मी त्याचे बरोबर हॉटेलमध्यें गेलों. हॉटेलवाला तेलंगी ब्राह्मण असून सहकुटुंब सहपरिवारें रहात होता. त्यास जेवावयास मिळेल काय म्हणून विचारलें, परंतु त्याला तेलंगी व कानडीशिवाय कांहीं समजेना. त्याचे दुकानावर एक विक्री करणारा नोकर होता, त्याला कांहीं इंग्रजी व हिंदुस्थानी शब्द येत होते; त्यांवरून व कांहीं खुणांवरून मला आपले मनोविकार त्यास दाखवावे लागत. या मानवी खुणांच्या आद्यभाषेवरून समजलें कीं, येथें जेवावयाचें तयार नसतें. पण कोणी आगाऊ पैसे देऊन सांगितल्यास फक्त ब्राह्मणांस मिळतें व तेथें त्याची राहण्याची सोयही होते. असें समजल्यामुळें समाधान झालें. जागा साधारणच होती व ओलही बरेंच होतें. पण ब्राह्मण वस्ती असल्यामुळें व स्टेशन, बाजार जवळ असल्यामुळें तीच जागा पसंत करून मी आपलें पाकीट तेथें ठेविलें. भाषा समजेना ह्मणून बोलण्याचा फारसा इलाज नव्हताच. मीं पोंचलों तों पांच वाजले; त्यावेळीं आकाश निरभ्र असून ग्रीष्म ऋतु होता, तरी शरद् ऋतूची सृष्टिशोभा पहावयास मिळाली. दिवे वगैरे लावल्यावर संध्याकाळीं भोजनाची व्यवस्था झाली. येथें चहापेक्षां गरम कॉफीचाच सांप्रदाय फार आहे. येथें जिकडे तिकडे युरोपियनांचे चहाचे मळे आहेत, तसे कॉफीचेही आहेत. निलगिरीचा चहा फार स्वादिष्ट ह्मणून प्रसिद्ध आहे पण या ठिकाणीं चहा कोणी घेत नाहींत. जेवण झाल्यावर जसजशी रात्र पडत चालली तसतसा थंडीचा कडाका जास्त वाटु लागला. जागा बंदोबस्ताची होती तरी थंडी जास्त भासली. कारण खालून वर आल्यामुळें हवेमध्यें एकदम फरक पडला व तो शरिरास सोसेना. जे नेहमीं राहाणारे आहेत त्यांस संवयच झालेली होती तरी ते विशेष तयारींत असत; म्हणजे घरांत नेहेमीं शेगडी पेटलेली असे. मी कसेंही करून रात्र काढली. उजाडल्यावर शौचविधि वगैरे झाल्यावर सूर्योदय झाला तेव्हां तो दिवस दिवाळीसारखा

मनोरम वाटला. घरांतील मंडळी सुद्धां लौकर उठली होती. त्यांचें पहिलें काम म्हणजे चूल पेटवून पाणी तापत ठेवणें; कारण त्या शिवाय शौचविधि होतच नाहीं. थंड पाण्यांत हात बुडविण्याची सोयच नाहीं. शौचविधि झाल्यावर स्नान करणेस मी रीतीप्रमाणें थंड पाणी मागितलें तेव्हां त्यांनीं सांगितलें थंडपाण्याचें स्नान येथें चालणार नाहीं. ऊन पाण्याचे पैसे फार तर देऊं नका पण थंडपाण्याचें स्नान करूं नका असें दुकानदारानें मोठ्या प्रेमानें मला सांगितलें. पण या पेक्षां सुद्धां कडक थंडी असली तरी मी थंड पाण्याचेंच स्नान करतों, मला हिमालयाचा अनुभव आहे, सबब कांहीं हरकत नाहीं असें सांगून मी नळाखालीं कसें तरी थंडानें स्नान केलें व संध्या आटपून नमस्कार थोडे जास्त घातले. यामुळें शरिरास थोडी ऊब आली व लगेच कपडे घालून जरा क्षणभर बसलों.

दुकानांत विक्रीकरतां ताजे पदार्थ करण्याचा त्यांचा क्रम चाललाच होता. येथें शिळा पदार्थ दुकानांत ठेवितां उपयोगीं नाहीं; म्हणून एकदा पदार्थ शिळा राहिल्यास त्यास पुन्हां ताजेपणाचा संस्कार करून ठेवावा लागतो. दुकानदार स्नान न करतां भस्म व तांबडें गंध याची घोंडमट्टी करून तो गिऱ्हाइकाची वाट पहात बसला होता. सकाळची गिऱ्हाइकी म्हणजे कॉफीची; त्याप्रमाणें भराभर मंडळी येत होती. युरोपियनसुद्धां इतरांच्यापेक्षां ब्राह्मणाचें दुकान मिठाईला पसंत करीत असें दिसे. ती गिऱ्हाईकांची मजा पाहिल्यावर ८ वाजतां मी बाहेर पडलों. बाजारची शोभा पाहिल्यावर मार्केट व शहर पाहिलें. जिकडेतिकडे अगदीं व्यवस्थितपणा दिसला. घाण कोठेंही नाहीं. व्यापारी मुसलमान, पारशी वगैरे सर्व जातीचे दिसले. नंतर मी वनश्री पाहाण्यास गेलों. युरोपियनांचे बंगले डोंगराचे उतरणीवर असल्यामुळें सारखी शोभा दिसे. जिकडेतिकडे सडका होत्या. असें चढत चढत मीं दोडाबेटा शिखर पाहाण्यात वर गेलों. हें

शिखर समुद्रसपाटीपासून सरासरी २ मैल उंच आहे, ह्मणजे महाबळेश्वराच्या दुप्पट आहे.

हिमालयांत जशीं देवदाराचीं व सुरूचीं झाडें पुष्कळ आहेत तशीं येथें त्याच स्वरूपाचीं व गगनचुंबित अशीं ब्ल्यूगम नांवाचीं आस्ट्रेलियन झाडें आहेत व हीं आपलेकडील जांभळीच्या झाडासारखीं आहेत. याला येथें कापराचीं झाडें ह्मणतात पण यांपासून कापूर कांहीं निघत नाहीं. या झाडांचीं दाट जंगलें आहेत व हीं या ठिकाणीं आपोआप उगवतात. ह्या झाडांमुळें येथील वस्तीस सर्पणाचा पुरवठा झाला आहे. नाहींतर एक लाखापेक्षां जास्त वस्तीला एवढ्या उंचीवर सर्पण पुरविणें कठीण झालें असतें. हीं झाडें आपोआप उगवतात व उष्ण कटिबंध असल्यामुळें भराभर वाढतात. सरकारास यांचें उत्पन्नही फार आहे. हीं झाडें कोणासही तोडण्याचा हुकूम नाहीं. जंगलखात्याच्या सरकारी वखारींतून लांकडें नेलीं पाहिजेत. येथील म्युनिसिपालिटीस रस्ते झाडण्याचें व शिंपण्याचें मुळींच काम नाहीं. कारण हीं कामें येथें नेहमीं लंकेश रावणाच्याप्रमाणें वारा व पाऊस उत्तम प्रकारें करतात. ह्मणजे निलगिरीवर बाराही महिने पाऊस, थंडी व वारा आहे, पण बर्फ नाहीं. या कामगिरीबद्दल मेघांना बक्षीस काय तर त्यांनीं माकडांप्रमाणें गिरिशिखरावर बसून निलगिरीची हवा खावी व वाऱ्याचे संगतीनें हंसत खेळत डोलावें! मी दोडावेटाच्या शिखरावर गेलों व तेथून सर्व वनश्रीची शोभा पाहिली. सृष्टिसौंदर्यांत मनुष्यकृतीच्या सौंदर्याची ह्मणजे बागबगीचे व बंगले यांच्या शोभेची भर अधिक पडल्यामुळें त्या ठिकाणास विशेष शोभा आली होती. तेथें एका खोऱ्यामध्यें एक सर्पाकृती लांबच लांब कृत्रिम सरोवर केलें असून तें स्टेशन जवळच आहे. भोंवताली ह्या सृष्टिदेवीकडे आलेल्या बायका—गिरीपंक्ति व त्यांच्या मुली टेकड्या—त्यांनीं आपल्या मांडीवर ह्मणजे पाहिऱ्यांवर ह्मणजे तळावर लहान लहान निरनिराळ्या

पोपाखांत घेतलेलीं मुलें--ह्मणजे बंगले, घरें व त्या प्रत्येका सभोंवतीं फलपुष्पांचे, ताटव्यांचे त्यांनीं घातलेले आंगरखे व सडकांच्या रत्नमाळा व त्यांवर गुंजारव करीत जाणाऱ्या भुंग्यांच्या माळा ह्मणजे पों पों करीत जाणाऱ्या मोटारी, आपल्या धन्याला पाठीवर घेऊन व त्यांच्या इच्छेप्रमाणें स्वैरगमन करून त्यांचे वैभव 'टों टों' 'पों पों' अशा उंच स्वरानें गुंजारव करीत व रस्ता आपल्या वेगानें झाडून मोकळा करीत जात होत्या. हें पाहून त्यांच्या धन्यांनासुद्धां आपल्या वैभवाची कृतार्थता वाटत होती, कारण हल्लीं मजुर वर्ग त्यांच्यावर नाखुष झाल्यामुळें त्यांचे वैभव कोणी गात नाहीं. तेव्हां त्यांच्याबद्दल ह्या निर्जिव गणिका सजीवांप्रमाणें कीर्ति गाऊं लागल्या हें पाहून त्यांना अत्यंत आनंद कां वाटणार नाहीं? आपल्या तारुण्यानें कृतार्थ झालेल्या व अत्यंत सौंदर्ययुक्त अशा त्या मोटारी, उघड्या बग्यांतून विलासी लोकांचें आपल्या बायकांमुलांसह फिरणें, मध्येंच मणिमंगलसूत्रासारखें तें सुंदर सरोवर, तसेंच मधून मधून वर डोकें काढून पहाणारे बगीचे, कृत्रिम व अकृत्रिम फुलांचे ताटवे, चहा, कॉफी, सिंकोना यांच्या बागा व त्यांच्या चमत्कारिक कृत्रिम रचना हे सर्व दागिने त्या सख्यांनीं घालून, नटून थटून त्या सृष्टिदेवीकडे वसंतपूजेला ह्मणजे हळद कुंकवाला आल्या होत्या. उन्हाचा उपद्रव मुळींच नाहीं, हवा आल्हादकारक व मनावर परिणाम करणारी, जिकडे तिकडे सुगंध, जणू काय वनश्रीनें आपल्या सर्व सख्या गोळा करून आमच्यासारख्या अभ्यागताची ही वसंतपूजाच आरंभिली आहे असें वाटून आपण येथून उठूंच नये व येथेंच असें परमेश्वराचें अगाध कौतुक पहात तपश्चर्या करीत बसावें असें वाटलें व त्याप्रमाणें थोडा वेळ बसलोंही. नंतर सहज घड्याळाकडे पाहिलें तों ११ वाजून गेले, तेव्हां निरूपायानें उठलों. वेळ कुणीकडे गेला याचें भानच राहिलें नाहीं.

मैदानी हवेपेक्षां पहाडी हवेंत हेंच विशेष आहे कीं, तेथें कितीही श्रम केले तरी बुद्धीला व शरिराला थकवा येतच नाहीं. म्हणूनच आमच्या पूर्वज ऋषींचे आश्रम, अतींद्रिय वादाचे प्रश्न सोडविण्याकरतां तीव्र बुद्धि उत्पन्न व्हावी म्हणून उंच डोंगावर बांधलेले असत. तेथें राहून, तप करून त्यांनीं अतींद्रिय वादाचे, ईश्वराविषयक, तसेंच सृष्टि उत्पत्तीचे व प्रलयाचे आणि धार्मीक व वैशेषिक नीतीचे बिकट प्रश्न हितपरिणामी असे सोडविले. आणि त्या त्यांच्या गहन विचारसरणींवर हल्लींचे त्यांचे छिचोर वंशज कांहींएक विचार न करतां केवळ परकीयांच्या नादीं लागून, चहा पिऊन व विडी ओढीत बेदरकार टीका करतात व आपले अकलेचे तारे तोडतात याला काय म्हणावें ? घर फिरलें ह्मणजे घराचे वांसे फिरतात हेंच खरें. ही हवा ताकदवान् असल्यामुळें गव्हर्नर किंवा गव्हर्नजनरलासारखे फार जबाबदार अधिकारी ह्याच कारणाकरितां गिर्यारोहण करतात. ह्या गिर्यारोहणाचे खर्चाबद्दल लोकनियुक्त नामदारांनीं कौन्सिलांत कित्येक वेळां तरी टीका केली. परंतु सरकारनें तुम्हांला समजत नाहीं अशींच रोखठोक उत्तरें वेळोवेळीं दिलीं आहेत असें म्हणतात. उष्ण कटिबंधांत समुद्रसपाटी-पासून जमीन दोन मैल जर उंच गेली तर हवापाण्यांत काय काय चमत्कार होतात हें येथें चांगलें समजतें. ही हवा ताकतवान् असल्या-मळें शरीर व मनाचें पोषण होऊन आयुष्य वाढतें. विशेषतः लहान-प ीं ही हवा मिळाल्यास पुढें मनुष्य सकस व जोरदार होतो. यासाठीं गव्हर्नर, कमिशनर, कलेक्टर, मिलिटरी कॅंप, दवाखाने, व युरोपियन मुलांमुलींकरितां शाळा, जिमखाने या सर्वांची फक्त युरोपियनांकरतां येथें सोय केली आहे. यांत नेटिव्हांचा संबंध नाहीं व ह्या हवेला त्यांचा बिलकूल विटाळही होतां कामा नये. नेटिव्हांनीं येथें यावें पण युरोपि-यनांचें सुख वाढविण्याकरितां यावें, त्यांच्या सुखाचे भागिदार होण्या-करतां येऊं नये. ह्मणजे विलायती मालाचीं लहानसहान दुकानें

घालावीं व कसातरी आपला गुजारा करावा. किंवा मोलमजुरी करून व पट्टेवाले, कोचमन, अशीं कामें करून पाहिजेतर ही हवा खावी. पण तींही मोठ्या अदबीनें व केवळ नोकरासारखी खावी असाच येथें जिकडे तिकडे प्रकार दिसला. उत्तकमंड हें आमचें असून आम्हींच आमच्या उन्नतीकरितां चोर व गुलाम झालों आहोंत ! निलगिरीच्या दोडाबेटा गिरिशिखराच्या माथ्यावर अत्युच्च ठिकाणीं एका झाडाखालीं बसलों असतां हा खालील सर्व देखावा फक्त युरोपियनांकरतां आहे असें पाहून व जेत्यांच्या ह्या मूर्ख समजुतीबद्दल मनाला फार वाईट वाटलें. पण रावणापासून जे ते राजे असा मुस्कट दाबीचा बंदोबस्त करीतच आले. कंसानें, हिरण्यकश्यपूनेंहि असेंच केलें; तरी त्यांचें राज्य जावयाचें त्यावेळीं गेलेंच. याचें कारण काय तर सृष्टीची किंवा ईश्वराची घडामोड कोणास चुकावयाची नाहीं. तो काळ आला ह्मणजे कल्पनेबाहेर परिस्थिति उत्पन्न होते व त्यापुढें मनुष्य प्रयत्न व्यर्थ जातो. हल्लीं आफ्रिका, फिलिपाईन बेटें व मिसर येथेंही तोच प्रकार चालला आहे, तेव्हां केवळ आपल्यालाच वाईट वाटण्याचें कारण नाहीं; तेही आपले भागीदार आहेत असें मनांत येऊन व हल्लीं हिंदुस्थानरूपी सिंह जागा होऊन थोडा विचारी होऊन आपण खरे सिंह आहों अशी त्याची भावना होत आहे, हें पाहून मनाला थोडा संतोष वाटला व तेथून निघालों तों बारा वाजायला झाले. इतका वेळ कसा झाला हें लक्षांतसुद्धां आलें नाहीं. उतारच होता तरी घरीं येण्यास एक वाजला. जेवण तयार होतेंच. लगेच जेवून दोन वाजतां मालकाचा व घरांतल्या मंडळीचा नुसत्या खुणांनींच व नमस्कार वगैरे करून निरोप घेतला. सर्व मुलेंमाणसें बायकासुद्धां आपल्याकडून आभारदर्शक असें कांहीं बोलत असाव्या असें त्यांच्या आनंदाच्या मुखचर्येवरून व मर्यादेच्या भाषेवरून दिसलें. त्यांनीं असेच येत जा व पत्र पाठवीत जा असें दर्शवून आपला पत्ता

दिला व माझा पत्ता टिपून घेतला. नंतर कुली करून मी स्टेशनवर आलों व तीन वाजतां गाडींत बसलों. येथें येतांना फार गर्दी होती यामुळें गिरिशोभा कांहीं पाहातां आली नाहीं. पण जातांना गर्दी मुळींच नसल्यामुळें घांटाची शोभा, धबधबे, रेलवेचीं वळणें वगैरे मनसोक्त पाहातां आलीं व त्यामुळें उत्तम मनोरंजन होऊन वेळ केंव्हां गेला हें समजलें नाहीं.

वाटेंत जीं स्टेशनें लागतात त्यांत कुणूर हें मोठें आहे. येथें वस्ती ८।१० हजार असून बाजारपेठ उत्तम आहे. पर्वताच्या माचीवरून अनेक बंगले बांधिले आहेत. उत्तकमंड व कुणूर यांच्यामध्यें बरीच रहदारी असल्यामुळें यामध्यें एक दोन लोकल् गाड्या जास्त ठेविल्या आहेत. पाश्चूर इन्स्टिटयूशन व त्यासंबंधाचा सरकारी बगीचा हीं येथें आहेत. पिसाळलेले कुत्रे चावले असतांना ते बरे करण्याचा हा सरकारी दवाखाना आहे. कुत्रें खरेंच पिसाळलें असून तें चावलें आहे असा स्थानिक सर्जननें दाखला दिल्यास, कांहीं रेलवे फुकट व कांहीं अर्ध्या भाड्यानें येण्याजाण्यास तिकीट देत असत पण आतां इकडे येऊं नये असा सरकारी ठराव झाला आहे. येथें आल्यावर रोग्यास खाण्यापिण्याबद्दल कांहीं खर्च करावा लागत नसे व तो सरकारांतून मिळे, असें आजपर्यंत होतें पण आतां तो प्रकार बंद झाला आहे. निलगिरी रस्त्याच्या स्टेशनावर आक्रोडें व जायफळें यांची कच्चीं पक्कीं फळें जंगली लोक गाडीवर विकावयास आणितात. त्यांचीं जंगलें येथें फार आहेत. उत्तकमंड येथून म्हैसूर, त्रावणकोर येथें जाण्यास प्रशस्त घांट आहेत. म्हैसुराकडून येथें येण्याला रेलवेही होणार आहे असें ऐकिलें. तसें झाल्यास म्हैसुराहून येथें येण्याला जो मोठा हेलपाटा पडतो, तो पडणार नाहीं. येथें चहाकाफीचे मळेवाले, मिशनरी व सुखवस्तू पेन्शन घेऊन राहिलेले असे पुष्कळ युरोपियन घरें बांधून राहिले आहेत. अशा रीतीनें युरोपियनांचे बंगले, बागा व

सृष्टिशोभा पहात आमची गाडी ६॥ वाजतां मटापालियमला आली व उष्णता भासूं लागल्यामुळें आंगांतील कपडे काढावे लागले. एकं-दरींत निलगिरीचा प्रवास फारच सुखावह झाला. ह्यावेळीं मी विला-यतेंतच आहे असें वाटलें कारण हवा व राहणी अगदीं तशीच आहे त्यामुळें त्याच्याकरतां खर्च केलेल्या जास्त पैशाचें सार्थक झालें. हें सुख आम्हीं एकटेच भोगीत नसून त्या सुखाचे भागीदार आम्हीं आमचे वाचकवर्गास करीत आहों. ह्या इहलोकच्या यात्रेंतसुद्धां सृष्टिसौंदर्य व ईश्वराचा महिमा आहेच. येथील चहाच्या मळ्यांमध्यें चहाचीं झाडें मोठालीं करीत नाहींत. कंबरेच्यावर त्यांना उंच वाढूं देत नाहींत. पानें कोंवळीं असल्यामुळें चहा स्वादिष्ट होतो. मटापा-लियमला आल्यावर दुसरी गाडी ७॥ लाच निघणार होती ह्मणून संध्या,फराळ वगैरे आटपून गाडींत बसलों. परंतु गर्दी नव्हती कारण आतां गाडी मोठी होती. येथून

## मदुरा

येथें मिनाक्षीचे दर्शनास जावयाचें ह्मणून फोडानूर जंक्शन-पासून परभारें मदुरेस जाण्याकरितां दिंडिगलवरून रेलवे रस्ता घोरप-ड्यांच्या नकाशांत दाखविला होता व त्याप्रमाणें मी आपला कार्य-क्रमही ठरविला होता. परंतु असा रस्ता अजून झाला नाहीं असें नवीन रेलवेगाईडवरून समजलें व प्रत्यक्ष चौकशी अंतीं तें कायम ठरलें ह्मणून फिरून येरोड, त्रिचनापल्ली, दिंडीगल हीं जंक्शनें ओलां-डून द्राविडी प्राणायामानें मदुरेस यावें लागलें. फोडानूरपर्यंत मी पॅसें-जरनें आलों व पुढें लांबचा प्रवास ह्मणून मेलनें करावा असें ठर-विलें. आमची गाडी रात्रीं १० वाजतां फोडानूरला आली. तेथून दुसरी मेल गाडी १०॥ वाजतां निघणार होती व ती अगदीं तयार होती परंतु तिकीट कोठें काढावें हें समजेना. स्टेशनवरील सर्व पाट्या

एकदोन वेळां वाचून पाहिल्या पण पत्ता नाहीं. शेवटीं एका तिकिट कलेक्टरास थर्डक्लास तिकीट ऑफिस कोठें आहे ह्मणून विचारलें. तेव्हां त्यानें सांगितलें, ह्या स्टेशनवरचा पूल उलटून गेल्यावर पलीकडे धर्मशाळा आहे तेथें आहे! बोजा घेऊन धांवावें तर तो जड, सबब तो एका मनुष्याजवळ ठेवून मी तिकीट काढून कसा तरी आलों. अशा वेळीं बोजा दुसरे कोणी नेला तर काय करणार? बरें तो घेऊन हिंडणार तरीं कोठें? वेळ कोठें आहे? कुली तरी कसचा मिळतो? रात्रीची वेळ व सर्वच गडबड, अशा वेळीं परमेश्वरावर किंवा देवावरच भरंवसा ठेवून कामें करावीं लागतात. भाषा भिन्न असल्यामुळें चौकशीही फारशी करतां येत नाहीं. सर्वांना इंग्रजी कोठें येतें? सबब परमेश्वरावरच हवाला ठेवला पाहिजे, ह्मणजे अशानेंच मनाला परमेश्वराच्या विश्वासाचीच संवय लागते व मन स्थिर होतें. आपण कोणाचाच अपहार केला नसला तर आपणावरही परमेश्वर तसा प्रसंग सहसा आणीत नाहीं. इतकेंच नव्हे तर तो आपला पाठीराखा होऊन आपल्याला सर्व प्रकारची मदतच करीत असतो, असेंच वारंवार प्रत्ययास येतें. मनुष्य कृतघ्न झाल्यास इलाज नाहीं पण आपण ज्याच्याजवळ बोजा ठेवितों त्याचें नांव गांव कांहीं माहित नसतें आणि असलें तरी तो सांगेल त्याच्यावरच भरंवसा ठेवणें भाग आहे. त्याला विपरीत बुद्धि झाल्यास परदेशांत आपण काय करणार? अर्थात तो मनुष्य नसून परमेश्वरच मनुष्य रूपानें आपलें रक्षण करण्यास येत असतो, असेंच मानणें भाग आहे व अशी दृढ समजूत असेल तरच यात्रेत किंवा प्रवासांत सुख होईल.

मदुरेचें तिकीट काढून मला गाडी तर मिळाली. त्रिचनापल्लीचे अलिकडे श्रीरंगम स्टेशन लागतें तेथें उतरून श्रीरंगाचें दर्शन घ्यावें असें मनांत आलें. पण तेथून तें ३।४ मैल लांब असून गाड्या मिळत नाहींत व वेळही नव्हता सबब तें राहिलें. ज्याला सवड असेल त्यानें

अवश्य दर्शनास जावें. दक्षिणेच्या यात्रेंत तें प्रसिद्ध आहे. श्रीरंगम पासून पश्चिमेस सुमारें २॥ मैलांवर जंबुकेश्वर नांवाचें शिवस्थान फार प्रख्यात आहे त्याला आपतत्व असें म्हणतात; तेथेंही अवश्य जावें. तसेंच त्रिचनापल्ली, सालेम, कावेरीपुरम हीं शहरें वाटेंत लागतात तीं अवश्य पहावीं. कावेरीपुरम येथें कावेरीस धरण बांधून त्या धबधब्यानें वीज उत्पन्न केली आहे व तीच म्हैसूरच्या सर्व राज्यांत खेळविली आहे असें ह्मणतात. रामेश्वराचे वाटेंत मदुरा असल्यामुळें रामेश्वरास जाणाऱ्या सर्व उतारूंस तेथें उतरावें लागतें. मदुरा हें दोन तीन लाईनींचें मोठें जंक्शन आहे. येथें निरनिराळ्या बाजूस जाण्याचीं निरनिराळीं ५।६ तिकीट ऑफिसें निरनिराळ्या ठिकाणीं आहेत. त्यांत आपलें कोणचें, प्लॅटफॉर्म कोणता, गाडी कोठून येते किंवा तेथेंच तयार होते, याची आगाऊ चौकशी करावी लागते. अप्रसिद्ध चौकशी ह्मणजे तोंडातोंडीची निदान दोघांतिघांजवळ तरी करावी ह्मणजे खरें कळतें. हें स्टेशन नेहमीं उतारूंच्या गर्दीनें गजबजलेलें असतें. स्टेशनजवळच फर्लांग दोन फर्लांगांवर मोठमोठीं ब्राह्मणांची हॉटेलें उर्फ खाणावळी आहेत त्यांत राहाण्यास स्वतंत्र जागा भाड्यानें मिळते. जेवणाखाणाची, स्नानाची वगैरे सर्व सोयी मिळतात. इमारती दुमजली तिमजली असतात. पण या बाजूंचे संडास मात्र फार चमत्कारिक असतात. आपल्याकडे लघवीकरतां जशीं लांबलचक गटारें बांधिलेलीं असतात तोच नमुना हा आहे. त्यांतच सर्वांनीं शौचविधि करावयाचा. मध्यें भिंत किंवा दरवाजा नाहीं, छप्पर नाहीं, कांहीं नाहीं! मुख्य भागापासून संडास निराळे दाखविण्याकारितां सर्व संडास मिळून सभोंवती थोडा भिंतीचा आडवसा केलेला असतो एवढेंच! प्रत्येकाला भिंत नसतेच. भंग्यानें येऊन तसाच गटारांतील मळ गोळा करून न्यावा. भांडें किंवा टोपली कांहीं नाहीं. ज्याला उघड्यावर व अशा समुदायांत बसण्याची सवय नाहीं त्याला येथें शौचशुद्धी व्हावयाची

नाहीं सबब उघड्यावर व मैदानीं शौचशुद्धीची संवय ठेविली पाहिजे. अशी संवय असली तरी अशा ठिकाणीं एकट्याला शौचशुद्धि होईल. पण मंडळी येत जात असतेच कारण सर्वांची वेळ एकच असते व बायकापुरूषही येत जात असतात त्यांना काय कारणार? रस्त्यावर मुलें परसाकडेस बसतात तसेंच हें आहे. येवढाल्या मोठ्या इमारती बांधितात त्यांत ५।६ संडास बांधले तर काय हरकत आहे? पण रिवाजच नाहीं त्याला काय उपाय? निदान बायकांनीं तरी अवेळीं जावें हाच त्याला उपाय दिसतो, दुसरा नाहीं. ह्या रिवाजाची बायकापुरुषांना संवय पाहिजे ह्मणून हें लिहिलें आहे. मदुरा येथें खुद्द स्टेशनचे आवारांतही रेल्वेची खाणावळ आहे व तीही बरी आहे पण तेथें राहाण्याची सोय नाहीं, इतकेंच नव्हे तर जेवींपर्यंत पाकीट किंवा गांठोडें सुरक्षीत ठेवण्याचीसुद्धां सोय नाहीं. जेवून येईपर्यंत गांठोडें कोणाच्या तरी ताब्यांत दिलें पाहिजे, नाहींतर आपल्याजवळ घेतलें पाहिजे; पण जेवतांना घेण्याची सोय नाहीं. सोंवळ्या ओंवळयाचा तर विधिनिशेध नाहींच, फक्त ब्राह्मण व ब्राह्मणेतरांच्या पंक्ती निराळ्या असतात. येथें चोरांचा व भांमट्यांचा उपद्रव फार आहे. जिकडेतिकडे चोरांपासून सावध रहा अशा प्रकारच्या पाट्या लाविल्या आहेत, पण चोऱ्या थांबतच नाहींत!

मदुरेस सुंदरेश्वराचें (शिवाचें) व मीनाक्षीचें (पार्वतीचें) मिळून फारच मोठें असें एक मुख्य देवालय आहे व तें खरोखरच दर्शनीय आहे. याचें आवार फार मोठें आहे. आवारांत भोंवतालीं बाजार भरलेले असतात. भोंवतालीं कोट फारच उंच ह्मणजे ताडाएवढा उंच आहे व त्यांला नऊ गोपुरें असून तीं फार प्रेक्षणीय आहेत. अशीं सुंदर गोपुरें जगांत कोठेंही नाहींत. सर्व गोपुरांत नानाविध देवतांचीं, तसेंच हत्ती, घोडे, पालख्या, निरनिराळीं वाद्यें यांचीं चित्रें खालपासून वर शेंड्यापर्यंत निरनिराळया नक्षींत, मेहर-

पींत व प्रसंगांत काढलेलीं आहेत. किती पाहावें हें समजतच नाहीं. ज्यानें एवढा आटोकाट प्रयत्न करून व अलोट पैसा खर्च करून प्रत्येक चित्र तयार करतांना आपल्या कसबाची कमाल केली, तीं चित्रें व त्यांचें कसब पाहण्यास आह्माला क्षणभरसुद्धां वेळ सांपडूं नये याचें आश्चर्य वाटतें, परंतु उपाय नाहीं. अशा प्रकारें यात्रा करणें ती सवड होईल त्यानें स्वस्थपणानें करावी हेंच खरें. या गोपुरांतील चित्रांना पूर्वीं रंग दिला होता परंतु आतां तो कित्येक वर्षांत दिलेला नाहीं त्याबद्दल त्या चित्रांसही वाईट वाटत असेल व आतां आमचें ऐश्वर्य पाहाण्यासारखें नाहीं तरीपण पूर्वीं आह्मीं किती ऐश्वर्यवंत होतों, याची साक्ष हल्लींच्या आमच्या स्वरूपावरून व आमच्यावरील पुसट रंगावरून तुम्हाला कळेल अशीं तीं म्हणत आहेत असा देखावा दिसतो. असो. सर्वांत मोठें गोपूर १५२ फूट उंच आहे. खालून वर-पर्यंत नजरही पोंचत नाहीं इतकें तें मोठें आहे. आंतलें देवालयही असेंच फार मोठें आहे. नुसता सभामंडप एक हजार खांबांचा आहे. आंत गेल्यावर आपण आलों कोठून, दर्शनाला कोठें जावयाचें, परत जाण्यास रस्ता कोणचा, हें कांहींच समजत नाहीं. कारण सर्वच रस्ते सारखे व जिकडे तिकडे बाजार! देवळांतही पुष्कळ देवतांच्या प्रतिमा आहेत. माहितगार मनुष्याशिवाय त्या सर्वांचें दर्शन घेऊन परत आपल्या मार्गावर येणें कठीण आहे. याकरतां देवळांत प्रत्येक महाद्वारावर यात्रेकरूस दर्शन करविण्याकरतां एकादा पंड्या उभा असतोच. त्यास १।२ आणे दिले म्हणजे तो त्या सर्वांचें दर्शन करून व त्यांच्या पौराणिक कथा सांगून परत मूळ ठिकाणीं आणून पोंच-वितो. कांहीं कांहीं ठिकाणीं दिवसा १२ वाजतांसुद्धां गर्द अंधार पडलेला असतो इतक्या खोल जागीं देवांचीं दर्शनें आहेत. त्यांत मीनाक्षीची म्हणजे पार्वतीची जागा फारच खोलांत आहे. मूर्ति उंची वस्त्रप्रावर्णानें मंडित व डागडागिने घातलेली अशी कृष्णपाषाणाची आहे. पण ती फारच

सुंदर दिसते. मूर्ति सरासरी ३ फूट उंचीची आहे. तिचे सोन्या-मोत्यांचे व जडावाचे दागिने व त्यांच्यावर प्रकाश पडला म्हणजे त्यांची चकाकी पाहून डोळे दिपतात. सर्वच पाहाण्यासारखें आहे. कारागिरानें आपल्या कसबाची जेथें तेथें सर्वत्र कमाल केली आहे. हें ह्या देवळाचें पक्कें वैभव आहे, पण तीं जेव्हां पूर्ण वैभवांत होतीं त्या स्थितीची कल्पना हल्लींच्या लोकांस करतांही येणार नाहीं. इंग्रजी राज्यांत काठीला सोनें बांधून वाटेल तिकडे हिंडावें अशी म्हण पडली आहे. पण सोनेंच शिल्लक राहिलें नाहीं, मग बांधणार काय? पूर्वी उत्तर हिंदुस्थानाच्या संपत्तीवर मुसलमानांनीं वारंवार हल्ले करून ती काबूल कंदाहार व इराणकडे नेली, पण दक्षिण हिंदुस्थानांत ती कायम राहिली. येथेंही मुसलमानी झाली होती पण ते राजे येथें राहिल्या-मुळें येथल्या संपत्तीचें श्रीमंतांत व राजांत एकीकरण झालें व त्याचा प्रवाह गरिबांकडे व कारागिरांकडे वाहात राहिला व संपत्ति परदेशीं गेली नाहीं यामुळें देश सुखी राहिला. त्यावेळच्या संपत्तीचें हें अवशिष्ट स्वरूप त्यावेळच्या दानधर्म केलेल्या देवळाच्या रूपानें राहिलें आहे, यावरून त्यावेळीं संपत्ति किती होती याची कल्पना करावी. याकरितां हिंदुस्थान ह्मणजे सोन्याचा तुकडा ह्मणण्याची वहि-वाट आहे पण इंग्रजी झाल्यापासून संपत्तीचा लोट मुसलमानांच्या लुटीपेक्षां जास्तच जात आहे त्यामुळें हिंदुस्थानची सर्व बाजूंनीं अव-नति होत आहे. असो. अशा वैभवसंपन्न देवळांत दर्शनार्थ जाऊन एकाद्यानें देवापुढें दिडकी ठेविली तर त्याची तेथें काय किंमत आहे! ती ठेवण्यालाही लाजच वाटते पण आपण येथील वैभवाप्रमाणें ठेवूं गेल्यास आपल्या जवळचें सर्व दिलें तरीही तें शोभणार नाहीं. फार काय पण राजेरजवाड्यांनाही तें देतां येणार नाहीं अशी येथें स्थिति आहे. फार काय सांगू यात्रेकरू प्रत्येक ठिकाणीं दिडकी दिडकीच देण्यास तयार झाला तरीसुद्धां त्यांस ती परवडत नाहीं, ह्याला काय करावें! साऱ्या दक्षिणेंत एवढें मोठें देवालय नाहीं.

याशिवाय तिरुमल नायकाचा वाडा व गांवाबाहेर टेपाकुलम नांवाचा मोठा तलाव व त्यांत ईश्वराचें भव्य देवालय हीं फार शोभिवंत आहेत. ह्या बाजूला मोठमोठाले बांधिलेले तलाव, भोंवतालीं व आंत मधोमध शिवमंदिरें व त्या शिवमंदिरास जाण्यास निरनिराळे रस्ते व सभोंवतीं मोठमोठे कोट असे देखावे फार आहेत. तळ्यामधल्या देवालयांत जाण्यास क्वचित् मार्ग असतो व क्वचित् होडींतूनही जावें लागतें. उत्साहाचे वेळीं रात्रीं तेथें देवळांत व तळ्याचे भोंवतालीं सर्व देवळांत दीपोत्साह होतो व त्यांचीं प्रतिबिंबें पाण्यांत पडतात तेव्हां तो देखावा फारच चित्ताकर्षक व मजेचा दिसतो. त्याचें वर्णन करतां येत नाहीं, तो प्रत्यक्ष पाहिलाच पाहिजे. त्याचे दिग्दर्शनार्थ या बुकाचे प्रारंभीं मलपृष्ठावर दर्शनी चित्र दिलें आहे त्यावरून कल्पना येईल. शिवाय ह्या पुष्करणींत सूर्योदयीं व सूर्यास्तीं ब्राह्मण स्नान-संध्या करीत असलेले पाहून या नैसर्गिक देखाव्यांत त्याचीही भर पडते. तलाव मोठा असल्यास त्याचे भोंवतालीं निदान कोपऱ्यावर तरी लहान लहान देवळें असतात. ह्याही तलावाभोंवतीं देवळें आहेत. हा भाग शहराबाहेर असल्यामुळें देवदर्शनास कोणीं येण्याची इच्छा केली नाहीं तरी मोकळ्या हवेची शोभा पाहाण्याची कोणास तरी इच्छा होईलच व अशानें देवदर्शनाची संवय लागेल, असा पोक्त विचार पूर्वजांचा दिसतो. जेथें कांहीं चांगलें दिसेल किंवा पाहाण्या-सारखें असेल तेथें देवतेची स्थापना झाली आहेच. ह्मणजे सर्व चांगल्याचें श्रेय देवतेकडे देणेंची पूर्वीपासून वहिवाटच आहे असें दिसतें. हे सर्व धार्मिक साम्राज्याचे प्रकार आहेत. राज्य वाढलें ह्मणजे राज्यकर्त्यांचा धर्मही अनायासें वाढतोच पण त्याचा उपद्रव हल्लींच्या ख्रिस्ती धर्माप्रमाणें दुसऱ्याला नसावा. त्यांनीं पाहिजे तर आपल्या धर्माचे उत्साह फार मोठ्या प्रमाणांत करावे. पण दुसऱ्याला बाट-विण्याकरतां अधिकाराच्या जोरावर सक्ति करूं नये.

मदुरेनंतर इकडील आचार्यांच्या शिवनीं प्रीव्ही कौन्सिलपर्यंत होता, परंतु वेळ नाहीं म्हणून पुढें एकदमाला नाहीं. आतां एखादा

## रामेश्वर

ाला ) तर जाहिरात देऊन संस्थान हें अशा भांडणामुळें

चा रस्ता धरला. पूर्वी मंडपंप, पुजाऱ्याला तेथील उत्पन्नांपैकीं बोटीनें रामेश्वरास जावें लागे. पण ने प्रत्येक प्रहराला २।३ सुद्धां रेल्वे झाली आहे. सिलोनहूनही तिकडची रे सर्व कोकणस्थ, मध्यें १०।१२ मैल समुद्रावर पूल होऊन दोन्ही रे- येथें कोकण- मिळाल्या असल्या परंतु महायुद्धामुळें तें सर्व राहिलें अ तरी ह्या एक होणार खचित व मग रामावळें यांत दुसरी आवृत्ति निघाली असें होईल. हल्लीं लोकांस्यायाचा अंतर स्टीमरमधून जावें लागतें व पुढें सिलोन रेल्वेमधून प्रवासत्याही येतो. मंडपंपासून रामेश्वरपर्यंत मध्यें पामबेनच्या सामुद्रधुनीवर रेल्वेचा- पूल आहे पण तो मोड पूल आहे. म्हणजे गाडीचे वेळीं तो जोडून त्यावरून गाडी जाते व इतर वेळीं त्याचे दोन्ही भाग मोडून यंत्राच्या साह्यानें उभे करितात व त्या खालून गलबतें व बोटी जातात. सिलोन व हिंदुस्थान हीं दोन्हीं ब्रिटिशांच्या छत्राखालीं आहेत, तरी सिलोनचा गव्हर्नर अगदीं स्वतंत्र आहे. तो परदेश आहे असें समजतात. म्हणून सिलोनच्या गव्हर्मेंटनें मंडपं येथें आपले डॉक्टर ठेवून हिंदुस्थानमधून सिलोनमध्यें येणाऱ्या लोकांस १० दिवसांचें क्वारंटाईन ठेविलें आहे. ज्याला सिलोनास जावयाचें असेल त्यानें येथें १० दिवस राहून डॉक्टरचा पास घेतला पाहिजे, त्याशिवाय त्यास पुढें सिलोनास जातां येणार नाहीं. रामेश्वर व धनुष्कोडीला जावयाचें असल्यास सदर पासाची जरूर नाहीं अशी पाटी इंग्रजींत मोठ्या अक्षरांनीं लिहिलेली या स्टेशनवर लाविलेली आहे. प्लेग किंवा सांथीचे रोग सुरू असतां हा नियम सक्तीनें अमलांत येतो.

याशिवाय निरुमल ' खोल नसून फारच उथळ आहे. गाडींतून नांवाचा मोठा तलाव व त्य अगदीं स्पष्ट दिसतात त्यावरून हे टाकलेले आहेत. ह्या बाजूला मोठमनुष्यकृती असावी असें स्पष्ट दिसतें. रामाव- मधोमध शिवमंदिरें व त्या शिला ही गोष्ट पुराणप्रसिद्ध आहे. तिचें सभोवतीं मोठमोठे कोट असे हे धोंडे इतके मोठे आहेत कीं, ते देवालयांत जाण्यास कचित मार्ग कल्पनासुद्धां होत नाहीं, कारण सौथ लागतें. उत्साहाचे न्हां गाडी अगदीं लहान आहे. या सामुद्रधुनींतील देवळांत दीपोत्म्सदर आगगाडीच्या डब्यापेक्षांही मोठा आहे. मार्गे तो देखावा फळ किंवा विजयानगराजवळ जशा दगडांच्या राशी सांगि- येत नाहीं।हेत, तसेच येथें हे गाटेगोटे आहेत. यावरून रामायणकाळचा बुकाचे । काळच्या माणसांनीं (वानरांनींच) बांधला असावा हें उघड येईल. िआहे. हें काम हल्लींच्या मनुष्याच्या कल्पनेंतही येण्यासारखें नाहीं, इतकें तें मोठें आहे. हल्लींच्या मनुष्यांच्या प्रयत्नांनीं ह्मणजे यंत्रानें सुद्धां होणें अशक्य आहे कारण सर्व खाडीभर असेच धोंडे आहेत. आपण रेल्वेची व बोटीची शक्ति अचाट ह्मणतों पण ती याच्या पासंगासही लागावयाची नाहीं!

रामेश्वर स्टेशनपासून गांव जवळच ह्मणजे एक मैलाचे आंतच आहे. या बेटांत सर्वत्र वाळू आहे. वाळूशिवाय दुसरें कांहीं नाहीं. ह्या प्रांतांत ह्या ठिकाणीं मात्र महाराष्ट्रीय लोकांची वस्ती आहे, यामुळें मराठी जाणणारे बरेच आहेत. खुद्द रामेश्वराचे पुजारीच महाराष्ट्रीय (कोंकणस्थ ब्राह्मण) आहेत. कोंकणस्थ ब्राह्मणाशिवाय येथें पुजारी नेमावयाचा नाहीं असा येथें ठराव झाला आहे व तो हायकोर्ट व प्रीव्ही कौन्सिलपर्यंत भांडणें होऊन कायम झाला आहे असें समजतें. रामेश्वराचा मूळचा पुजारी लिंगाईत होता. त्याचा निर्वंश झाला तेंव्हां त्यानें मरतेसमयीं कोंकणस्थ ब्राह्मणाकडे ही पूजा दिली व त्याप्रमाणें मृत्युलेख केला. तेव्हांपासून ही पूजा कोंकणस्थ ब्राह्मणाकडे आली.

त्याबद्दल तामीळ, कानडी, तेलंगी लोकांनीं प्रीव्ही कौन्सिलपर्यंत तक्रार केली परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आतां एखादा पुजारी अगदीं नाहींसा झाला ( निर्वंश झाला ) तर जाहिरात देऊन कोकणांतून तो न्यावा लागतो. रामेश्वर संस्थान हें अशा भांडणामुळें हल्लीं सरकारचे ताब्यांत आहे. प्रत्येक पुजाऱ्याला तेथील उत्पन्नांपैकीं दरमहा सुमारें ५० रुपये पगार मिळतो. प्रत्येक प्रहराला २।३ याप्रमाणें पुजाऱ्यांची संख्या सुमारें १५।२० आहे. हे सर्व कोकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे ह्मणजे महाराष्ट्रीयच आहेत. यामुळें येथें कोकण-स्थांची वस्ती १००।१५० वर आहे.

महाराष्ट्रीय ब्राह्मणांचें सोंवळें व इतर ब्राह्मणांचें सोंवळें यांत फार फरक आहे. आणि देव तर नेहमीं सोंवळ्यांतच राहावयाचा ह्मणून हे पुजारी, देऊळांत ( गाभाऱ्यांत ) पुजाऱ्याशिवाय कोणत्याही ब्राह्मणास सुद्धां येऊं देत नाहींत. सर्वत्रांची पूजा पुजाऱ्यामार्फत करावी लागते. मी त्यांस विचारलें महाराष्ट्र कोकणस्थ ब्राह्मणास येण्यास काय हरकत आहे ? त्यावर ते म्हणाले खरोखर येण्यास हरकत नाहीं, परंतु अलीकडे ब्राह्मणांचीं सोंगें पुष्कळ लोक आणूं लागले आहेत. मग पैशाच्या आशेनें ब्राह्मणत्वाचे वशिले लागतात, भांडणें होतात, म्हणून असा कडक नियम करावा लागला. या नियमा-प्रमाणें येथील पुजाऱ्यास सुद्धां त्याची पाळी आल्याशिवाय गाभाऱ्यांत जातां येत नाहीं. मग त्याच्या स्वतःच्या मुलांमाणसांस तरी कसें जातां येईल? यांत विद्वान, अविद्वान, खरेखोटे ब्राह्मण यांचा कांहींच संबंध नाहीं. शिवाय आंतील मौल्यवान वस्तूंबद्दल ते पुजारी जबाबदार आहेत.

मदुरा मंडपंपासून यात्रा आपल्या घरीं आणण्याकरितां पंडे त्या त्या स्टेशनवर आलेले असतात. त्यांपैकीं स्वशाखेचा ब्राह्मण पाहून आपला पंडा करावा ह्मणजे देवदर्शनविधि व सर्व विधि यथासांग होतात

व सर्व सोय होते. रामेश्वरास पंड्याचे घरीं आल्यावर मी प्रथम देवाचे दर्शनास गेलों. प्रथमच भव्य व चित्रविचित्र देवतांच्या मूर्तींचें भलें मोठें गोपूर दृष्टास पडलें. मला प्रथम तेंच देऊळ आहे असें वाटलें. आंत जातांना वाटेंत दुतर्फा फोटो, चित्रें, शंख, शिंपा व इतर जलचर प्राण्यांचे अवशेष व प्रासादिक जिन्नस यांचीं दुकानें दृष्टीस पडलीं. दुकानदार मुसलमानसुद्धां होते. मीं पंड्यास विचारलें मुसलमान हिंदूंच्या देवळांत कसे? तो ह्मणाला ह्या देवळाला एकांत एक अशीं प्रदक्षिणेचीं पांच महाद्वारें आहेत. त्यांतून आंत जाण्यास पांच प्रदक्षिणा कराव्या लागतात. त्यापैकीं तीन प्रदक्षिणेपर्यंत वाटेल त्या जातीचे लोक (विधर्मी लोक) अर्थात युरोपियनसुद्धां जाण्यास मोकळीक आहे. यापुढें मात्र हिंदूंशिवाय कोणास जाण्याचा अधिकार नाहीं.

पुजारी मला नेत होता व मी त्याच्या पाठीमागून जात होतों. कितीतरी दालने व सभामंडप ओलांडित व भोंवतीं प्रदक्षिणा करीत अखेर मीं श्रीरामेश्वरापर्यंत येऊन पोंचलों. दर्शनास गर्दी होतीच. येथें दर्शनास मात्र फी नाहीं पण बाकी प्रत्येक बाबतींत फी आहे. नुसतें बिल्वपत्र वाहाणें झाल्यास सुद्धां फी आहे. देवाचें दर्शन बरेंच लांबून घ्यावें लागतें. आंत जिकडे तिकडे अंधार आहे सबब दिवे लावलेले असतात, पण स्पष्ट दिसत नाहीं. यात्रेकरूस प्रथम ज्याप्रकारची पूजा करावयाची असेल त्या जातीची फी जवळच्या पंचांच्या ऑफिसमध्यें भरून त्याची पावती त्या पूजापात्रामध्यें ठेवावी लागते. त्याशिवाय पूजा स्वीकारली जात नाहीं. पूजा देवाचे उंबरठ्यावर नेऊन दिल्यावर एक ब्राह्मण ती घेतो व पावतीप्रमाणें आहे किंवा नाहीं हें पाहून त्यांतील पावती काढून घेऊन जवळच्या ब्राह्मणाजवळ ती देतो. तो देवाजवळच्या ब्राह्मणाजवळ देतो देवाजवळचा ब्राह्मण ती पूजा देवाला वाहात असतो. दुसरा एक ब्राह्मण त्या पूजेचीं भांडीं विसळून परत

करतो. चवथा कापूर आरती करून देव ओंवाळीत असतो. कापूर लावला ह्मणजे सर्वांस देवाचें दर्शन होतें व आपली पूजा देवावर चढली असें पंड्या दाखवितो. असा प्रकार एकसारखा चाललेला असतो. जरा गर्दी कमी झाली ह्मणजे ईश्वराचे दर्शनास जाईन ह्मटलें पण गर्दी मुळीं कमीच होईना. अखेरीस एका कठड्यावर जरा उभें राहून श्रीरामेश्वराचें दर्शन घेतलें व डोळ्यांचें पारणें फेडलें व कृतकृत्य झालों असें वाटलें. आपल्या प्रयत्नास परमेश्वरानें यश देऊन दर्शन दिलें यामुळें मनास फार आनंद झाला व हुशारी वाटली. शाळुंका सरासरी दीड दोन वीत उंचीची आहे.

समोर रामेश्वराचा नंदी बसलेलाच आहे तरी तो दोन पुरूष उंच आहे! हा नंदी घडविण्यास केवढा मोठा धोंडा तरी लागला असावा याची वाचकांनींच कल्पना करावी. त्याचप्रमाणें सर्व दालनांचे तक्तपोशीचे दगड ४०।४० फूट लांबीचे व पांच पांच फूट रुंदीचे असून सर्व देऊळ दगडी आहे, त्यांत लाकडाचा स्पर्श सुद्धां नाहीं. रामेश्वर बेटांत दगड मुळींच नाहींत. नुसती पांढरी बारीक वाळू आहे. अशा प्रकारचे दगड विजयानगराजवळ मागें सांगितले तेथेंच आहेत. तेथून ह्मणजे जवळ जवळ ५०० कोसांवरून हे काळे कठीण पथ्थर आणणें व त्यांच्या फळ्या, तीन तीन पुरूष उंचीचे खांब आणि असला अवजड नंदी वगैरेसारख्या अजस्र वस्तू बनविणें व त्या जिथेच्या तिथें बसविणें हीं कामें विलक्षण शक्तीचीं आहेत. मोठ्या रेल्वेचा ६० टनाचा मोठा डबा घेतला तरीसुद्धां त्यांत हा नंदी जावयाचा नाहीं आणि डब्यांत ठेवल्यास डब्याचा चुराडाच होईल व कमानी, चाकें वगैरे पार तुटून जातील. अशीं दगडी अचाट कामें पाहून जीव थक्क होतो व प्राचीनांचे शारीर-सामर्थ्याची व त्यांच्या शिल्पकामाची कल्पना येते.

रामेश्वराचें लिंग रामानें सेतुबंधासमयीं स्थापन केलें आहे.

रामेश्वराची पिंडी गंडकी शिलेची असून लिंग वाळूचें आहे. हें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक असून चारीधामांपैकीं एक आहे. रामसैन्यानें सेतुबंधाकरतां जो दगड आणला त्यांपैकीं शिल्लक राहिलेल्या दगडांचें हें देऊळ बांधलें असावें किंवा मुद्दाम दगड आणून बांधलें असावें. बाकी इतकें मोठें देवालय साऱ्या हिंदुस्थानांत नाहीं. मदुरेपेक्षांही हें मोठें आहे. सबंध रामेश्वर गांवसुद्धां आंत सुखानें राहील इतकें तें मोठें आहे! रामेश्वर गांवांत पाणी आहे व नळही आहेत; देवळाच्या आवारांत २४ विहिरी भिन्नभिन्न ठिकाणीं आहेत, पण गांवांतील विहिरींपेक्षां देवळांतील विहिरींचेंच पाणी उत्तम आहे. विहिरी खोल नाहींत पण समुद्र जवळ असल्यामुळें अगदीं उथळ आहेत. त्यामुळें पाण्याचा तोटा कधींही नाहीं. आंत कांहीं तलाव व पुष्करण्याही आहेत. हें हिंदुस्थानचें एक टोंक आहे व तें महासागरांत वाळूंत असूनही पाणी गोड आहे. तरी प्रत्येक विहिरीचें पाणी थोडथोड्या निरनिराळ्या प्रकारच्या चवींचें आहे हा तेथील विशेषत: तीर्थमहिमा दिसतो. देवळांतच पार्वतीच्या देवळाचा भाग निराळा आहे. याशिवाय काशीविश्वेश्वर, वीरभद्र, गणपती, मारुती, नवग्रह वगैरे कितीतरी देवस्थानें आंत आहेत. शिवाय देवाच्या कचेऱ्या, कोठ्या, उत्साहाचे वेळचीं वाहानें व त्यांची व्यवस्था ह्यांची योजना पाहिली ह्मणजे हें एक मोठ्या सार्वभौम राजाचें राजमंदिरच आहे असें वाटतें. देवाचे मिरवणुकीचे हत्तीही आहेत. मोठ्या हत्तीवर अंबारी घालून वर महात बसला तरी हा हत्ती भर पोषाख घालून देवाच्या पालखीच्या वेळीं प्रदक्षिणेच्या मार्गानें खुशाल फिरतो. छताला टांगलेल्या हंड्या किंवा किटसन् लाईटचे दिवे त्याला बिलकूल लागत नाहींत. ते छतावर बरेच उंच लटकत असतात. इतकीं तीं उंच व भव्य पटांगणें व दालनें आहेत व मध्यें त्यांस खांबांचा आधारसुद्धां नाहीं!

रामेश्वराच्या देवळाचा कांहीं भाग मोडकळीस आला होता, तो मोडून जुन्याप्रमाणेंच नवा अगदीं जशाच्यातसा एका भाविक नाटकोट कंपनीला तेलाच्या धंद्यांत फार यश येत गेल्यामुळें तिनें बांधला आहे. हा बांधण्यास १० वर्षें लागलीं व लक्षावधी रुपये खर्च झाले आहेत असें ह्मणतात. आतां पार्वतीच्याहि सभामंडपाचें काम त्याच कंपनीनें चालविलें आहे. पायाच दोन पुरुष खोल खणला आहे कारण सर्वच जमीन वालुकामय असल्यामुळें काम केव्हां खचेल याचा नेम नाहीं. आतां हें काम पुरें होईल तेव्हां खरें. हल्लीं ह्या सर्व कामावर असणाऱ्या मनुष्यांची संख्या सरासरी एक हजार तरी असावी असा अदमास आहे. याच कंपनीकडून येथें व काशी विश्वेश्वरास रोज त्रिकाळ पंचामृति पूजा, राजभोग व ब्राह्मणास अन्नछत्र हें अद्याप चालू आहे. काशीस पुजारी, वाजंत्री व आचारी हे त्यांनीं तैलंगणांतूनच नेले आहेत व त्यांना तेथें वर्षासनें करून दिलीं आहेत. काशींत विश्वेश्वराला यांची पूजा चालली असतां त्यावेळीं देवळांत कोणालाही, कशीही यात्रा जमलेली असली तरी शिरूं देत नाहींत. दुरून यांची पूजा व नैवेद्य पाहाण्यासारखा असतो. दुपारीं अकरानंतर ह्यांच्या माध्यान्ह पूजेला आरंभ होतो, तो अवश्य पहावा.

ह्या देवळाचा खर्चही फार मोठा दांडगा आहे. देवाच्या रोजच्या दिवाबत्तीचा खर्चच हल्लीं नुसता २०० रुपये आहे असें ह्मणतात. शिवाय एकादशी, प्रदोप, सोमवार, शिवरात्र, महाशिवरात्र वगैरे शिवव्रताच्या कमजास्त प्रसंगीं, तसेंच दर मंगळवारीं व शुक्रवारीं, नवरात्रांत, जगदंबेची पालखी निघते. त्यावेळचा दीपोत्साहाचा थाट फार न चढाईनें व अपूर्व होतो. मीं नेहमींची शुक्रवारची जगदंबेची पालखी पाहिली. वाजंत्री, पालखीवाले, मशालवाले, चौघडेवाले, वगैरे सर्वांची कायमची व्यवस्था ठेवण्यास काय खर्च लागत असेल याची कल्पना करावी. एवढें विस्तृत देवालय आहे तरी रोज रात्रीं २ वाजेपर्यंत

जिकडेतिकडे क्रिट्सन लाईटचे दिवे झळकत असतात!

या देवाला सरकारी उत्पन्न किती आहे, लोकांनीं किती दिलें आहे, राजेरजवाड्यांनीं कांहीं दिलें आहे काय, ह्मणून विचारलें असतां कोणाकडूनही व सरकारांतूनसुद्धां एक पैचेंही उत्पन्न नाहीं असें समजलें! मग एवढा अवाढव्य खर्च चालतो कसा? तर रोजच्या उत्पन्नावर! इतकें ह्याचें रोजचें उत्पन्न दांडगें आहे! नुसतें बिल्वपत्र वाहाणेस चार आणे, गंगा वाहाणेस दोन रुपये याप्रमाणें प्रत्येक बाबतींत कर ठरला आहे. ह्या कराच्या छापिल पाट्या चोहोंकडे लागल्या आहेत. हा कर भरल्याची पावती पूजापात्रांत ठेवावी तेव्हां ती पूजा ब्राह्मण आंत घेतो, त्याशिवाय त्याला हातच लावीत नाहीं. ह्या पावत्या व दुसरी पावत्या ह्यांचा मेळ पाहून मग हिशोब होतो. याशिवाय देवाजवळ कांहीं दिडकी पैसा ठेवणें असल्यास कोणासही ठेवतां येत नाहीं व पूजेंत सुद्धां एक दिडकीही ठेवतां येत नाहीं. देवाचे दाराशीं एक मोठी थोरली घागर तिचें तोंड बंद करून व वर सील करून ठेविलेली असते व तिच्या तोंडांत कोणतेंही नाणें जाईल इतकें मोठें तिच्या तोंडाला भोंक पाडिलेलें असतें, त्यांत वाटेल त्यानें नाणें टाकावें. कोणाचेही हातांत किंवा देवापुढें सुटें नाणें ठेवण्याची सक्त मनाई आहे, अशा पाट्या जिकडे तिकडे मारलेल्या आहेत. या उपर नजर चुकीनें किंवा गैरसमजुतीनें कोणी ठेविल्यास दरवाज्यावर घागरीजवळ दोघे तिघे पाहारेकरी असतातच, त्यांनीं ती उचलून घागरींत टाकलीच पाहिजे व येणाऱ्या पूजासुद्धां त्यांनीं तपासल्या पाहिजेत. याशिवाय कोणास देवास कांहीं दागिना अगर देणगी द्यावयाची असेल तर त्यानें ती कमेटींत हजर करून त्याची पावती घ्यावी; त्याशिवाय तो दागिना देवाचे दरबारांत पोंचला नाहीं असें समजावें, अशा जिकडे तिकडे पाट्या मारल्या आहेत. पावतीशिवाय देवळांतील कोणतीही वस्तु कोणा-

लाही हातांत घेण्यास सक्त मनाई आहे. नोकरानें ती घेतलेली आढळल्यास त्याला ताबडतोब बडतर्फ केला जातो. मग तो कितीही मोठा असला किंवा त्याची कितीही लायकी असली तरी त्याची क्षमा होत नाहीं, असा कडक बंदोबस्त आहे. यामुळें येथें तरफदारी किंवा पक्षपात होतच नाहीं. तिकीट ऑफिसामध्यें पांच पांच सहा सहा कारकून ठेविलेले असतात, तरी तिकीट घेण्याला तास अर्धातास मोडतोच. सकाळीं सहापासून इतकी गर्दी असते कीं, कारकुनास पैसे घेऊन पावती द्यावयास सवडच नसते. बारा नंतर गर्दी कमी होते पण सर्व दिवसभर थोडें बहुत काम चाललेंच असतें. ऑफिसांत रुपयांच्या, नोटींच्या व नाण्यांच्या राशी पडलेल्याच असतात. आंत कोणालाही जातां येत नाहीं. सर्व ऑफिस लोखंडी गजांनीं अगदीं वरपर्यंत बंद केलेलें आहे. खुरच्या, टेबलें कोणासही नाहींत. जुन्या पद्धतीप्रमाणें गादी व तक्या हीं प्रत्येकास आहेत. या सर्वांत एक मुख्य मुनीम आहे. हें ऑफिस सुमारें पंधरा फूट लांब, दाहा फूट रुंद असून दोन्ही बाजूला कारकून पोष्टाप्रमाणें गजांकडे तोंडें करून बसलेले असतात व लोकांची गर्दी बाहेर असते.

अशा रीतीचें उत्पन्न दांडगें असल्यामुळें पंड्यांमध्यें भांडणें सुरू झालीं व शेवटीं हें संस्थान सरकारच्या ताब्यांत गेलें आहे. तेव्हांपासून सरकारतर्फे याची व्यवस्था सुरू झाली आहे. अज्ञानाच्या इस्टेटीप्रमाणें हल्लीं हें संस्थान मदुरा येथील डिस्ट्रिक्ट जज्जाच्या ताब्यांत आहे. या संस्थानावर २५० रुपयांचा एक मुख्य अंमलदार आहे, तो मदुरेस असतो. दुसरा १०० रुपयांचा आहे तो रामेश्वरास असतो व त्याचे हाताखालीं ५०।४० रुपयांचे चार आहेत. याप्रमाणें मामलेदार कचेरीसारखी व्यवस्था आहे. हे सर्व अधिकारी सुशिक्षित द्राविडी ब्राह्मण असतात. रात्रीं ९।१० वाजतां कचेरी बंद होते. ही नेहमींची हकीकत झाली. याशिवाय सोमवार, प्रदोष, वगैरे थोडें

कमजास्त पर्व आलें कीं यात्रा वाढत जाते. आणि महाशिवरात्रीस तर याची कमालच होते. त्यावेळीं लक्षावधी यात्रा जमते. अगदीं पेशावर, पंजाब, बंगालपासून लोक येतात व नेपाळ, भूतान वगैरे हिमालयांतील संस्थानांतूनही लोक येतात ! शर्थ आहे त्या लोकांची. बायका मुलें घेऊन यात्रा चाललीच असते. याला अंधश्रद्धा म्हणावी कीं भाविकपणा म्हणावा का हिंदुधर्माचें रहस्य म्हणावें हें कांहीं समजत नाहीं. चार धामांमध्यें रामेश्वर हेंच फार सोपें आहे. बाकी द्वारका, जगन्नाथ हीं थोडीं कठीण आहेत. बद्रिनाथ सर्वांत कठीण आहे व तेथें जाण्याचे दिवसही नियमित आहेत; तरी सुद्धां तेथें लक्षावधि यात्रा जाते ! मग रामेश्वराला तर आगगाडीची सोय झाल्यामुळें बारा महिने मुंग्यांसारखी यात्रा चाललेली असते यांत आश्चर्य नाहींच.

रामेश्वर येथें आर्यधर्माचें वैभव स्पष्ट दिसून येतें. रामेश्वरास कुठून यात्रा येत नाहीं असें होत नाहीं. रेल्वेंतून, बोटींतून, सर्वांमधून येते. रेल्वे झाल्यापासून या यात्रेला ऊतच आलेला आहे असें म्हणतात. खुद्द रामेश्वर गांवाला उत्पन्न असें कांहीं नाहीं. सर्व कांहीं बाहेरून आणावें लागतें. उत्पन्न न होण्याचें कारण मुख्यत्वें येथें सर्वत्र वाळू आहे. वाळूशिवाय दुसरें दगड मातीसुद्धां नाहीं. शिवाय वाळूंत होणारीं पिकें लाविलीं तरी वाऱ्यानें बाहेरची वाळू येऊन तिचे पिकांवर ढीग जमतात व पिकांचा नाश होतो. पण आतां रेल्वे लायनीचा बांध आयताच झाल्यामुळें वाऱ्यानें वाळू येत नाहीं. यामुळें पुष्कळ लोकांनीं नारळीच्या बागा केल्या आहेत व त्या यशस्वी झाल्या आहेत. आतां दुसरेंही उत्पन्न होईल असें दिसतें. याशिवाय सर्व गांवाचें यात्रेकरूंवर पोषण होतें असें तेथील लोक स्पष्ट सांगतात. यात्रेमुळें सर्व दुकानदार, मजुरवर्ग, कारागीर, पंडे, देवस्थानचे नोकरचाकर वगैरे सर्वांचें पोषण होतें. इतकेंच नव्हे तर ते तेथें यात्रेमुळें गबर झाले आहेत. रेल्वेसुद्धां पॅसेंजर ट्रॅफिकवर

चालली आहे. माल फक्त आणावयाचाच, न्यावयाचा नाहीं! सारांश सर्व हिंदुस्थानांतून येथें पाण्यासारखा पैसा ओतला जातो.

शुक्रवारीं रात्रीं दहा वाजतां श्रीजगदंबेची (पार्वतीची) पालखी निघते तिचा थाट फार मजेचा असतो. उत्सव मूर्ति ३ फूट उंचीची असून सर्व सोन्याची केली आहे, अर्थात ती फारच सुरेख आहे. ही मूर्ति उत्सवापुरती काढतात. ती १० कुलपांचे आंत ठेविली आहे. हीं दाहा कुलपें दाहांचे ताब्यांत आहेत सबब सर्व एकत्र होतील तेव्हां ती निघते. सर्व मानकरी, भालदार, चोपदार, पलीतेवाले, चौघडेवाले, वाजंत्री, शृंगारलेले हत्ती, घोडे वगैरे हक्कदार कायमचे ठेविलेले आहेत. पालखी गांवांत कोठें फिरत नाहीं. फक्त रामेश्वरालाच तीन निरनिराळ्या हालांतून प्रदक्षिणा घालते. पण सर्व प्रदक्षिणा मिळून जवळ जवळ अर्धा पाऊण मैल तरी होत असेल इतकें हें देऊळ मोठें आहे. याच्या बाहेरच्या प्रदक्षिणा ह्यापेक्षां फार मोठ्या आहेत. त्यांचा उपयोग सणाच्या महत्वाप्रमाणें होतो. पालखी फिरून आली ह्मणजे चारी शाखेच्या ब्राह्मणांचें मंत्रपुष्प होतें. प्रत्येक वेळीं आतां अमक्या शाखेच्या ब्राह्मणानीं अमुक ह्मणावें, तें संपल्यावर दुसऱ्यानें अमुक ह्मणावें, अशी भालदारांची ललकारी चालू असते व त्याप्रमाणें तेथें ब्राह्मण ह्मणतात. येथें भालदार, चोपदार व पालखी उचलणारे सर्व द्राविडी ब्राह्मणच असतात. त्यांना विशिष्ठ प्रकारचा पोशाख वगैरे कांहीं नसतो. ते उघडे बोडके असतात, फक्त नेसलेल्या धोतरावर कमरेला उपरणें बांधलेलें असतें व हातांत चांदीनें मढविलेला भालदारीचा सोंटा असतो. पालखी निघण्यापूर्वींपासून ती परत येईपर्यंत सर्व कामें रेखल्यासारखीं ठराविक होतात.

प्रदक्षिणेंत ठिकाठिकाणीं कृत्रिम कमानी केलेल्या असतात. कांहींवर परींचीं चित्रें दोन्ही बाजूंस असून त्यांच्या हातांत माळा देऊन त्या तिरक्या पंख पसरून एखाद्या चित्रांत दाखविल्याप्रमाणें बांधलेल्या

असतात व त्यांच्या हातांत माळा लोंबत असतात. पालखी जवळ आली म्हणजे त्यांच्याकडून त्या माळा देवीचे गळयांत घातल्या जातील अशी योजना केलेली असते. अशी ठिकठिकाणीं निरनिराळी मजा केलेली असते. येथील पालखी सिंहासनासारखी असते पण तिच्यावर छत्र नसतें. पुढें व मागें दोन दोन लांब लांब दांडे असून त्यापुढें सिंहाचीं तोंडें असतात. पालखीवर वैभवाकरितां नुसती सोन्याची सुंदर छत्री धरलेली असते. यामुळें असे निरनिराळे सुंदर देखावे दाखवितां येतात व शोभा फार आणतां येते. दीपोत्सवाच्या निरनिराळया कमानी असून त्यांत कांहीं अक्षरें, शब्द व नक्षी दिव्यांच्या माळांनींच दाखविलेली असते यामुळें शोभा वृद्धिंगत होते. फक्त दारूकाम मात्र नसतें. किटसन लाईटचे दिवे जिकडे तिकडे असतातच. ह्याशिवाय गोडे तेलाच्या कायमच्या तांब्याच्या पंत्या असतात. देवीचे देवळासमोर तर दिव्यांची कमालच केलेली असते. देवीची अगोदरच सोन्याची सुबक व सिंहावर बसलेली मूर्ति, तिच्यावर जडजवाहिराचे दागिने, पुतळयांच्या माळा वगैरे व भरजरीचा पोशाख घातला म्हणजे तें ध्यान मनांतून कधीं जातच नाहीं. जिकडे तिकडे सुवर्णमय व रत्नमय दिसतें व दिवेसुद्धां तसेच दिसतात. ऊन, पाऊस, वारा कोणतीही स्थिति असो, पालखी देवळांतूनच निघावयाची असल्यामुळें तिच्या थाटामध्यें कधीं कांहीं कमी होतच नाहीं. प्रदोशाची शंकराची पालखीही अशीच निघते पण तिचा एवढा थाट नसतो. ही जगन्माताच मूळ मायारूप मोहमयी, त्यांत तिची सुवर्णकांति व अंगावर किरीट कुंडलांसुद्धां हिरेमाणकांचे तेजानें एकापेक्षां एक वरचढ असणारे असे रत्नमय दागिने, भरजरी पोषाख व त्या सर्वांस उत्तेजन देणारे असे नानाप्रकारचे दिवे यांची प्रभा त्यांवर पडली म्हणजे त्या दिव्यतेजाचें काय वर्णन करावें ! त्यावेळीं आपण स्वर्गांतील इंद्रसभेंत आहों किंवा आणखीं दुसऱ्या

श्रेष्ठ ठिकाणीं आहों ह्याचें भानच राहात नाहीं. मूळचें तें भावनेचें दैवी स्वरूप पडलें तेव्हां त्यांचा असा थाट होणें स्वाभाविक आहे. ही साध्या पालखीची गोष्ट झाली. विशेष प्रसंगीं, नवरात्रांत वगैरे विशेष थाट होतो हें सांगणें नकोच. यात्रेकरूंनीं ही पालखी सवड करून अवश्य पाहावी. शंकराचीही अशीच सोन्याची मूर्ति आहे पण ती फक्त महाशिवरात्रीचे उत्साहाचे वेळीं काढतात.

येथें आल्यानंतर दुसऱ्या दिवशीं तीर्थविधीला आरंभ केला. प्रथम जवळ एक तीर्थ आहे तेथें क्षौर करून स्नान करावें लागतें व नंतर समुद्र स्नानापासून आरंभ करून प्रत्येक ठिकाणीं समंत्रक स्नान करावें लागतें व याप्रमाणें चोवीस तीर्थांचें स्नान करावें लागतें. हीं तीर्थें मागें सांगितलेल्या विहिरी, तलाव व पुष्करणी हींच आहेत आणि तीं सर्व रामेश्वराच्या देवळाच्या आवारांतच आहेत पण भिन्नभिन्न ठिकाणीं आहेत. इतकें आवार मोठें आहे. त्यांचें ठरलेल्या अनुक्रमानें स्नान करावें लागतें. हीं स्नानें कोणी तांब्या दोन तांब्ये पाण्यानें करतो कोणी जास्त पाणी घेतो. प्रत्येक तीर्थाचें पाणी भिन्नभिन्न आहे व हा चमत्कार दाखविण्याकरतांच ह्या स्नानांची योजना केली असावी असें दिसतें. कोणालाही पुष्करणीच्या किंवा विहिरीच्या आंत उतरूं देत नाहींत. तांब्यानीं, पोहऱ्यानें किंवा बकेटानें पाणी बाहेर काढून तें पुन्हां आंत जाणार नाहीं अशा ठिकाणीं स्नान करावें अशा ठिकठिकाणीं इंग्रजींत व देशभाषेंत पाट्या मारल्या आहेत व शिवाय बंदोबस्ताकरितां शिपाई उभे केलेले आहेत. कपडेसुद्धां पुष्करणींत धुऊं देत नाहींत फक्त संध्यामार्जन करूं देतात. विहिरींचें पाणी सुद्धां पोहोऱ्यानें काढून दूर स्नान करावें लागतें. यामुळें कोठेंही पाणी बिघडत नाहीं व इतकी यात्रा नेहमीं जमते तरी इतर क्षेत्रांप्रमाणें येथें व काशीस प्रत्यक्ष गंगाच असल्यामुळें सांथीचे रोग होत नाहींत. काशीस व रामेश्वरास अद्यापपर्यंत प्लेग झाला नाहीं किंवा

सांधींचे रोग मुळींच झाले नाहींत, याचें मुख्यतः कारण हेंच आहे.

हा प्रदेश उष्ण असल्यामुळें क्षौर करून सुद्धां येथें थंड पाण्याचीं स्नानें बाधत नाहींत. भोंवतालीं समुद्र असून सुद्धां येथें उन्हाळा वाळू-मुळें विशेष भासतो. येथें पाऊसही अनियमितपणानें पडतो. पण मुख्य पावसाळ्याला आरंभ दिवाळी नंतर होतो म्हणजे येथें ईशान्य मोसमचा पाऊस पडतो. सर्व पूर्व किनाऱ्यावर हाच मोसम आहे, सबब ह्या यात्रेस आरंभ शिमग्यानंतर करावा. चैत्र वैशाखांत सुद्धां या बाजूला हिरवीं गार शेतें असतात व त्यामुळें आपल्याकडील श्रावण भाद्रपदासारखे हे दिवस दिसतात. पण पाऊस व ढग मात्र नसतात. जिकडे तिकडे भाताचीं शेतें आहेत व सबंध पूर्व किनारा असा आहे. कालव्यामुळें व उष्ण मुलुखामुळें येथें दोनदांच नव्हे तर तीनचारदां भाताचीं पिकें काढतात; त्यामुळें जमिनीला विश्रांति मुळींच नाहीं. शेतें कोंकणासारखींच लहान लहान असतात. घाटावर जसे शेताचे माळ असतात तसे येथें नाहींत. या बाजूस सर्व उत्पन्न भाताचेंच आहे पण येथील तांदुळ उंची नसतो. ह्या द्राविडी लोकांचें भात हेंच मुख्य खाणें आहे; तरी त्यांना तो चांगला करतां येत नाहीं हें आश्चर्य आहे. कदाचित् अन्न राकट असल्यामुळें असें होत असेल.

कोणत्याहि क्षेत्रास प्रथम दिवशीं तीर्थविधि, दुसरे दिवशीं श्राद्ध व तिसरे दिवशीं देवब्राह्मण असें हें त्रिरात्र व्रत आहे. पहिले दिवशीं क्षौर करून उपास करावा लागतो. ही उपासाची योजना फार चांगली आहे व त्यामुळें यात्रेकरूंस हवा पाण्यासंबंधानें बाधा होत नाहीं, हें मागें सांगितलेंच आहे. हा सक्षौर प्रायश्चित्त विधि झाल्या-वर देहाची अंतर्बाह्य शुद्धता होते व पितरांच्या उद्देशानें तीर्थश्राद्ध करून त्यांचीही बोळवण होते. नंतर तिसरे दिवशीं मंगलदायक देव-ब्राह्मणांची पूजा करून यात्रा संपूर्ण करावी लागते.

ज्याठिकाणीं तीर्थ आहे तेथें हे तिन्ही विधी करावे लागतात.

ज्याठिकाणीं तीर्थ नाहीं, नुसतें देवस्थान आहे, उदाहरणार्थ तुळजापूर, तेथें प्रायश्चित्त व श्राद्ध नाहीं. नुसते देवब्राह्मण व तीर्थप्रसाद असतो. रामेश्वरास सागरतीर्थ आहे व देवस्थानही आहे सबब तेथें सर्व विधि आहेत. मला तीर्थविधि व श्राद्ध कोठेंच करावें लागलें नाहीं. कारण बद्रिनारायणास ब्रह्मकपाटीं ज्यांच्या नांवानें एकदां पिंड दिला व तर्पण केलें तो परमगतीला ह्मणजे ब्रह्माला पोंचला. त्याचें पुन्हा स्मरण सुद्धां करूं नये मग श्राद्ध कसलें? स्मरण करणें ह्मणजे एक प्रकारचें त्यांना आवाहन करणें सारखेंच आहे. आणि आवाहन करणें हें एक प्रकारचें श्राद्धच आहे; ह्मणून परमगतीला पोंचलेल्या पितरांचें पुन्हां आवाहनसुद्धां करूं नये. कारण त्या परमगतीपेक्षां श्रेष्ठ असें दुसरें स्थान नाहीं. मी फक्त गंगोत्रीची गंगा आणली होती ती मात्र यथाविधि रामेश्वरास वाहिली. ही गंगा मी एका कुपींत सीलबंद करून आणली होती परंतु कुपींतली गंगा चालत नाहीं. भांड्यांत घालून सीलबंद भांडें कचेरींत दाखवावें लागतें व शेवटीं तें भांडें परत न मिळतां रामेश्वराचें होतें. शंकराला कांचपात्र आवडत नाहीं ह्मणून कुपी नको असें ह्मणतात. अशीं भांडीं बरींच झालीं ह्मणजे त्यांचा बाजारांत लिलाव होतो व तींच पुन्हां बाजारांतून गंगेकरतां यात्रेकरू विकत घेतात! मलाही असेंच एक भांडें घेऊन त्यांत आणलेली गंगा घालून सीलबंद करून घ्यावें लागलें. ज्याच्याजवळ गंगा नसेल त्याला जर गंगा वाहावी अशी इच्छा झाली, तर तेथें कचेरीमध्यें शुद्ध गंगा विकत मिळेल अशा इंग्रजींत व देशी भाषेंत पाट्या लाविल्या आहेत. अहिल्याबाई होळकरीणीची गंगेची कावड रोज रामेश्वरास पायीं जावी अशी तिनें व्यवस्था केली आहे आणि त्याप्रमाणें ती अद्याप जाते असें ह्मणतात. हा त्या साध्वीचा अगाध महिमा आहे. आपलीं कृत्यें निरंतर चालावीं अशीं तीं करून ठेवणारांची इच्छा असते पण त्यांच्या पुण्याईप्रमाणेंच तीं टिकतात.

रामेश्वराची यात्रा करून जातांना येथून सेतु न्यावा लागतो. हें सेतूचें स्थान रामेश्वरापासून फार लांब धनुष्कोडी येथें आहे व तेथपर्यंत रेल्वे आहे. रामेश्वरची सर्व यात्रा धनुष्यकोडीपर्यंत जातेच. सर्व गेली नाहीं तरी त्यांचा मुख्य पुढारी सेतूकरतां तरी तेथें जातोच. ह्मणजे रामेश्वरास सर्व गाडी खलास होते आणि धनुष्यकोंडीला जाण्याकरतां पुन्हां तशीच भरते! कधीं कधीं माणसांना जागाच मिळत नाहीं! धनुष्यकोंडीला गाडी दिवसांतून एकदांच जाते. कांहीं यात्रा प्रथम धनुष्यकोंडीला जाऊन मग येथें येते यामुळें गाडींत जागा नसल्यास तिकिटें बंद होतात. मग कोणी गांवांत परत जातात; राहण्याची सवड नसल्यास कोणी तसेच रेल्वेचे बाजूनें धनुष्यकोंडीपर्यंत चालत जातात. रेल्वेचें भाडें अडीच आणे आहे, अर्थात तें ९।१० मैल असावें. रस्ता नुसता पुळणीचा आहे. राहण्यास फार वेळ नसल्यास कोणी कोणी प्रथम सेतुबंधास ह्मणजे धनुष्यकोंडीस जाऊन नंतर रामेश्वरास येतात. मेल धनुष्यकोंडीला जात नाहीं. ती सिलोनकडे ह्मणजे धनुष्कोंडी पिलरकडे जाते व उतारू तेथें उतरून बोटींतून पुढें नेण्याची व्यवस्था केलेली असते व ही मेल सिलोनची आलेली मंडळी परत नेते. बोट सिलोनच्या जवळच्या बेटावर जाते तेथें सिलोनची मेल असतेच; त्या मेलमधून लोक सिलोनास जातात. प्रथम सिलोनला जाण्याचा रस्ता धनुष्कोंडीवरूनच आंखलेला होता व त्याप्रमाणें रेल्वे अगदीं दोन्ही समुद्र एका ठिकाणीं मिळतात तेथपर्यंत नेली होती. परंतु तेथें दोन्ही समुद्र मिळतात ह्मणून त्यांच्या भरतीच्या आघातानें समुद्र उसळतो यामुळें बोट लावण्याची सोय नाहीं. ह्मणून धनुकोंडी पिलर हें सिलोनला जाण्याकरितां बोटीच्या सोईचें स्टेशन केलें असून तेथें बोटीचा धक्का केला आहे. यामुळें रेल्वेतून उतरून धक्यावरून मनुष्य थेट बोटींत बसतो.

ह्या रेल्वेंतून धनुष्यकोंडीला जातांना मात्र देखावा मजेचा दिसतो.

रामेश्वरापासून धनुष्कोंडीपर्यंतचा भाग मुशिरासारखा समुद्रांत गेला आहे. दोन्ही समुद्र गाडींतून चांगले दिसतात. पश्चिमेकडील अरबी समुद्रास रत्नाकर ह्मणतात व पूर्व समुद्रास किंवा बंगालचे उपसागरास महोदधी ह्मणतात. हे दोन समुद्र ज्या ठिकाणीं मिळतात त्या ठिकाणीं स्नानाचें पुण्य विशेष आहे. कारण तो भयानक देखावा दिसावा व त्याची नजरेस संवय व्हावी हेंच तें पुण्य आहे. पाणी एकसारखें उसळत असतें यामुळें पायाखालची वाळू भराभर निघून जात असते. समुद्रही फार खोल आहे यामुळें येथें स्नान करणारांची फार तारांबळ उडते. कोणी इतके भित्रे असतात कीं, तांब्यानें पाणी घेऊन स्नान करतात; त्यांच्या तांब्यामध्यें पाण्याच्या दुप्पट माती येते, पण त्यांचा निरुपाय आहे. येथें भिण्यासारखी स्थिति आहे खरीच. येथें जास्त पुण्य मिळवूं गेल्यास तो कायमचाच पुण्यवान व्हावयाचा ! ! गाडी पूर्वीं अगदीं या ठिकाणापर्यंत येत होती परंतु आतां धनुष्यकोंडी स्टेशन येथून १।२ मैल मागें आणलें आहे यामुळें यात्रेकरूंना मात्र या समुद्रसंगमावर स्नानाकरतां व सेतु आणणेकरितां जावेंच लागतें. धनुष्यकोंडी येथें थोडी वस्ती आहे. बाजार, देवळें व अहिल्याबाईचें अन्नसत्रही आहे. हे दोन समुद्र ज्या ठिकाणीं मिळतात, त्या ठिकाणीं भरतीचे वेळीं लाटा एकमेकांवर फार जोरानें आपटतात व पाणी फार वर उसळतें. त्या लाटांचें खेळणें, खिदळणें, ओरडणें, व चमत्कारिक नाचरंग करणे यांची शोभा दुरूनच पाहाण्याची मजा असते. ‘ युद्धस्य वार्ता रम्या ’ त्याप्रमाणे यांचा अनुभव मात्र घेण्याचा उपाय नाहीं. मोठ्या बोटीला सुद्धां तेथून जाणें धोक्याचें आहे; ह्मणूनच महासागरांत जाणाऱ्या बोटी ह्या बेटावरून जात नाहींत, त्या सिलोनला वळसा घालून जातात. बोटींची ही स्थिति मग मनुष्याच्या स्नानाची गोष्ट काय विचारावी ? त्यांत बायकांचा कांहीं उपायच नसतो.

येथें संकलपयुक्त स्नान करण्याकरतां व दुसऱ्या विधीकरतां पंड्या बरोबर घ्यावा लागतो. तो समंत्रक सर्व पूजा व स्नानविधि यात्रेकरूकडून करवून घेतो व यात्रेच्या प्रसादाकरतां त्यास सेतु म्हणजे, ओंजळभर तेथील वाळू देतो. ही वाळू पुन्हा रामेश्वर येथें सेतुमाधवाचे देवळांत आणून त्याची पूजा करतात. सेतुमाधव, बिंदुमाधव, व वेणिमाधव हे तिघे भाऊ आहेत. यांचें त्या त्या क्षेत्रांचे ठिकाणीं, दर्शनाचें पुण्य विशेष आहे. सर्व यात्रेची सांगता त्यांच्या दर्शनाशिवाय होतच नाहीं. यापैकीं वेणिमाधव ( त्रिवेणी माधव ) प्रयागांत, बिंदुमाधव काशींत व सेतुमाधव रामेश्वरास आहे. येथें सेतु आणून त्याची पूजा झाल्यावर त्याचे तीन भाग करतात. दोन उपाध्ये बुवास देऊन एक भाग प्रसादाकरतां उपाध्येबुवा यात्रेकरूस देतात. हा भाग फार जपून ठेवावा लागतो; अगदीं कुपींत सीलबंद करून घ्यावा लागतो. कारण याच्यांतील एक कणही बाहेर जाऊं देतां उपयोगी नाहीं, त्याबद्दल फार पाप आहे. म्हणजे हा वाळूचा प्रसाद म्हणून कोणी दुर्लक्ष करील तर तसें करूं नये. या यात्रेमध्यें हाच प्रसाद मुख्य आहे हें लक्षांत असावें हा त्याचा मुख्य हेतु दिसतो. हा सेतु प्रयागास नेऊन तेथें त्याची पिंडी करून यथाविधि पूजा करून, नंतर तो त्रिवेणींत विसर्जन करून तेथून प्रसादाकरतां गंगा घ्यावयाची असते व ती घरीं आणून तिची पूजा करून, तो तीर्थप्रसाद सर्वांस वांटला म्हणजे ही यात्रा संपूर्ण होते. या यात्रेचें पुण्य विशेष आहे. निदान मनुष्य चौकस व बहुश्रुत तरी होतो हें पुण्य काय कमी आहे ? निदान आर्यावर्ताची त्याला खरी कल्पना तरी येतेच.

याप्रमाणें ही सर्व यात्रा केल्यावर मीं गंधमादन पर्वतावर उपाध्येबुवास घेऊन गेलों. हा पर्वत म्हणजे हल्लीं शुद्ध पांढऱ्या वाळूची एक टेंकडी आहे ! युगमानानें व वाऱ्याच्या वेगानें हा खचला असावा. याच पर्वतावरून मारुतीनें वर उंच उडी मारली तेव्हां त्यास लंका

दिसली व पुढें त्यानें ह्यापेक्षां उंच गगनपर्यंत उडी मारली व तो लंकेत गेला. हल्लीं ह्या ठिकाणाहून मानार बेट किंवा सिलोनचा किनारा सुमारें २०।२५ मैल आहे असें दिसतें आणि मागें सांगितलेल्या ठिकाणांतूनच (धनुष्यकोडी पिलरवरूनच) सिलोनला समुद्रावरून रेल्वेचा पूल होणार आहे असें ह्मणतात. कृष्णावतारांत भारतीय युद्ध सुरू असतां बळिराम कोणत्याच बाजूस न मिळतां तीर्थयात्रेस गेला व सर्व आर्यावर्तांतील यात्रा करून १६ व्या दिवशीं परत आला, त्यावेळीं दुर्योधन व भीम यांचें शेवटचें गदा युद्ध चाललें होतें. हल्लीं रेल्वे मेलनें जरी प्रवास केला तरी सर्व भरतखंडांतील यात्रा १६ दिवसांत पूर्ण होणार नाहींत. अर्थात बळिराम हा हल्लींचे मेलगाडीचेपेक्षां निदान दुप्पट तिप्पट तरी जलद चालणारा असला पाहिजे. ही कृष्णावतारांतील गोष्ट झाली. त्यापूर्वींचा रामावतार ह्मणजे त्यावेळीं मनुष्यांची शक्ति विशेष असली पाहिजे हें उघड आहे. व मागें हंपी विजयानगरचे मोठमोठ्या घराएवढे धोंडेही आपण पाहिले आहेत, तेव्हां हीच त्यांच्या पराक्रमाची किंवा कृतीची किंवा खेळांची हल्लींची साक्ष आहे. हे सर्व धोंडे किंवा राशी एकट्या मारुतीनेंच केल्या असें नसून नळ, नीळ, जांबुवंत वगैरे एकापेक्षां एक पराक्रमी मंडळी होती व त्यांचीच ही कृति असावी. त्या सर्वांत मारुती श्रेष्ठ अर्थात गंधमादनावरून हल्लींचे २०।२५ मैल मारुतीनें लंकेत उडी मारली यांत अशक्यतेचा भाग दिसत नाहीं. आणि जरी उडी मारण्याची अशक्यता वाटली तरी तो समुद्र पोहून जाणें मुळींच अशक्य नाहीं. कारण हल्लीं इंग्लंड व फ्रान्समधील इंग्लिश खाडी वीस मैलांची असून ती पोहून जाणाऱ्या १५।१६ वर्षांच्या मुलीसुद्धां आढळल्या आहेत व त्यांनीं बक्षिसें मिळविलीं आहेत! कदाचित् त्यावेळीं हे समुद्र जास्त जवळ असतील. महाभारत वनपर्व अध्याय १४९ यांत स्पष्ट सांगितलें आहे कीं, नद्या, पर्वत, वृक्ष, सिद्धदेव, महर्षि, आणि सर्व पदार्थ

व पृथिव्यादि पंचमहाभूतेंसुद्धां युगायुगाचे ठिकाणीं कालानुरोधानें वर्तन करीत असतात. ह्मणजे शरीर, बल व प्रभाव हे कमी कमी होऊनच उत्पन्न होतात. सबब मारुती अर्जुनास ह्मणतो समुद्रोल्लंघनाचें माझें रूप पाहाण्याची तूं इच्छा करूं नको, तें अतर्क्य आहे. कालाचें अतिक्रमण करणें अशक्य असल्यामुळें मीही युगधर्माप्रमाणेंच वर्तन करीत आहें असें खुद्द मारुती म्हणतो मग दुसरा पुरावा कशाला? अर्थात् वयमानाप्रमाणें गतसामर्थ्य पुन्हां ज्याचें त्यालासुद्धां प्राप्त होत नाहीं हेंच खरें. तसेंच तें असह्यही आहे. रामानें सेतु मोडिला ह्मणण्यापेक्षां युगमानानें समुद्राची मर्यादा वाढून तो बुडाला व त्यायोगानें हें अंतर जास्त वाढलें असें ह्मणणें बरें. तसेंच लक्ष्मणास शक्ति लागून तो मूर्छित पडला त्यावेळीं मारुतीनें द्रोणागिरि रात्रीच्या रात्रीं आणला ह्मणजे प्रत्यक्ष पर्वत आणण्याऐवजीं द्रोणागिरीच्या सर्व किंवा बऱ्याचशा वनस्पतींचा ढीग त्यानें आणिला असेल, तेव्हां अर्थात् वनस्पतीसंबंधानें सर्व द्रोणागिरी आणल्यासारखेंच झालें. आतां आपल्या शक्तीवरून त्या गोष्टीची आपणांस कल्पनाही करतां येत नाहीं, ह्मणून त्यास आपण हसणार, ही गोष्ट अलाहिदा आहे व यांत सर्व दोष आपलाच आहे. कारण युगायुगाचे मानानें सर्व प्राणीमात्रांच्या शक्तींचा ऱ्हास कसा होत आहे याची आपण कल्पनाच करीत नाहीं. पांडवांचीं (भीमाचीं) कृत्यें यांची उपपत्ति अशीच लाविली पाहिजे. अर्जुनानें त्यावेळच्या मानानें फार भक्कम असा बाणांचा पूल केला होता व तो मारुतीनें नुसती त्यावर उडी मारून आपल्या भारानें मोडून टाकला, असें एकदोनदां झालें. शेवटीं अर्जुनाची प्रतिज्ञा फुकट गेली ह्मणून तो प्रतिज्ञेप्रमाणें अग्निकाष्टें भक्षण करणार होता, इतक्यांत श्रीकृष्ण ब्राह्मणाचे वेशानें तेथें आले व त्यांनीं आपलें सुदर्शन, पुन्हा पूल पडूं नये ह्मणून त्याखालीं घातलें तेव्हां पूल टिकला. अर्थात् श्रीकृष्णाची शक्ति मात्र कांहींशी रामावताराइतकी होती; आणि ह्मणूनच भारतीय युद्ध

हातांत शस्त्र न घेतां व कांहीं प्रतिकार न करितां केवळ खेळाप्रमाणें असें फक्त मारुतीला व कृष्णालाच वाटलें व इतरांना तें जिवा विशेषच वाटलें. कृष्ण व मारुती यांनीं मात्र आपल्यावर आलेल्या शस्त्रांचा मुळींच प्रतिकार केला नाहीं, म्हणून कृष्णाच्या शक्तीपुढें मारुतीचें कांहीं चाललें नाहीं. पण अर्जुनाची शक्ति युद्धानंतर म्हणजे युग संपण्याचेवेळीं युग पद्धतीनें कमी होऊन, शेवटीं तो अगदीं निर्बळ झाला. तसेंच भीम एवढा नवनाग सहस्त्रबळी होता तरी त्याला मारुतीचें शेपूट उचलतां आलें नाहीं. भाविक पद्धतीनें पाहिलें असतां त्यांत कृष्णाचा मोठेपणा व त्याच्या सामर्थ्यानें पांडवास जय मिळाला. प्रत्यक्ष पांडवांच्यांत कांहीं अर्थ नाहीं. रामावतारांतील एखाद्या माकडानेंसुद्धां त्यांचा पराभव केला असता हें दाखविण्याकरितां त्याचा उपयोग होईल व तो खराही आहे. पण युग पद्धतीनेंच शक्ति कमी होत चालली आहे हें जें तत्व व्यासांनीं त्यांत ग्रथित केलें आहे, तें विसरतां कामा नये. तें विसरतात म्हणून आह्माला पुराणांवर केवळ श्रद्धा ठेवण्याची पाळी आली आहे. पुराणांत विनोद किंवा कोटि नाहीं असें नाहीं, पण तो विनोद अज्ञानी लोकांचें मन आकर्षण करून घेण्यारितां, सामर्थ्याची व पुराणाची गोडी लावण्याकरितां आहे हें उघड आहे. बाजारांतसुद्धां ज्या दुकानांत टापटीप, स्वच्छता, आदरातिथ्य विशेष असेल तो दुकानदार लबाड असला तरी गिऱ्हाईक प्रथम त्याच्याकडे जातें. तीच गोष्ट ही. तात्पर्य एका अवतारांत जी गोष्ट शक्तीच्या किंवा कल्पनेच्या बाहेर म्हणून ठरली जाते, तीच त्याच्या पूर्वींचे अवतारांत नुसता खेळ म्हणून म्हटली जात होती. इतका शक्तीमध्यें अवताराच्या मानानें फरक पडतो. हा फरक आपण लक्षांत घेत नाहीं ही आपली चूक आहे. कल्पनेकरितां पेशवाईतील मनुष्यांच्या शक्तीमध्यें व आपल्या हल्लींच्या मनुष्यांच्या शक्तीमध्यें किती फरक आहे तो पहावा. फार कशाला आपल्या वडिलांच्या शक्तीमध्यें

व आपल्या शक्तीमध्यें व आयुष्यामध्यें किती फरक आहे हा ज्याचा त्यानें पुरावा पाहावा व त्यावरून युगाचे शक्तीचे ऱ्हासाची कल्पना करावी. सारांश इतिहास किंवा पुराणकालांतील गोष्टी, त्या कालची व व्यक्तीची कल्पना, त्या कालांतील इतर गोष्टींवरून ह्मणजे पूर्णपणें त्यांच्यांशीं तादात्म्य केल्याशिवाय चांगल्या समजणारच नाहींत. नुसती आपल्यावरून कल्पना करून त्यांस मूर्ख ठरविल्यास तो आपलेकडे मूर्खपणा येतो हें लक्षांत ठेवावें. कृष्णावतारांत फक्त कृष्णाची शक्ति मात्र रामावतरांतील रामाइतकी होती. आपल्यांतसुद्धां एकादा मनुष्य अचाट बुद्धिमान्, विलक्षण सामर्थ्यवान् व बराच उंचही आढळतो, पण हा अपवाद आहे. असा निपजला ह्मणजेच त्याला अवतारी पुरुष ह्मणतात.

गंधमादन पर्वत हा पूर्वीच्या काळीं कदाचित् मोठा असेल किंवा वानरांनीं तो केलाही असेल. परंतु वाऱ्याच्या सतत झोतानें त्यांतील वाळू उडून जाऊन तो आतां अगदीं लहान एका वाळूच्या टेंकडा-एवढा—झाला आहे. हल्लीं त्यावर रामाचें देवालय आहे व तेथें गोसावी वगैरे राहातात. तेथें जाण्याला सडक नसून नुसत्या वाळूंतून जावें लागतें. नुसती पुळण असल्यानें पायांत घालण्याचा कांहीं उपाय नाहीं; बरें न घालावें तर वाळूंत बाभळीचे किंवा फणे निगडुंगाचे कांटे पडलेले असतात त्यांचा त्रास होतो. गाडीही जात नाहीं. त्यामुळें असा त्रास आहे. असा रस्ता थोडाथोडका नाहीं तर दोन मैल आहे. वाटेंत ठिकठिकाणीं मारुतीचीं व दुसरीं देवळें, पाण्याचीं डबकीं ( तीर्थें ) आहेत. त्यांतील कांहीं तीर्थें बांधीव आहेत. त्या बेटांत जिकडे तिकडे वाळू असून व भोंवतालीं समुद्र असून पाणी गोड आहे. मागें सांगितलेल्या धनुष्कोडीच्या टोंकाजवळ समुद्र अगदीं जवळ असतां एक पुरुष विहीर खणली आहे तेथेंसुद्धां गोड पाणी लागलें आहे. बेट लहान असून पर्वत किंवा नदीचा

संबंध नसतांनासुद्धां जिकडेतिकडे गोड पाणी लागतें ही आश्चर्यकारक गोष्ट आहे. हें एक ह्या यात्रेचें रहस्य दिसतें. रामाचें देऊळ टेकडीच्या शिखरावर आहे. त्याच्या गच्चीवर उभें राहिलें असतां सर्व रामेश्वर बेट एकसमयावच्छेदें करून दिसतें. त्यावरून रेलवे कशी आली आहे, कशी गेली आहे, सिलोनला बोट कशी जाते हें सर्व स्पष्ट दिसतें. यात्रेकरूंनीं या ठिकाणीं अवश्य जावें.

रामेश्वरास सॅनिटेशन बोर्ड आहे, म्युनिसिपालिटी नाहीं. इकडील रिवाजाप्रमाणें संडासही नाहींत. प्रत्येक आळीमागें एकेक मोकळी गल्ली ठेविली आहे, तींत शौचास जावें. ज्यानें त्यानें आपल्या घरां-पाठीमागें बसावें, दुसऱ्याचे हद्दींत जाण्याचें कारण नाहीं. बायका पुरुषा-मध्यें भेद नाहीं; जरूर तर निरनिराळ्यावेळीं जावें किंवा एक येईपर्यंत दुसऱ्यानें जाऊं नये. १० वाजून गेल्यावर १२ चे आंत भंगी येऊन त्या गल्ल्या साफ करून जातो. जिकडेतिकडे वाळू असल्यामुळें घाण होत नाहीं. रामेश्वराची पौराणिक कथा अशी आहे:—हें लिंग श्रीरामचंद्रांनीं लंकेंत जाण्याकरितां समुद्रांत सेतु बांधिला तो निर्विघ्न-पणें पार पडावा व रावण वधाचे कामीं आपणास यश यावें ह्मणून त्यांनीं हें वाळूचें करून त्याची आराधना केली. खुद्द काशीविश्वेश्वरासच येथें आणण्याचा बेत होता व त्याप्रमाणें मारुतीची रवानगीही केली होती; परंतु मुहूर्त चुकूं लागला ह्मणून हें वाळूचें लिंग केलें व त्याची आराधना केली. तेव्हां त्यांत शंकर प्रकट होऊन त्यांनीं त्यांस इच्छित वर दिला व रामाच्या आग्रहावरून आपण त्यांत राहिले. याला गंगोत्रीची गंगा घालण्याचें विशेष पुण्य आहे. रामानें हें स्थापन केलें ह्मणून यांस रामेश्वर ह्मणतात. मारुतीनें मागून आणलेल्या काशी-विश्वेश्वराच्या लिंगाची नंतर जवळच स्थापना केलेली आहे. त्यालाही हल्लीं काशीविश्वेश्वरच ह्मणतात.

रावणवधासारखें महत्कार्य करण्यास निघण्यापूर्वी रामचंद्र अव-

तारी पुरुष होते तरी त्यांस परमेश्वराचें अधिष्टान करून व त्याचें अनन्य भावानें चिंतन करून इष्ट कामनासिध्यर्थ वरप्रसाद मागावाच लागला. कोणत्याही कार्यारंभीं आपल्या इष्ट देवतेचें स्मरण करावें, अशी आर्यांची प्राचीन चाल आहे. आपल्या इष्ट देवतेचें देऊळ जवळ असल्यास ठीकच आहे, नाहींतर घरांतल्या देवांचें दर्शन घ्यावें किंवा आपल्या इष्ट देवतेचें सुपारीसारखें किंवा कसलेंही अधिष्ठान करून त्याची अनन्य भावानें पूजा करावी, निदान मनःपूर्वक स्मरण तरी करावें ह्मणजे ती देवता त्यास अदृश्य रूपानें मदत करावयास येते. पण ही गोष्ट अलीकडचे लोक विसरतात, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. वेदाध्ययनाच्या आरंभींसुद्धां श्रीगणेशायनमः किंवा कोणत्याही इष्ट देवतेचें स्मरण करून कार्याला लागावें, असें रामदासासारख्या भगवद्भक्तांनीं आणि गीतेमध्येंही स्पष्ट सांगितलें आहे. पण अलीकडचे लोकांस त्यांचे चालते बोलते देव जे वडील त्यांच्या आशीर्वादाची सुद्धां किंमत वाटत नाहींशी झाली आहे. ह्या चांगल्या गोष्टी हल्लीं पाश्चमात्यांनीं घेतल्या आहेत आणि त्यांच्या जुन्या नास्तीक गोष्टी आपण स्वीकारूं लागलों आहोंत. धर्माचीच पर्वा नाहीं, मग देवाला तरी कोण विचारतो? सर्व आपल्या कर्तृत्वाची घमेंड व त्यानेंच ही अधोगती चालली आहे. एवढें मोठें साम्राज्य सरकार, ज्यांना आपल्या कर्तृत्वाचा मोठा अभिमान, फ्रान्ससारखीं बलाढ्य राष्ट्रें ज्यांच्या मदतीला, इतकेंच नव्हे तर सर्व जगाची ज्यांना मदत, इतर धर्मांमध्यें कांहीं अर्थ नाहीं असा ज्यांचा पूर्ण समज, सर्व तारक काय तो प्रभू येशूख्रिस्त असून त्याच्यावर ज्यांचा पूर्ण विश्वास, पण महायुद्धाच्या कचाट्यांत सांपडतांच यश येण्याकरतां येशूच्या देवळांत वारंवार प्रार्थना करून व घंटा वाजवून ते थकले. व या युद्धांतून धडगतीनें आपली सुटका होत नाहीं असें समजतांच त्यांस सर्व देव दिसूं लागले! व त्यांच्या

कर्तृत्वाची घमेंड जिरली तेव्हां सर्व धर्मांच्या लोकांनीं जय मिळण्या-बद्दल आपापल्या देवांची प्रार्थना करावी असे शेवटीं त्यांनीं हुकूम सोडले. त्यांचे सर्व उपाय थकले शेवटीं त्यांस हाच उपाय दिसला व त्याप्रमाणें सर्व प्रजाजनांनीं आपापल्या देवांची प्रार्थना केल्यावर एकदांचा कसाबसा जय मिळाला. यावरून ख्रिस्ताबद्दलचा अभिमान खोटा आहे असें स्पष्ट ठरलें व ख्रिस्तापेक्षां इतर धर्मच श्रेष्ठ ठरले; किंवा निदान ख्रिस्तावर त्यांचा पूर्ण विश्वास नसल्यामुळें अशा ढोंगी-पणानें तो त्यांस पावत नाहीं असेंही ह्मटलें तरी कांहीं हरकत नाहीं. असो. संकटाशिवाय देवाची आठवण होत नाहीं ह्मणतात तेंच खरें. आपलें अस्तित्व दाखविण्याकरतां परमेश्वर हीं संकटें आणतो व हीं संकटें ह्मणजे शिक्षणच आहे. हल्लीं आपला देश अधोगतीला जात चालला आहे, ह्याबद्दल सर्वांची एकवाक्यता आहे. पण त्याचें मूळ कारण नीतिधर्म किंवा सदसद्विचार यांचे अधोगतीकडे न लावतां, कोणी ह्मणतात प्रथम जाती काढून टाका, प्रथम बायकांच्या मुंजी करा, विधवांचीं लग्नें लावा, पोषाख बदला, डोकीवर केस राखा. कोणी ह्मणतात मडमांशीं लग्नें लावा, कारण तेही आर्य-शाखेंतलेच आहेत ! कोणी ह्मणतात मराठ्यांच्या विधवांशीं लग्नें लावा, कारण ब्राह्मणांना त्रैवर्णिकांशीं लग्न करण्याचा अधिकार श्रुतीनें दिला आहे ! ! कोणी ह्मणतात मांसाहार करा कारण ऋषी करीत होते व ते त्रैवर्णिकांकडे जेवीतही होते आणि ह्मणूनच ते शहाणे व सामर्थ्यवान झाले ! ! ! हें तुह्मांला कसें हो समजलें तर आम्हीं विद्वान् संस्कृतज्ञ झालों, बी. ए. झालों, एम्. ए. झालों व इंग्रजांमार्फत वेदांचा अर्थ लाविला त्यांत आह्मांला हीं रत्नें सांपडलीं ! ! ! कोणी ह्मणतात ख्रिस्त धर्म स्वीकारा कारण हल्लींच्या परिस्थितीला तोच योग्य आहे. अशा रीतीनें प्रथम समाज सुधारा; कशाकरितां ? तर गेलेलें वैभव पुन्हा मिळण्याकरितां ! ! ! काय हें ! एखादें अज्ञान पोर सुद्धां

सांगेल कीं, एकी करण्याचा व वैभव मिळण्याचा या गोष्टींशीं कांहींएक लेशसुद्धां संबंध नाहीं. त्याला कांहीं तरी पराक्रमच केला पाहिजे. उगीच नुसती अशी अप्रयोजक वटवट करून काय उपयोगी? आमचें स्वराज्य होतें तेव्हां आमचे जातींचीच काय पण हिंदुमुसलमानांची सुद्धां एकीच होती व ती विशेष म्हणजे विश्वासु होती. पुष्कळ आरब आमच्या राजांच्या नोकरीस होते व त्यांनीं आपल्या पहाऱ्याचें काम फार इमानें इतबारें केलें आहे. आणि आतां नवराबायकोंचें व बापलेकांचे सुद्धां जमत नाहीं? कोणाचा कोणाला विश्वास नाहीं याला खरें कारण काय तर आमचें राज्य गेलें व आमचा धर्म गेला. लोकमान्य टिळकानीं हेंच बजाविलें कीं, स्वराज्य आल्याशिवाय असल्या गोष्टींचा निकाल करितां यावयाचा नाहीं. जों जों प्रयत्न कराल तों तों भलतेंच होत जाईल. तोच प्रत्यय आज येत आहे. शरीरांतील शक्ति कमी झाली म्हणजे नानाप्रकारचे नसते रोग उद्भवतात. त्या प्रत्येक रोगावर औषध काय देणार? व त्यापासून गुण तरी काय येणार? त्याला शक्तीच वाढली पाहिजे. निदान शक्ति येईपर्यंत औषधें तरी बंद ठेविलीं पाहिजेत. अशा रोगांना औषधें देत गेल्यास जुने रोग बरे न होतां नवे मात्र उद्भवतात असा सर्वत्र अनुभव आहे आणि तोच हल्लीं अनुभवास येत आहे. सारांश स्वराज्य येईपर्यंत म्हणजे आपल्या हातांत सत्ता येईपर्यंत आपल्या धर्मांत व रूढींत कांहीं विशेष ढवळाढवळ करतां उपयोगी नाहीं. या रूढी किंवा आचार स्वराज्याला किंवा एकीला प्रतिबंधक होत आहेत हें म्हणणेंच चुकीचें आहे. मग आमच्या इकडील महाविद्वानांना हें कां समजत नाहीं? खरें पाहिलें असतां ही उन्नति नाहीं हें त्यांचें मनसुद्धां त्यांना सांगत असेल, कारण हें न समजण्याइतके वेडे ते खचित नाहींत. हा केवळ राजकर्त्यांच्या संगतीचा परिणाम आहे, मनाचे चोचले आहेत. तशांत आपल्या धर्माचें आम्हाला ज्ञान नाहीं. आमच्यांत फूट पाडावी,

आमच्या सर्व उच्च संस्कृतींचा नाश व्हावा ह्मणून त्यांची शिकवण व तिचा हा परिणाम आहे. ह्मणजे रोग एक व औषध दुसरेंच! गुण कसा येईल? आमची समाजरचना व आचार विचार सर्व जगांत श्रेष्ठ आहेत असें निरभिमानी युरोपियन सुद्धां स्पष्ट सांगतात पण तिकडे आमचे लोक लक्ष देत नाहींत. त्यांना हे हिजडे चाळे किंवा मनाचे चोचले पाहिजे आहेत. आमच्या कोळ्या कातकऱ्यांत जें कुटुंबसुख आहे तें युरोपांतल्या राजे रजवाड्यांतसुद्धां नाहीं. याच समाजानें एकदां सर्व पृथ्वीवर साम्राज्य केलें व आपला कित्ता सर्वांस गिरवावयास लावला, हें त्यांचे लक्षांत येत नाहीं. सध्यां अवकळा आली आहे ही समाज रचनेमुळें नसून दुर्दैवानें किंवा कालचक्राचे फेऱ्यानें ती आली आहे. पण त्याकरितां भांबावून जाऊन आपल्याच पूर्वजांवर, धर्मावर, किंवा त्यांच्या चाली रीतींवर ताशेरे झाडून असे अनन्वित प्रकार करणें हें अगदीं गैर आहे. बाहेर काम झालें नाहीं, कांहीं कामांत अपेश आलें तर त्याबद्दलचा राग घरांतल्या मंडळीवर व देवधर्मावर कां? नेहमीं घरांतल्या ह्यातारीशीं ह्मणजे समाजाशीं पिरपिर कां? तर इंग्रजाच्या संगतीनें आमचा समाज बिघडला असें बोलण्याचीसुद्धां त्यांना छाती होत नाहीं ह्मणून! पूर्वजांच्या वतीनें कोणी बोलावयाला नाहीं ह्मणून? विचार करा!! मन स्थिर करून परमेश्वर चिंतन केल्यास युक्ति सुचून आलेला काळ कसा तरी प्रयत्न करून निघून जाईल, पण बिघडलेलें शील कधींही सुधारणार नाहीं. मग इष्ट दशा प्राप्त होण्याचें तर लांबच राहिलें. ही गोष्ट आमचे कडील विद्वानांनाही समजत नाहीं याचें फार फार आश्चर्य वाटतें. 'परबुद्धि विनाशाय' ही खूण ते विसरतात. मराठ्यांचा उत्कर्ष होऊं नये, आपसांत भांडणें लागावीं ह्मणून निजामानें सातारा व कोल्हापूर ह्या गाद्यांत बेबनाव उत्पन्न केला. त्यावेळीं शाहूजवळ कोल्हापूर-करांचा नायनाट करण्यासारखा बाजीराव सरदार होता पण बाजी-

रावानें हा निजामाचा कावा ओळखून शाहूचे आज्ञेनें त्यांचेवर स्वाऱ्या करून त्याची खोड मोडली. रघुनाथराव इंग्रजांस वश झाला असतां पेशवे ( नानाफडणीस ) रघुनाथरावापाशीं भांडले नाहींत, इंग्रजाशीं भांडले. शिवाजीचा तर त्या कामीं हातखंडाच होता. आपल्या जातीचा कोणताही कर्तृत्ववान् सरदार शत्रूकडे सांपडला असला तरी युक्तिप्रयुक्तीनें त्याला वश करून घ्यावयाचाच, वगैरे गोष्टी इतिहासांत प्रसिद्धच आहेत. इतिहास शिकावयाचा तो दुसऱ्याचे दुर्गुण घेण्याकरितां नसून स्वत्व कायम राखण्याकरितांच आहे. कोठें ती राज्यकारण धुरंधर मंडळी व कोठें हे आजकाळचे बी. ए. ! घरादाराचें वाटोळें करून हे बी. ए. झाले व त्यांनीं विद्वान होऊन घर घालविलें, श्रेष्ठ मंडळी घालविली ( त्यांचें ऐकिलें नाहीं ), आचार विचार घालविला व आतां संस्कृतीही घालवूं पाहात आहेत. जुनी मंडळी कोठें बी. ए. झाली होती? पण त्यांनीं आपलेपणा पूर्णपणें राखिला, शत्रूंवर जरब बसविली व त्यांस दास केलें; पण हे बी. ए दुसऱ्याचे दास झाले व आपल्या कुळगोत्राला दास होण्याचा उपदेश करीत आहेत. याचें कारण ते आपल्या मनांत इष्टकामना सिद्ध्यर्थ रामेश्वराची ( परमेश्वराची ) स्थापना करीत नाहींत हें होय. मग त्यांस त्यांच्या सुधारणेचा खरा मार्ग कसा सांपडेल? ते पाश्चात्यांच्या प्रवाहांत वाहत जाऊन शेवटीं अधोगतीलाच जाणार. परमेश्वर चिंतनानें मुख्यतः मनुष्यांत स्वाभिमान उत्पन्न होतो व आमची चूक सुधारण्यास तुह्मीं आह्माला उपदेश करूं नका, आह्मी खरे श्रेष्ठ आहों व तुह्मीं कनिष्ठ आहां, आमची चूक आह्मीं सुधारूं असें तो अशा मानभावी लोकांस स्पष्ट सांगतो. सारांश ज्यांनीं त्यांनीं आपल्या मनांत रामेश्वराची (परमेश्वराची) स्थापना करून स्वाभिमानपूर्वक देशकालवर्तमानाप्रमाणें कार्याला लागावें हेंच रामेश्वराचे यात्रेचें तत्व आहे, अशी माझी या यात्रेनें समजूत झाली आहे व तीच कायम आहे व सर्वांनींही हाच

कित्ता गिरवावा निदान मजसारख्या गरिबांनीं तरी गिरवावा अशी माझी विनंति आहे. धार्मिकपणामुळें मन जसें स्थिर, कार्यक्षम व मजबूत होतें तसें दुसरें कशानेंही होत नाहीं. पण हा अनुभव तरुणपणीं हल्लीं दुसऱ्याच्या चिथावणीनें येत नाहीं, ह्मणून तरुण मुलें भिन्न संस्कृतीच्या लोकांच्या ताब्यांत देतां उपयोगी नाहीं. मग तो शिक्षक कितीही विद्वान असो. याच तत्वावर लो० टिळकांनीं 'हे आमचे गुरुजीच नव्हत' असें युरोपीयन प्रोफेसरासंबंधीं ह्मटलें होतें. सत्व रक्षण करून आपलें इष्ट कार्य साधून घेणारा कचासारखा मुलगा फारच क्वचित् ह्मणून मुलांना जपलें पाहिजे. जपाननें हल्लीं जी नवीन पद्धतीनें आपली सुधारणा केली ती आपलें स्वत्व कायम राखूनच केली; स्वधर्म सोडून किंवा आपले आचारविचारांना फांटा देऊन केली नाहीं. हा कित्ता आमच्या सुशिक्षितांच्या पुढें असतां अजून त्यांचे डोळे कसे उघडत नाहींत? इंग्रजीशिवाय चालावयाचें नाहीं, तर मग जपानचें कसें चाललें आहे? तें ह्मणतें जरूरीपुरतें ह्मणजे पाश्चात्यांचे हृदय किंवा खुब्या समजण्याकरितां इंग्रजीच कां तर पाश्चात्यांची किंवा पौर्वात्यांची हवी ती भाषा शिका व प्रसंगापुरता आचारविचार बदला, पण जात व धोरण जपानी कायम ठेवा. मग आपणाला आपली संस्कृति कां राखतां येऊं नये? आपल्याकडे मनुष्याच्या सर्व शक्ति क्षीण झाल्यानंतर मग धार्मिक शिक्षणांचा व आचारांचा अनुभव घेतात. पण ह्मातारपणीं तो अनुभव येऊन उपयोग होत नाहीं. मग ते तरुणांना उपदेश करतात पण तो तरुणांना पटत नाहीं. वृद्धांची कर्तृत्वशक्ति नष्ट झालेली असते, यामुळें उत्पन्न झालेली शक्ति नष्ट होते. ज्याचें मन त्याच्या पूर्व भाग्यानें प्रथमपासून धार्मिक निष्ठेनें स्थिर होतें, त्याचेच हातून पुढें महत्कार्यें होतात हें शिवाजीच्या, बाजीरावाच्या किंवा अलीकडील लोकमान्यांच्या उदाहरणावरून स्पष्ट आहे. जो धार्मिक नाहीं त्याला कार्यांत यश येण्याचा

संशय व भीति वाटते. कारण त्याचें मनच स्थिर व जोरदार नसतें. कधींकाळीं त्यांना यश आल्यास पुन्हां येईल असा भरंवसा नसतो. येथें हल्लींच्या सुशिक्षितांसंबंधें काढलेले उद्गार अनुदारपणाचे किंवा द्वेषबुद्धीचे नसून खऱ्या प्रेमाचे आहेत हें पूर्ण लक्षांत ठेवावें अशी प्रार्थना आहे.

रामेश्वराचे यात्रेंत प्रासादिक वस्तू घेतांना त्यांत रामेश्वराचे व रामाचे निरनिराळ्या अवस्थांचे फोटो मिळतात, तीं तीं ठिकाणें व देवदर्शनें अवश्य घ्यावीं व स्मरणार्थ तसे सर्व प्रकारचे फोटोही घ्यावेत. त्याशिवाय शंख, शिंपा, कवडे, भस्म व रामेश्वराचे सोनेरी लहानमोठे बस्ट कांचेंत बसविलेले मिळतात तेही यथाशक्ति घ्यावे.

ह्या रामेश्वरापर्यंत मुसलमानांच्या स्वाऱ्यांची लाट आली याची साक्ष तेव्हांपासून येथें वाटलेले मुसलमान व त्यांच्या मशिदीही आहेत. उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांच्या वारंवार स्वाऱ्यांच्या योगानें ह्या धर्माला जितका त्रास पोंचला तितका इकडे नाहीं. दक्षिण हिंदुस्थानांत मुसलमानी राज्यें झालीं पण हिंदूंचें व त्यांचें केवळ हाडवैर नव्हतें. इतकेंच नव्हे तर हिंदू व मुसलमान परस्परांच्या देवाला मानही देत. मुसलमानांच्या राजांनीं हिंदूधर्माच्या देवळाला उत्पन्नेंही करून दिलीं आहेत. ह्मणून हिंदू लोक साधूला जसा मान देतात तसा फकिरालाही देऊं लागले, यामुळें इकडचीं देवळें फोडून त्याठिकाणीं मशिदी झाल्या नाहींत. पण उत्तर हिंदुस्थानांत मात्र प्रत्येक महत्वाचें देऊळ पाडून त्यावर किंवा त्याच्याजवळ मशीद झाली आहे. असा द्वेषामुळें अनन्वित प्रकार झाला. त्याची दुरुस्ती पेशवाई होतांच तावडतोब करण्यांत आली, त्यामुळें दक्षिणेंत मुसलमानांना स्वास्थ्य करतां आलें नाहीं व मोठमोठीं देवालयें सुखरूप राहिलीं. हल्लीं वाटलेले मुसलमान जिकडेतिकडे आहेत. हीच त्या धर्माच्या फैलावाची साक्ष आहे. अल्लाउद्दीन खिलजीनें रामेश्वरास मशीद बांधली होती असें इतिहास ह्मणतो

पण मला कोठें ती तेथें दिसली नाहीं. आतां मुसलमानी वस्ती असल्यामुळें दर्गे, पीर वगैरे अलीकडच्या संस्था असतील पण जुनें काम कोठें दिसलें नाहीं. दक्षिणेंतील हिंदू लोक जसे विशेष धार्मिक आहेत तसे इकडील मुसलमानही त्यांच्याच रक्ताचे असल्यामुळें कडवे मुसलमान झाले नाहींत. केवळ धर्माशिवाय हिंदूचा व मुसलमानांचा व्यवसाय व राहाणी एकच आहे.

रामेश्वराची यात्रा झाल्यावर तेथून परत जातांना वाटेंत कोणकोणत्या यात्रा करण्यासारख्या आहेत त्या तेथें रामेश्वरचे उपाध्ये सांगतात. सवड असेल त्यानें तशा त्या कराव्या. मीही यात्रा संपवून पुन्हा मदुरेला आलों व स्टेशनवर खाणावळींत जेवलों. नंतर नियमित ठिकाणीं तिकीट घेतल्यावर नियमित प्लॅट फॉर्मवर जाण्याकरतां हमाल केला व त्याचेबरोबर मी जाऊं लागलों. तेव्हां तो ह्मणाला मी रेल्वेंतून जातों, तुह्मी या रस्त्यानें येऊं नका, तुह्मांला रेल्वे पोलीस अडकवितील, तुह्मी पुलावरून शेवटच्या प्लॅटफॉर्मवर या, मी तेथें आहे. मीं त्याला सांगितलें तूं पुलावरून चल पण तो चढ उतरण्याची खटपट कशाला करतो! तो लगेच चालताच झाला. मी तेथें गेलों तों तो तेथें मिळाला. अशा वेळीं कुलीच्या दंडावरील पट्ट्याचा नंबर नीट लक्षांत ठेवला पाहिजे, नाहींतर गांठोडें गेलेंच समजावें. नंतर त्यानें मला गाडींत बसविलें. गाडींत बसविण्याचा ठराव असल्याशिवाय बसवित नाहींत सबब गाडींत बसविण्याचा ठराव करावा. याला कांहीं पैसे जास्त घेतात पण जागा बरी मिळते. मग मी दिंडीगल, त्रिचनापल्ली, तंजावर हीं जंक्शनें ओलांडून.

## कुंभकोण

येथें आलों. मला वेळ नव्हता ह्मणून मी हीं ठिकाणें पाहिलीं नाहींत. पण यात्रेकरूंनीं अवश्य पहावीं. मद्रास येथें सेंट्रल स्टेशनाजवळ

वारबाक्स रोडवर परमानंद छोटादास यांची धर्मशाळा आहे. येथेंही एक दोन रुपये देऊन तांगा केला ह्मणजे तो सर्व मद्रास शहर दाखवून आणितो. त्रिचनापल्ली फोर्ट येथें चिनाई पिळे यांची कोरोनेशन धर्मशाळा आहे. वाटेंत तंजावर हें महाराष्ट्रीयांना पाहाण्यासारखे व इतिहास प्रसिद्ध शहर पाहाणेंचें राहिलें मद्रास इलाख्यांत महाराष्ट्रीयांना अभिमान वाटण्यासारखें हें शहर आहे. शिवाजीचा भाऊ व्यंकोजी यास शहाजीनें आपली जहागिरी देऊन येथें ठेविलें होतें. या तंजावरचा उपयोग मराठ्यांना एकदोन आणीबाणीच्या वेळीं झाला. औरंजेबानें संभाजीला मारला व ती स्थिति राजारामाचीही होईल ह्मणून त्यावेळच्या कारस्थानी लोकांनीं राजारामाला तंजावरास पळविलें होतें व आपण दंगल करून शांतता झाली तेव्हां त्याला परत आणला, इत्यादि गोष्टी इतिहास प्रसिद्धच आहेत. येथें मराठी भाषा चालते खरी पण हल्लीं भाषा व पेहेराव यांमध्यें स्थानिक संगतीनें व इकडे महाराष्ट्राचें दळणवळण कमी झाल्यामुळें बराच फरक झाला आहे. यात्रेकरूंनीं सवड असल्यास तंजावर येथें अवश्य जावें.

कुंभकोणला कुंभकोणच स्टेशन आहे. येथें स्टेशनजवळ राजाछत्तम ही धर्मशाळा चांगली आहे. हिला रोज चार आणे भाडें आहे. पण नळ विहीर व खोल्या यांची सोय असून बंदोबस्त उत्तम आहे. बाजारांतही एक उत्तम धरमशाळा असून तेथेंही विहीर व नळ यांची सोय आहे. उत्तरेस जशी काशी वेदविवेकरतां प्रसिद्ध आहे तसें दक्षिणेस कुंभकोण आहे. अद्यापही येथे वेदाध्ययनाच्या व संस्कृत पाठशाळा आहेत. येथील शिवालय फार मोठें व प्रख्यात आहे. देवळाचें गोपूरही फार मोठें ह्मणजे १२ मजली ह्मणजे सुमारें १६० फूट उंच आहे. देवळाचें काम जुन्या पद्धतीचें आहे पण पाहाण्यालायक आहे. जवळच महामहम् नांवाचा विस्तीर्ण जलाशय ( तळें ) असून त्याचे कांठीं बरींच देवळें आहेत. सकाळ संध्याकाळ स्नान-

संध्येचा व पूजा अर्चेचा देखावा याच्या कांठावर स्वस्थपणें बसून पाहाण्यासारखा असा चित्ताकर्षक आहे. ज्याला आर्यांची प्राचीन वैदिक राहणी पाहावयाची असेल त्यानें येथें येऊन राहावें. महामहम् तिर्थांत १२ वर्षांनीं गंगा येते अशी प्रख्याती आहे. त्यावेळीं यात्रा विशेष येते असें ह्मणतात. ह्या महामहम् तीर्थाजवळ स्वस्थपणें राहण्याकरितां उत्तम धर्मशाळा आहे. कुंभकोण नंतर मायावरम् जंक्शनवरून मी

## चिदंबरम्

येथें आलों. हें देवालय ह्या प्रांतांत फार प्रख्यात आहे. पंचमहातत्वांपैकीं आकाश तत्वाचें हें स्थान आहे. स्टेशनपासून गांव सुमारें एक मैल लांब असून सडका आहेत व जाण्या येण्यास गाड्या मिळतात ह्या प्रांतांत एकानें गाडी ठरविली ह्मणजे मग त्यांत दुसऱ्यानें बसतां कामा नये, एकाच्याच कुटुंबांतील मंडळी चालते. पण एकटाच मनुष्य असला व त्याला गाडी करावयाची असली, तर त्याला सर्व गाडीचें भाडें भरावें लागतें. ह्या देवालयाचें आवार फार विस्तृत ह्मणजे ५००×६०० यार्ड आहे. व त्या सभोंवतीं एक ताडाएवढा उंच तट असून चारी बाजूस चार मोठीं गोपुरें आहेत. चारी दिशांचीं महाद्वारें अशींच फार मोठीं आहेत. संध्याकाळीं ह्या गोपुरांवर चारी बाजूंनीं दिव्यांच्या माळा लावतात त्यावेळीं लांबून त्यांची फार बहारीची शोभा दिसते. मी गेलों त्यावेळीं देवळाची दुरुस्ती चालली होती. आवारांत पुष्कळ देवतांचीं मंदिरें आहेत, त्यांत प्रथमदर्शनीं गणेश मंदीर लागतें. त्यांतील श्रीसिद्धिविनायकाची मूर्ति फार मोठी ह्मणजे बसलेली आहे तरी दीड पुरुष उंचीची आहे. ध्यान अत्यंत सुरेख, सप्रमाण व चित्ताकर्षक असें आहे. नाहींतर गणपती व मारुती यांच्या मूर्ती कांहींतरी ओबडधोबड असतात. गणपत्यथर्वशीर्षांत

वर्णन केल्याप्रमाणें ही प्रतिमा दर्शनीय आहे. हिच्या तोडीची व इतकी मोठी प्रतिमा सबंध आर्यावर्तांत क्वचित् ठिकाणीं असेल. मी पुष्कळ हिंडलों पण ह्यासारखें ध्यान माझ्या पाहाण्यांत आलें नाहीं. मूर्ति सिंदूरचर्चित नाहीं, कृष्ण पाषाणाची असून घोटीव आहे व यामुळेंच ती अशी मूळस्वरूपांतच राहिली आहे. जवळ जवळ अशाच ध्यानाची मूर्ति पण लहान असून नर्मदेच्या तांबड्या दगडाची ह्मणजे जेथून नर्मदे गणपती आणतात तसल्या दगडाची मूर्ति मीं उंबरगांव जिल्हा ठाणें येथें पाहिली आहे. ती जुने प्रसिद्ध पेढीवाले गोपाळराव मैराळ ह्यांनीं एका कारागिराकडून करविली होती पण कांहीं कारणानें ती त्यांना नापसंत झाली ह्मणून तिची स्थापना तेथें झाली आहे.

चिंदवरं येथें मला मुख्य देवळांत पिंडी किंवा लिंग दिसलें नाहीं. कदाचित तें मागें किंवा खालीं असेल. शंकराची उभी प्रतिमा नटराजन् सारखी दिसली. ही तांबूस रंगाची स्फटिकमय आहे. येथें रोज प्रदोषकाळीं पूजेचा मोठा थाट होतो. देवालय सुवर्णमय आहे. वर कौलें नसून पितळेचे पत्रे मारले आहेत. आरतीचे वेळीं येथें मोठमोठ्या घंटा दोहों बाजूंस टांगल्या आहेत त्यांचा गंभीर ध्वनि चालू असतो. या घंटा नाशिकच्या नारोशंकरच्या घांटेएवढ्या मोठ्या आहेत. ह्या हातानें वाजवितां येत नाहींत. त्या टांगलेल्या दांड्याला एक चक्र केलें असून त्यावर साखळदंड लाविलेला आहे. तो साखळदंड ओढला म्हणजे त्याच्या योगानें ते चाक गिरकी घेतें व त्या योगानें घंटेला हेलकावे मिळतात व लोलकाचे टोले घांटेवर सारख्या प्रमाणांत पडतात. आरतीच्या वेळचा दीपोत्साह, लोकांची दर्शनाची गर्दी, नानाप्रकारचीं वाद्यें व तुतारे यांचें दुमदुमणें, ह्यांच्या योगानें एकाग्रता उत्पन्न होते व क्षणभर देवदर्शनानें पूर्ण सात्विक वृत्ति उत्पन्न होते. देवळाचे कांहीं भाग पडले आहेत, पण दुरुस्तीचें कामही चाललें आहे ही संतोषाची गोष्ट आहे. आवारात पुष्करणीहि आहे. दक्षिणेंत मुसलमान लोक

आले खरे पण इकडील देवालयाला त्यांचा विशेष उपद्रव झाला नाहीं. जो झाला त्याची दुरुस्ती लोकांनीं ताबडतोब केली यामुळें इकडील देवळाचें मूळस्वरूप राहिलें आहे. दक्षिणेंत हिंदूचेंच साम्राज्य फार वर्षें राहिल्यामुळें येथें देवधर्माची व्यवस्था पहाण्यासारखी असते. प्रत्येक गांवांत एक मोठें देऊळ व त्यांत एकादी तरी पुष्करणी असतेच. प्रदेश उष्ण असल्यामुळें सकाळ संध्याकाळ पुष्करणींत स्नान, संध्या व भस्म धारण करून अनायासें देवदर्शन होतें व यामुळें देव व धर्म यांची फारकत होत नाहीं.

'काश्याम् मरणान्मुक्तिः' म्हणजे काशींत मरण आलें असतां मुक्ति मिळते पण चिदंबरं येथील शंकराच्या स्मरणानेंच मुक्ति मिळते अशी येथील स्थानमहात्म्याची प्रसिद्धि आहे. येथेंही धर्मशाळा व खाणावळी आहेत. गाडीवानानें मला एका खानावळींत नेलें व मी ब्राह्मण आहे एवढी मात्र खाणावळीण बाईनीं चौकशी केली. येथें भाषा तेलंगी म्हणून भाषेचा घोटाळा आहेच. येथें मी ज्या खाणावळींत गेलों होतों तेथें दोन बाया होत्या. त्या काय म्हणत हें मला समजत नसे, अर्थात मी काय म्हणें हेंही त्यांना समजत नसे. पण दक्षिणी ब्राह्मणांचा रीतिरिवाज सगळीकडे सारखाच, यामुळें पुष्कळ गोष्टी सहज समजत. पाय धुवायाला पाणी कोणचें दिलें आहे, पिण्याकरतां कोणचें आहे, हें भांड्यांवरून व त्यांच्या ठिकाणावरून समजे. येथें जेवायला केळीचें पान उभें न घेतां आडवें घेतात यामुळें मात्र चूक होण्याचा संभव असतो. पण मला तें माहीत असल्यामुळें मी योग्य ठिकाणीं बसलों. बायका वाढावयाला आणीत त्यापैकीं जरूर तें मी घेईं, नको असल्यास पुरेची खूण करीं. बायका खाणावळींतीलच असल्यामुळें तारतम्य किंवा धोरण जाणणाऱ्या होत्या. यामुळें जेवतांना मला मागण्याचा प्रसंग फारसा आलाच नाहीं. मी गेलों ती अवेळ होती ह्मणून जेवणारी दुसरी मंडळी दिसली नाहीं. माझें बोलणें व खुणा पाहून त्या हंसत !

मी जेवून पैसे देऊन नमस्कार करून निघून गेलों. बाजारांत किंवा पुरुषांजवळ बोलण्याचा कांहीं उपाय चालतो कारण त्यांना हिंदुस्थानी थोडें कळतें; पण निवळ बायकांशीं संबंध असला म्हणजे त्यांना कांहीं समजत नाहीं. त्यांना देशभाषेशिवाय कोणतीच भाषा येत नसते, म्हणजे तो गोंधळच ! या प्रांतांत बऱ्याच खाणावळी केवळ बायकांनीं चालविलेल्या आहेत. खाणावळींत वरण, भात, भाजी, चटणी व आमटी इतके पदार्थ असतात. भाकरी, पोळी मात्र या देशांत कोठेंच मिळत नाहीं व सांगितलें तरी मिळावयाची नाहीं. तूप अगदीं थोडें वाढतात. जेवायला बसल्यावर भात तीनदां वाढतात. पहिला भात साराशीं, दुसरा आमटीशीं व तिसरा ताकाशीं जेवतात. कोरडी भाजी पुन्हा फारशी वाढीत नाहींत. कोठें कोठें लोणचें व पापडही मिळतो. येथील लोणचीं व पापड हे फार प्रख्यात आहेत. एकंदर बेत कोकणस्थांच्या उपयोगीं पडेल असा असतो पण देशस्थांना याचा कांहीं उपयोग नाहीं. कोणतेही पदार्थ फार तिखट, आंबट, खारट वगैरे नसतात, मध्यम असतात. मुलूख उष्ण आहे यामुळें लोक उघडे बोडके असतात. स्टेशनावर व गाडींतसुद्धां लोक उघडे बोडकेच असतात. शेंडीचा बुचडा बांधलेले, काळेकुट्ट व भस्माचे पट्टे ओढलेले असेच जिकडे तिकडे दिसतात. भस्माचा इकडे प्रचार जास्त, गंध कमी लावतात. येथील स्टेशनावर केळीं बहुतेक मिळतात व तीं गोडीला चांगलीं असून स्वस्तही मिळतात. इकडे स्टेशनवर चहा मिळत नाहीं पण कॉफी मिळते. ताकही विकावयास येतें व तें चहासारखें लोक मोठ्या हौसेनें घेऊन पितात! चिदंबरं झाल्यानंतर विलुपुरम् जंक्शनवरून मी

## चेंगलपट उर्फ पक्षीतीर्थ.

या जंक्शनवर आलों. येथूनच पक्षीतीर्थाला किंवा पंचीतीर्थाला जाण्याचा रस्ता आहे. गाडीचे वेळीं येथें गावांत जाण्याकरतां व पक्षी-

तीर्थाला जाण्याकरतां गाड्या उभ्या असतात. पक्षीतीर्थ येथून ९ मैल सडकेनें आहे. हें जैनांचें यात्रेचें ठिकाण आहे असें कोणी ह्मणतात पण पक्षीतीर्थावर मीं शिवस्थान पाहिलें आहे, तेव्हां तें ब्राह्मण धर्माचेंच स्थान असावें असें दिसतें. गाडी पहाटेस आली व उजाडायला आह्मी पक्षीतीर्थावर जाऊं असा बेत होता, पण स्टेशन-वरच फार अडथळा झाला. येथील तिकीट कलेक्टरनें माझा बोजा हमालाजवळ दिलेला आहे असें पाहून त्यानें अडविलें व हा बोजा वजन केला पाहिजे असें ह्मणाला. बोजांत प्रवासाचे कपडे, अंथरूण पांघरूण व कांहीं खाण्याचे पदार्थ आहेत, दुसरें कांहीं नाहीं असें सांगितलें व दाखविलेंही. शेवटीं विनाकारण खोटी होऊं नये ह्मणून कांहीं देऊंही लागलों पण तो कांहीं ऐकेना. तेव्हां वजन कर ह्मणून सांगितलें कारण कोठून तरी लवकर सुटका व्हावी व आपणास बैलगाडी मिळावी हा हेतू होता, पण तसें कांहीं घडलें नाहीं. सर्व लोक गेले पण वेक्लार्क कांहीं येईना व त्याशिवाय वजन होईना. तिकिट कलेक्टर ह्मणाले, वजन करणें आमचें काम नाहीं वेक्लार्क येईल तो वजन करील. वेक्लार्क शौच मुखमार्जन करून ७ वाजतां आला व त्यानें सर्व बोजा वजन केला; बोडिंगसुद्धां काढू दिलें नाहीं व कायद्याप्रमाणें १५ शेर सूटही दिली नाहीं. स्टेशनमास्तरकडे तक्रार न्यावी तर सकाळची वेळ असल्यामुळें व गाडी येऊन गेल्यामुळें तेही निघून गेले. शेवटीं मागितलेले पैसे देऊन पावती घेऊन निघून गेलों, तों सर्व गाड्या गेल्या. मग कशी तरी गाडी करून पक्षी-तीर्थाला जाण्यास निघालों. गाडी जाण्यायेण्याच्या भाड्याची केली होती. येथें दरोबस्त जमीन भातशेतीची आहे. उन्हाळ्यांत सुद्धां हीं शेतें धन धान्यांनीं भरलेलीं पाहून मनाला मोठें आश्चर्य वाटलें. ही शेती इकडील मोठमोठ्या कालव्यांवर होते, असें समजलें. सडका सर्वत्र आहेत. शेतें पाहात पाहात मी पक्षीतीर्थाला ९।। वाजतां पोंचलों.

गाड्यांच्या अड्यावर उतरतांच तेथें पक्षीतीर्थाचे उपाध्ये भेटले. ते ह्मणाले, पक्षी राजाला काय भोग चढवावयाचा तो बोला. त्यांनीं त्या क्षेत्राचा महिमा सांगितला कीं, इतर ठिकाणचे देव जेवतात ही कल्पना आहे पण या ठिकाणचा देव मूर्तिमंत असून तो माझ्या हातून जेवून जातो. जेवून संतुष्ट होऊन सर्व प्रकारचे मनोरथ पूर्ण करणारा असा आहे. असा चमत्कार दुनियेंत कोठेंही नाहीं, तो तुह्मी प्रत्यक्ष येऊन पहा, वगैरे सांगून त्यानें दक्षिणेचा आरंभ १२५ रुपयांपासून केला. मी सव्वा रुपया देऊन नमस्कार केला, तेव्हां त्यानें सांगितलें कीं, तुह्मी ह्या जवळच्या तीर्थांत स्नान करून खालच्या देवाचें दर्शन करून या ठिकाणीं १२॥ वाजतां या; ह्मणजे मी तुह्मांला गडावर घेऊन जाईन तेथें तुह्माला दैविक चमत्कार दृष्टीस पडेल. मी त्याप्रमाणें तीर्थांत (एक मोठा तलाव आहे त्यांत) स्नानसंध्या करून खालील देवळांचें व शंकराचें दर्शन घेतलें. देवालयाचीं प्रेक्षणीय सप्तगोपुरें पाहिलीं व साडेबाराला तेथें आलों, तों ही स्वारी तेथें नव्हती. तपास केला तों तो कोठें दिसेना. मला वाटलें उशीर झाल्यामुळें कदाचित् ही स्वारी वर गेली असेल. कोणी ह्मणाले वर गेले तुह्मांला यावयाचें असेल तर मजबरोबर चला. मग मी दुसऱ्या यात्रेकरूबरोबर गडावर जाऊं लागलों. मंडळी जातच होती. चढाव उंच असूच पायऱ्या केलेल्या आहेत.

वर गेल्यावर तेथें एक शंकराचें देऊळ आहे. त्याचा दोन प्रहराचा चौघडा व माध्यान्हीची पूजा चालली होती. मला वाटलें, पक्षी राजाच्या स्वागतार्थ हा चौघडा चालला असेल पण तसें नाहीं. तो त्या शिवस्थानाचाच होता. शिवस्थान एवढें डोंगरावर होतें तरी आंत सगळा काळोखच होता. अखेरीस मी दर्शन करून बाहेर आलों. बाहेर यात्रेकरूंना बसण्याकरतां चौफेर पडव्या आहेत. दीड वाजतां सर्व मंडळी आली, त्यांत तो पुजारीही आला. आतां त्याचे बारा

वाजले! त्या ठिकाणीं धर्मशाळा असून एके ठिकाणीं स्वयंपाकाची जागाही केलेली होती. तेथें मंडळी जमली असेल त्याप्रमाणें एक शेर सवाशेराचा पातळसा भात तेथील पुजारी करतात. तो तयार झाला ह्मणजे त्या ठिकाणापासून लांब व जरा उंच जागीं सर्व मंडळी जाते. ती जागा पक्षीराजाच्या दर्शनाकरतां केली आहे. सर्व मंडळीस बसण्याकरतां मांडव घातला आहे. हें ठिकाण शंकराच्या देवळापासून फर्लांगावर जवळच्या एका डोंगराच्या शिखरावर आहे. तेथें उभें राहून पाहिलें असतां पूर्वेकडे बंगालचा उपसागर व सर्व समुद्र किनारा लांब स्पष्ट दिसतो. ठिकठिकाणीं नारळी पोफळीचीं बनें दिसतात. दुसऱ्या बाजूस सर्व शेतें पिकांनीं भरलेलीं दिसतात. कांहीं शेतांत राब आहे, कांहीं हिरवीं झालीं आहेत, कांहीं पिकलीं आहेत व कांहींची कापणी चालली आहे असा सर्व प्रकारचा देखावा एकसमयावच्छेदेंकरून दिसला व मनाला फार करमणूक होऊन वेळ केव्हां निघून गेला हें समजलें सुद्धां नाहीं. हा तेथील तीर्थमहिमा आहे. येथें मांडवाखालीं सर्व स्त्री पुरुष दर्शनार्थ बसले होते. त्यांत एक मुसलमान आपल्या दोन बायकांमुलांसुद्धां येऊन दूर बसला होता. मी त्यास विचारलें तुह्मी कशाला आलां? हा हिंदूंचा देव तुह्मांला काय उपयोग? तो ह्मणाला, पक्षी प्रत्यक्ष येऊन हातांतून खाऊन जातो हें खरें काय? खरें असल्यास ते पक्षी कसे आहेत हा चमत्कार प्रत्यक्ष पाहाण्यास आलों. सर्व मंडळी जमल्यावर पुजाऱ्यानें पूजा, भात शिजविलेलें भांडें व पाण्याची एक कळशी असें सामान तेथें जरा उंच एक खडक आहे तेथें आणून ठेवलें. नंतर एक वृद्ध पुजारी पुढें येऊन पक्षी राजाच्या आव्हाहनाचा मंत्र ह्मणून त्यानें त्या खडकावर त्यास साष्टांग नमस्कार घातला व सर्व मंडळी पक्षीराजाची वाट पाहात बसली. एका वाटींत थोडें पाणी ओतलेलें असतें. पानावर भात काढून ठेविलेला असतो व पक्षीराजाला बसण्याकरतां पाटही मांडलेला असतो. पुजारी सर्व

मंडळीस सांगतात कीं, रामनामाचें स्मरण करा व भावना शुद्ध ठेवा, म्हणजे पक्षिराज लवकर येतील.

या शिखराशिवाय भोंवतालच्या शिखरावर गिधाडासारखे दुसरे पक्षी येऊन जात असत. मला वाटलें हेच ते पक्षी असतील, परंतु ते नाहींत. आणि कावळे, बगळे वगैरे दुसरे कोणचेच पक्षी पक्षिराजाच्या खडकावर इतके उंच येत नाहींत असें दिसलें. कांहीं वेळानें एक तांबूस व शुभ्र पांढरा घारीएवढा पक्षी वरून घिरट्या घालीत घालीत तेथें उतरला. त्याची चोंच तांबुस होती. तो तेथें उतरल्यावर पुजाऱ्यानें त्यास हाक मारली व हातांत भाताचा घांस घेऊन त्यानें तो पुढें केला. तेव्हां त्या पक्षानें एकदां त्याच्याकडे पाहिलें तेव्हां तो नेहमींचा आहे असें त्यास समजलें व नंतर त्यानें मांडवाखालील सर्व मंडळीस लक्षपूर्वक पाहिलें; तेव्हां सर्वांनीं मनोभावानें त्याचें दर्शन घेऊन हात जोडून नमस्कार केला. नंतर पुन्हा पुजाऱ्याकडे पाहून तो त्याचेजवळ येऊन पाटावर बसला व त्यानें त्याच्या हातांतून पुढें केलेला घांस खाल्ला. असे दोन तीन घांस खाल्ले व मग वाटींत पाणी पुढें करून दिलें तें ही तो प्याला. आणखी एक दोन घांस घेऊन पाणी पिऊन तो पक्षी उडून गेला. नंतर दुसरे पक्ष्याची प्रार्थना केली व त्याप्रमाणें १०।१५ मिनिटांनीं तोही आला. तोही तसाच होता पण तो पहिला नसून नवा खास आहे असें स्पष्ट दिसत होतें. त्यानेंही वरप्रमाणेंच येऊन घांस घेतला व पाणी पिऊन तोही निघून गेला, हें सर्वांनीं प्रत्यक्ष पाहिलें. मंडळीपासून पक्षी पांच हातांवर होते. हें पाहून त्या मुसलमानासुद्धां सर्वांस आश्चर्य वाटलें.

हे दोनच पक्षी येतात. दुसरे कोणी बोलावले तरी येत नाहींत व त्यांस कांहीं मिळतही नाहीं. नाहीं म्हणायला आसपास दुसरे पक्षी तेथें येतात पण ते या ठिकाणीं येत नाहींत. एकाद्या मृत मनुष्याची आशा राहिल्यास जसे कावळे पिंडाजवळ येतात पण त्यास

शिवत नाहींत. पिंडाजवळ कावळा येतो पण कोणी तरी हाकलल्या-सारखा जातो व मृताच्या मनांतील इष्ट गोष्ट बोलतांच किंवा कबूल करतांच तो शिवतो हा चमत्कार ज्यांनीं पाहिला असेल त्याच्या ही गोष्ट लक्षांत येईल. यावरून देह नष्ट झाला तरी जीवाची इच्छा शिल्लक राहाते व ती त्याच्या अदृश्य आत्म्याकडून पिंडाचे कावळे हाकलण्याचे रूपानें दिसते असें स्पष्ट दिसतें. अर्थात् त्यावेळीं त्यांची इच्छा पुरी करण्याचें वचन दिलें नाहीं तर त्याच्या त्या अतृप्त इच्छे-करतां त्याला पुन्हा जन्मास यावें लागतें असें दिसतें. तोच प्रकार येथें आहे ह्मणजे सर्व पक्षांना ही गोष्ट दिसते पण ते खाण्याकारितां येत नाहींत.

पक्षी गेल्यावर हे पूर्वींचे तपस्वी ऋषी असून पक्षीरूपानें येथें येऊन दर्शन देतात व त्यांच्याजवळ कोणतेंही मागणें मागितल्यास ते इच्छित मनोरथ पूर्ण करतात, वगैरे कथा पुजारीबुवा व्याख्यान रूपानें सांगतात. नंतर उरलेला भात प्रसाद ह्मणून त्यांत साखर घालून सर्वांना वांटतात. ब्राह्मण वगैरे मंडळीस भाताचा प्रसाद चालत नाहीं, ह्मणून त्यांस साखरेचा प्रसाद देतात. ही साखर ज्याचे पोटांत जाईल त्यास मुलगा होत नसल्यास मुलगा होतो व मुलगा झाल्यावर एक चांदीचें भांडें पक्षीराजाच्या दर्शनास पुन्हा येऊन त्यास पाणी पिण्यास द्या वगैरे उपदेश पुजारीबोवा सांगत असतातच! मी हा प्रसाद घरीं मांवदें केलें त्यावेळीं पक्वानाचे साखरेंत घालून तो प्रसाद सर्वांना वांटला! प्रसाद वांटल्यावर मंडळी गडाखालीं येऊन जिकडे तिकडे निघून जाते. हे पक्षी इतक्या लवकर नेहमीं येतातच असें नाहीं; कधीं कधीं दोन दोन, तीन तीन तासही लागतात पण येतात मात्र खरे. अगदीं क्वचित् अश्रद्ध किंवा दुर्दैवी मंडळी असल्यास येत नाहींत, असेंही कधीं कधीं घडतें!

येथें श्रद्धा बसण्यासारखे एकदोन प्रश्न उत्पन्न होतात. हें तीर्थ

आज बरेच वर्षें ह्मणजे ४।५ शें वर्षे तरी प्रसिद्ध आहे असें ह्मणतात. निदान १०० वर्षे तरी असावें. येथील लोक हें अनादि असेंच चाललें आहे असें ह्मणतात. हें खरें असल्यास इतके दिवस हे पक्षी कसे येतात ? त्यांना तारुण्य, ह्मातारपण ( जरा मरण ) नाहीं कीं काय ? किंवा त्यांचे ऐवजीं दुसरे येतात कीं काय ? असल्यास कोठून ? दुसरें, अन्न दृष्टीस पडल्यावर पक्ष्यांच्या स्वभावाप्रमाणें सर्व पक्षी यावयास पाहिजेत; मग दुसरे पक्षी कां येत नाहींत ? त्यांना हा प्रकार दिसत नाहीं कीं काय ? पशूंस किंवा पक्ष्यांस ज्या ठिकाणीं अन्न रोज मिळतें अशी त्यांची खात्री असते, तेथें त्यावेळीं ते नेहमीं हजर राहातात; उलट त्यांची मंडळी जास्त जमत जाते असा जेवणाचे वेळीं कावळे, मांजरें येतात त्यावरून अनुभव आहे तसें येथें कां होत नाहीं ? नुसत्या वहिवाटीप्रमाणें असें होतें इतक्यानें सर्व गोष्टींचें समाधान होत नाहीं व या सर्व गोष्टींचा चमत्कार वाटतो. अर्थात जिथें चमत्कार असेल, तींच ईश्वरी करणी व तेथेंच ईश्वर आहे असें मानून लोक त्याचे भजनीं लागतात व त्यांचे भावाप्रमाणें त्यांस फळही मिळतें, हेंही आपण पाहातों. बाकी यात्रेकरूनीं ही यात्रा अवश्य पाहावी व आपले मनाचें समाधान करून घ्यावें. जे पक्षी दृष्टीस पडतात त्यांचें स्वरूप इतर पक्ष्यांहून निराळें दिसतें खरें. प्रथम अशा जातीचे घारीसारखे मोठे पक्षी शुभ्र पांढरे किंवा तांबूस पांढरे सहसा नसतात; काळे, कबरे असतात. यामुळें त्यांचे दर्शनानें समाधान होतें, अर्थात श्रद्धाही बसते. यासंबंधानें जास्त माहिती मिळविण्यास भाषेची अडचण व तेथील लोक विशेष भाविक असल्यामुळें त्यांच्या बोलण्यावर केवळ विश्वास ठेवतां येत नाहीं. सबब जास्त माहिती मिळवितां आली नाहीं. कोणा यात्रेकरूस मिळाल्यास त्यानें इकडे कळवावी.

खालीं आल्यावर खाणावळींत जेवावयास गेलों. हा खाणावळवाला मोठा लबाड होता. त्याचेजवळ जेवण तयार नसतां त्यानें उगीच

घाई केली. दुसरे भाताचे वेळेस त्यानें मला कच्चा भात वाढला. भाताची वाफ जिरली नव्हती, अर्थात तो मला टाकून द्यावा लागला, तरी त्याला खाणावळीचे पैसे ठरल्याप्रमाणें दिले. मात्र तूं ही लबाडी केलीस असें सांगितलें.

कर्नाटकाचा व तैलंगणाचा मुलूख कालव्यांमुळें संपन्न झाला आहे. जिकडे तिकडे केव्हांही हिरवी गार भातजमीन दिसते. लोक तीन तीन सुद्धां पिकें काढतात असें ह्मणतात. पण बागबागाईती कोठें मोठ्या प्रमाणावर दृष्टीस पडल्या नाहींत. येथून पुढें परत चेंगलपट स्टेशनवर आलों तेव्हां स्टेशनमास्तर भेटले. ते तेलंगी ब्राह्मण होते. पण मुंबई प्रांतांत बरेच दिवस राहिल्यामुळें त्यांस मराठी चांगलें येत होतें. माझा पोशाख पाहून ते प्रथमच मजजवळ इंग्रजी ऐवजीं मराठीच बोलूं लागले. त्यांची मराठी उच्च दर्जाची होती. ही भाषा तुह्मांला चांगली कशी येते ह्मणून विचारतां त्यांनीं मी जी. आय्. पींत कांहीं दिवस होतों असें सांगितलें. त्यांना सकाळीं घडलेला सर्व वृत्तांत सांगितला. तेव्हां ते म्हणाले, झाला हा प्रकार कायदेशीर झाला. तुह्मी पैसे देऊन पावती सुद्धां घेतलीत आतां कांहीं करतां येणार नाहीं. तिकिट कले-क्टरनें तारतम्य पाहावयास पाहिजे होतें तें पाहिलें नाहीं ह्मणून एक दोन शेर वजनाकरतां २० शेरांचा चार्ज भरावा लागला ! जी. आय्. पी. मध्यें उतारूंचें लहान बेडिंग माफ आहे पण या रेलवेंत तें फक्त फर्स्ट व सेकंड क्लासांनाच माफ आहे, थर्ड क्लासाला नाहीं. त्यांनीं तें रेलवे गाईडमध्यें काढूनही दाखविलें. ते गृहस्थ फार सज्जन होते. गाडीची वेळ झाल्यामुळें त्यांचेजवळ जास्त बोलतां आलें नाहीं. गाडींत बसून मी

## कांचीवरम्

येथें आलों. येथें शिवकांची व विष्णूकांची असे शहराचे दोन मोटे भाग आहेत. मोक्षदायिनी सप्तपुऱ्यांपैकीं ही एकच तेवढी दक्षिणेंत

आहे. अयोध्या, मथुरा, माया ( हरिद्वार ), काशी, अवंतिका व द्वारावती ( द्वारका ) ह्या उत्तर हिंदुस्थानांत आहेत व त्यांचीं वर्णनें पहिल्या भागांत आलीं आहेतच. ह्या सहांपैकीं अयोध्या, मथुरा व द्वारका ह्या तीन विष्णूच्या आणि काशी, उज्जनी आणि माया ( हरिद्वार ) ह्या तीन शिवाच्या. बाकी ही एकच दक्षिणेंत राहिली, ती हरिहरांना वांटलेली आहे. ह्मणजे निम्मेभाग शिवकांचीचा व निम्मेभाग विष्णूकांचीचा असे ह्या अवाढव्य शहराचे स्वाभाविक दोन भाग झाले आहेत. तसेंच चार धामांपैकीं केदारेश्वर व रामेश्वर हीं शिवधामें आणि द्वारका व जगन्नाथ हीं विष्णुधामें होत. शंकर हें कडक दैवत असल्यामुळें त्याचीं स्थानेंही कडकच आहेत. ह्मणजे केदारेश्वर हिमालयांत अति कडक थंडींत व रामेश्वर अतिशय उष्ण प्रदेशांत आहे. तसें विष्णूचें नाहीं. विष्णू हें सौम्य दैवत असल्यामुळें त्याचीं ठिकाणें द्वारका व जगन्नाथ हीं समशीतोष्ण हवेंत आहेत. ह्या मुख्य यात्रा आहेत. या झाल्या ह्मणजे यात्रेकरूच्या मनांत हरिहरासंबंधें अद्वैत उर्फ अभेदभाव उत्पन्न होऊन भांडण संपतें व मनुष्य सायुज्यतेला मिळतो. ह्मणून यांची योग्यता सर्व यात्रांमध्यें श्रेष्ठ धरिली आहे. या लांबलचक व चतुरस्र प्रवासामुळें मनुष्य धूर्त, विचारी व कार्यक्षम होतो हाही व्यावहारीक फायदा आहेच.

कांची स्टेशनपासून शिवकांची दोन मैल आहे व विष्णुकांची चार मैल आहे. स्टेशनपासून गांव लागलेलाच असून स्टेशनाजवळ धर्मशाळा बरी आहे पण गांवांत पंड्याकडे जावें हें बरें. शहर विस्तृत आहे. या शिवस्थानाला पृथ्वीतत्व ह्मणतात. या प्रांतांमध्यें हें देवस्थान फार प्रसिद्ध आहे. येथेंही स्टेशनवर मला मराठी जाणणारा पंडा भेटला. तो शिवकांचीचा राहाणारा असून स्मार्तच होता व त्याला मराठी चांगलें येत होतें. त्याचे मार्फत गाडी केली ह्मणून तीन आण्यांत मिळाली, नाहींतर तो आठ आणे घेऊन बसला होता.

पंड्यानें मला गाडींत बसवून दिलें व गाडीवानास मला आपल्या घरीं नेण्यास सांगून आपण दुसऱ्या यात्रेकरूचा शोध करूं लागला पण दुसरें कोणी त्यास मिळालें नाहीं. मी त्याचे घरीं ओटीवर बसलों होतों, इतक्यांत तो आलाच. ही वेळ संध्याकाळची होती. प्रदोष-काळचे शिवदर्शनाची योग्यता मोठी ह्मणून प्रथम कपडे काढून हात पाय धुवून, संध्या करून त्याचे बरोबर शिवदर्शनास गेलों. याचेंच चित्र दर्शनी आहे. येथेंही शंकराचे आवारांत स्नानसंध्येकरतां पुष्करणी आहे. लोक काळेकुट्ट, उघडे बोडके व भस्माचे मोठमोठे पट्टे ओढलेले पुष्करणींत संध्याकरून दर्शन घेऊन परत जात होते. देऊळ फार मोठें असून त्याचे दगडी सभामंडपाचें दुरुस्तीचें काम चाललें होतें. जिकडे तिकडे उजेड किंवा भरपूर प्रकाश नव्हता. सर्वत्र अंधारामध्यें कोठें कोठें दिवे लुकलुकत होते. शिवदर्शनार्थ देवळांत अंधारांतून फार खोल जावें लागतें. देवळांतून दर्शन घेऊन आलों परंतु त्यावेळीं चांगलेंसें दर्शन झालें नाहीं. दुसरे दिवशीं सकाळीं मुद्दाम दर्शनाकरतां गेलों. पण वेळ सकाळची, उजेड कमी ह्मणून दर्शन चांगलें झालें नाहीं. देवळाचे आवारांत कुमारस्वामीचें देऊळ आहे, त्यालाच कार्तिकेय किंवा सुब्रह्मण्य स्वामी ह्मणतात. कुमार-स्वामीला स्त्री परिवार नाहीं अशी सर्वत्र प्रसिद्धि आहे. इतकेंच नव्हे तर त्याचें दर्शन बायकांनीं घेणें हें महत्पाप आहे. परंतु या ठिकाणीं याच्या दोहों बाजूला वल्ली व सेना अशा दोन स्त्रिया आहेत. त्यांपैकीं वल्ली ही लक्ष्मीची कन्या असून ती विष्णूनें विवाहोक्त विधीनें त्यास दिली. दुसरी देवसेना ही इंद्रकन्या असून ती इंद्रानें कुमारस्वामीस विवाहोक्त विधीनें दिली. यामुळें येथें स्त्रिया सुद्धां स्वामीच्या दर्शनास जातात. देवकार्य केल्यामुळें देवांनीं त्यास ह्या बायका दिल्या. ह्मणजे इष्टकार्य होईपर्यंत मनुष्यानें कडक ब्रह्मचर्यानें राहिलेंच पाहिजे. प्रत्यक्ष आईबाप प्रेमानें बुद्धिभेद करूं लागले तरी ऐकतां कामा नये.

इष्टकार्य झाल्यावर मग त्यानें संसारसुखाचा अनुभव घ्यावा. पेशवाई सामर्थ्यवान झाली तेव्हां बायकासुद्धां लढाईंत चैनीकरितां नेत पण त्याचा विपरीत परिणाम पानपतांत झालाच. या सुब्रह्मण्याचें ह्मणजे विवाहीत कार्तिकस्वामींचें मुख्य स्थान रेनिगुंठ्याच्या दक्षिणेस आरकोनम् लाईनीवर २३ मैलांवर तिरुतनी स्टेशन आहे व तेथून एक मैलावर गांव आहे आणि जवळच कुमारपर्वत आहे त्यावर आहे. तेथें ह्या सुब्रह्मण्याचें फार भव्य देवालय आहे. चढाव मोठा नसून पायऱ्या आहेत, तेथें यात्रेकरू सहकुटुंब सहपरिवार दर्शनास जातात. बालाजी प्रमाणेंच ह्या देवाचें महत्व आहे.

काल रात्रीं शिवदर्शन घेऊन आल्यावर पंड्याच्या ओटीवर निजलों. पंड्याचे घरीं बायका माणसें नव्हतीं, तीं माहेरीं गेलीं होतीं. त्याचें घर भाऊबंदकीनें विभागलें होतें ह्मणून त्याजकडे पडवीवजा भाग आला होता. सकाळीं उठल्यावर शौचविधीला कोठें जावयाचें ह्मणून विचारलें असतां दक्षिणेकडे गांवाबाहेर मैदानावर जाण्यास सांगितलें. मी तिकडे गेलों तों तेथील देखावा दृष्टीस पडला, त्यावरून हीच त्या विधीची जागा हें समजलें. पण येथें मला एक चमत्कार दृष्टीस पडला. या विधीकरतां मंडळी जात होती त्यांपैकीं कोणाजवळही भांडें नव्हतें ! नुसता हातांत सोटा व अंगावर धोतर घेऊन ही सभ्य मंडळी उघडी बोडकी चालली होती ! प्रथम मला ही मंडळी शौचास जात असतील असें वाटलें सुद्धां नाहीं. मग हे काय करतात तें पाहिलें. तेव्हां शौचविधि झाल्यावर जवळच एक तलाव आहे त्यांत उभें राहून ढोंपरभर पाण्यांत जाऊन धोतर वर करून त्यांची शरीरशुद्धि चालली होती ! नंतर दुसरा स्वच्छ तलाव आहे त्यांत ही मंडळी मुखमार्जन करतात असें दिसलें. पण त्यांत कोठें बायका दिसल्या नाहींत, ही एक समाधानाची गोष्ट आहे. बायकांची व्यवस्था काय आहे हें मी घरीं आल्यावर उपाध्येबोवांस विचारलें. तेव्हां ते ह्मणाले

त्यांच्याकरतां परड्यांतच सोय केलेली असते. हें एकप्रकारें बरें आहे. मी परत येतांना पाहिलें तों उघडे बोडके हातांत सोंटा घेतलेले पुष्कळ लोक या कार्याकरतां जात येत होते, पण कोणाच्याही हाता-मध्यें भांडें नव्हतें. हा देशाचार आहे पण तो वाईट आहे. निदान ब्राह्मणासारख्या श्रेष्ठ जातीनें ह्याची तरी सुधारणा करावी. पण हा आचार त्यांचा त्यांना आवडतो त्याला उपाय नाहीं. त्या संबंधानें जास्त विचारतां त्यांची सुधारणा करण्याची इच्छा दिसली नाहीं. हा आचार हंपी विरूपाक्ष, हासपेटपासून इकडे आहे असें ह्मणतात. पण मला तिकडे इतकें स्पष्टपणें त्याचें दिग्दर्शन झालें नाहीं, परंतु तें येथें झालें !

या शिवकांचींतील मुख्य तीर्थ 'सर्वतीर्थ' ह्मणून मोठा तलाव आहे. मागें स्वच्छ पाण्याचा तलाव म्हणून जो सांगितला तोच हा व याचेंच दर्शनी चित्र आहे. हा विस्तृत जलाशय असून चौफेर पायऱ्यांनीं बांधून काढलेला आहे व मध्यें जलमंदीर आहे. तसेंच चारी बाजूंलाही मंदिरें आहेत. या ठिकाणीं क्षौर, प्रायश्चित्त वगैरे कोणी करतात. मी गेलों तेव्हां हे विधी चालले होते. मला हा विधि करावयाचा नव्हता फक्त तीर्थस्थान करावयाचें होतें. उपाध्येबुवांनीं तीर्थाचे पुजेचें साहित्य वगैरे घेतलें व मी त्यांचेबरोबर गेलों. तेथें संकल्प करतांना इतर नेह-मींच्या पातकांच्या संकल्पाबरोबर ज्ञान, वैराग्य, ब्रह्मवर्चस्व प्राप्त्यर्थं असा मोक्षदायी संपत्तीचा विशेषेंकरून उल्लेख केलेला आढळला. रितीप्रमाणें कायिक, वाचिक वगैरे इहलोकच्या शरीर व मन शुद्धीचाही उल्लेख होताच. आजपर्यंत मी इतर ठिकाणीं पुष्कळ हिंडलों पण त्यांच्या संकल्पामध्यें परमार्थाचें नांवही नव्हतें. फक्त शरीरशुद्धि व इहलोकचें वैभव मिळण्याकरतांच ते संकल्प होते. स्नानसंध्या झाल्यानंतर मी घरीं गेलों व पुन्हा शिवदर्शनास आलों. या वेळीं माध्यान्ह होता यामुळें सर्व देखावा स्पष्ट दिसला. शाळूंका एक वीत दीड वीत उंच आहे व इतर शिवस्थानाप्रमाणें हें लिंग खोल गाभाऱ्यांत नसून मूर्ती-

प्रमाणें उंचावर आहे. या मुख्य शिवस्थानाचें नांव एकांबरेश्वर असून मंदिराचा परीघ अतिशय मोठा आहे. त्याचे परिघांत पुष्कळ देवता, तीर्थें व पुष्करण्या आहेत. रामेश्वरापेक्षां सुद्धां याचा परीघ फार मोठा आढळला. आवारांतील सर्व देवतांचीं दर्शनें घेण्यास सुमारें दोन तीन मैल फिरावें लागतें इतकें आवार मोठें आहे. मुख्य देवाचें महाद्वार फार मोठें असून त्यावरील गोपूरही थाटाचें आहे व तें आठ दहा मजली उंच आहे. जुना सभामंडप मोडकळीस आला म्हणून रामेश्वरची नाटकोट ही तेलाची कंपनीच तो बांधीत आहे. हें नवें काम सुद्धां अगदीं जुन्या पद्धतीप्रमाणें अगदीं सुंदर व दगडी होत आहे ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे. पण हल्लीं अशीं कामें करण्याकरतां किती पैसा लागत असेल याची कल्पना त्यांनाच विचारली पाहिजे. त्या तेलाच्या कंपनीनें हें काम मनावर घेतलें असून यांत वर्गणीचा संबंध नाहीं. देवालयाचा प्रदक्षिणेचा मार्गही सुंदर बांधला आहे. आंत तीर्थोदकाच्या पुष्करण्याही फार मोठमोठ्या आहेत व त्या पुष्करण्यांसभोंवतीं मोठमोठ्या धर्मशाळा व देवळें आहेत. यामुळें पावसाळीं सुद्धां सकाळ संध्याकाळ येथें स्नानसंध्येचा देखावा मोठा रमणीय दिसतो. इकडे प्रदेश उष्ण असल्यामुळें सकाळ संध्याकाळ थंडपाण्याचें स्नान सोसतें. स्नानानंतर प्रत्येकजण भस्म लावून संध्या करितो. नंतर देवदर्शन अनायासें होत असल्यामुळें येथें बहुतेक मंडळी आचारशुद्ध व कर्मठ असते, यामुळें येथें ख्रिश्चन मिशनऱ्यांचें फारसें बंड दिसलें नाहीं. पण कडक आचारामुळें ब्राह्मण ब्राह्मणेतरांचें फार खडाष्टक आहे. पण कर्मठ वैदिक आचाराचें हें दर्शनीय स्थान आहे.

या शिवलिंगावर रुद्राभिषेक करावयास काय लागेल ह्मणून मी उपाध्येबुवांस विचारलें. तेव्हां ते ह्मणाले, या लिंगास पाण्याचा स्पर्श करूं देत नाहींत कारण हें वाळूचें आहे. याला फक्त सुगंधी तेलाची

उटी चढते. रामेश्वरही वाळूचेंच लिंग असतां तेथें जर गंगा चढते तर येथें कां चढूं नये ? शंकर तर जलधाराप्रीय आहेत, मग हें असें कसें ? तर तसें करीत नाहींत एवढेंच ते ह्मणाले. तेव्हां मी तो नाद सोडून दिला. शिवलिंग मात्र तलकट झालेलें दिसलें खरें. तेथील पुजारी स्मार्त ब्राह्मण आहेत. ते इतरांस देवाला स्पर्श करूं देत नाहींत. बौद्धधर्मीयांचें हें प्राचीनकाळीं दक्षिणेंतील मुख्य ठाणें होतें असें ह्मणतात. त्यांचे अवशेष अद्याप कोठें कोठें दृष्टीस पडतात. या शिवकांचींच्या शंकराचे देवळाचे आवारांत देवळाचे पाठीमागें एक अती प्राचीन आंब्याचें झाड आहे, त्याला चार फांद्या आहेत हेच ते चार वेद होत. या चार फांद्यांस निरनिराळीं फुलें, फळें वगैरे येतात. ह्मणजे एकाचें फळ गोड तर दुसऱ्याचें आंबट व तिसऱ्याचें तुरट; त्याचप्रमाणें रंग, रूप, रुची व आकारही फळांचे निरनिराळे असतात. हीं फळें तोडतां कामा नये. खालीं पडेल तेंच घ्यावयाचें. कोणी पाडल्यास त्याचे डोळे जातात असें ह्मणतात. तेव्हां याची नसती प्रचिती कोण घेईल? मी गेलों त्यावेळीं झाडावर आंबे नव्हते. झाडाला फांद्या अगदीं खालपासून लागल्या आहेत, पण झाडावर कोणी चढतांही उपयोगाचें नाहीं, कारण याच झाडाखालीं शंकर प्रगट झाले असें सांगतात. झाडाच्या फांद्या जमिनीपासूनच पसरल्या आहेत पण त्यांचें बुंध मात्र एकच आहे. बाकी हें झाड इतर झाडांसारखेंच दिसलें. पण त्याचा हा चमत्कार पाहाण्यास मला संधी मिळाली नाहीं. कारण फळें पडलेलीं कशीं सांपडतील? तेव्हां उपाध्ये बुवांवरच विश्वास ठेवणें भाग पडलें. पण त्याला तरी खोटें सांगण्याचें प्रयोजन काय?

मी गेलों त्या दिवशीं देवीची पालखी शहरांत फिरत होती. येथील पालख्या रथासारख्या सिंहासन केलेल्या उघड्या असतात. शोभेला मात्र वर छत्री असते यामुळें देखावा फार चांगला दिसतो. ही पालखी वारंवार नित्रत असल्यामुळें सावकाश न चालवितां जलदच

चालवितात. पालखी उचलणारे ब्राह्मणच असतात. पालखीचा थाट उत्तम असून त्यापुढें वारांगनांचें नृत्य चाललेलें असतें. दीपोत्साहही थाटाचा होता.

दुपारीं देवदर्शन करून आल्यावर घरीं जेवणासाठीं आलों. देवब्राह्मण करावयाचा असल्यामुळें जेवण उपाध्येबुवांकडेच होतें. त्यांच्या घरांत बायको नसल्यामुळें जेवणाची व्यवस्था त्यांनीं आपल्या शेजारच्या भाऊजयीकडे केली होती. जेवणाची व्यवस्था अगदीं साधी असून स्वच्छतेचा भागही कमी होता. त्यांत सांगण्यासारखी गोष्ट ही कीं, पुऱ्या तेलांत तळल्या होत्या व त्याही साधारण कच्च्या व काळ्या होत्या! एकही पुरी फुगलेली नव्हती!! उपाध्येबुवांस याचें कारण विचारतां इकडे तुपाच्या पुऱ्या खाण्याचा संप्रदाय नाहीं. हें निव्वळ तेल नसून तूप व तेल यांचे निम्मेनिम मिश्रण आहे असें त्यांनीं सांगितलें. पण त्यांत तूप नव्हतेंच व असल्यास अगदीं थोडें असेल अशी माझी खात्री होती. तूप तेलाचें मिश्रण करूं नयें इतकेंच नव्हे तर बाजारांतून तूप व तेल एकदम एका मनुष्यानें तरी आणूं नये, असा महाराष्ट्रांतील परिपाठ आहे व त्याच्या हें अगदीं विरुद्ध झालें आणि तें देवालाही आवडलें! म्हणजे देवकार्यांतही इकडे असा प्रकार चालतो. पण तें मिश्रण नसावें असें दिसतें. सुमारें २५ पुऱ्या केल्या होत्या त्यांपैकीं दहा बारा त्यांनीं मलाच वाढल्या. बाकीच्यामध्यें ब्राह्मण, सुवासिनी, कुमार, कुमारिका यांचें पर्याप्त भोजन झालें!! म्हणजे जवळ जवळ सगळेच पैसे खावयाचे दुसरें कांहीं त्यांत मला दिसलें नाहीं. माझ्या जवळून जेवणाच्या पात्रांचा भाव चांगला घेऊन तुह्मी असा गैरशिस्त प्रकार केला हें बरें झालें नाहीं, असें मीं शेवटीं त्यास ह्मटलें. मी तरी दुसरें काय करणार? त्यावर शुद्ध तुपाच्या पुऱ्या केल्या असत्या तर त्याला कोणी हात लावला नसता, आमच्याकडे असाच संप्रदाय आहे, असें उपाध्येबुवा पुन्हां ह्मणालेच! इकडे पोळीतुकड्याचा संप्रदाय

कमी खरा. तसेंच तुपापेक्षां तेलाकडे प्रवृत्ति जास्त खरीच. पण मग त्याप्रमाणें पैसे कमी घ्यावयाचे होते. ज्यास्त कां घ्यावे ? याचें उत्तर नाहीं ! म्हणून मीही स्वस्थ बसलों. जेवणानंतर या प्रांतांत फक्त पानसुपारी सुटी देतात. पानाला चुना लावून सुपारी खाल्ली म्हणजे झालें. काताची आवश्यकता नाहीं, कारण येथील सुपारी कातामध्येंच शिजविलेली असते !

जेवण झाल्यानंतर येथील तीर्थयात्रा संपल्यामुळें विष्णुकांचीला व कामाक्षी देवीला जाऊन, तसेंच स्टेशनवर पुढें जाण्याचें ठरविलें. एका गाडीवाल्याबरोबर मला याप्रमाणें जावयाचें आहे असें सांगून ठराव केला. तेथून विष्णूकांची तीन मैल आहे व कामाक्षीवरून गेलें तर स्टेशन ३॥ मैल आहे. दोन्ही मिळून साडेसहा मैलांचा प्रवास होता. शिवकांचीपासून विष्णूकांचीपर्यंत सर्वत्र गांव व दुकानें पसरलीं आहेत. सरकारी कचेऱ्या व कोर्टें ह्या दोहोंच्या मध्यें आहेत. मी विष्णूकांचीला पोंचलों त्यावेळीं देवाचे दरवाजे लावलेले होते. आणखी एक तासानें उघडतील असें म्हणाले. येथील ब्राह्मण रामानुजपंथी आहेत. रीतीप्रमाणें देऊळ व गोपूरें हीं प्रेक्षणीय आहेतच. सभामंडपही फार मोठा ९६ खांबांचा आहे. भोंवतालची शोभा पहात होतों, इतक्यांत दरवाजे उघडले. या आवारांत दोन तीन देवळें आहेत. हें विष्णुदैवत असल्यामुळें सर्व मूर्ती अलंकारयुक्त व प्रेक्षणीय आहेत. अलंकारही पाहण्यासारखे हिरेजडीत आहेत. मुख्य देवता वरदराज विष्णूची आहे. ती बऱ्याच मोठ्या टेंकडीवजा उंचवट्यावर आहे. टेंकडीला धरूनच देऊळ बांधलें आहे त्यामुळें देव माडीवर आहे असें वाटतें. प्रथम देवाचें दर्शन करूं देत ना. संध्याकाळच्या पूजेच्या वेळीं या म्हणजे दर्शन होईल असें तेथील पुजारी म्हणाले; पण इतक्यांत बरीच यात्रा आली व प्रत्येकापासून दोन दोन आणे घेतले तरी बरेच पैसे होतील असें पाहून पुजाऱ्यानें दरवाजे उघडले. माडीवर देवाचे ठिकाणीं अंधार होता.

एक दिवा मात्र लुकलुक करीत होता. पण मंडळी जमल्यावर कापूर वगैरे लावून पुजाऱ्यानें सर्वांस देवाचें दर्शन करविलें. मूर्ति शाळिग्राम शिलेची असून एक पुरूषभर उंच आहे. हातांत शंखचक्रगदादि आयुधांनीं युक्त व अलंकारांनी परीपूर्ण भरलेली अशी दर्शनीय व चित्तवृत्ति स्थिर होण्याजोगी आहे. बरेच वेळ दर्शन घेऊन चित्तवृत्ति स्थिर झाल्यावर ( मनांत रूप राहिल्यावर ) मी परत फिरलों. गाडी-वाल्यानें गाडी कामाक्षीला नेण्याऐवजीं स्टेशनवरच आणली. गाडीला वेळ होता ह्मणून त्याला कराराप्रमाणें कामाक्षीला पुन्हा गाडी न्यावी लागली. कामाक्षीचें देऊळही मोठेंच आहे. त्यावेळीं देवीची पंचामृती पूजा चालली होती, त्यामुळें सालंकार दर्शन झालें नाहीं. पण मूर्ति फारच मनोहर आहे असें म्हणतात. देवी कमलावर पद्मासन घालून बसली आहे. ही कृष्णपाषाणाची आहे. या देवालयाचे आवारांत वैष्णवसंप्रदायी शंकराचार्यांची मूर्ति आहे. तिचे हातांत दंड, कमंडलू वगैरे संन्याशाचीं चिन्हें असल्यामुळें पाहाणारास कौतुक वाटतें. मूर्ति पांढऱ्या संगमरवरी दगडाची आहे. शिवकांची व विष्णूकांची यांचे रथोत्सव फार दांडगे होतात असें म्हणतात. शंकराचा रथ विष्णूकां-चीला जात नाहीं. पण विष्णूकांचीचा मात्र शिवकांचीला येतो. एवढ्या लांबीवर रथ मिरवीत आणावयाचा म्हणजे दिवाबत्तीच किती लागत असेल ? रथाची उंची सुमारें २५ फूट असावी असें दिसतें. असले भले टोलेजंग रथ तीन तीन मैल माणसांनीं ओढीत न्यावयाचे व परत आणावयाचे ह्मणजे माणसांची संघशक्ति चांगलीच असली पाहिजे. विष्णूकांचीहून संध्याकाळीं ७ वाजतां रथ निघतो, तो बाराला शिवकांचीला येतो व तेथून शंकराची भेट झाल्यावर निघतो तो उजाडायला विष्णूकांचीला परत जातो ! ह्मणजे दोन्ही कांचींत रात्रभर धुडकूस चाललेला असतो. मिठाईचीं दुकानें, चहा कॉफी व रोषणाई जिकडे तिकडे भरलेली असते. हे रथ खालपासून २५ फूट उंचीच्या

देवतेच्या स्थानापर्यंत असून ते वाजंत्री, चौघडेवाले वगैरे यांच्या उतरल्या रांगांनीं भरलेले असतात. यामुळें सर्व लोकांना देवतेचें दर्शन होऊन, आपलेकडील चैत्रगौरीप्रमाणें मिरवणुकीचा अपूर्व थाट दिसतो.


स्टेशनवर आल्यावर गाडीवाल्यास ठराव केलेलें आठ आणे भाडें देऊं लागलों, तेव्हां तो घेईना. कारण तो ह्मणाला, मला पुन्हा स्टेशनवरून कामाक्षीला जावें लागलें. मी ह्मटलें तूं चुकलास त्याला मी काय करूं? तुला मी विष्णूकांचीपासून बजावीत आलों होतों कीं, मला कामाक्षीला जावयाचें आहे, विसरूं नको. पण तूं ह्मणालास रस्ता हाच आहे. त्याच्याशीं माझी बरीच बोलाचाली झाली तेव्हां तेथें पोलीस आले. त्यांना मी आमचा ठराव सांगितला पण तो पोलीसही अखेर गाडीवाल्याकडचाच झाला. तो ह्मणाला इतक्या लांबीचे तो मागतो आहे तितके पैसे होतात ते त्यास द्या. मी सांगितलें चूक त्याची आहे. तेव्हां तो म्हणाला तुह्मी दोघे स्टेशनच्या बाहेर जा व भांडत बसा. येथें स्टेशनांत कांहीं गडबड उपयोगी नाहीं. गाडीवाला पाकीट देईना व पोलीसही त्याला कांहीं सांगेना. शेवटीं अतिप्रसंग आला हें पाहून मला त्याला त्याचे ह्मणण्याप्रमाणें पैसे द्यावे लागले! गाडीवाले, हमाल वगैरे लोकांस पोलीस व स्टेशनवरचे लोक एकमेकांना सामिल असल्यामुळें यात्रेकरूंचे असे हाल होतात. नंतर तेथून अर्कोनला आलों. ह्या गाडीला मद्रास—मुंबईमेल मिळते, म्हणून कांचीवरंवरूनच रेनीगुंठ्याचें मेलचें तिकीट काढलें होतें, त्याप्रमाणें रेनीगुंठ्यावर आलों. मेलचें तिकीट काढलें नसतें तर पुन्हा तिकीट काढून अर्कोनमवर मेल मिळाली नसती. कारण कीं, ती तेथें उभीच होती. म्हणून पुढच्या गाडीच्या धोरणानें तिकीट काढावें लागतें व तें तसें मिळतेंही. रेनीगुंठ्यावरून

# तिरुपती ईस्ट ऊर्फ बालाजी

या स्टेशनावर आलों. हें व्यंकटेश किंवा गिरीबालाजीचें स्टेशन आहे. रात्र होती तरी तेथें पंड्याचा गुमास्ता आलाच होता. रेनीगुंट्या-वरून लहान गाडीचें हें पहिलेंच स्टेशन आहे. रात्रीं दहाची वेळ होती. आह्मीं त्या गुमास्त्याबरोबर गांवांत गेलों. गांव सुमारें एक मैल लांब आहे. उपाध्येबुवा रामानुजपंथी वैष्णव ब्राह्मण होते. त्यांनीं आमची सर्व चौकशी केली व त्यांस आह्मीं आपला मनोदय सांगितला. तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं, येथून बालाजी सहा मैल पर्वतावर आहे. येथून यात्रा रात्रीं ४ वाजतां निघते. डोली पाहिजे असल्यास डोलीही मिळते. तिरुपतीहून शेषाचल पर्वत सुमारें एक मैलावर आहे व त्यापुढें सहा मैल डोंगरी चढण असून रस्ता पायऱ्यांचा बांधीव आहे, त्यामुळें जाण्यास कांहीं हरकत नाहीं. त्याप्रमाणें रात्रीं ४ वाजतां यात्रा निघाली व मीही त्यांचेबरोबर निघालों. ही यात्रा निघण्याची वेळ असल्यामुळें गांवांत व पर्वताच्या वाटेवर सुद्धां दिवे लावलेले असतात. कारण नेहमीं ह्याचवेळीं यात्रा जाते.

बालाजी हें स्वतंत्र संस्थान आहे. त्याचें उत्पन्न फार मोठें दांडगें आहे. हा श्रीमंतांचा देव आहे. येथें नुसता देवापुढें कापूर लावला तर चार आणे कर आहे! दर्शनाला मात्र कर नाहीं हें भाग्य आहे!! इतर कर चार आण्यांपासून एक हजार रुपयांपर्यंत आहेत!!! दक्षिणेकडे या देवावर वैष्णवांची जितकी श्रद्धा आहे तितकी दुसरी कोणावरही नाहीं. यामुळें रामेश्वरप्रमाणेंच येथें नेहमीं यात्रा लोटत असते. प्रथम दोन मैल पहाडावर जाण्यास बराच चढाव आहे व मग चढ उतार आहे. सर्व डोंगरावर दगडी पायऱ्यांचा प्रशस्त राजमार्ग केला आहे. गांवांतून थेट बालाजीपर्यंत मार्गाच्या दोन्ही बाजूला ठिकठिकाणीं बालाजीचीं देवळें, साधू, वैराग्यांचें देवतार्चन, आंधळ्यापांगळ्यांचें भजन व भिकाऱ्यांची भिकेबद्दलची प्रार्थना चालूच असते. यामुळें रस्ता

बालाजी उर्फ – व्यंकटेश.



तिरुपती (गिरीवर.)

स्थानिक वांचनालय
ठाणे

कंटाळवाणा न वाटतां पुढें काय आहे हें पाहाण्याचा हुरूप येऊन मनाबरोबर शरीरही सहज लीलेनें जातें, हा त्या देवाचा महिमा आहे. जातां जातां वाटेंत उजाडलें. उजाडल्यावर पाहातों तों मार्गांत बहुतेक पायऱ्यांच्या दगडांवर नांवें, तारखा, भिन्न भिन्न भाषांत थेट देवळापर्यंत घातल्या आहेत. मला प्रथम वाटलें कीं, हा दगड किंवा पायरी ज्यानें बांधली त्यानें आपलें नांव कोरलें असेल. पण पुढें सर्वांवरच नांवें दिसलीं व त्यांच्यावरचे सन, शक अगदीं अलीकडचे दिसले. अर्थात पहिली कल्पना चुकली. नंतर पुढें जात असतां दगडावर नांव कोरणारेच भेटले. जसा मजकूर असेल त्याप्रमाणें पैसे घेऊन पाहिजे त्या दगडावर नांवें, मूर्ति वगैरे कसलेंही खोदकाम करतात व पैसे मिळवितात. लोकांच्या दगडावर आपलें नांव कोरण्यांत काय पुरुषार्थ आहे ? शिवाय आपलेंच नांव सर्व यात्रेकरूंनीं पायांनीं तुडवावें त्यांत भूषण तरी कसलें? सबब ते ह्मणत असतांही मी नांव कोरण्याचें नाकारलें.

या गिरीवर जोडा घालून जातां कामा नये, असें मागाहून समजलें. न जाण्याचें कारण केवळ ईश्वर विषयक निष्ठा हेंच होय. ह्मणजे सर्व पर्वत हा शेष आहे ही भावना आणि ह्मणूनच ह्याला शेषाद्री असें ह्मणतात. मी पहाड चढूं लागतांच एक वृद्ध बाई पुढें येऊन ह्मणाली,तुह्मी यात्रेला आलां आहां आणि हें काय करतां? बूट काढून ठेवा, मी तुमचा रक्षण करीन व याल तेव्हां घेऊन जा. हे पहा मीं कित्येकांचे जोडे व बूट ठेविले आहेत; आणि तिच्याजवळ ते होते खरेच. बूट १२ रुपयांचा व जोडे हलके तेव्हां ठेवावा किंवा बरोबर घेऊन जावें ह्मणून विचार केला. पण एकंदर धार्मिक व व्यवहारिक विचार करून तो अखेर तिजपाशीं ठेवला व पुढें जाऊं लागलों. पायऱ्या चांगल्या बांधीव व गुळगुळीत आहेत. बुटांची कांहीं जरूरच नाहीं, इतकेंच नव्हे तर बूट घातल्यावर पाय घसरण्याचा संभवही आहे असें दिसलें. तेव्हां बूट किंवा जोडा घालून जाऊं नये हा नियम ऐहिक दृष्ट्याही

ठीक आहे असें वाटलें. कारण जोडा किंवा बूट घालून जर कोणी यात्रेकरू पाय घसरून पडला व त्याचा पाय मुरगळला तर देवाचे यात्रेला गेलों असतां माझें असें कायमचें नुकसान झालें व हा मला देव पावला, असें लाक्षणिक ह्मणणें भाग पडूं नये ह्मणून हा पारमार्थिक नियम केला आहे. असो. अर्ध्या वाटेवर गेल्यावर सूर्योदय झाला, तेव्हां भोंवतालची वनश्रीची शोभा चांगली दिसूं लागली. हे उन्हाळ्याचे दिवस होते तरी मधून मधून येथें पाऊस पडे. ह्मणजे येथें ईशान्य मोसमचा पाऊस असल्यामुळें त्याला कार्तिकानंतर आरंभ होतो व तो फाल्गूनापर्यंत असतो. पुढें आपल्याकडे जसा वळीवाचा पाऊस दिवाळीचे वेळीं पडतो, तसा येथेंही हल्लीं पडतो. ह्मणून वनश्री आश्विन महिन्याप्रमाणें सुंदर दिसत होती. यापुढील मार्ग चढउताराचा होता. अशा रीतीनें जातां जातां मी वर देवळाचे ठिकाणीं आठ वाजतां जाऊन पोंचलों. वर चांगला गांव वसला असून त्यास वरची तिरुपती ह्मणतात.

वर इस्पितळें, बंगले, बाजार, पोष्ट ऑफिस, तारऑफिस, मोठमोठ्या टोलेजंग धर्मशाळा, बालाजी संस्थानच्या कोठ्या व त्यावरील महंत, पुजारी वगैरे राहाण्याच्या जागा आहेत. या महंतांचा लवाजमाही एकाद्या संस्थानिकाप्रमाणें आहे. पाण्याचे नळ प्रत्येक धर्मशाळेमध्यें आहेत. धर्मशाळा उंच, प्रशस्त अशा दगडी बांधल्या आहेत. सर्वच व्यवस्था उत्तम आहे व ती सर्व संस्थानच्या खर्चांतून चालली आहे. पण अलीकडे हे महंत आल्यापासून जरा अव्यवस्था आहे असें लोक ह्मणतात. रस्त्यांची दुरुस्ती होत नाहीं. पोष्ट ऑफिस व तारऑफिस हीं उठून गेलीं. फक्त खाबांवर तार मात्र राहिली आहे. व्यापारी बाजारही फारसा राहिला नाहीं, पण यात्रेचा बाजार मात्र राहिला आहे. बालाजीचें देवालय व त्याचा आवार फार मोठा आहे व त्यासभोंवतीं सर्वत्र धर्मशाळा आहेत. या क्षेत्रांत एकंदर २१ तीर्थें आहेत,

त्यांत सर्वांत मोठें तीर्थ स्वामी पुष्करणी नांवाचें देवळाजवळच आहे. त्या ठिकाणीं प्रथम स्नानसंध्या करून मग दर्शनास जावें असें ठरवून स्नानास गेलों. येथें माकडांचा उपद्रव मोठा आहे. कपडे काढून स्नानाला गेल्यास कपडे पळवितात! पळविण्याचा हेतू खिशांत कांहीं खाण्याची वस्तू असल्यास काढून घेऊन कपडा कोठें तरी फेंकून देणें हा होय. नाहींतर कपडा उचलून नेला म्हणजे ज्याचा नेला असेल तो कांहीं तरी खाण्यास पुढें करतो व या रीतीनें त्यांस खाण्यास मिळतें, हें त्या माकडांना माहित आहे म्हणून ते कपडे चोरतात. खाण्याच्या वस्तूंच्या दुकानदारांना गिऱ्हाइकांपेक्षां या माकडांना फार जपावें लागतें. केळ्यांचें लोंगर टांगलें असलें आणि थोडें दुर्लक्ष झालें म्हणजे एक माकड येऊन खुशाल भराभर ५।६ केळीं मोडून घेऊन पळून जातें व उंच ठिकाणीं बसून चैनीनें खात बसतें!!

ही पुष्करणी ऊर्फ तीर्थ फार प्रशस्त म्हणजे १००×५० फूट आहे. आंत उतरण्यास पायऱ्या असून मध्यें एक लहानसें जलमंदीर आहे, पण पाणी स्वच्छ नाहीं. याच ठिकाणीं क्षौर करून स्नान करतात. येथें एक चमत्कारिक चाल दृष्टीस पडली. येथें विधवा स्त्रिया क्षौर केल्यावर स्नानानंतर डोकें उघडेंच टाकतात. डोक्यावर पदर घेतच नाहींत. डोक्याखालून घेतात व तशाच देवळांत जातात. काय हा देशाचार आहे कांहीं समजत नाहीं! मी स्नानसंध्या करून वर दर्शनास आलों, तों दर्शनाची गर्दी होतीच. थोडा वेळ थांबलों तर गर्दी कमी होईल, म्हणून इकडे तिकडे पाहूं लागलों. मुख्य देऊळ पितळेच्या पत्र्यानें मढविलें असून देवाच्या घंटा मोठाल्या आहेत. येथेंही रामेश्वरासारखीं पैसे घेऊन पावती देण्याचीं मोठमोठीं ऑफिसें आहेत. असें पाहातां पाहातां आतां गर्दी कमी होईल असें वाटलें पण गर्दी कमी होईना. अखेर दर्शनाचा नंबर लावला व गर्दींत शिरलों. रीतीप्रमाणें धक्केबुक्के खाऊन

दर्शन झालें. देव ह्मणतो, माझें कदाचित् तुह्माला विस्मरण होईल, परंतु या धक्याबुक्यांचें होणार नाहीं. अर्थात यांचें स्मरण झालें ह्मणजे माझी आठवण होईलच! देवाची मूर्ति कृष्णपाषाणाची, गंडकी शिलेची, चतुर्भुज असून शंख, चक्र, गदा, पद्म हीं धारण केलेली, एक पुरुषभर उंचीची अशी दर्शनीय आहे. भक्त देवाला आपल्या आवडीप्रमाणें रंगवितात ती गोष्ट निराळी. प्रत्यक्ष देवाचा आकारही मनुष्यांनीं (भक्तांनीं) च ठरविला आहे. ह्मणजे देव भक्ताप्रमाणें होतो तसा ह्या देवानें इकडील वैष्णव संप्रदायाप्रमाणें मुद्रा लावून पोशाख केला आहे. गंध कपाळभर उभें लावतात.

येथें सुद्धां देवापुढें कांहींएक ठेवावयाचें नाहीं. देव फक्त पत्र-पुष्पांचा मालक! दरवाजाजवळ रामेश्वराप्रमाणेंच एक मोठी घागर, तिच्या तोंडास तांब्याचा पत्रा व दादरा बांधून व सील करून आंत पैसा टाकण्याइतकें भोंक ठेवून खांबास बांधून ठेविलेली आहे. तेथें-सुद्धां सील आहे. जिकडे तिकडे सीलबंद कारभार आहे. ज्याला पैसे टाकावयाचे असतील त्यानें त्यांत टाकावे. दरवाजावर शिपाई असता-तच व ते यात्रेकरूंस घागरींत पैसा टाकण्याकरितां सांगतात. याउपर यात्रेकरूनें भाषा न समजल्यामुळें किंवा गैरसमजुतीनें पुढें ठेविल्यास तें ते उचलून घागरींत टाकतात. याशिवाय बाहेर एक मोठें छातीइतकें उंच व तीन हात व्यासाचें तांब्याचें पंचपात्र ठेविलें आहे. त्याचे सभोंवतीं खालपासून वरपर्यंत चौरस कापडाचा रुमाल बांधून त्या रुमालाचीं चारी टोकें चार खांबांस बांधून त्यावर कामिटीचीं सिलें केलीं आहेत. पंचपात्राच्या गळ्याजवळ त्या कापडास एक सैल दोरी बांधली आहे; त्यामुळें त्यांत भोंक राहातें व त्यांतून आंत पैसे पडतात. तीवरही सील केलें असून त्यावर सशस्त्र पोलीसचा पाहारा आहे. त्यांत लोक ओंजळीच्या ओंजळी व ताटें भरभरून पैसे टाकतात; कोणी रुपयांची ओंजळ भरतो, कोणी नाण्यांची व कोणी खुर्द्यांचीं ताटें

भरून पैसे ओततात. कोणी दागिन्यांचे नवस करून तेही त्यांत टाकतात. एकानें १६ तोळे वजनाचें सोन्याचें कडें त्यांत टाकलेलें पाहिलें आहे! असा प्रकार चाललेला असतो. हे सर्व पैसे नवसाचे असतात. कोणी मुलाच्या हातून टाकतात, कोणी बायकोच्या हातून टाकतात व कोणी स्वत: टाकतात. जसा नवस असेल तसे टाकतात. दुसऱ्या दिवशीं हें पंचपात्र सर्व पंच व मुख्य महंत यांच्या समक्ष उघडतात. नंतर तसेंच दुसरें पंचपात्र त्या ठिकाणीं ठेवतात व पहिलें काढून घेतात. यात्रा येईल त्याप्रमाणें हें पंचपात्र अर्धे, पाऊण किंवा कधीं सर्वंधही भरतें असें ह्मणतात! नवरात्रांत ह्या देवाचा मोठा उत्साह होतो. नवरात्रांत आणि बालाजीचा असा मोठा उत्साह साऱ्या हिंदुस्थानांत कोठेंही होत नाहीं. नवरात्र ह्मणजे देवीच्या उत्सवाचे दिवस पण जेथे जेथें बालाजींचीं किंवा व्यंकटेशाचीं देवस्थानें आहेत, तेथें तेथें हा उत्सव नऊ दिवस मोठ्या थाटानें करून दहाव्या दिवशीं सीमोल्लंघनाची मोठी मिरवणूक काढितात. गिरीच्या खालोखाल हा उत्सव ठाणें जिल्ह्यांत माहीम येथें होत असे. तेथें दररोज नऊ वहानांवर नऊ दिवस देवाची मिरवणूक काढून दसऱ्याची मिरवणूक गरुडावर होत असे. तेव्हां आसपासच्या गांवचीं फार गर्दी होत असे. हल्लीं माहीम मोडत चालल्यामुळें उत्सवाचा थाट थोडा कमी झाला आहे. त्यापेक्षां येथें यात्रा अलोट येते अर्थात् सोहाळाही फार मोठा होतो व त्यावेळीं हें पंचपात्र नेहमीं भरतें असें ह्मणतात. हें पंचपात्र उचलून कोठीमध्यें नेतात व तेथें तें ओतून त्यांतील पत्रें, पुष्पें व फळें एका बाजूला टाकतात. खुर्दा, नाणें, रुपये व दागिने यांच्या निरनिराळ्या राशी करून त्यांची मोजदाद करतात. रुपये खरे खोटे याबद्दल दगडावर वाजवून पाहातात व नंतर एकत्र करून कीर्दींत सर्वांसमक्ष जमा करून खजिन्यांत टाकतात. यावेळीं मुख्य महंतासुद्धां सर्व मंडळी हजर असावी लागते. सभामंडपांत एका बाजूला या

कोठीला अगदीं वरपर्यंत गज मारून जी स्वतंत्र कोठी केली आहे, तींत ही व्यवस्था होते. त्यांत दुसरे कोणासही घेत नाहींत. पण व्यवहार मात्र सर्वांसमक्ष पोलिसच्या देखरेखीखालीं करावा लागतो.

या हल्लींच्या जगांत पैशाइतकें प्रिय कांहीं नाहीं. जिवापेक्षांही पैशाला जास्ती जपतात व त्याकरितां आपला जीव वाटेल त्या धोक्यांत घालतात, पण एक पैही अनाठायीं खर्च करीत नाहीं. एकादा पैसा हरवला किंवा चोरीस गेला तर आकांत होतो व मन स्वस्थ राहात नाहीं. तसेंच प्रत्यक्ष पैसे कर्जाऊ घेतले असून खतें, पत्रें, साक्षी वगैरे झाल्या तरी प्रसंगीं भर कोर्टांत प्रतिज्ञेवर पैसे घेतले नाहींत असें चक्क सांगतात. सारांश पैशाकरतां लोक किती खोटींनाटीं कामें करतात याचा नेम नाहीं. आणि येथें तर खत नाहीं, पत्र नाहीं, साक्ष नाहीं, कोणी सांगितलें नाहीं, कोणाचा तगादा नाहीं. केवळ नवसाचा मनानें संकल्प केलेला, त्याचा स्पष्ट उच्चारही कोठें केलेला नाहीं. असा प्रकार असतां इच्छित फल मिळाल्याबरोबर लोक आपण होऊन बायकामुलांसुद्धां या कठीण गडावर येतात. येववत नसल्यास डोली करून येतात पण तक्रार करीत नाहींत; आणि ओंजळीच्या ओंजळी, ताटेंच्या ताटें पैसे भर भरून ओततात. पावती मागत नाहींत, कांहीं नाहीं व त्यांतच आनंद व कृतकृत्य मानतात. यांतलें इंगित काय आहे ? सुधारलेल्या जगाच्या दृष्टीनें पाहिलें असतां त्याचें उत्तर मिळत नाहीं. कारण हे लोक ज्याला देव म्हणून म्हणतात व नवस करतात व ज्यानें आह्मांला हें सर्व दिलें असें म्हणतात, तो इतर दगडांसारखाच दगड आहे. इमारतीच्या व इतर दगडांस जसा विशिष्ट आकार दिला आहे तसा ह्यासही चक्क टाकी लावून आकार दिला आहे. यांत देव कुठून आला ? बरें देव आला असें मानलें तर खरा देव कोणाच्याही सुखदु:खाला कारणीभूत होत नाहीं. मग या देवाला नवस कसले करतात ? व तो कसला पावतो ? बरें, त्यांना सिद्धि

होत असेल तर त्यांच्या प्रयत्नानें व सृष्टि नियमांनीं होत असेल. त्यांत देवाचा काय संबंध? व देवाला पैसे काय करावयाचे? पैसे मागणारा देव व त्याला देणारा हे दोघेही लबाडच असले पाहिजेत. देव पोरें देतो, संकटें निवारण करतो, असें ह्मणणें ह्मणजे ह्या आरोपानें देवाचें खरें देवत्व जाऊन त्यास व्यापारी देव बनविल्यासारखें होतें. अर्थात हें सर्व झूट असून लबाड लोकांचा हा सारा बाजार आहे, यापेक्षां यांत कांहीं नाहीं असें विधर्मीयांच्या संगतीस लागलेले आमचे अधुनिक नवीन जगांतील सुधारक लोक अश्रद्धेनें म्हणतील. आणि त्यादृष्टीनें विचार केला असतां तें खरेंही आहे व या त्यांच्या भावने-प्रमाणेंच त्यांना फळही तसेंच मिळतें !

हा एका बाजूचा विचार झाला. आतां दुसरी श्रद्धेची बाजू पहा. या सुधारलेल्या जगांत मनुष्याला आपल्या कर्तृत्वाचा मोठा अभिमान आहे. त्यांत पाश्चात्यांच्या शिक्षणानें व बुद्धिभेदानें तर तो दृढ होत चालला आहे. पण या संसार प्रपंचांत किंवा मनुष्याचे आयुष्यांत असे कांहीं चमत्कारिक प्रसंग येतात कीं, त्यांचें निवारण कोणच्याही मनुष्याच्या प्रयत्नानें होत नाहीं व त्याचें कांहीं चालत नाहीं. बुद्धि कुंठीत होते व चित्ताचें कांहीं केल्या समाधान होत नाहीं. एकाद्या मनुष्याला पोहण्याचा फार अभिमान असतो, पण त्याची पाण्यांत बुडण्याची वेळ आली म्हणजे पोहण्याच्या त्याच्या सर्व कला निष्फळ ठरून तो कशाचा तरी–नुसत्या गवताच्या काडीचाही–आधार शोधीत असतो. तसें मनुष्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले, म्हणजे मनाच्या समाधानाकरतां तरी त्याला जगंनियंत्यास हाक मारणें भाग पडतें व देव कांहीं करीत नाहीं, वगैरे मतें त्याला सोडून द्यावीं लागतात. अशावेळीं जो कोणी भेटेल त्याला गुरु करून किंवा त्यावेळीं ज्या व्यक्तीचें किंवा देवाचें स्मरण होऊन त्याची मुक्तता होईल त्या गुरूच्या किंवा त्यानें केलेल्या उपदेशाकडे किंवा मनांत त्याविषीं जें ध्यान किंवा

दैवत आलें असेल त्याच्या उपासनेच्या मार्गाला तो लागतो. याच तत्वावर हिंदुधर्मामध्यें नाना दैवतें व नानामतें उत्पन्न झालीं असलीं, तरी त्या त्या उपासनेच्या द्वारें तो मूळ भगवंताला शरण जातो हेंच खरें. मग अशीं जितकीं जास्त उपासकें असतील तितकीं तीं जास्त श्रेयस्कर आहेत किंवा नाहींत? इतर धर्मांमध्यें उपास्य हें एकच आहे; व त्यांतच सर्व देव भरलेला आहे, अशी समजूत होणें हें मानवी रुचिवैचित्र्याला अगदीं शोभण्यासारखें नाहीं. ईश्वर सर्वत्र भरलेला आहे, तो अनाद्यंत आहे ही गोष्ट अती प्राचीन काळापासून आजपर्यंत सर्व लोक मानीत आलेले आहेत. मग जास्त उपास्यें मानणें सोईचें कीं एकच उपास्य मानणें सोईचें? माडीवर जाण्यास एकच जिना बरा किंवा अनेक असणें सोईचें याचा विचार कोणीही करावा. वस्तुतः

**न देवो विद्यते काष्टे न पाषाणे न मृण्मये ।**
**भावोहि विद्यते देवो तस्माद्भावोहि कारणं ॥**

ही कल्पना हिंदूंचीच आहे. पण भाव बसण्यास वरील सारखा प्रसंग व कांहीं तरी व कसलें तरी उपास्य किंवा प्रतीक समोर पाहिजेच.

आपल्याला सरकारांत धारा भरावयाचा असला ह्मणजे आपण तो गांवच्या पाटील तलाठ्याकडे भरतों. पाटील अगर तलाठी सरकार नाहीं हें आपणास ठाऊक आहे. मग मूळ सरकार कोठें आहे याचा तपास केला तर त्याचा तपास लागतच नाहीं. खुद्द विलायतेंतील बादशाहा हेंच सरकार आहे असें जर कोणी समजत असतील तर ती चूक आहे, हें शाळेंतला एक लहानसा मुलगासुद्धां सांगेल. पाटील कुळकर्ण्यापासून बादशाहापर्यंत सर्व लोक सरकारचे अंश आहेत ही गोष्ट स्पष्ट आहे. मग सरकारचाच जर पत्ता नाहीं तर त्याचा धारा कोठें भरावयाचा? असें ह्मणून कोणी धारा भारणार नाहीं, तर मात्र चालणार नाहीं. ह्मणजे सरकार नाहीं असें मात्र नाहीं, कारण त्याची हुकमत पदोपदीं दिसते. ह्मणून केव्हांही सरकारनें ठरविल्याप्रमाणें

पाटील तलाठ्याकडे धारा भरलच पाहिजे. तो धारा पाटील तलाठ्याकडे भरला असतां तो सरकारला पोंचतो व त्या सरकारकडून त्याचें संरक्षणही होतें. म्हणजे गांवढेगांवचें सरकार पाटील तलाठीच. तसें उपासकाचें उपास्य हेंच दैवत खरें. अर्थात तोच संबंध देव अथवा उपास्य आणि उपासक ह्यांच्यामध्यें स्पष्ट आहे. देव हा कांहीं दिसत नाहीं. त्याला नांव, गुण, रूप वगैरे नाहीं. मग कृतज्ञ होऊन त्याची पूजा अर्चा कोठें करावयाची ? व मनाचें समाधान कसें व्हावयाचें ? याकरतां परमेश्वर सर्वोपास्यांत भरलेला आहे, म्हणून त्या उपास्यांची पूजा केली असतां ती देवाला पावते. हें खरें कशावरून ? तर असा अनुभव येतो म्हणून ! एकाद्या व्रताची किंवा नवसाची सांगता केली नाहीं, तर अनिष्ट स्थिति प्राप्त होऊन मनाचें समाधान नाहींसें होतें व तीच सांगता करतांच म्हणजे ब्राह्मण भोजन घालून तीर्थप्रसाद घेतांच ती त्या देवाला पोंचून मनाला समाधान होतें व अनिष्ट गोष्टी होत नाहींतशा होतात. या गोष्टींचा प्रत्यय सर्वांना आलेला असतो. सारांश, जोंपर्यंत मनुष्याला देहबुद्धि आहे, देहाला सुखदु:खांची परवा आहे, तोंपर्यंत ईश्वराच्या कृपाछत्राची त्याला जरुरी आहेच. म्हणून प्रजेला जसें राजाचें देणें दिलें पाहिजे, तसें मनुष्याला सुद्धां ईश्वराची कृपा संपादिलीच पाहिजे. मग ती कोणत्याही स्वरूपाची असो. तो जेव्हां देहातीत होईल, त्याचा देहाभिमान जाईल, तेव्हां त्यालाही ईश्वराची जरूर नाहीं. कारण तोच प्रत्यक्ष ईश्वर झाला ! तसेंच प्रजा जेव्हां राजाच्या बाहेर जाईल तेव्हां तिलाही राजाचें देणें द्यावयास नको. म्हणजे ती प्रजाही नव्हे, स्वतंत्र त्यांचें राज्यच झालें. सर्व वसाहती अशाच आहेत. रामानें मारुतीला शेवटीं आत्मोपदेश केला तेव्हां रामानें काय समजलें असें त्यास विचारिलें, तेव्हां मारुती म्हणाले

देहबुद्ध्यातु दासोहम् जीवबुद्ध्यात्वदंशकः ।
तत्वबुद्ध्यात्वमेवाहमिति मे निश्चिता मतिः ॥

अर्थ वर आला आहेच.

आतां उपासनेला कांहीं तरी अधिष्ठान पाहिजे ह्मणून तो कांहीं तरी अधिष्ठान ठरवितो आणि त्या अधिष्ठानांत उपास्य दैवत पूर्ण प्रतिष्ठित आहे अशी त्याची दृढ समजूत होते. कोणी ही प्राणप्रतिष्ठा समंत्रक करितो. मग तें लांकूड आहे अथवा दगड आहे किंवा धातू आहे ही भावना त्याची पार नाहींशी होते व त्यांत त्याचें समाधान होऊं लागतें; नंतर त्याची पूजाअर्चा करण्यानें ती परमेश्वरास पोंचून त्याची इष्टसिद्धि होते व त्याच्याच योगानें त्याचीं सर्व दुःखें नाहींतशीं होतात. तेव्हां तोच प्रत्यक्ष परमेश्वर आहे, त्याच्यापुढें आपलीं सुख-दुःखें सांगितलीं व करुणा भाकिली असतां तो संकटसमयीं आपणांस साह्य करतो, अशी त्याची दृढ भावना होते. तो त्याप्रमाणें करतो, लोकांना सांगतो व आपल्या कुलाला उपदेश करून तसेंच करवतो. याप्रमाणें कुलस्वामी, कुलगुरू व कुलदैवत यांची स्थापना झाली. ही खरी विभूति पूजा आहे.राष्ट्रीय विभूति पूजा ही याच तत्वावर असते.

मग त्या अधिष्ठानाच्या किंवा उपास्याच्या विभूती आणखी दुसऱ्या कोठें कोठें आहेत याचा तो तपास करतो. त्यांच्या यात्रा करतो, कथा कीर्तनें करतो व व्रतें, कैवल्यें, करतो. अशानें त्याच्या प्रयत्नास यश येऊं लागतें व त्याचें मन भावनाप्रधान होऊन तें त्याठिकाणीं दृढही होतें. अशी दृढ भावना झालेल्या मनुष्याची पूजाअर्चा व व्रतें, कैवल्यें अगदीं चित्ताकर्षक असतात व हा मनुष्य इतका धर्मभोळा कसा बनला याचें दुसऱ्यांना आश्चर्य वाटतें. त्यास विचारतां तो ह्मणतो माझी मूळचीच चूक झाली, पूर्वजांचे नियमच खरे आहेत. 'जीव जर अनन्यभावानें मला शरण येतील तर त्यांच्या यातनांचें निरसन करणें हें माझें काम आहे' असें परमेश्वर सांगतो व त्याप्रमाणें तो करतोंही मात्र भाव पाहिजे.

अनन्याश्चिंतयंतोमां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां, योगक्षेमं वहाम्यहम् ॥

हें भगवंतांचें वाक्य प्रसिद्धच आहे. याचमुळें व्रतें कैवल्यें हीं उत्पन्न झालीं. याचकरितां प्रत्येक घरांत देवघर किंवा देवाचें कसलें तरी अधिष्ठान पाहिजेच अशी त्याची समजूत होते. अशा एकाच ध्येयाचें अनेक यात्रेकरू एके ठिकाणीं जमल्यामुळें ते एकमेकांस आपल्या नवसाचा अनुभव कळवितात व त्या योगानें त्या प्रतीकांचें स्तोम माजून त्यांवर पुराणोक्त असे भविकांचे ग्रंथ होतात. अशी दृढभावना झाल्यावर मिशनऱ्यासारख्यांनीं 'अरे याला कसले भजतां? तो दगड आहे दगड!' असा किती जरी पंढरपुराप्रमाणें उपदेश केला तरी त्यांस तो कसा रुचणार? असें होतां होतां तो जर अधिकारी झाला तर परमेश्वर सर्व जगांत पूर्णत्वानें भरलेला आहे, अर्थात् तो आपल्यांत सुद्धां आहे, अशी त्याची भावना होते. मात्र अनन्यभावानें त्याला हाक मारणाराचीच खोटी आहे. अशी त्याची स्थिति झाली ह्मणजे तो मुक्त होतो. कै. महादेव मोरेश्वर कुंठे, महादेव चिमणाजी आपटे वगैरे मी मी ह्मणविणाऱ्या कट्या सुधारकांची हीच स्थिति झाली आहे हें प्रसिद्ध आहे. याप्रमाणें परमेश्वर आपलें अस्तित्व प्रगट करतो. मग भक्तांचा ह्याच ठिकाणीं आपल्या उपास्य दैवताचा वास आहे अशी समजूत झाल्यास त्या ठिकाणीं देव कां येणार नाहीं? त्यांत तो येऊन भक्तांची इष्टसिद्धि करणारच. मग त्यांत देव कसा नाहीं? मानील त्याला आहेच व तोच इष्टसिद्धि करतो हेंच खरें.

दुसरें असें कीं, सर्वांच्या मनांत त्या दगडाविषयीं—मूर्ती विषयीं—प्रेम उत्पन्न होतें व त्यापेक्षां इतर सुंदर दगड किंवा मूर्ती असून त्या-विषयीं होत नाहीं. यावरून त्या दगडांत देवाचें विशिष्ट अधिष्ठान झालें आहे असें ह्मणण्यास काय हरकत आहे? आतां तें अधिष्ठान मंत्रानें येवो किंवा भावनेनें येवो, पण त्यांत देवाची जागृति झाली

आहे खरी. जगांत पुष्कळ मनुष्यें असून विशिष्ट मनुष्याच्याच भजनीं लोक इतके कां लागतात? त्याची प्रत्यक्ष पूजा करितां आली नाहीं तर त्याचे फोटो काढून त्याच्या गळ्यांत माळांचा वर्षाव कां होतो? त्यास देवाचा अंश मानून त्याची पूजाअर्चा कां करितात? अर्थात त्याची केलेली पूजा त्याच्या शरीराची दिसली तरी ती शरीराची नसून त्याच्या बुद्धिरूपी किंवा कर्तृत्व रूपी देवतेचीच होते. व त्यायोगें ती देवता प्रसन्न होऊन ती व्यक्ति लोककल्याण जास्त जास्तच करीत सुटते, हा अनुभव प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें दगडाच्या मूर्तीची केलेली पूजा तिची नसून ज्या आराध्य देवतेच्या नांवानें ती होते तिलाच जाऊन पोचते. तिच्या नांवानें सन्मानानें ब्राह्मण जेवूं घातले असतां ब्राह्मण जरी कदाचित् त्या जेवणाबद्दल कृतघ्न झाले किंवा असंतुष्ट झाले असें मानिलें तरी ती देवता त्यानें संतुष्ट होते. कशावरून? तर ब्राह्मण जेवूं घालण्यापूर्वी जे अनिष्ट परिणाम होत असत ते होत नाहींसे होतात म्हणून. ह्या गोष्टी प्रसिद्धच आहेत आणि यालाच नवस फेडणें असें म्हणतात. अंगावरून ओवाळून टाकलेला नारळ किंवा बळी भूत कांहीं खावयाला येत नाहीं; तो दुसरा कोणी पशुपक्षी खातो. तरी तो भुताला पोंचून त्याचे अनिष्ट परिणाम टळतात. बायकोला किंवा मुलाला शृंगारण्यांत व त्यांचें कौतुक पुरविण्यांत आनंद कां होतो हें ज्याचें त्यानें पहावें. सारांश, शरिरस्थ आत्मा अदृश्य राहून इंद्रियांचे द्वारें जसा बाह्य सृष्टीचा उपभोग घेतो तसा विश्वात्मा कोणत्याही प्रतिकाचे रूपानें किंवा केवळ नामस्मरणानेंही पूजनीय होतो. म्हणजे अनन्यभावानें कोठें कशी जरी पूजा केली तरी ती त्याला पावते. त्यांत दुरभिमानानें कोणी कोणास हंसण्याचें किंवा द्वेष करण्याचें कारण नाहीं. ही पूजा किंवा भक्ति जसजशी तीव्रतेनें एखाद्या प्रतिकाच्या ठायीं होईल तसतशी ती देवता त्या ठिकाणीं विशिष्ट प्रकारें वास करून इष्टसिद्धि करील. सारांश, देवाचें

अस्तित्व भक्तीवर किंवा भावनेवर आहे, दुसरें कशावर नाहीं. धनवीज एखाद्या पदार्थांत जितकी जास्त प्रमाणांत उत्पन्न करावी त्याच्या विरुद्ध ऋणवीज तितकी त्या प्रमाणांत उत्पन्न होते. प्रतिध्वनि व आघात प्रत्याघात समान असतात हें सृष्टितत्व त्रिकालाबाधित आहे. ज्याचा भाव असेल त्याला तो देव आहे, इतरांना नाहीं. सर्व देवस्थानें भावामुळेंच उत्पन्न झालीं आहेत व हेंच मूर्तिपूजेचें रहस्य आहे.

हे दोन्हीं प्रकारचे विचार सांगितले, यांपैकीं ज्या भावानें जो मनुष्य पाहील त्याप्रमाणें त्यास फळ मिळेल आणि मिळतेंही. ' भावेन देवं ' ही ह्मण प्रसिद्धच आहे. दगड मानला तर दगडासारखें फळ मिळेल व देव मानला तर देवासारखें फळ मिळेल; म्हणजे इष्ट हेतू सिद्धीस जातील. ऐहिक व पारलौकिक दृष्टीनें देहधारी किंवा प्रापंचिक मनुष्यानें यांतील कोणता मार्ग आचरणीय आहे, हें ज्याचें त्यानें ठरवावें. पहिली विचारसरणी नास्तिक, केवळ बडबड करण्यासारखी दुःखपर्यवसायी अतएव त्याज्य व दुसरी सौभाग्य व आनंदपर्यवसायी म्हणून केव्हांही ग्राह्यच होईल; म्हणूनच मध्यम व गरीब लोक विद्वानांच्या कोटिक्रमास भीक न घालतां दुसऱ्या मार्गानें संतोष पावतात.

याप्रमाणें या देवाची स्थिति आहे. येथें घेतलेला नवस सहसा फुकट जात नाहीं, अशी त्यांची दृढ भावना आहे. अर्थांत त्याप्रमाणें त्यांस फळही मिळतें. यामुळें नवस फेडण्याकरतां येथें यात्रेकरूंच्या झुंडीच्या झुंडी येतात. माझ्यासारखा केवळ दर्शनार्थ आलेला मनुष्य अगदीं विरळा. हे नवस फेडण्यास येतात अर्थांत त्यांची कार्यसिद्धि झालेली असते ह्मणूनच बिनतक्रार येतात. नाहींतर कोण येणार? हे नवस कार्यसिद्धि जशी बिकट असेल त्याप्रमाणें बिकट असतात. पैशाचे किंवा वस्तूचे नवस करणें यांत कांहीं काठिण्य नाहीं. ते मागें सांगितल्याप्रमाणें होतातच. पण येथील शरीर कष्टाचे नियम पाहून जीव थक्क होतो. कांहीं कांहीं स्त्रीपुरुष गडबडां लोळत देवाला—देवळाला—अष्टोत्तरशें प्रदक्षिणा करीत

म्हणतात व इष्टसिद्धि झाल्यावर त्याप्रमाणें करतातही! प्रदक्षिणेचा घेर निदान एक फर्लांग तरी असावा. अशा १०८ प्रदक्षिणा दगडाच्या फरसबंदीवरून बायकांनीं लोळत करणें कठीण नाहीं असें कोण म्हणेल? असेच दुसरे भयंकर नवस असतात. ते काय वर्णावे? हें सर्व मी प्रत्यक्ष पाहिले आहेत. याशिवाय येथें लग्न मुंजी वाटेल तेव्हां होतात. चातुर्मास्यांत सुद्धां होतात. ज्याना चार महिने लग्न होण्याचा धीर नसतो असे घोडनवरे व घोडनवऱ्या यांचा विवाह किंवा प्रितिविवाह व मुंजी येथें कंत्राटानें होतात. मिळून बालाजीवर नित्य श्री नित्यमंगलं चालूच असतें. येथील ब्राह्मण रामानुजपंथी आहेत. ते सर्व प्रकारची तजवीज करून देतात. तसेंच कोणास कांहीं पूजा करणें असेल, मंगलारती करणें असेल, तर तेथें कोठींत ( ऑफिस ) कारकून बसलेले आहेत, त्यांच्याजवळ कोणत्या व्रतकैवल्यास किती पैसे पडतील अशा जाहिरातीच्या पाट्या पोष्टाप्रमाणें आंत बाहेर मारलेल्या आहेत, त्याप्रमाणें पैसे घेऊन ते पावती देतात. रामेश्वराप्रमाणें ही पावती देवाच्या उपाध्याजवळ साहित्यासुद्धां दिली ह्मणजे ती व्यवस्था होते. हा कर व्रतनियमाप्रमाणें चार आण्यांपासून एक हजार रुपयांपर्यंत असतो. सर्वांत ब्रह्मोत्सव करावयाचा असल्यास किंवा रथोत्सव करण्यास पैसा जास्त लागतो. नैवेद्याचेही असेच नियम आहेत. साधारण खिचडीपासून नैवेद्यास आरंभ होतो. सर्वांत मनोहर नांवाचा नैवेद्य देवास फार प्रिय आहे. त्याचे लाडू प्रसादाकरतां बाहेर विकतात. त्याच्या लहानशा लाडवाची किंमत चार आणे असते. नवस करणारांशिवाय देवास त्या संस्थानाकडून रोज महाभोग अर्पण होतातच. व त्यांचा प्रसाद दहिंभात, घावन, आंबोळी, भाकरी, पोळी, लाडू ( हे निरनिराळे वेळचे भोगाचे प्रकार असतात व त्यांत कापूर, चंदन वगैरे देवास अर्पण केलेले पदार्थ असतात, यामुळें त्या पदार्थांस सुवास येऊन ते जास्त दिवस टिक-

तात.) असे पदार्थ किंमतीच्या मानानें मिळतात. यांतील दहिंभात, भाकरी, पोळी हे पदार्थ मात्र ब्राह्मण विकतात. येथेंही खरकटें, उष्ट्याचा विधिनिषेध फारसा नाहीं. मी या ठिकाणीं जेवण्याचें न करतां नानाप्रकारचे प्रसाद घेऊनच पोटभर खाल्ले व कांहीं प्रसादा-करतां घरीं आणले. अशा प्रकारचे प्रसाद जास्त घेऊन ठेवल्यामुळें प्रवासामध्यें अडीअडचणीला फार उपयोगी पडतात. ज्याला अनुकू-लता नसेल तो बाजारांतील धान्य घेऊन निराळा सैंपाक करतो व त्यांत ह्या प्रासादिक वस्तू घालून नैवेद्य समर्पण करतो.

देवाची मूर्ति चतुर्भुज, शंख, चक्र, गदा, पद्म, अशीं आयुधें धारण केलेली, सुमारें सहा सात फूट उंचीची, गंडकी शिलेची आहे. दंडास सर्पाचीं बाहुभूषणें आहेत. मूर्तीचें ध्यान सुरेख आहे. पण हे लोक रामानुजपंथी असल्यामुळें ह्यांच्या चालीप्रमाणें हे आपलेप्रमाणें देवाचेही सर्व कपाळभर पांढऱ्या गंधाचे उभे पट्टे लावून विरूप करतात. मध्यें मात्र एक तांबडी किंवा काळी रेघ असते. काय यांत सौंदर्य आहे हें त्यांचें त्यांनाच माहीत. पण हा देशाचार आहे, त्याला काय करणार ? देवाचे वस्त्रालंकारही पुष्कळ आहेत. निरनिराळ्या वेळीं देवाला निरनिराळे दागिने व पोषाख घातलेली मूर्ति फार मनोहर दिसते. देवळाच्या आवारांत देवाचे प्रसाद सकाळीं ९ वाजल्यापासून २ वाजेपर्यंत विक्रीत बसतात. हा प्रसाद वाटेल तेवढा विकत मिळतो. शिल्लक राहिलेला दुसरे दिवसाकरितां ठेवतात. त्यांतील भात वगैरे दुसरे दिवशीं खराब होतो. पण त्यांत दहीं वगैरे घालून कालवून विकतात, पण हें गैर आहे. नाशवंत मालाची व्यवस्था निराळीच केली पाहिजे. असे प्रकार यात्रेंत फार होतात ह्मणून यात्रेंत कॉलऱ्यासारखे रोग होतात. देवळाच्या बाहेरच्या आवारांत केळीं, नारळ, देवाचे दर्शनाचे फोटो, लांकडी व धातूंच्या मूर्ती, भस्म, गोपीचंदन, वगैरे प्रासादिक वस्तूंचीं मोठमोठीं पुष्कळ दुकानें असतात. तसेंच शिधासामान, पानपत्रावळ, व इतर

वस्तूंचींही दुकानें असतात. सर्व पदार्थ नीट खबरदारीनें झांकून आणले पाहिजेत. उघडे आणल्यास वानर झडप घालून केव्हांच नेतात!

या ठिकाणच्या इमारतींपैकीं एका उंच इमारतीचे गच्चीवर उभा राहून मीं भोंवतालची सर्व सृष्टिशोभा पाहिली. तेव्हां हा पर्वत खाल-पासून शेषाच्या वेटोळ्यासारखा असून वरचे बाजूस त्यास शेषाच्या फणासारखी शिखरांची रांग आहे व त्या खालींच व्यंकटेश किंवा बालाजीचें देऊळ आहे, म्हणून यास शेषाचल म्हणत असावें व त्या खालीं ह्या भगवंताचा वास झाला असावा असें दिसतें. येथील सर्व सुखसोहळा पाहून तीन वाजतां ऊन खालीं झालें आहे असें पाहून मी खालीं निघून आलों. बूटवाल्या बाईजवळ आलों तर ज्या बाईनें बूट घेतला होता ती तेथें नव्हती. खूण चुकली कीं काय म्हणून पाहतां, नाहीं अशी खात्री झाली. मग तपास केल्यावर तिचा मुलगा मिळाला व त्यानें बूट दिला. रीतीप्रमाणें त्याला दोन आण्याचे पैसे बक्षीस दिले. बाई भेटली नाहीं परंतु तिचा मुलगा होता म्हणून प्रथम मला संशयच आला होता, तसा त्यालाही माझा संशयच आला. त्यानें मला निरनिराळे हलके बूट दाखविले पण ते माझे नाहींत असें सांगितलें व माझा बूट नवा चांगला आहे असें सांगितल्यावर त्यानें तो घरांतून आणून दिला. अर्थात त्यानें योग्य काळजी घेतल्याबद्दल त्याला बक्षीस देणें जरूरच होतें. नाहींतर राशींत असे बूट ठेविले म्हणजे लबाड लोक हाच माझा बूट असें म्हणून घेऊन जातात. असो. खालीं आल्यावर खालचा बाजार पाहिला. बाजार मोठा आहे. पाण्याचे नळ असून म्युनिसिपालिटी आहे. येथें दूध विकण्याकरतां गवळी सकाळ संध्याकाळ गाय व वासरें घेऊन हिंडतात. ज्याला जितकें पाहिजे असेल तेवढें वासरूं सोडून दूध काढून देतात! असा संप्रदाय हिंदुस्तानांत मला कोठेंही दिसला नाहीं. येथील गाईसही अशीच संवय लागली आहे. आपल्याकडे गाईचें दूध वारंवार निघत नाहीं.

त्या पान्हा चोरतात. पण हा येथें अपवाद आहे. येथेंही घराजवळ संडास आहेत व ते मदुरेसारखेच सर्व उघडे असतात. दरवाजे वगैरे कांहीं नाहीं. कोणी गेला आहे असें कळल्यास दुसऱ्यानें जाऊं नये, 'याशिवाय मार्ग नाहीं !

येथें बालाजीचे वडील भाऊ गोविंदजी (शेषशायी भगवान) यांचें भव्य मंदीर आहे. गोविंदजी नेहमीं निजलेले असतात. त्यांचें दर्शन रात्रीं ८ वाजतां होतें. गोविंदजींची मूर्ति ६।७ फुटींची असून शेषावर निजलेली आहे. मूर्ति उजव्या कुशीवर निजलेली आहे तरी डोळे उघडे आहेत. सर्व अलंकार घातलेले असून धोतर, पोषाक वगैरे घातलेली अशी आहे. या देवळामध्यें आंत पुष्करणीचा हौद, चौघडा, हत्ती वगैरे सर्व वैभव आहे. बालाजीची सर्व यात्रा येथें दर्शनास येतेच. येथें मला मराठी भाषेचा प्रचार बराच दिसला. येथून नंतर मी परत रेनिगुंठ्याला येऊन

## कालाहस्ती

स आलों. कालाहस्ती हें वायुतत्व आहे. कांची हें पृथ्वीतत्व आहे. जंबुकेश्वर हें आपतत्व असून तें त्रिचनापल्ली रोड रस्त्यावर श्रीरंगापासून पश्चिमेस सुमारें अडीच मैलांवर आहे. तसेंच अरुणाचल हें तेजतत्व आहे. अरुणाचल हें मद्रास सदर्न मराठा रेल्वेवर कडपाटी जंक्शनपासून ५८ मैलांवर तिरुवन्नामालाय या स्टेशनापासून अर्धा मैलावर डोंगरांत आहे. येथें भवानीशंकराची मूर्ति पंचवदना आहे. जंबुकेश्वर व अरुणाचल हीं ठिकाणें प्रथम माहित नसून आतां समजलीं. आतां तीं आडवळणावर राहिलीं व वेळ नव्हता ह्मणून गेलों नाहीं. यात्रेकरूंनीं अवश्य जावें. यांपैकीं विशेष श्रेष्ठ चिदंबरं आहे. हें आकाशतत्व आहे व याचें वर्णन मागें आलेंच आहे. हीं शिवस्थानें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं नाहींत. पण काय तत्वावर यांचीं अशीं पंचमहा-

तत्वाचीं नांवें पडलीं हें समजत नाहीं. पण दक्षिणेंत यांची फार प्रख्याती आहे.

कालाहस्ती हा गांव स्टेशनपासून सुमारें दोन मैल आहे. गांवांत जातांना सुवर्णमुखी नदी लागते. उन्हाळ्यामुळें नदीला पाणी अगदींच थोडें होतें. सडक नदींतूनच गेली आहे. नदी उलटल्यावर लगेच देऊळ लागतें. देऊळ फार प्रशस्त असून काम जुन्या पद्धतीचें आहे. आंत शाळुंका कमरेएवढी उंच व अर्धा हात व्यासाची आहे. देवळांत पुष्कळ देवता आहेत; त्यांत गणपती, मारुती वगैरे नेहमीचे देव असून नवग्रह, चौसष्ट योगिनी वगैरे आणखीं बरेच आहेत. येथें दरमहा शिवरात्रीस १५।२० हजार यात्रा जमते. दक्षिणेमध्यें शिव-माहात्म्य जास्ती व उत्तर हिंदुस्तानांत विष्णूमाहात्म्य जास्ती. याचें कारण रामकृष्णांचे अवतार तिकडे झाले व रामानुज, वल्लभाचार्य इत्यादि वैष्णवपंथी लोक तिकडे निर्माण झाले, त्यामुळें कृष्णाची किंवा विष्णूचीच भक्ति तेथें प्राधान्य आहे. याठिकाणीं भाषा तेलगू आहे, पण मला एक सुशिक्षित डॉक्टर खाणावळींत भेटले व त्यांनीं इंग्रजींतून इकडच्या प्रांतांतील सामाजिक, धार्मिक व राजकीय स्थिति कळविली. येथें पाणी पितांना भांडें तोंडास लावतां कामा नये. लाव-ल्यास विसळून चालत नाहीं, घांसून घावें लागतें.

हें देऊळ मोठें असल्यामुळें तें दाखविण्याकरतां येथें पुजारी असतातच. त्यांपैकीं एक मजबरोबर देऊळ दाखविण्याकरतां आला. मी त्याला विचारलें, तुला काय द्यावयाचें? त्यानें इच्छेस येईल तें द्या, तक्रार होणार नाहीं असें सांगितलें ह्मणून मी त्याजबरोबर गेलों. त्यानें सर्व देऊळ दाखविलें व ठिकाठिकाणीं दक्षणा ठेवण्यास सांगितल्या त्याही यथाशक्ति ठेविल्या. देवळांतून बाहेर जातांना त्याचे इच्छेवरून त्याचे हातावर दोन आणे ठेविले. वस्तुतः हें देऊळ मदुरा किंवा रामेश्वर यांच्या चतुर्थांशा इतकेंही नव्हतें, तथापी ब्राह्मण आहे ह्मणून त्याला दोन

आणे दिले, तरी त्याचा संतोष झाला नाहीं. हो ना करतां करतां चार आणे ठेविले तरी तो ऐकेना. तेव्हां त्याला विचारलें, तुला पाहिजे तरी काय? तेव्हां तो निदान एक रुपया तरी द्या असें ह्मणाला. शाबास त्याची! ह्मणजे देवळाजवळ आणा दोन आणे ठेवावयाचे व ह्यानें देवदर्शन करविलें त्याबद्दल एक रुपया द्यावयाचा. मागणाऱ्या मनुष्याला कांहीं तरी लाज पाहिजे, पण तिचा यांना मुळींच गंधही नाहीं. अखेरीस मीं सांगितलें कीं, देऊं केलेले चार आणे पाहिजे तर घ्या, नाहींतर हा मी चाललों असें ह्मणून मी गाडींत बसलों. तेव्हां रुष्ट होऊन मोठ्या कष्टानें त्यानें ते घेतले. ह्मणजे काय जुलूम आहे पहा! पैसे देऊन सुद्धां संतोष नाहींच, पण उलट वांकडेपणा पदरीं येतो. पण त्यांच्या असंतोषाकडे आपण मुळींच लक्ष देऊं नये. गाडीवाल्यानेंही असेंच केलें. स्टेशनवर त्यानें सांगितलें कीं, येथून गांव चार मैल आहे. सडक होती व मैल फर्लांग मांडलेले होते. गांव फक्त एक मैल आणि सात फर्लांग ह्मणजे पुरे दोन मैल नसतांही, खुशाल चार मैल सांगून त्यानें भाडें जास्त उपटलें. अशा लबाडीला काय करणार? ह्मणजे मला गांवांत येतांना ६ आणे पडले पण गावांतून स्टेशनवर जातांना गाडी दोन आण्यांत मिळाली! गांव स्टेशनपासून जवळच आहे हें मला माहीत होतें. पण हा प्रत्यक्ष येथील माहीतगार असें समजून त्याचें ह्मणणें मी खरें मानलें. अनोळखी मनुष्यास प्रवासांत असे प्रकार नेहमीं घडतात पण त्याबद्दल कांहीं विधिनिषेध मानूं नये. परंतु मेहनतीबद्दल कोणास कांहीं दिल्याशिवाय मात्र राहूं नये. सहसा कोणाचे फुकट श्रम घेऊं नयेत. कालाहस्तीनंतर मीं व्यंकट-गिरीला उतरलों नाहीं. गिरीचा व्यंकटेश किंवा बालाजी ह्मणतात तें हें स्थान अशी माझी पूर्वी समजूत होती. पण खरा व्यंकटेश किंवा बालाजी ह्मणजे तिरुपतीजवळ शेषाचलावर आहे तोच असें तेथें समजलें. त्याचें वर्णन मागें आलें आहेच. ह्या व्यंकटगिरी येथें फक्त

जाहागिरदार राहातात. त्यांचा राजवाडा पाहाण्यासारखा आहे. येथेंही वैशाख महिन्यांत ईश्वराच्या मंदिरांत ब्रह्मोत्सव मोठा थाटाचा होतो असें ह्मणतात. नांवामुळें अशी चूक होण्याचा संभव असतो.

व्यंकटगिरीनंतर गुडूरपर्यंत न जातां परत रेनिगुंट्यास आलों. व तेथून मोठ्या लाइनीनें गुंटकल जंक्शनवर येऊन पुन्हा छोट्या लाइनीनें नंद्याळ स्टेशनवर आलों. येथून श्रीशैल्यपर्वतावरील

## श्रीमल्लिकार्जुन

च्या यात्रेस निघावें लागतें. ही यात्रा हिमालयाप्रमाणेंच फार त्रासाची व दगदगीची आहे. एकवार हिमालयाची यात्रा परवडेल पण ही परवडणार नाहीं; याचें कारण हिमालयाची यात्रा उन्हाळ्यामध्यें नेहमीं चालू असते तसें हिचें नाहीं. ही यात्रा फक्त महाशिवरात्रीला किंवा चैत्री पूर्णिमेलाच जाते, इतर वेळीं जात नाहीं. यात्रा निघेल त्याचवेळीं जाण्याचें कारण हा प्रदेश दुर्गम आहे असें नाहीं, पण ह्या प्रांतांत भिल्ल किंवा डाकू लोकांची फार वस्ती आहे व हे लोक यात्रेकरूंला निर्दयपणें छळतात व त्यांच्या जिवास अपाय करितात. इंग्रजसरकास सुद्धां यांचा कायमचा बंदोवस्त करितां येत नाहीं ! या लोकांस पकडून न्यायासनापुढें उभें केलें असतां ते लोक आपला लुटण्याचा गुन्हा बिनतक्रार कबूल करितात ! तुम्हीं असें कां करितां असें कोर्टानें विचारल्यास हा आमचा वंशपरंपरेनें धंदा आहे आणि आह्मी तो कधीं सोडणार नाहीं असें सांगतात ! तुह्माला शिक्षा होईल असें सांगितल्यास आह्मी सांपडल्यास आह्मांस शिक्षा करा, आम्हीं शिक्षेला भीत नाहीं असें स्पष्ट उत्तर देतात ! ! तरी पण त्यांचे पुढाऱ्यांस पकडून सरकारनें त्यांनीं केलेल्या खुनाबद्दल फाशीं दिलें आहे, यामुळें यांचा जोर आतां कमी झाला आहे. तथापी यांच्याबद्दल अजून निनावा देतां येत नाहीं. आतां त्याचा परिणाम एवढाच झाला आहे कीं,

पोलिस असल्यास त्यांस ते दबकतात! पूर्वी पोलिसांवर सुद्धां ते हल्ला करीत असत तसा आतां करीत नाहींत. एक श्रीमंत मनुष्य असाच अवेळीं यात्रेस निघाला होता. त्याला एका श्रीमंत भाट्यानें आपला अनुभव सांगितला कीं, महाराज यावेळीं यात्रेला जाऊं नका. तुह्मी म्हणाल पोलिसची मदत घेऊन जाईन, तरी पण पोलिस बाजूस राहून तुह्मी मात्र फुकट प्राणास मुकाल!! मी असाच घमेंडीनें अवेळीं यात्रेस निघालों होतों तेव्हां या लोकांनीं मला पूर्णपणें लुटलें व कसा बसा पण जिवंत, नागडा उघडा करून हाकलून दिलें!! तेव्हां त्या मनुष्यानें जाण्याचा बेत रहित केला. मी दक्षिण हिंदुस्थानची यात्रा करावयास निघालों त्यावेळीं त्या ठिकाणची अशी परिस्थिति समजल्यामुळें मी त्यावेळीं इकडे आलों नाहीं. पुढें पेनशन घेतल्यावर १९२४ च्या शिवरात्रीचे यात्रेबरोबर गेलों कारण येथील चैत्री पौर्णिमेची यात्रा इतकी मोठी नसते. त्या दृष्टीनें या यात्रेचें वर्णन शेवटीं द्यावयाचें किंवा स्वतंत्र द्यावयाचें परंतु ही यात्रा त्या ठिकाणची असल्यामुळें सोईकरितां तिचें येथें वर्णन देत आहें. या यात्रेचें काठिण्य मोठें, ह्मणून वर्णन शक्य तोंपर्यंत सविस्तर करीत आहें. यात्रा पुष्कळ जमत असल्यामुळें सरकारास पोलिस बंदोबस्त ठेवतां येतो व त्यायोगें सर्व यात्रा सुखरूपपणें पार पडते. यात्रेच्या दिवसांतच फक्त दुकानें वगैरे यात्रेकरूंच्या सोई असतात, इतर वेळीं नसतात. यात्रेचे वेळीं लुटालूट करितां येत नसल्यामुळें हे भिल्ल यात्रेंत गाडी भाड्याचा किंवा मजुरीचा धंदा करितात. धंदा करीत असतां ते असा दगा फटका करीत नाहींत. इतकेंच नव्हे तर धंद्यांत ते अत्यंत प्रामाणिक आहेत. ह्या लोकांचे गांवांमधून यात्रा जाऊं लागली किंवा त्यांच्या गांवांत यात्रेनें मुक्काम केला तर यात्रा जातेवेळीं हे यात्रेकरूजवळून माणशीं आणा दोन आणे कर घेतात. हा कर विशेष नसल्यामुळें लोक खुषीनें देतात व सरकारचे शिपाइ-

सुद्धां तिकडे दुर्लक्ष करितात. असा कर सर्व यात्रेंत जातांना ३।४ ठिकाणीं द्यावा लागतो व तो फक्त जातांनाच द्यावा लागतो परत येतांना कांहीं नाहीं. ही यात्रा फार त्रासाची आहे, असें आह्मीं आतां ह्मणतों कारण आह्मीं ह्मणजे अलीकडील प्रजा सुखाला फार भुकेलेले आहों. पण पूर्वी जेव्हां सर्वच प्रवास अडचणीचा होता तेव्हां ह्या दगदगीला व त्रासाला लोक मुळींच जुमानीत नसत. इतकेंच नव्हे तर जसजसे शरीर क्लेश जास्त होतील तसतसें पुण्य विशेष ह्मणजे काटकपणा विशेष येतो अशी लोकांची समजूत होती आणि तें खरेंही आहे. पुण्य ह्मणजे काटकपणा व कार्यक्षमता ह्या दृष्टीनें त्याची योग्यता विशेषच आहे. ही यात्रा पहाडी आहे पण पहाडावर यात्रेकरूंना त्रास होऊं नये ह्मणून ज्या ठिकाणीं रस्ता कठीण आला आहे, तेथें सर्व पर्वतभर चांगल्या प्रशस्त मोठमोठ्या दगडी चिऱ्यांच्या पायऱ्या बांधल्या आहेत.

या यात्रेला जाण्याचे चार मार्ग आहेत. एक नंद्यालवरून, दुसरा कर्नूलवरून, तिसरा नंद्याळ पुढील गाझरपल्ली स्टेशनवरून व चौथा कृष्णा स्टेशनवरून निजाम हद्दींतून जातो. जो तो आपापल्या सवडीचे मार्गानें जातो, बाकी सर्व मार्ग जवळजवळ सारखेच आहेत. पण मुंबईकडच्या मनुष्यांस नंद्याळवरूनच जाणें सोईचें आहे व बहूतेक यात्रा याच मार्गानें जाते, ह्मणून याच रस्त्यावर सरकारचा बंदोबस्त विशेष असतो. प्रत्येक जिल्ह्यांतील १५ याप्रमाणें दाहा जिल्ह्यांतील १५० पोलीस त्यांच्यावरील अधिकाऱ्यांसुद्धां या यात्रेच्या बंदोबस्तास येतात. हल्लीं ही संख्या जास्त वाढविली आहे असें ह्मणतात. पोलिसांचें काम भिल्ल व डाकू या लोकांपासून यात्रेकरूंचें संरक्षण करणें हें आहेच; पण यात्रेकरूसुद्धां सर्वच केवळ परमार्थ साधनाकरितां कोठें येतात? देवाची यात्रा करून किंवा पुण्य संपादून देव या जन्मीं नाहीं तरी पुढल्या जन्मीं प्रसन्न होण्याची वाट कांहीं लोक

कोठें पहातात? ते या जन्मींच आत्मसाधन करून घेतात. असे लोक चोरटे, भामटे, लुटारू हेही या यात्रेस बरेच येतात व साधेल तेवढा आपला तळीराम गार करून बसतात! अशा मंडळीवरही पोलिसांस देखरेख ठेवावयाची असते. पण दुःखाची गोष्ट हीच कीं, ह्या त्यांच्या कृत्याला पोलिसांची सुद्धां आंतून फूस असते! ह्मणजे लुटीचे हिश्शाचे ते भागिदार होतात. यामुळें अशा मनुष्यांस पोलीस सहसा पकडीत नाहींत व गुन्हा होत असतांना सहज दिसला तरी तिकडे मुद्दाम दुर्लक्ष्य करितात. याउप्पर कोणी पकडून पोलिसांचे स्वाधीन केलाच तर पोलीस त्यास बाह्यात्कारी धाक दपटशा देऊन व पैसे उपटून घेऊन खुशाल सोडून देतात! यामुळें न्यायाच्या ऐवजीं पोलिसांची मदत अन्यायालाच होते. पण असें जरी आहे तरी पोलीस अवश्य पाहिजे. कारण त्यांचे योगानें दिवसाढवळ्या व सर्व लोकांसमक्ष त्यांस किंवा कोणासच लुटालूट करितां येत नाहीं. पोलिसांस पगार थोडा असतो आणि त्यांची ड्यूटी जरी फिरण्याची आहे तरी त्यांस या स्पेशल ड्यूटीबद्दल स्पेशल अलावन्सही मिळून रोज आठ आणे भत्ता मिळतो व जाण्यायेण्याचा खर्चही मिळतो. याशिवाय यात्रेकरूंकडून त्यांस प्रामाणिकपणें रोज चिरीमिरीही मिळते ती निराळीच! खेरीज दुकानदार, खाणावळवाले, हाटेलवाले व त्या संस्थानचे वहिवाटदार असतात त्यांच्या अन्नसत्रासारख्या कांहीं संस्था असतात त्यांजकडून सदर पोलिसांस भरपूर आश्रय मिळतो. ही ड्यूटी सरासरी २० दिवसांची आहे. ह्मणजे शिवरात्रीचेपूर्वी दाहा दिवस व पुढें दाहा दिवस अशी योजना असते. अशा रीतीनें ही ड्यूटी पोलिसांना त्रासदायक न वाटतां लाभदायकच होते. सहा महिने नोकरी करून जें मिळणार नाहीं तें त्यांस ह्या वीस दिवसांत मिळतें! यामुळें ह्या ड्यूटीवर जाण्याची पाळी आल्यास ते भाग्यवान् समजतात असें ऐकितों!

देश श्रीमंत असो, गरीब असो, सुशिक्षित असो किंवा नसो

चोऱ्या ह्या सर्वत्र होतात. सुशिक्षित मनुष्य चोरी करणार नाहीं हें ह्मणणेंच खोटें आहे. एकवार अशिक्षित मनुष्य पापभीरू व धर्म-भोळा असेल तर त्याचे हातून चोरी होण्याचा संभव कमी; पण सुशिक्षित मनुष्याची तशी हमी देतां येत नाहीं. याचें कारण सुशिक्षित मनुष्याचें चोरी करण्याचें व पचविण्याचें सामर्थ्यही सुशिक्षितच असतें, तसें अशिक्षित मनुष्याचें नसतें यामुळें तो भिऊन वागतो. सुशिक्षित मनुष्याला हल्लींच्या जगांत प्रामाणिकपणाचा मान आहे हेंही त्यास दडून राहाण्याचें साधन आहे. निर्वाहाकरितां चोरी होणें हें एकवार क्षम्य आहे. पण आंगीं कांहीं गुण नसतां केवळ मिजासीनें राहण्याची अनावर इच्छा असणें किंवा व्यर्थ महत्वाकांक्षा असणें हें मात्र अत्यंत निंद्य आहे. कसाही प्रसंग आला असतां आपलें शील न बदलणारे राजा हरिश्चंद्रासारखे पुरुष फार क्वचित् सांपडतात. तसेंच सर्व प्रकारची अनुकूलता असतांही वाईट मार्गाकडे जाणारी मंडळीही आढळते. याचें कोणास आश्चर्य वाटेल पण आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. हल्लींच्या श्रेष्ठ दर्जाचे श्रीमंतांकडे थोडें लक्ष दिलें असतां समाधानच होईल! हल्लींच्या काळीं राजापासून रंकापर्यंत प्रामाणिकपणा कोठेंही राहिला नाहीं. महाभाग्यवान् व्हिक्टोरिया राणीनें दिलेलीं वचनें सुद्धां त्यांच्या मुलांच्यानें, त्यांच्या देशानें किंवा त्यांच्या प्रधानांकडून पाळलीं गेलीं नाहींत आणि हल्लीं तर आज दिलेलें वचन उद्यां प्रसंग आल्यास कागदाचें चिठोरें समजण्यांत येतें! हा प्रकार सर्वत्र झाला आहे. श्रीमंतानें किंवा श्रेष्ठानें केलें म्हणजे त्याला मुत्सद्दीपणा किंवा राज-कारण म्हणतात व गरिबानें केलें म्हणजे त्यास चोरी, भामटेगिरी वगैरे हलकीं नांवें देतात एवढेंच. महायुद्धाचे काळीं व त्यानंतर हा अनुभव सर्व जगाला अनायासें आलाच आहे!

पूर्वीं देश संपन्न असून लोक पिढीजात श्रीमंत होते. त्यांचे वंशजाचें मन संपत्तीनें कलुषित होत नसे. पण हल्लींचे श्रीमंत एका

पिढींतच झाले असल्यामुळें त्यांचें व त्यांचे वंशजांचें मन दरिद्रीच राहिलेलें असतें. हल्लींच्या काळीं प्रामाणिकपणें निर्वाह होणें कठीण झालें आहे. यामुळें चोऱ्या होण्याचें कारण दरिद्रता हेंच प्रधान आहे. आमचें शील बिघडलें आहे असें परके ह्मणतात. पण आमचें स्वराज्य असेपर्यंत आमचें शील बिघडलें नव्हतें. आणि आतां परकी-यांचे सहवासानें व हल्लींच्या राज्यकारभारामुळें आह्मीं दरिद्री बनून नीतिभ्रष्ट होत आहों खरे. अगदीं काल परवापर्यंत ह्मणजे आपलेकडे नवीन शिक्षणाचा प्रसार हलक्या जातींत झाला नव्हता तोंपर्यंत ते लोक उत्तम शीलवान होते आणि अद्यापपर्यंत जेथें नवीन शिक्षण गेलें नाहीं तेथेंही ते तसेच आहेत. पूर्वींचे साक्षीदार गणपती, शंकर किंवा उपास्य दैवतें अथवा सृष्टीचीं पंचमहातत्वें हे होते. अद्यापपर्यंत सुद्धां लग्नकार्यासारख्या धर्मकृत्यांत अग्नि, सूर्य, ध्रुव नक्षत्र यांनाच साक्षी ठेवून लग्न लावतात. पण हे साक्षिदार कोणापुढें साक्ष देण्या-करितां जातच नाहींत ह्मणजे लोक अत्यंत पापभिरु होते. त्यानंतर हल्लींचें शिक्षण ब्राह्मणासारख्या सुशिक्षित समाजास प्रथम मिळालें ह्मणून तो प्रथम भ्रष्ट होत चालला. यामुळें हल्लींच्या काळीं ब्राह्मणाचा शब्द एकवार विश्वसनीय मानीत नाहींत पण अशा अडाणी मनुष्याचा मानतात; आणि तो तसा असतोही. इतके आमचे लोक प्रथम नीति-मान होते. हल्लीं नीतिशास्त्र शाळेंत शिकवितात पण अशा शिक्षणानें लोक नीतिमान कसे होतील? नीति ही समाजाच्या—त्यांतही मोठ्या मनुष्याच्या—अनुकरणानें प्राप्त होते. पण ज्यांचें अनुकरण करावयाचें तेच जर राजापासून सुद्धां अनीतिमान आहेत तर नुसतें शिक्षण दिलें तरी लोक नीतिमान कसे होतील? 'राजा कालस्य कारणम्' ह्मणतात तें हेंच. हल्लींचा सुशिक्षित मनुष्य सुखाला भुकेला असतो अर्थात तो कायद्याला व शिक्षेला भितो ह्मणूनच सुशिक्षित मनुष्यांवर राज्य करणें सोपें जातें. सरकार रयतेला सुशिक्षित करीत आहे त्याचा

हेतु हाच आहे. लोकांना सर्व जगाचें ज्ञान करून देऊन त्यांत आपण कोठें आहों व आपली व आपल्या समाजाची उन्नति कशी करावी हा हेतु त्यांत असता तर तो श्रेष्ठ हेतु खरा. असा हेतु राष्ट्रीय शिक्षणाचा पाहिजे. हाच सरकारी शिक्षण व राष्ट्रीय शिक्षण यांतील फरक आहे, दुसरें काय? हल्लीं शिक्षण याचा अर्थच बदलला आहे. आमच्या पूर्वींच्या बायका अशिक्षित होत्या व आतां त्या सुशिक्षित होत चालल्या आहेत हें ह्मणणेंच चुकीचें आहे. आमच्या पूर्वींच्या बायका गृहकृत्यांत, बालसंगोपनांत, पातिव्रत्यांत व स्वकुलाभिमानांत किती तरबेज होत्या व हल्लींच्या किती आहेत याची प्रत्येकानें आपली आई व बायको ह्यांची तुलना करून पहावी; ह्मणजे हल्लींच्या शिक्षणानें आपली उन्नति होत आहे किंवा अवनति होत आहे हें समजून येईल. खरें शिक्षण ह्मणजे ज्याचे त्याचे धंद्याचें असले पाहिजे सबब ज्यानें त्यानें आपल्या उद्योगधंद्यांत वाकबगार होऊन नंतर लिहिणें वाचणें शिकून जगांतील सुधारणांचा उपयोग आपल्या धंद्याच्या उन्नतीकरितां किती करितां येईल हें पहाणें हें होय. आणि असेंच शिक्षण पाश्चात्यांमध्यें मिळतें. हल्लींच्या शिक्षणानें लोक नोकर, मिजासी, धर्मलंड, स्वाभिमानशून्य, कर्तृत्वहीन व निष्प्रभ ऊर्फ नेभळे बनतात व तीच गत स्त्रियांची होत आहे.

हल्लींच्या काळीं खाद्यपेयासुद्धां चैनीच्या पदार्थांस ऊत आला आहे. धर्मबंधनें, सदसद्विचार व नीतितत्वें यांचा नायनाट झाल्यामुळें बहुतेकांचीं मनें स्वच्छंदानें उच्छृंखल झालीं आहेत. यामुळें शारीरिक, मानसिक वगैरे संपत्तींचा ऱ्हास मोठ्या झपाट्यानें होत आहे, तसेंच द्रव्य परदेशीं जात आहे. राजकारणामुळें, होमचार्जेसमुळें हक्कानें संपत्ति जात आहे; त्याशिवाय परदेशाचे नोकर, त्यांचीं पेनशनें, हुंडणावळ, व्यापार यांची त्या ऱ्हासाच्या कामीं मदत होत आहेच. पण त्या सर्वांत चैनीच्या वस्तू घेऊन आह्मी होऊन त्यांस संपत्ति देत आहों व आह्मीं भिकार होत आहों याला काय करावें? प्रत्येक

यात्रेंतून किती तरी मोहक खेळणीं येतात. ही चैन नको म्हणून महात्मा गांधींनीं अगदीं साधें राहून खादी वापरण्यास सांगितलीं, तरी लोक खादींचेही नानाप्रकारचे उंची पेहराव करून आपली चैनच करीत आहेत. ही चैन करण्याची अनावर इच्छा हेंच चोरीचें मूळ आहे. अवकाळ प्राप्त झाला असतां अमृताचें सुद्धां विष होतें म्हणतात तेंच खरें. असो. दारिद्र्याचें वर्णन करण्याचें हें स्थळ नव्हे पण हल्लींच्या परिस्थितीची थोडी तरी कल्पना यावी ह्मणजे अशा केवळ पोटाकरितां चोरी करणाऱ्याची उपपत्ति लागून समजूत होईल व त्याप्रमाणें लोकांस वागतां येईल व अशा चोरट्याविषयीं थोडासा आपलेपणा उत्पन्न होऊन तीव्र द्वेष नाहींसा होईल, सबब केलें. द्वेष जाऊन चित्त सम होणें हा एक यात्रेच्या फायद्यांपैकीं फायदा आहे.

नंद्याळपासून श्रीशैल्याचा पायथा म्हणजे नागलोटी ठिकाण ४० मैल लांब आहे. सडक आहे तरी सामानसुमान सुद्धां इतक्या लांब पायीं जाणें मध्यम स्थितीच्या मनुष्याला कठीण आहे. यापुढें २३ मैल पर्यंत चढाव लागतो सबब एव्हांपासून दमून उपयोगी नाहीं म्हणून पुष्कळ लोक गाड्या करतात. पायीं यात्रा मुळींच जात नाहीं असें नाहीं, पण अशांची संख्या फार थोडी. स्टेशनापासून नंद्याळ गांव दोन मैल लांब आहे, तेथून नागलोटीपर्यंत केवळ जाण्याच्या किंवा जाण्यायेण्याच्या गाड्या मिळतात. स्टेशनवरून महाग मिळतात म्हणून गांवांत येऊन शौचविधि उरकून नीट चौकशी करून गाडी करावी हेंच उत्तम. ही यात्रा एकट्यानें करावयासारखी नाहीं. बैल गाडीचा प्रवास जरूर असल्यामुळें संघशक्तीची जरूर आहे कारण एकट्याकरितां गाडी करणें जड जातें. शिवाय प्रांत निराळा, भाषा निराळी, वागणूक निराळी, आचार निराळा, म्हणून आपल्या जातीप्रमाणें, धर्माप्रमाणें व आचाराप्रमाणें मंडळी शोधावी हें उत्तम. मीही अशाच दाहा बारा दक्षिणी यात्रेकरूंच्या

मंडळींत शिरलों. व त्यांनीं व आह्मीं एक समाईक गाडी केली होती. गाड्या मोठ्या असतात व त्यांचीं चाकें मोठीं असून बैल मोठे व पल्लेदार असतात. गाडीच्या साट्या मजबूत असून गाड्या छपराच्या असतात. एका गाडींत सुमारें ८ ते १२ मंडळी सामानासुद्धां सुखानें बसतात. भाडें व्यक्तीवर असतें किंवा सबंध गाडीवरही असतें. व्यक्तीवर भाडें देण्यापेक्षां गाडीवर ठरवावें हें उत्तम. कारण व्यक्तीवर भाडें ठरविल्यास भिन्न संस्कृतीची मंडळी आपल्या शेजारीं येते व ती किती येते याचा नेमच नाहीं. अशावेळीं गाडीवान आपल्या बैलांकडे न पाहातां तो पैशाकडे पाहातो व त्यापासून आपल्याला विनाकारण त्रास होतो. सबंध गाडीचा ठराव असला ह्मणजे त्यास जास्त मंडळी घेतां येतच नाहीं व आपण सांगूं तसें त्यास वागणें भाग पडतें व आपला त्रास चुकतो. गाडींत शक्य तितकी कमी मंडळी असली ह्मणजे सामानासुद्धां विशेष सुरक्षितपणें जातां येतें.

या गाड्या दललामार्फत सुद्धां मिळतात. गाडीवानांची (भिल्लांची) भाषा तेलगू आहे पण दलाल मुसलमान आहेत. त्यांना हिंदुस्थानी व तेलगू येत असल्यामुळें हे दुभाषे दोघांच्या अज्ञानाचा फायदा करून घेतात! नंद्याळपासून नागलोटीपर्यंत ह्मणजे श्रीशैल्याचे पायथ्यापर्यंत जाऊन नंतर परत येतांना महानंदीवरून नंद्याळपर्यंत किंवा जवळच्या गाझरपल्ली स्टेशनपर्यंतच मुख्यतः परत येण्याचा करार करावा. ठराव करितांना महानंदीला जाण्याचें विसरूं नये, कारण महानंदी हें स्थान ह्या यात्रेंत मुख्य आहे. ठराव नसल्यास गाडिवान तिकडे जात नाहींत व गेल्यास निदान भाडें जास्त मागतात. दर गाडीस ह्या एवढ्या प्रवासाबद्दल प्रसंगाप्रमाणें १२ ते १८ रुपये भाडें पडतें. दलाला मार्फत गाड्या केल्यास कांहीं कमी पडतें परंतु त्यांत कांहीं अर्थ नसतो. ह्या लांबच्या प्रवासांत गाडी चांगली मजबूत व बैल पल्लेदार असावे लागतात. ते तसे आहेत

किंवा नाहींत हें नीट पाहून जोडलेल्या गाडींत आपलें सामान ठेवावें व नंतर मग करार पुरा करावा; नाहींतर दाखवितांना गाडी बैल निराळे दाखवितात व प्रत्यक्ष देतांना दुसरे देतात! वाईट गाडी बैल मिळाले असतां प्रवासांत बैल थकल्यास वारंवार मुक्काम करावे लागून थोडा गैरसोईचा रस्ता लागला कीं, लगेच गाडीवान उतरण्यास सांगतो व तसें उतरणें भाग असतें. कारण बैल एवढें ओझें नेण्याचे लायकीचेच नसतात! गाडी ठरवितांना बैलांचें खाणें व गाडीवानाचें खाणें हीं आपलेकडे घेऊं नये. गाड्या संगती सोबतीनें निघतात. नंद्याळपासून श्रीशैल्यापर्यंत मोठा बाजार नाहीं, सबब डाळ तांदूळ वगैरे जिन्नस संपले असल्यास ते येथें घेऊन ठेवावे कारण पुढें मिळत नाहींत. ज्या मंडळींत आपण जाणार त्या सर्व मंडळीनें आपलें सामान रक्षण करून शक्य तेवढें दुसऱ्याच्या सामानाकडे लक्ष द्यावें. शिवाय प्रत्येकानें बाहेर जातांना आपलें सामान दुसऱ्याच्या ताब्यांत अवश्य देऊन नंतर बाहेर जावें, विसरूं नये. हें जरूर लक्षांत ठेवावें. ही आपल्या बरोबरची मंडळी आहे आपल्या सामानाकडे लक्ष देतील असें ह्मणून भागत नाहीं. ते तितकें लक्ष देत नाहींत व सामान चोरीस जातें, ह्मणून हें मुद्दाम लिहिलें आहे. आतां

## सामान

काय घ्यावें याबद्दल मागें लिहिलेंच आहे. परंतु ज्यांना या यात्रेकरितांच मुद्दाम निघावयाचें असेल त्यांजबद्दल थोडेंसें सांगतों. हे शिवरात्रीचे दिवस असतात तरी थंडी म्हणण्यासारखी नसते, सबब थंडीकरितां विशेष कपडे घेऊं नये. या प्रवासांत रेल्वेवरसुद्धां ब्राह्मणाच्या खाणावळी असतात व ठिकठिकाणीं या यात्रेनिमित्त फक्त ब्राह्मणाकरितां तरी अन्नसत्रें असतात. यात्रेच्या रस्त्यावर यात्रेपुरतीं जीं अन्नसत्रें असतात तीं एका गृहस्थाचीं किंवा एका संस्थेचीं नसतात.

तर या यात्रेंत जो यात्रेकरूंजवळून कर घेतला जातो त्यांतून ह्मणजे त्या संस्थानाकडून तीं असतात, असें मागाहून समजलें. सबब अशा छत्रांतून भोजनास जाण्यास कांहीं हरकत नाहीं. पण ज्यांस जावयाचें नसेल त्यांनीं ५।६ दिवसांपुरतें टिकेल असें फराळाचें घ्यावें म्हणजे झालें. बरोबर मंडळी बरीच असल्यास त्यांस पुरेशीं भांडीं घ्यावीं; त्यांत साधारण एक मोठें बकेट व घागर हीं अवश्य घ्यावीं. बकेट कपडे धुण्यास व पाणी नेण्यास सोईचें असतें. बकेट व घागर असली ह्मणजे पाणी विहिरींतून काढून नेतां व साठवितांही येतें. यात्रेंत पाणी नेहमीं भरपूर मिळतेंच असा नेम नाहीं ह्मणून कधीं कधीं सवडीप्रमाणें पाणी साठवून ठेवावें लागतें, सबब हीं भांडीं अवश्य घ्यावीं. दुकानांत पत्रावळी मिळतात सबब ताटें घेतलीं नाहीं तरी चालतात. एक कंदील (हरिकेन लँटर्न) वाऱ्यानें न जाणारा असा घ्यावा व त्याला जाड फडकें गुंडाळावें ह्मणजे तो बकेटांत सुखरूपपणें राहतो. सामानाचे नग नक्की किती बांधावयाचे हें ठरवून ते ज्याचे त्याचे ताब्यांत नेहमीं द्यावे. रेल्वेंत सर्वत्रांस एका ठिकाणीं जागा मिळते असें नाहीं. ज्यास जेथें जागा मिळेल तेथें त्यानें आपल्या सामानासुद्धां बसावें व योग्य ठिकाणीं उतरावें अशा रीतीनें सर्व सामानसुमान घेतल्यावर

## बैलगाडीचा प्रवास

करावा. नंद्याळपासून ३० मैल आत्मकूटपर्यंत मोठी सडक आहे. एवढा पल्ला मध्यें मुक्काम न करितां भागत नाहीं. दोन तीन ठिकाणीं सोईचे मुक्काम करावे लागतात. हे मुक्काम घरांत न होतां झाडींत, धर्मशाळेंत किंवा नदीवर होतात. मुक्काम करितांना आपापल्या सामानाची फार खबरदारी घ्यावी लागते. गडबडीमध्यें एकाचें सामान दुसऱ्याचे सामानांत जातें. तसें तें खरोखर गेल्यास एकवार कांहीं हरकत नाहीं, तें पुन्हा मिळण्याचा तरी संभव असतो. पण तें नक्की गेलें आहे अशी आपली

खात्री करून घ्यावी. निघण्यास थोडा उशीर झाला तरी चालेल. पण चुकून मागें राहिलेलें सामान पुन्हां मिळण्याचा बिलकूल संभव नसतो. आपला तळ जेथें पडला असेल तेथें जवळपास कोणाचे तळ होते याचा तपास ठेवावा. बाकी जवळपासचे लोक चोरी करीत नाहींत. लांबचाच भामट्या किंवा उचल्या चोरी करून जातो. अशा यात्रेंत राजरोस चोरी करण्याची मोठी गम्मत आहे. समजा, आपण कपडे वाळत घातले असले ह्मणजे कोणी नाहीं असें समजून लबाड मनुष्य कपडे चोरतो. कदाचित् कोणी पाहून पकडला तर मी काढून तुमचेच गाठोड्यांत टाकीत आहें असें ह्मणावयाचें! नाहीं तर चोरी यशस्वी झाली आहेच!! शिवाय आपला तळ असेल तेथें स्थानिक गांवची पोरें किंवा रानांतील गोंवारी, माकडें, कुत्रीं, कावळे वगैरे यांचीही आपले सामानावर टेहेळणी असते. सकाळ संध्याकाळ किंवा मुक्काम उठतांना संधी साधून तेही वस्तु लांबविण्यास कमी करीत नाहींत, सबब भांडीं, कपडे, जोडे यांजवर नेहमीं नजर असावी. पैशाचा व्यवहार तर फारच गुप्त रीतीनें केला पाहिजे हें मागें सांगितलें आहेच.

या प्रवासांत भिल्लांच्या भयानें पोलिसांचा उत्तम बंदोबस्त असतो. यात्रेपुरत्या ठिकठिकाणीं पोलिस चौक्या ठेवितात. सूर्यास्ताचा समय झाला ह्मणजे कोणालाच प्रवास करूं देत नाहींत; अर्थात रात्रीं गाड्या हाकूं देत नाहींत ह्मणून बैलांना नेहमीं उन्हांतून प्रवास करावा लागतो. सर्व गाड्यांना छपरें असतात, छपराशिवाय एकही गाडी नसते. या सडकेनें जातांना ठिकठिकाणीं कृष्णेचे कालवे दृष्टीस पडतात व कालव्यांचे योगानें भातशेती व परोपरीच्या बागाईतीचे सुंदर मळे दृष्टीस पडतात. पण ज्या ठिकाणीं पाणी नाहीं त्या ठिकाणीं फारच हाल होतात. वाटेंत जंगल आहे पण तें ह्मणण्यासारखें नाहीं, त्यांत शिशिर ऋतु असल्यामुळें सर्व झाडांचे खरंटे झालेले असतात.

वाटेंत एका ठिकाणीं नदीकांठी आह्मीं उघड्यावर मुक्काम केला. त्यावेळीं माणसांशिवाय आणखीं स्थानिक प्राणिमात्रांचा फार त्रास झाला. कावळे, कुत्रे, माणसें ह्यांचें सर्व लक्ष आमच्या हालचालीवर होतें. जरा दुर्लक्ष झालें कीं वस्तू लांबविलीच! गाडीवानांचें आटपलें ह्मणजे ते निघण्याची घाई करितात व आपण कधीं कधीं एकटे मागें रहतों. अशावेळीं प्रथमच आपली गाडी किती थांबावयाची आहे व आपलें काम तितक्या वेळांत आटोपेल किंवा नाहीं याचा हिशोब करून आटोपेल इतक्याच कामाला लागावें; ह्मणजे जरूर पडेल तसा जेवणाचा किंवा फराळाचा अथवा नुसत्या स्नानाचा बेत करावा. स्नानास किंवा बाजारांत जातांना आपल्या सर्व वस्तू नीट आटपून त्यावर एक घोंगडी किंवा सर्व वस्तू आच्छदन होतील असें एखादें तरट किंवा धोतर टाकावें. दृष्टि आड सृष्टि आहे. वस्तु दिसली तर चोरीचा मोह पडतो; दिसलीच नाहीं ह्मणजे उदमेखून सहसा कोणी कांहीं करीत नाहीं.

अशा प्रकारें प्रवास करितां करितां आमच्या गाड्या सूर्यास्ताच्या सुमारें एका पोलीस चौकीजवळ आल्या, त्या पोलिसांनीं अडविल्या व पुढें जाण्याची बंदी केली. दिवस अर्धा तास होता. इतक्या अवकाशांत आम्हीं पुढच्या मुक्कामास जाऊन पोहोचूं, सोबतीस दहाबारा गाड्या आहेत तेव्हां काळजी करण्याचें कारण नाहीं, मेहेरबानी करून आह्माला सोडा, अशी त्या पोलिसांची सर्वांनीं फार काकळूत केली. हेतु इतकाच कीं, शिवरात्रीचे आदले दिवशीं संध्याकाळीं तरी मल्लिकाअर्जुनास पोचावें. ह्मणून त्यांनीं शिपायास लांचलुचपतही दाखविली पण तो मुळींच ऐकेना. तो ह्मणाला ह्या डाकू लोकांचा तुह्मांला अनुभव नाहीं, तरवारीनें कापतील तेव्हां समजेल! तुम्ही बायकामुलांचे धनी आहां व तीं घेऊन तुह्मी आलां आहां. तेव्हां फुकट कशाला मरतां? तरी लोक आपला हेका सोडिनात व आपला

जाण्याचा हट्ट दाखवूं लागले; तेव्हां त्यानें सांगितलें कीं, सोबतीची फार कशाला गडबड करितां? एकाच्या मानेवर सुरी धरली ह्मणजे सगळे सर्व टाकून पळून जाल. अशानें तुह्मीं जिवानिशी जाल व माझी नोकरी जाईल म्हणून यापुढें जाल तर खबरदार असें त्यानें दरडावून सांगितलें व अंधारही पडत चालला. तेव्हां सर्व गाड्या शिपायानें दाखविल्या ठिकाणीं नजीकच्या गांवच्या धर्मशाळेंत जाऊन उतरल्या. जवळ पाण्याची विहीर असून तिला आंत उतरण्यास पायऱ्या होत्या ही फारच सोईची गोष्ट होती. शिपायानें सांगितलें येथें आमचा पाहारा आहे येथें निर्धास्त असा. मोठ्या पहाटेस आह्मीं मोठ्या बंदोबस्तानें बरोबर सशस्त्र पोलीस देऊन पुढच्या चौकीच्या हद्दीपर्यंत तुह्मांला पोंचते करूं. एवढें भय असतां आगींत उडी टाकणें हें फार गैर असें मलाही वाटूं लागून मीही लोकांची समजूत घातली. हल्लीं पोलिसच्या चौक्या जास्त जवळ घालून बंदोबस्त करीत असतात असें ह्मणतात. सर्व गाड्या उतरल्या. जो तो आपलें सामान खालीं काढून बंदोबस्तानें राहिला. जिकडे तिकडे दिवे लागले व लोकांनी पाणी उदक आणून फराळ केला व हंतरुणें घालून निजले. मीही आपली संध्या, स्तोत्रपाठ आटपून जेथें आमची मंडळी उतरली होती त्यांचमध्यें घोंगडी टाकून अंगातला कोट उशाशीं घेऊन निजलों होतों. रात्रीं दोन वाजतां चंद्रोदय झाला व शिपायानें पुकारलें. आमच्या गाडीवानानें आमच्या मंडळीस उठविलें. मीही जागा होऊन सामानाची बांधाबांध केली, पाकीट भरलें व मंडळीस शौचास जाऊन येतों असें सांगितलें व शौचास गेलों. १५।२० मिनिटांत शौचविधि उरकून येतों तर तळावर कोणी नाहीं व माझें सामानही नाहीं! जिकडे तिकडे अंधार!! इतक्यांत आमचे मंडळीपैकीं एकजण आला व ह्मणाला तुमचें पाकीट, हंतरुणाची वळकटी बंद होती ह्मणून गाडींत आणून ठेविलीं आहेत. बाकी कोट, बूट, टोपी तुह्माला घालावीं लागतील

म्हणून तेथेंच ठेविलीं आहेत; तींही आतां आणणार होतों पण तेथें पाहातों तों कोट नाहीं! इतक्यांत तुम्ही आलां! आतां मी काय तपास करणार? जागेवर कोणीच नाहीं सर्व गाड्या भरून लोक गेले. पोलिसाला वर्दी द्यावी तर लोक म्हणाले आतां वरदी देण्याचें कारण नाहीं. गडबडींत कोणाचे गाठोड्यांत चुकून गेला असेल पुढचे मुक्कामावर तपास करूं नाहींतर वाटेल ती तजवीज करूं. घाबरण्याचें कारण नाहीं व वेळ घालविण्यांत अर्थ नाहीं. गाड्या गेल्या तुह्मी चला, मग पाहूं. मी वेड्यासारख्या होऊन गाडींत बसलों! पुढच्या मुक्कामावर तपास केला पण तपास कसला लागतो? मुद्दाम जेथें चोरी झाली तेथें ती कशी सांपडणार? मी आमच्या मंडळीस विचारलें तुह्मी माझें समान कां आणलेंत? तर ते ह्मणाले सामान प्याकबंद होतें व गाडींत सामान लावावयाचें होतें ह्मणून आणलें. तर मग कोट कां आणला नाहीं? तर आह्मी तुमच्या कोटाला हात कसा लावावा? आंतली वस्तु गेल्यास जबाबदार कोण? मग तुह्मी आतां आणला नाहीं व लक्षही ठेविले नाहीं यामुळें सर्व कोटच गेला त्याचा जबाबदार कोण? पण अशा प्रकारच्या प्रश्नांस काय उत्तरें मिळणार हें ठरलेंच आहे. याचा कांहींएक उपयोग न होतां भांडण मात्र झालें असतें! प्रवासांत जेथें जेथें मी निरुपायानें संगती केली तेथें तेथें माझें असेंच वारंवार नुकसान झालें आहे. ह्मणूनच चोरीविषयीं विशेष विचार व तिजाविषयीं दक्षता किती बाळगावी याच्याबद्दल फार स्पष्टपणें वर्णनें करावीं लागत आहेत. कोट गेल्यामुळें माझी फारच अडचण झाली त्यापेक्षां मी स्वतंत्र गाडी केली असती तर मला सुख होऊन माझी एकही वस्तु खचीत गेली नसती व मला पश्चात्ताप ही झाला नसता. यानंतर कोटाविषयीं कोणी कांहींही विचार केला नाहीं, इतकेंच नव्हे तर उसनवार पैसे मागत होतों तेही कोणी दिले नाहींत! उरले तर देऊं

असें ह्मणत पण ह्या ह्मणण्यांत कांहीं अर्थ नाहीं हें उघडच आहे. काम निघून गेल्यावर पैसे कशाला? अशाप्रसंगीं मला मदत मिळावयास पाहिजे होती पण कोणीही उपयोगी पडला नाहीं! मग समाजांत किंवा संगतींत जाण्यांत तरी काय अर्थ आहे? बाकी पैसे मिळून मला त्यांचा फारसा उपयोगही झाला नसता, कारण कोटामध्यें यात्रेच्या उपयोगाकरितां व प्रवासाकरितां उपयुक्त वस्तु घेतल्या होत्या त्या तेथें जंगलांत कशा मिळणार? खुद्द कोटावांचूनच फार अडे, कारण पैसा अडका, घेतली वस्तु कोठें ठेवावयाची! शिवाय कोटांत घड्याळ, चष्मा, चाकू, सुंठ, सुपारी, ठिकठिकाणचें पाणी बाधूं नये ह्मणून खिशांत ठेवलेलें औषध व किरकोळ खर्चाकरितां खुर्दा नाणें मिळून १५।२० रुपये ठेविले होते ते वगैरे सर्व सामान गेलें. त्या सर्वांत फार उपयुक्त वस्तु ह्मणजे माझें नोटबूक व शिसपेन गेली याबद्दल मला फार वाईट वाटलें. कारण नोटबुकांत माझ्या प्रवासाची सर्व हकीकत लिहून ठेविली होती ती गेली व पुढें टिपण्याचें साधनही कांहीं राहिलें नाहीं. कारण कागद, शिसपेन किंवा एक्झरसाईजचें कोरें बुक या जंगली यात्रेंत कोठेंच मिळालें नाहीं. असें सर्व प्रकारचें सामान कोटांत असून त्याचा नियमित संग्रह माझ्यापद्धतीप्रमाणें आणखी माझ्या पाकिटांतही होताच. पाकीटही गेलें असतें ह्मणजे परतच फिरावें लागलें असतें पण परमेश्वरानें एवढा अंत पाहिला नाहीं, हें मोठें भाग्य समजावयाचें. सदरकोट व आंतील सामान न मिळाल्यामुळें वेळोवेळीं माझे किती अडे हें सांगता येत नाहीं. प्रत्येक ठिकाणीं वस्तूवाचून मला चुकल्या चुकल्यासारखें होई. कोट गेल्यामुळें माझें ५०।६० रुपयांचें नुकसान झालें. पण हें सर्व उपयुक्त सामान राहून माझे ५०।६० रुपयेच गेले असते तर चोराचा फायदा झाला असता व माझाही त्या मानानें फायदा झाला असता! घड्याळाशिवाय त्या सामानाचा चोराला तरी काय

उपयोग? तो तें फेकून देईल किंवा कवडीमोल विकील! अशा प्रवासांत पैशापेक्षां सामानाचीच योग्याता अधीक असते. यात्रेंत चोरीचा मला अद्याप अनुभव नव्हता तो यात्रा ह्मणूनच परमेश्वरानें हा सोहाळा शेवटीं दाखविला असें मी समजतों!!

असा विचार करीत असतां व गोष्टी बोलत असतां आमच्या गाड्या उजाडण्याचे सुमारास ३० मैल चालून आत्मकूटला आल्या. आत्मकूट येथें सरकारी कचेरी आहे व यात्रेचें अन्नछत्रही आहे. यापुढें रस्त्याला बाजार नाहीं तेव्हां कांहीं मिळत नाहीं ह्मणून ज्याला फराळाचे पदार्थ केळीं दूध वगैरे घेणें असेल त्यांनीं ते येथेंच घेऊन ठेवावे. हा जाण्याचा दिवस बहुधा एकादशीच्या सुमाराचा असतो व पुष्कळ यात्रेकरूंस एकादशी असते. येथून दुसरे सडकेनें तीन मैल गेल्यावर एक मोठा तलाव लागतो, तेथें सडक सोडून रस्ता शेतांतून जातो. याठिकाणीं गाड्या दुपारीं ११ वाजतां आल्यावर पोलिसांनीं पुन्हा त्या बंद केल्या. दहा वाजेपर्यंत जितक्या गाड्या येतील त्यांचीच रवानगी दहा वाजतां करितात व पुढच्या गाड्यांची रवानगी एक वाजतां करितात. आह्मी उतरलों होतों तो तलाव फार मोठा असून पाणीही गढूळच होतें; तरी त्यांत कोणासही स्नान करूं दिलें नाहीं, मग कपडा तरी कसा धुणार? तरी लोकांनीं बाहेर पाणी काढून स्नान, भोजन व फराळ केला तों एक वाजला व लगेच गाड्या जोडल्या. आमच्या गाडया १०।१२ होत्या, त्यांत एक वाजेपर्यंत आणखी ४।५ मिळून सुमारें २० झाल्या. यांचे मदतीस सहा सशस्त्र पोलीस होते. दोन पुढें, दोन मध्यें व दोन शेवटीं अशा बंदोबस्तानें आम्ही हा शेतांतून जाणारा आडरस्ता ६ मैल गेलों व पुढें एक मैल केवळ पहाडी रस्ता लागला. त्यांत मात्र आदळआपटीमुळें एकमेकांचीं डोकीं फुटण्याची वेळ आली होती व हा रस्ता केव्हां संपतो असें झालें होतें. शेवटीं दोनच्या सुमारास आम्हीं

डोंगराच्या पायथ्याशीं म्हणजे नागलोटीचे ठिकाणीं एकदांचे येऊन पोंचलों.

नागलोटीचें ठिकाण जवळ येत चाललें तसें पोलिसांनीं गाडी-वानांपासून पोस्त उपटण्यास आरंभ केला. पोस्त काय? गाडीमागें आणा दोन आणे किंवा चार आणे होते, त्याला कोणी नाहीं म्हणत नसे. मी पोलिसांना विचारलें तुमचे डाकू लोक कोठें दिसले नाहींत ते? तेव्हां ते म्हणाले ते लोक तसे दृष्टीस पडावयाचे नाहींत. झाड-झुडपांत दबून बसलेले असतात व संधी मिळतांच बहिरी ससाण्या-प्रमाणें त्यांचा एकदम छापा येतो आणि मारून लुटालूट करून तुमची जमवाजमव होत आहे इतक्यांत ते चोहोंकडे नाहींसेही होतात, असा त्यांचा गनिमी कावा आहे! यामुळें त्यांचा हल्ला अपरिहार्य आहे. परमेश्वर कृपेनें हा सुखसोहळा तुमच्या नशीबीं आला नाहीं हें भाग्य समजा! नागलोटी येथें त्यांचा नमुना पहावयास मिळाला. येथें जंगल ऑफिसरांची कचेरी आहे. जंगलाचें रक्षण करण्याकरितां व डाकूंवर दाब बसण्याकरितां त्यांचेपैकींच हे कांहीं नौकर ठेविले होते. हे लोक आपल्याकडील कातकऱ्यांसारखेच दिसले पण त्यांपेक्षां हे जरा रांकट, डोळे विशेष पाणिदार, शरीर कमावलेलें, पिळदार, सुटसुटीत व बांधेसूद असून रंग अत्यंत काळा पण तेजस्वी होता. यांच्या मुद्रेवरून हे लोक अत्यंत प्रामाणिक, जिवाला जीव देणारे, निधड्या छातीचे व कर्तृत्वसंपन्न असावे असें दिसलें आणि असा त्यांचा इतिहासही आहे. असले लोक वश झाले व त्यांस अलिकडील युद्धकला शिकवून नवी शस्त्रें दिलीं, तर हे सर्व हिंदुस्थानच काय सर्व जग सुद्धां पादाक्रांत करितील हें काय सांगावें! याचा अनुभव प्रत्यक्ष शिवाजी महाराजांनीं करून दिलाच आहे. इंग्रजी होण्यापूर्वीं सर्व हिंदुस्थानवासीयांचे हे अमोल गुण प्रख्यात होते. आतां इंग्रजांनीं आह्मांला सुशिक्षित केलें ह्मणजे

काय केलें हें आपण प्रत्यक्ष पाहातच आहों. 'शत्रुबुद्धि विनाशाय' ह्मणजे शत्रूची बुद्धि चांगली दिसली तरी ती घेऊं नये ह्मणतात तें हेंच. ज्या अमृतमय गुणांनीं स्वदेशांत राज्य स्थापतां येऊन तें वृद्धिंगत करतां आलें, तेच गुण परराष्ट्राचा वारा लागतांच विषमय होऊन पोटाकरितां चोऱ्यामाऱ्या करावयास लावून त्यांच्या नाशास कारणीभूत झाले आहेत हा दैवदुर्विपाक आहे. हल्लीं त्यांच्याकडे पाहून त्यांचा माणशीं आणा दोन आणे कर कोणासही देऊं नये असें वाटतच नाहीं. सर्व लोक आनंदानें देत. हा कर फक्त जातांनाच असे परत येतांना नसे ह्मणून त्याचें कांहींच वाटत नसे. हा कर ते जमवून वाटून घेत ह्मणजे दुधाची तहान ताकावर भागवीत!

नागलोटीस वीरभद्राचें पुरातन चिरेबंदी देवालय आहे. जत्रेकरितां शिधासामानाचीं व मेवामिठाईचीं मिळून १५।२० दुकानें व पोलिस स्टेशन आलें होतें. हा सर्व मुक्काम उघड्या मोठ्या मैदानावर होता, त्यांत आलेल्या गाड्यांचा अड्डा व वर श्रीशैल्यास जाण्याकरितां घोडीं, गाढवें, डोलीवाले, ओझींवाले यांची येथें गर्दीच होती. येथें सर्वांत महत्वाची सोय ह्मणजे एक बांधीव पाण्याचें कुंड असून त्यांत मनगटाएवढी पाण्याची धार गायमुखांतून सतत वाहत होती. नंद्याळला मात्र नदी होती पण नंद्याळ सोडल्यापासून असें सुंदर पाणी कोठेंच दृष्टीस पडलें नाहीं. ह्या पाण्याचें रक्षण रात्रंदिवस पोलीस ठेवून उत्तम प्रकारें केलें होतें व येथें घाण करूं नये ह्मणून द्राविडी भाषेंत जिकडे तिकडे पाट्या लावल्या होत्या. देवस्थान कमेटीनें यात्रेकरूंकरितां येथें मूळच्या पडक्या चिरेबंदी धर्मशाळा होत्या तरी कशा तरी शाकारणीच्या पाच पंचवीस मांडवाच्या दोन रांका रस्त्याच्या दोन बाजूंस केल्या होत्या व ठिकठिकाणीं किटसनचे मोठमोठे ८।१० दिवेही लावले होते. मध्यें थंडीच्या निवारणार्थ व लोकांच्या सोईकरितां रात्रभर जळणारी होळी पेटत असे. वस्त्रहीन यात्रेकरू तिच्चे भोवतीं

निजत व शेकत बसत. सकाळ संध्याकाळ लोकांचा झाडाखालीं चुली पेटून स्वयंपाक चाले. यात्रा हजारों आली होती, त्यांना धर्मशाळा किंवा मांडव कसे पुरणार? सर्व पुरुष, बायका, मुलें भेदाभेद न पाहातां रानोमाळ वावरत होतीं व सर्व जंगल आपलें घर समजून निजत होतीं. सर्वांच्या मनांत विश्वबंधुत्वाची भावना जागृत होऊन सर्व लोक समरस झाले होते व काम, क्रोध, लोभ इत्यादि इहलोकच्या दुर्गुणांचा त्याग करून स्वर्गीय सुख अनुभवीत होते, त्यावेळीं हें नंदनवनच दिसलें. हें सर्व ठीक होतें. पण प्रातर्विधीच्या वेळीं मात्र मनुष्य योनीपलीकडील पशुयोनीचा देखावा दृष्टीस पडे व अत्यंत किळस वाटे. जेथें जागा स्वच्छ करून अन्नपानादि व्यवहार करावयाचे त्याच ठिकाणीं मनुष्यत्वास न शोभणारे उत्सर्जनविधि करून मनुष्यत्वास न शोभणारें कृत्य करून आपल्या अपकीर्तीचा झेंडा दुर्गंधयुक्त ठेवावयाचा याला काय म्हणावें? एक मंडळी उठून गेली म्हणजे पुन्हां मुक्कामाला जी मंडळी येई तिला हा सर्व देखावा दृष्टीस पडे! मग पुन्हां तीच जागा साफ करून व शुद्ध करून तेथें अन्नपाण्याचे व इतर पवित्र व्यवहार सुरू करावयाचे! कारण उपाय नाहीं. पाण्यापासून फार लांब किती बिऱ्हाड न्यावयाचें! हे विधि करणारे तरी पाण्यापासून लांब जातच नसत!

येथून पुढें पहाडी प्रवासास आरंभ होतो. पहिला मुक्काम दाहा मैलांचा आहे, पैकीं दोन मैल चढाव व पुढें आठ मैल अगदीं सपाट जंगलांतून रस्ता आहे. इतकी रुंद डोंगर सपाटी क्वचित् आढळेल. पहिले दोन मैल चढाव असेपर्यंत मोठमोठ्या गुळगुळीत पत्र्या दगडांच्या प्रशस्त पायऱ्या केल्या आहेत. ठिकठिकाणीं कमानी करून जुन्या पद्धतीच्या देवड्याही बांधिल्या आहेत. पुढें डोंगरावर बांधीव रस्ता नसून माळ रस्ता आहे. यात्रा सकाळपासून संध्याकाळीं

चार वाजेपर्यंत जात असते. यात्रा जाऊं लागतांना आरंभी भिल्लांची जकात आहे. या वाटेनें माणसें, जनावरें, घोडीं, गाढवें, डोल्या, ओझीवाले, सुपें, टोपल्या, करंड्यावाले यांची एकच गर्दी असते. वाटेंत सर्वत्र ऊन असल्यामुळें उन्हांतून प्रवास करावाच लागतो कारण जंगल नाहीं व भिल्लांच्या धास्तीनें रात्रीं प्रवास करूं देत नाहींत ह्मणून उन्हांतून जावें लागतें. त्यांत हा रस्ता चढणीचा, वाटेंत पाणी नाहीं, लोकांची गर्दी, त्यांत दगड गुळगुळीत यामुळें माणसांचे व जनावरांचे पाय घसरतात, ह्या सर्व अडचणी लक्षांत घेऊन जपून चालावें लागतें. असा हा त्रासाचा रस्ता चार तासांचा आहे, यामुळें नागलोटीहून सायंकाळीं चारनंतर कोणालाही घाट चढूं देत नाहींत. अगदीं थकलेल्या भागलेल्याकरितां मध्यें पांच मैलांवर एक पोलिस स्टेशन ठेविलें आहे पण त्याचा उपयोग सहसा करूं देत नाहींत. या रस्त्यांतसुद्धां पोलिसांची जाण्यायेण्याची गस्त सुरू असते, यामुळें यात्रेंतील थकलेले भागलेले यांना प्रसंगीं मदत होऊन भिल्लांवर दरारा राहतो. नागलोटीपासून मल्लिकार्जुनापर्यंत ३१ मैलांमध्यें भिल्लांचे चाळीस गांव आहेत. पण ते ह्या यात्रेच्या रस्त्याला लागून नाहींत, आड वाटेवर आहेत. जंगल उंच झाडांचें नसून खुरटें आहे. त्यांत विशेषेंकरून कळक, बांबू यांचाच भरणा विशेष आहे, यामुळें यांच्या घर्षणानें नेहमीं वणवे जळत असतात. किंवा जंगल नाहींसें व्हावें ह्मणून कोणी आग लावीतही असतील! याशिवाय या जंगलांत फार मोठमोठीं ह्मणजे पुरुष दीड दीड पुरुष मुग्यांचीं वारूळें आढळतात. अशीं वारुळें आजपर्यंत मीं कोठेंही पाहिलीं नाहींत. या पहाडी प्रवासांत ज्यांना आपलें सर्व ओझें जास्त मजुरी पडत असल्यामुळें वर नेववत नाहीं ते आपलें जास्त ओझें नागलोटी येथें पोलिसच्या स्वाधीन सीलबंद करून किंवा नीट बंदोबस्तानें ठेवितात. त्याबद्दल पोलिसांस कांहीं द्यावें लागतें व तें बरोबरही आहे.

हा डोंगर पश्चिमाभिमुख असल्यामुळें हा प्रवास संध्याकाळीं दोन पासून सुरू करावा ह्मणजे संध्याकाळीं ७ वाजेपर्यंत मध्यें मध्यें विश्रांति घेत सुखानें होतो व ऊनही समोरचें नसतें. शिवाय दुसरा प्रवास सुरू करण्यापूर्वी रात्रभर विश्रांति मिळते. सकाळचा प्रवास करावयाचा असल्यास पाहाटेपासून सुरू करावा, पण पेचरबु ह्या मधल्या मुक्कामाला सावलीची चांगलीशी जागा नाहीं यामुळें फार त्रास होतो. एका यात्रेकरूबरोबर एक वयातीत गृहस्थ होता व तो यात्रेकरूही अशक्तच होता. मी त्यास सांगितलें कीं, तुह्मी दोघां मिळून एक डोली करा ह्मणजे जो थकेल त्यानें डोलींत बसावें, पण त्यानीं ती गोष्ट पैशाचे टंचाईमुळें नाकारली. पण पाहिले चढावाचे ३ मैल गेल्यावरच त्या गृहस्थाचा पाय चालेना आणि सूर्यास्त तर झाला. यात्रा येईनाशी झाली तेव्हां ते घाबरले पण परमेश्वरच्या कृपेनें त्यांना परत जाणारी डोली भेटली ती त्यांनीं अखेरीस केली ह्मणून ते रात्रीं दाहा वाजतां तरी ठरीव मुक्कामाला पोचले! नाहींतर त्यांच्यावर हा बिकट प्रसंग होता. सबब वृद्धांनीं पायीं चालण्याच्या धमकेचा वृथाभिमान धरून आपल्याबरोबर दुसऱ्याला संकटांत पाडूं नये. हे उन्हातान्हांतून आपल्या हिंमतीनें दोन मैलांचा खरा चढाव चार तासांत चढून गेलें पण पुढच्या सपाटीच्या सुखाच्या प्रवासाकरितां त्यांना व्यर्थ दंड पडायचा तो पडलाच! सबब वृद्धांनीं पूर्वींच्या कर्तृत्वाची घमेंड मारूं नये व दुसरे सांगतील त्याप्रमाणें ऐकावें. हा प्रवास संपला ह्मणजे

## पेचरबू

हें मुक्कामाचें ठिकाण लागतें. खुद्द गांवचें ठिकाण निराळें आहे आणि यात्रेकरूंकरितां जागा निराळी करून ठेविलेली असते. सरकारी जंगलच्या आफीसरांचे बंगले जवळच निराळे असतात. यात्रेकरूंचा कोणाशींही संबंध नाहीं. येथेंही देवस्थान कमेटीकडून

यात्रेकरूंच्या सोईकरितां सर्वत्र जागा साफ करून, तात्पुरते त्या मैदानी तळाभोंवतीं ५०।६० मांडव घातले होते. त्यांत सुद्धां सर्व यात्रेचा समावेश होत नाहीं. जागा सर्वत्र साफ असते, किटसनचे दिवे रात्रभर लावले असतात, होळ्या पेटवल्या असतात, पोलिस स्टेशन असतें, ब्राह्मणाकरितां एक दोन अन्नछत्रें असतात यामुळें यात्रा रानोमाळ पसरलेली असते. सर्व ठीक आहे पण पाणी मात्र फार लांब आहे त्यामुळें येथें घाण नाहीं हा एक मोठा फायदा झाला आहे. कारण पाण्याजवळच चुली करून स्वयंपाक करावयाचा व जातां वेळीं त्याचे जवळच मलोत्सर्ग करावयाचा हें अती वाईट आहे, पण येथें जागा ऐसपैस व मुबलक मैदान आहे यामुळें अड्या-जवळ घाण नसते. जवळ पाण्याचा एक लहान तलाव आहे पण त्याचें पाणी फार वाईट आहे. तेथून लांब अर्ध्या मैलावर विहीर आहे तिचे पाणी मात्र चांगलें आहे. येथें झाडी नाहीं यामुळें दुपारीं मुक्काम ठेवणें गैरसोईचें आहे. सायंकाळच्या मुक्कामाची मात्र मजा आहे. एखाद्या सैन्याच्या तळाच्या छावणीप्रमाणें हा देखावा भव्य दिसतो. या यात्रेकरितां सुमारें ४।५ एकर तरी जमीन लागली असेल. काय मजा आहे पहा. संध्याकाळपर्यंत तीन चार हजार माणूस येतें व सकाळला एकही रहात नाहीं. मंडळी आली ह्मणजे एखाद्या भर-भराटीच्या बाजाराचा देखावा दिसतो व मंडळी गेली ह्मणजे सर्व जागा शून्य स्मशानवत् भयाण दिसते. मनुष्याशिवाय शोभा कसली? दहा वाजेपर्यंत कोण आला कोण नाहीं, प्रवास कसा झाला याचेविषयीं सुख:दुखाचे हालहवाल विचारण्यांत वेळ जातो. पहाटे लोक उठून कोणी भजन करितात, कोणी शौचविधी करितात, कोणी जाण्याची तयारी करितात; असें करून दिसूं लागण्यापूर्वीं कंदील लावून लोक चालूं लाग-तात. या ठिकाणीं सुद्धां जातांना कोळ्यांचा दोन दोन आणे कर आहे. येथून पुढचा पल्ला १२ मैलांचा असून रस्ता हिमालयासारखा चढ

उताराचा आहे. हिमालयाची सडक लहान व बारीक तशी येथील मात्र नाहीं. चढणी उतरणीचे ठिकाणीं येथें उत्तम पुरातन गुळगुळीत दगडी पायऱ्यांच्या सडका केल्या आहेत. आज हजारों वर्षे झालीं तरी त्यांची अद्याप रिपेर नाहीं. कांहीं ठिकाणीं आतां डोंगर कोसळल्यामुळें तेथील शिळा कोसळल्या आहेत, पण असा रस्ता थोडा आहे. या पुढच्या रस्त्यांत बांबूंचा किंवा वारूळांचा संबंध नाहीं. जंगल आहे पण अगदीं विरळ आहे. निवळ डोंगरांची चढ उतरण आहे. या डोंगरांत मध्यें मध्यें मोडकीं तोडकीं शिवस्थानें नंदी वगैरे आढळतात. या वाटेंतील चढाव फार मोठे नाहींत. एक

## भीमंतोळा

येथील चढाव मात्र खड्या चढउताराचा व फार मोठाही आहे. याचे खोऱ्यांत उतरलें ह्मणजे मागील व पुढील पर्वताची भयंकर भिंत दिसते. इतकी लांब व एकदम खोल दरी क्वचित् आढळते. व ही मात्र हिमालयाच्या सदृश आहे. ह्या दरींत अर्थात एक ओढा आहे पण त्यांत ह्मणण्यासारखें पाणी नाहीं; कांहीं डबकीं आहेत पण तीं सांचवणीचीं असल्यामुळें लवकर खराब होतात. ह्या सर्व पर्वतावर दगड हिमालयासारखा पत्र्याचा आहे. या रस्त्याला विशेष सृष्टिसौंदर्य, जंगल, थंडी, बर्फ, पाणलोट वगैरे असतें तर मात्र

**दुजें कैलास भुवन। श्रीशैल्य मल्लिकार्जुन।**
**वाचे स्मरतां धन्यधन्य। अनुपम्य क्षेत्र हें ॥**

ही नरहरी कविची उक्ति सार्थ झाली असती. ही यात्रा शिवरात्रीला जाते व तो शिशिर ऋतु असल्यामुळें वनशोभेऐवजीं सर्व वृक्ष गलितपर्ण झाल्यामुळें जिकडे तिकडे उदासीनता मात्र दिसते. पुढें वसंत ऋतु आल्यावर चैत्री पौर्णिमेस मात्र येथील वनशोभा सुरेख दिसत असेल. पण ह्या रानामध्यें सुद्धां वड, पिंपळ यांसारखे मोठ मोठे

वृक्ष मुळींच नाहींत, आंबा, जांभूळ, चिंच, उंबर यांसारखे फलदायी वृक्ष नाहींत, तसेंच कुसरी किंवा रानटी सुवासीक किंवा सुंदर रंगाची फुलें नाहींत. कसलींच फुलें नाहींत! हें खोरें चढतांना अगदीं नाकीं नव येतात. उन्हाची वेळ येत असल्यामुळें हे श्रम विशेष जाणवतात. ह्या भीमंतोळ्याच्या अत्युच्य शिखरास कैलास पर्वत ह्मणतात. याच्या शिखरावरून श्रीमल्लिकार्जुनाचे देवळाचे कळसाचें दर्शन घेणें मोठें पुण्यकारक आहे. हा पेचरबूपासून दहा मैल आहे व तो चढून गेल्यावर पुढें तीन मैलांवर श्रीशैल्य पर्वत आहे व त्यावर श्रीमल्लिकार्जुनाचें स्थान आहे. पुढचा रस्ता सुद्धां असाच चढ उताराचा आहे. जसजसे आपण देवळाजवळ जावें तसतशीं मोडकीं तोडकीं दगडी शिवालयें फार आढळतात. हल्लीं तीं विश्रांतीचीं स्थानें बनलीं आहेत. असा रस्ता बसत बसत क्रमल्यावर साडेदहाच्या सुमारास

## श्रीमल्लिकार्जुन

मंदिराचें एकदांचें दर्शन झालें व जिवाचा संतोष झाला. हे दोन्ही डोंगरी प्रवास लांबलचक असून मध्यें पाणी नाहीं ह्मणून या प्रवासांत यात्रेकरू पाण्याचा तांब्या किंवा चंबू बरोबर घेऊन पाणी पीत पीत, बसत बसत, देवाचें नांव घेत, उन्हातान्हांतून कसा तरी हा प्रवास करितात. ही यात्रा इतक्या त्रासाची आहे पण आंधळ्या पांगळ्यांनीं कांहीं हिला सोडिली नाहीं! भीमंतोळ्यापासून लवकरच पुढें आंधळे, पांगळे, गोसावी व बैरागी यांच्या ठराविक बैठका रस्त्याचे बाजूस दृष्टीस पडतात. व यावरून आतां लवकरच देऊळ दिसेल असें वाटतें. पण एक डोंगर गेला, दुसरा गेला तरी दर्शन नाहीं. ऊन फार होतें यामुळें जीव कासावीस होतो. त्या गरिबांचे केविलवाणे शब्द ऐकून दया उत्पन्न व्हावयाची त्याचे ऐवजी राग

मात्र उत्पन्न होतो, कारण यांचें सर्व करणें खोटें असतें. खरें एकपट असल्यास दहापट कींव येण्यासारखें भासवितात. शिवाय यांच्यांत प्रामाणिकपणाचा पूर्ण अभाव असतो. 'उदर निमित्तं बहुकृत वेषः' साधेल त्या रीतीनें भोंदूपणा दाखवून किंवा सवड साधल्यास चोऱ्या करून हे आपला तळीराम गार करितात. सर्वजण पूर्ण निरोगी, सशक्त व धटिंगण असतात आणि आज तीन दिवसांत अन्न मिळालें नाहीं असें चक्क सांगतात, तें कोणास कसें खरें वाटेल! गूळ असला म्हणजे मुंग्यांस आमंत्रण करावें लागत नाहीं, त्याप्रमाणें हे आंधळे, पांगळे व लंगडे आपल्या विकल शरीराची सबब पुढें न करितां यात्रा डोंगरावर, पर्वतावर कोठेंही असो, यांची तयारी सर्वांच्या आधीं व हे टाईमशीर बिनचूक तेथें हजर असतात. हे कसे येतात व कसे जातात हें त्याचें त्यांनाच ठाऊक!! आम्ही चांगले धडधाकट असून अशा यात्रा आम्हाला त्रासाच्या वाटतात पण त्यांना ह्या पर्वण्याच वाटतात! यांना कामधंदा करावयास सांगितला म्हणजे आम्ही तर विकलांग, आम्ही काय करणार? ही त्यांची सबब पुढें आहेच! पण भीक मागण्यांत व लोकांस बुचाडण्यांत यांचा नंबर पहिला!

देवळाजवळ गेल्यावर तेथें त्याच्या कोटाबाहेर देवस्थान कमेटीनें घातलेल्या मांडवांत धान्य, मीठ, मिरची, घासलेटची दुकानें, भांडीं व दुसऱ्या प्रासादिक वस्तूंचीं व मेवा मिठाईचीं दुकानें दिसलीं. तरी पण यात्रेचे मानानें दुकानें फार कमी होतीं. कारण केवळ २।३ दिवसांकरितां २५।३० मैल चढावावर सामान केवळ जास्त विक्री होईल या आशेनें नेणें जोखमाचें खरें. तरी पण यात्रेच्या वेळीं लहान लहान नाटकें करणाऱ्या मंडळ्यांपैकीं एक मंडळी येथें आली असून त्यांचीं तेलगू भाषेचीं नाटकें सुरू होतीं. घोडे, पाळणे मात्र कोठें दिसले नाहींत. मी इकडे फारसें लक्ष न देतां महाद्वारानें आंत गेलों. महाद्वारावरच चांगलें प्रशस्त गोपुर आहे. देवळाभोंवतीं फारच मोठा

असा ह्मणजे तीस फूट रुंद व चाळीस फूट उंच असा धनत्तर कोट आहे व त्याच्या चारी बाजूला चार प्रशस्त गोपुरें आहेत. प्रयेक गोपुराचे दरवाजे अद्यापपर्यंत शाबूत असून अंबारीसुद्धां हत्ती आंत सहज जाईल एवढाले ते मोठे आहेत. आंतल्या आवारांत नंदी, पार्वती, शंकर, विष्णु यांचीं ४१५ लहान लहान देवळें आहेत. त्यांत दर्शनी नंदीचें देऊळ फारच मजबूत दगडी बांधलें असून आंत नंदीही पुरुषर उंचीचा असा बसलेला आहे. सभोंवतालच्या तटाला आंतून सर्वत्र खोल्या आहेत. आवारांत दोत तीन विहिरी व पुष्करण्या आहेत, त्या उघड्या नसून बंद आहेत. त्यांवर देवळासारखे घुमट बांधिले आहेत. त्यांतलें पाणी यात्रेचे वेळीं रक्षण केलें जातें व फक्त पिण्यापुरता त्याचा उपयोग करितात. तटच्या बाहेर अशाच दोन तीन पुष्करणी व एक मोठा बांधीव तलाव आहे. हे सर्व यात्रेपूर्वी भरलेले असतात पण महायात्रेचे पुढें त्यांचा मुळींच टिकाव लागत नाहीं.

मी गेलों तो दिवस शिवरात्रीचे अलीकडचा होता. गेल्या बरोबर धूळ भेट घेण्याचे इराद्यानें दर्शनास जाऊं लागलों तर दर्शनास मज्जाव! शिपायानें सांगितलें कीं, दर्शनाचा सव्वा रुपयाचा पास काढा तर दर्शन, नाहीं तर नाहीं. तेव्हां सव्वा रुपया देऊन पास घेतला व दर्शन घेतलें. ह्या पास देण्यांत लबाडी होऊं नये व देवळांत पासाशिवाय कोणी जाऊं नये ह्मणून तेथें रखवालदार मुद्दाम मुलमान ठेविले आहेत. तसेंच गर्दी फार म्हणून पास देण्याच्याही दोन जागा केल्या होत्या. मी गेलों तेव्हां गर्दी होतीच. देऊळ दगडी व पूर्ण मजबूद असून अजून तें सुस्थितींत आहे. शिवाची पिंडी व साळुंका काय लहानशीच होती. नाहींतरी शंकराचे पिंडींत पहाण्यासारखें काय असणार? दागदागिने, शोभा वगैरे कांहीं नाहीं. पण तिचे दर्शनानें, दर्शनास गेलेल्या लोकांस आपल्या येण्याचेंचसें काय पण आपण ह्या दर्शनानें कृतकृत्य झालों

असें त्यांच्या चेहऱ्यावरून दिसत होतें. अशी भावना नसती तर लोक दर्शनास आलेच नसते. देव कसा आहे अशी बाहेरील भाविक मंडळी विचारतात व त्यांस तें तसें सांगितलें तरी त्यांचे दर्शनाची इच्छा लवमात्र कमी न होतां आपण केंव्हां दर्शन घेऊं असें त्यांस वाटे व अहमहमिकेनें लोक दर्शनाचीं तिकिटें घेत व देवळांत दर्शनाकरितां धक्कया बुक्कया खात व शिपायाचे चाबूक सोशीत! ते एकदां दर्शन घेऊन येत तरी सुद्धां दर्शनाची योग्य वेळ येतांच पुन्हा दर्शनाची इच्छा त्यांस होईच आणि हीच भाविकपणाची कमाल आहे. असें दर्शन झालें असतां मनाची शांति होते व जिवाचें सार्थक झाल्यासारखें वाटतें व ह्यालाच तीर्थाचें स्थानमहात्म्य व धर्मरहस्य म्हणतात. प्रेम किंवा भक्ति यांची तुलना कायदा किंवा न्याय यांच्याशीं करितां कामा नये. कारण हीं दोन परिमेयें अगदीं भिन्न आहेत. सख्खी आई मुलांना प्रेमानें वागविते पण सावत्र आई मुलांना कायदेशीर वागविते! स्वराज्यांत लोक प्रेमानें वागतात कारण राजा व प्रजा या उभयतांमध्यें प्रेम असतें. पण परराष्ट्र असलें ह्मणजे जिकडे तिकडे कायद्याचें साम्राज्य चालतें आणि हे कायदे आपलें साम्राज्य अविच्छिन्न चालावें, आपली सर्व प्रकारें परिपूर्णता व्हावी—मग त्यानें रयतेच्या हक्कांची कितीही पायमल्ली झाली तरी चालेल—या तत्वावर ते केलेले असतात! स्वराज्य व सुराज्य यामध्यें फरक काय तो हाच.

धूळ भेट घेतल्यावर स्नानाची व्यवस्था पहाण्यास गेलों तों एकानें पुष्करणीवजा एक डबकें दाखविलें आणि सांगितलें कीं खाण्यापिण्यास सुद्धां हेंच पाणी! आणि तें पाणी तर गाढवें जनावरें यांच्या मलमूत्र विसर्जनानें अत्यंत घाण झालेलें होतें!! त्यांत पायसुद्धां बुडविण्याची मला इच्छा होईना. पुढें तपास करितां दुसऱ्या २।४ ठिकाणीं चांगलें पाणी आहे पण तें पाणी कुंडांतून बाहेर काढून

स्नान करावें लागतें, आंत उतरूं देत नाहींत असें समजलें. हें उत्तम आहे व या करितांच बकेट अवश्य पाहिजे. त्याप्रमाणें मी स्नानसंध्या करून पुन्हा दर्शनास गेलों, पण पहारेकऱ्यानें सांगितलें कीं ह्या चिठीवरून दोनदां दर्शन होतें. तुम्ही आतां पुन्हा दर्शन घेतल्यास उद्यां शिवरात्रीस दर्शन होणार नाहीं व ही चिठी परत घेतली जाईल! मी विचारलें एकदां सव्वा रुपया भरला म्हणजे इतर ठिकाणाप्रमाणें येथें पाहिजे तितके वेळां दर्शन होत नाहीं काय ? तेव्हां तो ह्मणाला नाहीं. मला प्रथम हें विलक्षण वाटलें पण विचार केला तेव्हां त्याचें धोरण समजलें. नाहीं तर एकाच पासावर वाटेल तितके दर्शन करून येतील व उत्पन्न बुडेल! जो पास काढील तो प्रथम दर्शन घेणारच शिवाय शिवरात्रीला त्याला दर्शन पाहिजेच ह्मणजे त्याला दोनदां दर्शन पाहिजेच. ह्मणून दोहोंपेक्षां जास्त दर्शनें बंद केलीं!! हें फी लावून दर्शन महाशिवरात्रीचे रात्रीं पहाटे ४ वाजेपर्यंत असतें व यापुढें दर्शन फुकट असतें. कारण नवा दर्शन करणारा येथपर्यंत येतोच, कदाचित् राहिल्यास अशांची संख्या फारशी नसते. फार तर चुकलेमाकले-ल्यांची संख्या ५।१० असते व त्यांची पर्वणी निघून गेल्यामुळें त्यांना कर माफ. माझ्या तिकिटाच्या नंबरावरून यात्रा सुमारें पंधरा हजार पर्यंत जमत असावी असें दिसतें. एवढ्या सर्वांस एका दिवसांत दोनदां दर्शन करविण्यास किती मेहनत पडत असेल याची कल्पना वाच-कांनींच करावी. महाशिवरात्रीचे दिवशीं सकाळीं पाताळगंगेचें स्नान करून आल्यापासून आठ वाजल्यापासून दर्शनाचे नंबर लागतात ते रात्रीं बारावाजेपर्यंत अगदीं मोठ्या जिकिरीचें धक्कबुक्क्यांचें दर्शनाचें काम चाललें असतें. एकएक तासानें पहारेकरी बदलावे लागतात. प्रत्येक वेळीं १०।१५ माणसें सोडीत दर्शनापर्यंत जाण्याच्या अशा तीन चौक्या होत्या. दर्शनास येण्याचा मार्ग व जाण्याचा मार्ग मात्र निराळे केले होते. याशिवाय बायकांकरितां निराळी व्यवस्था

करण्यासारखी नव्हती. तशांत हा तेलंगण देश आहे येथें स्त्रियांनासुद्धां मर्यादा थोडी कमीच, त्या खुशाल पुरुषांचे गर्दींत शिरत!

## हा कर कोणाचा?

या संबंधानें चौकशी केली तर हा सरकारचा नसून हें देवस्थान ज्या शंकराचार्यांच्या ताब्यांत आहे त्यांचा आहे असें समजलें. या करांतून यात्रेकरूंकरितां श्रीशैल्य पर्वताचा सर्व रस्ता जंगल तोडून व गवत जाळून साफ करणें, ठिकठिकाणीं झोंपड्या बांधणें, देवळाची दुरुस्ती, रंग, सफेती, आंतील सर्व पटांगणें बेणणें व चौक्या, पहारे, गोपुरें साफसूफ करून ठेवणें वगैरे कामें केलीं जातात. शिवाय दिवाबत्ती, पोलीस, पाण्याची व्यवस्था, अन्नसत्रें, गाडी, चाकरमाणसें, या करितांही खर्च केला जातो. ह्या देवावर भक्ति मुख्यत: लिंगायतांची आहे यामुळें तेच लोक येथें जास्त येतात. याच यात्रेंत ते आपला सर्व तीर्थविधी ह्मणजे क्षौर, प्रायश्चित्त, तीर्थश्राद्ध वगैरे करितात. त्यांना दुसरें मोक्ष-तीर्थ नाहीं. हा वर्ग श्रीमंत, व्यापारीपेशाचा असून धार्मिकबुद्धीचा व वजनदार आहे. त्यांच्या मनांत कांहीं विशेष प्रयत्न करून ह्या देवळाची व्यवस्था आपले ताब्यांत घ्यावी असें येऊन त्यांनीं मद्रास सर-कारकडे यात्रेची अव्यवस्था व चुका दाखवून सर्व व्यवस्था आमचेकडून व्हावी ह्मणून अर्ज केला होता. परंतु शंकराचार्यांचा ताबा येथें फार प्राचीनकाळपासून असल्यामुळें सरकारमध्यें हें प्रकरण तसेंच पडून राहिलें आहे. स्मार्त शंकराचार्यांना लिंगाईत आपले धर्मगुरु मानीत नाहींत, तसे वीरवैष्णवही मानीत नाहींत. त्यांचे गुरु रामानुजाचार्य व वल्लभाचार्य निराळे आहेत. वीरशैव व वीरवैष्णव ह्यांचें हें केवळ भांडण नव्हे, तर धर्मसंबंधें हाडवैर आजकाल सुद्धां चाललें आहे! लिंगाईत हे सर्वांचा द्वेष करितात व आपणच सर्वांत श्रेष्ठ असें मानतात. वीरवैष्णवही त्याच प्रकारचे आहेत पण थोडे कमी आहेत.

स्मार्त व भागवत हे संप्रदाय मात्र सर्वांशीं समभावानें पूर्ण अद्वैतानें वागतात व ' शिवश्च हृदयं विष्णुः विष्णुश्च हृदयं शिवः ' हेंच त्यांचें ध्येय असतें.

शंकराचें देवालय जेथें जेथें असतें तेथें तेथें प्रायः पाण्याची सोय असते. त्याप्रमाणें येथेंही मागें सांगितल्याप्रमाणें आहे पण एवढ्या मोठ्या यात्रेपुढें त्याचा निभाव लागत नाहीं. कारण पाणी झऱ्याचें नसून साठींव आहे म्हणून पाण्याचा पुरवठा किती टिकणार? यात्रा जसजशी वाढते तसतसे पाण्याचे हाल होतात. पाणीच मिळत नाहीं पण त्यांतल्या त्यांत येथून खालीं तीन मैलांवर

## पाताळगंगा

असल्यामुळें महाशिवरात्रीस सर्व यात्रेस यथासांग गंगेचें स्नान होतें, नाहीं तर स्नानाशिवाय बहुतेकांस राहावें लागलें असतें! या यात्रेंत पाताळगंगेचें दर्शन अत्यंत रम्य व पुण्यकारक किंबहुना ह्या गंगेचें दर्शन व्हावें हाच या यात्रेचा मुख्य उद्देश दिसतो. कृष्णानदी पश्चिमघाटांत महाबळेश्वराजवळ उगम पावून पूर्वसमुद्रास म्हणजे बंगालचे उपसागरास मिळावयास गेली आहे. तिला वाटेंत पूर्वघाट ओलांडावा लागतो, त्या घाटांतला हा रम्य देखावा आहे. पश्चिमघाट म्हणजे सह्याद्री एकसलग किंवा अखंड आहे तसा पूर्वघाट नाहीं. त्याचे तुकडे तुकडे झाले आहेत यामुळेंच गोदावरी, कृष्णा, कावेरी ह्या महानद्यांना समुद्रास मिळण्यास वाटा मिळाल्या आहेत. त्यांत गोदावरीपेक्षां कृष्णानदी ह्या रुंद खोऱ्यांतून संथ वाहत असल्यामुळें येथें हा तिचा थाट गंगेप्रमाणें अपूर्व संथ दिसतो. तिच्या दोन्ही बाजूंस अत्यंत विशाळ व उंचच उंच कडे, त्यांमध्यें कृष्णेचें विस्तीर्ण व भयंकर पात्र व त्यांतील हिरवट काळसर पाण्याचा प्रवाह व त्यांत मंद मंद उसळणाऱ्या लाटा पाहून पाण्यासाठीं हपापलेल्या जीवांचें अत्यंत

समाधान होतें. व किती पाणी पिऊं, किं स्नान करूं, कीं फार गलिच्छ झालेले कपडे मनमुराद धुवूं, किं यथेच्छ पोहूं, किं नुसतें मनमुराद पाहतच राहूं, कीं करूं तरी काय, असें मनास वाटून चित्त क्षणभर गोंधळून जातें. फार काय सृष्टिदेवीनें आपल्या विलासार्थ हा पायऱ्यांचा रंगी बेरंगी गालिचा घातलेला रंगमहालच केला आहे असें वाटतें! कारण सूर्यकिरण पाण्याच्या तरंगावर निरनिराळ्या वेळीं पडले असतां निरनिराळ्या रंगाचे देखावे दृष्टीस पडतात.

महाशिवरात्रीस पहाटे चार वाजल्यापासून हातांत कंदील घेऊन बायका, मुलें, म्हातारीं, कोतारीं, डोलीवाले यांची गर्दी गंगेस जाण्यास चालू होते. देवळापासून मोठमोठ्या पायऱ्यांचा सारखा तीन मैल उतार होता. इतक्या रात्रीं मंडळी स्नानाला निघाली होती तरी त्यांच्यापूर्वी देवळापासून अगदीं नदीपर्यंत रस्त्यांच्या दोहों बाजूनीं आंधळ्या पांगळ्यांच्या बैठका होत्याच! यात्रा येतांच कोणाचीं गाणीं, भजनें चालू झालीं, कोणी साधु भस्माचे पट्टे लावून ध्यानस्थ बसले होते, कोणी उभे तपश्चर्या करीत होते, कोणी उलटें टांगून घेतलें होतें, कांहीं साधूंनीं आपलें डोकें जमीनींत गाडून कडकडीत तपश्चर्या चालविली होती! पण ही तपश्चर्या परमार्थाकरितां नसून स्वार्थाकरितां--पैशाकरितां—होती. 'उदरनिमित्तं बहुकृत वेशः' हाच त्या सर्वांचा उद्देश होता, कारण परमार्थाची ही जागाच नव्हे. पुढील यात्रेकरू निघून गेले म्हणजे त्यांचें ध्यान विसर्जन होऊन लगेच ते आपसांत बोलत, एकमेकांस शिव्या देत, भांडत, पण यात्रेकरू येतांच पुन्हा नाक धरून बसत! अशी मी त्यांची मजा पहात होतों. हे ढोंगी आदल्या दिवशीं येथें बसले असावे. त्यांना भय भीती कांहींच नाहीं. जिवंत भुतेंच तीं! त्यांना पाहून भुतेंसुद्धां पळतील इतके चित्रविचित्र त्यांचे चेहरे व आचार होते! यात्रेकरूही, कोणी भूपाळ्या म्हणत चालले होते, कोणी पहाटेचीं गाणीं म्हणत होते, कोणी प्रातः-

स्मरण चालविलें होतें, कोणाचें गंगाष्टक चाललें होतें, असा राम-पहारचा वेळ आनंदांत घालवीत असतां झाडावरचे पशुपक्षीही त्यांना मदत करीत असत. रस्ताही उताराचा होता त्यामुळें तो केव्हां संपला हें समजलेंच नाहीं! जसजशी गंगा जवळ आली तसतसें स्नान करून फिरलेले यात्रेकरूही दिसूं लागले. अशा रीतीनें मजा पहात पहात उजाडतांच आम्ही पाताळगंगेला आलों त्यावेळीं इतकी गरदी जमली होती कीं, मुंग्यासारखीं माणसें जमलेलीं होतीं. एवढें हजारों माणूस जमलें होतें तरी त्या खोऱ्याचा एक कोपराही भरला नव्हता इतकें तें खोरें विशाळ व भव्य आहे! कोणी कपडे धूत होते, कोणी संकल्पयुक्त स्नान करीत होते. भटांची तर संकल्प सांगण्यांत तारंबळ उडाली होती. कित्येक नुसत्या बुड्या मारीत होते पण पोहत लांब जात नसत. मीही बराच पुढें पोहोत गेलों पण फार पुढें न जातां मागें फिरलों. कारण डोहो अत्यंत मोठा व खोल असल्यामुळें आंत कासवें, मासे, सुसरी, अशा कितीतरी जलचर प्राण्यांचें तेथें साम्राज्य असेल हें सांगतां येत नाहीं. कितीक जलचर हा आतां लांब पोहत पाहत येईल व आपण त्याजवर झडप घालूं असें वाट पहात असतील वगैरे विचार करून मी पुढें न जातां मागें फिरलों. या यात्रेंत पोहणारे कोणी नसतील असें नाहीं पण पात्राचा विशालपणा पाहून त्यांची छाती होईना. एक दोन पुण्याचे पोहणारे होते तेच मजबरोबर आले होते, पण एकामागून एक आह्मी मागें परतलों. पग मनाला वाटे एक मोठी नाव घ्यावी व एक दोन दिवसांचें फराळाचें घ्यावें आणि रात्रंदिवस विहार करून दिवसारात्रींची येथील अपूर्व शोभा पाहून मनाचें समाधान करून घ्यावें. पण हे मनाचे मांडे मनींच ठेवावे लागले! श्रीसूर्यनारायणाचा ताप असह्य होत चालला व परत जातांना मोठा चढाव आहे ह्मणूनच लवकर निघा असें तो बजाऊं लागला, तेव्हां तो देखावा निरुपायानें सोडून जाणें भाग झालें. हें दर्शन अत्यंत रम्य

व पुण्यकारक असल्यामुळें यात्रेकरूंपैकीं कोणीही येथें गेल्याशिवाय रहात नाहीं. ज्यास सामर्थ्य नसेल तो डोली करून जातो पण सर्व यात्रा एकदां तरी गेल्याशिवाय रहातच नाहीं. त्यांत दिवस शिवरात्रीचा, ही त्यांत विशेष पर्वणी, मग काय विचारतां, एवढा मोठा रुंद पायऱ्यांचा रस्ता पण मनुष्यांना खेटल्याशिवाय जातां येत नव्हतें.

अशी मजा पाहून मी गंगेचा तांब्या भरून घेऊन परत फिरत असतां एक बाई मोठ्यानें रडत असलेली आढळली. कां तर तिची पन्नास रुपयांची गठडी गेली! तिनें ती पुरचुंडी कांठावर आपल्या कोरड्या लुगड्याजवळच पण कोणास सहसा न दिसेल अशी ठेविली होती. ती स्नान करीत असतां तिचें लक्ष एकसारखें त्या पुरचुंडीकडे होतें; अर्थात त्या पुरचुंडींत कांहीं तरी विशेष असलें पाहिजे असें कोणासही वाटेल. तें एका धूर्तानें पाहिलें होतें. तिनें बुडी मारली व पुन्हा पाहिलें तों पुरचुंडी नाहीं! नंतर तिनें पुष्कळ तपास केला, पोलिसास सांगितलें पण रडण्याशिवाय तिला कांहीं मिळालें नाहीं!! त्यापेक्षां तिनें ती एखादीचे स्वाधीन केली असती तर कांहीं बरें झालें असतें. पण लोकांच्या स्वाधीन केली तर चोरी होण्याचा (तो पळून जाण्याचा) विशेष संभव व आपल्याजवळ इतके पैसे आहेत असें लोकांस समजेल! त्यांत बायकांचा स्वभाव फार संशयी पण त्याचा परिणाम हा असा झाला! कधीं कधीं चोराजवळच गाठोडें द्यावें लागतें हें त्यांना समजत नाहीं.

दुसरी गोष्ट येथून गंगा घेऊन फिरत असतां एक दुर्दैवी बाई वाटेंत भेटली. बायका विधवा झाल्या ह्मणजे त्या बहुतेक स्वतंत्र होतात. परंतु त्यांचा स्त्रीधर्म जात नाहीं व तेवढ्या पुरतें त्यांस परस्वाधीन व्हावें लागतेंच. आणि तो स्त्रीधर्म अगदीं महत्वाच्या व अडचणीच्या प्रसंगीं त्यांच्या आड येतो! त्यांत त्यांचा निरुपाय आहे व कोणाचाही इलाज नसतो. हा स्त्रीधर्म ह्मणजे स्त्रियांचें महिन्याचें

अस्पृशत्व! हें शुभाशुभ प्रसंगीं ज्यावेळीं स्त्रियांची विशेष जरूर असेल किंवा त्यांचें अगदीं नडीचें काम असेल त्यावेळीं त्यांची अवेळ असली तरी त्यांस बहुतेक अडवतेंच असा सर्वत्र अनुभव आहे. तोच अनुभव त्या बाईस यावेळीं येऊन ती अगदीं खिन्न झाली. इतके जवळ येऊन आपण ह्या गंगा स्नानास कायमचे अंतरलों, कारण आपले तीन दिवस भरताहेत तोंपर्यंत यात्रा कशी राहाणार? ही बाई गंगेचे अगदीं जवळ आली आणि अस्पृश्य झाली तेव्हांच तिचे हात पाय मोडले व ती नाउमेद झाली. मग तिनें क्षणभर लोकांची मजा पाहिली, गंगेची अवर्णनीय शोभा पाहिली व नमस्कारही न करितां परत फिरली, कारण तिला नमस्कार सुद्धां वर्जच आहे. ती स्वत: अस्पृश्य झाली ह्मणून कोणाला शिवावयाचें नाहीं असें तिनें किती जरी मनांत आणलें तरी या विलक्षण गर्दींत सर्व रस्ताभर माणसांना खेटल्याशिवाय कसें निभणार? ह्मणजे पुण्य मिळविण्याकरितां गेली तों अशा रीतीनें तिचे पदरांत पापाचे घडे पडले कारण तिचे प्रत्यक्ष स्पर्शास्पर्शानें शुचिर्भूत झालेली सर्व यात्रा बाटली व तिनेंच शेवटीं शंकरालाही बाटविलें!! मला हें समजल्यावर मलाही वाईट वाटलें. तिनें हवी तेवढी आपल्या दैवाची व स्त्रीजातीची निंदा केली पण मग मी तिची समजूत घातली कीं गंगेचें दर्शनच खरें पुण्यकारक आहे. तुम्ही हा देखावा प्रत्यक्ष पाहिल्यामुळें तो तुमचे दृष्टीआड कधीं होणार नाहीं. स्नान हें मुख्य नव्हे कारण आतां आह्मीं वरतीं जाऊं तेव्हां अंगाला घामाच्या धारा लागून तें फुकट जाईल. शिवाय गंगा ह्मणून कोणी घरीं नेली व आपल्या स्नानाच्या पाण्यांत हीपैकीं कांहीं टाकून स्नान केलें तरी या देखाव्याची त्यास बरोबरी येईल काय? वगैरे थोडेंबहुत सांगितल्यावर तिचें थोडें समाधान झालें असें दिसलें. आज शिवरात्र असल्यामुळें जेवणाखाण्याचा फारसा लफडा नसल्यामुळें संध्याकाळपर्यंत यात्रा स्नानास जात येत होती. श्रीशैल्य

पर्वतावर सर्वत्र जंगल आहे खरें पण त्यांत बेलाचा किंवा आंब्याचा वृक्ष एकही नाहीं! महाशिवरात्रीस बेल व आंब्याचा मोहर हीं अवश्य पाहिजेत पण या ठिकाणीं त्यांचा पूर्ण अभाव होता. कसलीं तरी पानें व कसलीं तरी फुलें लोक देवाला वाहत होते. बाजारांतच या शिवाय दुसरीं फुलें नव्हतीं. बेल किंवा मोहोर लांब कोठें मिळता तर पैशाचे आशेनें लोकांनीं तो आणलाच असता, यावरून त्या जंगलांत नाहींच असें दिसतें.

आज शिवरात्र होती सबब देवळाचे आवारांत ठिकठिकाणीं कथा, भजन, पुराण चाललें होतें. एक साधु आधुनिक पद्धतीनें गोरक्षणावर व्याख्यान देत होता. समाज तेलंगी पण व्याख्यान हिंदुस्थानींत चाललें होतें. एक दुभाषा त्याच्या एक एक वाक्याचें तेलंगींत भाषांतर करून सांगे पण अशानें वाक्यें सुटीं सुटीं होत असल्यामुळें व्याख्यात्याचा जोर कमी होई व व्याख्यान कृत्रीम दिसे. तरीपण श्रोते अगदीं लक्षपूर्वक तें ऐकत आहेत असें दिसत होतें. एका ठिकाणीं एक गोसावी योगाचीं सर्व आसनें भराभर करीत होता कीं तज्ञसुद्धां तोंडांत बोट घालीत! मलासुद्धां त्याचीं मयूरासन, कुक्कुटासन हीं कठीण व कधीं पाहावयास न मिळणारीं अशीं शुद्ध आसनें येथें पहावयास मिळालीं. हा अलभ्य लाभ झाला तरी पण हीं आसनें कशाकरितां, परमार्थ साधनाकरितां नव्हेत! पुढें धोतर मांडलें होतेंच. केवळ दिडकी पैसा मिळविण्याकरितां हा खटाटोप होता. आसनें व प्राणायाम यांचा उद्देश चित्तवृत्ति–निरोध हा आहे पण याची चित्तवृत्ति बदललेली दिसली नाहीं. रात्रीं नऊ वाजून गेल्यावर मी देवळा सभोंवतालची शोभा पहाण्यास निघालों.

आज शिवरात्रीची रात्र होती. जिकडे तिकडे दिवे लावून लोकांचे थवेच्या थवे जमले होते, ठिकठिकाणीं किटसनचे मोठे दिवेही लावले होते आणि जो तो आंपल्या भाषेंत कोणी एकतारीवर, कोणी दुतारींत,

कोणी टाळ, मृदंग व डफऱ्या इत्यादि नानाप्रकारचे वाद्यांवर, आनंदानें व प्रेमानें देवाचें भजन करीत होते व देवाला आळवीत होते. तेथें सर्व प्रकारच्या द्राविडी भाषा श्री भवानीशंकराच्या देवदर्शनास व त्यांच्या लीला गाण्याकरितां आल्या होत्या. मीं कांहीं केलें नाहीं तरी सर्व ठिकाणचे मेळे व भजनें नुसतीं पाहून मला तीन तास पुरले नाहींत. मग ठिकाठिकाणीं त्यांचें विशेष कौतुक पहात उभा राहिलों असतों तर सर्व रात्र केव्हांच निघून गेली असती. पण तेलगू, कानडी, अरबी, मल्याळी वगैरे भाषांत मला काय समजणार! तरी पण भजनांच्या त्यांच्या आविर्भावावरून ते लाजलज्जा सोडून प्रेमानें नाचत, वाकड्या तिकड्या उड्या मारीत व माना डोलवीत, इत्यादि त्यांच्या लीलांवरून त्यांचें देवाविषयीं प्रेम किंवा भक्ति स्पष्ट दिसत होती. त्यांचा तो प्रेमळपणा पाहून आपणही त्यांच्याबरोबर तन्मय होण्याकरितां कांहीं समजत नाहीं तरी नाचावें, बागडावें असें वाटे! अशा रीतीनें ती सर्व रात्र लोकांनीं परमेश्वर भक्तींत घालविली. उजाडल्यावर मागें सांगितल्याप्रमाणें आह्मीं पाण्याच्या दुर्भिक्षामुळें जरा लांबच्या विहिरीवर गेलों व तेथें शौचविधीपासून सर्व तयारी केली. लोकांना येथें पाण्याचा सुगावा लागल्याबरोबर येथें हां हां ह्मणतां शें दोनशें मंडळी जमली व ज्या विहिरींत कंबरभर पाणी होतें तींत अखेर तांब्यासुद्धां बुडेना! पण कसें तरी एक वाजेपर्यंत आमचे शिवरात्रीच्या पारण्याचें काम संपून आह्मीं कळशी भरून घेऊन दोन वाजतां परत देवळांत वस्तीस आलों! यापुढें परत फिरावयाचें. निम्मेपेक्षां जास्त यात्रा परत फिरली पण आमची मंडळीं ह्मणाली आज उपास सोडला आहे आज विश्रांति करून पहाटे निघूं. पण सकाळीं ऊन घेऊन बिकट रस्त्यांतून चालणें व पेचरबूसारख्या नालायक ठिकाणीं उन्हाचा मुक्काम करून संध्याकाळीं समोरचें ऊन घेऊन नागलोटीस येणें मला आवडलें नाहीं. मी ताबडतोब निघालों

व संध्याकाळीं पेचरबूस मुक्काम करून सकाळीं नागलोटीस आलों. व मंडळी दुसरे दिवशीं ठरल्याप्रमाणें निघाली. त्यांची व आमची भेट फिरून नागलोटीस पडावयाची होती. त्यांची व माझी गाडी एकच असल्यामुळें त्यांच्याकरितां मला नागलोटीस मुक्काम करावा लागला. मी ठरविल्याप्रमाणें माझा प्रवास सुखावह झाला व मी एक दिवस नागलोटीस अगोदर आल्यामुळें मला फायदाच झाला. मला या ठिकाणची सर्व माहिती स्वस्थपणें मिळवितां आली.

मल्लिकार्जुनास मी ज्या दिवशीं गेलों त्या दिवशीं मला एका अन्नछत्रांत जाण्याचा प्रसंग आला. तेथील तैलंग ब्राह्मणाची जेवणाची रीत पाहून मला फार अचंबा वाटला. सोंवळें ओवळें नाहीं ह्मटलें तरी चालेल. पण एका तेलंगानें मोठ्या पत्रावळीभर भाताची रास घेतली व तिच्यावर ओंजळभर तांबडें तिखट पेरलें व त्यावर चिंचेचें आंबट दार सार ओतिलें व त्यावर अन्नशुद्धीकरितां नांवाला तुपाचा चमचा फिरवला. नंतर त्यानें तो सर्व भात कालवला तो अगदीं तांबडा लाल झाला! त्या भाताकडे माझ्यानें पाहावलें सुद्धां नाहीं, पण सदर गृहस्थ त्याचीं मुटकळीं करून खुशाल प्रेमानें खात होता. खातांना त्याच्या तोंडांतून हाय, हुश्श, हुश्श असें कांहीं येत नव्हतें! इतकेंच नव्हे तर तोंडी लावायला आणखी तिखट चटणी मागत होता!! त्याचें तें खाणें पाहून मला तर खरोखर अचंबा वाटला व अंगावर शाहारे आले. तें तिखट कमी तिखट असेल ह्मणून त्याची मी तपासणी केली पण तें आपल्यापेक्षां कोणतेही प्रकारें तिखटपणांत कमी नव्हतें. तेव्हां त्याचे आचरटपणाची खात्री झाली. अति गोड पदार्थ व कसेंही घाणेरें तूप खाणारे गुजराथी, अति आंबट खाणारे कानडी, अति तेलकट खाणारे नागपूरे, अति खारट खाणारे कोकणे, तसे अति तिखट खाणारे हे तेलंगे होत. हे सर्व आचरटच

आहेत, त्याचप्रमाणें त्यांचे आचार, स्वरूपें, शरीरें व विचारही असतात असें माझ्या अनुभवास आलें.

नागलोटीला आल्यावर मला तेथें एक महाराष्ट्र देशस्थ ब्राह्मण भेटले, ते पायानें अव्यंग होते. तैलंगणांत जाऊन त्यांच्या तीन पिढ्या झाल्या होत्या. अर्थात् त्यांचे आचार विचार तैलंगणांप्रमाणेंच झाले होते. ते माझ्याशीं मराठी बोलत व आपण मराठीचे प्रोफेसर आहों असें त्यांना वाटे. पण परक्या मनुष्याप्रमाणें त्यांचे लिंगभेद व उच्चार करण्याचे सूर अगदीं निराळे येत व त्यांचें हसूं येई. हे गृहस्थ म्याट्रिकपर्यंत इंग्रजी शिकून जंगलखात्यांत कारकून होते. त्यांची बायको वारल्यावर त्यांना संसाराची उपरती झाली. त्यांना दोन लहान मुलगे होते ते त्यांनीं आपल्या इस्टेटीसुद्धां त्यांच्या मामाच्या स्वाधीन केले व आपण परोपकारार्थ भिक्षापात्र घेऊन साधुसंतांची सेवा आरंभिली. या उद्देशास त्यांना एक विधवा कोमटीण बाईही मिळाली होती व तिलाही अशीच संसाराची उपरती झाली होती. यात्रा असली ह्मणजे तेथें साधुसंताचा ह्मणा किंवा भोंदूंचा ह्मणा मेळा यावयाचाच. अर्थात त्यांच्या सेवेला हें एक उत्तम स्थान त्यांना सांपडलें. ही दोघें जसजसा साधु असेल तसतशी त्याची सेवा त्याच्या इच्छेप्रमाणें करीत. ह्मणजे त्यांचे जटांना तेल उठणें, स्नानाला ऊन पाणी, ताजें व मनमुराद भोजन व दक्षणा भांग गांजा, यांची व्यवस्था स्वत: करीत. साधूंच्या जटांना स्वत: तेल लावावयाचें, त्या विंचरावयाच्या, रासन्हाण्याप्रमाणें किंवा दिवाळीच्या स्नानाप्रमाणें त्यांना पाहिजे तेवढें ऊन पाणी द्यावयाचें. बाई पाणी घाली व हे गृहस्थ स्वत: त्याचें आंग चोळीत व नंतर त्याचे ओले कपडे किंवा लंगोट्या स्वत: धुवून काढीत हें मी प्रत्यक्ष पाहिलें आहे. नंतर त्यांना गंध, पुष्प, अक्षता लावून त्यांच्या गळ्यांत पुष्पमाळा घालीत. नंतर जेवायचीं पानें मांडून ते बसले ह्मणजे त्यांना धूप दीप दाखवून त्यांची आरती करीत व

असलेल्या पदार्थांत यथेच्छ भोजन घालून त्यांचीं उष्टीं काढीत व नंतर त्यांना गांजा मिळे. अशा रीतीनें त्यांची जगांत कोठेंही अशी संभावना होणार नाहीं ती त्यांची येथें होत होती! सारांश दिवाळसणांत जावयाचें जें कौतुक होतें त्यासारखेंच जवळजवळ थोडें जास्तच त्यांचें कौतुक येथें होत होतें. कमी काय तें ह्याचें अन्न जाडेंभरडें आणि पदार्थ दोनच; भात व पातळभाजी, एखादी चटणी पण त्यांत प्रेमाची किंवा कौतुकाची लज्जत असल्यामुळें त्यांना तें उंची पक्वान्नापेक्षां सुद्धां मिष्ट लागे. कारण गोसावड्यांना इतक्या प्रेमानें कोण भिक्षा घालणार? कशी तरी कटकट काढावी ह्मणून लोक ती घालणार. त्यांत ताजें, शिजलेलें क्वचित् मिळावयाचें व मनमुराद किंवा पोटभर तर मिळणें मुष्किलच; अर्थात त्यांना ती दिवाळी कां वाटूं नये? असे साधू त्या यात्रेंतून आग्रहानें बोलावून बोलावून आणावयाचे. बोलावण्याकरितां एक दोन माणसेंहि नाक्या नाक्यावर ठेविलीं होतीं. असा प्रकार सकाळीं आठ वाजल्यापासून रात्रीं दहा वाजेपर्यंत चालावयाचा. त्यापुढें हीं दोघें पुन्हा स्नान करून शेषान्नाचें ग्रहण करीत. काय त्या अमृतमय अन्नाची गोडी सांगावी? यांत अमृतमय काय आहे अशी अलीकडील लोक पृच्छा करितील तर त्यांस हें भक्तिरसाच्या जिव्हाळ्या-शिवाय समजणार नाहीं. लहान मुलांचें कौतुक केल्यामुळें त्यांच्या आनंदानें होणाऱ्या आनंदाचें वर्णन कसें करितां येईल! हा सात्विक आनंद आहे त्याची ओळख सात्विक मनुष्याशिवाय पटणार नाहीं. मध्यें किंवा अवेळीं एखादा साधू आला तर त्याला शेषान्न द्यावयाचें, शेषान्न रहावें ह्मणून मुद्दाम जास्त करावयाचें व तें घेण्यास कोणी आला नाहीं तर भांडीं घांसणारास तें द्यावयाचें. अन्न शिल्लक नसल्यास पोहे, पीठ द्यावयाचें. कोणी शिधा, भांडीं लहान मोठीं मागितल्यास तीं विनतक्रार त्यांची विशेष चौकशी न करितां द्यावयाचीं! कोणी कांहीं कधींही मागावयास येवो, वस्तु असली ह्मणजे नाहीं

ह्मणावयाचें नाहीं असें त्यांचें ब्रीद होतें. मला असा पुरूष कोठेंही पहाण्यास मिळाला नाहीं. कितीही श्रीमंत असला तरी तो दिलेल्या भांड्यांविषयीं काळजी घेईलच, पण हा अगदीं निष्काळजी असे! पुराणामध्यें कर्ण व नळराजा यांच्या दातृत्वाविषयीं गोष्टी ऐकिल्या ह्मणजे हल्लींच्या काळीं त्या अशक्य असें वाटत असे पण त्यांच्या शक्यतेचें उदाहरण मला येथें प्रत्यक्ष पहावयास मिळालें व मन थक्क झालें! ज्या यात्रेंत किंवा व्यवहारांत मनुष्य सुतळीच्या तोड्यालाही पराकाष्टेचा जपतो त्या यात्रेंत यांची अशी दातृत्व शक्ति, मग ती अगदीं हलक्या वस्तूची कां होईना पण आश्चर्य नाहीं असें कोण ह्मणेल! धन्य त्यांची!!

यासंबंधें त्यांचें व माझें बरेंच बोलणें झालें कीं, हे गोसावडे फार लुच्चे, वाटमारे व यात्रेकरूंना उघड उघड लुटणारे, यांच्या ढोंगी-पणास तुमच्यासारखे सुशिक्षित कसे भुलतात? अशा लोकांस उत्तेजन देऊन जगांत ढोंगीपणा वाढविण्यास तुह्मी मदत करितां असें होत नाहीं का? आणि अशांवर उपकार करून किंवा त्यांची अशी महापूजा करून ते प्रसन्न काय होणार आणि तुम्हांला पुण्य तें काय मिळणार? सत्पात्रीं दान करावें, कुपात्रीं करूं नये; केल्यास दान देणाराचा पुण्यक्षय होतो हें शास्त्र तुम्हांस माहीत नाहीं काय? याचें उत्तर त्यानें फार प्रेमानें दिलें कीं, प्रत्येक गोष्टीस दोन बाजू असतात; एक बरी व दुसरी वाईट. आपण वाईट गोष्टीकडे लक्ष देऊं नये. सगळेच लोक वाईट असतात असें नाहीं. जेथें वाईट असतें तेथेंच चांगलें असतें, पण तें आपणास ओळखतां येत नाहीं. सबब त्याचे पूजेकरितां दहा इतर साधूंची पूजा केली तर त्यांत काय वाईट? ते कसे जरी असले तरी आपण त्यांची पूजा करितों असें मानूंच नये तर मी ही विश्वात्म्या विश्वेश्वराचीच पूजा करीत आहें अशी भावना ठेवावी ह्मणजे झालें. आपलें संचित सरलें असलें तर यांतच एखादा सत्पुरूष सांपडून आपला उद्धार होईल. तो पुरुष तुमच्या आमच्यांत

मात्र सांपडणार नाहीं. साधूंनीं किती जरी चांगले किंवा वाईट आशीर्वाद दिले तरी आपल्या बऱ्यावाईट कृत्याचें फळ परमेश्वर देईलच. हा त्याच्यावर भार होतो सबब त्याची काळजी त्याला आहेच. आपण बेफिकीर वागावें. हा सर्व त्याचा दरबार असून त्या दरबारांतील हे मुख्य मानकरी आहेत सबब ही पूजा त्याचे ठिकाणीं रुजू होते व तिचें फळ कधीं तरी चांगलेंच येईल. ते कसे जरी असले तरी त्यांचे आत्मे संतोषित होतात ही गोष्ट खोटी नाहींना? मग ही विश्वेश्वराची पूजा काय कमी आहे? ह्मणजे हा सर्व भावनेचा प्रकार आहे; मनुष्य जशी आपली भावना ठेवील तसें त्यास फळ खात्रीनें मिळेल यांत शंका नाहीं.

भांड्यांसंबंधें मी त्यांस विचारलें कीं, तुम्ही लोकांना मोठमोठीं भांडीं त्यांची विशेष ओळख नसतां, नुसतेंच नांव विचारून त्यांस देतां आणि कोणी चोरून नेलें तर काय करणार! याचें उत्तर त्यानें दिलें कीं, अद्याप प्रभुकृपेनें असें झालें नाहीं याउपर झालें तर झालें. मीं हीं भांडीं माझ्या घरचीं आणिलीं नाहींत. भिक्षा मागून हीं लहान मोठीं भांडीं मीं घेतलीं आहेत तीं त्या सर्वेश्वराच्या उपयोगाकरितां घेतलीं आहेत, अर्थात ज्यांच्याकरितां घेतलीं आहेत त्यानेंच तीं नेलीं तर त्याबद्दल वाईट वाटण्याचें कारण नाहीं. त्याच्या इच्छेनें आपणास आणखीं जास्त मिळतील! त्याच्या इच्छेशिवाय नेण्याची इच्छा कोणास होईल? या साधुपुरुषाच्या समागमामुळें मला ह्या यात्रेच्या बद्दलची बरीच माहिती मिळाली, नाहीं तर येथील स्थानिक भाषा तेलंगी असल्यामुळें मिळणें शक्य नव्हतें. त्यानेंच ह्या यात्रेचें महत्व, सोई, येथील कर कोणाचे, त्यांचा उपयोग कोण कसा करितो, जाण्यायेण्याचे रस्ते वगैरे सर्व गोष्टी सांगितल्या. त्याप्रमाणेंच मी येथें त्या दिल्या आहेत.

आमची मंडळी आल्यावर तिनें पहिल्या परत बोलीच्या गाड्यांचा तपास केला. जातांना आम्हीं कधीं येणार हें त्या गाडीवानास सांगून

ठेविलें होतें. त्यानें अर्धें भाडें आगाऊ घेऊन ठेविलें होतें त्यापैकीं फक्त एक रुपया आम्ही अडकावून ठेविला होता. तरी त्यास थोडें जास्त भाडें मिळाल्याबरोबर हा करार मोडून तो चालता झाला! आम्हीं त्याची रितीप्रमाणें आणखी एक वेळ वाट पाहिली परंतु तो आला नाहीं. तेव्हां आम्हीं दुसऱ्या गाड्या करून महानंदीवरून गाजरपल्ली स्टेशनवर जाण्याचा ठराव केला व त्याप्रमाणें आम्हीं महानंदीला आलों.

## महानंदी

हें ठिकाण या सर्व यात्रेंत व प्रवासांत अतिशय रम्य आहे. सर्व त्रासदायक यात्रेचा हा शेवटचा गोड घांस आहे. येथील देऊळ व धर्मशाळा अद्यापर्यंत उत्तम स्थितींत असून देवळावरचीं चित्रें सुद्धां अगदीं सुस्थितींत आहेत. येथें रमणीयत्वाचा भाग ह्मणजे येथें जल-विहार करण्याकरितां पुष्करिणी आहेत. श्रीमंत राजेरजवाड्यांमध्यें जलविहाराची कशी सोय असते हें येथें प्रत्यक्ष सर्वांस पहावयास मिळालें. देवळाभोंवतीं मोठी वाडी—बाग—आहे. आंत चौफेर कुसूं असून त्याला रहाण्याकरितां खोल्या केल्या आहेत. मुख्य मंदिरा-समोर तें जलविहार कुंड आहे व त्यांत देवळाचे जोत्याला गायमुख आहे. त्यांतून एकसारखें मांडीएवढें पाणी वाहत येऊन तें या कुंडांत पडत आहे. ह्या बागेमध्यें एक ओढा आहे त्याचें हें बांधून आणलें असावें पण तें कोठून येतें हें समजत नाहीं. पुष्करणी मात्र फार मजेची बांधली आहे. ती सुमारें ६० फूट लांब रुंद औरस चौरस असून त्याभोंवतीं खुलें प्रशस्त पटांगण आहे व भोंवतीं कोट आहे. येथें सर्वत्र छातीभर खोल पाणी आहे व मध्यें एक अगदीं लहान शिवालय असून त्यांत एक लहान पिंडी आहे. कोटाच्या बाहेर तशाच दोन पुष्करिणी केल्या आहेत व त्यांत ह्या पुष्करिणींचेंच पाणी सोडलें आहे. ह्या दुसऱ्या पुष्करिणींचा उपयोग धुण्याकडे होतो.

या प्रांतांत पाण्याचें दुर्भिक्ष्य, त्यांत हें अत्यंत रमणीय पोहोण्याचें ठिकाण मग काय विचारावें? येथें ह्या देवळांतल्या पुष्करिणींत स्नान करतात. स्नान करतांना फारच मोठा मजेचा देखावा दिसतो. देवळांतल्या या पुष्करिणींतून बायकांना पाण्यांतल्या देवदर्शनास जाणें थोडें अवघड असल्यामुळें जो तो अगदीं लाजलज्जा सोडून आपली बायको कडेवर घेऊन तिच्या सकट जलसंचार करीत होता. तसेंच म्हाताऱ्या बायका व मुलें यांचीही अशीच सोय होत होती व भोवतालची मंडळी हें कौतुक मोठ्या प्रेमानें पहात होती. येथें स्नान केल्यावर प्रथम मंडळी पुष्करिणींतील जलमंदिरांत शिवाच्या दर्शनास जातात. नंतर पाण्यांतून आलेल्यानेंच मुख्य देवालयांत जातात. येथें दर्शनास यात्रेपुरता चार आणे कर आहे. देवळांत बैलाच्या कानासारखा कान खडकांत स्वयंभु असून त्यांला मोठें भोंक आहे व भोवतीं पिंडी आहे. असा हा दर्शनाचा देखावा आहे. जलमंदिराच्या शंकरापुढील हें नंदिकेश्वराचें स्थान असून लिंगाइतांनीं तें अत्यंत पूज्य मानलें आहे. याशिवाय भद्रकाली, गणपती, विष्णु वगैरे देवालयें जवळच आहेत पण त्यांबद्दल फी नाहीं. ह्याच पुष्करिणीचें पाणी लोक प्यावयास नेतात. लोक स्नान करितात तरी मोठा प्रवाह सारखा चालू असल्यामुळें पाणी फारच स्वच्छ राहतें. येथेंही मल्लिकार्जुनाप्रमाणें यात्रेच्यावेळीं प्रासादिक वस्तूंचीं व शिधासामुग्रीचीं दुकानें असतात, तसेंच येथें अन्नछत्रही असतें. अशी मजा पहात आह्मी येथून तीन मैलांवर गाजरपल्ली नांवाचे स्टेशन आहे तेथें संध्याकाळीं पोंचलों. ही यात्रा कठीण आहे. ती करितां आली नाहीं तरी गाजरपल्लीवरून ही महानंदीची तीन मैलांची यात्रा तरी केल्याशिवाय राहूं नये अशी शिफारस आहे.

येथील स्टेशन मास्तर महाराष्ट्रीय होते. ते फार उत्तम स्वभावाचे होते. नाहीं तर यात्रेकरूंचे हाल वर्णन करवत नाहींत.

गाडीला दोन तीन तास उशीर असल्यास लांबच्या उतारूंस स्टेशनवर नुसतें बसून सुद्धां देत नाहींत. टिकिटें मिळत नाहींत, गाडींत जागा मिळत नाहीं, ह्मणून विनाकारण कुचंबाणें लागतें. पण यांनीं सर्वांस सर्व सोयींचें आश्वासन दिलें. इतकेंच नव्हे तर वाटेल त्याला पाहिजे तेथील अगदीं थेटचें तिकीट दिलें. हें तिकिटें देण्याचें काम तीन मनुष्यें तीन तासपर्यंत करीत होतीं! तिकिटें मिळून गाडींत जागा मिळाली नाहीं तर पंचाईत पण यात्रे-करितां पांच दिवसपर्यंत ह्या स्टेशनकरितां पांच सहा डबे रिझर्व त्यांनीं प्रत्येक गाडीला मागितले. व सर्वांस बजाविलें कीं सर्वांची सोय झाल्याशिवाय गाडी सुटणार नाहीं, कोणीही घाई न करितां अगदीं आपल्या सामानासुद्धां स्वस्थ बसावें. एकही मनुष्य शिल्लक रहाणार नाहीं असें सांगून त्याप्रमाणें खरोखर त्यांनीं व्यवस्था केली त्याबद्दल यात्रे-करूनीं फार खुशीनें त्याना दर टिकिटामागें दोन दोन आणे दिले. अशा रीतीनें त्यांचाही नफा झाला व यात्रेकरूंची सोय झाली; ह्मणून त्यांना आनंद झाला हें पुण्य काय कमी आहे? कांहीं लोक पैसे मात्र घेतात आणि व्यवस्थेच्या नांवानें पूज्य! उतारूंची व्यवस्था लावणें हें स्टेशन-मास्तरचें काम खरें, पण किती स्टेशनमास्तर या प्रमाणें वागतात? पंधरा मिनिटें आगाऊ गेल्यास पाहिजे त्या स्टेशनचें तिकीट दिलें पाहिजे असा सर्व कंपन्याचा नियम आहे. टिकीट आफीस चोवीस तास उघडें राहील अशी कायदेशीर नोटीस तिकीट आफीसावर लावलेली असते पण आंत मनुष्यच नसतो! असल्यास गाडी सुटल्याची घंटा झाल्यावर तिकीट मिळेल ह्मणून चक्क सांगतात. स्टेशनमास्तरकडें तक्रार करावी तर ते तरी कोठें असतात! ह्मणजे तिकीट मिळण्याची कटकट चुकण्याकरितां जो नियम केला तो फुकट गेला! सरकारी नोकर किंवा कंपनीचे नोकर आपल्या धन्याचें कायदेशीर नुकसान न करितां रयतेशीं किंवा उतारूशीं ह्मणजे देशबांधवांशीं प्रेमानें

वागतील तर ते कांहीं त्यांचा फायदा केल्याशिवाय राहणार नाहींत. तो त्यांच्या चोरीमुळें किंवा बेपर्वाईमुळें होणार नाहीं आणि हेंच खरें स्वदेशहित आहे. यावरून आपल्या धन्याचें काडीचेंही नुकसान न करितां त्यांना स्वदेशहित साधतां येत नाहीं असें नाहीं. इंग्रज सरकारचा राज्यकारभार देशी मनुष्यांकडूनच हाकला जातो पण ते अधिकारावर असतां त्यांचें देशबंधुत्व व सहानुभुती नष्ट होते, यामुळें तो मनुष्य देशी असून विदेशी होतो याचा नोकरांनीं विचार करावा.

## या यात्रेचें महत्व.

ही यात्रा अती प्राचीन काळापासून प्रसिद्ध आहे, हें या ठिकाणच्या अवशेषांवरूनही समजतें. श्रीगुरुदत्तात्रयांनीं आपलें अवतार कृत्य येथें संपाविलें व [illegible] वास येथेंच केला. श्रीनारद ऋषी ह्या मल्लिकार्जुनाचे दर्शनास जात होते व बरोबर वसिष्ट वामदेव होते. हल्लींच्या लुटारू कोळ्यांच्या वंशजांपैकीं वाल्या कोळयानें त्यांना येथें द्रव्याकरितां अडविलें. पैसे असतील तेवढे टाका नाहींतर मारून टाकतों असें तो ह्मणाला. आह्माला मारून तुला काय मिळणार? उगीच कां मारतोस? तेव्हां तो ह्मणाला हा माझा पोटापाण्याचा धंदा आहे. बरें अशा रीतीनें आजपर्यंत तूं किती जणांना मारलेंस ह्मणून नारदानें विचारलें. तेव्हां लहान लहान खड्यांनीं भरलेले सात रांजण त्यानें त्यांस दाखविले. एक मनुष्य मारला ह्मणजे एक खडा ह्या रांजणांत टाकीत टाकीत हे सर्व रांजण मी भरले आहेत! हें तूं कशा करितां करतोस? तर कुटुंब पोषणाकरितां. बरें ह्या पातकाचे भागिदार तुझीं बायकामुलें आहेत काय? होय तर! जा तर त्यांना विचारून ये. तो त्यांस विचारण्यास गेला तेव्हां तीं ह्मणालीं आह्मी नाहीं भागिदार होणार! कां? तुमच्या पोटाकरितां नाहीं का मी हें करीत? तेव्हां तीं ह्मणालीं आमचें पोषण करणें हें तुझें काम आहे. आम्ही कोठें तुला चोऱ्या

किंवा वाटमारेपणाचा धंदा कर ह्मणून सांगतों ? हें तूं आपल्या सोईसाठीं करितोस त्याजबद्दल आम्ही जबाबदार नाहीं. असें जेव्हां त्यांचें बोलणें त्यानें ऐकिलें तेव्हां त्याचे डोळे उघडले!! व तो नारदास शरण गेला. तेव्हां नारदांनीं त्यास राम नामाचा उपदेश केला. पण त्याच्या अति- शय पातकामुळें त्याच्या तोंडांतून राम राम असें येईना! मरा, मरा असें येऊं लागलें. तरी पण सद्भावनेनें राम असें ह्मणण्याचा प्रयत्न कर ह्मणजे येईल असें सांगून ते मल्लिकार्जुनाचे दर्शनास गेले व मी फिरून येईपर्यंत उठूं नको असें त्यांनीं त्यास सांगितलें. त्याप्रमाणें वाल्मिकानें एवढी खडतर तपश्चर्या केली कीं, त्याचा तो जुना देह जीर्ण—नष्ट— होऊन त्यावर वारूळ झालें! नंतर नारद ऋषी दर्शन घेऊन परत आले. पाहतात तों, तेथें मोठें वारूळ झालें आहे पण त्यांतून मरा मराच्या- ऐवजीं राम नामाचा ध्वनी मात्र ऐकूं येत आहे. हें पाहून आतां मात्र हा उपदेशाच्या योग्य झाला आहे असें वाटून त्यांनीं त्याला आत्म- ज्ञानाचा उपदेश केला व त्यामुळें वाल्या कोळ्याचा वाल्मिक ऋषी बनला. ही प्रसिद्ध पौराणिक कथा येथें घडली. या गोष्टीचें मूळ स्वरूप मात्र येथें अद्याप दृश्य आहे. ह्मणजे येथील कोळी वाल्मिका- प्रमाणें न उमजतां अजून वाटमाऱ्याचा धंदा करून उदरनिर्वाह करितात व ज्या अरण्यांत त्यानें तपश्चर्या केली त्या अरण्यांत अद्याप पावेतों फार मोठीं वारुळें होतात.

ही वाल्मिक ऋषीची गोष्ट तंतोतंत अलीकडील वकिलांस लागू पडते. वकील लोक खोट्याचें खरें करून दाखवून फार पैसे उप- टतात व प्रायः ते आपल्या प्रपंचाकडेच लावतात. पण या गोष्टीवरून कोणते वकील उमजले आहेत? त्यांनीं आपल्या मनाला कधीं या पातकांचा प्रश्न केला असेल काय? ते एवढे शिकलेले असतां त्यांस सुद्धां प्रामाणिकपणें आपला उदरनिर्वाह करितां येऊं नये हें आश्चर्य नव्हे काय? पैसे थोडे कमी मिळतील पण त्यांत यश आहे, हें पूर्ण

लक्षांत ठेवावें. मल्लिकार्जुनाची पौराणिक कथा अशी:—एकदां षडानन ह्मणजे कार्तिकस्वामी हे कांहीं कारणानें मातापित्यांवर रुसून क्रौंच पर्वतावर निघून गेले. त्यांची त्यांनीं पुष्कळ समजूत घातली परंतु त्यांनीं कांहीं तें ऐकिलें नाहीं. पुढें शिवानीं गिरिजेच्या सांगण्यावरून त्यांच्याकडे कित्येक देव मध्यस्तीस पाठविले परंतु त्यांनीं आपला हेका सोडला नाहीं. या प्रकारें त्यांचें आचरण पाहून मातापितरांस बहुत खेद झाला. त्यांस पुत्रवियोग असह्य होऊन ते स्वतः पुत्रास भेटण्याकरितां श्रीशैल्याजवळील क्रौंच पर्वतावर जाण्यास निघाले ते श्रीशैल्यास आले. त्यांस कार्तिकेयांनीं पाहतांच तो आणखी तीन योजनें दूर लोहाचल पर्वतावर गेला व आतां या पर्वतावर जी स्त्री येईल ती सप्तजन्म विधवा होईल असा शाप दिला. त्या ठिकाणास हल्लीं कार्तिकस्वामी ह्मणतात. हा शाप ऐकून शिवपार्वती निरुपायानें ह्या स्थळींच पुत्राकडे स्नेह दृष्टीनें पहात राहिलीं. यां ठिकाणास मल्लिकार्जुन ह्मणतात.

त्या देवळाचा इतिहासही आसाच प्राचीन आहे. हा देव चंद्रगुप्ताचे स्वप्नांत आला त्यावरून चंद्रगुप्तानें ह्या देवळाचा जीर्णोद्धार केला. चंद्रगुप्ताचा काळ ह्मणजे इ. स. पूर्वीचा काळ, ह्मणजे अर्थात कमीत कमी दोन हजार वर्षांपूर्वीचा आहे. येथें चंद्रगुप्तानें आपला राजवाडाही बांधिला होता, त्याच्या खुणाही येथें लोक दाखवितात. या पर्वतावरही सर्वत्र चौथरे व इमारतींच्या पायाचे दगड दिसतात यावरून अति प्राचीन काळीं या पठारावर ही राजधानीची जागा असावी. ओंकारमांधात्यावर जशी नर्मदेची अपूर्व शोभा पाहून तेथें ज्योतिर्लिंगाची स्थापना केली व मांधात्यानें आपली राजधानी केली, तोच प्रकार येथें कृष्णेच्या ह्या डोहाच्या योगानें झाला आहे. दोन्ही ठिकाणच्या शोभा नाटकांतल्या पडद्याप्रमाणें अगदीं प्रेक्षणीय आहेत, यामुळें येथेंही ज्योतिर्लिंगाची स्थापना करून व चंद्रगुप्तानें आपली

राजधानी करून या जागेला धार्मिक व राजकीय दर्जा प्राप्त करून दिला असला पाहिजे. राजधानीच्या दृष्टीनेंच या पर्वतावरील सडका फार प्रशस्त व मजबूत बांधिलेल्या आहेत. हल्लीं रेलवेमुळें अशा स्थळांची योग्यता कमी झाली ही गोष्ट वेगळी. पण ज्यावेळीं मनुष्य वस्ती डोंगरावर करण्याची वहिवाट होती त्यावेळीं ह्या पठाराला फार महत्व असलें पाहिजे. गुहा घराण्याची येथें राजधानी होती अशा-बद्दल देवळांत व आसपासही मोडके तोडके शिलालेख सांपडतात. कालगतीनें येथील राजाचें वैभव गेलें व लोकांची डोंगरी राहणी बदलली ह्मणून येथील वस्ती उठली. तरी येथील सृष्टीचा देखावा कमी झाला नसून तो पहाण्याकरितांच या यात्रेची योजना केली असावी असें वाटतें. शिवाजीलाही हें ठिकाण अत्यंत आवडलें होतें. तो येथून पुष्कळ दिवस हाललाच नाहीं. त्याचे सप्त प्रकरणात्मक बखरींत पुढील माहिती आहे. कर्नूलच्या ईशान्येस २४ मैलांवर भवनाशी व कृष्णा यांचा निवृत्ति संगम आहे. तेथून थेट पूर्वेस ३७ मैलांवर पठारावर मल्लिकार्जुनाचें स्थान आहे. येथें पूर्वी नलमल नांवाचे निबिड अरण्य होतें तें आतां नाहीं. याला पूर्वी कैलासभूवन ह्मणत. या पठाराची उंची १५७५ फूट असून पाताळगंगेवर जाण्यासाठीं विजयानगरच्या एका राणीनें पायऱ्या बांधिल्या. मल्लिकार्जुनाच्या देवळाच्या तटाची लांबी ६६० फूट व रुंदी ५१० फूट व उंची २५ फूट आहे. हें सर्व हल्लींचें दगडीकाम विजयानगरच्या कृष्णदेव राजानें इ. स. १५१० त केलें. शिवाजीचेही मनांत असें काम करण्याचें होतें पण आयुष्य टिकलें नाहीं!

याप्रमाणें यात्रा संपवून मी गाजरपल्लीवरून बेझवाड्यावरून जगन्नाथाला जाण्याकरितां खुरदारोड येथें आलों. ज्याला ही यात्रा करण्याची सवड नसेल त्यानें व्यंकटगिरीहून गुडूरपर्यंत छोट्या लाइनीनें येऊन नंतर बड्या लाइनीनें तेथून बेझवाडा, वाल्टेअर, गंजमवरून खुर्दारोडवर यावें.

मीही प्रथम असाच आलों होतों. वाटेंत गोदावरी व कृष्णा यांचे महापूल व त्यांचीं विस्तीर्ण पात्रें पाहाण्यासारखीं आहेत. वाल्टेअरपर्यंत मद्रास आणि सदर्न मराठा रेल्वे असते. पुढें बंगाल–नागपूर रेल्वे लागते, सबब वाल्टेअरला गाडी अर्धा तास थांबते पण बदलावी लागत नाहीं. दुसेर लाइनचें एंजीन लावून गार्ड बदलतात यामुळें उतारूंची गैर-सोय होत नाहीं. इतक्या वेळांत लोक उतरून स्टेशनवरच्या खाणा-वळींत जलद जेऊन पुन्हां गाडींत बसतात. गाडी येण्याची वेळ झाली ह्मणजे खाणावळवाले पानें वाढून तयार ठेवतात. ती अगदीं जेवण्याची वेळ असते. लोक कपडे वगैरे काढून न ठेवतां अधाशा-सारखे एकदांचे जेवून पैसे देऊन चालते होतात व त्याच गाडींत बसतात. येथेंही खाणावळींत ब्राह्मण ब्राह्मणेतरांच्या पंक्ती निरनिराळ्या आहेत. येथें ब्राह्मण ब्राह्मणेतरांत कांहीं फरक नाहीं. कोणीच कपडे काढीत नाहींत व स्पर्शास्पर्शाचा भेद मानीत नाहींत. तरी पण ब्राह्मणांचीं पानें स्वतंत्र व दूरदूर ठेविलेलीं असतात व इतरांचीं जवळ जवळ ठेविलेलीं असतात. दोघांच्या जागा मात्र निराळ्या असतात. ब्राह्मणांत आणखीं निराळे पंथ जेवण्यापुरते तरी मानीत नाहींत. त्यानें ब्राह्मण आहे असें ह्मटलें ह्मणजे झालें. अंगांतलीं मुख्यतः न काढण्याचें कारण वेळ वांचतो व चोरीची धास्ती नसते हें आहे. आणि परिस्थितीप्रमाणें तो आपद्धर्मही योग्य आहे. अशा ठिकाणीं कर्मठ मनुष्याची फजिती व्हावयाचीच पण त्यामुळें कर्मठपणाला कमीपणा येत नाहीं. आपत्तीचे प्रसंगीं आपद्धर्म न पाळणें हेंच गौण व निषिद्ध आहे. याठिकाणीं कर्मठपणा करीत बसल्यास गाडी जाव-याची व चोऱ्या व्हावयाच्या. जसें मनुष्य फार आजारी असून तो जर कर्मठपणा करील तर त्याचेंही आचरण धर्मबाह्यच समजलें पाहिजे. कारण रोगामुळें त्याचें अंतर्याम शुद्ध नाहीं, तर बाह्यशुद्धि काय कामाची ?

मलाही जेवावयाचें होतें, पण मी या धांगडधिंग्यांत जेवलों

नाहीं. त्यारितां मी आपली ही गाडी चुकवून मागच्या गाडींत जाण्याचें ठरविलें. केवळ त्या ताज्या जेवणाकरतां आपला आचार सोडणें योग्य नाहीं. शिवाय अंगांत कपडे ठेविले तरी पाकीट कोण संभाळणार? ही वेळच अशी असते कीं, कोणीही पाकीट घेऊन गाडींत बसला ह्मणजे झालें! गाडी सुटली कीं पाकीट गेलें व सर्वच गेलें! अशावेळीं पाकिटाची जबाबदारी कोणी घेत नाहीं, किंवा कोणी घेतली तरी त्यांत अर्थ नसतो. एका मनुष्यानें आपलें पाकीट एका दुकानदारापाशीं रक्षणाकरतां दिलें. पुढें दुकानदारच पाकीट घेऊन गेला व तेथें दुसरा आला. त्याला त्यानें पाकीट विचारलें, तेव्हां तो ह्मणाला मला काय ठाऊक? झालें, पाकीट गेलें! आणि असाच प्रकार येथेंही झाला. गाडी सुटल्यानंतर मला जेवावयाचें आहे असें मी खाणावळवाल्यास सांगितलें, पण कांहीं शिल्लक उरलें नाहीं जरा थांबा असें तो म्हणाला. इतक्यांत एक मनुष्य माझें पैशाचें पाकीट गेलें म्हणून रडत ओरडत आला. तर तेथें काय? कांहीं नाहीं. सर्व लोक जिकडच्या तिकडे गेले, तेथें चिटपाखरूंही राहिलें नाहीं. बिचारा रडत गेला. असें नेहेमीं चाललें असतें. म्हणून स्टेशनवर, खाणावळींत, दुकानांत, जिकडे तिकडे चोरीपासून सावध रहा अशा सगळीकडे पाट्या मारलेल्या असतात. ह्या सर्वच चोऱ्या मुद्दाम होतात असा अर्थ नाहीं. कांहीं धांदलीनेंही होत असतील व यामुळेंच चोऱ्यांची संख्या जास्त होते. ह्मणजे साधली तर शिकार नाहींतर भिकार. कोणी पकडल्यास गडबडीमुळें व विस्मरणामुळें असें झालें असें चक्क सांगतात.

जेवण तयार झाल्यानंतर जिकडे तिकडे पुन्हा स्वच्छता झाली. मीही रीतीप्रमाणें कपडे काढून शुद्ध होऊन सावकाश जेवून दुसरे गाडीला गेलों. सारांश आपद्धर्माचे वेळीं तो न पाळणें हें धर्मबाह्य आहे. कारण त्यामुळें अनर्थ झाला तर तो धर्मामुळें झाला, असें कोणी ह्मणतील, तर त्यांना तें म्हणतां येऊं नये. धर्म कांहीं

कोणाच्या आड येत नाहीं. त्याची योजना करणें हेंच शहाणपणाचें आहे. पण प्रसंग नसतांना मतलबाकरतां व चैनीकरितां आपद्धर्माचें आचरण करणें हेंही निशिद्ध आहे. देशकालाकडे लक्ष देऊन चालणें हाच श्रेष्ठ धर्म आहे. ह्मणून कोणत्याही कार्यारंभीं देशकाळाचें स्मरण व त्याचा विचार हें मुख्य सांगितलें आहे. 'देश कालौ संकीर्त्य' असें प्रत्येक कार्यारंभीं सांगितलेलें असतें. ह्मणजे कार्याला आरंभ करण्यापूर्वीं त्याचे विधी सांगितलेले आहेत. तरी त्यांचें आचरण देशकालवर्तमानाकडे लक्ष देऊन केलें पाहिजे असें धर्मानें स्पष्ट सांगितलें आहे, त्याप्रमाणें आचरण न करितां जर अनर्थ झाला किंवा नुकसान झालें तर त्याबद्दल धर्म जबाबदार नाहीं. धर्म समाजाचें रक्षण करण्याकरितां आहे, नाश करण्याकरितां नाहीं. ह्मणजे धर्म कोणाच्या आड येत नाहीं हेंच खरें. ब्राह्मण व ब्राह्मणेत्तर यांच्यामध्यें हाच वाद उत्पन्न झाला आहे. परबुद्धीच्या योगानें ब्राह्मणेत्तरांच्या मतें ब्राह्मणांनीं ब्रह्मकर्माशिवाय दुसरे कुठेंच पाहातां कामा नये असें त्यांचें ह्मणणें आहे, पण ही त्यांची चूक आहे. ब्राह्मणांचें कर्तव्य निव्वळ स्नानसंध्या, ब्रह्मकर्म व वेदाध्ययन करणें एवढेंच नाहीं. तर ब्राह्मण ही सुशिक्षित जात असल्यामुळें त्यांना चालू देशकालवर्तमानाचें जसें ज्ञान होईल, तसें इतर सुशिक्षित झाले तरी त्यांना होणें शक्य नाहीं. ह्मणून आपण कोणच्या परिस्थितीमध्यें आहों, यांतून बचावाकरतां आपण काय केलें पाहिजे, तें स्वतः आचरण करून इतरांनाही त्यांचा मार्ग त्यांनीं दाखविला पाहिजे. केवळ आपलाच उद्धार न करतां त्यांनीं सर्व जातींचा सुद्धां केलाच पाहिजे, तरच तो ब्राह्मण. 'वर्णानां ब्राह्मणो गुरुः' याचा अर्थच तो आहे. केवळ जुन्या पद्धतीप्रमाणें ब्रह्मकर्म करणारा मनुष्य ब्राह्मण नाहीं. ब्राह्मणानें प्रसंग येईल त्याप्रमाणें ब्रह्मकर्म सोडून वाणिज्य, क्षत्रियत्व, प्रसंगीं शूद्रत्वही पत्करलें पाहिजे. पण हें अशा परोपकाराकरतां केलें पाहिजे,

स्वार्थाकरतां मात्र नाहीं हें विसरतां कामा नये परशुराम, द्रोणाचार्य व अलिकडचे पेशवे, त्याचप्रमाणें हल्लींचे लोकमान्यांसारखे पुढारी आपलें ब्रह्मकर्म सोडून लोकशिक्षक झाले होते. यांचीं उदाहरणें याच दृष्टीनें प्रख्यात आहेत. जेव्हां काळ अनुकूल असेल ह्मणजे स्वराज्य असून राजे धर्मशास्ते असतील तेव्हां ज्यानें त्यानें आपल्या स्वधर्माप्रमाणें वागणें हेंच इष्ट आहे. पण घरांत चोर शिरला असतां केवळ स्वधर्म ह्मणून नाक धरून बसणें याकरतां खचित ब्राह्मण जन्म नाहीं. इतर लोक ह्मणतात, ब्राह्मण असें करतात नीं ब्राह्मण तसें करतात, त्यांचें सोंवळें ओंवळें आह्माला माहीत आहे. पण अशा प्रसंगाकरतांच तुकारामानें आपल्या जातीस उपदेश केला आहे कीं, 'जरी झाला ब्राह्मण भ्रष्ट। तरी तिहीं लोकीं श्रेष्ठ'. याचा अर्थ ब्राह्मणानें वाटेल तसें करावें असा मात्र नाहीं, तर इतरांनीं ब्राह्मणाच्या नादीं लागून वाटेल तसें करूं नये. ब्राह्मणांचा पाय कदाचित् घसरला तरी ते पूर्वपदावर येतील, पण तुह्माला मात्र येतां येणार नाहीं. तुमची मात्र अवनती कायमची होईल. ह्मणून ब्राह्मणाच्या नादीं लागून तुह्मीं आपलें कर्तव्यकर्म विसरूं नका, ह्मणजे त्यांच्या उपदेशाप्रमाणें ऐका व त्यांतच तुमचें हित आहे. ब्राह्मण तुमच्या कितीही विरुद्ध झाले तरी तुमच्या अवनतीबद्दल त्यांना जितकें वाईट वाटेल तितकें परधर्मीयांना खचित वाटणार नाहीं, ही खूण गांठ बांधून ठेवा. वगैरे माहिती मागें एकदां आली आहेच पण प्रसंगार्थ तिचें दिग्दर्शन केलें आहे. शिवाय हल्लीं केवळ ब्रह्मकर्म करून त्यांचा उदरनिर्वाह होण्याचे दिवस राहिले नाहींत यामुळें भिक्षुकवर्गही कमी होत चालला आहे.

नंतर मी खुर्दारोड जंक्शनवर आलों. खुर्दारोडला रेल्वेची खाणावळ नाहीं कारण मद्रास इलाखा संपला. गांवही इतर जातीचा आहे व तो स्टेशनपासून सुमारें एक फर्लांगावर आहे तेथें गेलों.

स्वस्तिक वाचनालय,
ठाणे.

जगन्नाथ.



जगन्नाथपुरी

येथील ब्राह्मण बंगाली अर्थात मांसाहारी पण येथें एक तेलंगी ब्राह्मण आढळला, त्याचे घरीं जेवलों. तो व त्याची वृद्ध आई अशीं दोघेंच होतीं. त्याच्या खाणावळींत कांहीं अर्थ नाहीं. कसें तरी पोट भरून घेतलें. खुर्दारोडपासून एक फांटा जगंनाथाला जातो. कलकत्त्याहून जगंनाथाला यात्रेकरूंची रोज एक पॅसेंजर व एक मेल अशा दोन गाड्या जातात व त्याच परत येतात. जातांना पॅसेंजर गाडींत बसलों. पुरीचे उपाध्ये खुरदारोडवर यात्रा नेण्याकरितां आलेच होते, त्यांच्या बरोबर पुरीला गेलों. हे उपाध्ये यात्रा नेण्याकरितां काशी, गया, खरगपूरकडे हिंडत असतात. गांव स्टेशनपासून दोन मैल लांब आहे. जगंनाथाचें देऊळ स्टेशनपासून अडीच मैल तरी लांब असेल असें वाटतें. आमच्या पंड्याचें घर देवळाजवळच होतें. गाडी सहा वाजतां पुरीवर येते. गाडी करून गांवांत आल्याबरोबर पाकीट पंड्याकडे ठेविलें व प्रथम जगंनाथाचे धूळभेटीचे दर्शनास जाण्यास निघालों. पण इतक्यांत दर्शन होणार नाहीं, रात्रीं आठ वाजतां दर्शन होईल, असें पंड्या म्हणाला. मध्यप्रांत येथून जवळच असल्यामुळें जगंनाथास मराठी भाषा चालते, निदान ती पुष्कळांना समजते.

## जगन्नाथपुरी

येथील जगंनाथाचें देवालय उंचच उंच असून त्यावर गरुडध्वज व कळसावर सुदर्शन चक्र असून सर्व देवळाभोंवतीं, घुमटावर, आंत व बाहेर देवादिकांचीं सुंदर चित्रें आहेत. त्यांत कांहीं अतिशृं-गारिक व बीभत्सही आहेत. कांहीं भक्तजन त्यांतही रमतात व तिकडेच लक्ष देतात, पण ही देवाची लीला आहे. नुसत्या या गुणाकडे न पाहतां याचप्रमाणें देवाच्या सर्व गुणांकडे इतक्याच आवडीनें व प्रेमानें पाहून त्यांचें अनुकरण केलें पाहिजे आणि एवढ्याचकरितां हीं चित्रें आहेत हें विसरतां कामा नये.

देवळांत व भोंवतीं सर्वत्र प्रासादिक वस्तूंचा व प्रसादांचा बाजार भरलेला असतो. दर्शनास उशीर असल्यामुळें ही सर्व शोभा पाहून जवळच्या एका तीर्थास (पुष्करणीस) जाऊन संध्योपासना केली व एक घागर पिण्याकरतां भरून आणली. रीतीप्रमाणें दर्शनाचे वेळीं गर्दी होतीच. वेळ रात्रीची असल्यामुळें फारसा तिष्ठत न बसतां, गर्दीतच पंड्याबरोबर दर्शनास गेलों. देवांच्या मुर्ती तीन आहेत. बलिराम, सुभद्रा व जगन्नाथजी (श्रीकृष्ण). बलिरामाची मुर्ति मोठी व पांढरी आहे. जगंनाथाची त्यापेक्षां लहान व काळी आहे. रामलक्ष्मणासारख्याच ह्या मूर्ती आहेत आणि मध्यें सुभद्रेची सर्वांत लहान पांढरी मूर्ति आहे. बलिरामाची मूर्ति ३।४ फुटांची आहे व त्या मानानें सर्व मूर्ती आहेत. मूर्ती उंच ओट्यावर आहेत यामुळें सर्वांस दर्शन चांगलें होतें. या काष्टमय मूर्ती आहेत व त्यांचे हस्तपादादी अवयव स्पष्ट दिसत नाहींत, ते भुंडे आहेत. हातांला पंजे व बोटें नाहींत व मूर्तीही ओबडधोबड असून त्यांना रंगही तशाच प्रकारचे ओबडधोबड दिले आहेत. याचें कारण याविषयींची एक कथा अशी आहे कीं, समुद्रांतून कांहीं लांकडें वाहून आलीं आणि त्याबद्दल पुरीच्या राजाला जगन्नाथाचा दृष्टांत झाला कीं, यांच्या मूर्ती करून माझी स्थापना कर. त्याकरतां तेथें विश्वकर्मा (देवांचा सुतार) सुताराचें रूप घेऊन आला व त्यानें सांगितलें कीं, राजा मी मूर्ती करतों; याला तीस दिवस लागतील तोंपर्यंत तूं दरवाजा उघडूं नको. त्यावर राजानें ठीक आहे असें सांगितलें, पण मुदतीपूर्वीं एक दोन दिवसच राजानें आंत काम कसें काय चाललें आहे हें पाहाण्याकरतां दरवाजा उघडला. तों सर्व मूर्ती तयार झाल्या होत्या फक्त हात पाय व नाक डोळे इत्यादि अवयव सोडवावयाचे राहिले होते, ते दरवाजे उघडल्यामुळें तसेच राहिले. ह्मणून ह्या मूर्ती अशा आहेत. अजूनही कांहीं नियमित मुदतीनें चंदनाचीं तीन खोडें समुद्रांतून वाहून

येतात. व त्यांच्या मूर्ती अशाच वेड्यावांकड्या करून त्या जुन्याच ठिकाणीं बसवितात. त्यांत कांहीं सुधारणा करीत नाहींत. असें केल्यानें मूर्ती स्थापना करणारा, त्या घडविणारा व दुसरे त्या कामावरील मुख्य मनुष्य हीं मरून जातात अशी त्या प्रांतीं आख्यायिका आहे. प्रभास तीर्थांत यादवी माजून यादवांचा अंत झाला व तेथें त्यांचें दहन झालें. कृष्णाचेंही झालें पण अत्यंत कपटाचरणामुळें त्याचा देह अग्नीलासुद्धां जाळतां येईना. फक्त हात, पाय व डोकें हीं जळलीं पण धड तसेंच राहिलें, तें तसेंच समुद्रांत टाकलें. जलचरांना व माशांनासुद्धां तें खातां येईना. अखेर तें वाहत वाहत जगन्नाथास गेलें. जातांना त्याचें लाकूड बनलें व पुढें त्याच्या मूर्ती झाल्या. अर्थांत ह्या मूर्ती कृष्णाच्या शवाच्या ह्मणून अत्यंत पूज्य आहेत. मूर्तींचें असें बाह्य स्वरूप आहे तरी आंत शालिग्राम असतात. या दैविक प्रभावामुळें त्यांना विशेष प्रकारचें तेज येऊन त्यांवर भक्तांची विलक्षण श्रद्धा बसते असें ह्मणतात.

जगंनाथांचा रथोत्सव आषाढ महिन्यांत मोठा दांडगा होतो, त्या वेळीं सुमारें दोन तीन लाख यात्रा जमते असें ह्मणतात. हा रथही मोडून दरवर्षीं नवा करतात व हें काम वर्षभर चालू असतें. ज्या रथावर देव बसले तो मोडून त्याचे तुकडे करितात. त्याचा उपयोग पुन्हां होतां कामा नये. हा रथोत्सव व त्यापूर्वी १५ दिवस देवाचा स्नानोत्सव होतो. हे दोन्ही उत्सव मिळून आषाढ महिनाभर उत्साह चालू असतो. अर्थांत हे दोन्हीं उत्सव पहाण्यासारखे असतात. देवाचा पंचामृताभिषेक, महानैवेद्य व तासातासांचे निरनिराळे पोशाख, अलंकार, आभरणादिक राजोपभोग नियमित वेळीं रात्रंदिवस चाललेले असतात. दर्शनार्थ मंडळीही जात येत असतेच. येथें दर्शनास फी वगैरे कांहीं नाहीं. वाटेल तेव्हां मोकळीक असते पण कांही विशेष प्रसंगीं यात्रा बंद करतात. जास्त गर्दी होते तेव्हां व्यवस्था करतात. गर्दीमध्यें

जाण्यास हरकत नाहीं, पण दरवाजाचे उंबरठे कोठें उंच असतात, कोठें पायऱ्या नीच असतात तें दिसत नसल्यामुळें मनुष्यें पडतात. सबब फार चांचपत चांचपत जावें लागतें. दिवे कितीही लावले तरी गर्दी पुष्कळ असल्यामुळें पायाखालतीं दिसत नाहीं. त्या जगन्नाथाच्या देवळांत व त्याचे आसपास घासलेट तेलाचा दिवा बिलकुल लावतां कामा नये असा निर्बंध आहे. यामुळें देवाचे मोठमोठे हॉल असून आंत गोडे तेलाचे मोठे दिवे मोठमोठ्या कंदीलांत लावतात पण जागेच्या मानानें त्यांचा कांहीं उजेड पडत नाहीं. देवळाजवळ जगन्नाथाची पुष्पवटिका आहे व या बागेंतूनच जगन्नाथाच्या रोजच्या पूजेला टोपलीभर फुलें, तुळशी जातात. फुलें तुळशी वेचून त्यांचे हारतुरे करून नित्य पूजेच्या वेळीं देणें हेंच ह्या बागवानाचें काम आहे. बाग मोठी असून तींत पुष्कळ सुवासिक फुलझाडांचे ताटवे आहेत. याकरितां स्वतंत्र मनुष्यें नेमिलीं आहेत.

दुसऱ्या दिवशीं तीर्थविधीला आरंभ केला. प्रथम सागराचें स्नान करावें लागतें. सर्व वालुकामय प्रदेश आहे. देवळापासून समुद्र जवळच सुमारें दोन फर्लांगावर आहे. कलकत्त्यास जाणाऱ्या बोटी येथें लागतात काय असा तपास केला. पण रेलवे झाल्यापासून येथें बोटी लागत नाहींत. पुढें गंजामला लागतात असें समजलें. रेलवेपूर्वीं जगन्नाथाला हा बोटींचा मार्गच होता. आतां हा बंद करून त्याऐवजीं कलकत्त्याहून रोज दोन ट्रेन्स येतात व जातात. ओढ्या प्रांतांतील अनार्य लोक—कोंड, संताळ वगैरे डोंगरी लोकांच्या पलटणी येथें तयार केल्या आहेत, त्यांची वाळूंतून परेड चालली होती. हे लोक फार काळे, खुजे पण राकट असून आपल्याकडील कोळी, भिल्ल व रामोशी यांसारखे दिसतात. समुद्र स्नानानंतर दुसरीं तीर्थें, पुष्करण्या, विहिरी आहेत त्यांत स्नान केलें व सकाळच्या बाजारचा थाट पाहिला. बाजारांत व घरोघर जगन्नाथाचे फोटो, पुतळे, लांकडाचे

व मातीचे लहान मोठे जिन्नस व देवाच्या प्रतिमा मूळ देवळांतील प्रतिमेसारख्या पण लहानमोठ्या जिकडे तिकडे घरोघर होत्या. प्रसादाचे जिनसांचे लाडूंचीं दुकानें फार होतीं. याशिवाय दहीं, दूध, लोणी यांचींही दुकानें पुष्कळ असून हे जिन्नस स्वस्तही मिळत असत. दहीं, दूध, लोणी हीं देतांना त्यांस हात लावावयाचा नाहीं किंवा कशानेंही त्यांस स्पर्श करावयाचा नाहीं ह्मणून त्यांच्याकरितां लहान मोठीं मडकीं टोपलींत घालून आणितात व मडकींच विकतात, त्यांतून काढून देत नाहींत. ज्या ठिकाणीं कृष्णाचें किंवा विष्णूचें क्षेत्र आहे तेथें दहीं, दूध चांगलें मिळतें व तें उत्तम असतें. दहीं उन्हांत असलें तरी बिलकूल पाणी सुटत नाहीं हें येथें विशेष आहे. वैशाखाचे दिवस असून इतकें चांगलें व स्वस्त दहीं, दूध, लोणी हिंदुस्थानांत दुसरे कोठेंही नसेल! देवाचा प्रसाद ह्मणजे मुख्यतः भात व कोरडी भाजी हीं पंड्यामार्फत पैसे देऊन मिळतात. पण दहीं, दूध, लोणी बाजारांतून आगाऊ घेऊन ठेवावें लागतें. दहीं, दूध बारा वाजेपर्यंत मिळतें व जगंनाथाला भोग दिल्यावर एक दोन वाजतां भाताचा प्रसाद मिळतो. ह्या प्रसादाला सुद्धां हात लावीत नाहींत. भात शिजवलेलीं मडकींच्या मडकींच विकतात. लहान मडकें नसलें तर मोठें फोडून अन्नासुद्धां विकतात. कोणाचाही प्रत्यक्ष किंवा दुसऱ्या वस्तूचा स्पर्श अन्नाला होत नसल्यामुळें या प्रसादाला सोंवळ्या ओंवळ्याचा मुळींच प्रतिबंध नाहीं. जगंनाथाचा भोग झाला ह्मणजे घंटा होते व मग सर्व पंडे व यात्रा जाते व भोग विकत घेतात. पंडे लोक गड्याच्या डोक्यावर हीं सर्व मडकीं किंवा तुकडे एका मोठ्या हाऱ्यांत घालून घरीं आणतात व आपल्या यात्रेकरूंना वांटतात. इतर यात्रेकरूकरितां येथेंही या प्रसादाचीं घाऊक व किरकोळ दुकानें असतात. मात्र या संबंधाचा सर्व व्यवहार मडक्यांशीं चालतो.

हाच प्रकार मथुरा, द्वारका येथेंही आहे व थोड्या बहुत फरकानें सर्व उत्तर हिंदुस्थानांतही आहे.

जगंनाथास देवळांत पाकशाळेंत प्रसादाच्या हांडयावर हांडया अशा सात हांडया एकावर एक ठेऊन खालीं विस्तव लावला असतांना सात हांडया एकदम शिजतात. त्यांतही सर्वांत वरची प्रथम शिजते व नंतर खालीं खालीं शिजत येतात व सर्वांखालची शेवटीं शिजते अशी प्रख्याती ऐकिली होती. ती दाखविण्यास पंडयास सांगितलें पण पंडया ह्मणाला ही माहिती खोटी आहे. लोखंडाच्या मोठमोठ्या चुली केलेल्या असतात त्यांची रचना कळसासारखी असून त्याचे आंत पोंकळी असते व त्या सभोंवतीं लहान मोठीं मडकीं नीट राहाण्याची सोय ह्मणजे तिवया केलेल्या असतात. त्यांवर खालपासून वरपर्यंत मडकीं ठेवतात व खालीं जाळ लावितात, ह्मणजे एकाच जाळानें सर्व मडकीं शिजून येतात. जाळ प्रत्येक मडक्याला लागतो, तुह्मी म्हणतां तशीं एकावर एक सात मडकीं शिजत नाहींत. मलाही याबद्दल संशयच होता, कारण एकावर एक अशीं सात मडकीं भरून ठेविलीं असतां ती टिकणारच नाहींत, खालचें फुटून जाईल. मडकीं हीं पक्की व मजबूत नसतात, तेव्हां तीं टिकणें शक्य नाहीं. चूल जशी असेल त्याप्रमाणें हीं मडकीं चुलीवर पांचापासून पंधरापर्यंत ठेविलीं जातात. ही खरी हकीगत समजण्याकरितां मी ही पाकशाळा दाखविण्याविषयीं पंड्यास सांगितलें. त्यानें सकाळीं १० वाजतां स्वयंपाकाचे वेळीं नेण्याचें कबूल केलें, पण त्यावेळीं तो कोठें नाहींसाच झाला. शेवटीं मी त्या वेळेला पाकशाळेंत गेलों पण आंत जाण्याची मनाई होती. ओढिये ब्राह्मणांकडे ती व्यवस्था आहे व ते आंत कोणास जाऊं देत नाहींत. पहारेवाल्यास कांहीं देऊन मी ब्राह्मण आहें असें सांगितलें, तरी पुढें न जातां त्यानें एका लहान छिद्रांतून तें पाहाण्यास सांगितलें. पाकशाळा चोंहोंकडून

बंद असल्यामुळें आंत धूर फार झाला होता. त्यामुळें व अंधारामुळें मला स्पष्ट कांहीं दिसलें नाहीं पण हांड्या भट्टीवर कशा ठेविल्या आहेत त्यांची व भट्टीच्या रचनेची समजूत झाली, ती मागें दिली आहेच. एकावर एक हंडी याचा अर्थ जिन्याच्या पायऱ्यांसारखी एकावर एक, एकाच्या डोक्यावर दुसरी असा नव्हे. बदरी नारायणासही अगदीं हाच प्रकार आहे. येथें पाहाडी ब्राह्मण असतात तेही कोणास पाकशाळेंत जाऊं देत नाहींत, पण मी तें असेंच पाहिलें आहे व अगदीं तोच प्रकार येथें आहे.

प्रत्येक मडकें सुमारें एक शेराचें असतें, त्याला आडका असें ह्मणतात. हा एक शेराचा आडका आपल्या नांवानें जगंनाथजीस भोग चढविण्यास शंभर रुपये लागतात, असें पंड्यानें सांगितलें! तुमच्या नांवानें केवढा आडका चढवावयाचा? एक शेराचा किंवा दोन शेरांचा किंवा जास्ती चढवावयाचा—कमीचें नांव नाहीं—याबद्दल यात्रेकरूंस ते विचारतात. जगंनाथास हा आडका थोडाबहुत चढविलाच पाहिजे, त्याशिवाय यात्रा सफळ होत नाहीं व प्रसादाचा अधिकार नसतो, असें ते लोक सांगतात. एका आडक्याला एवढे रुपये कशाला लागतात हें मीं त्यास विचारलें तर तो म्हणाला हा येथें ठराव आहे. म्हणजे यात्रेकरूंकडून पैसे काढण्याचें हें महाद्वार आहे. कारण शेराला शंभर रुपये म्हणजे चिपट्याचा हिशेब केला तरी पांच, सहा रुपये होतातच. प्रत्येक यात्रेकऱ्याकडून असे पैसे निघाले म्हणजे रक्कम शंभराच्यावर सहज जाते. निरनिराळ्या यात्रेमध्यें यात्रेकरूंकडून पैसे काढण्याचीं अशीं निरनिराळी साधनें असतात पण आपण त्यांच्या नादीं लागूं नये. आपल्याला देवाला जितक्या पैशांचा नैवेद्य करावयाचा असेल, तितक्याचाच आपला आडका ह्मणून सांगावें व तेवढे पैसे देऊन टाकावेत ह्मणजे झालें. पंडे म्हणतात यात्रेकरूंकडून हे जे पैसे मिळतात ते सर्व एकत्र करून त्याच्या व्याजावर

आमचें व देवाचें पोट चालतें. पण हें ह्मणणें केवळ खोटें दिसतें. कारण असें असतें तर यात्रा आपल्या घरीं नेण्याचा एवढा अट्टाहास कोणी केला नसता व आपल्याजवळ वंशपरंपरेच्या वंशावळी लिहून घेतल्या नसत्या. या पंड्यांना सुद्धां कांहीं येत नाहीं. यात्रेकरूला फक्त त्यांच्या पाया पडावयास सांगून त्याकडून त्याला सुफलाचा आशिर्वाद मात्र घ्यावयाचा असतो. हे पंडे यात्रेकरूला आपल्या हातून प्रसादाचें भोजन घालतात व त्याबद्दल कांहीं द्यावयास नको असें ह्मणतात पण मग दक्षणेची हेंगल घालीत बसतात व जेवण काढतात. ह्मणून आपण प्रसाद प्रथमपासूनच विकत घ्यावा ह्मणजे झालें. त्यांनीं आपली राहण्याची सोय केली, देवदर्शन करविलें त्या सर्व मिळून आपल्याला जें कांहीं द्यावयाचें असेल तें द्यावें. ते असंतुष्ट राहणारच. येथेंही स्वतंत्र फार मोठाल्या धर्मशाळा आहेत त्यांत असंख्य यात्रेकरू उतरतात. येथील म्युनिसिपालटीनें पंड्यांचीं घरें मोजून त्यांत किती यात्रेकरू घ्यावे हें ठरविलें आहे. त्यापेक्षां जास्त घेतां कामा नये. रामेश्वराप्रमाणें येथील संडासही उघडेच असतात. धर्मशाळेंत उतरल्यास पंड्याच्या आडक्याचा व नांवनोंदणीचा कांहीं त्रास नसतो. आपण दिलेल्या पैशाचा एवढा आडका एका माणसाला पुरत नाहीं मग तीन देवांना कसा पुरेल? वगैरे त्यांचें बोलणें चालू असतेंच पण आपण तिकडे लक्ष देऊं नये. त्यांचा जसा शंभर रुपयांचा आडका तसा आपला हा आडका समजावा. हें जशास तसें आहे, यांत देवाचा कांहीं संबंध नाहीं. शिवाय आपल्या नांवानें नेवैद्य दाखविला जातो किंवा नाहीं, हें कोणास ठाऊक? वस्तुतः त्या प्रसादाशीं ह्याचा कांहींएक संबंध नसेल. प्रसाद हवा तेवढा यात्रेच्या मानानें करतात व हवा तसा विकतात. पंड्या मात्र यात्रेकरूचे पैसे खिशांत टाकतो. कारण पाकशाळेंत कोणासच जाऊं देत नाहींत व नेवेद्याचे वेळींही जाऊं देत नाहींत. सारांश दानधर्मांत आपल्याला

करावयाचें तेंच करावें; चिकित्सा करीत बसूं नये. आपण मनोमय केलें ह्मणजे तें देवाला पावतेंच. येथील बाजारांत देवाच्या भोगाचे--प्रसादाचे--लाडू मिळतात, ते मात्र बरेचसे घेऊन जावे. उन्हाळा असल्यामुळें ते चार पांच महिनेसुद्धां टिकतात असें ह्मणतात. त्यांत कापूर, देवाचें अष्टगंध वगैरे सुगंधी द्रव्येंही असतात. ह्मणून हा प्रसाद घरीं वाटण्यास घ्यावा किंवा मांवद्याचे वेळीं महाप्रसादांत तो घालावा ह्मणजे सर्वांसच पोंचेल. जास्त घेतल्यास प्रवासांत फराळाचेंही काम करितो.

ह्यावेळीं ह्मणजे दुपारीं एक दोन वाजतां देवळांत गर्दी कमी होती म्हणून देवळाची सर्व रचना आंतून बाहेरून पाहिली. देवळांतील बहुतेक भाग मेणे, पालख्या, वाहनें वगैरेंनीं भरला आहे. शिवाय खांबांवर व शिखरावर खोदलेलीं चित्रें बरींच आहेत. त्यांत दशावतार, देवदानवांचीं महायुद्धें, कृष्णगोपींच्या विलासांचे देखावे, रासक्रीडा दाखविल्या आहेत. त्यांत कित्येकांच्या विलासाचा अगदीं स्पष्ट कळसच केला आहे. कृष्णाच्या देवळांत हा प्रकार कमी अधिक दृष्टीस पडतोच. मोठमोठ्या दीपमाळा, निरनिराळ्या कामाच्या कोठ्या वगैरे सर्व व्यवस्था पाहिली. हें देऊळ फार उंचच उंच आहे पण दक्षिणेंतील देवळांप्रमाणें याला गोपुरें नाहींत. एकही गोपूर नाहीं. फक्त भोंवतीं २५।३० फूट उंचीचा तट आहे व त्या मानानें आंत जाण्यास १५।२० फूट उंचीचे मोठमोठे भलेभक्कम दरवाजे आहेत. गांवांत जिकडे तिकडे जगंनाथाचीं देवळें व प्रतिमा आहेत. सर्वांचा फोटो देवळांतल्या मूर्तीसारखाच आहे.

जगन्नाथ हें चार धामांपैकीं आहे. उत्तरेस बदरीनारायण, पश्चिमेस द्वारका, दक्षिणेस रामेश्वर व पूर्वेस जगंनाथ. सर्वांत चारी धामांच्या यात्रेची योग्यता मोठी आहे. कारण उघडच आहे कीं, तीं हिंदुस्थानचीं चार टोकें असल्यामुळें सर्व आर्यावर्त पाहावा लागतो.

यामुळें एकदेशीयत्वानें मनुष्याच्या बुद्धीवर जे एकलकोंडेपणाचे अनिष्ट परिणाम झालेले असतात ते पार निघून जातात व आपल्या सर्व आर्यबंधूंची शहाणी व ओळख होऊन त्यांच्याविषयीं आदर उत्पन्न होतो. अलीकडे आर्यावर्तांत केवळ हिंदूंचीच वस्ती नसून त्यांत मुसलमान, ख्रिस्ति, पारशी यांचें मिश्रण झालें आहे आणि रेलवेनें त्यांचें वारंवार संघटण होत आहे. यामुळें आतां यात्रेकरू यात्रेच्या योगानें विश्वकुटुंबी बनतो. विश्वकुटुंबी होतो ह्मणजे बाट्या होतो असा अर्थ नाहीं, तर ठिकठिकाणचे उत्सव व मेळे व आपल्या व निरनिराळ्या धर्माचें कौतुक पाहून त्याला आपल्या स्वधर्माविषयींच खरा अभिमान उत्पन्न होतो. द्वेष मात्र जातो पण धर्माचें खरें स्वरूप व रहस्य कळतें. धर्म हा संघशक्ति निर्माण करण्याकरतां असतो, द्वेष किंवा फुटाफूट वाढविण्याकरतां नसतो. पाश्चिमात्य हे खरोखरच धर्मलंड आहेत, कारण त्यांच्यामध्यें धर्मबंधन असें ह्मणण्यासारखें नाहीं व असल्यास ते पाळीत नाहींत; बाह्यबंधनें मात्र पाळतात. धर्मासंबंधानें ते उदासीन आहेत हें खरें आहे. तरी परराष्ट्रांत आपलें राज्य राहाण्याकरतां व आपल्या वतीची संघशक्ति निर्माण करण्याकरतां परराष्ट्रांतील लोक बाटवून स्वधर्मांत सामील करणें हें ते लोक अत्यंत पवित्र कर्तव्य समजतात आणि धर्माच्या इतर बाबतींत फारसा खर्च न करतां शक्य होईल तेवढा धर्मप्रसाराकरतांच पैसा खर्च करतात. मुसलमानांनींही हेंच केलें. खरोखर हिंदुस्थानांतील परधर्मी लोक हे खरे हिंदू बीजाचे असतां त्यांस ख्रिस्ति व मुसलमान करून त्यांनीं हिंदू लोकांमध्यें आपसांत विरोध मात्र उत्पन्न केला आहे. परंतु आतां राष्ट्रीय सभेसारख्या मोठमोठ्या यात्रा निघून त्यांत सुशिक्षित लोक मुख्यत्वेंकरून पडल्यामुळें आमच्या ख्रिस्ती व मुसलमान बंधूंचे डोळे आतां कोठें उघडत आहेत. आणि त्यांना आतां असें पुरें समजूं लागलें आहे कीं, आमच्या खऱ्या

हिताचे भागीदार खरे हिंदूच आहेत, पाश्चात्य नाहींत. हल्लीं आम्हीं जरी विधर्मी झालों, तरी हिंदूंचें व आमचें रक्त एकच आहे आणि हेच शेवटीं आमच्या उपयोगी पडतील. तेव्हां हिंदूंशीं फटकून वागून आपलें चालणार नाहीं. हिंदूंना सुद्धां आतां असें कळूं लागलें आहे कीं, हिंदूंमध्यें ज्या असंख्य जाती आहेत, त्यांमध्यें ह्या दोन आणखी जास्त घातल्या ह्मणजे झालें. ते दुसरे देवाला भजतात तर हिंदूंचें तरी एक उपास्य दैवत कोठें आहे? अशी द्वेपबुद्धि कांहींशी कमी होत चालली आहे, हा अलीकडच्याच राष्ट्रीय यात्रांचाच खरा परिणाम आहे. मात्र या यात्रा खालीं मान घालून करूं नये. असो. चारी धाम माझ्या हातून संपूर्ण झाले व ते ईश्वरकृपेनें निर्विघ्नपणें शेवटास गेले, देवानें सद्बुद्धि देऊन ही सेवा मजकडून करून घेतली याजबद्दल परमेश्वराचा मी अत्यंत आभारी आहें.

**'आपुलीया बळें नाहीं बोलवत, सखा भगवंत वाचा त्याची'**

ह्या तुकारामाच्या उक्तीप्रमाणें सर्व कर्ता हर्ता तोच आहे अशी माझी समजूत होऊन यावेळीं माझें मन स्थिर झालें. यात्रा संपल्यावर पंडे लोक वंशपरंपरा विचारून पुढील पिढीचे उपाध्ये होतात.

ओढ्या प्रांतांमध्यें श्रीविष्णूच्या चतुरायुध क्षेत्रांपैकीं जगंनाथाला शंखक्षेत्र ह्मणतात. ही यात्रा प्रथम झाली ह्मणजे मग यात्रेकरू चक्र, गदा व पद्म या क्षेत्रांत जातात. सर्व क्षेत्रें याच प्रांतांत आहेत. भुवनेश्वर हें चक्र क्षेत्र असून पुरीच्या उत्तरेस ३२ मैलांवर व खुर्दारोडपासून उत्तरेकडचें म्हणजे. कलकत्त्याच्या बाजूचें हें पहिलें स्टेशन आहे. येथें बिंदूसरोवर या नांवाचें मोठें म्हणजे १३००×७०० फुटांचें सरोवर बांधलेलें असून आंत उतरण्यास पायऱ्या आहेत व सभोंवार पुष्कळ देवळें आहेत. पूर्वीं भक्तिमहात्म्य फार होतें त्यावेळीं येथें सात हजार देवस्थानें होतीं असें ह्मणतात. तीं कालावधीनें नाश पावलीं आहेत, तरी अजून ४००।५०० चांगल्या स्थितीमध्यें

पाहाण्यासारखीं आहेत, त्यांत मुक्तेश्वराचें स्थान मुख्य आहे. भुवनेश्वराचें मुख्य दैवत लिंगराज महादेव व कपालेश्वरी देवी ( ही अष्ट मात्रकांपैकीं आहे. ) हीं मुख्य आहेत. जगंनाथाचे यात्रेनंतर ही यात्रा प्रथम करतात. वर सांगितलेलें बिंदूसरोवर हें पंचमहासरोवरांपैकीं मात्र नाहीं. खरें बिंदूसरोवर पहिल्या भागामध्यें मातृगयेच्या जवळ सांगितलें आहे तेंच आहे.

याच्या पुढचें त्याच लायनीवरचें स्टेशन जजपूर किंवा वैतरणी रोड, हें गदा क्षेत्र आहे. हें वैतरणी नदीचे डावे तीरावर आहे. ही वैतरणी समुद्रास मिळाली आहे तेथेंच कलंकी अवतार व्हावयाचा आहे असें पुराणांत सांगितलें आहे. कोकणांत ठाणें जिल्ह्यांत वैतरणी नदी आहे व तिच्या एका बाजूला दातिवरें व दुसऱ्या बाजूला अरनाळा आहे. पण हिची प्रख्याती एवढी नाहीं. केसरी राजघराण्याच्या वेळीं जजपूर हें फार प्रख्यात होतें. महावारुणी पर्वाचे वेळीं येथें यात्रा अति जमते. येथें भवानीचें मंदीर पाहाण्याजोगें आहे. वैतरणी सिंधुसंगमीं स्नान करण्याचें विशेष पुण्य आहे.

बाकी राहिलेलें पद्मक्षेत्र हें कोनाराक ऊर्फ मैत्रावन हें पुरीपासून वीस मैलांवर वायव्येस सागरतीरीं आहे. येथें सूर्यनारायणाचें देवालय काळ्या पाषाणाचें फार पुरातन आहे. पूर्वीं हें देवालय फार विस्तृत होतें. त्याचे भोंवतालचे भाग मोडून जगंनाथाला नेले. या विशाल देवालयाचें देवघर, जगमोहन, नरमंदीर आणि भोगमंदीर इत्यादि प्राकार फार मोठे होते. त्यांपैकीं जगमोहन ह्मणजे सभामंडप मात्र उरला आहे. याचें शिखर १०० फूट उंच आहे. हें अति उंच आहे ह्मणून येथें हल्लीं बोटींकरितां दीपगृह ठेविलें आहे. या ठिकाणीं पूर्वीं श्रीकृष्णाचा नातू सांब यानें श्रीसूर्यनारायणाची आराधना केली होती अशी आख्यायिका आहे. जवळच चंद्रभागा नदी आहे. या क्षेत्रीं चंद्रभागा सागरसंगमाचें स्नान, कल्पवृक्षाची पूजा,

सूर्यनारायणाची व नवग्रह मूर्तींची आराधना हीं मुख्य आहेत. माघशुद्ध सप्तमी ह्मणजे रथसप्तमीस येथें मोठी यात्रा भरते. यात्रेचे दिवसाशिवाय येथें कांहीं व्यवस्था नसते. या बाकीच्या क्षेत्रांस सवड असल्यास जावें. पण जगंनाथ ब्रँचवर गोपाळपूर ह्मणून अलीकडचें स्टेशन लागतें तेथें जरूर उतरावें व दर्शन घेऊन पुढें जावें. हीं शंख, चक्र, गदा इत्यादि आयुध क्षेत्रांचीं नांवें कशीं पडली हें समजत नाहीं. या यात्रेनंतर मीं

## कलकत्ता

येथें गेलों. जगंनाथास थर्डक्लास तिकीट ऑफिस व वेटिंगरूम, स्टेशन पासून अलग प्रशस्त मैदानांत आहेत. पण यात्रा फार भरते त्या मानानें हीं अगदीं लहान आहेत. येथें तिकीट पाहिजे तेव्हां मिळतें व खोटी होत नाहीं हें बरें आहे. कलकत्त्याहून जगंनाथाला रोज एक पॅसेंजर व एक मेल गाडी जाते व त्याच पुन्हा कलकत्त्यास परत जात असल्यामुळें खुर्दा रोडवर उतरावें लागलें नाहीं.

बंगाल हा सर्व प्रदेश भातजमिनीचा व मैदानाचा आहे. जिकडे तिकडे भाताचीं शेतें हिरवीं गार दिसतात. ही सर्व शेती पावसावर व कालव्यांवर होते. पावसाचे येथें दोन मोसम आहेत. गंगेचे कालवे जिकडे तिकडे पसरलेले आहेत. मुलूख मैदानी व समपातळींतच असल्यामुळें जिकडे तिकडे पाणी पसरलेलें पाहून फार मजा दिसते. कारण सर्वत्र पाण्याचा दुष्काळ पण येथें पाण्याचा सुकाळ!

गाडी सूर्योदयाला कलकत्त्याला आली, पण घड्याळांत पाहातों तों पांचच वाजले. सूर्योदय झाला तरी पांचच कसे वाजले! मला वाटलें घड्याळ बिघडलें. पण दुसरे स्टेशनचे घड्याळाशीं तपासून पाहातां बरोबर आहे असें आढळून आलें. तेव्हां मग आठवण झाली कीं, कलकत्ता मुंबईच्या पुढें १५ अंश आहे ह्मणून

एकतास सूर्योदय अगोदर झाला! कलकत्त्यास हावरा स्टेशनवर पॅसेंजर व हमालांची गर्दी असल्यामुळें व सर्व गाडी खलास व्हावयाची असल्यामुळें कलकत्त्याचीं तिकिटें अलीकडच्या स्टेशनवर घेतात. व अशीं तिकिटें द्यावीं अशाबद्दल अलीकडच्या स्टेशनवर जिकडे तिकडे पाट्या लाविल्या आहेत हें एकप्रकारें बरें आहे. तिकिटें घेतल्यामुळें हावरा स्टेशनवर गाडी शेवटच्या प्लॅटफॉर्मवर ह्मणजे रस्त्यावरच लागली.

हावरा स्टेशनवर उतरल्यावर रीतीप्रमाणें कुली स्वागत करण्याकरतां आले होते, त्यांत एक गरीब महाराष्ट्र कुली दिसला. अर्थात त्यास मराठी येत होतें त्यामुळें मला भाषेची अडचण पडली नाहीं. हा कुली रेलवेचा नव्हता. कारण रेलवे मजूर स्टेशनपर्यंतच असतात व त्यांच्या दंडावर नंबर असतो. मी त्यास बोजा दिला हें रेलवे मजुरास सहन झालें नाहीं. त्यांनीं त्याच्याजवळून बोजा खालीं ठेवविला व त्यास प्लॅटफॉर्मवरून धक्क्या मारून घालवून दिलें, तेव्हां तो मजकडे पाहूं लागला. मी त्यास सांगितलें स्टेशनाबाहेर उभा राहा, मी येतों. त्याप्रमाणें तो बाहेर उभा होता. मी बोजा घेऊन स्टेशनाबाहेर गेलों व बोजा त्यास दिला व तो घेऊन प्रथम गंगासागरसंगमावर स्नानास चल असें सांगितलें. त्यानें हुगळी नदीच्या पुलापलीकडे जेथें स्नानघांट उत्तम बांधलेले आहेत तेथें नेलें. हुगळी नदीचा पूल फार प्रशस्त आहे. टांगे, मोटारींचा रस्ता निराळा, खटाऱ्यांचा निराळा, पायवाट निराळी असे त्यावर निरनिराळे मार्ग केले आहेत त्याप्रमाणें नदीच्या पात्रांतही उत्तम व्यवस्था केली आहे. बोटी, गलबतें, होड्या यांचे निरनिराळे मार्ग पुलाच्या ज्या कमानींतून त्यांना जावयाचें ते मार्ग ठरवून टाकले आहेत. स्नानघाटाचीही अशीच सोय केली आहे. गळाभर पाण्याच्या पलीकडे तारांचें जाळें लाविलें आहे. यामुळें नदीचे प्रवाहानें किंवा भरतीच्या वेगानें स्नानाला उतरलेला मनुष्य पुढें नदींत जाण्याचा संभव नसतो. या जाळ्यापर्यंत

पाण्यांत शेवटपर्यंत पायऱ्या बांधल्या आहेत, त्यामुळें प्रत्येकाला इच्छेप्रमाणें पाण्यांत उतरतां येतें. समुद्र जवळ असल्यामुळें त्याची भरती ओहोटी, बोटींचा धुडकूस यामुळें नदीचें पाणी फार गढूळ व गदळ होतें. तसेंच तें खारटही होतें. ह्या गंगासागर संगमाची योग्यता पुराणांतरीं फार मोठी सांगितली आहे. गंगेच्या उगमीं, त्रिवेणींत काशीस व ह्या गंगासागर संगमाच्या ठिकाणीं मनुष्याला स्नान होणें दुर्लभ आहे असें पुराणांतही सांगितलें आहे.

**सर्वत्र सुलभा गंगा, त्रिषुस्थानेषु दुर्लभा ।**
**गंगाद्वारे प्रयागेच, गंगा सागर संगमे ॥**

या सर्व ठिकाणीं मला स्नान घडलें व ही गंगामातेची मोठी कृपाच आहे असें मी समजतों. हल्लीं उत्तम साधनें झालीं आहेत पण कांहींएक साधन नसल्यास या तिन्ही ठिकाणीं स्नान घडणें बरेंच कठीण व धोक्याचें आहे खरें; जाण्यायेण्याचा रस्ताही फार वाईट म्हणूनच यास दुर्लभ म्हटलें आहे. अर्थात या योगानें मनाला निराळाच असा कठीण अनुभव मिळत असल्यामुळें त्यास विशेष पुण्यकारक म्हटलें आहे. पूर्वीं पायींच यात्रा करावी लागल्यामुळें सर्व गंगेस प्रदक्षिणा करावी लागे. ह्मणजे तिचे आदि, अंत कठीण आहेत तसाच मध्यही कठीण आहे. गंगायमुना यांचा ज्या ठिकाणीं संगम आहे तेथें पाण्याला दोन्ही प्रवाहांच्या वेगानें वेणीसारखा पीळ पडत असतो व खालीं वाळू आहे यामुळें पाय घसरून पोहणारा सुद्धां बुडण्याचा संभव असतो. खालीं डोकें वर पाय होतात! अर्थात स्नान दुर्लभ खरें पण होडयांच्यामुळें हें सुलभ झालें आहे. शिवाय हा संगमही निश्चित आहे म्हणजे त्याचें ठिकाण एक आहे असें नाहीं व हें पहिले भागांत त्या संगमाचे वर्णनाचे ठिकाणीं सांगितलेंच आहे.

गंगासागरीं स्नानाचे ठिकाणीं वर धरमशाळा आहे तेथें गंगेचें पूजासाहित्य गंध, तुळशी फुलें असतात तसें श्राद्धसाहित्यही असतें.

बंगाली ब्राह्मण संकल्प व पूजा सांगण्याकरतां व श्राद्धसंकल्पाकरितां तेथेंही आहेतच. स्नान संध्या केल्यावर प्रथम मी महाकाळीचे दर्शनास निघालों. ती तेथून तीन मैल लांब असल्यामुळें ट्राममध्यें बसलों. वाटेंत ठिकठिकाणीं ट्राम बदलावी लागते. कुली घेतल्यामुळें ट्राम कोठें बदलावयाची तें समजून बोजा घेण्याचा त्रासही चुकला होता. ट्राममधून शहरची सर्व शोभा दिसत होती. येथेंही ट्राम मुंबईप्रमाणें विजेचींच आहे. पण येथें प्रत्येक ट्रामचे दोन भाग ह्मणजे दोन गाड्या जोडलेल्या असतात. पहिलींत अपरक्लासचे लोक बसतात व दुसरींत लोअरक्लासचे लोक बसतात. अर्थांत दोहींचे दर थोडे निराळे आहेत. याप्रमाणें शहरची, रस्त्यांची, उतारूंची व रस्त्यावरील लोकांची, दुकानांची व घरांची शोभा पहात पहात मी महाकाळीचे देवळाजवळ आलों. तरी ट्राम स्टेशनपासून देऊळ, गंगेचे कांठीं म्हणजे अर्धा मैल दूर आहे. पण कुली असल्यामुळें रस्ता विचारावा लागला नाहीं, मी त्याचे मागून जात होतों. ट्राममधून मी शहराचे निरानिराळे देखावे पाहिले त्यांत मला हें शहर मुंबईपेक्षां सुंदर व स्वच्छ दिसलें नाहीं. बाकी कलकत्ता हें शहर मुंबईपेक्षां फार मोठें आहे. मुंबई शहराला तें बेट असल्यामुळें मर्यादा आहे, तशी याला नाहीं. कलकत्ता हें शहर हावरा, काशीपूर, चितपूर, माणिकतोळा आणि गार्डनरी या गांवांमिळून झालें आहे. याची लोकसंख्या बारा लक्ष आहे. येथील प्रेक्षणीय स्थळें रायल मिंट (टांकसाळ) स्टँडरोडवर, बोटॉनिकल गार्डन—शिवपुरला, झुलाझिकल गार्डन-अलीपूरला, एडन गार्डन, ऑशियाटिक इन्स्टीटयूशन, चौरंगी, हायकोर्ट, गव्हर्नमेन्ट हाऊस, किल्ला, इंन्जनीअरींग कॉलेज, मोठमोठ्या गिरण्या, खिदर बाजाराकडचें भूमिकैलास शिवमंदीर, महाकाली, जैन मंदीर वगैरे पाहण्यासारखीं आहेत. एक माहीतगार मनुष्य घेऊन किंवा टांगा करून हीं सर्व पाहून यावें. शिवाय मोठमोठ्या कंप-

महाकाली.



कलकत्ता.

वाचनालय,
ठाणे.

न्यांचीं दुकानें, पेढ्या, निरानिराळ्या रेल्वेंचीं शहरांतील तिकिट ऑफिसें पाहिलीं पण त्या सर्वांत मुंबईचाच नंबर वर लागेल असें मला वाटतें. येथील म्यूझियम पाहाण्यासारखें आहे असें म्हणतात. सर्व शहर पाहाण्यास निदान एक दोन दिवस तरी राहावयास पाहिजे होतें पण वेळ नव्हता ह्मणून तें राहिलें. टांगेवाल्यास दीड दोन रुपये दिले ह्मणजे तो सर्व दाखवून आणतो. परक्या मनुष्यास काय दाखवावयाचें असतें तें सर्व त्यास माहीत असतें. शिवाय माहिती करितां हें लिहिलें आहे.

ट्राममधून उतरून महाकालीचे दर्शनास गेलों. तेथें मात्र फळें, पुष्पें, मिठाई, दहीं, दूध व इतर सामानाच्या दुकानांची गर्दी होती. दर्शनाचीही गर्दीच होती कारण ती वेळ सकाळचे दर्शनाची होती. पण पंड्यास एक दोन आणे देऊन मी अन्य मार्गानें अगदीं जवळ जाऊन दर्शन घेतलें. मूर्ति तीन चार फूट उंच असून कृष्ण पाषाणाची आहे. अंगावर बंगाली पद्धतीचे सर्व अलंकार आहेत. जीभ लालभडक व फार मोठी असून खालीं लोंबत आहे पण ती लालभडक कागदाची आहे. मूळची आंत असावी असें दिसलें. मूर्तीचें स्वरूप उग्र आहे. गळ्यांत नररुंडमाळा, महिशासुरमर्दन, हातांत निरनिराळीं आयुधें, शिरें व कपालें आहेत. ही मूर्ति सिंदूरचर्चित नाहीं. हात मात्र सिंदूर लावलेले दिसले व ते पोशाखाच्या बाहेर सुटे दिसले. महाकाळीच्या देवळाबाहेर तिच्या आवारांत गंध, पुष्प, कुंकू व हविर्द्रव्यें यांचीं दुकानें आहेत. महाकाळीच्या नांवानें कोणास हवन करणें असेल तर एका शेगडीमध्यें होम (विस्तव) पेटवून व त्याच्याजवळ भाताच्या लाह्या, तूप वगैरे हवनीय द्रव्येंही घेऊन लोक बसले आहेत. वाटेल त्यानें महाकाळीच्या नांवानें मूठपशाचें हवन करावें. त्याचप्रमाणें महाकाली हें आदिशक्तीचें उग्र, रौद्र व तमोगुणात्मक रूप असल्यामुळें येथें कोंबडीं, बकरीं वगैरे पशुबलिदानाची अगदीं रेलचेल

असून ते लोक अगदीं सुऱ्या घेऊन तशा भक्तजनांची वाट पाहात असतात! ब्राह्मणांचाही पूजापाठ चालला होता. पण यांत सप्तशितीचा कोठेंही पाठ चालू नव्हता व सप्तशती ह्मणणारा एक ब्राह्मणही दिसला नाहीं. महासरस्वती व महालक्ष्मी हीं आदिशक्तीचीं रजोगुणात्मक व सत्वगुणात्मक रूपें असल्यामुळें तेथें असें तमोगुणात्मक बलिदान न होतां सात्विक वस्तूंचें बलिदान होतें. बाकी देव आपल्या भक्ताप्रमाणें आचरण करतो व त्याप्रमाणेंच होतो हेंच खरें. हें महाकालीचें स्थान फार पुरातन व विख्यात आहे. देवीपुराणांत हिचें विशेष महात्म्य आहे ह्मणूनच मी हिच्या दर्शनास आलों. देऊळ मोठें नसून अगदींच लहान व साधें आहे पण हें ३०० वर्षांचें जुनें आहे. हें महायात्रेचें मुख्य स्थान असल्यामुळें येथें दर्शनाची गर्दी नेहेमीं विशेष असते. आश्विन नवरात्रांत येथें मोठा उत्साह होतो, त्यावेळीं येथें व्यापारही फार मोठ्या प्रमाणांत होतो. पण या भागांत कलकत्त्यासारख्या सुधारलेल्या मोठ्या म्युनिसिपालिटीची असावी तशी स्वच्छता नाहीं. मला हा भाग साधारण गांवढ्यासारखाच दिसला. येथेंही एक गंगेचा फांटा नजीकच आला आहे. येथें पुष्कळ लोक स्नान करतात व दुसरेंही तलाव तीर्थें असून देवळें, धर्मशाळाही आहेत. मी एका धर्मशाळेंत कुलीसुद्धां उतरलों. येथील ब्राह्मण मांसाहारी असल्यामुळें खाणावळीची सोय नव्हती, ह्मणून स्वयंपाक करून कुलीसुद्धां भोजन आटोपून घेतलें. येथें दहीं दूध मात्र चांगले मिळतें. येथें धर्मशाळेंत बसावयास परवानगी आहे पण कोणी जेवावयाचें केल्यास—मग त्यानें जरी स्तोत्र केलें तरी—दोन आणे भाडें द्यावें लागतें. भोजन झाल्यावर थोडी विश्रांति घेऊन पुन्हा महाकालीचे दर्शनास गेलों. त्यावेळीं गर्दी नव्हती ह्मणून स्वस्थपणें दर्शन घेतां आलें.

या नंतर परत जाण्यास निघालों. वाटेंत तिकीट ऑफिसांत तिकीट घ्यावयाचें आहे असें कुलीस बजाविलें असतां तसें तो न करतां एक-

दम स्टेशनवर आला! ट्राममधून तेथें उतरल्यास पुन्हा तिकीट काढावें लागतें ह्मणून उतरलों नाहीं, तिकीट स्टेशनवर मिळेल असें तो ह्मणाला, पण स्टेशनवर पाहातों तों तेथें तिकिटांची अत्यंत गैरसोय होती. गांवांत दोन तीन तिकीट ऑफिसें असल्यामुळें येथें असा प्रकार होईलच असें मला वाटलें होतेंच. येथेंही थर्डक्लास तिकीट ऑफिसें स्टेशनच्या एका बाजूला आहेत. या ईस्ट इंडिया रेलवेचें रेलवे गाईड मिळतें त्यांत प्रथम हावरा स्टेशनचा नकाशा काढला आहे व त्यांत कोठें काय आहे, हें सर्व नीट दाखविलें आहे ह्मणून बरें आहे; नाहींतर या अवाढव्य स्टेशनांत कसलाच पत्ता लागताना. या गाईडांत कोणती गाडी कोणत्या लायनींवरून जाते, कोणत्या प्लॅट-फॉर्मवरून सुटते व कोणत्या प्लॅटफॉर्मवर येते हें सर्व दाखविलें आहे. या स्टेशनावरून हिंदुस्थानांतील सर्व भागांत गाड्या जातात. आसाम, डाका, दार्जिलिंग, मोंगीर, गया, मुंबई, नागपूर व मद्रास अशा ठिकाणीं जाणाऱ्या लायनी निराळ्या आहेत. या स्टेशनवर हिंदुस्थानांतील वाटेल त्या रेलवेस्टेशनचें तिकीट मिळतें. या गाइडांतील स्टेशनच्या नकाशांत निरनिराळ्या क्लासांचीं तिकीट ऑफिसें, लगेज ऑफिसें, निरनिराळ्या वेटिंग रूम्स वगैरे कोठें आहेत तें सर्व दाखविलें आहे. १०।१२ प्लॅटफॉर्म्स आहेत व तीन चार सडकाही स्टेशनांत प्लॅटफार्म-वर गेल्या आहेत. त्या ठिकाणीं बग्या, मोटार व निरनिराळ्या प्रकारच्या गाड्या उतारूंच्या सोयीकरितां व मालाकरितां उभ्या असतात. गाडींतून उतरल्याबरोबर एकदम रेलवेमध्यें बसतां व उतरतां येतें, यामुळें हमाली चार्जेस वगैरे पुष्कळ वांचतात. या गाड्यांची व प्लॅटफॉर्मची माहिती या गाइडांत दिली नसती तर परक्या मनुष्यांना त्याचा पत्ता लागताना. इनक्वायरी ऑफिसें जरी किती ठेविलीं तरी त्यांनीं व्यवस्था झाली नसती. प्रथम इनक्वायरी ऑफिसच सांपडण्याची पंचाईत पडली असती. येथें थर्डक्लास तिकीट ऑफिसाकरितां एक

मोठी लांबच लांब पडळ केली असून त्याला १०।१५ खिडक्या केल्या आहेत व प्रत्येक खिडकीवर येथें कोठल्या लाइनीचें तिकीट मिळेल याची पाटी लाविली आहे. सर्व पाट्या इंग्रजींत आहेत, त्या वाचून ज्यानें त्यानें आपल्या रेल्वेच्या खिडकीकडे जावें. थर्डक्लासमध्यें नित्यनियमाप्रमाणें गर्दी असतेच. गांवांत इतकीं तिकीट ऑफिसें आहेत तरी स्टेशनवर गर्दी आहेच. इतकी दांडगी रहदारी या स्टेशनवर आहे.

येथें थर्डक्लास तिकीट देण्याकरितां बंगाली बायका आहेत. गाडी स्टेशनमध्यें प्लॅटफॉर्मवर उभी राहिली तरी तिकीट देत नाहींत. तक्रार केली तर आतां तिकीट मिळेल जा, असें सांगतात. शिवाय बायका ह्या पुरुषाचें काम करूं लागल्या तरी त्यांना पुरुषाप्रमाणें कामाचा उरक कसा येणार? त्यांना मुळींच उरक नाहीं. एकाचे पैसे घेतले ह्मणजे ते नीट तपासून घेऊन तिकीटाची नीट तपासणी करून मग तें देतात. मग दुसऱ्याचें द्यावयाचें. त्यांत कोणी लांबचें किंवा ओढ वळणाचें तिकीट मागितल्यास तीं पुस्तकें काढून हिशेब करतां करतांच व्यर्थ वेळ निघून जातो व गर्दीमध्यें धक्केबुक्के मात्र खावे लागतात. प्रत्येक खिडकीवर पोलीसचा बंदोबस्त असतो. जाण्यायेण्याचे कटडे वेगवेगळे असतात, पण अति गर्दीमुळें त्यांचा फारसा उपयोग होत नाहीं. थर्डक्लास तिकीट ऑफिसमध्यें बायका नेमल्यामुळें तिकीटाची येथें फारच गैरसोय व अव्यवस्था आहे. ईस्ट इंडिया रेल्वेवर मेलचे थर्ड-क्लासचे दर निराळे नाहींत. मात्र तिकीट २०० मैलांपुढचें असलें पाहिजे. मला मुंबई मेलमधून काशीस जावयाचें होतें. मेल उभी राहिल्याबरोबर गांवांतून ज्यांनीं ज्यांनीं तिकीट काढून आणलें होतें त्यांनीं सर्व गाडी गच्च भरून गेली व मला वेळीं तिकीट न मिळाल्यामुळें माझी मेल चुकली! स्टेशनावर तिकीट न देण्याचें कारण हेंच आहे असें मला मागून समजलें. गांवांतल्या तिकिटांनीं गाडी भरली तर जागा नाहीं ह्मणून स्टेशनवर तिकिटें देतच नाहींत. ज्याला

निश्चयात्मक गाडी साधावयाची इच्छा असेल त्यानें गांवांतूनच तिकीट काढावें. ही माझी चूक झाली म्हणून मला मागून पॅसेंजरनें जावें लागलें. यामुळें वाटेंत जेवण्याकरतां एके ठिकाणीं उतरावें लागलें व मोंगलसराईंत जाण्यास एक दिवस जास्त लागला.

हावरा स्टेशनवर आह्मीं आल्यावर कुलीला ठरविल्याप्रमाणें पैसे देऊं लागलों, तर तेथेंही त्याची तक्रार झालीच. तो म्हणाला माझा सर्व दिवस मोडला मला जास्त पैसे द्या. मी ह्मटलें, तुला जेवावयाला मिळत नव्हतें तें जेवूं घालून ठरल्याप्रमाणें पैसे दिले, तरी तूं नाखूषच झालास! ह्मणजे हेंगल घालून पैसे उपटणें हें ह्यांचें ब्रीदच असतें. प्रथम ओझें मिळण्याकरतां फार गयावाया करतात व वाटेल ती अट कबूल करतात व मिळाल्यावर अशी घासाघीस करितात. आपण कटकटीला कंटाळतों हें त्यांना माहीत असतें, म्हणूनच ते कटकट करून पैसे उपटतात. पण कटकटीला कंटाळून उपयोगीं नाहीं. प्रसंगीं ती थोडीबहूत केलीच पाहिजे. एवढ्याच करतां वारंवार ह्या गोष्टी लिहाव्या लागतात. मेल निघून गेल्यावर सहा तासांनीं पॅसेंजर निघणार होती, अर्थात वेळ पुष्कळ होता, म्हणून फराळ वगैरे आटपून गाईडवरून विचारपूस करून सर्व स्टेशन स्वस्थपणें पाहिलें. आजपर्यंत मी रेलवेचीं जीं स्टेशनें पाहिलीं त्यांत याचा नंबर मुंबईच्या पेक्षांही बराच वर लागतो. येथील व्यवस्था, सुखसोयी, व अवाढव्य-पणा वाखाणण्यासारखा आहे. हुबळी नदीचा पूल उलटून गेल्यावर सर्व स्टेशनच लागतें व तेंही पाहाण्यासारखें आहे. येथें तिकीट घेण्याच्या मात्र भानगडींत पडूं नये, तें गांवांतूनच घ्यावें व विसर-ल्यास पुन्हा गांवांत जावें. स्टेशनपासून ट्रामनें तिकीट ऑफिसांत गेल्यास जाण्याचा एक आणा व येण्याचा एक आणा, दोन आणे खर्च होतील खरे पण तिकीट सुखानें मिळेल; परंतु तें स्टेशनवर पोलिसाला चार आणे दिले तरी मिळणार नाहीं. गांवांत तिकीटें फक्त दिवसा

मिळतात, रात्रीं मिळत नाहींत. दोन्हीं ठिकाणीं हिंदुस्थानांतील वाटेल त्या स्टेशनचें तिकीट मिळतें. मेल चुकल्यामुळें स्टेशनची सर्व माहिती करून घेतां आली हा मात्र फायदा झाला.

या रेलवे लाइनीवरील शोण नदाचा पूल फारच मोठा आहे. ह्मणजे हा सुमारें दोन मैल तरी असावा असें वाटतें. पात्र फार मोठें असल्यामुळें उथळ आहे. पाण्याचे पाट क्वचित् ठिकाणीं आहेत. एवढा मोठा महानद पण तो सर्व उन्हाळ्यामुळें कोरडा पडला होता व सर्वत्र रेती होती. गयेस मागें गेलों असल्यामुळें पुन्हां गेलों नाहीं. याच रस्त्यांत वाटेंत तारकेश्वर, पारसनाथ, वैद्यनाथ, जगदीशपूर हीं देवस्थानें व राणीगंज येथील कोळशाच्या खाणी वगैरे पाहण्यासारखीं स्थळें आहेत. तसेंच गंगेच्या दुसऱ्या बाजूनें रेलवेनें गेलों असतों तर दार्जीलिंग येथील कांचनगंगा इत्यादि हिमालयाचीं बर्फाच्छादित शिखरें रेलवेंत बसूनही पाहातां आलीं असतीं. तसेंच मधल्या रेलवेनें गेलों असतों तर पाटणा, मोंगीर, राजमहाल, मूर्शिदाबाद व डाका हीं ऐतिहासिक व पौराणिक स्थळें पाहातां आलीं असतीं.

जिकडे तिकडे गंगेचा महिमा काय वर्णावा? ती परलोकींसुद्धां सुख देणारी आहे हें खचित. कारण मनुष्याचीं इहलोकचीं बरीं वाईट कृत्यें जर परलोकच्या सुखदुःखाला कारणीभूत होतात व त्याप्रमाणें त्यास पुनर्जन्म येतो, असा सर्व धर्मांचा सिद्धांत आहे. त्याचप्रमाणें गंगेचे इहलोकींचे उपयोग फार आहेत, अर्थात ते सर्व धर्मीयांना लागू आहेत. ह्मणूनच हिच्या कांठीं प्राचीन काळापासून फार बलाढ्य व धनाढ्य अशीं राष्ट्रें झालीं. जवळच्या मगध देशांत जरासंध वगैरे मोठमोठे पराक्रमी राजे झाले. अद्यापही गंगेच्या कांठीं अत्यंत सुबत्ता आहे. तिच्यांतून व्यापारोपयोगी गलबतें जातात, तरी व्यापाराचें दळणवळण संपत नाहीं. ह्मणून तिच्या दोन्हीं कांठांनीं राक्षसी रेलवे झालेल्या आहेत व या रेलवेंतून माल व उतारू यांची इतकी गर्दी

असते कीं, आंत मनुष्याला बसण्याची पंचाईत पडते व डबे न मिळाल्यामुळें माल तसाच पडून राहतो तो गंगेच्या नावांतून जातो. असा गंगेचा इहलोकचा व्यापारी महिमा आहे. ह्मणजे ती इहलोकीं सुख देणारी आहे, ह्मणूनच ती परलोकीं सुख देणारी आहे असें आर्यांनीं ठरवून व तिच्या ठिकाणीं देवत्व मानून तिचें भजन, पूजन व पूजा अर्चा करून तिच्या उपकाराची अंशतः तरी फेड करावी असें आर्यांनीं ठरविलें हें योग्यच आहे. हिंदूधर्मामध्यें कृतज्ञता बुद्धि जशी आढळते तशी इतर धर्मीयांमध्यें आढळत नाहीं. याच धोरणानें आर्यलोक कोयते, कुऱ्हाडी इत्यादि हत्यारें यांची विजयादशमीचे दिवशीं व नानाप्रकारचे दिवे यांची दिव्याचे अमावास्येचे दिवशीं इत्यादि ह्या जरी जड वस्तू आहेत, तरी त्या आपल्या उपयोगीं पडतात ह्मणून वर्षांतून एकदां तरी त्यांची पूजा करतात. आतां कोणी ह्मणेल कीं, या जड वस्तूंच्या संभावनेनें त्यांस काय सुख होणार? पण ईश्वर हा स्थिर व जड यांमध्येंही आहे असें सर्व धर्मांनीं मानलें आहे व अलीकडे कलकत्याच्या प्रोफेसर बोस यांनीं तो प्रयोग करून जडांना सुद्धां चैतन्य आहे व त्यांना सुखदुःख होतें असें दाखविलें आहे. अर्थात त्यांची केलेली पूजा त्यांच्या इष्ट देवतेस पोंचते हेंच खरें. याचें विवेचन थोडें बहुत मागें आलें आहेच.

वेळ व पैसा नव्हता ह्मणून वरील ठिकाणच्या यात्रा करणें राहिलें. ज्याला जशी इच्छा व सवड असेल तशा त्यानें त्या करून याव्या. मी मोंगलसराई स्टेशनवर आलों तेथें गुजराथी लोकांचें भोजनालय आहे. तेथें भाताशिवाय पुरी, भाजी, चिवडा वगैरे सर्व वस्तू चांगल्या मिळतात व त्या बऱ्या, स्वच्छ व ताज्या असतात, त्यामुळें त्यांचा विशेष खप होतो. काशी जवळच असल्यामुळें व तेथें जावयाचें असल्यामुळें मी याचा कांहीं उपयोग केला नाहीं. मोंगलसराईवरून मी

## काशी

येथें पुन्हा गेलों. कारण सर्व यात्रा संपल्यावर ती शेवटीं विश्वेश्वराचें दर्शन घेऊन त्याला किंवा ज्याच्या त्याच्या इष्ट देवतेला अर्पण करावी लागते. त्याकरतां मी येथें आलों त्याप्रमाणें पंचतीर्थीं स्नान, काशी-विश्वेश्वराचें दर्शन व प्रसाद घेऊन निघालों. ह्यावेळींही हिंदू युनिव्हरसिटी उन्हाळ्यामुळें बंद असल्यामुळें कॉलेज पाहाण्यास सांपडलें नाहीं. मी बनारस स्टेशनवर छोट्या गाडींत बसून पुन्हा

## प्रयाग

येथें आलों. येथें आल्यावर रामेश्वराचा सेतू यथाविधी पूजा करून संगमांत विसर्जन करणें हें यात्रेचें मुख्य काम त्याबद्दल पंड्यास विचारलें, तेव्हां त्यानें सर्व विधी सांगितला. पंड्या दक्षिणी ब्राह्मण होता व माझ्या माहितीवरून तो आमचा कुलगुरु असून प्रामाणिक होता. याशिवाय, काशी, प्रयाग येथें सुखवस्तू दक्षिणी भिक्षुक ब्राह्मणही पुष्कळ आहेत व त्यांचेकडेही कर्म यथासांग होतें. आमच्या ब्राह्मणानें सेतूपूजेकरतां एक तांब्याचें ताम्हन व त्यांत सेतूच्या वाळूच्या लिंगाची पूजा करून संपूर्णतेकरतां एक सोन्याचें बिल्वपत्र वाहावें लागतें, अभिषेकासुद्धां पूजेला निदान चार पांच ब्राम्हण तरी लागतात, तुम्हाला वाटेल तेवढा खर्च करा असें त्यानें रीतीनें सांगितलें. सदर सुवर्ण बिल्वपत्र येथील भिक्षुकांनीं केलेलें असतेंच. प्रत्येक पूजेचे वेळीं तें धुवून त्याचा उपयोग करतात. ताम्हनें वगैरे वरतूनी असतातच, फक्त पैसे दिले म्हणजे झालें. ह्या कृत्यास भोजनासुद्धां निदान दहा रुपये तरी लागतील असें त्यानें सांगितलें, तें मला पटून सर्व कृत्य यथासांग झालें व माझी यात्रा येथें परमेश्वर कृपेनें संपली. संकल्पित गोष्ट सिद्धीस गेली म्हणून मी काशीविश्वेश्वराचे आभार मानले.

काशीहून प्रयागास येण्यास काशीच्या बनारस स्टेशनवर येऊन

छोटया गाडीनें इजितब्रीज ( दारागंज ) येथें उतरावें. इजितब्रीज व अलाहाबाद यांचें भाडें सारखेंच आहे. पण अलाहाबादपासून संगम फार लांब आहे व इजितब्रीजपासून संगम अगदी जवळ आहे. ह्या बनारस स्टेशनवर एक हिंदू खिस्ती बुकें व त्याचीं चित्रें नुसत्या यात्रेचें गुणवर्णन करून विकीत होता. केवळ कमिशनकरतां तो हें काम करीत होता. पुस्तकावर गंगेच्या उत्पत्तीचा कथा वगैरे मनमोहक यात्रेकरूला भुलविणारे शब्द होते. कागद विलायती चांगले गुळगुळीत, पुस्तक मोठें आणि किंमत अगदीं कमी, एक किंवा दोन पैसे, यावरून कोणालाही तीं घ्यावींशीं वाटतात. रूप व किंमतीवरून मी त्या विकणाऱ्याला विचारलें, हीं खिस्ती मिशनरींचीं बुकें आहेत काय? तो म्हणाला नाहीं; आपल्याच शास्त्राचीं आहेत. म्हणून पुस्तक घेऊन वाचूं लागलों तों त्याचें पर्यवसान शेवटीं येशूवर! चित्रेंही तसलींच. पुस्तकें परत करणार तों तो मनुष्य नाहींसाच झाला!! मीं हीं पुस्तकें फाडून फेकून दिलीं. या योगानें तरी दुसऱ्या लोकांना त्याची कल्पना यावी. मिशनरी लोकांचा काय दीर्घप्रयत्न आहे पहा! तसेंच आपल्या लोकांचाही काय नीचपणा आहे तोही पहा! पुस्तकें विकण्याकरतां त्याला हिंदूच मनुष्य पाहिजे, कारण खिश्चनजवळून तीं कोणीं घेणारच नाहीं. काशीस येऊन तरी स्वधर्माचें वर्धन करावें तें सोडून केवळ थोड्या फायद्याकरतां कुऱ्हाडीच्या दांडयाप्रमाणें आत्मघाताला कारणीभूत होणारी ही नीच मंडळी आपल्या समाजांत दुसऱ्यांच्या संगतीनें व स्वदेशांत सुद्धां नीच वृत्तीशिवाय अन्य मार्गानें त्यांस पोट भरण्याची आशा राहिली नाहीं म्हणून अशीं नीच व आत्मघातकी कामें करणारी निघूं लागली आहे, याबद्दल फार वाईट वाटलें. सुवर्णभूमि म्हणून जो देश गाजला होता त्याच्या पुत्रांवर हा असा प्रसंग यावा हा केवळ कालमहिमाच आहे. मिशनरी लोक हिंदू धर्मसंस्थेच्या ठिकाणीं त्या देवाची वाटेल तशी निंद

करून आपल्या धर्माची थोरवी गातात व त्यांला प्रतिबंध केल्यास प्रतिबंध करणारास माजिस्ट्रेटकडून शिक्षा होते. पण ख्रिश्चन चर्च-जवळ आपण असा प्रकार केला तर ते सगळे लोक आपणांवर तुटून पडतात. माजिस्ट्रेटकडे जावें तर त्याची ते मुळींच दाद घेत नाहींत. माजिस्ट्रेट सुद्धां हिंदूच आहेत. पण ते राज्यकर्त्यांचे नोकर असल्या-मुळें 'कुऱ्हाडीचा दांडा गोताला काळ' याप्रमाणें झाले आहेत. हा राजकर्त्यांचा धर्मासंबंधीं उदासीनपणा आहे किंवा त्याचा फार्स आहे! याचा प्रत्येक हिंदूनें यापुढें तरी विचार करावा व त्याप्रमाणें वागावें.

मी यावेळीं प्रयागास गेलों ते दिवस अगदीं अखेरचे असल्यामुळें गंगा यमुनांच्या संगमावरसुद्धां पाणी फार नव्हतें, यामुळें संगमाची मागें पहिल्या भागामध्यें सांगितल्यासारखी चित्रविचित्र शोभा दिसली नाहीं. उन्हाळ्यांतसुद्धां ह्या नद्यांला हिमालयांतील बर्फ वितळून पूर येतात, पण उन्हाळ्याचे दिवसांत काल्व्यांकडे पाणी जास्त खर्च होत असल्यामुळें ह्या नद्यांस पाणी फार मिळत नाहीं व त्या फार कृश दिसतात. यामुळें गंगेचें व यमुनेचें वाळवंट रिकामें होतें, त्यांत तेथील लोक कांकड्या, टरबुजें वगैरे काचीच्या फळांचे वेल लावून फार उत्पन्न करतात. काशी व प्रयाग येथील टरकांकड्या व टरबुजें प्रसिद्ध आहेत. दोन्ही म्युनिसिपालिट्यांनीं नदीच्या पलीकडील गांवां-तून काशी व प्रयाग येथें येण्याकरतां रेल्वेशिवाय मोठमोठे पोकळ लोखंडी बोयरे टाकून तरते पूल करून दिले आहेत. हे पूल पाण्या-वर कमळासारखे तरते राहातात व पाणी जसजसें खालीं जाईल तस-तसे खालीं जातात व वर येईल तसतसे वर येतात. यांवरून गाड्या, घोडे सुद्धां जातात. या संगमावर सेतु विसर्जन करण्याकरतां अगदीं व्रतस्थ राहून कोणापाशीं भाषण न करतां केवळ काशीविश्वेश्वराचें किंवा इष्ट देवतेचें स्मरण करीत सोंवळ्यानें जाऊन तो संगमांत विसर्जन करावा लागतो. त्याप्रमाणें तो करून पुन्हा स्नान करून

घरीं येऊन ब्राह्मणभोजन केलें व यात्रेची समाप्ती आपल्या हातून यथाविधी व यथाशक्ति झाली ती परमेश्वरार्पण केल्यामुळें मनाला फार समाधान झालें.

दुसरे दिवशीं गंगेची कावड स्वतः आणून एक घासलेटचा कोरा स्वच्छ डबा घेऊन तो भरून रेलवे पार्सल करून घरीं पाठवून दिला. भरलेला डबा सुमारें रेलवेचे २१ शेर असतो. सबब डबा थोडा कमी भरून त्याला पक्का डाग करावा व पार्सल इजितब्रीज स्टेशनावरूनच रवाना करावें. कारण ही रेलवे हा नाशिवंत माल समजून निम्मे दरानें नेते. पण मोठ्या स्टेशनवर (अलाहाबाद स्टेशनावर) गेल्यास ती ह्मणजे औंध रोहिलखंड रेलवे पुरा चार्ज घेते! तसेंच वजन २० शेरांच्या ऐवजीं १९ शेर झालें तरी चालेल पण थोडें जास्त झाल्यास तीस शेरांचा चार्ज पडतो हें लक्षांत ठेवावें. डबा थोडा कमी भरावा ह्मणजे कांट्याच्या वजनाच्या फरकांत सुद्धां त्याचा अधिकपणा येऊं नये. ज्या ठिकाणीं पुरा चार्ज घ्यावयाचा असतो तेथें तो मागून दिला तरी चालतो, सबब अशा पार्सलचा चार्ज आगाऊ देऊं नये. तो पार्सल घेतेवेळीं द्यावा ह्मणजे पार्सलची नासधूस झाल्यास चार्ज भरण्याचें कारण पडत नाहीं. ज्या ठिकाणीं अर्धा चार्ज घेतात तेथें तो आगाऊ भरावा लागतो. पार्सल करणावळ खरोखर रेलवे नियमाप्रमाणें मास्तरास कांहीं द्यावयास नको, पण त्याबद्दल ते पैसे फार घेतात नाहींतर अडवितात. आंत गंगाच आहे कशावरून? साक्षीदार कोण आहे? नियमाप्रमाणें दोन साक्षीदार लागतात, पण मास्तरास पैसे दिले मग कांहीं लागत नाहीं. सबब हाही एक चार्जच आहे असें समजून द्यावा, तक्रार करीत बसूं नये. त्यांस खूष केलें नाहीं तर डब्याचो आदळ आपट करून तो गळावयास लावतात व शेवटीं डबा रिकामा जातो, गंगा वाहून जाते. कोणी घेणेस हरकत केल्यास आंत गटाराचें किंवा कसलें तरी पाणी भरून

सिल करून देतात. अशा गोष्टी वारंवार घडतात म्हणून असल्या वाबतींत त्यांची दाद घ्यावी हेंच उत्तम.

दारागंजपासून मोठें स्टेशन अलाहाबाद तीन चार मैल लांब आहे. स्टेशनवर जावयाचें आहे असें झटकेवाल्यास ( गाडीवाल्यास ) सांगितल्यास भाडें माणशीं आठ बारा आणे तरी कमींत कमीं मागतात. पण मधल्या चौकला जावयाचें आहे असें म्हटलें म्हणजे दोन आण्याला नेतात. चौक ही स्टेशन रस्त्यावर दारागंजपासून दोन अडीच मैलांवर व्यापाराची मोठी पेठ आहे. तेथें लोक हरहमेश बाजाराकरतां जातात. चौकहूनही स्टेशनवरची मंडळी जाते व येते, म्हणून तेथून स्टेशनला जाण्याला आणा दीड आणा पडतो. अशा रीतीनें तीन चार आण्यांमध्यें मनुष्य सहज स्टेशनवर जातो सारांश, दारागंजपासून स्टेशनवर जाणारा मनुष्य बहुधा यात्रेकरूच असतो. म्हणून त्याजकडून पैसे जास्त घ्यावयाचे म्हणजे हा यात्रेकरूवर कर आहे. हा कर गैरमाहितीनें किंवा भोळसरपणानें व्यर्थ भरावा लागतो. म्हणून अशा गोष्टीचा खुलासा करावा लागतो. दारागंजच्या झटकेवाल्यांना चौक म्हणजे कांहीं वाटत नाहीं, पण स्टेशन म्हणजे लांब वाटतें. वस्तुतः चौक २।२॥ मैल असून त्यापुढें स्टेशन मैल दीड मैल आहे. असें असतां हा केवळ समजुतीचा घोटाळा आहे.

येथें एक याबद्दल मजा झाली. एका पोलिस अमलदाराचे ओळखीची मंडळी दारागंजवरून स्टेशनवर जावयाची होती, म्हणून त्यानें झटकेवाल्यास स्टेशनचें भाडें काय म्हणून विचारलें; त्यानें रीतीप्रमाणें बारा आणे सांगितलें कारण त्यावेळीं तो ड्रेसमध्यें नव्हता. लगेच त्यानें टांगेवाल्याजवळ त्याचें लायसन्स बूक मागितलें व नंबर, नांव टिपून घेतलें तेव्हां तो घाबरला. पोलिसचे जे दोन मनुष्य जावयाचे होते त्यांस पोलिसनें लायसन्स शर्तीप्रमाणेंच तीन तीन आण्यांचे पैसे देण्यास सांगितलें. झटकेवाला म्हणाला, महाराज, महागाईमुळें परवडत

नाहीं. तेव्हां पोलीस ह्मणाला, तांगा ठेवलास कशाला? विकून टाक! मला काय सांगतोस? उद्यां तुला पोलीस कोर्टाचें समन्स येईल! ह्मणजे पोलीसला दयामाया मुळीच नाहीं. पण त्यावांचून हे तांगेवाले व मजूर वठणीस येत नाहींत हेंच खरें. हा प्रकार सर्वत्र आहे. मात्र थाला कर्तव्यदक्ष पोलीस लागतो. नाहीतर तो तांगेवाल्याला अनुकूल झाला, ह्मणजे सगळें फुकट जातें.

या स्टेशनवरून थेट भुसावळला जाण्याकरितां एक पॅसेंजर निघते. तिला नेहेमीं फार गर्दी असते. गर्दी फार पाहिल्यावर गाडींत बसण्याकरितां स्टेशनचे दरवाजे उघडीतच नाहींत, मग पोलीसचें व हमालांचें फावतें. ते हवे तसे पैसे घेऊन अन्य मार्गानें जाऊन उतारूंस गाडींत बसवितात. गाडी निघण्याची वेळ आली तरी दरवाजे कां उघडत नाहींत ह्मणून तपास केला, तेव्हां गाडी भरून गेली होती, जागाच नाहीं असें समजलें. २००।३०० मंडळी तशीच राहिली व मीही त्यांत राहिलों. आतां कसें करावें व प्लॅट फॉर्मवर जाऊन गाडी कशी मिळते याचा विचार पडला. ही गाडी चुकल्यास १२ तासांशिवाय पुन्हा दुसरी गाडी नाहीं व परत जाण्याचीही सोय नाहीं कारण रात्र पडली. मग प्लॅटफॉर्म तिकीट काढलें व फर्स्टक्लासचे दरवाजांतून प्लॅटफॉर्मवर गेलों तेथें गर्दीमुळें गाडींतील लोक दरवाजाच उघडूं देत नव्हते. मग हमालाला चार आणे द्यावयाचें कबूल करून त्यानें सवड असलेल्या डब्यांत माझें पाकीट खिडकीवाटे टाकलें व मग मी कसा तरी गाडींत बसलों व गाडी चालू झाली! अशा वेळीं प्लॅटफॉर्म तिकीटसुद्धां बंद करतात. पण कलकत्त्यास व मोठमोठ्या स्टेशनवर हा लायनीवर एक खांब केला आहे, त्यांत जोड पैसा टाकला ह्मणजे प्लॅटफॉर्म तिकीट आपोआप येतें. खांबामध्यें दोन दिडक्या सुट्या टाकतां कामा नये. अशा धोरणानें गाडी मिळाली. प्रसंगीं काय करावें लागतें, हें समजण्याकरतां इतकें लिहिलें आहे. अशा रीतीनें

यथासांग यात्रा संपल्यावर शेवटीं रामदर्शन घेऊन घरीं जावें ह्मणून मीं

## चित्रकूट

येथें जाण्याचा बेत केला व माणिकपूर जंक्शनवर उतरलों. गाडी चुकली असती तर चित्रकूटला जातां आलें नसतें पण रामकृपेमुळें हें दर्शन घडलें. माणिकपूर गांव अगदीं लहान आहे पण रेलवेच्या जंक्शनमुळें तो थोडा वाढला आहे. माणिकपुरापासून झांशीकडे जो फांटा जातो, त्या फांट्यावर चित्रकूट आहे. चित्रकूटास जाण्यास प्रथम माणिकपुरापासून करवी हें स्टेशन लागतें व त्यापुढें चित्रकूट स्टेशन आहे. पण चित्रकूट स्टेशनपेक्षां करवी स्टेशन जाण्यास चांगलें आहे. दोन्ही स्टेशनपासून चित्रकूट सारखेंच लांब आहे. पण करवी हें शिंदे सरकारचें तालुक्याचें गांव असल्यामुळें येथें गाड्या वगैरे मिळतात व करवीपासून चित्रकूटपर्यंत जशी थेट सडक आहे तशी चित्रकूटपासून नाहीं, नुसता रस्ता आहे. मी करवीस उतरलों व तेथून चित्रकुटास गाडी करून गेलों. तेथून चित्रकूट सुमारें पांच मैल आहे. मला चित्रकूटास सोडून गाडी परत गेली.

माणिकपूरपासून करवीपर्यंतचा प्रांत अगदीं डोंगराळ आहे, त्यांत वनस्पतीचा लेशही नाहीं. सगळे डोंगर उघडे बोडके आहेत. हा प्रदेश अगदीं रुक्ष दिसला. हा शिंद्यांच्या राज्यांतील प्रदेश आहे. चित्रकूट गांव अगदीं साधारण आहे. फक्त यात्रेकरूंकरतांच तो गांव वसला आहे असें ह्मटलें तरी चालेल. तेथील जुन्या इमारतींच्या अवशेषांवरून व नदीला घांट बांधले आहेत ह्मणून तो प्राचीनकाळीं प्रख्यात व संपन्न असावा असें दिसतें. पण हल्लीं त्याचें तें स्वरूप जाऊन तो कुग्राम झाला आहे. येथें पंड्यांच्या दुमजली धर्मशाळा, कांहीं आवश्यक पदार्थांचीं दुकानें याशिवाय येथें हल्लीं कांहीं उरलें नाहीं. हा सर्व प्रदेश डोंगराळ आहे व यांपैकींच ज्या एका डोंगरावर

रामचंद्रांनीं बरेच दिवस वास केला त्याला चित्रकूट ह्मणतात. हा डोंगर इतर डोंगरांपासून अगदीं सुटा आहे असें पाहून रामचंद्रांनीं अयोध्या सोडून प्रथम येथेंच मोठा मुक्काम केला. कारण दंडकारण्यास व राक्षस वस्तीस येथूनच आरंभ झाला. या दंडकारण्यास आरंभ येथून जवळच पांडवांचें खांडववन ( हल्लीं ज्याला मरेढची छावणी ) ह्मणतात तेथून होतो. याच खांडव वनांत मयासूर राहात होता. तो पांडवांचे तर्फेचा होता ह्मणून त्याचें रक्षण करून अर्जुनानें खांडव-वन अग्नीस दिलें. याच मयासुरानें पुढें पांडवांस मयसभा करून दिली. याच दंडकारण्यापासून राक्षसांचा विध्वंस करीत रामचंद्र लंकेंत गेले, व ज्याच्या हिंमतीवर आर्यावर्तांतील राक्षसशाही चालली होती त्या रावणाचा नायनाट करून सर्व आर्यावर्त आर्यांच्या सुधारणेस खुला करून दिला. राक्षसशाही होती तरी मिशनऱ्यांप्रमाणें आमचे ऋषी तुरळक तुरळक डोंगरांवर होतेच. त्यांनींच आर्यावर्ताचें महत्व रामचंद्रास सांगून त्याच्याच सामर्थ्यानें ही पुण्यभूमी केली. हल्लींचे मिशनरी व आमचे ऋषी यांत फरक मात्र मोठा आहे. हल्लींचे मिशनरी हे लोकांस स्वार्थाकरितां—स्वधर्म प्रसारार्थ विनाकारण तापद होतात तसे हे नव्हते. हे राक्षसांना उपदेश करीत नव्हते. ते ऋषी एकातांत असतां व अज्ञात तत्वाचा शोध करीत असतां हे राक्षस त्यांना विनाकारण त्रास देत व मानवांच्या प्रगतीचा मार्ग कुंठीत करीत. ह्मणून त्यांचा नायनाट करणें रामचंद्रास भाग पडलें.

येथील मुख्य तीर्थ मंदाकिनी नदी आहे. येथेंच काय तें स्नान दान मुख्यतः करावयाचें असतें. याच नदीवर रामानें दशरथाची उत्तरक्रिया प्रथम केली. रामाच्या वास्तव्यानें जशीं कांहीं ठिकाणें क्षेत्रें बनलीं, त्याचप्रमाणें हें ठिकाण क्षेत्र झालें आहे. ह्मणून या ठिकाणीं पितरांच्या उद्देशानें दानधर्म केला असतां तो विशेष फलप्रद आहे असें मानलें आहे. बाकी राम येथें फार दिवस राहिले, ते येथील

स्थानमहात्म्य पाहतच राहिले. चित्रकूट पर्वत बेताचा उंच असून तो अगदीं अलग आहे व त्यावर सहसा एकदम कोणाला चाल करून येतां येणार नाहीं. तेथून बऱ्याच लांब प्रदेशावर दृष्टि पोंचते. शिकारीची व पाण्याची सोय, सृष्टि सौंदर्य उत्तम. राक्षसांना प्रथमच वचक बसवावयाचा होता सबब त्यांच्या राज्यांत फार लांब एकदम शिरणें योग्य नाहीं. शिवाय आपल्या मागें अयोध्येची कशी काय स्थिति होत आहे, राज्य जाऊन बेबंदशाई होते कीं काय, या सर्व कारणांचा विचार करून रामचंद्र येथें फार दिवस राहिले. या नदीचें पात्र व घांट, त्यावरील उंच उंच इमारती ह्यांची शोभा टुमदार आहे. एकंदर तपश्चर्या करण्यासारखी जागा आहे. येथें वानरांचा उपद्रव फार आहे. घरावर कौलें घालतात, तीं हे फोडतात ह्मणून कौलांवर पुष्कळ बाभळीच्या कांट्यांच्या राशी घालाव्या लागतात. या वानरांमुळें कांट्यांचा उपद्रव येथें फार आहे. मला एका वानरानें फसविल्याची गोष्ट मी मागें सांगितली आहे, ती ह्याच ठिकाणीं घडली. बाजारांतून उघडा पदार्थ आणण्याचा उपाय नाहीं. घरांत जर दरवाजा उघडा ठेविला व माणूस नसलें ह्मणजे यांचें वानरी राज्य—मोड, तोड, आपट, फेंक वगैरे—सुरू होतेंच. नुसतें माणूस असून उपयोगी नाहीं, अगदीं दक्ष असलें पाहिजे. मनुष्य जरा नरम पाहिला कीं त्याच्यावर हे स्वारी करतातच. अगदीं काठी घेऊन बसलें पाहिजे किंवा दार लावून तरी घेतलें पाहिजे. यात्रेकरू आले ह्मणजे धर्मशाळेवर ह्यांची तीव्र नजर असते. येथें यात्रेकरूंना पंड्यांमार्फत स्वयंपाकास भांडीं वगैरे मिळतात. मंदाकिनीशिवाय पाणी नाहीं, ह्मणून धर्मशाळेंत पंड्यांनीं पाणीही आणून ठेविलेलें असतें. तें मडक्यांत ठेवितात ह्मणून कांहीं गार असतें.

मंदाकिनीवर माझें स्नान, दान वगैरे पंड्यामार्फत झालें. भोजनाची सोय नसल्यामुळें जेवण करून जेवलों. येथील यात्रेचा दुसरा

भाग ह्मणजे चित्रकूट पर्वताला प्रदक्षिणा ही होय. या पंचक्रोशींत निरनिराळ्या टेंकड्यांवर निरनिराळ्या देवतांचीं व तीर्थांचीं वगैरे येथें तेहे[illegible] स्थानें आहेत. त्यांत कोटी तीर्थ, दिवाण गंगा, हनुमान-[illegible]ीय. अ[illegible]कशिला, अत्रिऋषीचा आश्रम, गुप्त गोदावरी आणि भरतकूप हीं सात मुख्य आहेत. त्यांत अत्रिऋषीच्या आश्रमांत दत्तात्रेयांचा अवतार झाला. यात्रेकरूंस सवड असेल त्याप्रमाणें ते त्यांचीं दर्शनें घेतात. चित्रकूटाची प्रदक्षिणा पांच मैलांची आहे. ह्या पर्वतावर अद्याप रामचंद्राचा वास आहे असें समजून त्याच्यावर कोणी चढत नाहींत. तो राममय आहे असें समजून त्याच्या भोंवतीं प्रदक्षिणा करतात. ही प्रदक्षिणा जोडा घालून करतां कामा नये असें ह्मणतात. मला हें संकटच झालें, कारण ऊन फार रखरखीत, प्रदेश वाळूचा व त्यांत बाभळींचे कांटे रुतलेले, तेव्हां शेवटीं ही यात्रा बरीच सफळ होईल असें वाटलें. तीन वाजून गेले तरी ऊन फार कडक, चिटपाखरूंसुद्धां बाहेर पडत नव्हतें. हा प्रदेश रुक्ष व भणभणीत अशा स्थितींत मजबरोबर कोणी मजूरसुद्धां येईना. रस्ता माहीत नाहीं व राहाण्यास वेळ नाहीं मग ही यात्रा कशी होणार याचा विचार पडला. पण

**"सत्य संकल्पाचा दाता भगवान । सर्व करी पूर्ण मनोरथ"**

या तुकारामाच्या उक्तीप्रमाणें रामाचें नांव घेऊन पायांत कांहीं न घालतां रामदर्शनार्थ निघालों.

वेळ उन्हाची होती. या प्रदेशांत उन्हाळा फारच कडक आहे. रस्ता विचारण्यास मनुष्यसुद्धां भेटावयाचा नाहीं. पण डोंगर कोणता व प्रदक्षिणा कशी करावयाची याची स्थानिक मंडळीजवळ पूर्वीं विचारपूस करून अटकळ करून ठेविली होती. पायांत कांहीं न घातल्यामुळें डोंगराच्या पायथ्यापर्यंत वाळूच्या रस्त्यांत थोडेबहुत पाय भाजले. मध्यें मध्यें झाडें आहेत, त्यांत थोडी थोडी विश्रांती घेत होतों.

या वाटेंत पाणी नाहीं ह्मणून याच रस्त्यांत पाणी पिण्यास साधुसंतांचे मठ आहेत. या पंचक्रोशीची प्रदक्षिणा कशी करावी याबद्दल 'चित्र-कूट महात्म्य' नांवाचें लहानसें सचित्र पुस्तक येथें पहिल्या मठांतच विकत मिळतें. त्यांत पहिले दिवशीं किती चालावें, दुसरे [illegible] कसा व कोठें मुक्काम करावा, दर्शनें कोणाचीं घ्यावीं, प्रवासाला केव्हां निघावें, किती वेळपर्यंत प्रवास करावा, वगैरे सर्व सांगितलें आहे. याची किंमत दोनचार दिडक्या असून तें हिंदुस्तानी भाषेंत लिहिलेलें आहे. ह्या चित्रकूट पर्वतावर हिमालय, मानस सरोवरा-पासून आर्यावर्तांतील सर्व तीर्थें दाखविलीं आहेत. व एक चित्रकूट पर्वताची प्रदक्षिणा केली ह्मणजे सर्व तीर्थांस प्रदक्षिणा होऊन त्याच्या सर्व यात्रा घडून तो परम पदाला पोंचतो, असें तुळसीदासानें आपल्या दोहोऱ्यांत ह्मटलें आहे. हा दोहराही ह्या पुस्तकांत आहे.

चित्रकूट पर्वतापर्यंत सडक नाहीं, वाळूचा रस्ता आहे. पायथ्याशीं गेल्यावर प्रदक्षिणेचा मार्ग लोकांनीं सांगितला. तो मार्ग मात्र अति उत्तम ह्मणजे सीमेंट कांक्रिटनें जसें काम करतात तसा हा मार्ग केलेला आहे. अर्थात पायांत घालण्यचें कांहीं कारणच उरलें नाहीं. व वाटेंत एक दोन सोबती (साधू) प्रदक्षिणेकरितां तेथून त्याचवेळीं निघाले होते, त्यांच्याबरोबर गेलों. म्हणजे माझें संकट पाहिल्यावर रामानें सर्व सोई लावून दिली. ह्या प्रदक्षिणेभर सर्वत्र थोडीबहुत वस्ती व मुख्यत्वें-करून रामाचीं देवळें आहेत आणि तीं चांगल्या स्थितींत आहेत. ठिकठिकाणचे देवांचे पोषाखही उत्तम आहेत. ह्या चित्रकुटावर व मंदाकिनी नदीचे कांठीं जेथें जेथें राम बसत होते, तेथें तेथें त्या त्या स्थितीचीं दर्शक अशीं देवळें स्थापना केलीं आहेत. प्रत्येक देव-ळांत त्यांतील सर्व देवांमिळून एक दिडकी ठेवली तरी ८।१० आण्यांच्या खुर्दा पुरत नाहीं. पण दिडकी ठेविली म्हणजे पुजारी खूष असतात व सर्व देव दाखवितात. हा प्रदक्षिणेचा मार्ग, देवळें व

मंदाकिनीचे घाट राजे रामचंद्र कुवर यांनीं सुमारें २०० वर्षांपूर्वी बांधले असें म्हणतात. हल्लींही चित्रकूट हें संस्थान (जाहागिरी) आहे.

येथील सर्व देवस्थानें व भोंवतालची मनोहर सृष्टिशोभा दर्शनीय आहे. म्हणूनच या यात्रेंत या प्रदक्षिणेस प्राधान्य दिलें आहे. येथें लक्ष्मणाच्या एकांतवासांची टेकडी निराळी असून तें स्थान बरेंच कडकडीत आहे व येथें ब्रम्हचारी व तपस्वी राहातात. लक्ष्मण सर्व दिवसभर रामचंद्राच्या सेवेंत असे, पण रात्रीं ह्या ठिकाणच्या आपल्या पर्णशाळेंत निजावयास येई असें म्हणतात, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या देवळांत मात्र सीता व रामाशिवाय लक्ष्मणाची स्वतंत्र मूर्ती आहे चित्रकूटावरून रामचंद्राला परत अयोध्येला नेण्याकरतां भरत शत्रुघ्न हे कुलगुरू वसिष्ठ यांस सामोरे करण्याकरितां बरोबर घेऊन, रामास आणण्यास योग्य असा राजकीय लवाजमा व त्यास शोभेसें थोडेंसें सैन्य यासुद्धां मोठ्या सन्मानानें राम, लक्ष्मण व सीता यांस परत नेण्याकरतां मेणे, पालख्यासुद्धां आले होते. ते ज्याठिकाणीं सर्व बसले होते तें ठिकाण व ते चौघे भाऊ व सीता यांचें सर्वांमिळून 'पुढें काय करावयाचें' अशाविषयीं ज्या ठिकाणीं खलबत झालें, ती जागा अत्यंत प्रशंसनीय व पवित्र आहे. या ठिकाणीं त्यांचें स्मारक म्हणून त्यांचीं खडकांत पावलें उठल्याच्या खुणा दाखविल्या आहेत. अर्थांत त्या कृत्रिम आहेत, पण त्या ह्या स्मारकाकरतां केल्या आहेत. सीतेच्या दोन पावलांची खूण ती या प्रसंगीं जरा मर्यादेकरतां एका बाजूस बसली होती म्हणून निराळी दाखविली आहे व बाकीच्या चार जोडया जवळ जवळ अशा मर्यादेच्या आहेत. याच ठिकाणीं रामचंद्रांनीं भरत शत्रुघ्नाला उपदेश करून व त्यांच्या आग्रहावरून त्यांस आपल्या पादुका दिल्या त्या त्यांनीं रामचंद्रास नेण्याकरतां जी पालखी आणली होती त्याच पालखींत

घालून नेल्या व त्या सिंहासनीं स्थापन करून रामाच्या नांवानें त्यांनीं राज्य चालविलें.

भरत ससैन्य सपरिवार येत आहे असें चित्रकूटावरून राम, लक्ष्मण, सीता यांनीं पाहिलें, तेव्हां रामास आनंद झाला. सीतेलाही आपल्या घरची मंडळी भेटतील म्हणून आनंद झाला; परंतु सैन्य पाहून लक्ष्मणाच्या मनाचा ग्रह विपरीत झाला, कारण अयोध्येचें वातावरण त्याचे डोक्यांतून अजून गेलें नव्हतें. त्यानें रामास ह्मटलें, भरताला भेटावयास यावयाचें होतें तर एवढें सैन्य कशाला? अर्थात कांहीं तरी दगा असावा. कैकयीच्या इच्छेला भरत मिळून आपला वध करून, आपला कांटा कायमचाच काढून टाकण्याकरतां तो येत असावा असें त्यास वाटलें, पण रामानें त्याचा निषेध केला. भरत असें कधीं करणार नाहीं अशी त्याची पक्की खात्री होती. याउपर लढाईचा प्रसंग आलाच तर मजपुढें हें सर्व सैन्य मशाकाप्रमाणें आहे हें तूं पक्कें समज, मी त्यांचा केव्हांच पराभव करीन! पण पुढें भरत सर्व सैन्य खालीं ठेवून कुलगुरु वसिष्ठ यांना पुढें करून हात बांधून रामापुढें आला, तेव्हां रामालाही गहिंवर आला व सर्वत्र आनंदी आनंद झाला! पण या गोष्टीवरून रामलक्ष्मणांचे स्वभावामध्यें किती फरक होता? रामाचा सत्वगुणी दिलदारपणा, आत्मविश्वास व सामर्थ्य, तसेंच लक्ष्मणाचा रजोगुणी मानुषी स्वभाव व रामचंद्राचा दैवी प्रभाव यांची चांगली ओळख पटते.

या स्थानास या यात्रेंत विशेष मान येण्याचें कारण किंबहुना या यात्रेचें रहस्य या ठिकाणचा भरतास केलेला रामाचा उपदेश हें आहे. श्रीकृष्णानें अर्जुनास भारती युद्धाचे वेळीं उपदेश करून गीता सांगितली त्या गीतेच्या रसाचेंच सार ह्या उपदेशांत आहे. सबब त्याचें थोडेसें दिग्दर्शन तरी करणें भाग आहे. राम ह्मणतातः—भरता! राज्यावर बसून ऐषआराम भोगणें हें फार सोपें आहे, त्यांत विशेष

पुरुषार्थ नाहीं. राज्यावर बसून कितीं जरी प्रयत्न केला तरी दुष्टांचें शासन होणार नाहीं. आपल्या सारख्यांचा जन्म अशा चैनींत घालविणें अगदीं अयोग्य आहे. अजून अनार्यांचें—राक्षसांचें—वर्चस्व जिकडेतिकडे फार आहे व ते ऋषींस त्रास देऊन त्यांच्या यज्ञ यागांचा उच्छेद करीत आहेत. याचा आपण जर वेळींच बंदोबस्त केला नाहीं तर आपल्या जन्माचा उपयोग काय? आर्यांचा धर्म, तत्वज्ञान, विद्या, कलाकौशल्य यांची जगभर कीर्ति होण्यास व जगांत शांतता नांदण्यास अनार्यांचा (राक्षसांचा) नायनाट केलाच पाहिजे व सर्व आर्यावर्त सुधारणेस व मनुष्याच्या उत्कर्षास मोकळा करून दिलाच पाहिजे व मनुष्यजातीचें कल्याण केलें पाहिजे. कारण अनार्यांस (राक्षसांस) उपदेश करून ते ऐकावयाचे नाहींत. ते नरमांस भक्षक आहेत. आणि ही गोष्ट सामान्य मनुष्याचे हातून व्हावयाची नाहीं, ती मलाच केली पाहिजे. तेव्हां तुह्मी मला येण्याचा आग्रह करूं नका आणि मी येतही नाहीं. तेव्हां भरत ह्मणाला, तरमग आह्मीसुद्धां तुजबरोबर ससैन्य येतों. तेव्हां राम ह्मणाले, जितक्या आपल्या राज्यांत (प्रांतांत) सुधारणा झाली आहे, त्या प्रजेचें धर्मानें आपण रक्षण केलें पाहिजे. तेव्हां तुह्मीं राज्याचा बंदोबस्त ठेवा, मी हें काम करून येतों. मला सैन्याची किंवा कसलीही जरूर नाहीं! यांत मला दशरथ राजाची प्रतिज्ञा खरी करावयाची आहे किंवा त्यानें कैकेयी मातेस दिलेला वर हीं सिद्धीस न्यावयाचीं आहेत किंवा कैकयी रागावली ह्मणून मी असें करतों वगैरे मानुषी भांडण्याच्या किंवा खरें खोटें करण्याच्या कल्पनांचा गंधही नाहीं. याचें नांव समर्थता, पूर्ण आत्मविश्वास व मनावर घेतलेलें कार्य सिद्धीस नेण्याची तडफ व धमक!! वस्तुतः माणसें हीं राक्षसांचे भक्ष, त्या असंख्य राक्षसांना, ते सामर्थ्यवान ह्मणजे त्यांची राज्यें असतां, त्यांचा सैन्याचा बंदोबस्त असतां, एकट्या मनुष्यानें मारावयाचें म्हणजे एका उंदरानें मांजरांच्या समुदायाचा नाय-

नाट करण्यासारखें आहे! अर्थात हें काम कल्पनेनेंही होण्यासारखें नाहीं, मग प्रत्यक्ष कसें होईल? म्हणूनच भारतापेक्षां रामायणाचें जगास आश्चर्य वाटतें. पण हें ज्यानें केलें त्याचें अमानुष सामर्थ्य असलेंच पाहिजे. म्हणूनच त्यास परमेश्वराचा अवतार म्हणतात किंवा प्रत्यक्ष देव म्हणून रामाची पूजा करतात व अद्यापपर्यंत त्याचें गुण-गौरव करितात. रावणवधाचे वेळीं मारुतीसारखी साह्यकारी पराक्रमी वानरें, माकडें तरी होतीं, पण नाशकास एकट्या रामानें सीतेच्या रक्षणास लक्ष्मणास ठेवून खरदूषणादि चौदा हजार राक्षस एका लढाईंत मारले, हें सीता व लक्ष्मण एका टेंकडीवर उभे राहून पाहात होते. हें वर्णन मागें नाशीकच्या वर्णनांत आलेंच आहे. काय हें सामर्थ्य? म्हणून म्हणतात, राम रावणाचें युद्धाला कसलीही उपमा नाहीं. तें अनुपमेय झालें. तरी रामाला हें काम करण्याला एक तप म्हणजे बारा वर्षें लागलीं. गंगा यमुनापर्यंत त्यावेळीं सुधारणा झाली होती. चित्रकूटपासूनच प्रायः दंडकारण्य लागलें. डोंगरांच्या रांगां-मध्यें ऋषींचे आश्रम व राक्षसांची वस्ती होती. म्हणून पहिला मुक्काम रामचंद्रांनीं त्यांतील सर्वांत उंच व अगदीं अलग अशा चित्रकूटास ठेविला व तो तेथील काम संपेपर्यंत बरेच दिवस होता. नंतर या कार्यासंबंधीं असा बरेच दिवसांचा मुक्काम नाशकास पंचवटींत ठेविला होता. आणि असाच बरेच दिवसांचा तिसरा मुक्काम पंपा सरोवरावर केला होता. निरनिराळ्या मुक्कामाचीं निरनिराळीं कारणें त्या त्या ठिकाणीं दिलीं आहेत व अशा रीतीनें प्रांत सर झाला किंवा निष्कंटक झाला म्हणजे रामाचा मुक्काम पुढें जाई. ऋषी हे राक्षसांना शाप देऊन आपलें रक्षण करण्यास समर्थ होते पण अशा रीतीनें शाप दिल्यास तपश्चर्येचा क्षय होतो म्हणजे अतींद्रिय वादाकरितां मन निर्विकार राहावयास पाहिजे तें अशानें राहात नाहीं. अर्थात अज्ञेय वादाच्या शोधनास मदत होत नाहीं, म्हणून हें लढाईचें काम क्षत्रियांकडे

दिलें होतें. पण त्यांत त्यांचा नाश होऊं नये म्हणून त्यांस समंत्रक शस्त्रास्त्रांचा म्हणजे दैवी शक्तींचा गुरूपदेशही देत असत आणि हा उपदेश देतांना त्यांस बजाऊन सांगत होते कीं, या दैवी अस्त्रांचा उपयोग भलत्याच ठिकाणीं करूं नका; अगदीं जिवावरची वेळ येईल तेव्हांच करा. क्षुद्र वस्तूंवर हीं अस्त्रें सोडल्यास तीं तिचा नाश करून पुरेसें काम न मिळाल्यामुळें जगांत अनर्थ करितात. म्हणून त्यांनीं हीं अस्त्रें भलत्याच मनुष्याच्या स्वाधीन केलीं नाहींत. ही परंपरा अद्याप-पर्यंत चालू आहे. सर्प, विंचू यांचें मंत्र जे अद्यापपर्यंत अवशिष्ट आहेत ते भलत्याच मनुष्याला देत नाहींत. शिवाय त्यांची पाळणू-कही ठेवावी लागते, तेव्हांच ते कार्यक्षम होतात. नाहींतर कार्य कर्त्याचा नाश करतात ही अद्यापपर्यंतची प्रतीति आहे. रामचंद्राच्या ह्या प्रवासाचें वर्णन मोरोपंतांनीं आपल्या सीतारामायणामध्यें फार थोडक्यांत व उत्कृष्ट रीतीनें केलें आहे. मोरोपंतांच्या सर्व रामायणां-मध्यें हें रामायण सीतेच्या तोंडीं घालून तिनें हें आपल्या बहिणीस सांगितल्यामुळें अत्यंत प्रेमळ झालें आहे. नमुन्याकरितां त्यांतील कांहीं निवडक पद्यें यथा प्रसंग देणार आहें. तरी रसिक वाचकांनीं हें वाचून आपलें कौतुक पुरवावें अशी शिफारस आहे. वरील प्रसंग त्या रामायणांत असा लिहिला आहे.

**भावोजी चित्रकूटीं परतुनि नगरा न्यावया शीघ्र आले ।**
**माझे डोळे तुम्हांतें निरखुनि बहु हे तेधवां तृप्त झाले ॥**
**स्वामींच्या पादुकांतें वरुनि परतले बोध मानूनि मागें ।**
**विप्रांच्या मानिलें हो परम सुख अविघ्नत्व पावोनि यागें ॥**

राज्यवैभव भोगण्यापेक्षां विप्रांचे ( ऋषींचे ) यज्ञयागांचें रक्षण करण्यांतच मला सुख नाहीं तर परम सुख आहे असें रामांनीं स्पष्ट सांगितलें आहे. तुझी आई रागावली किंवा मी राज्यावर बसावें अशी तिची इच्छा नाहीं वगैरे मागें सांगितलेल्या भांडणांचा त्यांत लवलेशही

नाहीं; जणूं काय तें झालेंच नाहीं. ह्मणजे पितरांच्या किंवा वाडवडिलांच्या नजरचुकीनें किंवा मुद्दाम जरी त्यांच्या कांहीं चुका झाल्या तरी त्यांचा उच्चारसुद्धां करूं नये, मग भांडण कोठलें! तर आपल्या सामर्थ्यानें त्याची पूर्णता करावी हें तत्व अलीकडच्या मंडळींनीं रामचरित्रावरून लक्षांत ठेवण्यासारखें आहे. असा प्रकार झाल्यावर घरांत भांडणें होण्याचा संभव काय? रामकाळीं आम्हीं किती श्रेष्ठ पदावर होतों आणि हल्लीं आम्ही किती नीच स्थितींत आलों आहों हें यावरून स्पष्ट दिसेलच. त्या दृष्टीनीं पाहिलें असतां हल्लींचीं मुलें आपल्या नीच मनोवृत्तीनें पितरांचा निराळ्या प्रकारें उद्धार करितात असें ह्मणण्यास काय हरकत आहे? तसेंच. आईबापांना नेहेमीं आपलीं मुलें जवळ असावीं व त्यांनीं सुखांत असावें असें अंधप्रेमानें त्यांस वाटतें. पण कर्तृत्वान पुरुष त्यांना समजूं लागलें ह्मणजे ते आपल्या कार्याला लागतात. पण तें करितांना ते देव व पितर यांच्याविषयीं आपल्या अंतःकरणांत फारच प्रेम ठेवितात, हें अगदीं अलीकडे शिवाजीपर्यंत स्वराज्यांत पूर्णत्वानें होतें. त्यानें शहाजीला कधींही दुःख दिलें नाहीं किंवा नोकरी सोडा, अविंधांना कशाला मदत करितां, मला मिळा असें कधींच ह्मटलें नाहीं. हल्लीं ही घडी पूर्ण बिघडली आहे. स्वतः कर्तृत्व मुळींच नसून वाडवडिलांच्या चुका कोठून तरी हुडकून काढून त्यांची निंदा करण्यांत पुरुषार्थ मानतात. फार काय त्या त्या 'काळच्या' ऐतिहासिक कर्तृत्वसंपन्न मनुष्यांची सुद्धां निंदा करण्यांत त्यांस मोठें भूषण वाटतें हें पूर्ण अवनतीचें लक्षण आहे असें कोण ह्मणणार नाहीं? देशांतीलच काय पण घरांतील भांडणेंसुद्धां रामअवतारापासून आहेतच. परंतु कर्तृत्ववान् पुरुषाचें धैर्य त्यांच्या योगानें मुळींच खचत नाहीं. तो आपल्या कर्तृत्वाचे जोरावर नवीन सृष्टि निर्माण करतो. पण आपले मंडळीचें ज वाईट किंवा कमी आहे त्या विषयीं कोणाशीं भांडत किंवा कारणें

सांगत बसत नाहीं. रामासारखा पूर्ण पराक्रमी, नीतिसंपन्न, अलोट धैर्याचा, विरक्त, निग्रही व कुटुंबांत किंवा राज्यांत कोठेंहि फंदाफितूर असले तरी आपल्या सामर्थ्यानें त्याचा एकजीव करणारा रामराजासारखा राजा त्रिभुवनांत झाला नाहीं व पुढेंही होणार नाहीं. ह्मणूनच त्याची प्राणप्रतिष्ठा प्रत्येक आर्य ह्मणविणाऱ्यानें आपले हृदयांत करून तसे गुण आपले आंगीं आणण्याचा प्रयत्न करावा. रामकृपेनें जशी श्रद्धा व कर्तृत्व असेल तसे त्यास ते प्राप्त होतील. हीच खरी रामाची पूजा आहे. मंत्रपुष्पाक्षतांनीं मूर्तीची पूजा करणें हें केवळ भाविकांकरतां आहे. शिवाजी, पहिले बाजीराव, चिमणाजी आप्पा व कै. लोकमान्य टिळक ह्यांचेमध्यें असे स्वसामर्थ्यानें ग्रहकलह, व राज्यांतील फंदाफितूर मिटविण्याचे थोडे बहुत गुण होते ह्मणूनच त्यांची कीर्ति इतिहासांत अजरामर आहे व त्यांस अवतारी पुरुष ह्मणतात. असो. चित्रकूटाभोंवतालचा अशा रीतीनें बंदोबस्त केला. आपल्या वडिलार्जित राज्याची व्यवस्था केली व नंतर आम्ही जवळच्या अत्रिऋषींच्या आश्रमाला गेलों असें सीतेनें सांगितलें.

देउनि अभय मुनितें, आशीर्वाद प्रसाद जोडून ।
अत्र्याश्रमासि गेले, स्वामी तो चित्रकूट सोडून ॥

याप्रमाणें चित्रकूटच्या ऋषींना कायमचें अभय वचन देऊन व त्यांचा आशीर्वादरूपी प्रसाद घेऊन स्वामी रामचंद्र आह्मांला घेऊन तेथून जवळच अत्रिऋषीच्या आश्रमांत गेले.

अत्रिऋषींचा आश्रम असाच तेथील एका जवळच्या पर्वतावर आहे. अत्रिऋषीला व त्यांची स्त्री अनुसूयेला बरेच दिवस मूल नव्हतें. यामुळें त्या उभयतांनीं रामलक्ष्मणांचें व त्यांची बायको अनुसूया हिनें सीतेचें फारच मोठें कौतूक पुरविलें. आतां कोणी ह्मणतील कीं, सीता ही सासरच्या व माहेरच्या राजघराण्यांत अनुपमेय सुखांत वाढलेली, तिचें कौतूक एकादी तापसी केवळ अरण्यांत काय करणार? व तिनें

केलें तरी सीतेला त्याचा गौरव काय वाटणार? पण सीतेला त्याबद्दल किती आनंद झाला व काय सुख झालें हें तिनें त्या रामायणांत मुद्दाम सांगितलें आहे. खरें सुख ममतापूर्वक गोड बोलण्यांत व प्रेमानें वागवण्यांत आहे, श्रीमंतींत नाहीं हें सीतेला पूर्णपणें समजलें होतें. दागिन्यांची व राजवैभवाची हौस तिची पूर्ण झाली होती कारण राजघराण्यांत जिकडे तिकडे गृहकलह माजलेला, एकाचें तोंड पूर्वेस तर दुसऱ्याचें अगदीं पश्चिमेस, इतकेंच नव्हे तर गृहकलहाग्नी एवढा भडकला कीं, त्यांत कुटुंबांतील मुख्य मुख्य अशा दशरथासारख्या आधारस्तंभांच्या आहुती पडूं लागल्या. अशा स्थितींत राजघराण्यांतील सुखें तिला कितीशीं गोड लागणार? याचकरतां सीता देवीनें सर्वस्वाचा त्याग करून आपल्या आत्मसुखाकरतां तिनें रामचंद्राबरोबर वनवास पत्करिला. अशीच गोष्ट पेशवाईंत थोरले माधवरावांच्या वेळीं झाली. त्यांच्या वेळीं असाच गृहकलहाग्नी पेटून त्यांत माधवराव व नारायणराव यांच्या आहुती पडल्या! या सर्व खेळाचें धोरण पाहून रमाबाई सर्वस्वाचा त्याग करून आत्मसुखाकरतां माधवरावांबरोबर सती गेल्या. यावरून या दोघींची पतीविषयीं निष्ठा कमी होते असें नाहीं. त्यांच्या पातिव्रत्याचा महिमा अगाधच आहे व तो 'अहिल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी तथा' ह्या श्लोकानें जगांत दुमदुमतो आहे. पण सुखदुःख सांगण्याचा प्रसंग आला ह्मणून हें सांगितलें. आतां कोणी ह्मणेल, त्यांत सीतेला खरें सुख झालें असेल कशावरून? तर तें तिच्या शब्दांनीच पंतांनीं ह्या सीतारामायणांत वर्णन केलें आहे. पंतांनीं पुष्कळ रामायणें केलीं पण त्यांत सीतारामायणाची योग्यता गृहस्थाश्रमी लोकांना—त्यांत विशेषेंकरून स्त्रियांना—फार मोठी आहे. इतर रामायणें देव व भक्त यांच्या भक्तिभावाचें समर्थन करणारीं आहेत. पण सीतारामायण हें केवळ गृहस्थाश्रमी लोकांकरतां आहे. सीतेनें आपल्या अरण्यवासांत तिच्यावर जे सुखदुःखाचे प्रसंग आले ते तिनें

अरण्यवासांतून आल्यावर आपल्या बहिणीस सांगितले आहेत. सीतेच्या बहिणी त्या तिच्या जावाही होत्या हें प्रसिद्धच आहे. अर्थात तिनें आपल्या गुजगोष्टीसुद्धां निष्कपटपणानें त्यांनीं जशाजशा विचारल्या तशातशा तिनें त्या सांगितल्या आहेत. तें अत्यंत मनोहर काव्य आहे. तें सर्व काव्य रामभक्तांनीं जरूर वाचावें असें पुन्हां सांगतों. सीता अनसूयेविषयीं ह्मणते,

तद्भार्या अनसूया मजवरि करि सासुमायसी माया।
स्वकरींचि अलंकारी आहे प्रेमासि काय सीमा या ॥

ह्मणजे अनुसूयेच्या प्रेमांत आईची माया व सासूचा करारीपणा उर्फ शीस्त या दोहोंचें मिश्रण होतें ह्मणजे ती सासूप्रमाणें व आई प्रमाणें माया करीत असे हें मुद्दाम सांगितलें आहे. ह्मणजे अनुसूयेची माया आईप्रमाणें केवळ वेडी किंवा सासूप्रमाणें केवळ कडक शिस्तीची नव्हती. ती माझे भलतेच लाड करीत नसे तर तिच्यामध्यें या दोहोंचें मिश्रण होतें. आतां ती दागिने कसले घालणार? अर्थात वन्य लता-पल्लवांचे आणि तेच दागिने खरे आहेत. त्यांच्या अभावीं सोन्याचे घालतात. पण त्यांचेंसुद्धां कसें कौतुकाचें वर्णन आहे पहा.

वेणी घालुनि लोचनीं निजकरें ती लेववी कज्जळ ।
लावी चंदन सुव्रता मज गमे अंगाचि तें तज्जळ ॥
गुंफी सत्कुसुमें शिरीं सुरुचिरा माळा गळा अर्पुनी ।
प्रेमें धर्म कथी सुधाधिक रमें सूक्तें मला तर्पुनी ॥

याप्रमाणें वेणी फणी व सुवासिक फुलांचे दागिने घातल्यावर फावल्यावेळीं अत्यंत प्रेमानें अमृताप्रमाणें गोड अशा शब्दांनीं ती मला पतिव्रतांचे धर्म सांगत असे. तसेंच पुढें अरण्यवासांत कसकसे प्रसंग येतील व त्यावेळीं कसें वागावें याबद्दलच्याही तिनें आगाऊ सूचना मला दिल्या होत्या. ह्मणजे अरण्यवासाचें खरें शिक्षण सीतेला अनुसूयेनें स्वानुभवानें दिलें होतें.

तसाचि मङ्ललाटीं साध्वी सिंदूर तिलक जो लावी।
तोहि अगतसारसदा कैसी तत्सुकृत सिद्धि बोलावी ॥१॥
तो अंगराग चिरकाल तसाचि ओला।
यत्सौरभीं भ्रमर पंक्ति सदैव लोला ॥
घ्राणे क्षणांसि ह्मणती कुसुमेंहि डोला।
वेणी नवीच न सती यश शक्य बोला ॥ २ ॥
उष्णा उटी हिमीं ती उष्णीं ही सर्वकाळ परम हिमा।
वृष्टि न मदतिक्रम करि साध्वीचा न वदवेचि पर महिमा ॥३॥

ह्मणजे प्रत्येक कवितेमध्यें त्या साध्वीचा मोठेपणा गाऊन त्याबद्दल तिचे कृतज्ञतापूर्वक आभार मानले आहेत. याचें मुख्य कारण लग्न झाल्यापासून ह्या अरण्यवासांत प्रेमाचें गृहसौख्य काय तें तिला येथेंच मिळालें. तसेंच पुढें अगस्ती ऋषींच्या आश्रमांत त्यांची बायको लोपामुद्रा हिनेंही केलें होतें. पण तें थोडें. कारण तेथें फार दिवस मुक्काम नव्हता. शेवटलें ह्मणजे वनवासाच्या काळांतलें जेव्हां सीतेला रावणानें आपल्या बागेंत अशोक वनांत टाकलें होतें त्यावेळी तिचें समाधान बिभीषणाची बायको सरमा व तिची मुलगी त्रिजटा हिनें केलें. यामुळें या तिन्ही प्रसंगाची आठवण सीतेला विशेष राहिली होती.

तिच्या बहिणींनीं तिला विचारलें होतें कीं, अरण्यांत तुझी वेणी फणी कोण करी व काजळ कुंकु कोण लावी? त्याचें उत्तर तिनें वरील पद्यांत दिलें आहे. अनुसूयेनें जातांना जें काजळ, कुंकु, उटी व वेणी-फणी करून फुलांच्या माळा घातल्या होत्या व डोक्यांत फुलें गुंफिलीं होतीं त्यांचा बदल करण्याचा प्रसंग कधींही आला नाहीं. कारण लावलेलें कुंकू नेहेमीं ओलें व तकतकीत दिसे, तें कधींही मलीन झालें नाहीं. तसेंच वेणी नुकतीच घातलेली आहे असें नेहेमीं वाटे. तिच्यांतील फुलें व गळ्यांतील फुलांच्या माळा कधींही कोमेजत नसत,

तसेंच त्यांचा सुवासही कधीं कमी झाला नाहीं. नेहेमीं भुंग्यांच्या त्याच्यावर उड्याच पडत असत. सर्वांत विशेष गोष्ट तिनें लाविलेल्या उटीची होती. ती उटी नेहेमीं ओली राही आणि उन्हाळ्यांत ती थंड असे व थंडींत उबदार राही. त्या उटीमुळें पावसापासूनही मला कधींही बाधा झाली नाहीं. अशा रीतीनें ऊन, पाऊस, थंडी, वारा वगैरे सर्व आपत्तींपासून त्या उटीनें माझें रक्षण केलें. यामुळें मला दुखणीं कधीं आलीं नाहींत. हें सर्व त्या पतिव्रतेच्या महिम्यामुळें झालें नाहींतर होणें शक्य नव्हतें. किती वेळां स्नान केलें तरी उटीचा सुगंध व तेजस्विता कधींही कमी होत नसे. कोणी ह्मणेल असें कसें होईल? तर जिनें आपल्या पातिव्रत्यानें ब्रह्मा, विष्णू, महेश या तीन भिन्न सृष्टितत्वांना प्रसंगीं निःसत्व करून सगळ्यांना सारखें करून टाकलें, इतकें कीं आपलें मूळ तत्व कोणतें हें त्यांच्या बायकांनासुद्धां ओळखतां आलें नाहीं, तिला काय अशक्य आहे? अलीकडेसुद्धां एकाद्यानें वाईट नजरेनें एकाद्या कुलवधूकडे पाहिलें तर तिच्या नजरेनें-सुद्धां त्याचा पराक्रम नाहींसा होऊन तो फिका पडतो. मग ह्या गोष्टी अशक्य कां मानाव्या? एकाद्या ऋषीच्या आश्रमामध्यें वाघ, हरणें वगैरे ज्यांचें परस्पर हाडवैर ते प्रेमानें नांदूं शकतात अशा आख्याइका आहेत व अलीकडच्या प्रोफेसर कार्लेकर यांच्या सर्कशी-मध्यें ती गोष्ट आपल्याला प्रत्यक्ष पाहावयाला मिळते. तसेंच अलीकडे इतकीं उंची अत्तरें निघालीं आहेत कीं, कपडा परटाकडे दिला तरी-सुद्धां त्यांचा वास जात नाहीं. हीं अत्तरें खनिज नसून उद्भिज आहेत, अर्थात् वनस्पतींचीं आहेत. तेव्हां अशा प्रकारच्या वनस्प-तींची तिला माहिती असून तशा वनस्पती तिच्या आश्रमामध्यें होत्या असें दिसतें. ह्मणजे ही गोष्ट अशक्य नाहीं. पण असें मानल्यानें त्या पतिव्रतेचा महिमा कमी होईल असें कोणी ह्मणेल तर तें मात्र चुकीचें आहे. कारण कोणचाही मंत्र किंवा औषध याची त्याच्या नियमाप्रमाणें

पाळणूक केली तरच त्याचा गुण येतो; एरवीं नुसतें औषध माहीत असून गुण येत नाहीं. म्हणूनच सर्पाच्या वगैरे मंत्राची पाळणूक करावी लागते व कोळी वारली आपली औषधें प्राण गेला तरी हल्लींच्या आचारभ्रष्ट लोकांना तीं सांगत नाहींत. हा कडकडीत व्रतस्थपणा व पातिव्रत्य एकच आहे. म्हणजे सिद्धि ही पातिव्रत्याला, पवित्रतेला व पूर्ण साधुत्वालाच आहे. हल्लींच्या सारख्या अश्रद्धावान व सब् गोलंका करणाराला नाहीं. म्हणूनच अस्पृश्यताची जरूरी आहे.

वत्से मांडवि मद्विवाहचरित प्रेमें पुसे ती सती ।
सांगावी मज लागली निजमुखें सर्वा कथा तीस ती ॥
आशीर्वाद बहु प्रसन्न हृदया दे मायसी लोभवी ।
त्या आर्येसि तसेंच हीसहि महा वात्सल्य हें शोभवी. ॥

अशा प्रेमामध्यें आम्हीं नांदत असतां त्या साध्वीनें मला एक दिवस मला माझ्या लग्नाची हकीगत कौतुकानें विचारली. तेव्हां काय करावें? मला लाज वाटत होती तरी ती माझ्याच तोंडानें निरुपायानें मला सांगावी लागली. ती सांगितल्यावर प्रेमानें तिनें माझ्या पाठीवर हात फिरविला व आशीर्वाद दिला त्यावेळीं तो हात माझ्या आईनेंच फिरविला आहे असें मला वाटून माझें फार समाधान झालें. ह्या गोष्टी अनुसूयेच्या मायेच्या वर्णनाकरतां म्हणून मुद्दाम सांगितल्या आहेत.

मग तेथुनि उर्मिळे निघाले ॥ प्रभु जों दंडककाननीं रिघाले ॥
धरि राक्षस जो शरीर हातें ॥ नच हें हनसतां शरीं राहातें ॥ १ ॥
स्वामिनीं वधुनि ताप सारिला ॥ त्याक्षणें सकळ ताप सारिला ॥
हा विराध सुरमान्य तारिला ॥ तुंबरु प्रबळ शाप वारिला ॥ २ ॥

हे उर्मिळे ( उर्मिळा ही एक तिची बहिण व लक्ष्मणाची बायको होती म्हणूनच तिचें नांव वारंवार येतें ) नंतर आम्ही तेथून निघून दंडकारण्यांत शिरलों. अरण्यांत स्वामी मजपुढें व लक्ष्मण भावोजी

माझ्यामागें चालत असत व रामचंद्राच्या पावलांकडे पहात मी खालीं मान घालून जात असें. पण अरण्यांत शिरतांच एक विराध नांवाचा मोठा राक्षस आला. व त्यानें मला एकदम मधूनच उचलून नेलें. काय बाई सांगावें? त्यावेळीं जर प्रभू रामचंद्र नसते तर हें शरीर ह्मणजे मी तुह्मांला आज दिसलेंच नसतें! पण प्रभूनें त्याला मारलें यामुळें माझी मुक्तता झाली तशी त्याचीही झाली. कारण त्याला तूं राक्षस होशील असा तुंबरू ऋषीनीं भयंकर शाप दिला होता. तो जाऊन तो राक्षस गंधर्व लोकास गेला. असा त्याचा उद्धार झाला. अशा गोष्टी पुष्कळ आहेत पण त्या सांगण्याचें हें स्थळ नाहीं. त्या रसिक जनांकरितां राखून ठेविल्या आहेत. रसिक जनांनीं आपल्या रुचीप्रमाणें त्यांचा स्वाद हवा तेव्हां घ्यावा.

या रामायणांत सीतेनें आपल्या चुकाही कबूल केल्या आहेत. त्यांत सर्वांत मोठी चूक ही कीं, मारिचाला मारण्याकरतां राम लक्ष्मणाला सीतेच्या रक्षणाकरतां ठेवून गेले असतां, मरतांना मारिचानें 'हे सीते, हे लक्ष्मणा' मी संकटांत आहे धांवा रे धांवा असे शद्ब उच्चारिले, ते सीतेला रामाचे आहेत असें वाटलें व त्यामुळें तिचा चित्त क्षोभ झाला. त्याचा लक्ष्मणानें निषेध केला कीं, राम हा असंख्य राक्षसांना अजिंक्य आहे त्याला हा एकटा राक्षस काय करील? हें सर्व राक्षसांचें कपट आहे. तरी सीतेला धीर निघाला नाहीं. वेळेचा काय नियम आहे असें ह्मणून तिचें त्यावेळीं देहभान जाऊन, लक्ष्मणानें आतां यापुढें विचार करीत बसूं नये व ताबडतोब जावें ह्मणून ती त्याला टोचून ह्मणते

**वर्तते मदभिलाष मनांत। तूं तरीच शिरलास वनांत॥**
**जींत उग्रतरता अशि वाणी। मन्मुखांतुनि निघे अशी वाणी॥**

आह्माला वनवास करावयाचा असतां तुला आमच्याबरोबर यावयाचें कारण काय? तर ते आतां कळलें. माझ्या अभिलाषाची तुला

इच्छा होती ह्मणूनच तूं असलें तरी ढोंग करून, लक्ष्मणा, तूं आमचे बरोबर आलास!! अशी हृदयभेद करणारी वाणी माझ्या तोंडांतून निघतांच लक्ष्मण भावोजी इतके विचारी, रामाचें हृद्गत व पराक्रम ज्यांला पूर्ण माहीत आहे असे महाधनुर्धर, पण अत्यंत पापभिरु अस-ल्यामुळें त्यांचें देहभान व शक्ति जाऊन त्यांच्या आंगास कंप सुटला व खिन्न वदनानें ते अक्षरही न बोलतां रामाकडे चालते झाले. पुढें झालेली हकीगत सर्वांस ठाऊक आहेच. चित्रकूट व अत्रि ऋषींच्या आश्रमाच्या जागेतून जात असतांना तेथील स्थानमहात्म्यानें रामाय-णांतील ह्या सर्व गोष्टी मूर्तिमंत डोळ्यापुढें उभ्या राहिल्या व यात्रेचें सार्थक झालें असें वाटलें. नाशीक व पंपा सरोवर येथील गोष्टी त्या त्या ठिकाणीं आल्या आहेतच. रामासंबंधीं ह्मणजे आर्यांची अत्यंत उज्वल संस्कृति प्रत्येक आर्याच्या मनांत ठसावी हाच ह्या यात्रेचा उद्देश आहे.

अशा रीतीनें अत्रिऋषींनीं व त्यांची बायको अनुसूया हिनें रामलक्ष्मण व सीतेचें उत्तम स्वागत केलें व पुढें रावण वधासारखा अवतार कृत्यें रामाचे हातून पुरीं व्हावीं ह्मणून त्यांनीं त्याला दिव्या-स्त्रेंही दिलीं. ह्मणूनच रामाला आपलें अवतारकृत्य पुरें करतां आलें व सीतेचें महत्संकटांतून रक्षण झालें. रावणाकडे असतां तुझी खाण्या-पिण्याची काय व्यवस्था होती असें तिच्या बहिणींनीं तिला विचारलें तेव्हां ती ह्मणाली:—

मामाजींचे शतमख सखे धाडिती अन्नपात्र।
स्वामींतें मी स्मरत कवळीं तत्प्रिया ग्रास मात्र।
केलें देहा वन मुनि सती निर्मितें अंगरागें।
चिंती चित्त प्रभु जय सदा शत्रुचा भंग रागें ॥१॥

दशरथ मामंजींचे जिवलग मित्र इंद्र यांजकडून मला एक रोज ताटभर अन्न येत असे, त्यांतला एक घांस मात्र अन्न केवळ जीव जग-विण्याकरितां मी खात असे. माझ्या शरीराचें रक्षण अनसूयेच्या उटीनें

झालें हें मागें सांगितलेंच आहे. याशिवाय मी आपला सर्व वेळ रामचंद्राला जय व्हावा व या विश्वासघातकी रावणाचें वाटोळें व्हावें म्हणून तपश्चर्येंत घालवीत असें. अशाप्रकारें रामचंद्रांनीं आर्यावर्त प्रथम जिंकून अनार्यांच्या संघशक्तीचा व त्यांच्या पराक्रमाचा नायनाट करून त्यांस निर्माल्यवत् केलें व सर्व प्रदेश आर्यांच्या वस्तीस व सुधारणेस मोकळा केला. यामुळें हिमालयापासून रामेश्वरापर्यंत रामचंद्राची कीर्ति सर्वत्र दुमदुमून राहिली. अशी कीर्ति कोणाचीही झाली नाहीं, ह्मणून सर्व हिंदू रामोपासक आहेत. मीही अशा रीतीनें रामचंद्राचा आशीर्वाद घेऊन माणिकपूर जंक्शनवरून कलकत्ता मेलनें घरीं आलों. वेळ नव्हता ह्मणून जबलपूर येथील नर्मदेचा धबधबा व मार्बल रॉकचे पहाड पाहाणें राहिलें. यात्रेकरूंनीं ते अवश्य पाहावे. घरीं आल्यावर सर्व प्रसादाचें मांवदें करून व सर्व यात्रा परमेश्वरार्पण करून रामचंद्राचा कित्ता पुढें ठेवून उद्योगास लागलों व सर्व देवतांनीं दिलेला हा यात्रेचा प्रसाद पुस्तक रूपानें सर्वांस दिला आहे. याची चव रूचिवैचित्र्याप्रमाणें जशी ज्याला प्रासादिक गोडी असेल तशी त्याला येईल.

---

# उपसंहार.

या दक्षिण हिंदुस्थानचे यात्रेंत रामाला वानरांनीं साह्य केलें ते पशु नसून ती राक्षस व मनुष्य यांमधली मनुष्यांत मोडणारी एक जात असावी व अशा अर्थानेंच त्यांना वा-नर--विकल्पानें मनुष्य—ह्मणजे त्यांचें स्वरूप व चालीरीती राक्षसांपेक्षां मनुष्याशीं बऱ्याच जुळणाऱ्या आहेत ह्मणून हें नांव मिळालें असावें, असें किष्किंधा येथील त्यासंबंधीं त्यांच्या वर्णनावरून दिसतें. कारण त्यांना भाषा होती, त्यांचीं राज्यें होतीं व कुटुंब पद्धती होती हें त्यांनीं

बांधलेल्या अजस्र दगडी गुहांवरून व वालीच्या दहन भूमीच्या लांबी रूंदीवरून स्पष्ट दिसतें. ही जात राक्षसांइतकी सामर्थ्य-वान नसली तरी त्यांच्या जवळजवळ बरोबरीची होती. यामुळें राक्ष-सांनी त्यांच्या बायकांकडे फारसें लक्ष न देतां त्यांहून सुकुमार, सुंदर व सामर्थ्यानें कमी अशा मनुष्यांच्या बायकांकडे–त्यांत रामा सार-ख्याच्या राजपत्न्यांकडे–त्यांची विशेष नजर गेली. सीतेच्या असामान्य सौंदर्याबद्दल शूर्पणखेनें त्यांजवळ रसभरीत वर्णन केलें, यामुळें त्यांत भर पडून हें रामायण झालें! रामाच्या साह्यानें वालीचा वध झाल्यानंतर त्यांचें आपसांतील भांडण संपून त्यांनीं एकदिलानें रामाला साह्य केलें. त्यांच्या वृक्ष पाषाणाच्या युद्ध कलेला व मुष्टियुद्धाला रामलक्ष्मणाच्या शस्त्रास्त्रांची असामान्य मदत झाली ह्मणूनच ही राक्षसशाही व रावणाची सोटेशाही यांचें समूळ उच्चाटण झालें. त्याशिवाय हें काम वानरें व मनुष्यें यांच्या एक एकट्याच्या सामर्थ्यानें असें सफाइदार झालें नसतें हें त्यांच्या एकीमुळें झालें.

आतां मनुष्यांची उत्पत्तीच वानरापासून झाली, असें पाश्चात्य उत्क्रांति तत्ववेत्ते डार्विन साहेब ह्मणतात पण तें विचाराला चांगलेंसें जुळत नाहीं. वानरांचें स्वरूप, हाडांची संख्या, डोक्याच्या कवटीचा आकार यांचें मनुष्याशीं पुष्कळ साम्य आहे असें त्याचें ह्मणणें आहे. पण उद्भिज सृष्टीच्या घडामोडीवरून ज्यापासून जो दुसरा पदार्थ प्रत्यक्ष उत्पन्न झालेला आपण पाहतों, उदाहरणार्थ सुरवंटाचें फुलपाखरूं, माशी किडे हगते त्या किड्यांच्या पुन्हां माशा होणें, रेशमाचे किडे वगैरे जीवजंतू यांच्यांत कांहींच साम्य दिसत नाहीं. जमिनीवर चालणारा तो आकाशांत उडणारा होतो; त्याच्यांत प्रकृतिसाम्य कांहीं लागत नाहीं. याशिवाय वानर व मनुष्य यांच्या स्वभावांत व आचरणांत फार फरक आहे. मनुष्याला वाचा आहे, तो मूळचा मांसहारी आहे, त्याला नखें आहेत, तो घर करून राहणारा

आहे; महत्वाकांक्षी, बुद्धिमान, जुटीनें राहणारा व त्यामुळें तो अचाट सामर्थ्याचा झाला आहे. या गुणधर्मांचा वानराच्या ठायीं पूर्ण अभाव आहे. ह्मणजे हे गुण त्यांना शिकवून सुद्धां येण्यासारखे नाहींत. मग मनुष्यांची उत्पत्ति कोणापासून झाली असावी ?

उत्क्रांति तत्वाप्रमाणें पशूपासून जर मनुष्यांची उत्पत्ति झाली असेल तर ती पशुश्रेष्ठ सिंहापासून झाली असली पाहिजे, कारण उत्क्रांति तत्वाप्रमाणें पशूपढची पायरी मनुष्याचीच दिसते. पशूंची उत्क्रांती होतां होतां सर्व सामर्थ्यवान् असा सिंह झाला. मनुष्यानंतर सिंह झाला नाहीं खचीत. मनुष्य मूळचा फार दुर्बळ व आत्मरक्षण करण्यास पूर्ण असमर्थ असा निपजलेला असतो. त्याचें रक्षण सिंहाच्या गुहेशिवाय दुर्बळ माकडांकडून झाडांवर होणें शक्य नाहीं. तो सिंहाच्या गुहेंत असल्यामुळें त्याच्याकडे कोणत्याही पशुपक्षाच्यानें पहावलें नाहीं ह्मणून त्याचें रक्षण झालें. सिंहाच्या दुधामुळें व संगतीनें त्याच्यांत हिंसक, शिकारीचे, मांसहारी प्राण्याचे व आत्मसामर्थ्याचे गुणधर्म आले. त्यानें सर्व प्राणिमात्रांवर प्रभुता मिळविली, त्याच्यांत महत्वाकांक्षा उत्पन्न झाली व सर्व स्थावर जंगम सृष्टींत तो बलाढ्य व असामान्य झाला. हे गुण माकडापासून अनुवंशिक संस्कारानें खचीत प्राप्त होण्यासारखे नाहींत, पण सिंहापासून मात्र आहेत. शिवाय आमच्यांतील दशअवतार ह्या उत्क्रांतीच्या पायऱ्याच आहेत. त्यांत वराह हा पशूचा अवतार झाल्यावर गजानन व नृसिंह असे मनुष्य व श्रेष्ठ पशु—हत्ती व सिंह—यांच्या मिश्रणाचे अवतार होऊन नंतर वामन हा पूर्ण मनुष्यावतार झाला व पुढें परशुराम, राम हे सामर्थ्यवान अवतार होऊन कृष्ण हा युक्तीचा व बुद्धिविशिष्ट सामर्थ्याचा अवतार झाला. ज्यानें ही दश अवतारांची योजना किंवा सांखळी बसवली त्या ज्ञात्या पुरुषाचा दृष्टीनें सुद्धां मनुष्य हा सिंहाचाच बच्चा असावा असें दिसतें. रामसिंग, धनसिंग, अशीं उत्तर हिंदुस्थानांत क्षत्रियांची नांवें आहेत, त्यांतील

सिंग हा शद्ब सिंह याचाच दर्शक आहे. याचा अर्थ आम्ही सिंहाचे अनुवंशिक आहों असाच स्पष्ट दिसतो. याशिवाय पुरुषाच्या तोंडावर मिशा, दाढी असे सर्व बाजूनें सिंहाप्रमाणें आयाळ असतात, पण बायकांना नसतात, त्याप्रमाणें सिंहीणीलाही नसतात हें सादृश्य कोणालाही नाकारतां येण्यासारखें नाहीं. अर्थात मनुष्य हा सिंहाचाच वंशज असावा. असो. आतां मूळ यात्रेचा समारोप करूं.

या यात्रेला आरंभ ता. २ मार्च १९२० ला करून अखेर ता. ८ मे १९२० रोजीं झाली आहे. हाच काळ दक्षिण हिंदुस्थानच्या यात्रेला सोईचा आहे. या यात्रेपैकीं नाशीक, त्र्यंबक, श्रीशैल्य, मल्लिकार्जुन व घारापुरी येथील यात्रा मात्र निरनिराळया वेळीं केल्या आहेत, बाकी सर्व एकदमच केल्या आहेत. कोणतीही यात्रा तिचे उत्साहाचे दिवसांत केल्याशिवाय तिचें महत्व समजत नाहीं. पण अशा रीतीनें करूं लागल्यास मनुष्यास दुसरा उद्योगच करितां येणार नाहीं, किंवा सर्व यात्रा हयातींत एकदां तरी होतील किंवा नाहीं याची शंका आहे. कारण मुद्दाम यात्रेला जाण्यास खर्च फार लागतो व व्यवहाराची गैर सोय करावी लागते. शिवाय अशा लोकसमुदायांत जाण्यांत इष्टाच्याऐवजीं कधीं कधीं अनिष्टच फार होतें; कधीं कधीं पाणीसुद्धां पुरेसें व शुद्ध मिळत नाहीं, मग दुसऱ्या गोष्टी कशाला? यांतही उत्साहाच्या वेळच्या देखाव्याचें कांहीं यात्रांचें वर्णन आहे त्यावरून खात्री होईल. ह्मणून शक्य तर उत्साह टाळावा, पण कांहींचें महत्व उत्साहाशिवाय मुळींच नसतें तेथें उत्साहांतच गेले पाहिजे त्याप्रमाणें गेलों आहें.

प्राचीन आर्यांनीं सर्व व्यवहाराचें एकीकरण सामान्यतः धर्मांत केलें आहे. आणि शेवटीं ज्यांनीं त्यांनीं आपल्या धर्माप्रमाणें वागावें, दुसऱ्याच्या धर्माप्रमाणें कधीं वागूं नये असें बजावून सांगितलें आहे. आणि यांतच तुमचें कल्याण आहे. हा धर्म सोडलात तर मात्र तुमची

अधोगति होईल. कारण प्रत्येकाच्या जीवित्वाच्या सुखसोयींची योजना अव्वलपासून अखेरपर्यंत ह्मणजे मोक्षापर्यंत त्यांनी त्यांत केली आहे. आणि या धर्माच्या, व्यवहारानुसार व जात्यनुसार शाखा केल्या आहेत. सर्व शाखांचे नियम ब्राह्मणांनींच केलेले आहेत असें नाहीं तर त्या त्या जातीच्या पुढाऱ्यांनीं ठरविले आहेत. ब्राह्मणांनीं त्या जातीच्या मर्यादा मात्र वेदानुसार घालून दिल्या आहेत. या शाखांचें आकलन ज्यानें त्यानें आपल्या बुद्धीप्रमाणें व सामर्थ्याप्रमाणें करावें. सर्व शाखांचें आकलन कितीही बुद्धिवान् असला तरी होणें शक्य नाहीं. तरीपण प्रत्येकानें स्वधर्म ही शाखा घेतलीच पाहिजे. नंतर आपल्या हौसेप्रमाणें व पराक्रमाप्रमाणें दुसऱ्या शाखांचें आकलन करावें. स्वधर्म ही शाखा सोडून दुसऱ्या अनेक शाखा घेतल्या तरी त्या फुकट आहेत, कारण झाडाच्या फांद्यांला मूळ झाडांचा आधार नसेल तर त्या निर्माल्यवत होतात. स्वधर्म ही एकच शाखा घेतली तरी तिच्या योगानें इहपरलोक साधतां येतो तसा कोणत्याही शाखेनें साधतां येत नाहीं. दुसऱ्या शाखांनीं फायदा झाला तरी तो शाश्वतीचा नसतो.

सर्व धर्मांचें मूळ भगवंताचें अधिष्ठान हें आहे ह्मणून कोणत्याही कार्यारंभीं मनापासून भगवच्चिंतन केलें पाहिजे व त्याचा प्रसाद घेतला पाहिजे. ह्मणजे त्यापासून अनपेक्षित अडचणी दूर होऊन प्रसंगविशेषीं घाबरल्यास ईश्वरस्मरण होऊन कांहीं तरी युक्ति सुचून किंवा कोणाची तरी मदत मिळून मनुष्य संकटांतून पार पडतो. अलीकडील मंडळींत ईश्वरी श्रद्धेचा अभाव होत चालला आहे ह्मणून त्यांस प्रत्येक कार्यांत अपयश येत चाललें आहे. आपल्या अविचारानें व घमेंडीनें कार्यास आरंभ करावयाचा व अपयश आल्यास मग वडील माणसें, धर्म व देव यांस शिव्या देत सुटावयाचें! पण याच्या योगानें कधींच उन्नति न होतां एकसारखी अधोगती मात्र होत चालली आहे याबद्दल फार वाईट वाटतें. परमेश्वरावर मनापासून दृढ विश्वास

ठेवण्याच्या संवयीपासून मनास किती समाधान होतें व कामधंद्यांत यश येऊन, सर्वदा हुरूप कायम राहून, मनुष्य दृढनिश्चयी बनून निश्चित कसा होतो याचा अनुभव प्रत्येकानें घेऊन पहाण्यासारखा आहे. आणि आजपर्यंत साधुसंत व वाडवडील हेंच सांगत आले आहेत. प्रवृत्ति निवृत्तीचे साधू रामदासही हेंच सांगतात.

**सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील त्याचें॥**
**परी तेथें भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे॥**

यात्रांचीं स्थानें शोधून काढण्यांत सृष्टिसौंदर्य, सृष्टचमत्कार, विशिष्ट ठिकाणचे कोणास घडलेले साक्षात्कार, आचार विचार, सत्पुरूष व परमेश्वर यांचीं अवतारकृत्यें व मानव जातीचीं स्थित्यंतरें यांजकडे जसें पूर्वजांनीं लक्ष दिलें आहे, त्याप्रमाणें मनुष्याच्या इहलोकींच्या सुखाकरतां व्यापार, त्याचें दळणवळण व त्यांचे त्यासंबंधानें व्यवहार यांकडेही लक्ष दिलें आहे. ह्मणजे प्रत्येक देवस्थानाला त्या ठिकाणाला अनुसरून यात्रेचे दिवस नेमले आहेत. किंबहुना ज्या दिवसांत तेथील व्यापाराचें, कारागिरीचें किंवा विशिष्ट गोष्टींचें महत्व दाखवितां येईल, त्याचप्रमाणें तेथें त्या देवतेची स्थापना केली आहे. ह्मणजे हिमालयांत अती उष्ण दिवसांत सुद्धां फार कडक थंडी पडते अशा ठिकाणीं केदारेश्वर ह्या शिवस्थानाची योजना केली आहे. व बद्रिनारायणास हवा त्यापेक्षां थोडी समशीतोष्ण आहे व तेथून परदेशाशीं व्यापार करण्याची खुष्कीनें सोय आहे, ह्मणून तेथें विष्णूची योजना केली आहे. हिमालयांतून बद्रिनारायणावरूनच तिबेट, चीन यांकडे जाण्याकरतां खुष्कीचा चांगला मार्ग आहे. हा एवढाच मार्ग फक्त उन्हाळ्यांत खुला असतो ह्मणून तेथें या मुख्य देवतेची स्थापना केली असावी. या पहाडी मार्गांत सडका करण्याचा उपाय नाहीं व ठिकठिकाणीं चौक्या बांधूनही उपयोग नाहीं. पण हें मुख्य यात्रेचेंच ठिकाण केल्यामुळें तेथें रहदारी

विशेष राहाते व व्यापारी लोकांना सोबतीची वगैरे सोय होते. सारांश हवा, पाणी, व्यापार, निसर्ग यांला अनुसरूनच सात्विक, राजस किंवा तमोगुणी देवतेची योजना करून त्याप्रमाणें तिचे उत्साहाचे दिवस ठराविले आहेत. हे दिवस वर्षांतून एकदां, दोनदां किंवा अधिक वेळां हंगामाच्या मानानें असतात व त्या देवाचें स्थानिक महात्म्य किंवा कथा पुराणें हीं त्या परिस्थितीला अनुलक्षून असतात. देवपूजा, कथापुराण वगैरे धार्मिक विधी प्रत्येक उत्साहांत असतात. हें तेथील ज्ञानसत्र आहे. ह्मणजे कथा, कीर्तन व पुराण सांगण्याचा मुख्य हेतू हा कीं, तुह्माला या यात्रेत व्यवहार करावयाचा आहे आणि याकरतांच तुह्मी येथें आलां आहां; तेव्हां तो करा पण पापभीरूपणानें करा, ह्मणजे कोणी कोणाला फसवूं नका. ह्मणजे अशानें व्यापार वाढेल, तुमची पत राहील व मनुष्य जातीचें कल्याण होईल. खेळ, नाटक, ललीत केवळ करमणुकीकरतां असतें. शेवटीं समावर्तन ह्मणजे पालखी, तीर्थप्रसाद यांची योजना असते. त्याचप्रमाणें यात्रेच्या सुखाकरतां निरनिराळ्या बाजारांची सुद्धां योजना असते. किंबहुना कांहीं यात्रांत बाजारचेंच फार प्राधान्य असतें. यामुळें पूर्वोक्त सर्व यात्राविधी उरकून गेले तरी बाजार महिना पंधरा दिवस चालूच असतो. ह्या बाजारामुळें व्यापारवृद्धीस मदत होते. ह्मणजे कोठें काय वस्तू उत्पन्न होतात, कोठून येतात, मार्ग कोणते, उत्पन्न करणारे कोण, हा माल मुख्यत: कोणत्या जातींत खपतो, त्यांचा व्यापार कसा, कोठें व काय प्रमाणांत चालतो, आपल्याकडे अशा वस्तू उत्पन्न करतां येतील किंवा नाहीं, सोयी व अडचणी काय आहेत वगैरे गोष्टींचा शोध लागून, निरनिराळ्या लोकांचा संबंध घडून बुद्धि चौकस व कार्यक्षम होते. सारांश हल्लीं प्रदर्शनापासून जे फायदे होतात. तेच 'यात्रा' ह्या धार्मिक विधीनें करून देण्याची योजना पूर्वजांनीं करून ठेविली आहे. प्रदर्शनाच्या तारखा

ठरवाव्या लागतात, लोकांस आमंत्रणें करावीं लागतात. कोणास आमंत्रण पोंचतें, कोणास पोंचत नाहीं. यामुळें मंडळी किंवा माल यात्रेस पाहिजे तितका येत नाहीं. प्रदर्शनाचे कांहीं दिवस कांहीं विशिष्ट माल तयार करण्याला गैरसोईचे असतात तसें यात्रेचें नाहीं त्या मालाला उपयुक्त दिवस असतील तेच यात्रेचे दिवस असतात यामुळें उंची माल तयार होतो व घेणारेही वाट पहातच असतात. अर्थात दोघांनाही फायदा होऊन व्यापारवृद्धि होते, माल चढाओढीनें व कसोशीनें विकला जाऊन त्याची सुधारणा होत जाते व लोकांचा प्रापंचिक फायदा होतो. शिवाय प्रदर्शनाप्रमाणें कृत्रिम खर्च नाहीं, तिकीट नाहीं, कांहीं नाहीं. वाटेल त्यानें वाटेल त्या किंमतीचा माल वाटेल तितका घेऊन बसावें. करांचें ओझें नसल्यामुळें तितका तो माल स्वस्त विकण्यास सांपडतो. किती सुंदर यात्रेची योजना ही! हाच आमचा व्यापारी भूगोल आहे आणि तो प्रत्यक्ष दर्शनानें शिकविला जातो परदेशी लोक आमच्यांत प्रदर्शनाची चाल नाहीं, लोक जंगली व अडाणी असें आह्माला ह्मणोत पण आमच्या पूर्वजांच्या धार्मिक योजना ते परके ह्मणून त्यांस समजत नाहींत व आमच्या लोकांस परक्यांच्या संगतीनें पूर्वजांचा तिटकारा अलीकडे आला व ते आपल्या धर्माचें रहस्य विसरले ह्मणून ते तिकडे लक्ष देत नाहींत! चैत्रांतील वसंतपूजेचे, हळदकुंकवाचे उत्सव हीं बायकांचीं कलाकौशल्याचीं प्रदर्शनें किंवा यात्रा नाहींत असें कोण ह्मणेल? त्या प्रदर्शनांत भाताचीं व इतर डाळदाण्यांचीं शेतें भांड्यांत लावून करण्याची आजपर्यंत वहिवाट होती पण ती आतां नाहींशी होत चालली आहे. यावरून पूर्वकाळीं पावसाळीं लावण्याकरितां एव्हांपासून रोपें तयार करीत असावे असें दिसतें. शिवाय त्या कुंड्यांनीं त्या स्थानास विशेष शोभा व शांतता येऊन चढाओढही दिसते. तसेंच श्रावण व आश्विन महिन्यांतील मंगळागौरी

हरतालिका, महालक्ष्मी वगैरे विविध पूजोत्सव हीं त्यांचीं काव्य, गाणीं, विनोद व खेळ यांचीं स्थळेंच आहेत. तसेंच लग्न, मुंजी वगैरेंच्या सोहळ्यांत निरनिराळे आप्त, स्नेही सकुटुंब येऊन आपली आप्तमंडळी मूळची कोणती, त्यांत नवीन भर पडून आपला वंशविस्तार कसा वाढत चालला आहे, याची कल्पना होते व त्यात आपलेपणा वाढतो. तसेंच यांच्यामुळें विश्वकुटुंबाची कल्पना जागृत होण्याचा संभव असतो. लग्न सोहाळ्याला गेल्यामुळें कुटुंबांतील कोणाच्या गरजा कशा आहेत, नवीन लग्नमुंजीचीं कोण कोण आहेत हें समजून कधीं कधीं हीं कार्यें अनपेक्षितपणानें तात्बडतोब जुळून येऊन सहज उरकून-ही जातात, नाहींतर महिनेच्या महिने खेपा घालूनही जमत नाहींत. शिवाय अशा प्रकारें जीं स्थळें मिळतात तीं कोणी तरी सांगणाऱ्या स्थळापेक्षां कितीतरी चांगलीं असतात, कारण तीं आपल्या आप्तइष्टांच्या परिचयाचीं असतात. परिचयाशिवाय केवळ बाह्य देखाव्यावर भुलून कितीतरी लोकांचें जन्माचें नुकसान झालें आहे. अशा समारंभांत मुलगे व मुली पाठविल्यानें वधुवरांचें प्रेम जडतें व त्यामुळें लग्नें होतात असें पाश्चात्य ह्मणतात. व या समारंभानें कधीं कधीं निर-निराळ्या लोकांच्या मुलाखती होऊन वडील मंडळीमार्फत कार्यें होतात असें आह्मी ह्मणतों अर्थात आमचेंच धोरण उच्च आहे असें असतां लोक पाश्चात्यांच्या धोरणाची तारीफ करतात याला काय ह्मणावें? सारांश आमच्या सर्व व्यवहाराचा संबंध आमच्या धर्माशीं आहे ह्मणून आमच्या सर्व पूर्वजांनीं व ऋषींनीं व जगद्गुरु श्रीकृष्णानीं '**स्वधर्मे निधनं श्रेयः**' असें सांगून स्वधर्माप्रमाणें वागा ह्मणजे तुमच्या सर्व कामना इहलोकच्या व परलोकच्या पूर्ण होतील असें ईश्वरानें सांगितलें आहे सबब नवें पाहाण्यापूर्वीं त्याबद्दल आमच्यांत काय आहे हें आमच्या नवीन पिढीनें पाहाण्यास विसरूं नये अशी प्रार्थना आहे. हिमालयाच्या यात्रेचें श्रेष्ठत्व विशेष आहे असें सांगण्याचें कारण हिमालय हें स्वतंत्र

जग आहे पण तें अज्ञात आहे. त्यांतील खनिज संपत्ती व वनस्पती यांची विशेषत: ओळख व्हावी, लोक तपस्वी व काटक वगैरे व्हावे हा त्यांत विशेष हेतु दिसतो. दक्षिणेंतील यात्रांचा हेतु मनुष्यस्वभाव, व्यापार व व्यवहार वगैरे यांत दाखविलाच आहे. अशा रीतानें यात्रेची उपयुक्तता, हिंदुधर्माचें रहस्य सांगावें तेवढें थोडेंच. त्याचें येथें हें दिग्दर्शन मात्र केलं आहे. दक्षिण हिंदुस्थानच्या यात्रांवरून व तेथील स्थानिक उत्साहांवरून मला हा प्रत्यय आला आहे. शिवाय निरनिराळ्या हवेमुळें त्या ठिकाणच्या लोकांचे रंग व आचारविचार, खाणेंपिणें व पेहेराव हे निरनिराळे झाले आहेत. यांत जातीच्या वैशिष्ट्यापेक्षां हवेचें वैशिष्ट्यच जास्त दिसतें.

मी ही यात्रा केली. ती माझे तीव्र इच्छेमुळें केली हें खरें आहे. पण ईश्वरेच्छेनें मला तशी परिस्थितीही प्राप्त झाली. तशी सर्वांना येईल असें वाटत नाहीं. अर्थात अशा एकदम यात्राही होणें कठीण आहे. तरी हें पुस्तक वाचून यात्रांचें रहस्य लक्षांत घेऊन संसारांत जरी राहिलांत तरी यात्रेचें पुण्य ईश्वरकृपेनें मिळेल असा भरंवसा आहे. श्रद्धा मात्र पाहिजे. संसारांत कामाकाजानिमित्त यात्रांच्या ठिकाणांजवळून जाणें झालें तर मुद्दाम सवड करून जरूर जाऊन देवदर्शन घेऊन व तेथील रहस्य घेऊन येण्यास चुकूं नये एवढें सांगणें आहे. हें जरी वाचकांच्या मनांत बिंबलें तरी या पुस्तकाचें सार्थक झालें असें मी समजेन.

**श्रीकृष्णार्पणमस्तु.**

20319

# परिशिष्ट--१.

## सोबत नकाशा आहे त्यांतील—१ पौराणिक, २ ऐतिहासिक, ३ सृष्टिसौंदर्याचीं किंवा हवा खाण्याचें, ४ कारखानें, व ५ दुसरीं प्रख्यात स्थानें यांची सूची.

पहिल्या भागापेक्षां ही यादी दुरुस्त करून व वाढवून दिली आहे.

# १ मुख्य पौराणिक यात्रा.

## बारा जोतिर्लिंगें.

सौराष्ट्रे सोमनाथंच श्रीशैल्ये मल्लिकार्जुनं
उज्जयिन्यां महांकाल मोंकारममलेश्वरं
परल्यां वैजनाथच डाकिन्यां भीमशंकरं
सेतुबंधे तु रामेशं नागेशं दारुकावने
वाराणस्यांतु विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे
हिमालये तु केदारं घृष्णेशंचं शिलालये ॥

१ **सोमनाथः**——सोरटी सोमनाथ—काठेवाडचे दक्षिणेस वेरावळ बंदरापासून चार मैल पूर्वेस. सडक आहे. तांगे मिळतात, ट्राम आहे. जवळच यादवांनीं यादवी केली तें स्थान, व श्रीकृष्ण बलराम निजधामास गेले तीं स्थानें आहेत. मुंबईहून बोटीनें वेरावळ येथें जावें किंवा वढवाण, राजकोट जेटलसर जंक्शनवरून वेरावळ येथें रेलवेनें जावें. या रस्त्यानें गेल्यास जुनागडाजवळील गिरनार पर्वतावरील जैन मंदिरें व दत्तस्थान यांचें अनायासें दर्शन होतें व जवळच्या पोरबंदर येथें

सुदाम्याचें दर्शन होतें. याला सुदामपुरी ह्मणतात. येथें सीमेंटची गिरणी आहे. हें लिंग चंद्रानें स्थापून त्याची पूजा केली ह्मणून त्याचा राजयक्ष्मा गेला. वर्णन चौथे भागांत.

२ मल्लिकार्जुन-- रायचूर, गुंटाकल जंक्शनवरून बेजवाडापर्यंतच्या छोट्या लाइनीवर नंद्याळ स्टेशन आहे, तेथपासून सडकेनें २९ मैल. आत्मकूट तेथून दुसऱ्या सडकेनें १० मैल. नागलेटी हा श्रीशैल्य पर्वताच्या पायथ्याशीं गांव आहे. या दहा मैलांपैकीं ७ मैल सडक व तीन मैल शेतांतून माळरानांतून दगडाळ रस्ता आहे. पुढें २३ मैल श्रीशैल्यपर्वत चढून जावा लागतो. पैकीं प्रथम दोन मैल चढाव, पुढें ८ मैल सपाट, पुढें चढउतार आहे. चढाव ह्मणण्यासारखा नाहीं. वाटेंत चढावाच्या ठिकाणीं प्रशस्त पायऱ्यांचे रस्ते आहेत. यांत दोन मुक्काम आहेत. महाशिवरात्रीस व चैत्रीपूर्णिमेच्या यात्रेत या रस्त्याचा बंदोबस्त इंग्रज सरकारकडून होतो एरवीं नसतो. यामुळें ही यात्रा महाशिवरात्रीशिवाय करणें धोक्याचें आहे कारण वाटेंत वाटमारे भिल्लांचा (डाकूंचा) उपद्रव भयंकर आहे. यात्रेच्या दिवसांत नंद्याळ स्टेशनवर जाण्यायेण्याच्या गाड्या मिळतात. येतांना महानंदीचें स्थान अवश्य पहावें. गाड्यांचा तसा करार करावा. जवळ पाताळगंगा आहे तिचें स्नान करावें. येथें दत्तात्रयांनीं कायमचा निवास केला. जवळ क्रौंचपर्वत आहे तेथें षडानन व ईश्वरपार्वती यांची भेट झाली. सविस्तर वर्णन ह्या तिसऱ्या भागांत आहे.

३ महांकाळेश्वर—उज्जनीस प्रसिद्धच आहे. वर्णन भाग १

४ ओंकार अमलेश्वर—ओंकारमांधाता. बी. बी. अँड. सी. आय. रेल्वेची छोटी लाईन राजपूताना माळवारेल्वे उज्जनी खांडवा रस्त्यावर मोरटक्क्यास उतरावें; तेथून सडकेनें दहा मैलांवर नर्मदेच्या कांठीं एक नर्मदेचा दुभंग झालेल्या बेटांत डोंगरावर आहे. डोंगरावर गौरीसोमनाथ, भैरवशिला वगैरे स्थानें पहाण्यासारखीं आहेत व दुसरें

नर्मदेच्या दुसऱ्या कांठीं संगमावर आहे. दोन्हीं ठिकाणांवरून नर्मदेची शोभा अपूर्व दिसते. ह्या डोंगरामुळें या क्षेत्रास ॐकाराचें रूप नदी प्रवाहानें आलें आहे. मोरटक्का स्टेशनवर पंडे येतात व गाड्या मिळतात. वर्णन भाग १.

**५ परळी वैजनाथ**:—गोदावरी व्हॅली रेल्वे मनमाडपासून निघते तेथून परभणी स्टेशनपासून १२ कोस दक्षिणेस आहे. रस्ता सडक नाहीं, माळरान आहे. स्टेशनवर गाड्या मिळतात. तेथून लगेच जोगाईचे अंब्यावरून लातूर स्टेशनपर्यंतची गाडी करावी, ह्मणजे अनायासें अंबाबाईचें दर्शन होतें. लातूरवरून येडशीस उतरावें व तुळजा भवानीचें दर्शन घेऊन तेथून बार्शी सोलापूरास जावें, किंवा पंढरपूर करून घ्यावें. वर्णन तिसऱ्या भागांत आहे.

**६ भीमाशंकर**:— जी. आय. पी. रेलवे. नेरळवरून आठ कोस खांडस आहे. रस्ता वाईट दगडाळ आहे, आतां कर्जतवरून साधारण सडक झाली आहे, पण रस्ता १० कोस आहे. खांडसापासून चार कोस घाट चढावा लागतो. चढाव कठीण आहे. खांडसास डोल्या मिळतात किंवा घाटावरून तळेगांव स्टेशनपासून खेड जुन्नरावरून थेट भिमाशंकराच्या देवळाशीं सडक जाते पण हा रस्ता फार लांब ९० मैलांचा आहे. शिवरात्रीच्या वेळीं टांगे मोटारी मिळतात. नेरळ, कर्जतवरून महाशिवरात्रीस गाड्या मिळतात. नेरळवरून जवळ आहे पण सडक नाहीं. वर्णन भाग ४ यांत आहे.

**७ रामेश्वर**:—प्रसिद्ध आहे. वर्णन भाग ३.

**८ औंढ्या नागनाथ**:—गोदावरी व्हॅली रेल्वे. मनमाडवरून पूर्णा जंक्शनवरून हिंगोली ब्रांच आहे. तीवर चौंडी स्टेशन लागतें तेथून पश्चिमेस १४ मैलांवर आहे, साधारण सडक आहे. क्वचित् गाड्या मिळतात. वर्णन भाग ३ यांत आहे.

९ विश्वनाथः—काशीस प्रसिद्ध आहे. मोंगल सराई जंक्शनवरून औंध रोहिलखंड रेलवेचें दुसरें स्टेशन काशी. तिकीट काशीचें घ्यावें बनारसचें घेऊं नये. बनारस पुढचें स्टेशन आहे तेथें जाऊं नये लांब पडतें वर्णन भाग १.

१० त्र्यंबकेश्वरः—नाशकाहून वीस मैल पश्चिमेस. गाड्या, मोटारी मिळतात. भाग ३.

११ केदारेश्वरः—हिमालयावर. पहिल्या भागांतील हिमालयाचा प्रवास वाचावा.

१२ घृष्णेश्वर उर्फ घुसृणेश्वरः—गोदावरी व्हॅली रेलवे. मनमाडपासून दौलताबाद स्टेशनपासून दाहा मैल वेरुळचीं लेणीं व पुढें घृष्णेश्वर घुसृण=कुंकू, केशर यावरून हें नांव. अर्धा मैल सडक आहे, गाड्या मिळतात. प्रथम स्टेशनजवळील इतिहास प्रसिद्ध दौलताबादचा किल्ला पहावा. नाणें ब्रिटिश चालत नाहीं, निजामशाई चालतें. वर्णन तिसऱ्या भागांत.

---

## सप्तपुऱ्या.

अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका
पुरी द्वारावतीचैव सप्तैता मोक्षदायकाः ॥

माया-हरिद्वार. कांची-कांचीवरं. अवंतिका-उज्जनी. द्वारावती-द्वारका. ह्या सर्व प्रसिद्ध आहेत. सर्वांचीं वर्णनें पहिल्या भागांत आहेत, फक्त कांचीचें वर्णन तिसऱ्या भागांत आहे.

---

## देवींचीं साडे तीन पीठें.

१ तुळजापूर—तुळजाभवानी. सोलापुरापासून नऊ कोसांवर. चांगली सडक आहे. किंवा लातूर लाईनीवरील येडशीपासून ९ कोस. गाड्या, तांगे मिळतात. वर्णन तिसऱ्या भागांत आहे.

२ कोल्हापूर— महालक्ष्मी–अंबाबाई. मिरजेपासून कोल्हापुरास जाण्यास फांटा फुटतो. वर्णन भाग ४

३ माहूर—माहामाया रेणुका याला मातापूर ह्मणतात. ग्रे. इं. पे. सु. रे मूर्तिजापूर, यवतमाळ ब्रांच, दारव्हा स्टेशनपासून १८ कोस. किंवा निजाम हद्दींत गोदावरी व्हाली रेलवेवरील पूर्णा हिंगोली ब्रांचवर बोलडा स्टेशनपासून पंचवीस कोस. दोन्ही रस्ते वाईटच आहेत, त्यांत पहिला दुसऱ्यापेक्षा बरा आहे मुख्य स्थान गडावर आहे. ज्याला सिद्धपूरची मातृगया होत नाहीं ते येथें मातृगया करितात. जवळच दुसऱ्या डोंगरावर दत्तात्रयाचें स्थान आहे तें अवश्य पहावें. दोन्ही ठिकाणीं पाणी दुर्मिळ आहे.

४ सप्तशृंगः—ही मात्र अर्धमात्रा आहे, बाकी सर्व पूर्ण मात्रेचीं पीठें आहेत. नाशीकपासून १३ कोस वणी मडक आहे. तेथून एक मैल गडाचा पायथा व पुढें गड चढावा लागतो, चढाव मोठा नाहीं पायऱ्या आहेत. जगदंबेची मूर्ती फार भव्य असून ती डोंगरावर उंच कपारांत आंतची कोरली आहे. वर उभें राहण्यास फारशी जागा नाहीं. वर्णन भाग तीन पहा.

---

## अष्ट विनायक.

स्वस्ति श्रीगणनायको गजमुखो मोरेश्वरः सिद्धिदो
बल्लाळो मुरुडे विनायक मढे चिंतामणिः स्थेवरे
लेण्याद्रौ गिरिजात्मकस्सुवरदं विघ्नेश्वरो ओझरे
ग्रामोरांजण संस्थितो गणपतिः कुर्यात् सदा मंगलं ॥१॥

१ गणनायक गजमुख गणपतीः—मोरेश्वरास (मोरगांव) सदर्न मराठा रेल्वे. जेजुरीपासून पांच कोस. सडक नाहीं पण रस्ता बरा आहे.

२ सिद्धिविनायकः—सिद्धटेकास. सिद्धटेक, ग्रे. इ. पे. रेल्वे दौंडच्या पुढें बोरिब्यल स्टेशनपासून सहा मैल, सडक नाहीं. गाड्या स्टेशनवर मिळत नाहींत, गांवांतून आणाव्या लागतात.

बल्लाळेश्वरः—बोटीनें जंजिरा संस्थानांत मुरुड गांवीं, पण हा गणपती तेथून भोर संस्थानांतील पालीस गेला आहे. मुरुड येथें नुसतें देवाचें सिंहासन आहे पण त्याचें दर्शन जरूर घ्यावें, कारण तें आद्य सिंहासन आहे. मुरुडाजवळ नांदगांव येथें गणपतीचें स्थान आहे त्याचें अवश्य दर्शन घ्यावें. पालीला कर्जत, खोपवली व धरमतर नागोठण्यावरून जाण्यास रस्ते आहेत. पालीस जाण्याकरितां कर्जतास किंवा खोपवलीस मोटारी मिळतात.

४ विनायकः—मढास. ग्रे. इ. पे. रे. कर्जत खोपवली ब्रांचवर डोलवली स्टेशनपासून दोन मैल रस्ता शेतांतून आहे.

५ चिंतामणीः—थेउरास. ग्रे. इ. पे. रे. पुण्यापुढें लोणी स्टेशनपासून पांच मैल. पुण्याहून सोलापुराकडे जी सडक जाते त्या सडकेनें दोन मैल सोलापूरच्या बाजूनें जावें, पुढें रेल्वे उलटून दुसरे लहान सडकेनें तीन मैल मुळामुठेच्या काठीं आहे. ह्या गणपतीसन्निध माधवराव पेशव्यांनीं आपला देह ठेविला. त्यांची बायको सौ० रमाबाई त्यांचे बरोबर सती गेली, तिचें वृंदावन नदीकाठीं आहे.

६ गिरिजात्मकः—लेण्याद्रीवर. ग्रे. इ. पे. रे. तळेगांव स्टेशनपासून जुन्नर पन्नास मैल. तेथून जवळच दोन मैलावर डोंगरांत एक लेणें खोदलें आहे त्यांत आहे. लेणें फार प्रशस्त व रम्य आहे, ह्मणून त्यास लेण्याद्री ह्मणतात. डोंगरापर्यंत सडक आहे व चढण्यास पायऱ्या आहेत; उंची लहानशा टेकडीएवढी आहे. पुण्याहूनसुद्धां जुन्नरास जाण्यास मोटारी मिळतात. ह्या गणपतीनें नुकतेंच दीड फूट जाडीचें कवच टाकिलें आहे तें सुमारें पांचशें वर्षांचें असावें असें दिसतें. जुन्नराजवळ शिवनेरी किल्ला आहे तो व शिवाई देवीचें अवश्य

दर्शन घ्यावें. जुन्नरास खुडाचे कागद होतात. त्यांचेही कारखाने अवश्य पहावे. ह्या गणपतीचें तोंड म्हणजे मूळ गणपती ह्याच डोंगराचे दुसरे बाजूस अगदीं अवघड जागीं आहे, तेथें कोणास जातां येत नाहीं. येथें पाठीचें दर्शन होतें.

**७ विघ्नेश्वरः**—ओझरास. ओझर जुन्नरचे पूर्वेस ६ मैलांवर आहे. रस्ता सडक नाहीं.

**८ गणपतिः**—रांजणगांवास. रांजणगांव पुण्याहून घोडनदीच्या रस्त्यावर आहे. पुण्याहून घोडनदीला उर्फ शिरूरला मोटारी जातात. त्या वाटेवर रांजणगांव आहे.

**सूचनाः**—सर्व गणपतींचें वर्णन चौथ्या भागांत खुलासेवार आहे.

---

## त्रिस्थळी.

**१ प्रयाग. २ काशी व ३ गया.** सर्व प्रसिद्ध आहेत. वर्णन पहिले भागांत आहे.

---

## चारधाम.

**१ बद्रीनारायण** ( भाग १ हिमालय वर्णन पहा ). २ **द्वारका** (वर्णन भाग १ ). ३ **रामेश्वर** (भाग ३ मध्यें ) आणि ४ **जगन्नाथ** (वर्णन भाग ३ ).

---

## पंचमहासरोवरें,

**बिंदू**—जी. बी. आणि सी. आय. रेलवेच्या छोटी लाईनींचें सिद्धपूर स्टेशन यालाच मातृगया म्हणतात. तेथून दीड मैलावर जंगलांत आहे. जवळ कपिल महामुनींचा आश्रम आहे. वर्णन पहिले भागांत.

२ नारायणः—कच्छ मांडवी बंदरापासून ४० कोस पश्चिमेस सिंधप्रांताचे अगदीं नजीक आहे. रस्ता रणाचा पुळणीचा आहे. उंटावरून जावें लागतें; गाड्या महाग मिळतात व वाईट असतात. वर्णन भाग ४ पहा.

३ पंपाः—स. म. रे. हासपेट स्टेशनपासून १० मैलांवर हंपी विरूपाक्षेश्वर. सडक आहे तांगे मोटारी जातात, स्टेशनवर खाणावळ आहे. तेथून पांच मैलांवर किष्किंधा, अंजनी पर्वत व पंपा सरोवर आहे. सर्वत्र सडका आहेत. वर्णन भाग ३.

पुष्कर:—अजमिरापासून सहा मैलांवर पश्चिमेस. सडक आहे तांगे मिळतात. येथें ब्रह्मदेवाचें देऊळ आहे, जवळ डोंगरावर सावित्रीचें स्थान आहे. भाग १ पहा.

५ मानसः—हिमालयाचे उत्तरेस. रस्ता पहिल्या भागांत हिमालयाचे वर्णनांत आहे. जोशी मठापासून स्वतंत्र मार्ग निघतो. तेथून कैलासपर्वत व मानस सरोवर दिसतें तरी १५० कोस आहे.

## पंचकेदार.

केदारं[1] मध्मं[2] तुंगं[3] रुद्रं[4] गोपेश्वरं तथा
केदार पंचकं नित्यं स्मरेत्पातक नाशकं ॥

सर्व बद्रिकेदारचे रस्त्यावर आहेत. भाग १ हिमालय वर्णन पहा.

## पंचबद्री.

१ योग. २ राज. ३ आदी. ४ वृद्ध. आणि ५ ध्यान बदरी. सर्व बदरिनारायणाचे रस्त्यावर आहेत. भाग पहिला पहा.

## पंचप्रयाग.

नंद[1] स्कंदं[2] तथा रुद्रं[3] देवेंद्रं[4] कर्णमेवच ।
प्रयाणपंचकं नित्यं स्मरेत्पातक नाशकं ॥

स्कंदप्रयाग–देवप्रयाग. देवेंद्र–विष्णुप्रयाग.

हे सर्व प्रयाग बदरिनारायणाचे रस्त्यावर आहेत भाग १ हिमालयाचें वर्णन व नकाशा पहावा.

---

## पंचमहातत्त्वांचीं देवस्थानें.

पृथ्वी–कांची वरं. सौ. इ. रेलवे शिवकांचीचें स्थान. कांचीवरम् स्टेशन अर्कोनं चेंगलपट ब्रांचवर आहे. भाग ३ पहा.

आप–जंबुकेश्वर. सौ. इं. रे. त्रिचनापल्ली एरोड रस्त्यावर. श्रीरंगरोड स्टेशनपासून सुमारें दोन मैलांवर. भाग ३ पहा.

तेज–अरुणाचल. सौ. इं. रे. कडपाटी जंगक्शनपासून कडपाटी विलुपुरं पोंदेचरी ब्रांचवर तिरुवन्नमलय स्टेशनपासून अर्ध्या मैलावर पश्चिमेस अरुणाचल पर्वत आहे त्यावर. भा. ३ पहा.

वायु–कालाहस्ती. स. म. रे. रेनीगुंठा गुडूर रस्त्यावर. स्टेशन पासून गांव एक मैल आहे सडक आहे. भाग ३ पहा.

आकाश – चिदांबरं. सौ. इं रे. विलुपुरं तंजावर रोडवर चिदांबरं स्टेशन आहे. देऊळ स्टेशनपासून दिसतें. सडक आहे. भाग ३ पहा.

---

## चतुरायुध क्षेत्रें

शंखक्षेत्र—जगन्नाथ. पूर्व किनाऱ्यावर प्रसिद्ध आहे. वर्णन भाग ३ पहा.

**चक्र—भुवनेश्वर.** जगन्नाथाच्या फाट्यावरील खुरदा रोड-पासून कलकत्त्याच्या रस्त्यावरील पहिलें स्टेशन. भाग ३ पहा.

**गदा—जयपूर** किंवा **जजपूर** स्टेशन. बी. एन. रे. खुरदा रोड कलकत्ता ब्रांचवर. भाग ३ पहा.

**पद्म—मैत्रावन.** कोनाराक हें जगन्नाथापासून वीस मैलांवर सागरतीरीं आहे. यालाच मैत्रावन नांव आहे. भाग ३.

---

## दत्तक्षेत्रें

श्रीदत्तात्रेयाचा जन्म चित्रकूट पर्वताजवळ अत्रि ऋषीच्या आश्रमांत झाला. त्याची माहिती चित्रकूटाचे ठिकाणीं तिसऱ्या भागांत शेवटीं आहे.

**गाणगापूर**— पुण्याहून रायचुराकडे जाणाऱ्या रस्त्यावर गाणगापूर स्टेशन आहे. तेथून गांव सात मैलांवर भिमा नदीच्या काठीं आहे. सडक नाहीं. भाग ३ पहा.

**नरसोबाची वाडी**—मिरज कोल्हापूर ब्रांचवर शिरोळ रोड स्टेशनपासून पांच मैलांवर. सडक आहे. गाड्या मिळतात. भाग ४ पहा.

**औदुंबर**—पुणे मिरज ब्रांचवर तासगांव स्टेशनपासून तीन मैलांवर कृष्णा काठीं आहे. भाग ४.

---

# २ ऐतिहासिक स्थळें.

**हंपी विजयानगर**—गदग गुंटाकल ब्रांचवर हासपेट स्टेशन-पासून १० मैलांवर तुंगभद्रेच्या काठीं. येथून पंपा सरोवर, अंजनी-पर्वत, किष्किंधा येथें जातां येतें. भाग ३.

**सातारा**—वांईपासून सातारा २० मैल. मराठ्यांची राजधानी. येथून समर्थांचा सज्जनगड, ब्रह्मेंद्रस्वामीची धावडशी, रामशास्त्रांची माहुली, जरंडा पर्वत येथें जातां येतें हीं साताऱ्या आसपास ५।७ मैलांपर्यंत आहेत सातारा येथें जुने राजवाडे आहेत. भाग ४ पहा.

**वेरुळ**—सर्व जगांत प्रख्यात कोरींव लेणीं. गोदावरी व्हाली रेलवे, मनमाडपासून फाटा फुटतो. दौलताबाद स्टेशनपासून १० मैल सडक आहे. भाग २.

**विजापूर**—स. म रे. हुबळी गदग ब्रांचवर विजापूर स्टेशन आहे. येथील बोलघुमज व इतर सुंदर मशीदी, महांकाली तोफ अद्याप पहाण्यासारख्या आहेत. भाग ३.

**रायगड व प्रतापगड**— महाबळेश्वराहून प्रतापगडला उत्तम वाट आहे. महाडावरूनही आहे पण ती कठीण आहे. रायगडला जाण्यास प्रथम बाणकोट उर्फ हरेश्वर बंदरास जाऊन तेथून लहान बोटीनें दासगांवास जावें; तेथून महाडास जावें तेथून ९ कोसांवर रायगड आहे वाटेंत ५ मैलांवर नातेगांव लागतो प्रतापगड येथें अफजुल खानाचें वधस्थान व सृष्टिसौंदर्य बहारीचें आहे. भा. ४.

**सिंहगड**—पुण्यापासून १७ मैल हा तानाजी मालुसऱ्यानें पराक्रमाची शर्थ करून घेतला. हल्लीं तेथें लोक हवा खाण्यास जातात. भाग ४.

**शिवनेरी**— जुन्नराजवळ शिवनेरी किल्ला, शिवाई देवी, शिवाजीचें जन्मस्थान हीं ऐतिहासिक स्थळें आहेत. भाग ४.

**घारापुरी**—मुंबईपासून बोटीनें जावें. हें मुंबईजवळ बेट आहे येथें कोरींवलेणीं उत्तम आहेत. भा. ३.

**कानेरी**—बी बी. रेलवे बोरिवली स्टेशनपासून किंवा ठाण्यापासून ६ मैल डोंगरांत आहेत. जवळच विहार तुळशीतलाव आहे. भा. ४.

---

# ३ सृष्टि सौंदर्याचीं किंवा हवा खाण्याचीं स्थानें

**महाबळेश्वर**—वांईपासून वीस मैल सह्याद्रीवर आहे. येथें मोटारी तागे जातात जवळ धौम महाबळेश्वर क्षेत्र आहे, तेथें अवश्य जावें तेथें कृष्णा वेण्या व सावित्री यांचें उगमाचें रम्यस्थान, ब्रह्मारण्य, व महाबळेश्वर शिवस्थान हीं पहाण्यासारखीं आहेत. हवा खाण्याचें ठिकाण व क्षेत्र अगदीं भिन्न ठिकाणीं आहेत. भाग ४ पहा.

**माथेरान**—नेरळ स्टेशनपासून छोटी रेलवे जाते. उन्हाळे दिवसांत हें रम्य ठिकाण आहे. येथील पाइंटची शोभा फार मजेची आहे. भाग ४ पहा.

**उत्तकमंड**—सौ. इं. रे. फोडानूर जंक्शनपासून मटापालियमकडे फाटा फुटतो, तेथून उत्तकमंड येथें स्वतंत्र रेलवे गेली आहे. दक्षिण हिंदुस्थानांत अत्युष्ण प्रदेशांत हें अति रम्य थंड ठिकाण युरोपीयन वस्तीचें आहे. येथील हवा थेट विलायतसारखी आहे. भाग ३ पहा.

**गिरसप्पा**—जगप्रसिद्ध धबधबा. इतका उंच धबधबा सर्व जगांत कोठें नाहीं. याला रस्ते दोन. एक होनावर बंदरापासून पडावानें १२ मैल गिरसप्पास जावें. तेथून मलीमणी घाटानें जोग या ठिकाणीं जावें. हा धबधबा म्हैसूर व ब्रिटिश हद्दीतून दोन्हींकडून पहाण्यासारखा आहे. याला घाटावरूनही दुसरा मार्ग आहे. स. म. रे. शिमोगा स्टेशनपासून ६४ मैल हा आहे. सडक आहे, तांगे मोटारी मिळतात. भाग ४ पहा.

**दुधसागर**— हा लहानसा, सुंदर धबधबा मार्म गोव्याहून लोंढ्यास रेलवेनें जातांना घाटांत लागतो; गाडींतून याची शोभा चांगली दिसते. भाग ४.

---

गोकाक--हाही एक लहान धबधबा गोकाक स्टेशनपासून सुमारें ३ मैल पूर्वेस आहे. येथें यावर एक गिरणी चालविलेली आहे. जाण्यास सडक आहे. गांव थोडा लांब आहे तेथें लांकडाचीं फळें हुबेहुब होतात. भाग ४ पहा.

तानसा तलाव-- जगप्रसिद्ध तलावांपैकीं हा एक आहे. जी. आय. पी रे. नाशीक रस्त्यावर आसनगांव स्टेशनपासून ६ मैलांवर. रस्ता खराब आहे. येथून मुंबईला पाणी आणलें आहे. भाग ४.

सिमला—प्रसिद्धच आहे. दिल्ली, अंबाला, काल्का व सिमला असा रस्ता आहे.

दार्जिलिंग—प्रसिद्ध हवेचें ठिकाण येथें जाण्यास रेलवे आहे. बंगाल सरकारचें हवा खाण्याचें ठिकाण आहे. रेलवेंतून लहान मोठ्या पहाडी कड्यांचें, दऱ्याखोऱ्यांचे व धबधब्यांचे देखावे प्रेक्षणीय आहेत; तसेच टॉम पईंटचें अवघड काम, महानदीवरील सातशें फूट लांबीचा जंगी पूल, आणि तेथून फार लांबवर कांचनगंगा, धवलगिरी हीं हिमालयाचीं बर्फयुक्त शिखरें व अनुपम सृष्टीशोभेचे प्रकार पाहाणाराचें मन प्रसन्न करणारे व थक्क करणारे आहेत.

अबूपहाड-बांबे बडोदा रेलवेची राजपूताना माळवा लाईन. आबूरोड स्टेशनपासून १७ मैल चांगली सडक आहे. तांगे, झंपारे मिळतात जुनें नाव आदर्शावली. जैनांचीं अत्यंत मनोहर देवळें आहेत. हवा तेजस्वी आहे.

मार्बलरॉक-इटारशी जबलपूर रस्त्यावर मिरगंज स्टेशनपासून दोन मैलांवर किंवा जबलपूरपासून १२ मैलांवर नर्मदेचा धबधबा आहे धबधबा संगमरवरी डोंगराच्या खिंडींत पडतो त्यामुळें ह्या गिरीप्रदेशाची व धबधब्याची शोभा अपूर्व दिसते. भा. ३.

———

## ४ कारखाने.

**पनवेलः**--मुंबईहून किंवा कर्जतहून रस्ता आहे. येथील आर्यौषधींचा मोठा कारखाना पहाण्यासारखा आहे.

**तळेगांवः**—स्टेशनपासून गांव जवळ आहे. येथील समर्थ विद्यालय व काचेचा कारखाना पहाण्यासारखा आहे. भाग ४

**ओगलेवाडीः**—संस्थान औंध, स्टेशन कराड. येथील कांच कारखानाही पहाण्यासारखा आहे.

**किरलोस्करवाडीः**— जि. सातारा. येथील लोखंडी कारखाना पहाण्यासारखा आहे.

**पोरबंदरः**— बंदर व काठेवाड रेलवेंतील हें शेवटचें स्टेशन आहे. मुंबईहून बोटीनेंही जातां येतें. किंवा काठेवाड रेलवे जेटलसरपासून फाटा फुटतो. याला सुदामपुरी ह्मणतात. येथें सिमेंटचा मोठा कारखाना आहे. भा. १.

**कोलारः**— येथें सोन्याच्या खाणी आहेत. बंगलोरपासून बोरींगपेठकडे रस्ता जातो. बोरींगपेठपासून खाणींकडे एक फांटा गेला आहे मुख्य स्टशेन उरगम. भा. ३.

---

# दुसरी फार प्रख्यात क्षेत्रें.

**आडिवरें**—महाकाळीचें स्थान. हें दैवत सत्वगुणी आहे. मुंबईहून पूर्णगड बंदर, तेथून कशेळीपर्यंत पडाव, पुढें विजयदुर्गकडे सडक जाते त्या सडकेनें २।३ मैल गेलें ह्मणजे उजवे बाजूस कनकादित्य डावे बाजूस आडिवरें गांव, पुढें १॥ मैल लांब देवीचें स्थान आहे.

**अमरनाथ**—श्रीनगर काश्मिरापासून साठ कोस किंवा रावळपिंडीपासून १०० शंभर कोस. श्रीनगर येथें जाण्यास टांगे, झंपारें, कंड्या वगैरे मिळतात. श्रावण शुद्ध ५ ला दरसाल श्रीनगर येथून श्रीशंकराचार्यांची दिंडी निघते, तीबरोबर निघावें. हिमालयाची तयारी पहिल्या भागांत सांगितल्याप्रमाणें करावी. रावळपिंडिपासून श्रीनगर ४० कोस आहे. रावळपिंडी स्टेशनपासून पुढीलप्रमाणें मुक्काम करावे लागतात. रावळपिंडी, हेपळाबाद, बारामुका, श्रीनगर, अनंतनाग, मटन, जतकमहाल, पेलगाम, चंदनवाडी, शेषनाग, वैतरणी व अमरनाथ. शेवटला मुक्काम वैतरणीवर होतो तेथें शुद्ध १४ ला पोचावें लागतें. दुसरे दिवशीं स्नान करून शुचिर्भूत होऊन भूर्जपत्र नेसून निघावें लागतें भूर्जपत्रावाचून दुसरा कपडा घेत नाहींत. सकाळीं निघून दुपारीं बारा वाजतां बर्फाचें अमरनाथाच्या लिंगाचें दर्शन होतें. हें लिंग त्याच दिवशीं आपोआप होऊन विसर्जन होतें. ही यात्रा अवघड आहे. वाटेंत यात्रेचा शिधा पाण्याचा बंदोबस्त काश्मीर सरकारकडून होतो.

**अमृतसर**—शीख लोकांचें पवित्र शहर येथें त्यांचें सुवर्णमंदीर आहे.

**आळंदी**—पुण्यापासून सडकेनें १३ मैल इंद्राणीचे काठीं आहे. येथें श्री ज्ञानेश्वर महाराजांची समाधी आहे. हिला पूर्वी अलकावती म्हणत. भाग ४ पहा.

**अंगलाजदेवी**—गोसाव्यांची मुख्य देवता. कराचीपासून शंभर कोस उंटावरून जावें लागतें. सर्व मुलूख वालुका-मैदान असून मध्यें पाणीसुद्धां मिळत नाहीं इतकी ही कठीण यात्रा आहे. म्हणून ही यात्रा फक्त गोसावीच करितात.

**अंबाबाई--जगदंबा**— जोगाईचें अंबें निजाम हद्दींत आहे. बार्शी लाईट रेलवेनें लातूरपासून ५१७ मैलांवर आहे, सडक नाहीं. याला मोमिनाबाद हें मुसलमानांनीं नांव ठेविलें आहे. भाग ३ पहा.

**उडूपी**--मंगलोर लाईन उडपी बंदरपासून सहा मैलांवर हा गांव आहे. वैष्णव मतानुयायी श्रीमध्वाचार्यांचा येथें मठ आहे. स्मार्त व वैष्णव दोन्ही पंथाचे लोक ही यात्रा करितात. जवळच एक सुब्रह्मण्याचें देऊळ आहे.

**उदेपूर**--रतलाम अजमीर रस्त्यावर चितूरगड जंक्शनवरून उदेपूर येथें जाण्यास फाटा फुटतो. महाराणा उदयसिंग यानें हें वसविलें. येथील श्रीजगन्नाथाचें मंदीर व राजवाडा पाहाण्यासारखा आहे. सर्व राजपुतान्यांत हें देवस्थान फार प्रसिद्ध आहे. येथून नाथद्वाराचें ठिकाण २२ मैलांवर आहे येथें मुख्य नाथजीचें देऊळ आहे. ही मूर्ती मथुरेंतून आणीत असतां रथाचीं चाकें येथें रुतलीं ह्मणून तिची येथें स्थापना केली. ह्या देवस्थानावर गुजराथी लोकांची फार भक्ति आहे.

**उद्धर रामेश्वर**--पालीपासून सहा मैल. येथें जटायूचा उद्धार झाला जटायूनें रावणास लंकेंत सिता घेऊन जातांना येथें डोंगरावर प्रतिबंध केला तें हें ठिकाण. डोंगरावर जटायु तीर्थ आहे भाग ४.

**कनकादित्य**--सूर्यनारायणाचे देऊळ. मुंबईहून पूर्णगड बंदर, तेथून कशेळीपर्यंत पडाव, पुढें विजयदुर्गकडे सडक जाते त्या रस्त्यानें २।२ मैल गेलें ह्मणजे उजवे बाजूस कनकादित्य.

**कनकेश्वर**--आंग्र्यांचें मुख्य देवस्थान हें प्राचीन आहे. मुंबईहून मांडवें किंवा रेवस बंदराहून अलिबागला सडक जाते त्या सडकेनें मापगांव येथें दत्ताचे देवळांत जाऊन तेथून वर डोंगरावर चढण्यास पायऱ्या आहेत. येथें उन्हाळ्यांत पाण्याचा तोटा आहे. धरमतरवरूनही रस्ता आहे. भाग ४.

**करनाळी**-- बडोदें व दुभई यांचेमध्यें नर्मदा तटाकीं, कर्नाळी क्षेत्राचें सुरस वर्णन नर्मदा महात्मांत आहे; जवळच गरुडेश्वरीं वासुदेवानंद ऊर्फ टेंमे स्वामी यांची समाधी आहे. यात्रा आषाढ

शुद्ध १. चैत्र व कार्तिकांत नर्मदास्नानास वीस हजारपासून पंचवीस हजारांपर्यंत यात्रा जमते.

**कऱ्हाड**—कृष्णा कोयनांचा प्रीतिसंगम. येथें ह्या दोन नद्या अगदीं समोरासमोरून येऊन जोरानें मिळतात. येथें आगपेट्यांचे कारखानें व दोन बुरूज आहेत. स. म. रे. कऱ्हाड स्टेशन आहे. भाग ४ पहा.

**कार्तिकस्वामी**—स. म. रे. हासपेट ते कण्वीहळ्ळी फाटा आहे. कण्वीहळ्ळीपासून ४ मैल सोंडूर व तेथून चार मैल लोहाचल पर्वतावर हे स्थान आहे. येथें नियमित जागीं दगड पुरून ठेविले असतां तीन वर्षांनीं त्यांचे भस्म होतें. येथें बायका दर्शनास जात नाहींत. भाग २.

**कुरुक्षेत्र**—दिल्ली अंबाला रस्यावर आहे. याला स्टेशनें कुरुक्षेत्र व स्थानेश्वर अशीं दोन आहेत. कुरुक्षेत्र हें गांवाजवळ आहे व स्थानेश्वर रणक्षेत्राजवळ आहे. येथें प्रख्यात भारतीय युद्ध झालें व श्रीकृष्णानें अर्जुनास गीता सांगितली. भाग १.

**गिरनार**—काठेवाड रेलवे. जेटलसर वेरावळ ब्रांच, जुनागड स्टेशनपासून २ मैल सडक आहे तांगे मोटारी मिळतात. वर जाण्यास सुंदर पायऱ्या आहेत, शेवटीं थोडा चढाव आहे उंची ३५०० फूट. अशोकाचे शिलालेख, अंबामातेचें व त्रिमूर्तीचें ह्मणजे दत्ताचें देवालय पहाण्यासारखें आहे. दुसऱ्या टोकावर जैन तीर्थंकरांचा समुदाय असून लहान मोठीं जैनांची सोळा मंदिरें अत्यंत प्रेक्षणीय आहेत. त्यांत नेमिनाथाचें देवालय मुख्य आहे. भाग ४.

**गिरी बालाजी उर्फ व्यंकटेश**—हें प्रख्यात व्यंकटेशाचें देवस्थान रेनीगुंठ्यापासून तिरुपतीकडे जो फाटा जातो त्यावर तिरुपती ईस्ट स्टेशनपासून व गांवापासून ६ मैल शेषाचल पर्वताच्या मस्तकावर आहे. स्टेशनपासून तिरुपती गांव नजीकच आहे. येथें

बालाजीचे वडील भाऊ गोविंदजी यांचें स्थान आहे. गोविंदजींची मूर्ती निजलेली आहे. येथून बालाजीला जाण्याकरितां डोल्या, पालख्याही मिळतात. वर जाण्यास प्रशस्त पायऱ्या आहेत. येथें अवेळीं लग्न मुंजी होतात. वैष्णव लोकांमध्यें ह्याची फार प्रख्याति आहे. भाग ३ पहा.

**गोकर्ण महाबळेश्वर**—मुंबईहून बोटीनें मंगलोर लाइनी वरील मार्मगावापुढील तद्री बंदर. तेथून पांच मैलांवर हें गणेश स्थापित शंकराचें आत्मलिंग आहे. किंवा रेलवेनें मुंबईहून गोव्यास जावें व तेथून तद्रीस जावें. भाग ४.

**चित्रकूट**—माणिकपूर झांशी रस्त्यावर करवी स्टेशनपासून पांच मैल सडक आहे. अयोध्या सोडल्यापासून रामानें येथेंच पहिला मोठा असा मुक्काम केला. भाग ३.

**जेजुरी**—स. म. रे. पुण्याचे जवळच आहे. येथें डोंगरावर मल्हारी मार्तंडाचें प्रसिद्ध देवालय आहे. गडावर जाण्यास पायऱ्या आहेत. भाग ४ पहा.

**ज्वालामुखी**—पंजाब इलाखा, कांग्रा जिल्हा, डेहरा तालुका. जवळचीं स्टेशनें पानकोट व जालंदर हीं अमृतसरच्या मार्गावर आहेत. तेथें अद्यापपर्यंत कधीं कधीं जमिनींतून ज्वाला निघतात! ही माझी यात्रा झाली नाहीं.

**डाकूर**—बी. बी. रे. आनंद गोध्रा रस्त्यावर हें स्टेशन आहे. येथें द्वारकेंतील श्रीकृष्णाची मूर्ती आणली आहे असें ह्मणतात. दर पौर्णिमेस येथें मोठा उत्साह होतो. भाग १ पहा.

**देहू**—जी. आय. पी. रे. शेलारवाडी स्टेशनपासून पांच मैलांवर इंद्रायणी नदीचे काठीं आहे. सडक आहे, नदीस घाट आहेत. हिच्या डोहांत तुकारामानीं आपले अभंगांची गाथा बुडविली पण तीन महिन्यानें ते कोरडे निघाले! येथें एक पिंपळ आहे तेथून तुकाराम सदेह विमानांत बसून वैकुंठास गेले. अद्यापपर्यंत फा. व. २

ती वेळ आली म्हणजे त्या पिंपळाचीं पानें हालत नाहींत. येथें तुकारामाचें देऊळ व टेकडीवरील त्यांच्या भजनाची जागा दाखवितात. भाग ४ पहा.

**नर्मदा प्रदक्षणा**—ही यात्रा बिन पैशाची खरी पण फार परिश्रमाची आहे. एकंदर ७५०+७५० मिळून जाऊन येऊन १५०० पंधराशें कोसांची ही आहे. ही उपोद्घातांत लिहिल्या रीतीप्रमाणेंच करावी लागते. हिला तीन वर्षें लागतात ! पावसाळ्यांत चार महिने नर्मदेला पूर आल्यामुळें तिचें पाणी रानोमाळ पसरतें ह्मणून कोठेंतरी मोठ्या शहरीं जेथें माधुकरीची सोय असेल तो मुक्काम करावा लागतो. या १५०० कोसांत चार मोठ्या झाडी आहेत. पहिली १२५ कोसांची शूलपाणीची, यांत सोबत पाहिजे. दुसरी ५० कोस ओंकाराची; येथें ही माहितगार मनुष्य पाहिजे. हींत मगर, श्वापदें यांची भीति आहे, थंडीवारा जास्त असतो. तिसरें १०० कोस छोटें महारण व चौथें १५० कोस मोटें महारण. या दोन्ही महारणांत नर्मदा प्रदक्षणा केलेला जुना माहितगार याची सोबत पाहिजे. कारण नर्मदा प्रवाह लहान, आकुंचित व दुसऱ्या नद्या मिळून तिचा संगम मोठा झाला आहे. अशा वेळीं नर्मदा ओळखण्याची पंचाईत पडते. कोठें कोठें नर्मदा पूर्ववाहिनी आहे. भयंकर चुकण्याचीं ठिकाणें गुडनेर संगम व लिंगाघाट. या दोन ठिकाणीं नर्मदा पूर्ववाहिनी आहे. हीं दोन्हीं ठिकाणें महारणांत आहेत; यांत झाडें वगैरे फारशीं नाहींत. कोठेंतरी छाया पाहून उतरावें लागतें.

अमरकंटे भृगुक्षेत्रे नर्मदा ओर संगमे
सर्वत्र पुण्यदा गंगा त्रिषुस्थाने विशेषतः ॥

अमरकंटक, भडोच व बडोदें राज्यांत चांदोरजवळ करनाळी येथें पुष्कळ दिवस मुक्काम केल्याचें पुण्य विशेष आहे. उत्तरेस नवग-

वेणी म्हणजे ९×२=१८ कोस व दक्षिणेस ३×४=१२ कोस नर्मदा दिसत नाहीं. मग विहिरी व तळ्यांचें पाणी प्यावें लागतें. याकरितां शंभर हात दोरी लागते. अंकलेश्वरपासून उत्तरेस शुक्लतीर्थ आहे, त्याचे समोर दक्षिणेस झवलेश्वर महादेव आहे. तेथून नर्मदा सुटते, किनारा लांब राहतो, नर्मदा दर्शन होत नाहीं; बाकी सर्वत्र नर्मदा कांठानेंच जावें लागतें. वरील अडचणीशिवाय सोबतीची फारशी जरूरी नाहीं व ती घेऊंहीं नये.

चातुर्मास्याशिवाय नर्मदा प्रदक्षणा वाटेल तेथून वाटेल तेव्हां-पासून करितां येते. मात्र तिला आरंभ तिच्या उत्तर तटापासून ह्मणजे तिला उजवी करून पुन्हां तेथें यावें लागतें. आल्यानंतर तेथून पुढें पांच कोस गेलें म्हणजे पंचक्रोशी पुरी होते व यात्रा पुरी होते. निघण्याचे वेळीं फक्त कढई करावी लागते. कढई म्हणजे त्या गांवीं जितके नर्मदा प्रदक्षणा करणारे लोक असतील त्यांस जेवण द्यावें लागतें. याशिवाय दुसरा विधी नाहीं. सर्वत्र पायवाट आहे. वाहनांत बसावयाचें नाहीं, जोडा छत्री घ्यावयाची नाहीं, पैसा जोखीम जवळ ठेवावयाचें नाहीं. नाहींतर भिल्ल मारतील! मजूर मिळत नाहीं. सर्व सामान पडशींत घालून आपणच न्यावें लागतें. हजामत करितां कामा नये. उतरण्यास कांहीं ठिकाणीं धर्मशाळा आहेत; कांहीं ठिकाणीं कांहीं नाहीं, कोठेंतरी मुक्काम करावा लागतो. सामान, कफनी, लंगोट्या, पंचा, निजण्यास मृगासन, तवा, पितळी, तांब्या किंवा तुंबा, खिचडीस भांडें याप्रमाणें घ्यावीं; जास्त बोजा घेऊं नये. फक्त सकाळीं प्रवास करावा. भिक्षा मागूनच निर्वाह करावा लागतो. संन्यास घेणारानें प्रथम या यात्रेचा अनुभव घ्यावा हें बरें. सर्वत्र शिधा मिळतो. कोठें कोठें माधुकरीची सोय असते. माधुकरी नसेल तेथें स्वतः स्वयंपाक करावा लागतो. ही यात्रा मुख्यतः गोसाव्यांची आहे. ही प्रास्ताविक माहिती आहे. यात्रेंत खुलासेवार माहिती मिळते.

**नांदगांव**—जंजिरा मुरूडपासून ६ मैल सडक आहे. तेथील जोशी यांचे घराण्यांत एकाला हा गणपती प्रसन्न होऊन त्याकडून त्यांस ज्योतिषांत सिद्धि मिळाली होती. भाग ४.

**निर्मळ**—वसई रोड स्टेशनपासून पांच मैल सडक आहे. येथें श्रीशंकराचार्यांची समाधी आहे. जवळ वसईचा किल्ला चिमणाजी आप्पानें सर केलेला आहे. भाग ४.

**परशुराम**—मुंबईहून जयगड लाईननें दाभोळ बंदर व तेथून लहान बोटीनें गोवळकोट येथें जावें; तेथून एक मैल चिपळूण. तेथून डोंगरावर हें देवस्थान आहे, चढण्यास पायऱ्या आहेत. गोवळकोटाहूनही एकदम वर जातां येतें पण रस्ता खराब आहे. भाग ४ पहा.

**पशुपतेश्वर**—नेपाळांत. बी. एन्. डब्ल्यू रेलवेनें बनारस स्टेशनपासून भटनी, गोरखपूर, नरकटीया जंगक्शनवरून शेवटलें स्टेशन-रक्सौल. तेथून दोन मैलांवर वीरगंज लहान गांव आहे. तेथून १०० मैल पशुपतेश्वर आहे. पैकीं साठ मैलांवर भीमखेडी पावेतों गाड्या जातात. पुढें ४० मैल पायीं जावें लागतें. तांग्यास माणशीं १० रुपये पडतात.

ही यात्रा नेपाळांत स्वतंत्र राष्ट्रांत आहे. ती फक्त महाशिवरात्रीस खुली असते, एरवीं बंद असते. यात्रेस सुरुवात माघ वद्य ७ ते ९ पर्यंत होते, तेथपर्यंत नेपाळ हद्दींत जातां येतें; पुढें बंद. पशुपतेश्वर हें शंकराचे शिरस्थानीं मानलें आहे व धड केदारेश्वर मानलें आहे ह्मणून ही यात्रा केल्याशिवाय केदारेश्वराची यात्रा संपूर्ण होत नाहीं; ह्मणून ही मुद्दाम करावी. वर्णन भाग २ पहा.

**पक्षितीर्थ**—मद्रासपासून रामेश्वरचे रस्त्यावर चेंगलपट हें जंक्शन आहे, तेथून पूर्वेस ९ मैलांवर डोंगरावर हें स्थान आहे. येथें प्राचीन ऋषी पक्षिरूपानें अद्याप भोग घेण्यास येतात हें प्रत्यक्ष दिसतें. हे पक्षी इतर पक्षांपेक्षां भिन्न दिसतात. हें जैनांचें देवस्थान

आहे ह्मणतात, पण येथें शंकराचें देऊळ आहे. वर्णन भाग ३.

**पंढरपूर**— प्रख्यात देवस्थान कुर्डूवाडीपासून पंढरपुराकडे छोटी रेल्वे गेली आहे. वर्णन भाग ३ पहा.

**पारसनाथ**—हें जैनांचें प्रसिद्ध मंदिर आहे. गया कलकत्ता रस्त्यावर गोमो व इसरी अशीं दोन स्टेशनें येथें जाण्याकरितां आहेत. बौद्धधर्मीयांची ही काशी आहे.

**पुळें**—येथील गणपतीचें स्थान प्रसिद्ध आहे. बोटीचें बंदर तिवरी, तेथून चार मैल दक्षिणेस. वाटेंत मालगुंड गांव लागतो. हें देऊळ समुद्रकांठीं आहे. बंदरावर क्वचित् गाड्या मिळतात, उत्सव माघ शु० ४ ला होतो त्यावेळीं मिळतात. भाग ४.

**ब्रह्मवर्त**— बिठूर. कानपूर अलीगड रस्त्यावर गंगेच्या कांठीं आहे. ही स्वायंभूव मनूची राजधानी. ब्रह्मदेवानें येथें अश्वमेध यज्ञ केला व ब्रह्मेश्वर लिंगाची स्थापना केली, यामुळें याला ब्रह्मवर्त ह्मणतात. येथें वाल्मीक ऋषीचा आश्रम होता. लव कुशांचा येथेंच जन्म झाला. दुसरे बाजीराव राज्याचा बेदावा इंग्रजांस देऊन येथें ब्रह्मकर्म करीत बसले. येथें पेशव्यांचा वाडा आहे.

**बार्शी**—अंबरिषानें साधनद्वादशीचें व्रत केलें व दुर्वासानें त्याला छळलें तें हें ठिकाण. येथें भगवंताचें (विष्णूचें) प्रख्यात देवस्थान आहे. येथें जाण्यास कुर्डूवाडीपासून छोट्या रेल्वेचा फाटा फुटतो. भाग ३ पहा.

**महाकाली**—कलकत्यास प्रसिद्ध आहे. भाग ३ पहा.

**महालक्ष्मी**—कोल्हापूरची निराळी. ही कोळवणांतील बी. बी. रेलवे. डहाणूरोड स्टेशनपासून जव्हार संस्थानचे रस्त्यावर महालक्ष्मीस जाण्यास डहाणूपासून वीस मैलांपासून फाटा फुटतो. फाटा-फुटल्यापासून २ मैलांवर आहे. चैत्र शु. १५ होते त्यावेळीं मोठी यात्रा भरते. ह्या देवीचे उपासक पारशीसुद्धां आहेत. गुजराथची

यात्रा विशेष येते. यात्रेच्या दिवसांत डहाणूरोड स्टेशनवरून मोटार टांगे मिळतात, चांगली सडक आहे. वर्णन भाग ४ पहा.

**महासरस्वती**—सरस्वती ४।५ ठिकाणीं आहे, पण बहुतेक ठिकाणीं ती गुह्यच किंवा अस्पष्ट आहे. १ मातृगया (सिद्धपूर) सरस्वतीचे कांठीं आहे २ कुरु क्षेत्रांत. ३ पंजाबांत. हिंदुस्थानांत आर्य प्रथम आल्यावर हिचेच ठिकाणीं त्यांनीं प्रथम फार वेळ वस्ती केली. हल्लीं ही गुप्त झाली आहे. ४ गंगा यमुना यांचे संगमीं. ५ हिमालयांत बदरिनारायणाचें उत्तरेस वसुधारेजवळ व्यासाश्रमीं. येथें मात्र चांगला प्रवाह आहे. अशी निरनिराळ्या पांच ठिकाणीं आहे. भाग १ हिमालय वर्णन पहा.

**मातृगया**— रा. मा. रे. सिद्धपूर स्टेशनपासून गांव एक मैल सरस्वतीचे काठीं आहे. येथें आईच्या नांवानें स्वतंत्र श्राद्ध होतें. कपिल महामुनीनीं आपली आई देवहुती हिला ज्ञानाचा उपदेश येथें केल्यामुळें ती मुक्त झाली ह्मणून येथें श्राद्ध केल्यानें पुत्र आईच्या ऋणांतून मुक्त होतो. वर्णन भाग १.

**मीनाक्षी**—मदुरा शहर सौ. इं रे. दक्षिण हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे तें रामेश्वराकडे जातांना लागतें. या शहरांत हें प्रख्यात देवस्थान आहे. येथील गोपुरें प्रख्यात आहेत. हीं ह्या देवळाला ९ आहेत. इतकीं सुंदर गोपुरें जगांत दुसरे कोठेंही नाहींत. देऊळही फार मोठें आहे. भाग ३.

**राजापूर**—गोवेंलाइन बोटीचें स्टेशन मुसाकाजी उर्फ जैतापूर तेथून खाडीनें थेट राजापूरपर्यंत एकोणीस मैल. आतां लहान बोट झाली आहे व पडावही जातात. येथून आग्नेय दिशेस दोन मैलांवर गंगेच्या उगमाचें स्थान आहे. येथें गंगा आली ह्मणजे तिच्या 'चौदा कुंडांतून पूर्णपणें जोरानें वाहूं लागते. आतां ती येत नाहींशी झाली आहे. भाग ४ पहा.

**वज्राबाई**—ठाणें जिल्हा. कल्याण भिवंडी वाडे रस्त्यावर भिवंडीपुढें अंबाडीपासून वसईस जाण्यास फाटा फुटतो त्यावर पांच मैलाचा रस्ता आहे. येथें वैतरणा नदींत उष्णोदकाचीं कुंडें आहेत. पाण्यास गंधकाचा वास येतो वसईच्या फिरंग्यांचे वेळ्यांत चिमणाजी आपा पेशवे यांस हिच्या नवसामुळें यश आल्यामुळें त्यांनीं हें देवालय किल्ल्यातारखें बांधलें आहे. येथें तीन मूर्ती आहेत. १ वज्राबाई २ रेणुका, ३ महालक्ष्मी. मूर्ती सिंदूरचर्चित असून दर्शनीय आहेत. यात्रा चैत्र व. ३०. भाग ४ पहा.

**वांई**—स. म. रे. वाठारपासून वीस मैल. पुण्याहूनही मोटारी सुटतात. ही प्राचीन विराट राजाची राजधानी. येथें पांडव अज्ञातवासांत होते त्या वेळच्या सर्व गोष्टींचीं स्थळें आहेत. जवळ धोममहाबळेश्वर पैकीं धोम येथें धौम्य ऋषीचा आश्रम होता. येथून मेणवलीस जातां येतें. तेथें नानाफडणविसांचा वाडा आहे. भाग ३ पहा.

**विंध्यवासिनी**—विंध्याचल स्टेशन अलाहाबाद व मोंगलसराई यांचे दरम्यान आहे, तेथून एक मैलावर विंध्याचल नांवाचें क्षेत्र गंगातीरीं आहे, तेथें विंध्यवासिनी नामक देवीचें मुख्य स्थान आहे. हिला माहामाया असेंही ह्मणतात. कृष्ण जन्माचे वेळीं कौंसानें देवकीचा आठवा गर्भ ह्मणून दगडावर आपटण्यास नेला असतां हातांतून निसटून आकाशांत गेली तीच ही महामाया.

**वीरेश्वर**—पालीपासून ९ मैलांवर खालापुराकडे सडक जाते त्या रस्त्यावर. येथें भूतसंबंध पीडा जाऊन महारोगही जातात. भाग ४.

**वैजनाथ**—नेरळहून किंवा कर्जतहून ११ मैल आहे, सडक नाहीं. येथें शंकरास अभिषेक धरिला असतां अद्याप निरनिराळ्या प्रकारचा सिंहनाद निघतो. कर्जत व नेरळमधील भिडपुरी रोड स्टेशनपासून १।२ मैल जवळ पडतें. भाग ४.

**शृंगेरी**—स. म. रे. हुबळी बंगलोर लाइनीवर बिरूर जंगक्शन

आहे, तेथून शिमोग्याचें रस्त्यावर तरीकारी स्टेशन लागतें तेथून स्टीमट्रामनें नरसिंगराजपुरास जावें; तेथून शृंगेरी ३२ मैल आहे. किंवा शिमोग्यापासून ५० मैल आहे. या वाटेनें तीर्थहळ्ळी क्षेत्र लागतें येथें श्रीआद्यशंकराचार्यांचा मुख्य मठ आहे. येथें शृंगऋषीचा मूळ आश्रम होता. येथून तुंगभद्रा नदी उगम पावली. ही नदीच हरिहरात्मक आहे. भाग ३.


**सिद्धेश्वर**—पालीपासून दोन मैल प्राचीन शिवस्थान आहे. भाग ४.

**सुब्रण्यक्षेत्र**—रेनीगुंठा अर्कोनं रस्त्यावर तिरूतनी स्टेशनवर कुमार पर्वतावर आहे. येथें सहकुटुंब यात्रा होते. मला जातां आलें नाहीं. भाग ३.

**सोमेश्वर**—रत्नागिरीपासून पडावानें जावें. हा प्राचीन प्रसिद्ध गांव आहे. येथील देवालय फार प्राचीन आहे. भाग ४.

**हरीहर** - स. म. रे. हुगळी ह्मैसूर ब्रांचवर तुंगभद्रेच्या काठीं शहर आहे. येथें हरिहरांची उभी मूर्ती एकरूपानें आहे ह्मणजे अर्धा भाग शंकराचा व अर्धा विष्णूचा. वर्णन भाग ३.

**हरेश्वर**—मुंबईहून बोटीचें बंदर, प्रख्यात देवस्थान. येथें सेवा केल्यानें भूतपिशाच्यासंबंधी पीडा जातात. भाग ४.



# परिशिष्ट--२ रें.

## भारतीय साम्राज्यांतील पौराणिक ५६ देश
## व
## त्यांचीं हल्लींचीं स्थानें.

१ आंध्र—नेल्लूर, मच्छलीपट्टण, राजमहेंद्री.
२ अंग—गयेजवळ.
३ नैषध—माळवा. (अवंति—उज्जनी.)
४ वंग—बंगाल (कलकत्ता).
५ बार्बर—अरबस्तान.
६ भद्र—मिसर—इजीप्त.
७ भोज—काशीचा प्रदेश.
८ चोल—अर्काट, तंजावर.
९. दशार्णव—काटेवाड.
१० द्रविड—जावली, मद्रासजवळ.
११ द्राविड—खुद्द मद्रास.
१२ पारसीक—इराण.
१३ गांधार—काबूल, कंदहार.
१४ गुर्जर—अहमदाबाद.
१५ गौड-कनोज, गंगातीरचा प्रदेश
१६ चंपावती—चौल, रेवदंडा.
१७ जालंदर—पंजाब.
१८ कालिंग—ओढ्याप्रांत.
१९ कोंकण—साष्टी, रत्नागिरी.
२० कोसल—अयोध्या, लखनौ.
२१ कांबोज—कांबोडिया आनाम.
२२ कामरूप—आसाम.
२३ कर्नाटक—म्हैसूर.
२४ काराट—खानदेश.
२५ कैकेय—द. अफगाणिस्थान.
२६ काश्मीर—काश्मीर, श्रीनगर.
२७ केरळ—कालिकोट.
२८ किरात—होनावर.
२९ कुंतरु—बेदर.
३० कुरु—पानपत.
३१ लाल—वेरुळ.
३२ मत्स्य—प्रयाग, कानपूर.
३३ मागध—गयेपुढें मणिपूर.
३४ महाराष्ट्र—पुणें. बेळगांव.
३५ मालव—नेमाड, इंदूर.
३६ मल्याळ—मंगळूर.
३७ मरू—मारवाड.
३८ नैध्रुव—आग्रा.

३९ मैथिल—गोरखपूर. तिरहूट.
४० निपाळ—नेपाळ.
४१ पानाट—काल्पी.
४२ पांचाळ—लाहोर.
४३ पांड्य—आर्काट.
४४ पुलिंद—बलुचिस्थान.
४५ सिवारै—कच्छभूज.
४६ सिंधु—कराची, हैदराबाद.
४७ सिंहल—लंका.
४८ सौराष्ट्र—सोरटी सोमनाथ.
४९ शूरसेन—आग्रा याचे दक्षिणेस.
५० टंकण—कुडुक दक्षिणेंत आहे.
५१ वराट—माहूर.
५२ विदेह—वऱ्हाड.
५३ विदर्भ—गोंडवण.
५४ त्रिविष्टप—तिबेट.
५५ यवन—बुखारा, समरकंद.
५६ बाल्हिक—सिरिया, शाम.

---

यावरून भारतीय साम्राज्य कसें पसरलें होतें याची कल्पना येईल.

---

सीता स्वयंवराचे वेळीं जनकाच्या राजसभेंत छप्पन्न देशचे राजे आले होते त्यांचें वर्णन विठ्ठल कवीनें आपल्या सीतास्वयंवरांत केलें आहे. हें वर्णन वाल्मीकि रामायण बालकांड चतुर्थ सर्ग यांतील रावण गर्वपरिहार या वर्णनाचे आधारें केलें आहे असें कवीचें ह्मणणें आहे. पण हबशी, फिरंगी वगैरे अलीकडचीं नावें त्यावेळीं असणें संभवनीय नाहीं. त्यानें ते कसेतरी त्यावेळच्या प्रसिद्धीप्रमाणें छप्पन्नास छप्पन्न जुळवून दिले असावे असा अजमास आहे. कारण त्यांत विदर्भ, सिंधु, मत्स्य, कामरूप, पांड्य, मैथिल, भोज, दशार्णव, पारसीक वगैरे जुन्या प्रख्यात देशांचीं नांवेंच नाहींत. त्यानें दिलेल्या छप्पन्न देशांचीं नावें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत.

राजे अंग[1] कलिंग[2] वंग[3] मगध[4] द्रावीड[5] कर्नाटकी[6]
गौड[7] श्चोल[8] निषाद[9] बर्बर[10] महाकांबोज[11] बंगालिकी[12]
काश्मीरादि[13] विदर्भ[14] गुर्जर[15] तथा सौराष्ट्र[16] तैलंगणी[17]
कालिंगा[18] शबरादि[19] नैषध[20] पुढें पाहे प्रभू कोंकणी[21] ॥ १ ॥

उज्जैन्यादि[22] पुलिंद[23] कुंतल[24] महा कौसल्य[25] मल्याळिचे[26]
राजे केरळ[27] चोरली[28] व्रजइचे[29] टंकाण[30] कैरातिचे[31]
काशीराज[32] कलिंद[33] कैकय[34] महानट्यादि नाटप्रभू
सिंहलादिक[35] चैद्य[36] जांगल[37] कुरू[38] गांधार[39] आंध्रय[40] प्रभु ॥२॥
पाहे ताम्रमुखादि शाम[41] हबसी[42] राजे फिरंगाणिचे[43]
पाहे कैकट[44] कच्छ[45] ते अरुबरू राजे खुरासानिचे[46]
पाहे म्लेंच्छ पठाण कैकड[47] महाराजे कनोजे[48] भले
पाहे डोंव गरीब भिल्ल चतुरे राजे सभे शोभले ॥ ३ ॥
पाहे लाट[49] विराट[50] माळव[51] महाराष्ट्र[52] प्रभू देशिचे
गौडी[53] कातुर मारवाड[54] नृपति नेपाळ[55] पांचाळिचे[56]
श्री ताम्रध्वज नीलकेतु मिनले शोभा कशी तें दिसे
पाहे रावण राक्षसाधिप उभा मेरू जसा लालसे ॥४॥

देशांच्या नांवांवर आंकडे घातले; आहेत बाकी राहिलेलीं राजांचीं नांवें आहेत. कारण छप्पन्नदेशचे व शाहाण्णव कुळींचे प्रख्यात राजे आले होते असें वर्णन आहे.

# परिशिष्ट--३ रें

## सप्तार्णवाः सप्तकुलाचलाश्च सप्तर्षयो द्वीप वनानि सप्त ॥

## सप्तद्वीपावसुंधरा.

पौराणिक काळीं पृथ्वीचा आकार कमळासारखा असून त्या कमळाच्या मध्यभागीं मेरूपर्यंत व त्याभोंवतीं पाकळ्याप्रमाणें सप्तद्वीपें आहेत असें मानीत असत. त्या प्रत्येक द्वीपांत लहान लहान देशासारखीं वर्षें (भाग) असत, असें त्या सप्तद्वीपांत एक एक प्रख्यात वर्ष होतें. तीं द्वीपें व त्यांचीं प्रख्यात वर्षें कोठें व कशीं होतीं त्याचा हा खुलासा केला आहे.

हल्लींच्या विद्वानांच्याही मतानें जगांत पामीरचा उंचवट्याचा प्रदेश हाच सर्व पृथ्वींत उंच आहे, हाच पूर्वीचा मेरू. त्यापासून प्रत्यक्ष किंवा परंपरेनें सुलेमान, हिमालय, काराकोरम, कुएनलन, थियानशान, ग्रोलरनाग, व हिंदुकूश असे सात पर्वत निघाले आहेत. यांतील प्रत्येक दोन पर्वतांच्यामध्यें जो प्रदेश सांपडतो त्यालाच पूर्वी महाद्वीप अशी संज्ञा होती. जसें सुलेमान व हिमालयामध्यें जंबूद्वीप हिमालय व काराकोरम यांमध्यें क्रौंच किंवा किन्नरद्वीप. याप्रमाणें पुढें जाणावें. भाग १ यांत जमनोत्रीचे यात्रा वर्णनांत त्या प्रदेशाचें दिग्दर्शन केलें आहे तें मेरुच्या वर्णनाला कसें तंतोतंत जुळतें तें स्पष्ट दाखविलेंच आहे. आतां तीं द्वीपें व त्यांचीं हल्लींचीं नावें सांगतों.

## सप्तद्वीपें.

—:x:—

१ जंबूद्वीप—हिंदुस्थान, सयाम, कांबोजपर्यंत.

२ क्रौंच किंवा किन्नरद्वीप—तिबेट व त्यापुढचा प्रदेश.

३ पुष्कर—गोबी मांगोलिया.

४ शाकद्वीप—रशिया सैबीरिया.

५ कुशद्वीप—तार्तरी.

६ शाल्मलद्वीप—इराण त्रान्स काकेशियापर्यंतचा प्रदेश.

७ प्लक्षद्वीप—रोम, सर्व यूरोप खंड. (हें मात्र जरा लांब राहिलें).

त्यावेळीं जितका पृथ्वीचा भाग प्रसिद्ध होता त्यास त्यांनीं हीं नांवें दिलीं होतीं अर्थात् अप्रसिद्ध व ओसाड भागाला नांव नव्हतें. फार उंचावरून विमानांतून ह्या मेरू पर्वतापासून चोहोंकडे नीट न्याहाळून पाहिलें तर खरोखरच ही सप्तद्वीपा वसुंधरा त्याला कमळाप्रमाणेंच दिसेल. इंग्लिश लोक पृथ्वीवरील सर्व जमिनीच्या मधोमध इंग्लंड आहे असें दाखवितात पण उंचीच्या व त्या काळच्या सुधारणेच्या दृष्टीनें पहातां सर्व जगाचा मेरू किंवा खुटा पामीरचा प्रदेशच ठरतो. प्राचीन आर्यांनीं सर्व जगांत संचार करून काढलेलें हें विधान किती समर्पक आहे? तसेंच कांहीं साधन नसतां हाच प्रदेश सर्व जगांत उंच आहे असें ज्यांनीं ठरविलें त्यांची अक्कल तारीफ करण्यासारखी नाहीं असें कोण ह्मणेल?

---

## सप्त वर्षें.

—:x:—

१ भरतवर्ष—हिंदुस्थान,

२ उत्तरकुरुवर्ष—काशगर, यार्कंद.

३ हिरण्मय वर्ष—बुखारा, समर्कंद.
४ हेमकूट—हिरात.
५ हरिवर्ष—कंदहार.
६ इलावर्ष—तेहरान.
७ किंपुरुष वर्ष—खिलात.

---

# सप्त समुद्र.

## सप्तार्णवामध्ये.

पौराणिक काळीं सप्त समुद्र प्रसिद्ध होते ते.

१ क्षीरोद—चीन समुद्र, पासिफिक महासागर.

२ दधिमंडोद—उत्तर महासागर (हा नेहमीं बर्फानें गोठलेला असल्यामुळें हा दह्यासारखा दिसे ह्मणून याला हें नांव मिळालें).

३ सुरोद—कास्पियन (याचे भोंवतीं पूर्वीं बरीच वस्ती होती).

४ घृतोद—अरल समुद्र (याचें पाणी जाड असावें).

५ इक्षुरसोद—काळा समुद्र (याचें पाणी त्या वेळीं गोड असावें).

६ क्षारोद—भूमध्य समुद्र (याचें पाणी विशेष खारट असावें).

७ शुद्धोद—अरबी समुद्र.

## सप्त कुलाचल.

त्यावेळीं भरतवर्षांत ( खंडांत ) जे सात कुलाचल ( पर्वत ) प्रसिद्ध होते ते. त्यांत हिमालयासारख्या द्वीपांची मर्यादादर्शक महापर्वतांचा समावेश होत नाहीं. कुलाचल म्हणजे महापर्वत नव्हे, तर कांहीं कारणानें प्रसिद्धीस आलेले लहान पर्वत.

द्रोणागिरी—झांशीचे दक्षिणेस.
मैनाक—दमोहजवळ.
सोनगिरी—ग्वालेरच्या दक्षिणेस.
मुक्तागिरी—एलीचपूरचे उत्तरेस.
कुंतलगिरी—अहमदनगर व बीड यांच्यामध्यें.
गजपंथा—नाशीकच्या उत्तरेस.
मांगीतुंगी—धुळ्याजवळ.

---

सप्तवनें आतां शिल्लक नाहींत. सप्तर्षी, सप्तभुवनें, सप्तरसातळें सर्वांना माहीत आहेत म्हणून तीं दिलीं नाहींत. ही माहिती पौराणिक कथांतून येते म्हणून मुद्दाम शोध करून दिली आहे. या सर्व वर्णनावरून पौराणिक कालांत आर्यांची प्रगति हल्लींच्या सर्व आशिया, युरोप व आफ्रिकेचा उत्तर किनारा यापर्यंत होती असें स्पष्ट दिसतें. यावरून त्यावेळीं यापेक्षां दुसरा पृथ्वीचा भाग ज्ञात नव्हता असें दिसतें; असता तर त्याचेंही वर्णन त्यांनीं दिलें असतें. पासिफीक, अतलांतिक व हिंदिमहासागर हे त्यांनीं ओलांडिले नव्हते असें दिसतें.

20399

REFBK-0020311

REFBK-0020311